|| श्रीनरहरिवरद ||

मावळंकर सरदेसाई घराण्याचा इतिहास

॥ श्रीनरहरिवरद ॥

मावळंकर सरदेसाई

घराण्याचा इतिहास

(पूर्वार्ध — भाग १।२)

लेखक —

गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए., बडोदें;
गोविंद सखाराम सरदेसाई, कोल्हापुर.


तुम्ही संत माझिया कडा। दिठीचा कराल बहुडा।
तरि तुम्हां माने येवढा। होईन मी ॥
ज्ञानेश्वरी, अ० १६.

पुणें,
[किं. रु. ५] ओरिएंटल बुक एजन्सि. [ट. हं. निराळें]
१९२६.

मुद्रक—
वासुदेव नारायण ठकार,
श्रीसिद्धेश्वर प्रेस,
कोल्हापुर.

प्रकाशक—
डॉ. नरहर गोपाळ सरदेसाई, एल्. एम्. अॅन्ड् एस्.
ओरिएंटल बुक एजन्सि, शुक्रवार पेठ,
पुणें.

मावळंकरांचें कुलदैवत-श्रीनृसिंह, मौ० मावळंगें.



चित्रकार—नारायण रामकृष्ण सरदेसाई, मुंबई.

संपादकीय निवेदन.

मावळंकर सरदेसाई घराण्याचा वृत्तान्त व त्याचे जुने कागद प्रसिद्ध करण्याचा उद्योग कसकसा बनत गेला, हें पुढें विस्तारानें सांगण्यांत आलें आहे. अनेकांचा हातभार लागून नानाविध अडचणींतून हें बिकट काम बऱ्याच अंशीं सिद्धीस जाऊन तें श्रीकुलस्वामीच्या चरणासंनिध कुटुंबबंधूंस अर्पण करण्याचा योग प्राप्त झाला, ही त्याची मोठी च कृपा समजली पाहिजे. मुद्रणाचें काम सुरू झाल्यावर मागाहून बरी च माहिती व कागद उपलब्ध झाले व अद्यापि होत आहेत, यामुळें छापून गेलेल्या मजकुरांत कित्येक दुरुस्त्या कराव्या लागल्या त्या पृष्ठ २५६ वरील चौदाव्या प्रकरणांत दाखल केल्या आहेत. आरंभीं च त्या वाचकांनीं ध्यानांत घेतल्यास अनेक प्रमाद दूर होतील. या पूर्वार्धाचे दोन भाग करण्यांत आले असून, पहिल्यांत घराण्याचा वृत्तान्त व वंशावळी आणि दुसऱ्यांत सुमारें तीनशें पावेतों ऐतिहासिक पत्रें छापलीं आहेत. अद्यापि जास्त कागद व माहिती उपलब्ध होत आहे. ती उत्तरार्धांत छापावयाची असून, त्याचें दिग्दर्शन पृ. २६९ वरील पंधराव्या म्हणजे उपसंहाराच्या प्रकरणांत केलें आहे.

एकंदरींत हें काम जरी एका घराण्यापुरतेंच करण्यांत आलें आहे तरी त्यांतील माहिती व विशेषतः त्यांत छापलेले अस्सल कागद शिवशाहीपासूनचे असल्यामुळें त्यांचे योगानें महाराष्ट्राच्या ऐतिहासिक साधनांत नवीन बहुमोल भर पडत आहे. तिचा इतिहासप्रेमी वाचक योग्य सत्कार करितील अशी आशा आहे.

जिवंत राष्ट्रास आपलेपणाचा अभिमान पाहिजे. प्रथम स्वतःची ओळख नंतर कुटुंबप्रेम अशा परंपरेनेंच स्वदेशाभिमान उत्पन्न व्हावयाचा असतो. या दृष्टीनें पूर्वेतिहासाचे माहितीवरून स्वत्वाची जाणीव उत्पन्न होण्यापुरता जरी या ग्रंथाचा उपयोग घडला तरी केलेल्या श्रमाचें सार्थक झालें असें मानतां येईल.

प्रकाशकाचा निरोप.

प्रकाशनार्हं किल किं विरच्य प्रकाशयेत्को रचितं यथावत् ।
प्रकाशितं के रसिकाः पठेयुस्तापाः कवीनां त्रिविधाः प्रकाशाः ॥

या उक्तींत सांगितलेल्या त्रिविधतापांत सरदेसाई घराण्याचा हस्तलिखित वृत्तान्त सांपडलेला पाहून, त्यास यथाशक्ति हातभार लावावा या हेतूनें मी हें प्रकाशनाचें काम अंगावर घेतलें. या पुस्तकाचे वाचनानें समग्र घराण्यांत पूर्वींचें ऐक्य, आणि तपश्चर्या व राजकारण करण्याची प्रेरणा उत्पन्न होऊन त्याचा लौकिक वाढावा, एवढीच श्रीनृसिंहचरणीं प्रार्थना आहे.

ओरिएंटल बुक एजन्सी
नं. १५ शुक्रवार, पुणें.

नरहर गोपाळ सरदेसाई.
एल्. एम्. अँड् एस्.

अनुक्रमणिका.

भाग १ ला.—वृत्तान्त.

भाग २ रा.— जुने कागदपत्र

चित्रें—भाग १.

॥ श्रीनृसिंह प्रसन्न ॥

मावळंकर
सरदेसाई घराण्याचा इतिहास
भाग पहिला

प्रकरण पहिलें

या उद्योगाचें प्रयोजन

हिंदुस्थानच्या इतिहासापैकीं 'मराठी रियासत' या भागाचें काम करीत असतां, रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे आदिकरून अनेक संशोधकांनीं प्रसिद्ध केलेले कागदपत्र पाहण्यांत आले. त्यांत मावळंगेकर सरदेसाई घराण्यांतील पुरुषांचा उल्लेख कांहीं कांहीं ठिकाणीं केलेला आढळला; आणि या घराण्याकडून हि राज्याची कामगारी झाली असल्याचें दिसलें. अलीकडे उत्पन्न झालेल्या ऐतिहासिक संशोधनाच्या जागृतीमुळें पुष्कळ जुने कागदपत्र बाहेर आले, आणि त्यांच्या आधारें निरनिराळ्या घराण्यांच्या हकीकती हि प्रसिद्ध होऊं लागल्या. यामुळें या घराण्याची हकीकत स्वतंत्रपणें तयार करण्याची इच्छा होऊन ती फलद्रूप होण्याकरितां मनःपूर्वक प्रयत्न करावा असा संकल्प केला. रा. राजवाडे यांनीं सरदेसाई घराण्याच्या कर्तबगारीची प्रशंसा "इतिहास व ऐतिहासिक" या मासिकांत कैक वर्षांपूर्वीं एका स्वतंत्र लेखानें केली, ती वाचली असतां आत्मिक बुद्धीनें या घराण्यास मी उगीच फाजील महत्व देत आहें असा आरोप मजवर सहसा कोणीं करणार नाहीं असें वाटलें. या घराण्यासंबंधाचे जे कागदपत्र व जी माहिती हातीं लागली, तेवढ्यानें मराठ्यांच्या इतिहासांत जी थोडी बहुत भर टाकतां येण्यासारखी होती, तेवढीच टाकण्याचा माझा हेतु असता, तर तें काम स्वल्पायासें यापूर्वींच तडीस

गेलें असतें. परंतु इसवी सन ११५० पासून आजपावेतों म्हणजे सातआठशें वर्षें ज्या घराण्याचा थांग अविच्छिन्नपणें लागतो, ज्याच्या दहा पंधरा शाखा आजमितीस निरनिराळ्या प्रांतीं निर्वाहाची सोय पाहून किंवा करून नांदत आहेत, व ज्याची प्रस्तुत खानेसुमारी दोन हजारांवर आहे, अशा या घराण्याच्या सर्व शाखांच्या संपूर्ण व खात्रीलायक वंशावळी संपादन करून त्या मिळेल तितक्या माहितीनिशीं व सांपडतील तेवढ्या अस्सल कागदपत्रांसुद्धां विद्यमान व भावी वंशजांपुढें ठेवणें माझें आद्य कर्तव्य होय, अशी माझी भावना होऊन तो प्रयत्न करण्यास मीं उद्युक्त झालों, आणि सुरवातीस सन १९१४ च्या ऑगस्टांत पुढील विनंतिपत्र काढून ठिकठिकाणच्या सरदेसाई मंडळीकडे पाठविलें.

विनंति.

" कोंकणांत कित्येक जुनीं वतनदार घराणीं हयात आहेत, त्यांपैकीं मावळंगकर सरदेसाई ह्यांचें घराणें ऐतिहासिक दृष्टीनें विशेष महत्त्वाचें असून, चिपळुणापासून देवगडापावेतों ह्या घराण्याचीं वतनें होतीं. हल्लीं वतनाचा जरी पुष्कळ संकोच झाला आहे, तरी घराण्याच्या अनेक शाखा ठिकठिकाणीं नांदत आहेत. पूर्वीं ह्या घराण्यांतील पुरुषांनीं नाना प्रकारचे उद्योग करून वतनें संपादिलीं; त्यांचे कागदपत्र वगैरे बहुतेक नष्ट झाल्यामुळें मागील गोष्टींचें स्मरण हि आतां लुप्तप्राय झालें आहे. तथापि अद्यापि जे कागद सांपडण्याजोगे आहेत ते एकत्र करून त्यांजवरून सर्व घराण्याचा एक लहानसा वृत्तान्त तयार करावा आणि त्यास एक संपूर्ण वंशवृक्ष जोडून, त्याचें पुस्तक छापावें, अशी माझी इच्छा आज कित्येक वर्षांपासून आहे आणि आपलीही तशीच असेल.

प्रसिद्ध इतिहाससंशोधक रा० रा० विश्वनाथ काशीनाथ राजवाडे हे जुने कागदपत्र शोधित नुकतेच कोंकणांत प्रवास करीत असतां, त्यांनीं कसबा संगमेश्वर व प्रभानवल्ली येथून कित्येक जुने कागद ऐतिहासिक उपयोगाचे शोधून काढिले, आणि त्या सर्व कागदांचा एक स्वतंत्र खंड मीं छापावा म्हणून त्यांच्या नकला त्यांनीं मजकडे दिल्या आहेत.

परंतु अद्यापि सर्व कागद हातीं आले किंवा गोळा झाले असें नाहीं. संगमेश्वर व प्रभानवल्लीशिवाय इतरांचे संग्रहीं असे कागद असणें शक्य आहे; आणि ते सर्व एकत्र करून छापिले असतां, पुस्तक सर्व सरदेसाई मंडळीचे संग्रहीं राहण्यास पात्र होईल. सरदेसाई मंडळींशिवाय इतर घराण्यांशींहि सरदेसाई ह्यांचा संबंध आलेला होता. विशाळगडकर प्रतिनिधि, मलकापूरचे सबनीस, साखरपेकर गोंडे व कुळकर्णी वगैरेंच्या दप्तरांत सरदेसाई घरण्याचे कागद व पत्रव्यवहार असणें संभवनीय आहे. नुसते वतनी कागद पाहिजेत असें नाहीं, तर पूर्वीच्या काळचा पत्रव्यवहार मिळेल तितकाही पाहिजे आहे. प्रभानवल्लीचें दप्तर मीं तपासिलें आहे, व त्यांत मिळालेले सर्व महत्त्वाचे कागद मी छापण्यास घेत आहें.

करितां सर्व भाईबंदांस व हितचिंतकांस विनंति करण्याची कीं,–

१ आपल्या संग्रहीं अगर माहितींत सरदेसाई घराण्याचे जुने कागदपत्र, लेख, बखरी वगैरे असतील, तर अस्सल अगर नकला मेहेरबानीनें मजकडे पाठवून द्याव्या.

२ दुसऱ्या कोठें आपल्या घराण्याचे कागदपत्र असतील, असें आपणांस माहीत असल्यास कळवावें; म्हणजे तेथें यत्न करितां येईल.

३ एकंदर ‘ सरदेसाई ’ घराण्याची व त्याच्या सर्व शाखांची संपूर्ण वंशावळ तयार करावयाची आहे. सबब आपल्या संग्रहीं अगर माहितींत ज्या वंशावळी असतील त्या इकडेस पाठवून द्याव्या. वंशावळींत मुलींचीं व मुलींच्या वंशांचीं नांवें दाखल असावीं.

४ आपल्या वाडवडिलांचे पराक्रम अगर हकीकती आणि कज्जांचे निमित्तानें कोर्टांत वगैरे गुदरलेल्या कैफियती, ज्या आपल्या स्मरणांत अगर ऐकिवांत असतील, त्या लिहून काढून मेहेरबानीनें पाठवाव्या.

५ हें काम सर्व कुटुंबांचें आहे. सर्वांनीं त्यास हातभार लाविला पाहिजे. मला ह्या विषयाची आवड असून, यथाशक्ति मेहनत करण्यास मी तयार आहें. मात्र घरोघर हिंडून कागद व वंशावळी मिळविणें व त्यांच्या नकला काढून पाठविणें हें काम करण्यास आपण मदत दिली पाहिजे.

ह्या कामीं ज्या कांहीं सूचना आपणास कराव्याशा वाटत असतील त्या निर्भीडपणें अवश्य कराव्या. त्यांचा योग्य विचार मी करीन. ह्या कामीं जो टपालाचा किंवा इतर खर्च होईल तो करण्यास मी तयार आहें. पत्र पावतांच उत्तर यावें. कळावें ही विनंति."

सदरचें विनंतिपत्र पुष्कळ ठिकाणीं पाठवून वंशावळी, कागदपत्र व इतर माहिती आणविण्याची खटपट केली, आणि सवडीप्रमाणें सरदेसायांच्या शाखा हल्लीं नांदतात अशा प्रमुख ठिकाणीं स्वतः जाऊन तपास केला. वतनी मुख्य शाखा प्रभानवल्लीची; तेथील दप्तरांत महत्वाचे कागद बरेच मिळाले. त्यांत कांहीं आदिलशाहींतील व थोडे शिवछत्रपतींच्या वेळचे, व तेथून पेशवाईअखेर बरेच, आणि अव्वल इंग्रजींतील कांहीं असे मिळाले. पुष्कळशा कागदांच्या दोन दोन सुवाच्य नकला काढून त्यांचीं दप्तरें त्या वेळच्या मंडळींनीं व्यवस्थित करून ठेवलीं होतीं असें आढळून आलें. कागदांचें महत्व व ते जपून ठेवण्याची अवश्यकता या मंडळीस जशी वाटत होती तशी ती पुढील पिढ्यांस न वाटल्यानें अलीकडे त्या कागदांची निगा चांगली राहिली नाहीं. त्यामुळें जुनीं वेष्टनें फाटून गेलीं, पेटारे खराब झाले, कागद जीर्ण होऊन त्यांचे तुकडे पडूं लागले, आणि त्यांजवर वरचेवर हात फिरून त्यांची चालना व्हावयास पाहिजे होती ती मुळींच झाली नाहीं. अशा स्थितींतून-सुद्धां हजार पंधराशें कागद बचावले हें सर्वस्वीं या घराण्याचें व अंशतः आपल्या इतिहासाचें सुदैव होय. या कागदांपैकीं मला मिळालेल्या कागदांची होईल तितकी व्यवस्था करून त्यांजवर तारखा वगैरे घालून मीं ठेवीत आहें. त्यांपैकीं बहुतेक महत्त्वाचे कागद या पुस्तकांत प्रसिद्ध करण्याची तजवीज झाली आहे. तथापि ही गोष्ट सर्वस्वी घराण्याविषयीं जो अभिमान विद्यमान वंशजांचे ठायीं राहिला असेल त्यावर अवलंबून राहणार असून, माझ्या एकट्याच्या हातून जें काम शेवटास गेलें नसतें, तें अनेक सुबुद्ध वंशजांच्या साह्यानें सिद्धीस जाण्याचा योग आला आहे. मिळालेले सर्व कागद एकवार छापून निघाले तरच त्यांचा या नव्या स्वरूपांत बचाव

होईल. परंतु अस्सल कागदांचें संरक्षण इतउत्तर कसें होईल ही विवंचना असून त्यासंबंधांत कायमची योजना मला अद्याप सुचलेली नाहीं.

या प्रभानवल्ली दप्तरांतील ४०।५० अस्सल कागद रा. राजवाडे यांनीं पूर्वीं ' इतिहास व ऐतिहासिक ' या मासिकांत प्रसिद्ध केले होते. मासिकाच्या प्रति आतां दुर्मिळ झाल्या आहेत म्हणून, व या घराण्याच्या इतिहासाशीं त्यांचा निकट संबंध असल्यानें, ते सर्व कागद येथें पुनः छापिले आहेत.

यांशिवाय अमदाबाद येथील मावळंकरांचे घराण्यांतील बरेच कागद मिळाले तेहि यांत प्रसिद्ध केले आहेत. मावळंकरांची ही जी शाखा अमदाबादेस कायम झाली आहे, ती तिकडे अव्वल इंग्रजींत गेली असावी. या शाखेकडे ती कोंकणप्रांतीं असतां सैतवडें येथील सरदेशमुखी वतन चालत होतें. या शाखेंतील एक नरसो लक्ष्मण यांनीं अव्वल इंग्रजींत स.१८१८ ते १८५३ पावेतों तलाठ्याच्या नोकरीपासून सुरवात करून अखेर कंपनी सरकारांतून दोन गांव इनाम, पालखीची नेमणूक व रावबहादुरी मिळवून, बडोदें येथील रेसिडन्सींतील नेटिव एजंटाची मानाची जागा मिळविली होती. त्यांजवर अखेर एका रेसिडेंटाच्या अवकृपेमुळें जें किटाळ आलें त्याचा साद्यंत इतिहास पार्लमेंटनें छापविलेल्या " ईस्ट इंडिया पेपर्स—भाग ४, १८५३ इ." या ४।५ शें फूलसकॅप आकाराच्या पानांच्या पुस्तकांत पाहिल्यास तो फार चित्ताकर्षक वाटेल. त्याचा संक्षिप्त सारांश पुढें या पुस्तकांत देण्यांत येत आहे.

ऐतिहासिक महत्त्वाचे कांहीं कागद संगमेश्वर—दप्तरांतही आहेत. संगमेश्वर व प्रभानवल्ली या घराण्यांच्या शाखा अव्वल इंग्रजी अंमलापावेतों एकत्र होत्या त्यामुळें संगमेश्वरचे कागद बहुतेक प्रभानवल्ली कागदांच्या नकला आहेत असें दिसलें. तथापि संगमेश्वर-दप्तर योग्य प्रकारें तपासून पाहण्यास मला फुरसत मिळाली नाहीं; व तेथील मंडळीस तें काम करण्यास, कोणत्याहि कारणानें कां होईना, बनत नाहीं. हा उद्योग एकट्या दुकट्याच्या हातून तडीस जाणारा नव्हे, हें जाणून निरनिराळ्या शाखांच्या विद्यमान व्यक्तींनीं मनावर घेऊन आपापल्या शाखेपुरता—नव्हे केवळ स्वतःच्या घरापुरता—

जरी थोडासा उद्योग केला तरी केवढें कार्य होणार आहे हें समजणें अवघड नाहीं. यांत प्रसिद्ध होण्याचा राहिलेला असा मजकूर अनेकांस पुरवितां येईल; निदान यांतील माहिती दुरुस्त करण्याचीं साधनें कित्येकांजवळ सांपडतील; व त्यासंबंधांत आधार दाखविणारे कागदपत्र हि कित्येकांजवळ मिळतील. बंधुवर्गांनीं बिनदिक्कत यांत दर्शविल्या प्रकारचा पुरवठा केल्यास फार मदत होईल.

तथापि यानंतर कोणास तशी सुबुद्धि झाल्यास व पुरवणी पुस्तक काढण्याइतका मजकूर जुळल्यास तें छापविण्याची तजवीज अवश्य करूं एवढें आश्वासन देणें जरूर आहे.

अस्सल कागदपत्र, ऐतिहासिक किंवा घरगुती, कोणाजवळ असतील तर त्यांनीं ते बिनहरकत प्रसिद्ध करण्यास द्यावे; निदान त्यांच्या नकला तरी बरोबर करून पाठवाव्या. सामाजिक, कौटुंबिक किंवा ऐतिहासिक महत्वाखेरीज त्या कागदांस आतां इतर प्रकारची किंमत राहिलेली नाहीं. भाऊबंदकींतील कज्जेकफावतीनें वतनाचे बेसुमार तुकडे होऊन गेले आहेत. कायदे, कोर्टें व कज्जेदलाल यांच्या सपाट्यांत सांपडल्यानें, घराण्यांतील कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या हटवादीपणानें, व अंशतः आश्रितांच्या शिरजोरपणानें पण विशेषतः स्वतःच्या ऐदीपणानें, वतनांस कायमपणें मुकलेलीं अनेक कुटुंबें देशोधडीस लागलीं असून, आडनांव किंवा क्वचित् मूलस्थानाची पुसट आठवण, यांखेरीज त्यांस वतनांत हल्लीं कसलेंहि स्वत्व म्हणून उरलेलें नाहीं. तेव्हां कागदपत्रांच्या प्रकाशनानें कोणी उपटसुंभ पुढें येऊन उरावर बसेल व राहिलें सवरलेलें बळकावील ही भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आणि मध्यंतरीं बराच काळ लोटला असल्यानें जुन्या कागदांच्या प्रकाशनामुळें नष्ट झालेल्या हक्कांचें पुनरुज्जीवन होण्यास " मुदतीचा कायदा " हा प्रचंड व दुस्तर पर्वत आडवा पडलेला आहेच. तेव्हां जुन्या कागदांस तळघरच्या अंधारांत कुलूप किल्लीच्या भरभक्कम बंदोबस्तांत गुप्त ठेवण्यांत आतां कोणताहि मतलब नाहीं. कसरीच्या भक्ष्यस्थानीं पडून किंवा इतर प्रकारें त्यांचा सर्वथैव नाश होऊं देण्यापेक्षां,

साधेल तर त्यांचा उद्धार करणेंच हितावह आहे हें कोणी हि सांगेल. मग तें पटणें न पटणें हें ज्याच्या त्याच्या बुद्धीवर राहील.

एका काळीं " सात शत " गांवांची सरदेशमुखी अनुभवणाऱ्या या घराण्याची वतनी व इतर उत्पन्नाच्या हिस्सेरसीनें हल्लीं इतकी हलाखीची स्थिति झाली आहे कीं, हिशास आलेल्या उत्पन्नावर ४।५ माणसांच्या एकाद्या लहानशा सुद्धां कुटुंबाची गुजराण होणें मुष्किलीचें झालें आहे. इंग्रजी अंमलाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत निवळ सरदेशमुखीच्या उत्पन्नावर लोकांचा निर्वाह जेमतेम चालला. त्यापुढील पंचवीस वर्षांत कर्जवाम करून उत्पन्नाच्या गहाणविक्रीवर लोकांनीं दिवस काढिले. त्यानंतरच्या पंचवीस वर्षांत पोटें भरण्यासाठीं गडी माणसांना रजा देऊन शेतकामास स्वतः कंबर कसण्याचा प्रसंग सरदेसायांवर गुदरला; किंबहुना त्यांपैकीं कित्येकांस लोकांच्या घरीं मोलमजुरी करून कुटुंबपोषण कष्टानें चालवावें लागलें. उदरनिर्वाहास शेती अपुरी पडली व खोती नांवापुरती राहिली. सरकार देणें वक्तशीर वारून घर चालविणें कठिण झाल्यानें, कित्येकांनीं घरास रामराम ठोकला, आणि देशावर येऊन, मानापमान बाजूस ठेवून मिळेल तो धंदा केला व घरीं थोडा बहुत पैशाचा पुरवठा केला; म्हणूनच अद्यापि कांहीं जण तरी वतनास चिकटून राहिलेले दिसत आहेत. त्यांतच ते पूर्वीच्या बडेजावीची मिरवणूक करितांना दिसतात. बडा घर आणि पोंकळ वांसा अशी त्यांची वास्तविक स्थिति आहे. आहे तें संभाळण्याची त्यांच्यात ताकद नाहीं व तें कसें बसें जिवंत ठेवण्याचीसुद्धां त्यांच्यांत धमक दिसत नाहीं. वरील बेगडी मोठेपणाची ज्यांस निभावणी नव्हती ते मुकाट्यानें आपले वतनी हिस्से दुसऱ्याच्या स्वाधीन करून बहुधा कायमपणेंच अन्यत्र निघून गेले. त्यामुळें दूर दूर ठिकाणीं गेलेल्यांचा व त्यांच्या वंशजांच्या ठिकाणांचा आतां पत्ता लागणें दुष्कर झालें आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासांत या घराण्याचें ऐतिहासिक महत्व एके वेळीं बरेंच होतें हें इतर लेखकांनीं अनेक ठिकाणीं दाखविलें असून हें पुस्तक वाचल्यावर तशी खात्री होईल याबद्दल संशय वाटत नाहीं. मराठे-

शाहीच्या स्थापनेपूर्वीं पांचशें वर्षें अनेक राज्यक्रांत्यांच्या उलाढालींत, अंगावर चालून येणाऱ्या शत्रूंस वारंवार जमीनदोस्त करून, व आपलें वतनी कर्तव्य तत्परतेनें बजावून ज्यांनीं वतनें संपादिलीं, संरक्षिलीं आणि वाढविलीं त्यांच्या त्या त्या काळच्या दीर्घोद्योगाची आणि चिकाटीची हकीकत बहुतांशीं नष्ट होत आली असून उरलेली अल्प स्वल्प माहिती त्याच पंथास लागली आहे. आदिलशाहीच्या पूर्वींचा कागद एकसुद्धां मिळत नसून शिवछत्रपतींच्या वेळचा १।२रा व औरंगजेबाच्या कारकीर्दींतील १०।५ एवढेच कागद आज उपलब्ध झाले आहेत. आमच्या हातीं आलेल्या कागदांचा भरणा मुख्यत्वें अठराव्या शतकांतला आहे. या कालांतील विशिष्ट पुरुषांच्या उद्योगाचा उल्लेख पुढें ठिकठिकाणीं करण्यांत आला आहे; आणि या शंभर वर्षांतील आपल्या पूर्वजांची कामगिरी त्यांस भूषणावह व आम्हांस अभिमानास्पद आहे. या म्हणण्याची सत्यता हें पुस्तक वाचणारांस पटेल; कारण त्याबद्दलचा अस्सल कागदपत्रांचा भरपूर पुरावा येथें दिलेला आहे. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत मराठी राज्याची मुहूर्तमेढ रोंविली गेली, आणि अठराव्या शतकांत त्याच्या अभिवृद्धीचा कळस झाला; अर्थात् अठरावें शतक व त्यांतील महाराष्ट्रीयांची करामत या दोहोंबद्दलची आठवण मनोवृत्तींस उचंबळविणारीच असणार. अनेक सुप्रसिद्ध वीरपुरुषांचा, मुत्सद्यांचा तो भाग्योदय काळ. आज महाराष्ट्रीयांचीं जीं लहान मोठीं संस्थानें दृष्टीस पडत आहेत तीं, किंवा गेल्या शतकांत जीं संपुष्टांत आलीं तीं सर्व, याच शंभर वर्षांत अस्तित्वांत आलीं. मराठ्यांच्या अंगचे गुणावगुण याच कालांत पूर्णत्वानें प्रकटले. वरवर विचार केला तरी देखील आढळून येईल कीं, मराठ्यांच्या राज्याच्या प्राणप्रतिष्ठेच्या कालीं ज्यांचीं नांवें इतिहासांत प्रामुख्येंकरून चमकतात त्यांच्या वंशजांपैकीं बहुतेकांचा आजमितीस पत्ता हि नाहीं. ज्या अनेक देशमुखांनीं एकनिष्ठेनें शिवछत्रपतीच्या उद्योगास पराकाष्ठेचें साहाय्य केलें, त्यांचे आजचे वंशज कोणत्या स्थितींत आहेत? एसाजी, तानाजी, बाजी प्रभु, बाजी जेधे सर्जेराव यांच्या वंशांची स्मृति तरी आज उरली आहे काय? आज-

मितीस सुप्रतिष्ठित असलेले बहुतेक संस्थानिक व जहागिरदार एकाद-दुसऱ्या पराक्रमी पूर्वजाचे वंशज आहेत कीं, पिढ्यानुपिढ्या पराक्रम गाजविणाऱ्यांचे सुपुत्र आहेत ? या प्रश्नांचा किंचित् विचार केल्यास असें आढळून येईल कीं, ज्यांनीं स्वार्थाकडे नजर न देतां, केवळ राष्ट्रासाठीं व धन्यासाठीं आपल्या सर्वस्वाचा बलि दिला, त्यांच्या पदरीं फक्त हाल-अपेष्टेचें फळ पडलें; आणि ज्यांनीं आपल्या कर्तबगारीस मतलबाची पुष्टि दिली त्यांनीं मात्र स्ववंशजांस विशेष आयासाशिवाय निर्वाह करण्याची सोय राखून ठेविली. असो. तर तात्पर्य काय, कीं मतलबावर दृष्टि न ठेवणाऱ्या अनेक देशमुखांप्रमाणें 'सरदेसाई' हि गंगेंत न्हाऊन कोरडे राहिले; आणि थोड्या पिढ्या गेल्या नाहींत तोंच उदरंभरणार्थ परागंदा होण्याची पाळी त्यांजपैकीं बहुतेकांवर आली ! !

मराठेशाही बुडाल्यानंतर आरंभींच्या शांतिसौख्याच्या अल्प काळांत या घराण्याची वंशवृद्धि मात्र पुष्कळ झाली. या वृद्धीला पुरेल इतकी कामगारी घरीं किंवा बाहेर न मिळाल्यानें, पहिली उद्योगपरंपरा तुटली. हातपाय पसरण्यास ऐसपैस जागा न सांपडल्यानें घरांतल्या घरांत रेटारेटी करून आपसांत यादवी माजविण्याची दुष्ट खोड या विस्तृत संततीस स्वाभाविक च लागली. यामुळें झालेल्या सर्वंकष् अधःपाताची अटकळ स्वानुभवानें पुष्कळांस झाली असेलच. ज्यांस ती झाली नसेल, त्यांस ती करण्याइतकी सामुग्री पुढील पानांत मिळेल असें मला वाटतें. एके काळीं ज्यांनीं संगमेश्वर, राजापुर, दाभोळ, विशाळगड इत्यादि पश्चिम समुद्राकडील बाजूनें बाहेर पडून कोल्हापुर, सातारा, पुणें या मध्यवर्ति ठिकाणीं व बेदर, विजापुर, विजयानगर वगैरे पूर्व दिशेकडच्या दूर दूर प्रांतीं निर्जन जंगलांतून, अनोळखीच्या प्रदेशांतून, मुठींत जीव धरून, संकटांची पर्वा न करतां अनेकवार मोठमोठ्या मजला मारिल्या, एकमेकांचा पाठपुरावा मोठ्या कसोशीनें केला, आपल्या वतनांचा बचाव जीवापाड श्रम करून केला आणि आपल्या पूर्वार्जित हक्कांत कमतरता येऊं दिली नाहीं, किंबहुना, हरघडीं नवीन मानमरातब संपादन केले, त्यांच्याच वंश-

जांनीं अलीकडच्या शेंपाऊणशें वर्षांतल्या सुखसोयींच्या साधनांनीं सुधारलेल्या संपन्न काळांत जन्मास येऊन ऐदी, अदूरदृष्टि आणि कलहप्रिय बनून नवीन संपादन तर केलें नाहींच, परंतु पूर्वसंपादित संभाळण्याचें सोपें काम तें सुद्धां बरोबर बजावलें नाहीं ! उलट सावकार, वकील व कोर्टें यांची यथाविधि शास्त्रोक्त पूजा करण्याचें व्रत घेऊन सर्वार्पणविधीनें त्याची सांगता केली आणि स्वतः भिक्षावृत्ति अवलंबिली ! मागल्यांची उघड उघड दिसणारी "स्वार्थपरायणता" व पुढल्यांचा ढळढळीत प्रत्ययास आलेला "स्वार्थत्याग" यांचा तुलनात्मक दृष्टीनें सांगोपांग विचार केल्यास, प्रवृत्ति-निवृत्ति मार्गांच्या व्यावहारिक खरेखोटेपणावर कांहीं वेगळ्याच प्रकारचा प्रकाश पडेल असा भरंवसा वाटतो. एतदर्थ सर्व सरदेसाई कुंटुंबीयांस माझी आग्रहाची विनंति आहे कीं, गेल्या शेंपाऊणशें वर्षांतील वतना-संबंधी भाईबंदकीचे, मारामारीचे आणि एकमेकांचा उच्छेद करणारे असे वाद किंवा बनाव त्यांच्या दप्तरीं सांपडतील तर त्यांची हकीकत लिहून ती त्यांनीं इकडे पाठवावी. पुरवणीनें त्यांची प्रसिद्धि करूं. त्यांच्या हकीकतींचा संकलित वृत्तान्त या पुस्तकाच्या शेजारीं मांडल्यास उभयविध कर्तबगारीचे मासले एकेजागीं पहावयास मिळतील; महाराष्ट्रीय जनांची मनोरचना होती कशी व झाली कशी व कां याचें शब्दचित्र काढितां येईल; आणि शितावरून भाताची परीक्षा या न्यायानें त्यावरून एकादा ऐतिहासिक धडा हि शिकतां येईल.

बाराव्या शतकाचे पूर्वार्धांत नृसिंहभट्ट सत्यवादी यांनीं कोकणांतील मावळंगें गांवीं श्रीनृसिंहदेवाच्या आवारांत आपल्या घराण्याचें हें लहान रोपटें लाविलें. श्रीकुलस्वामीच्या कृपाप्रसादानें सतराव्या शतकाच्या अखेरपावेतों ६५० वर्षें त्याची वाढ मोठ्या जोरानें होऊन शाखाविस्तार दूरवर पसरला; त्यास कर्तबगार, पराक्रमी व पुढच्यांनीं नांवाजण्यासारख्या संततीच्या फळांचा बहार एकसारखा येत राहिला. पण पुढच्या शें-दीडशें वर्षांत त्याच्या भरपूर वाढलेल्या व इतस्ततः पसरलेल्या अनेक शाखांस पुष्कळ मोहर येऊन हि फलनिष्पत्ति मात्र पूर्वींच्या तोडीची निपजेनाशी

झाली; आणि कांहीं शाखा तर वठण्याच्या स्थितीस येऊन पोंचल्या. ज्या रत्नागिरिप्रांतावर त्याची सांवली एकेकाळीं बहुतांस सुखदायी व सर्वांस आश्रयणीय होती, त्याच प्रांतांत आतां त्याच्या पूर्वकालीन संपन्नतेची आठवणहि लोकांत बुजूं लागली, आणि शाखा तुटून गेल्यानें मूळ खुंट सांप्रतच्या विपन्नतेचें चिन्ह म्हणूनच जणूं काय ठिकाणावर राहिला. हा बदललेल्या परिस्थितीचा परिणाम आहे किंवा घराण्याच्या नादानपणाचा पुरावा आहे हें कोणी सांगावें ? स्थित्यंतराचा असला देखावा इतर अनेक प्रसिद्ध घराण्यांच्या बाबतींत देखील आढळतो; आणि त्यावरून काळ किंवा दैव यांवर आपल्या कंगालपणाचा आरोप बेशक करण्यास आपल्यास सवड व सबब मिळते हें खरें. परंतु मेंदूस थोडकासा शीण दिल्यास स्पष्ट दिसून येईल कीं, वैभवशाली पूर्वजांवर ओढवलेल्या संकटपरंपरेचा फार लहान हिस्सा आपल्या वांट्यास आलेला आहे. त्यांचें धैर्य व त्यांची कर्तबगारी मात्र आपल्यांत काडीइतकी राहिलेली नाहीं. इतिहास वाचतांना ज्या पुरुषांचीं नांवें आपणांस आदरणीय वाटतात, त्यांचेच आपण वंशज आहों, ही आठवण आम्हांस कोणी तरी करून देणें हल्लीं भाग पडत आहे; ही गोष्ट जरी खरी आहे, तरी ती खात्री पटल्यावर पूर्वजांच्या अनेकविध कर्तबगारीचें वर्णन वाचून त्यांचा लौकिक अजिबाद नाहींसा होऊं नये याची खबरदारी एकाददुसरा महाराष्ट्रीय सुपुत्र आतांहि घेणार नाहीं असें तरी कां समजावें ? पूर्वीच्या सरदेसायांनीं स्वतःच्या कर्तबगारीनें आपल्यास नायक म्हणवून घेतलें. आम्हींहि मोठ्या दिमाखानें आपल्या नांवापुढें ती पदवी लावीत आहों. तथापि ती सार्थ करण्यास आम्हांस संधि नाहीं असें नाहीं; किंबहुना, अंगची करामत दाखविण्यास आजच्या शांततेच्या काळीं पुष्कळ निरनिराळे मार्ग मोकळे आहेत. त्यांपैकीं एकाद्या मार्गानें जाऊन स्वदेशबांधवांस मान तुकवावयास लावीनच लावीन, अशी प्रेरणा माझ्या बंधुवर्गापैकीं कोणा सभाग्यास या पुस्तकाच्या वाचनानें झाल्यास माझ्या श्रमाचें सार्थक होईल.

अंगीं पराक्रम नसला आणि निर्वाहास उद्योगाचें क्षेत्र सहजीं मिळालें नाहीं, म्हणजे वडिलार्जित उत्पन्नावर हक्क सांगून त्याचा मिळवेल तेवढा तुकडा पदरीं पाडून घेण्याचा मोह किती अनावर होतो याचें एक उदाहरण म्हणून, भगवंत शामजी नायक यांनीं ता० १९ माहे मे सन १८२९ इ० रोजीं कलेक्टराकडे केलेला अर्ज येथें देतों. या एका मासल्यावरून या पुरातन घराण्याचीं वतनें कशीं नष्ट झालीं तें कळून येईल.

" सेवेसीं अर्ज भगवंत नायक बिन शामजी नायक सरदेसाई मामले प्रभावळी सुभा प्रांत राजापूर व दाभोळ व देसाई तर्फ संगमेश्वर व कोंडिवरें, हल्लीं राहणार मौजे मावळंगे, ऐसाजे—

" अंजनवेल व रत्नागिरी या दोन तालुक्यांत आमचे गांवगन्ना हक्क वडिलार्जित आहेत, त्यास पुरातनपासून समाईक वतनाची वहिवाट चालत आहे. आह्मी वेगळे जाहलेले नाहीं. रंगोबा नायक सरदेसाई रा० झोंबडी हे व आम्ही एकत्र होतों, ते स. संमान अशरीनचे सालीं (१८२७ इ०) विभक्त जहालों. त्यास तालुके अंजनवेल व रत्नागिरि येथील वतनांची वांटणी जहाली नाहीं. दरोबस्त वतनांपैकीं तिसरी तक्षीम माझी आहे. परंतु अंजनवेल येथील आमचे तिसरे तक्षिमेचे हक्काबद्दल आबाजी नायक बिन अंतोबा नायक व गोविंद नायक बिन रंगोबा नायक यांनीं मजला तूर्त अदमासें दोनशें रुपये गांवगन्ना लावून दिल्हे ते मी सावकार यांजकडे गहाण लावून दिल्हे आहेत; त्याचा वसूल सावकार रदकर्जांत घेतात. व तालुके रत्नागिरि येथील हक्काची वहिवाट राघोबा नायक बिन दादोबा नायक हे माझे पुतण्ये व गणोबा नायक बिन प्रल्हाद नायक हा माझा नातू हे उभयतां वतनाची वहिवाट करितात. त्यांतील माझ्या तिसऱ्या तक्षिमेचे हक्काचे रुपये अदमासें ९०० होतात ते देतों म्हणतात परंतु वांटणी करून देत नाहींत. याजकरितां माझ्या तिसऱ्या तक्षिमेचे हिशाबद्दल राघोबा नायक बिन दादोबा नायक व गणोबा नायक बिन प्रल्हाद नायक राहणार संगमेश्वर यांजवर मी ऐन रुपये ९०० व त्याची दसपट रु० ९००० याची अर्जी मी करणार, त्यास मजजवळ कमि-

शन भरून अर्जी करावयास सामर्थ्य नाहीं, यामुळें मी धर्मअर्जी करणार त्यास मजजवळ जिंदगी आहे ती वितपशील—

रु.३० सोन्याचे दागिने बाळ्या बुगड्या खडकपात्रें मिळोन	रु.१७ तांब्याचीं भांडीं—स्वयंपाकाचीं ८, तांबे पंचपात्र्या ७, देवपूजेचीं २ मिळोन किं. १७ रु.
रु.१० जोडवीं विरोध्या रुप्याच्या.	रु.१० जुनीं चिरगुटें लुगडीं मुकटे वगैरे.
रु.१९ गुरें—हैस १, पाड्या लहान ३, पाडा १, पाड्या लहान ३, बैल १, मिळोन किं. १९ रु.	

एकूण जिंदगी रु. ८६.

एवढी जिंदगी मजजवळ आहे, त्याशिवाय जिंदगी नाहीं. एविशींचा गांवचे कमाविसदाराचा दाखला आणावा तर मी ज्या गांवीं राहतों त्या गांवची वहिवाट प्रतिवादींकडे आहे व शेजारीं लगत गांवगन्ना वहिवाट त्यांजकडेच आहे. यामुळें प्रतिवादी दाखला देत नाहींत. ऐशास साहेब मेहरबान होऊन धर्मअर्जी करण्यास हुकूम व्हावा. ”

केवळ मासल्याकारितां म्हणून वरील उतारा येथें दिला आहे. त्यांत कोणाची अवहेलना करण्याचा मुळींच हेतु नाहीं. वतनाचे हिस्से न होऊं देण्याविषयीं सरकारांतून आरंभापासून दक्षता ठेवण्यांत आली असती तर आज ४।५ घराणीं सुस्थितींत पहावयास मिळतीं व वरल्या मासल्याची भाऊबंदकी टळती!

वि० सू०—या घराण्याचा साद्यंत वृत्तांत लिहून प्रसिद्ध करावा या हेतूनें आज १०।१२ वर्षें खूब खटपट केली. विद्यमान सुशिक्षित बंधुवर्गाकडून माहिती मिळेल म्हणून आरंभीं जी अपेक्षा होती ती अनुभवांतीं खोटी ठरली. शेंकडा एक या प्रमाणांत हि अवश्य ती माहिती मिळाली नाहीं. अर्थात् गोळा झाली तेवढीच माहिती प्रसिद्ध करणें अवश्य वाटलें. त्यामुळें हा वृत्तान्त फार अपुरा राहिला आहे याची जाणीव मला आहे. परंतु या प्रयत्नाची सर्व सामान्य दिशा सर्वांस कळावी आणि असलेली माहिती तरी नष्ट होऊं नये ह्या हेतूनें, अनेक दोषांची जाणीव असतांही

हा भाग शक्य तितका पुरा करून वाचकांचे हातीं दिला आहे. त्यावरून यांतील अपुरेपणा काढून नवीन दुरुस्त आवृत्ति काढण्याचें श्रेय दुसरे कोणी कुटुंबबंधु घेतील तर त्यांत मला संतोषच होईल.

प्रकरण दुसरें.

घराण्याचें दप्तर.

कोल्हापुरचा शिलाहारवंशी राजा विजयार्क याच्या वेळेपासून म्हणजे इ० स० ११५० पासून जरी या घराण्याचा पत्ता लागतो, तरी पुढें छापलेल्या बखरींत लिहिल्यापेक्षां अधिक ऐतिहासिक माहिती मिळण्यासारखे कागद किंवा इतर साधनें आजमितीस सांपडलेलीं नाहींत. मराठशाहीच्या स्थापनेपूर्वी दोन चारशें वर्षें कोंकणप्रांतीं हें घराणें सरदेशमुखीचा अधिकार चालवीत आलें व पुढेंहि तो त्यांचा अधिकार कायम राहिला. परंतु या मुदतींतील त्यांच्या दप्तराचा मात्र कांहींच सुगावा लागत नाहीं. मराठशाहींत खिळणा ऊर्फ विशाळगड किल्ला व त्या खालील तळघांटचा व वरघांटचा प्रदेश जेव्हां पंत प्रतिनिधींकडे सोंपविण्यांत आला, तेव्हां त्या प्रांताची सरदेशमुखी चालविणारें हें घराणें प्रतिनिधींचें साक्षात् ताबेदार झालें, व त्याची एक शाखा कायमपणें विशाळगडीं राहूं लागली. दाभोळपासून खारेपाटणपावेतों व वरघांटीं मलकापुरापर्यंत सुमारें ७००।७५० गांवांचा टापू हा सरदेसायांचा वतनी अंमलाचा प्रांत होता; आणि जरूरीप्रमाणें तो अंमल निरनिराळ्या सुभेदारांच्या ताब्यांतील प्रदेशांत निरनिराळ्या ठाण्यांत राहून या घराण्यांतील एक किंवा अनेक पुरुष चालवीत आले. कागदपत्र मिळतात ते सर्व याच काळापासूनचे; परंतु प्रसंगोपात हीं घराणीं वेगवेगळीं राहूं लागलीं व उद्योगधंद्यामुळें कित्येक दूर दूर

ठिकाणीं जाऊन राहिलीं. त्यामुळें, कागदांची पांगापांग होऊन त्यांचें महत्व न समजणारांच्या हातीं असलेले कागद नाश पावले असावे. क्वचित् अद्यापिहि असावेत असा अंदाज आहे; परंतु दुसऱ्याच्या हातीं ते लागूं न देण्याची दक्षता मालकांच्या ठिकाणीं जी कोठें कोठें दिसण्यांत आली ती पाहतां, कागद दुसऱ्यांस दाखविण्याची सुबुद्धि उत्पन्न होईपर्यंत कागदांचीच इतिश्री होईल अशी भीति वाटते. आतांपर्यंत केलेल्या तपासांत विशाळगडच्या वडील शाखेच्या वंशजांकडे कागदपत्रांचें बरेंच मोठें दप्तर मिळालें. सर्वांत जुने कागद तेथेंच मिळाले; आणि या दप्तरांत मिळालेल्या साधनांवरूनच हा वृत्तान्त मुख्यतः तयार केला आहे. ही शाखा हल्लीं विशाळगडाच्या पायथ्याशीं प्रभानवल्ली गांवीं नांदत आहे. वतनाचा भोगवटा करणाऱ्या सरदेसायांत ही शाखा वडील होय.

या गांवाचें प्राचीन नांव प्रभावळी असून त्याचा आधुनिक अपभ्रंश प्रभानवल्ली असा झाला आहे. येथेंच पूर्वीं मामल्याचें ठाणें होतें. मुसलमानी अंमलांत त्याचें नांव मुज्फराबाद असून त्या वेळच्या मुसलमानी कागदांत त्या नांवानें त्याचा उल्लेख केलेला आहे. येथें मिळालेल्या कागदांत स० १६६० नंतरचे व तेथून थेट अव्वल इंग्रजी अंमलापर्यंतचे कागद मिळाले. कांहीं वर्षांपूर्वीं यांतील ४०।५० निवडक कागद रा. राजवाडे यांनीं धुळ्याच्या 'इतिहास व ऐतिहासिक' मासिकांत शिवकालीन घराणीं 'प्रभानवल्ली-सरदेसाई' या माथाळ्याखालीं छापून प्रसिद्ध केले आहेत. प्रभानवल्ली-दप्तरांतील कागदांचा मुख्य भरणा सन १७०० ते १८०० या मुदतींतील आहे. ३०।४० फारशी कागदही आहेत. मला मिळालेल्या कागदांपैकीं बहुतेक सर्व महत्वाचे कागद हल्लीं प्रसिद्ध करण्यांत येत आहेत.

याच दप्तरांत या घराण्याच्या बखरीच्या जुन्या, विश्वसनीय, व महत्वाच्या माहितीच्या दोन प्रती मिळाल्या. त्यांपैकीं एक अपुरी होती ती रा. राजवाडे यांस मिळाली होती, ती त्यांनीं वरील मासिकांत ले. ५ म्हणून प्रसिद्ध केली. दुसरी पुरी झालेली प्रत मला मिळाली ती पहिलीशीं ताडून पाहतां मूळच्या एका निराळ्या प्रतीवरून या दोन्ही नकललेल्या

दिसल्या. मूळची प्रत अस्सल असावी. ही बखर प्रथमच या पुस्तकांत साग्र प्रसिद्ध होत आहे. इतक्या प्राचीन घराण्याची सुसंगत बखर तयार करवून तिची प्रत जपून ठेविल्याबद्दल मावळंगकर सरदेसायांची प्रशंसा मोकळ्या मनानें रा.राजवाड्यांनीं केली आहे. त्यांच्या लेखाचा गोषवारा पुढें दिला आहे.

मावळंकरांचा संबंध सरदेशमुखी नात्यानें ज्या या प्रांताशीं होता त्या प्रांताशीं ऐतिहासिक संबंध इतर मोठमोठ्या घराण्यांचाहि या वेळीं आला. सातारा व कोल्हापुरचे छत्रपति, त्यांचे पंतप्रधान पेशवे, पंत प्रतिनिधि व पंत आमात्य, हबसाणचे शिद्दी सुभेदार, मराठी आरमाराचे आंग्रे सरदार, आणि जोत्याजी केसरकर, खंडोजी माणकर वगैरे मराठी राज्याचे इकडील सुभेदार यां सर्वांशीं मावळंगकर सरदेसाई यांचा झालेला पत्रव्यवहार दप्तरांत मिळाला आहे. राजवाड्यांनीं प्रसिद्ध केलेल्या पत्रव्यवहारावरून या दप्तराच्या महत्वाची कल्पना थोडीबहुत होईल. वर निर्दिष्ट केलेली बखर किंवा त्यांचा लेखांक ४३ " निवें येथील हकीगत" यांवरून तत्कालीन राजकीय परिस्थिति चांगल्या प्रकारें अजमावितां येते. मावळंगकरांचीं एकमेकांस गेलेलीं खाजगी पत्रें सामाजिक व कौटुंबिक परिस्थिति-निदर्शक आहेत. शके १८३५ च्या भा. इ. सं. मंडळाच्या इतिवृत्तांतील लेखांक ४७ यावर ई. स. १६९६ सालची रंगोबानायक मावळंगकराची सही " देसक मामले हमजाबाद" अशी असून त्याच कागदावर बाळाजी विश्वनाथ श्रीवर्धनकराची " देशमुख दंडाराजपुरी " अशी सही आहे.

दहा वर्षांखालीं प्रभानवल्ली दप्तर मीं तपासिलें. तेव्हां केलेल्या अंदाजानें सुमारें ⅓ कागद अगदीं नाहींसे झाले होते. माझ्या स्वाधीन मिळालेल्या कागदांशिवाय बाकीच्या दप्तरची आजची स्थिति काय झाली असेल तें सांगवत नाहीं

या दप्तरांत सुमारें ४५ फारशी लेख मिळाले त्यापैकीं सुमारें २५ कागद प्रो. यदुनाथ सरकार यांजकडे भाषांतराकरितां पाठविले होते. त्या लेखांचा मतलब त्यांनीं थोडक्यांत लिहून पाठविला. मासल्याकरितां ५ लेखांचें तात्पर्य येथें देतों—

(१). ता. १३।३।१६५५ इ०—केशव राघोबा नायकांस विजापुरची सनद—मुस्तफाबाद ऊर्फ दाभोळ व मुज्फराबाद ऊर्फ प्रभानवल्ली येथील सरदेशमुखीच्या पहिल्या सनदा घर जळालें त्यांत नाश पावल्या, त्या नवीन करून दिल्यासंबंधीं—

(२). ता. १६।३।१६५८ इ०—विजापुरच्या अली आदिलशहाचें प्रभानवल्लीचा हवालदार सय्यद नुरुल्लाखान याचें नांवें, " बंडखोरांचें पारिपत्य करून देशमुखांचा वसूल सुरळीत देवविण्याबद्दल " फर्मान.

(३, ४). ता. ९ व १४।१०।१६५९ चीं दाभोळ सुभ्यास फर्मानें. " रंगोबा नायक बिन केशव नायक यांचें सरदेशमुखीचें वतन, गांवें व इनामें वंशपरंपरेनें चालत आहेत असें अफ्जलखान कळवितात. तुम्हीं हल्लीं तीं जप्त केल्याचें समजतें, तरी तीं त्यांजकडे सुदामतप्रमाणें चालू ठेवावीं. त्यांस सरदेशमुखीवर पूर्णपणें कायम करण्यांत येत आहे," म्हणून वगैरे. हीं फर्मानें मिळविण्यांत अफ्जलखानाची मदत सरदेसायांस पुष्कळ झाल्याचें उघड दिसतें. अर्थात् ते शिवछत्रपतीस सामील झाले नाहींत.

(५). कान्होबा नायकाचा बंधु विसोबा नायक यास इनामी उत्पन्नाची वहिवाट करण्याबद्दल औरंगजेब बादशहाचें सन १६९१चें फर्मान.

यांशिवाय असलीं फर्मानें वरचेवर मिळालेलीं असून, तीं १७०४ सालीं औरंगजेबानें पुनः नवीन करून दिलीं आहेत.

दंडाराजपुरी म्हणजे जंजिरा येथील शिद्दी सत्ताधाऱ्यांकडील हि फर्मानें पुष्कळ आहेत. तीं बहुधा मोडी लिपींत व नांवाला मराठी भाषेंत आहेत. त्यांतील फारसी शब्दांचा भरणा इतका मोठा आहे कीं, निवळ मराठी जाणणारांस तीं समजणें कठीण.

वतनासंबंधाचीं हीं फर्मानें पाहिल्यास सरदेशमुखी वतन आपल्या हातांतून न जाऊं देणें हेंच सरदेसायांचें बरेंच बिकट कर्तव्य होऊन बसलें होतें. हल्लींच्या सार्वभौम सरकारच्या नियंत्रणाखालीं असलेले व बाह्यतः तरी कायदेकानूंचीं बंधनें पाळण्याची शपथ घेणारे, आणि राज्यारोहणप्रसंगीं प्रजावात्सल्याचीं गोडगोड वचनें देणारे, लुंगेसुंगे संस्थानिक सुद्धां पिढ्यानुपिढ्या

चालत आलेलीं वतनें किंवा उत्पन्नें लहरीसरशीं काढून घेतानां केव्हां केव्हां आढळतात; तर पूर्ण सत्ताधारी व पुष्कळ वेळां हम करे सो कायदा याच धोरणानें वागणाऱ्या २००।३०० वर्षांपूर्वींच्या राजांच्या कारकीर्दींत वतनें संभाळण्याचें काम किती बिकट असलें पाहिजे, याची कल्पना फक्त संस्थानी प्रजेसच बरोबर होईल. बेदर, विजापुरचे सुलतान, जंजिऱ्याचे शिद्दी, दिल्लीचे बादशहा, व मराठे छत्रपति यांच्याशीं, व त्यांजकडून वेळोवेळीं आपल्या प्रांतावर अंमल करण्याकरितां नेमून आलेल्या अधिकाऱ्यांशीं संधान बांधून, त्यांच्या धोरणानें वागून आपल्या हक्कांस त्यांची बाधा न व्हावी म्हणून, सरदेसायांस केवढी जबरदस्त खबरदारी घ्यावी लागत होती, व प्रसंगीं या अधिकाऱ्यांशीं त्यांस किती संभाळून झगडावें लागे, याचें अनुमान हे कागदपत्र पाहिले म्हणजे होतें. वतनाविषयींची सरदेसायांची एकनिष्ठा व तें हातचें न जाऊं देण्याविषयीं त्यांचें धोरणी वर्तन, हीं खरोखर कौतुक करण्यासारखीं आहेत. तथापि येथें हें हि सांगणें अवश्य आहे कीं, इतर वतनदारांप्रमाणें सरदेसायांत हि स्वराज्याची चाड दिसत नाहीं, किंबहुना, स्वराज्याची विस्तृत भावना आणि तज्जन्य देशाभिमान हीं त्यांच्या गांवीं हि नव्हतीं, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. आपलें वतन राखण्यापलीकडे त्यांची दृष्टि कधीं गेली नाहीं. मराठशाहीच्या गर्भवासांत चहूंकडे सभोंवार एक प्रकारची खळबळ उडून राहिली असतां देखील, पहिल्या धन्याच्या जागीं आलेल्या दुसऱ्या मालकाची पायधरणी करून आपल्या वतनाचा नव्या सनदापत्रांनीं बंदोबस्त करून घेण्यापेक्षां कर्तव्याची अन्य दिशा त्यांस केव्हां हि दिसली नाहीं. या संकुचित दृष्टीबद्दल त्यांची म्हणजे इतरांपेक्षां विशेष कसूर होती असें नाहीं, परंतु शिवछत्रपतीसारख्या ज्या थोड्या मंडळींनीं त्या वेळीं स्वदेश व स्वधर्म यांच्या उद्धारार्थ आपल्या जीवाचें रान केलें, त्यांचें अनुकरण करून यांनींहि हातपाय हालविले असते तर कांहीं बिघडलें नसतें. देशमुखीचें आपलें कर्तव्य बजावण्यांत मात्र त्यांजकडून केव्हां हि कसूर झालेली नाहीं; मग कारकीर्द मुसलमानी असो वा हिंदु असो, जंजिरा येथील शिद्दीची असो वा पंत प्रतिनिधींची असो.

प्रभानवल्ली दप्तरांतून या इतिहासास कागदांचा पुरवठा मुख्यत्वें झाला हें वर सांगितलें आहे च. संगमेश्वर येथील घराण्याचें हि दप्तर आणखी पुरवठा करण्याजोगें आहे. तें दप्तर पाहून कागद निवडण्याचें काम कोणीं तरी अंगावर घेऊन पार पाडिलें पाहिजे.

देवळें, वेरवली, मोडें, पन्हाळा, कोल्हापुर या ठिकाणीं सरदेसायांच्या शाखा नांदूं लागल्यामुळें तिकडील दप्तरांचा तपास करतां तेथून कांहीं माहिती मिळाली. तथापि सर्व ठिकाणीं पुष्कळ अधिक तपास व्हावयास पाहिजे आहे. आधीं हीं दप्तरें क्वचित् व्यवस्थित असतात. त्यांतून तीं पाहूं देण्यास मालकांस शंका वाटते. आपण होऊन त्यांच्या नकला करण्याची फुरसद त्यांस मिळण्याची मारामार; इच्छा नाहींच, ती झाल्यास हौस नसल्यानें उद्योग होत नाहीं. यामुळें अनेकांच्या हातून होणारें हें काम एकट्या दुकट्यावर पडून अखेर तें मनाजोगें वठत नाहीं. एक तप या कामीं खर्च केलें तेव्हां ८।१० इसमांकडून माहिती पुरविण्याच्या कामीं साह्य मिळालें. या इतिहासांत घराण्यांतील विद्यमान वंशजांची थोडी बहुत माहिती येणार असल्यानें, मदत करणारांचे उघड आभार मानावे तर ती न करणारे आपोआपच समजून येणार, म्हणून व आपल्या पूर्वजांचा इतिहास तयार करण्याच्या कामीं अल्पस्वल्प हातभार लावल्याबद्दल सार्वजनिक अभिनंदनाची अपेक्षा भलता समंजस मनुष्य करणार नाहीं याची खात्री असल्यानें, आभारप्रदर्शनाची संधि जाणून बुजून वायां जाऊं दिली आहे.

तथापि केवळ अपवाद म्हणूनच एका नांवाचा उल्लेख केल्यावांचून आम्हांस राहवत नाहीं. अमदाबादचे वकील श्रीयुत गणेश वासुदेव ऊर्फ दादासाहेब मावळंकर यांनीं या कामीं आरंभापासून फार उत्साहानें व कळकळीनें मदत केली आहे. " अमदाबाद दप्तर " या सदराखालीं त्यांजकडून मिळालेल्या कागदांचा आम्हीं या पुस्तकांत स्वतंत्र संग्रह केला आहे. आपल्या घराण्यापुरती माहिती त्यांनीं फार मेहनतीनें मिळवेल तितकी मिळवून सुवाच्य लिहून पाठविली. ती प्रसिद्ध करणें व कित्येक जागीं तिचा संक्षेप करणें यापलीकडे त्यांत आम्हांस कांहीं करावें लागलें

नाहीं. श्री० दादासाहेब यांच्या श्रमाच्या शतांशानें जरी इतर मंडळींनीं आपापल्या पुरता माहितीचा पुरवठा केला असता, तर या पुस्तकाचें स्वरूप आतांच्याहून पुष्कळ चांगलें झालें असतें. असो.

सरदेसायांची आज निरनिराळ्या ठिकाणीं घराणीं नांदत आहेत म्हणजे स्वतंत्र घरदार करून आहेत तीं येणें प्रमाणें:—

१. प्रभानवल्ली शाखा—या घराण्याच्या पोट शाखा— १ प्रभानवल्ली, २ संगमेश्वर, ३ झोंबडी, ४ मुचरी, व ५ मुंढर या गांवीं आहेत.

२. देवळें शाखा—याच्या पोट शाखा— १ देवळें, २ साखरी, ३ साळवण, ४ पन्हाळा व ५ पुणें येथें आहेत. उत्तर हिंदुस्थानांतहि कांहीं घराणीं या शाखेचीं आहेत.

३ वेरवली शाखा—याच्या पोट शाखा— १ वेरवली बुद्रुक, २ वेरवली खुर्द, ३ गोवील, ४ मोंडें व ५ उत्तर हिंदुस्थानांत या शाखेच्या एका घराण्यांतील इसम अलीकडे निरनिराळ्या जागीं उद्योगधंद्यासंबंधानें स्थायिक झाल्यासारखे आहेत.

४. मोंडें शाखा—या शाखेचा विस्तार इतर सर्व शाखांपेक्षां अधिक असल्यानें पोटापाण्याच्या उद्योगाकरितां, वऱ्हाडापासून तों कर्नाटकापर्यंत यांतील मंडळी पांगली आहेत. परंतु मुख्य पोट शाखा—१ मोंडें, २ कोल्हापुर, ३ पन्हाळा, ४ सांगली, ५ पुणें या ठिकाणीं कायम झाल्या आहेत.

५. यां शिवाय पुष्कळ दिवसांखालीं फुटलेल्या शाखांपैकीं डोंगरची पोट शाखा राजापुर तालुक्यांत असून, सैतवडें येथील एक पोट शाखा अमदाबादेस कायम झाली आहे.

६. रत्नागिरि जिल्ह्यांतील खेड, गुहागर व आडिवरें येथील मावळंकर शाखांचा पत्ता नुक्ताच लागला असून थोडीशी माहिती हि मिळाली आहे. हीं घराणीं मुख्य वृक्षाच्या शाखा होत एवढी खात्री झाली आहे, परंतु त्या कोठें व केव्हां वेगळ्या झाल्या याबद्दलचा पुरावा अजून मिळाला नाहीं.

७. केसरी वर्तमानपत्रांतून सर्व भाऊबंदांस प्रस्तुत उद्योगाबद्दल जागें करण्याच्या हेतूनें कांहीं दिवसांपूर्वीं जाहिरात दिली होती. तिचा उपयोग

अपेक्षित ठिकाणांहून मुळींच झाला नाहीं. परंतु ती जाहिर विनंति पाहिल्यावर श्रीक्षेत्र काशी येथील सरदेसायांचे व इतर अनेक कऱ्हाडे ब्राह्मणांचे तीर्थोपाध्याय वे. शा. सं. लक्ष्मीधर हरिराम ऊर्फ भाऊ भैया कात्रे (पत्ता व. नं. १६।६६ कात्रे यांचा वाडा, काळभैरवानजीक, चामर गल्ली, बनारस सिटी) यांचे चिरंजीव श्रीयुत सदाशिव लक्ष्मीधर, सीनियर बी. ए. क्लास, अलहाबाद कॉलेज, यांनीं पत्र लिहून तिकडील घराण्यांची संक्षिप्त माहिती पाठविली. त्यावरून महाराष्ट्रांत सैतवडें, गोळिवें, मावळंगें, अंजनवेल, गर, वांई, सातारा, बत्तिसशिराळें या ठिकाणीं आणि उत्तर हिंदुस्थानांत जालवण, गुलसराई, गोरझाम, सागर, बासोदा, सोपूर व लष्कर ग्वाल्हेर या ठिकाणीं कांहीं घराणीं नांदत आहेत असें समजलें. कात्रे यांच्या पत्रांचा उतारा पुढें देत आहों च. इतक्या घराण्यांच्या दप्तरांतून मिळणारी माहिती न मिळाल्यानें, हा इतिहास किती अपुरा राहिला आहे हें ध्यानीं येईल. दुसऱ्या भागाच्या प्रसिद्धीच्या वेळेपर्यंत ही पूर्तता होते कीं कसें तें पहावें.

हिंदुस्थानांत अशा प्रकारें सर्वत्र फैलावलल्या या घराण्याचें दप्तर सर्व तपासणें एक दोन इसमांचें काम नव्हे हें कोणी हि सांगेल. प्रस्तुत पुस्तकाचा प्रसार या सर्व घराण्यांत करून व सर्वांस मूळ ठिकाणची आठवण देऊन, त्यांजकडून घरच्या लेखसंग्रहास चालना देवविण्याची खटपट करण्यांत येईल. हल्लीं हि पत्रद्वारें खटपट चालू आहे. परंतु इसमांचीं नांवें व पत्ते मिळेपर्यंत पत्रव्यवहार सुरू करण्यास च अडचण आहे. हें पुस्तक ज्यांच्या अवलोकनांत येईल त्यांनीं क्षेत्रोपाध्याय श्रीयुत कात्रे यांचें अनुकरण करून या कामीं मदत केल्यास काम सुलभ होईल. निरनिराळ्या अशा घराण्यांचा एकमेकांशीं संबंध बरोबर समजण्यास एकमेकांस गेलेलीं खासगी पत्रें फार उपयोगीं पडतात, सबब तशीं जुनीं पुराणीं पत्रें कोणाकडे असल्यास त्यांनीं मेहरबानी करून तीं आमच्याकडे पाठवावीं अशी विनंति आहे. महाराष्ट्रांत अशा प्रकारें केलेल्या विनंतीचा आदर ४।५ शें साक्षर कुटुंबीय इसमांपैकीं आतांपर्यंत ८।१० इसमांकडूनच झाला आहे, तरी हि

अजून कांहीं महत्त्वाची माहिती मिळेल ही आशा सुटलेली नाहीं. उत्तरेकडील मंडळींचा अनुभव इतका खेदजनक येणार नाहीं असें तूर्त धरून चालतों. पाहूं या प्रत्ययास काय येतें तें.

दप्तरें मिळविण्याच्या, तीं तपासून निवडण्याच्या व मिळालेले लेख संगतवार लावून जपून ठेवण्याच्या कामीं, मेहनत घेण्यास व स्वसामर्थ्यानुरूप द्रव्य खर्चण्यास मीं ढिलाई केली नाहीं. हें मी प्रतिष्ठेकरितां मात्र सांगत नाहीं. केवळ झालेली हकीकत पुढें ठेवीत आहें. मिळालेल्या कागदांवरून वंशावळींची संगति जुळविण्यांत व त्या निर्दोष करण्यांत शक्य तितकी काळजी घेण्यांत आली आहे. प्रत्येक घराण्यांतील २।४ जाणत्या व आस्थेवाईक मंडळीनें मनावर घेतल्यास साधार माहितीचा पुरवठा सहज होऊन दोषस्थळें सुधारण्यास संधि सांपडेल, आणि या घराण्याचा इतिहास साग्र, निर्दोष व उठावदार निर्माण होईल. असा योग जुळवून आणण्याची मीं दहा पांच वर्षें बरीच खटपट करून पाहिली. परंतु आतां अधिक वेळ वाट न पाहतां जमलेल्या सामुग्रीवर जाडी भरडी भाजीभाकरी तयार करून सर्वांस वाढण्याची गडबड केली आहे. अर्थात् ती मनाप्रमाणें चवदार उतरणार नाहीं हें निराळें सांगणें नलगे. परंतु सामुग्रीच्या तुटपुंजीपणामुळें आलेल्या या दोषास मलाच सर्वथैव कोणी जबाबदार धरील असें वाटत नाहीं.

प्रकरण तिसरें

पूर्वपीठिका व नीतिमत्ता

मावळंकर सरदेसाई हे ऋग्वेदी आश्वलायनसूत्री शाकल शाखेचे कऱ्हाडे ब्राह्मण असून, त्यांचें कुलगोत्र कौशिक आहे. या गोत्राचे विश्वामित्र, अघमर्षण आणि कौशिक असे तीन प्रवर आहेत. देवळेकर शाखेपैकीं एकानें

अत्रिगोत्रांतील नाफडे आडनांवाचा मुलगा दत्तक घेतला होता. त्या पुरुषापासून वेरवली व मोंडें या पोटशाखा निघाल्या त्या अत्रिगोत्रहि पाळतात. परंतु सर्व धार्मिक कार्यांत फक्त कौशिक गोत्राचा च उच्चार होतो. अत्रिगोत्र हि पाळावयाचें याचा अर्थ आत्रि गोत्राशीं वैवाहिक संबंध करावयाचा नाहीं एवढाच होय. सुमारें ४० वर्षांपूर्वी मोंडेंकरांपैकीं एकाचा अत्रिगोत्रोत्पन्न मुलीशीं विवाह झाला; तेव्हां तो होण्यापूर्वी वधूच्या पित्याचे स्नेही कै. लो. बाळ गंगाधर टिळक यांनीं, सांगली येथें ब्रह्मवृंदांची मुद्दाम सभा भरवून, शास्त्राधारानें अमुक पिढ्यानंतर दत्तक पूर्वजाचें मूळच्या घरचें गोत्र पाळण्याचें कारण नाहीं, असें शास्त्री व पंडित यांचे अनुमतानें ठरविलें होतें. तथापि हें बंधन अद्यापि सर्वत्र सुटल्यासारखें दिसत नाहीं. या दोन शाखांखेरीज इतर सरदेसायांस व मावळंकरांस अत्रि गोत्राशीं सोयरीक करण्याचा कसला हि प्रतिबंध नव्हता व नाहीं.

यांचें मूळ आडनांव 'सत्यवादी'. मौजे मावळंगें तर्फ संगमेश्वर जिल्हा रत्नागिरि येथें मूळपुरुष येऊन राहिल्यावर, मावळंगेंकर-मावळंगकर-मावळंकर असें उपनाम त्यांस प्राप्त झालें. कागदपत्रांत 'महाळुंगकर' किंवा 'म्हाळुंगकर' अशीं हि रूपें आढळतात. देशमुखी व सरदेशमुखी वतनें मिळाल्यापासून 'नायक' या पदवीनें व 'देसाई' व 'सरदेसाई' या हुद्याच्या नांवानें, घराण्यांतील मंडळीचा उल्लेख होऊं लागला. वतनांत हिस्सेदार नाहींत तीं घराणीं फक्त मावळंकर आडनांव वापरतात. बाकी मंडळी 'सरदेसाई' आडनांवाचा उपयोग करितात. लोक त्यांस बहुधां देसाई म्हणतात. राहण्याच्या ठिकाणांवरून प्रभानवल्लीकर, देवळेकर, मोंडेंकर, साखरीकर 'सरदेसाई' अशी त्यांची लौकिकी प्रसिद्धि आहे.

मावळंकर सरदेसाई सर्व श्रीनृसिंहोपासक आहेत. संकल्पांत 'श्रीशांतादुर्गालक्ष्मीनृसिंहमहाविष्णुप्रमुखपंचायतनदेवताः" असा कुलदैवताचा उच्चार होतो. कोंकणप्रांतीं त्या त्या ठिकाणच्या पांढरीच्या देवाच्या नावाचा कुलदैवत—नामांत समावेश करितात.

या घराण्याच्या पूर्ववृत्तान्ताची खबर पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत दिली आहे. तिजवरून खालील संक्षिप्त अहवाल दिसतो तो असाः—

बाराव्या शतकाच्या पूर्वार्धाच्या अखेर अखेर मावळंकर सरदेसायांचा मूळ पुरुष, म्हणजे ज्या पुरुषाच्या पाठीमागचा वृत्तान्त अवगत नाहीं तो नृसिंहभट्ट सत्यवादी, गोदावरीच्या तीराचें मूळ ठिकाण सोडून, सहकुटुंब देशाटण करीत करीत, रत्नागिरि तालुक्यांतील गडनदीच्या कांठीं धामापुरानजीकच्या मावळंगें गांवीं आला. तेथें उपास्य दैवत श्रीनृसिंह याचें जागृतस्थान पाहून कायम वस्ति करून त्यानें बहुत दिवस देवताराधन केलें. त्याचा पुत्र गोविंदभट्ट व नातू नृसिंहभट्ट. या दुसऱ्या नृसिंहभटानें पुणें व सोलापुर जिल्ह्यांच्या सरहद्दीवरील नीरा व भीमा या नद्यांच्या संगमाजवळील नीरा-नरसिंहपुर या पवित्र क्षेत्रीं जाऊन, तेथें पंधरा वर्षे सामवेद—मंत्रोपासना केली. तेथील देवाचा दृष्टांत जाहल्यावरून नृसिंहभट्ट कोल्हापुरास आला. त्या वेळीं तेथें शिलाहार विजयार्क हा राजा राज्य करीत होता. त्याच्या अंमलाखालीं त्या समयीं सातारा प्रांत व तळकोंकणाचा हल्लींच्या रत्नागिरि जिल्ह्याचा मुलुख होता. सत्पात्र ब्राह्मण म्हणून विजयार्कानें नृसिंहभटास संगमेश्वर गांव दान दिला. नृसिंहभटावर श्रीनृसिंहाची खरोखरीच पूर्ण कृपा झाल्यानें, त्याचा पुत्र कृष्णाजी हा फार पराक्रमी निघाला. त्यानें संगमेश्वर गांवास बाजारहाट वगैरे करून गांवची नवीन रचना केली, मावळंग्यांत श्रीवर देवालय बांधिलें, आणि तो गांव स्वतःस इनाम मिळविला. त्यानें संगमेश्वर महालांतील सत्तर गांवांची देशमुखी व सरदेशमुखी वतनें संपादन केलीं. तेव्हांपासून या घराण्याचें भट्ट हें नांव जाऊन त्यास नायक ही पदवी व सरदेशमुख हा किताब प्राप्त झाला. वंशपरंपरेनें या दोनी पदव्या तेव्हांपासून आतांपर्यंत चालत आहेत. अर्थात् मावळंगकर सरदेशमुख किंवा सरदेसाई या घराण्याचा मूळपुरुष व संपादक हा कृष्णाजी नृसिंहच होय. कृष्णाजीचा नातू केशव नायक सरदेशमुख असतां विजयनगरचा राजा बुक्क (स. १३३४–१३७९ इ.) यानें तळकोंकणचें राज्य जिंकिलें. तेव्हां केशवनायकानें विजयनगरास जाऊन

बुक्क राजापासून ७०० गांवांची राजसत्ता मिळविली व खारेपाटण हें मुख्य ठिकाण करून तेथून त्यानें प्रांताचा कारभार चालविला. मावळंकरांचा हा खटाटोप कोंकण प्रांतांतील मराठे क्षत्रियांस सहन झाला नाहीं. त्यांच्यां-तील धर्मोजी व त्याचा पुत्र सूर्याजी चव्हाण यांनीं धामापुरास किल्ला बांधून विजयानगरच्या विरुद्ध पुंडाई चालविली. कोणत्या हि राजसत्तेस न जुमा-नतां बंडखोरी करून मुलुख मारण्याचा त्यांचा नेहमींचा क्रम होता. त्यांचा बंदोबस्त करून सरकारी वसूल सुरळीत येईल अशी व्यवस्था मावळंकरांस करणें भाग असल्यानें, केशवनायकाचा नातू गणोवा नायक यानें विजया-नगराहून कुमक आणवून चव्हाणांचा बंदोबस्त केला व सूर्याजीस ठार मारिलें. या कामगारीनें गणोवानायकास धामापुर गांव इनाम मिळाला. गणोवाचा नातू विसाजी याचे वेळीं हणमंतराव चांदा या नांवाचा दुसरा एक मराठा डिंगणी येथें आपली सत्ता स्थापून आसपासच्या मुलुखास उपद्रव देऊं लागला. त्यासही मावळंकरांनीं ठार केलें. दुसरा एक विठोजी प्रभावळीकर नामक मराठा उठला होता, त्यासही मावळंकरांनीं शांत केलें. चांद्याचा बंदोबस्त केल्याबद्दल विसाजी नायकास कुंभारखाणी गाव इनाम मिळाला. पुढें धाकोजी चाळके नांवाच्या मराठ्यानें राजकृपा संपादून कोंकणांत नव्वद गांवांचा मोकासा मिळविला, आणि फौज ठेवून तो त्या प्रांताचा उच्छेद करूं लागला. धाकोजीचा मुलगा रामाजी व नातू कुमारजी यांचें मावळंकरांशीं पिढिजाद वैर चाललें. विसाजीचा नातू गणोवा यानें रामाजीचा, व पणतू रंगोवा यानें कुमारजीचा बंदोबस्त केला तेव्हां वैर मोडून प्रांतांत शांतता झाली. हा प्रकार सन १५२८ इसवीचा होय.

पुढें विजयनगरचें राज्य मोडून मुसलमानी अंमल झाला त्या वेळीं तळ-कोंकणचा हा भाग बेदरच्या राज्यांत सामील झाला. चाळक्यांचें बंड मोड-ण्यास मावळंकरांना विजयानगरचें साह्य मिळत असे. तें राज्य मोडतांच, चाळक्यांस पुनः फावलें व मावळंकरांचें पूर्व वैर स्मरून त्यांस उपद्रव देण्यास त्यांनीं आरंभ केला. मावळंकरांची पुण्याई ऊर्जितावस्थेंत अस-

त्यानें, त्यांच्या कुळांत पराक्रमी व कर्तबगार संततीची वाण केव्हांच पडली नाहीं. त्या वेळचा सरदेशमुख नरसोबा नायक यानें सन १५९८ त बेदरास जाऊन, फौज आणून धारोजी खोत याशीं संगमेश्वर येथें युद्ध करून त्यास ठार केलें. नरसोबानें संगमेश्वरची वसाहत पुनः यथायोग्य करून सरदेशमुखीचा जीर्णोद्धार केला. पुढें प्रभावळीस कान्होजी सुर्वे नांवाचा मराठा व त्याचा मुलगा चांदजी यांनीं बंड उभारलें. या सुमारास बेदरची सत्ता मोडून विजापुरच्या अंमलाखालीं हा मुलुख गेला होता. सरदेशमुख केशव नायक बिन नरसोबा नायक यानें विजापुराहून कुमक आणवून चांदजीशीं प्रभावळींत मोठें युद्ध केलें. मग आदिलशहानें शृंगारपुर गांव चांदजीस देऊन त्याची समजावणी केली. यानंतर सरदेशमुखांस बंडखोरांचा बंदोबस्त करण्यासाठीं हातीं शस्त्र धरणेचा प्रसंग आला नाहीं. केशव नायकानें प्रभावळी हें आपलें राहण्याचें ठिकाण केलें. केशवास व तेथून पुढें संततीची वृद्धि पुष्कळ झाली. अशी या घराण्याची प्राचीन हकीकत बखरींत आहे.

कुटुंब व व्याप वाढत गेला व बाहेर कामगारीस क्षेत्र कमी नसतांही, घरकोंबडेपणाची संवय जडूं लागली, त्यामुळें घराण्यांत कौटुंबिक कलह सुरू झाले. देशांत राज्यक्रांत्या होऊन दरखेपेस नवीन येणाऱ्या राजवंशाला संतुष्ट ठेवून सरदेशमुखीचें वतन संभाळण्याचें व कर्तव्य बजाविण्याचें काम दिवसेंदिवस अधिकाधिक बिकट होऊं लागलें. त्या वेळच्या कागदपत्रांवरून असें उघड दिसतें कीं, या घराण्यांत पूर्वींचे बहुतेक पुरुष साहसी, समजदार व कर्ते निपजले, म्हणूनच त्यांनीं त्या भयंकर संकटांतून घराण्याचा बचाव केला. कमअक्कल व कमजोर माणसांचा मुळींच निभाव लागला नसता. सरदेशमुखीचें वतन व कर्तव्य हें सुखासुखीचें नसून सुळावरल्या पोळीसारखें होतें. दंगेखोर लोकांपासून रयतेचें संरक्षण करून, त्यांजपासून बिनबोभाट सरकारचें येणें वसूल करून, तें कडेकोट बंदोबस्तानें बेदर, विजापुर वगैरे सारख्या दूर दूर पल्ल्यांवर सुरक्षितपणें वक्तशीर पोंचतें करण्यास किती त्रास पडत असेल, केवढी काळजी वहावी लागत असेल,

हें पाहिलें म्हणजे त्या वेळीं एकाच घराण्यानें अनेक शतकें हें काम इतकें चोख पार पाडलें याबद्दल साभिमान कौतुक वाटतें. त्यांतच हा वसूल म्हणजे सहजासहजीं होणारें काम नव्हतें. प्रांतांत वरचेवर बंडखोर उत्पन्न होऊन मुलूख उजाड करीत; रयतेंत वसूल देण्याचें त्राण उरत नसे; वसुलाकरितां लोकांवर सक्ती करण्याची अनेक कारणांमुळें पंचाईत पडे; शिवाय रयतेस नाखुष करण्याची सरदेशमुखांत प्रायः प्रवृत्ति नसल्यानें, प्रसंगीं स्वतः कर्जवाम काढून सरकारी हप्ता भरण्यास ते मागें पुढें पहात नसत. वसूल वेळेवर ठिकाणावर न पोंचल्यास सरदेशमुखांस पकडून, पायांत बेड्या ठोकून, निरनिराळ्या किल्ल्यांवर त्यांस अडकवून ठेवीत व तेथें त्यांस अनेक प्रकारचा जाच करीत. हा जाच नको व तें वतन हि नको, असें म्हणून या घराण्यांतील कित्येकांस परागंदा होण्याचा हि प्रसंग आला. अव्वल इंग्रजी अंमलांत सुद्धां वतनावरचा हक्क सोडून देवळेकरांचीं सात कुटुंबें देशांतरीं गेलीं. मग पूर्वींच्या अस्सल धामधुमीच्या कारकीर्दींतील बिकटपणा काय सांगावा? कांहीं थोडे पुरुष तशाच चिकाटीचे होते, त्यांनीं सर्व संकटांस तोंड देऊन नेटानें उद्योग केला म्हणून च सहा सातशें वर्षें या घराण्याचा निभाव लागून त्याचा एवढा विस्तार झालेला आज दिसत आहे. कागदपत्रांत नमूद असलेले प्रसंग मोठे करुणाजनक आहेत. विजयनगर, बेदर, विजापुर, पुणें, सातारा इत्यादि दूरच्या ठिकाणीं या घराण्यांतील कोणी तरी एक अगर अनेकजण हुजूरसंनिध राहून, सरदेशमुखीचा बचाव करीत. आदिलशाही कारकीर्दींत या घराण्यास पुष्कळ जाच सोसावा लागला; कारण त्यांचा अंमल विशेष करडा असे.

मराठशाहीच्या उत्तरकालांत सरदेसायांचा संबंध मुख्यत्वें विशाळगडकर प्रतिनिधि यांशीं च तेवढा कायम राहिला. रत्नागिरि जिल्ह्यांतील प्रतिनिधींच्या प्रांताचा ताबा ब्रिटिश सरकारानें घेतला, त्याबरोबरच सरदेसायांस ब्रिटिशांच्या स्वामित्वाखालीं जावें लागलें. विशाळगडकरांस रत्नागिरि तिजोरींतून दरसाल २९००० रुपये यासंबंधानें इंग्रजांकडून मिळतात. त्याचप्रमाणें सरदेशमुखी वतनाबद्दलहि सरदेसाई यांस दर रुपयास ८५८६ प्रमाणें

जुडी वजा जातां बाकी पूर्वीच्या नक्त नेमणुका व वतनी इनाम जमिनी बिननोकरी चालू आहेत.

घराण्याच्या पूर्वपीठिकेंत याचा निर्देश अवश्य नव्हता, परंतु वतनाची हल्लींची स्थिति थोडक्यांत येथें समाविष्ट करावी असें वाटल्यावरून तिचें किंचित् दिग्दर्शन केलें आहे.

या घराण्यांतील कांहीं शाखांनीं अहंमदाबाद, कोल्हापुर, पन्हाळा येथें नवीन इनामें संपादन केलीं. त्यांपैकीं कित्येक १००।१२५ वर्षांपासूनचीं आहेत; परंतु "सरदेसाई" म्हणजे कोंकणप्रांतीच्या सरदेशमुखी वतनाचे संपादक या नात्यानेंच हा वृत्तान्त प्रथमतः लिहिला गेला असल्यानें, बाहेरच्यांची माहिती आरंभीं गोळा केली नव्हती. हल्लींच्या स्वरूपांत पुस्तक काढण्याची व त्या संबंधांत पडेल ती मेहनत करण्याची तयारी माझ्या बंधुवर्गांपैकीं एका गृहस्थांनीं दाखविल्यावरून इतरत्र जमविलेल्या माहितीचा या पुस्तकांत संग्रह केला; व यानंतर खटपट करून आणखी कागदपत्र व माहिती मिळाल्यास दुसरा भाग प्रसिद्ध करण्याचें अभिवचन हि त्याच गृहस्थाच्या प्रोत्साहनानें मी देत आहें.

पूर्वपीठिकेच्या हकीकतीवरून या घराण्याच्या सर्व साधारण वर्तणुकीचा आणि नीतिमत्तेचा निष्कर्ष काय निघतो, तें पाहणें मनोरंजक होईल.

वतनें संपादन करणारे अर्जक पुरुष पराक्रमी, कर्तृत्ववान्, हिंमतदार आणि प्रसंगानुसार वागणारे होते; मिळविलेलें राखण्याची व कर्तबगारीनें त्यांत भर टाकण्याची त्यांच्या अंगीं धमक होती. 'नवी विटी नवें राज्य' या म्हणीप्रमाणें राजसत्ता आणि अधिकारमंडळ बदललें कीं त्यांजकडून आपल्या वतनाच्या नवीन सनदा करून घेण्यास ते चुकले नाहीत. इंग्रजी अंमलांतच ही उठाठेव त्यांस चुकली. नवीन कायदे व नवीन नियम होऊन वतनदारांचे हक्क हळूहळू संपुष्टांत येऊं लागले, त्या वेळीं पूर्वीप्रमाणें दीर्घ प्रयत्न करून, त्यांचें संरक्षण करण्याचें कोणास अगत्य वाटलें नाहीं. मोठमोठ्या राज्यांची उलथापालथ झालेली पाहून 'नगाऱ्याच्या घाईपुढें टिमकीचें काई' म्हणून कदाचित् त्यांचे हातपाय गार पडले असतील;

किंवा वतनाच्या एकाददुसऱ्या हातीं असलेल्या लहान तुकड्याबद्दल महत्प्रयास कोणीं करावा, असा हि दांडगा विचार त्यांच्या मनांत आला असेल. थोडीशी जुडी भरून बाकीचें उत्पन्न आयतें बसून खाण्यास मिळतें, नोकरीची वगैरे दगदग मागें रहात नाहीं, अशा बावळट विचारांचें हि प्राबल्य झालें नसेल असें हि नाहीं. तात्पर्य काय कीं, उद्योगप्रिय संपादकांच्या जागीं ऐदी आयतोबा परिस्थितीनें आपोआप च निर्माण झाले. पराक्रमास पूर्वींचें क्षेत्र न राहिल्यानें व अनेक वर्षांच्या संवयीनें कर्तृत्वाच्या दुसऱ्या क्षेत्रांची ओळख लौकर न पटल्यानें, हतवीर्य होऊन ते फक्त गत जमेदारीचा पोकळ डामडौल मिरवीत राहिले. आपण चैनींत बसून कारभाऱ्यांवर सारा भरवंसा टाकण्याची दुर्बुद्धि त्यांस झाली. कालवर्तमानाकडे अथवा आपल्या उत्पन्नाच्या व्यवस्थेकडे त्यांनीं लक्ष्य दिलें नाहीं. पूर्वींप्रमाणें खर्च चालू राहून दानधर्मास मनस्वी द्रव्य लागूं लागलें. खर्चास उत्पन्न पुरेना म्हणून जमीन-जुमला, वतनें बेताबातानें एकामागून एक सावकाराच्या घरीं गहाण पडलीं. कारभाऱ्यांनीं आपल्या मर्जीमाफक मालकांच्या घरादारांची वाट लाविली. यजमानांनीं त्यांत मन घातलें नाहीं. घरीं बसल्या चिठ्या व कर्जरोखे लिहून देऊन मिळत होतें तोंपर्यंत धान्य, सामान, रोकड सावकारांकडून आणलीं. अविचाराचा हा सपाटा ५० वर्षें चालून बहुतेक वतनें सावकारांच्या घशांत उतरलीं, आणि कांहीं राहिलीं होतीं त्यांचा बराच मोठा हिस्सा कोर्टांतील वादांत संपून गेला.

या घराण्यांतील पूर्वींचे बहुतेक पुरुष एकंदरीनें उद्योगी, एकजुटीनें वागणारे व पापभीरु असत. रयतेवर पोटच्या पोरांप्रमाणें प्रेम करून, ते त्यांचा सांभाळ करीत. स्वतःचा खर्च व सरकारचीं देणीं, ते प्रसंगीं कर्ज काढून भागवीत; परंतु रयतेवर जुलूम कधीं हि करीत नसत. कुळांचें हि त्यांजवर निरतिशय प्रेम असे. काढलेलीं कर्जें बुडविण्याची किंवा सावकारास सबबी लावून टोलविण्याची इच्छा या घराण्यांत कोणास हि झाली नाहीं. सावकारांचीं त्यांस आलेलीं प्रेमळ पत्रें पाहिलीं, म्हणजे त्यांचा परामर्ष घेण्यांत सावकारसुद्धां किती दक्ष असत हें दिसून येतें. ही स्थिति अगदीं अलीकडे

मुद्धां दिसून येत आहे. परांजपे, हरि नाना जमेनीस वगैरे सावकारांचा सरदेसायांवर केवढा लोभ असे व त्यांची ते किती आदब राखीत, हें कोंकण प्रांतीं आजही मशहूर आहे.

मोडी लिहिणें वाचणें, हिशेब करणें, घोड्यावर बसणें वगैरे त्या काळीं अवश्य असलेल्या कामांत सरदेसाई मंडळी तरबेज असत. वडिलांचा उपमर्द त्यांचे हातून होत नसे. या कामीं अगदीं अलीकडेसुद्धां फारसे अपवाद मिळणार नाहींत. पूर्वीं आपसांतील कलह हि फार कमी होते. घरांतील कुळंबिणीसुद्धां आत्मिक भावनेनें घरच्या प्रपंचास जपत. गड्या-माणसांचीं लग्नें करून देणें व त्यांच्या संसारास हरएक प्रकारें नेहमीं मदत करणें, हें सरदेसाई मंडळी आपलें कर्तव्य समजत.

या घराण्यांतील पूर्वींच्या लोकांत विशिष्ट व्यसनें किंवा दुर्गुण असल्याचें कोठें आढळत नाहीं. दीर्घ आयुर्मर्यादेवरून त्यांची प्रकृति साधारण मानानें चांगली काटक व सुदृढ असावी असें वाटतें. सत्तर ऐंशी वर्षें जगलेली मंडळी पुष्कळच होऊन गेली. हल्लीं हयात असलेल्या मंडळींतील ७५।८० च्या मर्यादेस येऊन पोंहचलेल्या इसमांत देखील बहुतेक लोक निरोगी व नित्याचे सर्व व्यवहार इतरांच्या मदतीशिवाय करणारेच आढळतात; यावरून या घराण्याच्या व्यसनविन्मुखतेबद्दल खात्री पटण्यास हरकत नाहीं. स्वमताभिमान, दुराग्रह किंवा हटवादीपणा यांची थोडी छटा ह्या घराण्यांत पुष्कळ ठिकाणीं आढळते हें कबूल करणें भाग आहे.

प्रकरण चवथें

वंशावळींचें स्पष्टीकरण

'इतिहास आणि ऐतिहासिक' मासिकांत प्रसिद्ध इ. सं. रा. वि. का. राजवाडे यांनीं या घराण्याची बखर प्रसिद्ध करून त्याविषयीं आपले विचार

प्रगट केले आहेत. त्यांचा निष्कर्ष पुढें ६ व्या प्रकरणांत दिला आहे. मूळ पुरुष नृसिंहभट्ट सत्यवादी स. १०९३ मध्यें हयात होते हें राजवाड्यांनीं मूळलेखांत दाखवून दिलें आहे. इतर ऐतिहासिक पुराव्यांवरून ते गोदातीराहून ११४०।४५ च्या सुमारास मावळंग्यास आले असें दिसून येतें. यावेळीं त्यांचें वय ५०।६० वर्षांवर असावें. जागृत देवस्थान पाहून तेथें कायमपणें वस्ती करण्याचें मनांत येण्यास व गोदातीरच्या मूळठिकाणाची वास्तपुस्त हि नंतर न करण्यासारखी मनाची वृत्ति बनण्यास, सहकुटुंब असलेल्या माणसाचें व त्याच्या कुटुंबाचें हि वय सामान्यतः इतकें असणें अवश्य आहे. यावरून स. १०७५ च्या सुमारास त्यांचा जन्म असावा. त्या वेळेपासून प्रस्तुत १९२५ पर्यंत साडेआठशें वर्षें या मावळंकर घराण्याची परंपरा अव्याहत चालली आहे व त्यांचा संकलित इतिहास अविच्छिन्नपणें आपल्यास मिळत आहे. इतक्या मोठ्या अवधींत अनेकांनीं मिळविलेलीं वतनेंही पूर्वींच्या संपूर्ण स्वरूपांत नसलीं तरी निरनिराळ्या संक्षिप्त रूपांनीं अबाधितपणें घराण्यांत चालून त्या इतिहासाच्या सत्यतेची साक्ष पटवीत आहेत. हयात व उद्योग यांच्या परंपरेचा एवढा दीर्घकाल महाराष्ट्रांतच काय परंतु इतरत्र हि एकाच कुटुंबाच्या वांट्यास आलेला क्वचित् सांपडेल. याबद्दल रा. राजवाड्यांनीं मूळपुरुष नृसिंहभट्ट ' मोठा पुण्यवान् ' म्हणून म्हटलें आहे, त्याबद्दल आम्हां वंशजांस किती तरी धन्यता वाटली पाहिजे. या इतिहासाचें प्रकाशन हें पुण्यकर्म आहे व मूळपुरुषाच्या पुण्याईचेंच तें फल होय असें समजण्यास हरकत नाहीं. त्या पुण्यपुरुषाच्या कृपेनेंच सर्व हिंदुस्थानभर पसरलेल्या त्याच्या विद्यमान व अविद्यमान वंशजांची पुस्तकरूपांत एकत्र जमलेली ही परिषद एकमेकांविषयीं आपलेपणा उत्पन्न करण्यास समर्थ होईल अशी आशा आहे.

दर पिढीस सामान्यतः २० ते २५ वर्षांचा काल जातो असा नियम हिंदुस्थानांतील कुटुंबांच्या बाबतींत लागू पडतो. त्या मानानें सदरच्या ८५० वर्षांस ३४ पिढ्या बसतात; म्हणजे मूळ पुरुषाच्या जन्मवेळेपासून आज १९२४ अखेर ३३ पिढ्या पूर्ण होऊन हल्लींचीं लहान मुलें ३४ वे

पिढीस येतात. पुढील वंशावळी पाहिल्या असतां हा हिशेब बरोबर लागू पडत असल्यानें बखर व त्यानंतरच्या दोन अडीचशें वर्षांचा इतिहास हीं दोन्हीं रा. राजवाड्यांच्या म्हणण्याप्रमाणें " सुसंगत अत एव विश्वसनीय " आहेत अशी खात्री पटते. हीच गोष्ट अन्य रीतीनें खालील कोष्टकांतही दाखविली आहे.

राजवटी.	इसवी सन.	वर्ष-संख्या	पिढ्यांची संख्या	
			बखरींतील.	व्यवहार्य.
मूळ पुरुषाच्या जन्मकालापासून	१०७५ ते ११५०	७५	२	३
कोल्हापुरचे शिलाहार राजे	११५१ ते १३५०	२००	८	८
विजयानगरचे राजे	१३५१ ते १५००	१५०	६	६
बेदर व विजापुर येथील सुलतान	१५०१ ते १६६०	१६०	७	६ १/२
छत्रपति व पेशवे	१६६१ ते १८२०	१६०	६	६ ५/२
इंग्रजी अंमल	१८२१ ते १९२५	१०५	५	४
	एकूण	८५०	३४	३४

नृसिंहाच्या पूर्वींचे एक दोन पुरुष माहित नाहींत; पण ऐतिहासिक ७५ वर्षांच्या मुदतींतील त्यांच्या दोन पिढ्या हिशेबांत धरणें जरूर आहे. अर्थात् ऐतिहासिक व व्यवहार्य पिढ्यांची संख्या ३४ च येते. इंग्रजी अमलांतील शेवटच्या ४।५ वर्षांची एक पिढी धरली आहे ती नुक्ती सुरू झालेली हल्लींची पिढी होय. ही पिढी हिशेबीं धरली म्हणून अव्वलच्या ७५ वर्षांच्या ऐतिहासिक पिढ्या २ च धरल्या आहेत. १ ल्या पिढीचा पुरुष विजयार्क शिलाहाराच्या वेळीं (म्ह० ११५० त.) व आठव्या पिढीचा केशव विजयानगरच्या बुक्क राजाचा समकालीन (स. १३५० त.) होता. १५व्या पिढीच्या सोमाजीचा काल विजयानगरचें राज्य बुडाल्यावेळचा इ. स. १५६४

चा आहे. याच सोमाजीच्या वेळीं पहिला कुळकट म्ह० बखरीचा पूर्व व मोठा भाग तयार झाला असें रा० राजवाड्यांचें म्हणणें आहे, तें बरोबर नसावें असें वाटतें. याचीं कारणें पुढें दिलीं आहेत. स. १५६४ नंतरचा चालू इतिहासाचा ठळक काळ म्हटला म्हणजे दुसरा कुळकट अथवा बखरीचा उत्तरभाग तयार झाल्याचा स. १६८४ हा होय. या वेळेपासून कागदपत्रांचा पुरवठा उत्तरोत्तर अधिकाधिक होऊं लागतो, व अनुमानिक पुराव्याच्या जागीं प्रत्यक्ष प्रमाणाचा पुरावा मिळून ऐतिहासिक सामुग्री जुळविण्याचें काम सुकर होऊं लागतें. दुसरा कुळकट २७ व्या पिढीच्या रंगोबाच्या वेळीं तयार झाला; आणि हा रंगोबा स. १६६० मध्यें होता हें निश्चित आहे. तात्पर्य काय कीं, वरील कोष्टकांत निरनिराळ्या राजवटींतील पिढ्या व व्यवहारांतील पिढ्या दर्शविल्या आहेत, त्यांत १।२ पिढ्यांची तफावत दिसली तरी तेवढ्यामुळें बखरीच्या खरेपणाला कमतरता येत नसून, ऐतिहासिक कसोटीवर ती शंभर नंबरी च उतरते. वडील घराण्याच्या पिढ्या ३५।३६ पर्यंत वाढलेल्या आहेत. दोन सख्या भावांच्या वयोमानांत १ पिढीचें अंतर २।३ ठिकाणीं असल्यानें ही वाढ अस्वाभाविक नाहीं.

बखरीचा जन्मकाळ आतां ठरवूं. सन १६८४ च्या ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या तारखेस या बखरीचा उत्तर भाग तयार करण्यास आरंभ झाल्याबद्दल व तो त्या दिवशीं अगर पुढें १।२ दिवसांत पुरा केल्याबद्दल शंका उरत नाहीं च. हा उत्तर भाग ' याप्रमाणें पूर्वील वंशावलीची व वतनाची स्थित असे. या उपरीची स्थिति सोमाजी नायक देशमुखी करीत असतां, गणोबा नायक रोगमुक्त होऊन तीन वर्षीं महायात्रेहून देशास आलियावरी सोमाजी नायकीं वडिलांचे शिके व वतन गणोबा नायक चुलते याच्या स्वाधीन केले' या वाक्यांनीं आरंभलेला आहे; आणि पूर्वभागाचा शेवट 'त्याचा (२४ व्या पिढीचा नारोबा ओझरेकर याचा) पुत्र विसोबा ओझऱ्यांत आहे' या वाक्यानें झाला आहे. तसेंच या वाक्याच्या पूर्वी, जवळच 'त्यास (२४व्या पिढीचा महादोबा लोवलेकर यास) पुत्र आपण सोमाजी' असा मजकूर आहे. यावरून पूर्वभाग तयार झाल्यावेळीं २५ वे पिढीचे

सोमाजी लोवलेकर आणि विसोबा ओझरेकर हे दोघे हयात होते, यांत बिलकुल शंका राहत नाहीं. शिवाय हा सोमाजी, वतनाचा कारभार चालविण्यास, लोवल्याहून मुद्दाम बोलावून आणलेला कर्तृत्ववान् आणि जबाबदारी संभाळण्यासारखा प्रौढ असा होता. अर्थात् याच्या प्रोत्साहनानें सदरचा भाग तयार झाला असला पाहिजे. निदान तो तयार झाल्यावेळीं २५ व्या पिढीचा सोमाजी हयात होता हें निर्विवाद आहे. बखरीचा हा पूर्वभाग सर्व एकाच काळीं लिहिण्यांत आला हें हि भाषासरणीवरून स्पष्ट दिसतें. १५ व्या पिढीच्या सोमाजीनें हा भाग लिहविला म्हणणें म्हणजे २४ व्या पिढीपर्यंत त्याची हयात वाढविण्यासारखी सर्वस्वी असंबद्ध व असंभवनीय गोष्ट अंगीकारणें होय. सोमाजीनें शके १५०३ वृषनाम संवत्सरीं म्ह. सन १५८१त विजापुरास जाऊन निवें गांव इनाम मिळविलें, असा उल्लेख इ. आणि ऐ.—लेखांक ४३ यांत आहे. बखरींत हि या सोमाजीनें "गणोबा नायकांसमक्ष व त्यांपरोक्ष ५७ वर्षे देशमुखी चालविली...निवें बुद्रुक तर्फ देवरूख, हा गांव इनाम घेतला" असा मजकूर आहे. तेव्हां वरील सर्व हकीकत १५ व्या पिढीच्या सोमाजीची नसून त्यानंतरच्या सोमाजीची आहे; या १५ व्या सोमाजीनंतर २५ व्या पिढीपर्यंत दुसरा कोणी हि सोमाजी वंशावळींत नाहीं. या विवेचनावरून १५ व्या पिढीच्या सोमाजीनें पहिला कुळकट तयार केला, असें लिहिण्यांत रा. राजवाडे यांचा नामसादृश्यानें दृष्टिदोष अथवा हस्तदोष झाला असावा असें वाटतें. या दुसऱ्या सोमाजीची प्रौढपणची ५७ वर्षांची देशमुखीची कारकीर्द ध्यानीं आणिली म्हणजे तो मरणसमयीं ८०।९० वर्षांच्या उमरीचा सहज असावा, असें अनुमान निघतें. त्याच्या वेळीं तयार झालेल्या कुळकटास तत्पूर्वींच्या तसल्या च एकाद्या कुळकटाची मदत मिळालेली नसेल असें नाहीं, व तो पूर्वींच्या म्ह. १५ व्या सोमाजीनें केला नसेल असें हि नाहीं. परंतु याबद्दल खात्रीचा च नव्हे, तर अनुमानधवक्याचा सुद्धां पुरावा कोठें दिसत नाहीं. दुसऱ्या सोमाजीच्या वेळीं तयार झालेल्या कुळकटाची आठवण ताजी असल्यानें, सोमाजीच्या पश्चात् ४०।५० वर्षांच्या आंत च म्हणजे २६ व्या

पिढीची कृष्णाबाई व २७ व्या पिढीचे रंगोबा, नरसोबा, आणि विठ्ठल नायकाचा दत्तपुत्र सोमाजी नायक ३ रा यांच्या वेळीं बखरीचा उत्तर भाग तयार झाला आहे. या पुस्तकांत आतां प्रसिद्ध होत असलेल्या बखरीच्या आरंभीं " रंगोबा, नरसोबा व **सोमाजी नायक** यांनीं मातुःश्री कृष्णाबाई व सफरे उपाध्याय यांस विचारल्यावरून वडिलांच्या वेळची **पूर्वील वंशावळ सोमोबा नायक यांनीं** लिहिली, ती **सैतवडेकर सोमाजी नायक** यांजकडे आहे ती आणविणें " असा मजकूर आहे. यावरून २६व्या पिढीची कृष्णाबाई आणि २७ व्या पिढीचे रंगोबा, नरसोबा व सोमाजी यांच्या वेळीं दुसरे एक सैतवडेकर सोमाजी हयात होते, आणि या सर्व हयात मंडळीच्या पूर्वींच्या एका सोमाजीनें पहिली वंशावळ लिहिली हें शाबीत आहे. हे तीन सोमाजी कोणते हें पाहतां,

१ ला–पहिली वंशावळ लिहिणारा व आज म्ह. स. १६८४त हयात नसलेला;

२ रा–सैतवडेकर सोमाजी, ज्याकडून पूर्वील वंशावळ आणविली व जो स. १६८४ त हयात होता तो ;

३ रा–कृष्णाबाईस आपल्या वंशाची हकीकत रंगोबा व नरसोबा यांसमवेत समक्ष विचारणारा;— असे तीन दिसतात.

पहिला २५ व्या पिढीचा हें वर स्पष्ट करून दाखविलें आहे. २० व्या पिढीचा विठोबा सैतवडे येथें स्वतंत्र राहूं लागला आणि त्याचा मुलगा पुरुषोत्तम याच्या वेळीं तर सैतवडेकरांनीं वतनावर बेदावा लिहून दिला. यामुळें त्यांचा पुढील वंश मूळ बखरींत नाहीं. पुरुषोत्तमापासून पुढील वंश त्या शाखेच्या वंशवृक्षांत अन्यत्र दाखविण्यांत आला आहे. त्यांत सोमाजी सैतवडेकर हा २५ व्या पिढीस आहे. हा सोमाजी स. १६८४ त हयात असला पाहिजे; व २५ व्या पिढींतील लोवलेंकर सोमाजीनें तयार केलेल्या बखरीची प्रत त्याजकडे असली पाहिजे, असें अनुमान अयुक्त नाहीं. तिसरा सोमाजी हा २६ व्या पिढींतील, ज्याचे मूळचें नांव कान्होबा असें नमूद आहे तो, विठ्ठल सोमाजीचा दत्तपुत्र होय. दत्तक झाल्यावेळीं त्यास दत्तक आजाचें नांव ठेविलें हें स्पष्ट आहे. बखरीच्या आरंभीं सरदेश-

मुखीचा नांववाला मालक रंगोबा, त्याचा गुमास्ता थोरला सहोदर नरसोबा आणि उभयतांचा धाकटा चुलत भाऊ कान्होबा ऊर्फ सोमाजी यांचा निर्देश केला आहे, तो यथोचित व यथाक्रम आहे. येणेंप्रमाणें सर्व हकीकत सुसंगत, सुसंबद्ध आणि निर्विवाद ठरते.

पुढील वंशावळींत त्या त्या घराण्यांतील यच्चयावत् पुरुषांचीं नांवें आलेलीं नाहींत हें सांगावयास नकोच. अनेक कारणांमुळें आपल्या समकालीन मंडळींचा सुद्धां पूर्ण व बिनचुक वंशवेल तयार करणें मुष्किलीचें होतें, तर मागील दाखल्यांवरून व केवळ तुटपुंजा माहितीवरून आतां सर्वथैव बिनचुक व पूर्ण वंशावळी तयार होणें संभवनीय नाहीं. अनेक पुरुष माहीत नसतील, कित्येक परागंदा झालेले सुटले असतील, दूर दूर ठिकाणीं उद्योगधंद्यामुळें जाऊन तिकडेच कायम झालेल्यांची आठवण हि न राहिल्यानें पूर्वींच्या वंशावळींत दाखल नसतील. सारांश, अशा अनेक कारणांनीं बेपत्ता झालेल्यांची खबर वंशावळींत लागणार नाहीं. यामुळेंच एका शाखेपासून दुसरी कधीं, कां व कशी वेगळी झाली हें निर्विवादपणें दाखवितां येणार नाहीं. यशस्वी म्हणून तींच तींच नांवें पुनः पुनः ठेवल्यानें हि घोंटाळा झाला नसेलसें नाहीं. वंशावळींत १।२ जागीं, पिढ्यांची संख्या ३५।३६ पर्यंत जाऊन पोंचलेली आहे, तीं घराणीं सर्वांत वडील शाखेचीं आहेत. यामुळें वर स्वीकारलेल्या हिशेबी पद्धतीस थोडासा बाध आलेला दिसला, तरी तो अगदीं उपेक्षणीय आहे असें खात्रीनें वाटतें. तथापि वंशावळींची येथें दिलेली एकूणएक माहिती अगदीं पूर्ण, बिनचुक किंवा सर्वव्यापी आहे अशी बिनधोक हमी देतां येणार नाहीं. एवढें च फार तर सांगतां येईल कीं, मिळालेल्या साधनांचा एकमेकांशीं काळजीपूर्वक पडताळा घेऊन, मननपूर्वक सर्व माहिती होईल तितक्या बिनचूकीनें कागदावर बिनचुक उतरण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. असले प्रयत्न केव्हां हि पुढील दुरुस्तीस पात्र राहणारच.

आपल्याकडे वंशावळींतून स्त्रियांचा नामानिर्देश करण्याची चाल नाहीं. मुली, सुना यांचीं नांवें, वैवाहिक संबंधांचीं आप्त घराणीं एकत्र गोळा झालेलीं पाहण्यास मिळतीं, तर अनेकविध सामाजिक प्रश्नांबद्दल महत्वाची माहिती

संकलित झाली असती. निरनिराळ्या राज्यांच्या अमदानींत घराण्यांच्या क्षय-वृद्धी व उत्कर्षापकर्ष कसे झाले तें समजून आलें असतें. या पुढें असे वृत्तान्त लिहिणारांनीं अशा प्रकारची खटपट करावी म्हणून केवळ मार्ग-दर्शनार्थ येथें तसला अल्पसा प्रयत्न केला आहे.

प्रत्येक वंशावळींत स. ११५० तील मूळपिढीपासूनचा चालता क्रमांक आरंभीं डावे बाजूस दिला आहे; आणि उजव्या बाजूस तेवढ्या वंशावळी-पुरता, पिढ्यांचा पुनः वेगळा अनुक्रमांक दिला आहे. यामुळें एका पिढीची सर्व मंडळी एकाच ओळींत येऊन, पुनः मूळपुरुषापासून कोणाची कितवी पिढी हें सहज समजेल, तसेंच कोणत्या हि दोन वंशावळींतील कोणा हि दोघांचा एकमेकांशीं किती जवळचा अगर दूरचा संबध आहे, हें हि पाहतां येईल. सरदेसाई घराण्याचा बेटीव्यवहार इतर कोणत्या घराण्यांशीं होतो हें समजावें म्हणून समजून आलेले लग्नसंबंध, त्या त्या घराण्यांचीं आडनांवें, देऊन दरएक शाखेच्या त्रोटक हकीकतींत पुढें नमूद केले आहेत. पिढ्यांचे आंकडे वंशावळींत दिले आहेत, त्याखेरीज वंशावळींतील प्रत्येक इसमास स्वतंत्र आंकडा दिला आहे, त्यामुळें कोणत्या हि व्यक्तीचा निर्देश करणें असेल तर तो थोडक्यांत करण्याची सोय केली आहे. उदा. २-२६-७ म्हणजे वंशावळ नं. २ मधील २६ व्या मूळपिढीच्या ओळींतील नं. ७ चा केशव राघोबा हा इसम होय. या सोयीनें पुढें परिशिष्ट जोडण्याची वेळ आल्यास, किंवा या संबंधांत भाऊबंदांस पत्रव्यवहार करणें झाल्यास अगर कांहीं विशिष्ट माहिती मागविणें अगर पाठविणें असल्यास अडचण येणार नाहीं. शाखांच्या निरनिराळ्या वंशावळींच्या पहिल्या पुरुषास, तो पूर्वींच्या कोणत्या वंशावळींतील कोणता पुरुष हें याच पद्धतीनें लिहिलें असल्यानें गोंधळ होण्याचें कारण राहिलेलें नाहीं. ज्या इसमाचा नष्टांश आहे त्याचें नांव (   ) अशा कंसांत व ज्याच्या पुढील वंशाचा पत्ता लागला नाहीं त्याचें नांव [   ]अशा कंसांत दिलें आहे. इसवी सनाचे आंकडे ज्यांच्या-पुढें दिले आहेत ते इसम त्या सालीं हयात होते असा पत्ता लागलेला आहे. हे आंकडे (   ) कंसांत दिले आहेत. बिन कंसांचे असले आंकडे त्या इस-

माच्या मृत्युसनाचे दर्शक, आणि ज. म्हणजे जन्मसाल, व मृ. म्हणजे मृत्यु-साल असें समजावें.

नष्टांश व बेपत्ता यांची खूण नसतां हि कांहीं जणाचा पुढील वंश-विस्तार दिलेला नाहीं. या इसमांनीं वतनावर बेदावा लिहून दिल्यानंतर त्यांच्या पुत्रपौत्रादिकांचा नामनिर्देश मूळ दप्तरींत केलेला नाहीं. यामुळें आतां तो संबंध दाखवितां येणें मुष्कीलीचें आहे. तथापि त्यांचा किंवा [ ] या कंसांतर्गत पुरुषांचा नष्टांश च आहे असें बिलकुल समजण्याचें नाहीं.

सैतवडेकर, देवळेकर वगैरे नांवांनीं ज्यांचा उल्लेख वंशावळींत केला आहे, ते ते इसम त्या त्या गांवीं राहण्यास सहकुटुंब गेले व तेथें बहुधा त्यांचीं वेगळीं च घराणीं बनलीं. अशा स्वतंत्र शाखांच्या वंशावळी वेगळ्या दिल्या आहेत. आरंभींच्या वंशावळींत असे स्वतंत्र-शाखा-प्रवर्तक { } अशा कंसांत मोठ्या टाइपांत दाखविले आहेत.

ल. किंवा × म्हणजे इसमाचें लग्न कोणाशीं झालें हें सांगण्याची खूण असून, यासंबंधांत परकीय घराण्याचीं मिळालीं तेवढीं आडनांवें दिलीं आहेत.

दत्तक घेतलेल्या इसमास त्याच्या मुळच्या जागीं वंशावळींत जो अनुक्रमांक आहे तोच अंक त्यास जेथें दत्तक दिला तेथें, त्या दत्तकापूर्वी कंसांत लिहून दाखविला आहे. एका च वंशावळींत एखादा इसम कोठून कोठें दत्तक दिला घेतला हें यामुळें चटकन् दृष्टीस पडेल. एका वंशावळींतील इसम दुसऱ्या एखादे वंशावळींत दत्तक ह्मणून दाखविण्याच्या प्रसंगीं, वर (२–२६–७) च्या उदाहरणानें दाखविलेली पद्धत स्वीकारिली आहे.

शाखा-प्रवर्तकांखेरीज वंशावळींतील मोठ्या टाइपांत लिहिलेले सर्व इसम सन १९२४ अखेर हयात आहेत असें समजण्याचें आहे. प्रत्येक वंशावळींतील अखेरच्या १।२ पिढ्यांतील मोठ्या टाइपांत नसलेल्या इसमांपैकीं-सुद्धां कांहीं थोडे आज हयात असतील. बराच प्रयत्न करून हि सदरची माहिती आम्हांस अद्यापि मिळाली नाहीं. करितां विद्यमान मंडळीपैकीं पुढील वंशावळींत कोणी अविद्यमानांत दाखल झाले असतील, तर त्याबद्दल दोषाचें माप लेखकाच्या पदरीं न बांधतां, तें त्यांनीं स्वतःच्या किंवा त्यांची

भरपूर माहिती न पाठविणाऱ्या त्यांच्या आप्तेष्टांच्या पदरीं खुशाल बांधावें. कित्येकांकडून हल्लीं हयात असलेल्या मंडळीची जन्म-तारीख लिहून न येतां, फक्त त्यांच्या वयाचीं वर्षें लिहून आलीं. तीं व. किंवा वय यापुढें आंकडा देऊन दाखविलीं आहेत. ही वयोमर्यादा सन १९२४अखेरची असें समजावें.

आपल्या पूर्वजांनीं नाना प्रकारचे व्याप करून, घराण्याचा उत्कर्ष केला, अनेक संकटांस तोंड देऊन त्याचा सांभाळ केला, आणि अविरत प्रयत्नानें त्यास सुस्थिति आणिली. अशा पूर्वजांचें पुण्यस्मरण त्यांच्या वंशजांपुढें सदैव ताजें रहावें व तें त्यांस स्फूर्तिदायक व्हावें, हा हल्लींच्या या उद्योगाचा मुख्य उद्देश आहे; आतांच्या क्षणापर्यंत प्रत्येक लहान मोठ्या शाखेंतील प्रजेची फक्त खानेसुमारी करण्याचा हेतु नाहीं. वास्तविक पाहिल्यास, मराठशाहीच्या अस्ताबरोबरच या घराण्याच्या लौकिकाचा हि अस्त झाला. तथापि स. ११५० पासून स. १९२५ पर्यंतच्या वंशविस्ताराची माहिती यांत जितकी मिळवितां आली, तेवढी दरोबस्त दिली आहे. जेवढी माहिती यांत दिली आहे तीहून अधिक हातीं आली नाहीं. यानंतर प्रत्येकास स्वतःच्या संग्रहासाठीं आपआपल्या घरापुरता पुढील विस्तार सहज जोडतां येण्यासारखा आहे.

विभक्त झालेल्या व हल्लीं चालू असलेल्या वतनी शाखांचा निर्देश आरंभीं केला आहेच. त्यांचा दर्जा पाहूं गेल्यास, वडील शाखा प्रभानवल्ली व संगमेश्वर ही वतनांतील ८८ ची आणि बाकींच्या सर्व शाखा ८८ च्या आहेत. त्या—देवळेकर ८४, वेरवलीकर ८२, व मोडेंकर ८२, अशा ढोकळ मानानें आहेत. अहमदाबाद येथील सैतवडेकर शाखा ही प्राचीनकाळीं अलग झालेली असून, तिला हल्लीं वतनांत हिस्सा नाहीं. या शाखेंत आजमितीस चार दोन च पुरुष विद्यमान असून, त्यांची सांपत्तिक स्थिति चांगली आहे. वतनांतील प्रभानवल्ली व संगमेश्वर ही सर्वांत वडील शाखा, संतति व संपत्ति या दोनी बाजूंनीं सर्वांत रोडावली आहे. सतराव्या शतकांत या शाखेची पुष्कळ भरभराट होती. दहावीस जागीं त्यांचे वाडे माणसांनीं गजबजलेले होते. आज त्या ठिकाणीं जुन्या इमार-

तीचीं पडकीं भिंताडें व प्रचंड चौकटींच्या जोत्यावर उभें असलेलें लहानसें खोंपट दिसतें. त्यांतही वेळेवर दिवा लागण्याची मारामार झालेली पाहून मनास मोठा खेद होतो! विशाळगडावर ज्या वाड्यांत शेंकडों पुरुष नित्य वावरत, तेथें वाड्याच्या जागेच्या खुणा मात्र दिसतात! आस-पास एकादी टकली जेमतेम जीव धरून बसलेली दिसते! हा काल-गतीचा महिमा होय! गेल्या पन्नास पाऊणशें वर्षांत या घराण्यांत भयंकर संहार झाला व संततीचें वावडें झालें. बदललेल्या परिस्थितींत आपलें नांव राखण्याबद्दल यांनीं उद्योगास कमी केलें असें नाहीं; परंतु यश नाहीं; यामुळें बुडत्याचा पाय खोलांत, अशी स्थिति होऊन बसली आहे. सर्वांत कनिष्ठ शाखा मोंडेकरांची. वंशवृद्धीच्या बाबतींत ती सर्वांहून संपन्न असल्यामुळें, तिची विस्तृत वंशावळ अनेक तुकड्यांनीं दाखविणें जरूर झालें. या शाखेंतील पुष्कळ लोक निरनिराळ्या ठिकाणीं नेकीनें उद्योग करून व्यवस्थितपणें सुखानें नांदत आहेत. विद्वत्तेचें प्रमाण हि आज त्याच्यांत जास्त आहे. तरी पण सर्व घराण्यांतील मिळून पदवीधरांची संख्या दोन हातांच्या बोटांहून अधिक नसेल असें वाटतें.

पुढील वंशावळी लिहितांना, प्रसंगोपात एक विशेष गोष्ट नजरेस आली, तिचा उल्लेख मुद्दाम करण्याची वाचकांची परवानगी घेतों. संत-तीच्या अभावीं, जे जे कोणी दत्तक घेतले आहेत, तेथें १।२ रा अपवाद सोडून दिला, तर अशा दत्तकांस पुढें संतति विपुल झालेली च दृष्टीस पडते. परगोत्रांतील दत्तक घेतलेल्या महादोबाच्या वेरवली व मोंडें या शाखांचा विस्तार, इतर सर्व शाखांस सहज गुंडाळून टाकील एवढा मोठा झाला आहे. स्वगोत्रांतील दत्तकापासून झालेला विस्तार हि सर्वत्र औरस विस्ताराहून पसरलेला च दृष्टीस पडतो. ईश्वरी योजनेप्रमाणें ज्याचा नष्टांश व्हावयाचा, त्याचा मनुष्यकृत-दत्तकामुळें झालेला वंश-वेल असा कां फोंफा-वतो या कोड्याचा कोणी उलगडा करील तर फार चांगलें होईल.

पुस्तकाचा आकार मोठा धरावयाचा अशा योजनेनें वंशावळी प्रथम मोठ्या आकाराच्या लिहून त्यांतच जन्म-मृत्यूंचे काल, विवाहसंबंध वगैरे

अवांतर माहिती दर्शविली होती. परंतु मागाहून हल्लींचा लहान आकार पुस्तकाचा स्वीकारल्यामुळें त्यांत बसण्यासाठीं वंशावळीचे अनेक लहान तुकडे करावे लागले असून अवांतर माहिती दर एक शाखेच्या त्रोटक वृत्तान्तांत नेणें भाग पडलें आहे.

प्रकरण पांचवें

घराण्याची बखर

["इतिहास आणि ऐतिहासिक" या मासिक पुस्तकाच्या प्रथमांकांत ही बखर रा. वि. का. राजवाडे यांनीं यापूर्वीं छापविली; त्यावेळीं त्यांस ती सबंद मिळाली नव्हती. हल्लीं दुसरी एक सबंद प्रत मिळाल्यानें येथें बखर साद्यंत प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

मूळ बखर मोडी लिपींत असल्यानें वाचकांच्या सोयीसाठीं ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वारादि दुरुस्त केले असून, 'श्' व 'स्' आणि 'ल्' व 'ळ्' यांमधील मूळांतील अभेद बहुधा ठीक केला आहे. वाचण्यास सुलभ व्हावें म्हणून विरामचिन्हें सर्वत्र नवीन दिलीं आहेत; आणि दोन्ही प्रतींच्या पाठांतरांतून योग्य दिसले ते पाठ कायम केले आहेत. बखरीच्या सुरुवातीस लिहिलेली मिति इंग्रजी ता. २ माहे आगस्ट सन १६८४ होत आहे.]

संपादक.

स्वस्ति श्री शके १६०६ रक्ताक्षिनाम संवत्सरे श्रावण शुध प्रतिपदा सौम्यवासरे तद्दिने रंगोबा नायक व नरसोबा नायक व सोमाजी नायक मावळंकर यांणीं मातुश्री कृष्णाबाई व विष्णुभट सफरे व वासुदेवभट सफरे पुरोहित यांसि पुसिलें जे देशमुखी व सरदेशमुखी संगमेश्वर महालची, व मामले प्रभावळी व मामले दाभोळ या वतनांची वडिलांमध्यें अर्जक कोण

पुरुष, त्यापासून वंशावलि कैसी चालिली ? त्यावरून कृष्णाबाई यांणीं व उभयतां भटगोसावी यांणीं सांगितलें जे पूर्वील वंशावलि वडिलांचे वेळेची सोमोबा नायक यांणीं लिहिली होती ती वंशावलि सैतवडेकर सोमाजी नायक यांकडेस आहे ते आणवणें. त्यावरून सोमाजी नायक यांकडील वंशावलि-पत्र आणिलें. मग त्या पत्राचा उधारावरून व कृष्णाबाई व उभयतां भटगोसावी यांणीं सांगितलें त्यावरून वंशपरंपरा ऐसी आहे जे पूर्वीं नरसींभट सत्यवादी गोदातीरीं नृसिंहभक्त होते. ते देशाटणप्रसंगें तळकोंकणांत धामापुर समीप मावळंगें नामक गांवास सहकुटुंब आले. येथें श्रीनृसिंहाची मुहूर्ती बहुत ज्याग्रत पाहोन देवासंनिध राहोन देवताराधन त्यांणीं बहुत काल केलें. त्यांचे पुत्र गोविंदभट; त्यांणीं हि देवताराधन फार केलें. त्यांचे पुत्र मागती नरसींभट ते हि देवताराधन बहुत काल करीत असतां, त्यांस स्वप्न जाहाला जे तूं नीरानरसींपुरास जाऊन माजें भजन करणें; तेणें करून माहा सिधी पावसील. मग नरसींभट नीरानरसींपुरास जाऊन, पंधरा वर्षे तेथें राहोन सामराजमंत्रोपासना बहुत केली. यावर त्यास स्वप्न जाहाला जे तूं सेवा केलीस ते संपूर्ण करणें; या उपरी तुज देव साह्य आहे. ते कालीं राजा कोलापुरीं विजय नामक बरा धर्मात्मा होता. त्याचें राज्य तुंगभद्रेपासून गोदातीर व समुद्रकुलपरियंत होतें. तो राजा कौतुकास्तव संनिध सिंगणापुर येथें राहिला. तेथें नरसींभट सिंगणापुरास जाऊन दानाध्यक्षानुमतें राजदर्शन घेतलें. राजेयानें ब्राह्मणाची शिष्टता देखोन तळकोंकणांत संगमेश्वर ग्राम निधिनिक्षेपज्यलतरुपाषणसमवेत उदकपूर्वक दान दिल्हा. मग नरसींभट संगमेश्वरीं आले. गांवीची स्थित पाहातां पूर्वीं संगमेश्वरीं धर्मात्मा राजा कर्ण व सोमाजी प्रधान व इतर कार्यपुरुष धर्मात्मे होते त्यांणीं आपल्या नांवें देवस्थापना केल्या. त्याच्या वंशपरंपरेनें राजे राज्य करीत असतां पनालियाचे राज्याचें सेनाचक्र येऊन कर्णवंशज्याचें राज्य घेतलें. गांव उछिन होऊन बहुत वर्षे पडला. मग यवनांनीं वस्ती बहुत वर्षे केली. कालें करून ते हि उछिंन जाहाले. कांहीं यवन नदीवर राहिले होते. नरसींभट येऊन राजाज्ञेप्रमाणें गांवीं

सता (सत्ता) केली. वीस टके वार्षिक कर घेत. नरसींभटास पुत्र कृष्णाजी बहुत च पराक्रमी जाहाला. ते कालीं सिंगणापुरीचे राज्याचा वलीबेग नामक सहस्र अश्वांचा सरदार होता. त्यास राज्यानें गडनदीपासून बावननदीपावेतों सतर (७०) गांव मोकासा दिल्हे. यवनसता जाहाली. मग नरसींभट–पुत्र कृष्णाजीनें वलीबेगाची सेवा करून सतर गांवचा इजारा केला; आपलीच सता केली. संगमेश्वरीची रचना करून गांवांत ब्राह्मणादि सर्व जाती आणून हाटबाजार रचून पानमान-मर्यादा केली. मावळंगेयांत श्रीवर देवालय बांधलें. राज्यपुरुष वश्य करून सतर गांवची देशमुखी व सरदेशमुखी वतन साधिलें. मावळंगें इनाम घेऊन मावळंगकर उपनाम व कृष्णाजी नायक हें नाम प्रसिध केलें. कृष्णाजीस पुत्र दोन; गोविंद व विठल; विठल अपुत्र; गोविंद नायकास पुत्र नरसिंह. नरसिंह नायकास पुत्र तीन; केशव, वामन, कृष्ण. वामन राजसेवक जाहाला. कृष्णाजी मावळंगें येथें राहिला. केशव नायेक देशमुखी करीत असतां विद्यानगरीचा राजा बुकण याची चढाई कोलापुरीचे राज्यावरी होऊन राज्य घेतलें. सिंगणापूर उछिंन जाहालें. नर्मदेपरियंत सर्व देश विद्यानगरकरांहीं आक्रमण केला. मग केशवनायकें विद्यानगरास जाऊन राजदर्शन घेतलें. तळकोंकणांत सातशत गांवीची राजसता केली. तिमापा ब्राह्मण कारभारास अधिकारी करून आणिला; खारेपाटणास कारभार होई; या देशाचें पाटणदेश नाम जाहालें. केशव नायकाचा पुत्र रंगोबा नायक. तो देशमुखी करीत असतां धर्मोजी चवाण मराठा मवास होऊन त्याणें धामापुरीं दुर्ग बांधोन देशोपद्रव करी; राजसता चालो नेदी. त्याचा पुत्र सूर्याजी तो हि बलिष्ठ जाहाला. मग रंगोबाचा पुत्र गणोबा त्याणें विद्यानगरीहून साह्य आणून स्वयें युध करून सूर्याजीस मारिलें; तेव्हां गणोबा नायकास धामापुर इनाम दिल्हें. गणोबाचा पुत्र गोपाळ; त्याचा पुत्र विसाजी; तो देशमुखी करी तेव्हां हणमंतराव चांदा मराठा मवास होऊन डिंगणीच्या रानांत राहोन देश मारी. तेव्हां विसाजीनें परभोळकर हिरोजी प्रतिष्ठित होता त्यासीं घरोबा करून विद्यानगरीचें साह्य आणून

वंशावळ नं. १. बखरीच्या पूर्वार्धावरून मांडलेली

सन ११०० ते १७०० इ.

पिढी	
१	१ नृसिंहभट्ट सत्यवादी (११४३). मूळ पुरुष.
२	२ गोविंदभट्ट ,,
३	३ नृसिंहभट्ट ,, (११९०).
४	४ कृष्णाजी नायक सरदेशमुख मावळंगेकर
५	५ गोविंद ६ (विठ्ठल)
६	७ नृसिंह (५ गोविंद यांचा)
७	८ केशव (१३५२) ९ [वामन] १० (कृष्णाजी)
८	११ रंगोबा (१३७८)
९	१२ गणोबा (१४०३)
१०	१३ गोपाळ (१४२८)
११	१४ विसाजी (१४५३)
१२	१५ नृसिंह (१४७८)
१३	१६ गणोबा (१५०३)
१४	१७ रंगोबा (१५२८).

१४	१७ रंगोबा बिन गणोबा
१५	१८ सोमाजी (१५६५). १९।२०।२१ [इतर तीन पुत्र]
१६	२२ राघोबा (१५७८)
१७	२३ नरसोबा (१५९८)
१८	२४ केशव
१९	२५ गणोबा; २६ [विसोबा]; २७ [नारोबा गिऱ्येंकर]
२०	२८ महादोबा; २९ **नरसोबा देवळेकर**; ३० (दामोबा); ३१ विठोबा
२१	३२ गोविंद; ३३ [अंतोबा]; ३४ [शिवाजी] ऊर्फ विसाजी केळशीकर; ३५ [हरी]; ३६ **पुरुषोत्तम सैतवडेकर**
२२	३७ केशव
२३	३८ नरसोबा
२४	३९ (केशव); ४० गणोबा; ४१ महादोबा लोवलेकर; ४२ नारोबा ओझरेंकर
२५	४३ अंतोबा धामापुरकर; ४४ **राघोबा प्रभावळीकर**; ४५ सोमाजी; ४६ विसोबा

चांग्रास मारिलें; तेव्हां कुंभारखाणी खुर्द इनाम घेतली. बिसाजीस पुत्र नरसिंह नायक देशमुखी करीत असतां विद्यानगरीहून आणापा खारेपाटणास देशाधिपति करून आणिला. त्याचें व परभोळकरांचें महद्वैर जाहालें. परभोळकर विठोजी देश मारी; मग नरसिंह नायक यांचा पुत्र गणोवा नायक यानें विद्यानगरास जाऊन राज्याचें दर्शन घेऊन परभोलकरांस सवाशत गांव वरघांटे व कोंकणांत देऊन नियता (नेमा) वर ठेविलें. कांहीं काल गेलियावरी धाकोजी चाळका मराठा माहाशूर तीनशत लोकांचा सरदार त्याणें सेवाधर्में राजकृपा संपादून गडनदीपासून बावंननदीपर्यंत नवद गांव मोकासा घेतले; संगमेश्वरीं दुर्ग बांधोन त्या आश्रयें राहिला. नरसिंह नायकाचा व चाळके यांचा माहाविरोध जाहाला. मग नरसिंहनायकें संगमेश्वर सोडून नदीच्या उतरभागीं दोन नदीमध्यें दुर्ग बांधोन दुग्ध–गणपतीपासून नूतन पेठ केली, हाटबाजार केला, जाखमातेच्या पूर्वभागीं दुसरी पेठ वसविली. मग नरसिंहपुत्र गणोवा व धाकोजीचा पुत्र रामजी यांचें माहावैर जाहालें. चाळके च्यार पिढ्या होते. गणोवाचा पुत्र रंगोवा; तो पराक्रमी होता. रामाजीचा पुत्र कुमारजी; त्याचें व रंगोवाचें वैर होतें च. मग रंगोवाचा मुतालीक यादव नाईक यानें मध्यस्त होऊन रंगोवाचें व कुमारजी यांचें सख्य केलें. रंगोवानायक विद्यानगरास जाऊन बहुत राजमान्य पावला; साहा गांव मोकासा घेतले; वेंकापा अधिकारी खारेपाटणास आणिला. रंगोवा नायकाचे पुत्र च्यार; जेष्ठ सोमाजी; त्याणें विद्यानगरास जाऊन सातशत गांवची सरदेशमुखीचीं पत्रें घेतलीं; अंमल बसावा तंव रामराव कानडा साह्य नाहीं. तंव बेदरची पादशाई याची चढाई जाहाली. वरघांटे व तळकोंकणांत सर्व सता बेदरची जाहाली. बेदराहून काळा खोजा व गोरा खोजा कोंकणांत आले; त्यांणीं सर्व देशाची लावणी संचणी केली. माहालास कसबे केले. प्रभावळी मामला करून आठरा माहाल मामल्यास दिल्हे. कृष्णाजी परभोलकरास बारा गांव दुसरे कोंकणांत मोकासा दिल्हे. रंगोवाचा पुत्र सोमाजी; त्याणें पराक्रम फार केला. चाळके मवासपणें वर्तों लागले.

कुमारजी चाळक्याचा पुत्र धारोजी; त्याणें उष्णतीर्थाजवळ श्रीकेदाराचें देवालय बांधिलें; असुडें गांव देवास इनाम दिल्हा. सोमाजी नायकाचा पुत्र रावोवा. त्याचा पुत्र नरसोबा नायक; त्याणें बेदरचे पादशाहास भेटोन सरदेशमुखीचा जीर्णोधार केला; पत्रें घेतलीं व तेथील सेना व परभोलकर साह्य करून चाळके यासीं युध केलें. धारोजी खोत चाळके संगमेश्वरीं युधीं पाडिले. नरसोबानायकें पहिल्याप्रमाणें संगमेश्वर वसविलें; नदीचे उत्तरभागीं पेठ केली होती ते संगमेश्वराखालीं घेतली. मग कांहीं कालें बेदर लोपलें; विज्यापुरी पादशाई जाहाली. नरसोबा नायकाचा पुत्र केशवनायक विजापुरीं पादशाहास भेटोन, बहुमान पावोन, सरदेशमुखीचा जीर्णोधार करून फर्मान घेतला; बुर्बाड गांव इनाम घेतला; पादशाहापासून प्रभावळीस हवालदार आणिला. मग त्याचें व प्रभावळीकरांचें महद्वैर जाहालें. कानोजी प्रभावळीकर मवास जाहाला; त्यावरी विज्यापुरीची फौज येऊन मोठें युद्ध प्रभावळींत जाहालें; सारे प्रभावळीकर युधीं पडिले. कानोजीचा पुत्र चांदजी त्याचे पुरोहित याणें घेऊन गोवीलास पळवून नेला. चांदजी देवगिरीस जाऊन पादशाहास भेटोन गोवील तपा मोकासा घेतला. मग तो सवाशत शिपाई सजून राजापुरपावेतों देशोपद्रव करी; मग केशवनायक पादशाहापाशीं विज्यापुरीं मध्यस्त होऊन चांदजीस कौल घेतला. चांदजीनें सातशत माणसांनिशीं पादशाहाची चाकरी मान्य केली. मग त्यास संगमेश्वर तर्फेस ०००० चास गांव मोकासा दिल्हे; शृंगारपुर राहावयासी दिल्हें. केशवनायकीं कोंडअसुडें व गिऱ्यें गांवीं आगर व शेत इनाम घेतलें. केशवनायक प्रभावळींत हवालदाराजवळ राहिले. त्याचे पुत्र तीन; गणोवा व विसोवा व नारोवा. नारोवास पुत्रसंतान नाहीं; त्याणें रामभट सरवटे खारेपाटणकर याचा पुत्र विष्णु दत्तक घेतला; तो गिऱ्यें गांवीं केशवनायकीं आर्जविलें शेत व आगर तें खाऊन तेथें राहिला; त्याणें गिऱ्यें गांवीचें ज्योतिष व धर्माधिकारण साधून तेथें च राहिला. विसोवानें देशमुखीची मुद्रा दुसरी करावी, निमे कारभार आपण करावा म्हणोन गणोवानायकापाशीं वेव्हार आरंभिला; तेव्हां समस्त दायाजांनीं व त्याचे

पिते केशवनायकीं विसोवास सांगितलें जे जो वडील त्यासच सिके; इतरांनीं वडिलांचे आज्ञेंत वर्तावें; वाडिलांनीं सर्वांचें चालवावें; आमच्या वंशांत आजिपावेतों यैसें चालिलें; यास अन्यथा वर्तेल जो त्याचें बरें होणार नाहीं; मग विसोवा समजला. गणोवानायकीं विसोवास अर्धें बुर्वाड दिलें. गणोवानायकीं देशमुखी चालविली. त्यास पुत्र च्यार; माहादोवा, नरसोवा, दामोवा, विठोवा, येकूण च्यार. माहादोवा सरदेशमुखी करीत असतां, खिळण्यास किलेदारानें हुजुरून नंवद गांवचा तनखा मामल्याहून निराळा केला. तो कारभार निराळा जाहालियावरी किलास नरसोवा राहिला; त्याचा वंश देवळेकर देसाई. विठोवास पुत्र दोन; हरी व पुरुषोत्तम. पुरुषोत्तमानें विज्यापुरास जाऊन साडेच्यार हजार लारी खर्च करुन सैतवडें माहालची सरदेशमुखीचें फर्मान आणिलें; खर्च लागला तो माहादोवानें रीण घेऊन दिला. मग माहादोवाजवळ सरदेशमुखीचा वंत पुर्षोत्तम मागों लागला; वंत द्या किंवा कर्ज वारा. मग माहादोवानें सारें कर्ज आपण च वारिलें; आणि सरदेशमुखीच्या वंतासीं पुर्षोत्तमास पुत्रपौत्रादिकीं संमंध नाहींसा केला. पुरुषोत्तमाचा वंश सैतवडेकर. दामोदर अपुत्रिक; माहादोवास पुत्र तीन; गोविंद, अंतोवा व शिवाजी. गोविंद देशमुखी करीत असतां प्रभावळी प्रांत इजारा केला तंव पर्ज्यन्य गेला, वलटा पडला; टोळांनीं आगरें भक्षिलीं; लोक देशांतरास गेले. गोविंद नायकास महसुलाबद्दल खिळण्यावर नेऊन घातलें. दुसरे वर्षीं पर्ज्यन्य लागला. गोविंद नायकीं विज्यापुरास जाऊन अर्धी बाकी सोडविली; प्रभावळीची खोती मिरास फर्मानी व वोझरें बुद्रुक तर्फ देवरूख हा गांव इनाम घेतला; शिवाजीबंधूस बरोबर नेऊन साहा हजार लारी खर्चून त्याचें नांवें केळशी व सेवी तर्फेचें फर्मान घेतलें; खर्च आपण देऊन केळशी व सेवीची देशमुखी विसाजीस दिल्ही; आणि वडिलांचे वतनास संमंध नाहींसा केला. विसाजी तिकडेसच राहिला. अंतोवानायक निरंतर प्रभावळींत राहिले. गोविंद नायकास पुत्र केशव, त्याचा पुत्र नरसोवा नायक; त्याणें मावळंगेयाचे च्यार विभाग करून येक देवळेकरांस व येक सैतवडेकरांस दिल्हा; आपण दोन


घेतले ; इतर दायाजांस कोणास कोंड व कोणास आगरें व शेतें देऊन समजाविलें; विज्यापुरास जाऊन लोवलेयाचा कोंड इनाम आणिला. नरसोवास पुत्र च्यार; केशव नायक येक, गणोवा नायक येक, माहादोवा नायक येक व नारोवा नायक येक. केशवनायकें अतिपराक्रम केला; विज्यापुरीं साहा वर्षें होते. गणोवा नायक प्रभावळीस राहोन सरदेशमुखीचा कारभार करीत होते. महादोवा लोवलेयाच्या कोंडांत राहिला; त्यास लोवलेकर यैसें ह्मणत; त्यास पुत्र आपण सोमाजी. केशव नायकीं आडीच हजार होन दरबारखर्च करून दाभोळच्या सरदेशमुखी व दोन गांव यांचे फर्मान करून घेतले; प्रभावळी प्रांतें मुचरी गांव इनाम घेतला; हक लाजिमा ज्याजती करून घेतला. दिवाणांतून प्रभावळी प्रांत इजारा तिसाला केला ; टोळकांत जाहाली ; सारीं आगरें मोडलीं; त्यामुळें दोन वर्षांत पंचावन हजार लारी नुकसान आलें; दिवाणांतून वराता जाहाल्या, यैवज नाहीं; सारी हके व इनामती आमानत केल्या; बाकीबद्दल केशव नायकास खिळण्यावर घातलें. मग गणोवा नायकीं विज्यापुरास जाऊन दीड वर्ष राहोन तिजाई बाकी सोडविली; हके व इनामती सोडविल्या ; रीण घेऊन निमे बाकी खंडिली; उरली त्यास यैवज नाहीं ; तेव्हां सारे गोत्रज मेळऊन आठ हजार लारी बाकीस दिल्ह्या; मग केशव नायक सुटले. नारोवा नायक बंधु त्याचे स्वाधीन दोन वर्षे धामापुर व मावळंगें दोन गांव केले होते; मग दोन वर्षांचा यैवज साडेतीन हजार लारी त्याकडेस राहिल्या; बाकी खंडावयास केशव नायक मागत होते, परंतु ते न देत; बाकीबद्दल गडावर ओलीस राहा ह्मणत; तेव्हां नारोवा नायकीं उत्तर दिल्हें कीं आम्हांस वतन नलगे ; आपणांजवळ द्रव्य द्यावयास नाहीं, आणि आपणांस गडावरी राहवत नाहीं; यैसें बोलोन समस्त दायाजांस पत्र लिहून दिल्हें जे आपण वतन सोडिलें, आपणांस पुत्रपौत्रादिकांस वतनाशीं संमंध नाहीं. त्यापासून ते वतनास तुटले. केशवनायकीं काशीकरांचीं कर्जें काढून विज्यापुरीची कर्ज—बाकी वारिली. केशव नायक प्रभावळींत असत. गणोवा नायक संगमेश्वरीं राहिले. केशवनायकास

पुत्र नाहीं. गणोबा नायकास क्षयवेथा जाहाली; ते डोली करून माहायात्रेस गेले. केशव नायकाचा प्रांत-समय आला तेव्हां संगमेश्वरचे घरीं आले. काशीकरांचीं देणेयांचा व देशमुखीचा भार कोणी दायाजांमध्यें मान्य न करी; तेव्हां आपल्यास लोवल्याहून आणून आपल्या गळां शिके घालून वतन व कर्जाचा भार घालून बोलिले जे, सोमाजी तूं आपला पुतण्या; गणोबा नायक वाराणसीस गेले; ते आले तर बरेंच; नाहीं तर सर्व वतन इनामती तुजे स्वाधीन आसत; यैसें बोलोन उत्तम लोकास गेले. नारोबानायकीं वतनास संमंध नाहीं, आपण पुत्रपौत्रादिकीं वतन सोडिलें यैसें पत्र देऊन मौजे बोझरें बुद्रुक तर्फ देवरूख येथें राहिले. त्याचा पुत्र बोझरेयांत विसोबा आहे. याप्रमाणें पूर्वील वंशावलि व वतनाची स्थित असे.

या उपरीची स्थिति सोमाजी नायक देशमुखी करीत असतां गणोबा नायक रोगमुक्त होऊन तीन वर्षीं महायात्रेहून देशास आलियावरी सोमाजीनायकीं वडिलांचे शिके व वतन गणोबा नायक चुलते यांचे स्वाधीन केले. मग गणोबानायकें च्यार वर्षें देशमुखीचा कारभार केला. सोमाजीनायकांस विज्यापुरास पाठविले, त्यांणीं बरा उत्कर्ष केला; सांदेची मसलत पातशाहापाशीं मान्य केली; तेव्हां कोलवेची बाग व कुवसेवाडी इनाम घेतलीं; माखजन गांव व उंचगांव इसाफती घेतल्या. परभोळचे हवालदारास वैर जाहालें म्हणून मागतीं विज्यापुरास गेले; तीन वर्षें राहोन साहा हजार लारी दरबार-खर्च करून हवालदारास तहगीर केला; दाभोळचे सरदेशमुखीचीं ताकीदपत्रें व हक लाजीमा करून घेतला; परभोळीची राईवाडी व निवें बुद्रुक तर्फ देवरूख हा गांव इनाम घेतला व मिरासखोती करून घेतली; परभोळीस आले. त्यावरी गणोबानायकांसमक्ष व त्यांपरोक्ष सतावंन वर्षें देशमुखी चालविली. त्यांचा पुत्र विठलनायक; त्यांनीं विज्यापुरास जाऊन ठिकाणाती व इनामती व छत्री सुखासन बहुमान पावोन आले. नव वर्षें देशमुखी चालविली. सोमाजी नायक पहिल्यानें विज्यापुराहून येऊन गणोबानायकास संगमेश्वरीं भेटले. तेव्हां त्यावर गणोबा नायक बहु संतोषी जाहाले. कारभार सोमाजीनायकाचे स्वाधीन करून गणोबा नायक धामा-

पुरीं राहिले. त्यांचे पुत्र आंतोबानायक व राघोबानायक. आंतोबा नायक धामापुरीं राहिले. राघोबानायक परभोळींत कारभार करीत; त्यांस गणोबानायकीं दाभोळच्या सरदेशमुखीच्या कारभारास पाठविलें. गणोबानायक धामापुरीं राहोन घराचा जीर्णोधार केला; विहीर बांधिली; श्रीकेशवाचे देवालय बांधलें; अकरावे वर्षांत शांत जाहाले. त्यांचे पुत्र राघोबानायक च्यार वर्षे दाभोळेंत होते; तेथें हवालदारास नपडाव जाहाला; त्यावर ते संगमेश्वरास आले. मग सोमोबानायकीं कारभार राघोबानायकास संभाळून (सांगून ?) आपण वाराणशीस गेले. सोमाजी नायक आलियावरी राघोबानायकीं कारभार सोमाजीनायकांचे स्वाधीन करून आपण वाराणशीस गेले. आडीच वर्षाहीं येऊन संगमेश्वरींच राहिले. त्यांचे पुत्र केशव नायक दाभोळेस सरदेशमुखीस गेले; पांच वर्षे तेथें राहोन तेथील पाणी लागोन वेथा जाहाली; मग तेथून येऊन कोंडअसुडें येथें राहिले. विठलनायकीं परभोळींत व संगमेश्वरीं राहोन नव वर्षे देशमुखी चालविली; मग पाठीवरी पुळी होऊन संगमेश्वरीं शांत जाहाले. त्यांचे दतपुत्र विद्यमान सोमाजी नायक. विठलनायकानंतर कोंडअसुडेंयांतून केशवनायकीं येऊन चवीस वर्षे सरदेशमुखी चालविली. त्यांचे दत्तपुत्र विद्यमान रंगोबा नायक; यांस पुत्र तीन; केशव, गणेश, विसोबा. नरसोबानायकाचा पुत्र कनिष्ट नारोबा ज्याणें वतन पुत्रपौत्रादिकीं संमंध नाहीं म्हणून लिहून दिल्हें त्याचा पुत्र विसोबा, त्यास गणोबानायक चुलते यांणीं माऊळंगेयांत आणून येक आगर व येक शेत देऊन ठेविला; त्यास पुत्र आंतोबा. आंतोबास पुत्र दोघे; नारोबा, कृष्णाजी. नारोबा धामापुरीं राहिला. कृष्णाजीस पुत्र कानोबा. त्यास पुत्र दोन; नरसोबा, रंगोबा. रंगोबास राघोबा नायक. राघोबा नायकाचे पुत्र केशव नायक; ते अपुत्र; त्यांणीं रंगोबास दत्तक घेतला. रंगोबाचा सहोदर नरसोबा सोदरपणाच्या नात्यानें निरंतर संगमेश्वरीं असे. त्या काळीं तळकोंकणांत शिवाजी महाराजांचें राज्य जाहालें. केशव नायक महाराजांस भेटले. राजांहीं बहुमान केला; आणि पिलाजी नीलकंठराव सुभेदार यांबरोबर दिल्हे. त्यावर रावजी नाना सुभेदार जाहाले. केशव नायक अशक्त,

वंशावळ नं. २—शाखोत्पत्तिदर्शक—बखरीच्या उत्तरार्धावरून मांडलेली.



यांत २८वी पिढी पुरी दिली नाहीं. बखरीच्या वेळेपर्यंतची मंडळी फक्त येथें नमूद केली आहे. नंबर १२ सोमाजी कोणाचा जनकपुत्र तें पक्कें समजलें नाहीं. सन १६८४ नंतर (बखरीनंतर) जन्मलेल्यांचा येथें निर्देश केलला नाहीं.

सेवा न होय; तेव्हां केसो भैरव मुतालिक सुभासरदेशमुखीच्या कारभारानिमित्य ठेवून आपण संगमेश्वरास आले; मग वर्षानंतर शांत जाहाले. केसो भैरव राजापुरीं तीन वर्षे होते; त्यांस अतिसार व ज्वरवेथा होऊन संगमेश्वरचे घरास आले; सुभास कारभारी नाहीं; दुसरा शाहाणा मुतालिक नाहीं; रंगोबा लहान; कृष्णाबाई यांनीं नरसोबा, रंगोबा नायकाचा सोदर, शाहाणा चौकस कार्यक्षम पाहोन रंगोबा नायकाची मुतालिकी सांगोन शिके देऊन सुभास पाठविला. त्याणें चौदा वर्षें सरदेशमुखीची मुतालिकी बरी चालविली. मग दोन वर्षें कागदीं पत्रीं आपलेंच नांव लिहावयास लागला; यास्तव कृष्णाबाई यांनीं नरसोबा नायकास आणून घरीं ठेविला; हणमाजी केशव खेर यांस सुभाची मुतालिकी सांगोन राजापुरास पाठविला; तो आतां कारभार करितो. नरसोबास वर्णवेथा बहुत दिवस जाहली; मग धामापुरीं राहिला; तेथेंच शांत जाहाला. त्याचा पुत्र कानोबा लहान आहे.

टीप:– बखरीच्या दोन प्रती आम्हांस मिळाल्या; त्या दोनी हि नकला असाव्यात असें त्यांच्या स्वरूपावरून वाटलें. वरील शेवटच्या भागापूर्वींच्या भागांतील अखेरचा मजकूर " आंतोबास पुत्र दोघे; नारोबा, कृष्णाजी ...... त्यांनीं रंगोबास दत्तक घेतला " असा आहे. अस्सल वरुन नक्कल उतरतांना या ठिकाणीं काहीं तरी घोंटाळा झाला आहे व तो दूर करण्यास दुसरी प्रत अपुरी असल्यानें, अन्य साधन तूर्त हातीं नाहीं. नेहमींच्या पद्धतीनें अवतरणांतील मजकूर वाचीत गेल्यास या अवतरणांतील " अंतोबा " हा नं. २ वंशावळींतला नं. ९ चा इसम असें साहजिक वाटतें. परंतु तसें धरून चाललें कीं, वृत्तान्तांत अनेक दोष उत्पन्न होतात. तेंच " अंतोबा " त्याच वंशावळींतील नं. १ हा समजल्यास ते सर्व दोष टळून ऐतिहासिक कागदांतील दोन तीन ठिकाणच्या मजकुराचा अन्वय योग्य प्रकारें लागतो. बखरींतील सदरीं उद्धृत केलेल्या मजकुरांत " कृष्णाजीस पुत्र कान्होबा त्यास पुत्र दोन " हें वाक्य " कृष्णाजी उर्फ कानोबा यास पुत्र दोन " असें मुळांत असावें; तसेंच " रंगोबास राघोबा नायक " हें वाक्य अगदीं चुकीचें

आहे किंवा विनाकारण च पडलेलें आहे, अथवा राघोवा नायक हे शब्द दोनदां लिहिले गेले आहेत, असें पुष्कळ विचारांतीं दिसून आलेलें आहे. बखरीची जी प्रत अपुरी आहे ती या मजकुरापर्यंत येऊन पोंचलेली नाहीं; आणि अस्सल प्रतीच्या अभावीं पक्का तपास करण्यास इतर साधन नाहीं. बखरीचीं हीं २।३ वाक्यें फार घोंटाळा करणारीं असल्यानें, त्यांतून मार्ग काढून नं. २ ची वंशावळ तयार केली आहे. उपलब्ध कागदपत्रांवरून ती सुसंगत आहे. बखरीची आणखी एखादी सबंद प्रत मिळाल्यास ही गोष्ट स्पष्टपणें सांगण्यास हल्लीं इतका संकोच वाटणार नाहीं. —सं०.

प्रकरण सहावें

राजवाड्यांचा निष्कर्ष

घराण्याची बखर व इतर कागदपत्र यांवरून रा. वि. का. राजवाडे यांनीं 'इतिहास व ऐतिहासिक' मासिकांत लिहिलेल्या एका निबंधाचा सारांश त्यांच्याच शब्दांत खालीं दिला आहे.

प्रस्तुत मासिकांत प्रभानवल्लीच्या सरदेसायांचे सहा दस्तऐवज छापले आहेत. पैकीं पांचव्यांत सरदेसायांची कुळकथा दिली आहे. तिच्यावरून कऱ्हाड्यांचें कोंकणांतील प्राचीनत्व व तत्कालीन राजकीय इतिहास कळण्यास मार्ग होतो. सरदेसायांची कुळकथा दोनदां बनविली गेली. पहिली प्रत वंशावळींतील १५ वा पुरुष सोमोवा नायक यानें लिहिली व दुसरी प्रत २५ व्या पिढींतील रंगोवा नायक, नरसोवा नायक व सोमाजी नायक यांणीं शक १६०६ त सजविली. पहिली प्रत शक १४०० च्या सुमारास लिहिली. ही पहिली प्रत, मातुश्री कृष्णाबाई व सफरे पुरोहित या तिनी लेखी व तोंडी आधारांवरून दुसरी प्रत सजविली गेली.

पहिल्या २५ पिढ्यांपैकीं तिसरा पुरुष नरसिंहभट हा कोल्हापुरच्या शिलाहारांपैकीं विजयार्क ऊर्फ विजयादित्य राजाचा समकालीन होता. या विजयादित्यानें कोल्हापुरप्रांतीं शक १०६५ पासून शक ११११२ पर्यंत राज्य केलें. अर्थात् दुसरा नरसिंहभट या अवधींत विद्यमान होता. दुसरा नरसिंहभट जर शक १०६५ त होता, तर दर पिढीस २५ वर्षें धरिल्यास, पहिला नरसिंहभट शक १०१५ त हयात होता असें झालें. दुसऱ्या नरसिंहभटास विजयादित्यानें संगमेश्वर गांव धारादत्त दान दिला. कुळकथेंतील हकीकतीवरून या विजयादित्यानें संगमेश्वरच्या राजाला जिंकून, त्याचा वंश उच्छिन्न केल्याचें दिसून येतें. उच्छिन्न झालेल्या राजकुलांतील एक पूर्वज कर्णराजा असून त्याचा प्रधान सोमाजी नांवाचा होता. कर्णानें संगमेश्वरीं कर्णेश्वर नांवाचें शिवालय बांधिलेलें अद्याप आहे; व देवालयांतील एक शिलालेख भारतेतिहासमंडळापुढें वाचिलेला आहे. विजयादित्यानें कर्णवंश व संगमेश्वर दोनीं उच्छिन्न केलीं. कर्णाच्या पदरीं यवन ह्मणजे मुसलमान सैनिक असत, त्यांची वसती संगमेश्वरीं होती. पुढें ते उच्छिन्न झाले तरी थोडे यवन संगमेश्वरच्या नदीवर वसती करून होते. " संगमेश्वरीं यवनांनीं वसती बहुत दिवस केली " या कुळकथेंतील वाक्याचा अर्थ असा होतो कीं, यवनांची वसती विजयादित्यानें संगमेश्वर जिकल्याच्या पूर्वीं संगमेश्वरास होती. कर्णराजाच्या कालीं हि यवन संगमेश्वरीं रहात असावे असें दिसतें. म्हणजे शक १००० पूर्वीं संगमेश्वरास मुसलमानांची म्हणजे अरबांची वसती होऊन बहुत दिवस लोटले होते. शक ५६० त अरबांनीं इराण जिंकिल्यावर, इराण्यांचा कोंकणाशीं असलेला व्यापार अरबांनीं आपल्या हातीं घेऊन, कोंकणांतील संगमेश्वर वगैरे खाड्यांवरील गांवीं त्यांनीं वसती केली. ह्या वसतीला अनुलक्षून कुळकथेंतील वरील उल्लेख आहे.

कोल्हापुरच्या विजयादित्य व भोज या दोन शिलाहारांच्या पदरीं, वलीबेग नांवाचा सहस्र अश्वांचा मुसलमान सरदार होता. त्याला त्या राजांनीं गडनदीपासून बांवनदीपर्यंतच्या ७० गांवांचा मोकासा दिला. यवनांची सत्ता

संगमेश्वरीं झाली. तेव्हां नरसिंहभटाचा पुत्र कृष्णाजी यानें त्या सरदाराची मर्जी संपादून ७० गांवचें सरदेशमुखी वतन संपादिलें. कृष्णाजीचा पणतू केशवनायक याचे कालापर्यंत ७५।१०० वर्षांत शिलाहारांचें राज्य देवगिरीच्या यादवांच्या हातीं गेलें, व यादवांचा हि मोड होऊन, संगमेश्वराभोंवतील कोंकणावर विजयानगरच्या राजांचा अंमल बसला. कोल्हापुरच्या शिलाहारांची समाप्ति शक ११४० त झाली; देवगिरीच्या यादवांची समाप्ति शके १२४० त झाली. विजयानगरचें राज्य शक १२४० च्या सुमारास सुरू झालें. कृष्णाजी नायकाच्या वेळीं शक १२७६ त विजयानगरास बुक्क किंवा बुक्कण राजा होता. मुसलमानांनीं देवगिरीचें राज्य जिंकिल्याच्या गडबडींत संगमाचे पुत्र हरिहर व बुक्क यांनीं विजयानगरास राज्य स्थापिलें व दक्षिण कोंकणांत अंमल सुरू केला. नर्मदेपर्यंत विद्यानगरकरांचें राज्य झालें. तेव्हां केशवनायकानें विद्यानगरास जाऊन ७० गांवच्या देशमुखीचा पट आणिला. पुढील देशमुख रंगोबा नायक, गणोबा नायक, विसाजी नायक, नृसिंह नायक यांनीं आपआपल्या वेळची अनेक बंडें मोडून त्या कामगिरींबद्दल अनेक इनामती विजयानगरकरांकडून मिळविल्या. १५ व्या पिढीचा सोमाजी नायक बिन रंगोबा नायक यानें अखेर विजयानगराहून सातशें गांवच्या सरदेशमुखीचें वतन संपादन केलें. तों शक १४८७ त विजयानगरचें राज्य तालीकोटच्या लढाईंत बुडालें, व बेदरच्या बरीदशाहांचा अंमल संगमेश्वरावर सुरू झाला; तो शक १५२० च्या सुमारापर्यंत ह्मणजे सोमाजीनायकाचा नातू नरसोबा नायक याच्या देशमुखीपर्यंत होता. या अंमलांत प्रांताचे सोयीवार पोटविभाग होऊन लावणी संचणी व्यवस्थित झाली. पुढें विजापुरच्या आदिलशाही सुलतानांचा अंमल या प्रांतावर ज्यारी होऊन तो शक १६०६ पर्यंत म्हणजे दुसऱ्या सोमाजी नायकाच्या कालापर्यंत राहिला.

अशी एकंदर या कुळकटाची हकीकत आहे व ती सुसंगत अतएव विश्वसनीय आहे. कर्णवंशापासून शक १८४० पर्यंतच्या इंग्रजी अंमलाच्या १०० वर्षांच्या अवधीपर्यंत ८०० वर्षांत संगमेश्वर व प्रभानवल्ली प्रांतावर एकंदर

आठ अंमल झाले. त्या अवधींत इंद्राच्या इंद्राणीप्रमाणें सरदेसायांची सरदेशमुखी कायम होती. अद्याप हि कांहीं वतन सरदेसाई खात च आहेत. कोंकणपट्टींत अव्याहत आठशें वर्षें, मध्यें खंड न पडतां, चाललेलें असें हें सरदेसायांचें घराणें कित्येक राजेरजवाड्यांच्या घराण्यांहून हि प्राचीन आहे. आणि प्राचीन असण्यांत जर कांहीं प्रतिष्ठा असेल—आणि ती आहे हें व्यवहारांत आपण पहातों—तर ती प्रभानवल्लीकर सरदेसायांच्या कुळाला सार्थ मिळालेली समजणें अपरिहार्य आहे. या आठशें वर्षांत या प्रांतावर परकीयांचा अंमल २१९ वर्षें–मुसलमानांचा ११९ वर्षें व इंग्रजांचा १०० वर्षें–आहे. बाकी ६०० वर्षें हिंदूंचा होता. त्यापूर्वींचा अंमल हिंदूंचा च होता हें सांगावयाला नको च. दोन हजार वर्षांत स्वकीयांची एवढ्या कालाच्या अंमलाची प्रौढी पृथ्वीच्या पाठीवरील किती प्रांतांना मिरवितां येईल बरें? सरदेसायांचा मूळपुरुष नृसिंहभट सत्यवादी मोठा पुण्यवान कीं त्याचा औरस वंश आज ८०० वर्षें बिनखंड चालला आहे!

पहिला सोमाजी नायक व दुसरा सोमाजी नायक यांचे हि उपकार इतिहासज्ञ विसरणार नाहींत; एतदर्थ कीं त्यांनीं आपल्या प्रांताचा इतिहास, ठोकळ कां होईना, लिहून ठेविला. ही इतिहास-लेखनाची प्रवृत्ति सध्यांच्या त्यांच्या एका वंशजाच्या ठाईं प्रादुर्भूत झालेली दिसते.

बखरींतील तपशील, इतर स्थलीन प्रत्यंतरें पाहतां, पूर्णपणें विश्वसनीय आहे. फक्त शक १६०६ च्या श्रावण शुद्ध प्रतिपदेस सौम्यवासर नाहीं, एवढी एक चूक आहे ती उपेक्षणीय आहे.

शके १०१६ नंतर कऱ्हाडच्या शिलाहारांचा अंमल खारेपाटण व संगमेश्वर येथें झाला. तो अंमल झाल्यावर नरसिंहभट सत्यवादी यास कऱ्हाडच्या विजयादित्य शिलाहारानें संगमेश्वर गांव इनाम दिला. नरसिंहभटाचें हें कऱ्हाडे घराणें दक्षिण कोंकणातील पहिलें व महत्वाचें होय. कऱ्हाडच्या कऱ्हाडे ऊर्फ करहाटक ब्राह्मणांचें यानंतर राजापुर, संगमेश्वर या टापूंत नरसिंहभटाच्या घराण्याच्या अनुषंगानें आगमन झालें हें निश्चित आहे.

———

प्रकरण सातवें

भूगोलविषयक किंचित् माहिती

या घराण्याच्या शाखांचा फैलाव हल्लीं उत्तर हिंदुस्थानापासून तों दक्षिणेंत कर्नाटकापर्यंत झालेला आहे. देशावरील ठिकाणें सुप्रसिद्ध असल्यानें त्यांच्या विषयीं कांहीं सांगण्याची जरूरी नाहीं. परंतु सरदेसायांच्या वतनांचें मूळ ठिकाण जो रत्नागिरि जिल्हा त्या विषयींची माहिती थोड्या विस्तारानें दिल्यास घराण्याचा वृत्तान्त समजण्यास सुलभ होईल असें समजून तसें केलें आहे.

मुंबई बेटाच्या दक्षिणेस असलेल्या त्या इलाख्याच्या आरबी समुद्र व सह्याद्रि पर्वत यांच्या दरम्यानच्या अरुंद पट्टीस कोंकण म्हणतात, हें सर्वांस ठाऊक च आहे. या पट्टीचे उत्तर कोंकण व दक्षिण अथवा तळ—कोंकण असे दोन भाग. तळ-कोंकणच्या भागास हल्लीं रत्नागिरि जिल्हा म्हणतात. याचे उत्तरेस सावित्री नदी म्ह० बाणकोटची खाडी असून तिच्या पलीकडे शिद्दीचें संस्थान जंजिरा किंवा दंडाराजपुरी आहे. दक्षिणेस तेरेखोलची खाडी व तिच्या पलीकडे पोर्तुगीज अंमलाचा गोवें प्रांत आहे.

स० १८३० पूर्वीं रत्नागिरि जिल्ह्याच्या उत्तरेस असलेले रायगड, राजपुरी, आणि पेण हे तालुके तळ—कोंकणांत मोडत. हे तालुके सोडले म्हणजे उरलेल्या तळ—कोंकणाचे म्हणजे रत्नागिरि प्रांताचे १ सुवर्णदुर्ग, २ अंजनवेल, ३ रत्नागिरी, ४ विजयदुर्ग, आणि ५ मालवण असे पांच तालुके होते. सरदेसायांचा वतनी संबंध यांपैकीं अंजनवेल, रत्नागिरि आणि विजयदुर्ग या तालुक्यांशीं होता. हे तीन तालुके त्यावेळीं अनुक्रमें दाभोळ, रत्नागिरी आणि राजापुर या नांवांचे सुभे प्रांत होते. ते निरनिराळ्या सुभेदारांच्या ताब्यांत असत.

हल्लीं अंजनवेलचे खेड व चिपळूण, रत्नागिरीचे रत्नागिरि व देवरूख म्ह० संगमेश्वर, आणि विजयदुर्गचे राजापुर व देवगड असे तालुके झाले

आहेत. पूर्वी सुभ्यांचे मामले व मामल्यांचे तपे म्ह० हल्लींचे तर्फ किंवा महाल, असे पोट विभाग असत. प्रत्येक तप्यांत कसब्याचे मोठे किंवा ठाण्याचे मुख्य गांव असून, शिवाय मौजे, मजरे, वाड्या, कोंड व बाग असे अनुक्रमें लहान लहान गांव होते. गांवांस ' देह ' म्हणत.

दाभोळ बंदर वासिष्ठी नदीच्या उत्तर तीरावर आहे. दाभोळ सुभ्याखालीं सुवर्णदुर्ग तालुक्यापैकीं थोडा भाग होता, परंतु मुख्य भाग अंजनवेल तालुक्याचा आणि सैतवडें वगैरे रत्नागिरि तालुक्याच्या उत्तरेकडील भाग याच सुभ्याखालीं होता.

अंजनवेल तालुक्याचे सांवडें, वेळंब, गुहागर आणि चिपळुण हे तपे होते. जंगली-जयगड, गोपाळगड आणि विजयगड हे किल्ले; उत्तर तिवरा आणि कुंभारली हे दळणवळणाचे घाट; आणि कापशी व साळकाय--गोळकाय या नद्या; हीं सर्व या तालुक्यांतील होत.

रत्नागिरिः—तपे—सैतवडें, मालगुंड, संगमेश्वर, लांजें, धामणसें, फुणगुस, माजगांव, हातखंबें, हरचिरी, पांवस, देवळें, देवरूख आणि कोंडिवरें. किल्लेः—प्रचीतगड, महिमतगड, खिळणा ऊर्फ विशाळगड, जयगड, रत्नागिरि, व पूर्णगड. नद्याः—गडनदी, बावनदी, रत्नागिरीची खाडी, शास्त्रीनदी, सप्तलिंगी, सोनवी, घडघडी, कांजळी व मुचकुंदी म्ह० पूर्णगडची खाडी; घाटः—मळा, कुंडी व आंबा;

विजयदुर्गः—तपे—खारेपाटण, राजापुर, सौंदळ व विजयदुर्ग; किल्ले—यशवंतगड, गगनबावडा व विजयदुर्ग; घाट—अणस्कुरा, फोंडा व कांजिर्डा असे असून राजापुरची खाडी व खारेपाटणची खाडी या मुख्य नद्या.

पुढें छापलेल्या जुन्या कागदपत्रांत नमूद असलेल्या गांवांचीं नावें मुळांत च तपा, तर्फ किंवा तालुका यांसुद्धां दिलीं आहेत. सुभ्याचें नांव देखील बहुधां जेथल्या तेथें आहे. यामुळें तीं ठिकाणें नकाशावर सांपडण्यास अडचण येणार नाहीं. अंजनवेल, रत्नागिरि आणि विजयदुर्ग या तीन तालुक्यांशीं व त्यांतून विशेषतः रत्नागिरि तालुक्याशीं सरदेसायांच्या कामगिरीचा मुख्य संबंध. रत्नागिरि तालुक्याच्या उत्तर हद्दीवर गडनदीच्या कांठीं माव-

ळंगें गांवीं मूळ पुरुषानें कायमची वस्ति केली; आणि तेथून ५।६ मैलांवर दक्षिणेस असलेला संगमेश्वर गांव या घराण्यास प्रथम इनाम मिळाला; आणि पुढें लागलीं च मावळंगें गांव हि इनाम मिळाला. तेथून क्रमाक्रमानें एक एक नवीन गांव संपादन करीत या तालुक्याच्या दक्षिण सरहद्दी-वरील प्रभावळी गांवापर्यंतच्या पूर्व हद्दीवरील भागावर सरदेसायांचा अंमल बसला. मराठी राज्यांत विशाळगड हा किल्ला पंत प्रतिनिधींचें राहण्याचें ठिकाण झाल्यावर सरदेसायांनीं किल्ल्याच्या पायथ्याजवळील मामल्याचें ठाणें प्रभावळी हा गांव स्वतःच्या राहण्याचें मुख्य ठिकाण केलें. कामाचा व्याप व संतति वाढूं लागली तशी मावळंग्यापासून प्रभावळीपर्यंतच्या टापूंत मोर्डें, देवळें, वगैरे ठिकाणीं कायमपणें राहण्याची सोय त्यांनीं पाहिली. दाभोळ व अंजनवेल येथें सरदेशमुखीच्या कामावर असलेल्यांनीं त्या भागांत व राजापुर सुभ्याच्या कामावरील मंडळींनीं तिकडे सोयीवार जागा पाहून कुटुंबें नेऊन निरनिराळ्या गांवीं वस्ति केली. याप्रमाणें या तीन तालुक्यांत त्यांच्या शाखांचा प्रसार झाला. सरदेशमुखीच्या वतनाशीं संबंध सोडलेल्या कुटुं-बांस हि वतनदारांनीं कोणास कोंड, कोणास शेत याप्रमाणें देऊन त्यांच्या निर्वाहाची सोय केली होती. हीं कुटुंबें मावळंकर आडनांवानें त्या ठिकाणीं राहिलीं, व वंशवृद्धीमुळें निर्वाहाचें साधन अपुरें पडतां च तेथून चहूंकडे पांगलीं. आरंभीं त्यांस मिळालेलें उत्पन्न बेताचें च असल्यानें त्यांची पांगापांग फार लवकर झाली; त्यामुळें आजमितीस आपण सरदेसायांचें कोणी आहों याची त्यांस पूर्ण विस्मृति झाली आहे, एवढेंच नव्हे तर 'मावळंकर' याच उपनांवाच्या निरनिराळ्या कुटुंबीयांस सुद्धां एकमेकांची बिलकुल ओळख राहिलेली नाहीं. रत्नागिरि प्रांतस्थ कुटुंबाची ही स्थिति तर कैक वर्षांपूर्वीं उत्तर हिंदुस्थानांत जाऊन तिकडे च कायम झालेल्या मंडळींची गोष्ट पुसा-वयास च नको. असो.

या इतिहासांतील गडनदी ही पश्चिमवाहिनी व बाव (बावंद) नदी ही उत्तरवाहिनी असून त्यांचा संगम भातगांवाजवळ होऊन तेथून तीस शास्त्री-नदी हें नांव मिळालें आहे. ती जयगडाजवळ समुद्रास मिळते.

मुसलमानी अंमलांत कांहीं गांवांस त्यांनीं आपलीं नांवें दिलेलीं त्यांच्याकडील सनदापत्रांत आहेत तीं अशीं:—

१ प्रभानवल्ली–मुज्फराबाद; २ दाभोळ–मुस्तफाबाद; ३ खेड–जाफराबाद.

खेडाजवळ हवेली जाफराबाद म्हणून ठिकाण आहे व मराठी सनदांतून जीं गांवें खेड तर्फेंत आहेत तीं फारसी सनदांतून जाफराबाद तर्फेंतील म्हटलें आहे म्हणून खेडचें मुसलमानी नांव जाफराबाद असावें असा तर्क आहे. हमजाबाद हें नांव गुहागार किंवा अंजनवेल यास दिलेलें असावें असें वाटतें. एका फारसी कागदांत महमदाबाद ऊर्फ 'सतुरा' असें लिहिलेलें आढळलें, परंतु हें गांव कोणतें तें पक्कें समजलें नाहीं.

प्रकरण आठवें

विशाळगडची हकीकत

ज्या वंशावळी गोळा करून या पुस्तकांत प्रसिद्ध केल्या आहेत त्यांत या घराची मांडणी कोठें जमत नाहीं. नांवांत जी चूक झाली असावी असें वाटतें तशी ती अन्यत्र झालेली नुक्तें च दिसून आलें आहे. 'प्रतिनिधि घराण्याचा इतिहास, ग्रंथांक १' पृ. २११ यावर "राघोबा नायक बिन रंगोबा नायक सरदेसाई" ही मूळचीं मोडींतील अक्षरें "राणोबा, विनायक बिन रंगो, विनायक सरदेसाई" अशा प्रकारें वाचून एका इसमाचे तीन इसम तेथील लेखकानें केले आहेत. "राघोबा" या ओळखीच्या रूपाच्या जागीं सरदेसाई मंडळी "राघोवा" या वेगळ्याच रूपाचा उपयोग करीत असल्यानें एका **वा** अक्षरानें वरील घोंटाळा उडविला आहे. काशींतील लेखाची नक्कल करण्यांत ही चुकी होणें साहजिक आहे.

काशी व नासिक येथील उताऱ्यांत कोंकणांतील मावळंगें व धामापुर आणि तुळशी पेटा मंडणगड येथील मंडळींचीं नांवें अमुक नायक बिन तमुक नायक या देशमुखीच्या सार्वत्रिक पदवीसह लिहिलेलीं आहेत. तुळशी येथील मंडळींनीं 'देशमुख' हा हुद्दा हि लिहिला आहे. तसेंच उत्तर हिंदुस्थानांतील बासोदा येथील घराण्यानें "नाईक सरदेसाई मावळंकर मूळ राहणार देवळें" असें स्वच्छ लिहून शिवाय "आमचीं घराणीं या प्रांतीं जालवण, सागर, गुलसराई येथें आहेत" असा मजकूर सं. १९३८ च्या सदरच्या लेखास जोडिला आहे. यावरून या सर्व ठिकाणचीं मंडळी मावळंकर सरदेसायांपैकीं च आहेत यांत संशय रहात नाहीं. नं. ९ वंशावळींतील देशांतरीं गेलेल्या मंडळीचा च हा पुढील विस्तार असावा.

सातारा राज्याचे पंत प्रतिनिधि व त्यांच्या कारकीर्दीची वर्षे आतां येथें देऊन हें प्रकरण पुरें करूं.

सातारा राज्याचे प्रतिनिधि (स. १८४८ पर्यंत).

(ज्यांच्या पाठीमागें आंकडे आहेत ते कऱ्हाडकर म्ह० हल्लींचे औंधकर यांचे पूर्वज होत.)

		पंत प्रतिनिधि	कारकीर्द
		प्रल्हाद निराजी	स. १६९२–९७.
		तिमाजी रघुनाथ हणमंते	स. १६९७.
	१	परशुराम त्र्यंबक किन्हईकर	स. १६९८.
पुनः		तिमाजी रघुनाथ	स. १६९९.
,,		परशुराम त्र्यंबक	स. १७००–१७०८.
		गदाधर प्रल्हाद	स. १७०८–१०.
पुनः	१	परशुराम त्र्यंबक	स. १७१०–११.
		नारायण प्रल्हाद	स. १७११–१२.
,,	१	परशुराम त्र्यंबक	स. १७१४–१८.
	२	श्रीनिवास परशुराम ऊर्फ श्रीपतराव	स. १७१८–४७.
	३	जगजीवन परशुराम ऊर्फ दादोबा	स. १७४७–५४.
	४	श्रीनिवास गंगाधर ऊर्फ भवानराव	स. १७५४–६१.
		भास्करराव रघुनाथ	४ महिने.
		नारो शंकर राजे बहादर	७ महिने.
पुनः	४	श्रीनिवास गंगाधर	स. १७६३–६४.
	५	भगवंतराव त्र्यंबक	स. १७६५–७३.
पुनः	४	श्रीनिवास गंगाधर	स. १७७४–७७.
	५	परशुराम श्रीनिवास ऊर्फ थोटेपंत	स. १७७७–१८४८.

ही सर्व माहिती ' प्रतिनिधि घराण्याचा इतिहास ' या पुस्तकाच्या आधारें दिली आहे.

प्रकरण दहावें

महत्वाचे कांहीं वाद

वतनाबद्दल वाद खेळण्याची हौस महाराष्ट्राइतकी इतरत्र क्वचित् आढळेल. कोंकणप्रांतीं तर ती एक दुर्व्यसन होऊन बसली आहे. सरदेसायांचें कोंकणांतील वतन मोठें आणि वंशविस्तार हि दांडगा; तेव्हां वादाचें पीक सोळा आणे येण्यास क्षेत्र सर्वथैव अनुकूल. या क्षेत्राची कष्ट-मशागत करण्यास सरदेसायांनीं बिलकुल कसूर केली नाहीं. आज दोन अडीचशें वर्षें कज्जे चालले आहेत. कज्जांचा मूळ विषय वतनें; तीं संपुष्टांत येत चाललीं, तरी कज्जेदलालीची मगरमिठी सैल पडल्याचीं चिन्हें कांहीं दिसूं लागलेलीं नाहींत. आरंभीं वंश-विस्तार फारसा नव्हता तेव्हांदेखील पुढल्या वादळाचीं पूर्व चिन्हें दिसावयास लागलीं होतीं. परंतु त्यावेळीं बाहेरील लोकांशीं झगडण्याचें काम विशेष असे; यामुळें घरांत एकोपा राखणें सर्वांस अवश्य होतें. विठोजी परभोळकर, धारोजी चाळके शृंगारपुरकर सुर्वे वगैरेशीं वरचेवर सामना करून वतनाचें संरक्षण करणें हें च त्यावेळीं मुख्य काम होऊन बसलें होतें. या तंट्यांचा एकवार पुरा निकाल लागून स्थिरस्थावर झाल्यावर स्वार्थ **घरांत** डोकावूं लागला. १९ व्या पिढीच्या तीन भावांतील मधल्यास देशमुखीची दुसरी मुद्रा करून निंमा तनखा वेगळा पाडून घेण्याची इच्छा झाली; परंतु दायादांनीं कानउघाडणी केल्यावर त्याची समजूत पडली. पुढच्या पिढीस विशाळगड किल्ला व त्या खालील नंवद गांव यांचा तनखा सरकारांतून स्वतंत्र केल्यानें तिकडे एक भाऊ गुंतला, व भांडणाची ढुंपी लागण्यास अवकाश मिळाला नाहीं. २१ वे पिढीस पुरुषोत्तम सैतवडेकर आपला " वंत " मागूं लागला; तेव्हां त्याला त्याच्या कबूलीनें कर्जमुक्त व "वतनाशीं पुत्रपौत्रादिकीं संबंध नाहींसा" करण्यांत आलें. त्यापुढें २५ व्या पिढीपर्यंत कांहीं भानगड उत्पन्न झाली नाहीं. भाऊबंदांच्या पोटापाण्याची कायमची व्यवस्था त्या

त्या वेळच्या देशमुखानें हात राखून न केल्यानें त्याच्या देशमुखीच्या अधिकारांत किंवा वतनांत ढवळाढवळ करण्याचें कोणाच्या मनांत आलें नाहीं; आणि गृहकलहाचा वारा न लागल्यानें सरदेशमुखी अंमलाची ज्योत उत्तम प्रकारें तेवत राहून चहूंकडे घराण्याचें तेज फांकलें, इभ्रत वाढली व दरारा बसला.

गृहकलहाग्नीची पहिली ठिणगी कशी पडली व पेट न घेतां कशी विझली हें आतां थोडें मागें जाऊन पाहिलें पाहिजे.

केशव नायक (१-२४-३९) यांच्या पश्चात् गणोबा ना० (१-२४-४०) काशी यात्रेहून परत आल्यावर पुतण्या सोमाजी लोंबलेकर (१-२५-४५) यांजकडील सरदेशमुखीचा कारभार पुनः हातीं घेऊन थोडे दिवस काम करून धामापुरास विश्रांतीस्तव जाऊन राहिले. जाण्यापूर्वीं त्यांनीं पुनः सोमाजीस च कारभार सांगितला. गणोबाचा थोरला मुलगा अंतोबा (१-२५-४३) म्हातारपणीं वडिलांची सेवा करण्याकरितां त्यांचे जवळ धामापुरीं राहिला. अंतोबा सरदेशमुखीचा कारभार चालविण्याच्या वयाचा होता; परंतु वडिलांजवळ राहणें त्यास अधिक अगत्याचें वाटलें म्हणून असो किंवा त्याच्या थंड्या स्वभावास कारभाराची दगदग व उठाठेव नको असेल म्हणून असो, त्यानें अखेरपर्यंत कारभारासंबंधीं सर्वथैव उदासीन वृत्ति च ठेविली. गणोबाचा दुसरा मुलगा राघोबा मात्र सोमाजीजवळ कारभाराची माहिती घेण्याकरितां राहिला. कांहीं दिवसांनीं गणोबानें राघोबास दाभोळच्या सरदेशमुखीवर पाठविलें, व सोमाजी एकटाच कारभार करीत राहिला. ही गुमास्तेगिरी सोमाजीनें एकंदर ५७ वर्षें केली. गणोबानें शेवटच्या खेपेस सोमाजीकडे देशमुखी सोंपविली त्या वेळीं सोमाजीसुद्धां बराच वृद्ध झालेला होता. स्वतः तो फार पराक्रमी व कर्तृत्ववान् असून शिवाय दीर्घकाल देशमुखीचा कारभार त्याच्या हातीं असल्यामुळें, सरकार दरबारांत त्याची माहिती व वजन फार चांगलें होतें. त्याचा मुलगा विठोबा हा हि त्याच्याप्रमाणें च हुशार आणि विजापूर दरबारांत मानमान्यता पावलेला होता; बापाच्या पश्चात् त्यानें हि सरदेशमुखीचा

कारभार ९ वर्षे स्वतंत्रपणें केला होता. या प्रमाणें चांगल्या हुशार, वजनदार आणि दरबारी वशील्याच्या या पितापुत्रांच्या हातीं एकसारखा ६०–६५ वर्षें देशमुखीचा कारभार असतां खऱ्या मालकास (गणोबाच्या मुलांस) बाजूस सारून सरदेशमुखी बळकाविण्याची बुद्धि उभयतांपैकीं एकास हि झाली नाहीं यावरून त्यांची नीतिमत्ता फार वरच्या दर्जाची होती हें दिसून येतें. अंतोबाच्या निरिच्छपणामुळें आणि राघोबाच्या पूर्ववयामुळें, तसेंच पुढें तो दाभोळ कारभारांत गुंतल्यामुळें, सोमाजी व विठोबा यांस दगलबाजी करण्यास ही आयती सर्वोत्कृष्ट संधी होती. परंतु ते पूर्णपणें कर्तव्यनिष्ठ राहिले, आणि राघोबास कारभारांत तरबेज करण्यांत त्यांनीं हरएक प्रकारची मदत केली. यामुळें पुढें त्या कारभाराची जबाबदारी अंगावर पडल्यावेळीं राघोबास मुळींच अडचण पडली नाहीं; त्याची छाप सर्वांवर उत्तम प्रकारें बसून त्याच्या मागून, वडील घराणें बाजूस राहून, त्याचा मुलगा केशव नायक यास सरदेशमुखी मिळण्यास कोणी हरकत केली नाहीं. अशा प्रकारें अनंत गणेशाचे मुलगे नारोबा व कान्होबा यांची वडीलकी मागें पडली. नारोबाची पुढील हकीकत खात्रीची समजली नाहीं. केशवनायकानंतर त्याची हुशार व धोरणी स्त्री कृष्णाबाई हिनें अंतोबाचा धाकटा नातू रंगोबा दत्तक घेतला, आणि त्यास सरदेशमुखीचा मालक करून तो अल्पवयी म्हणून त्याचा थोरला भाऊ नरसोबा यास त्याची गुमास्तेगिरी सांगितली. यामुळें सरदेशमुखीच्या कारभाराची खरीखुरी वहिवाट एका अर्थीं वडील घराण्याच्या च हातीं राहून त्यावेळेपुरतें तरी तंट्याचें बीज रुजलें नाहीं. कृष्णाबाईच्या धूर्तपणानें वडिलकीचा मालक कान्होबा यास आपल्या च मुलाविरुद्ध वडीलधाकटेपणाच्या हक्काचा प्रश्न उत्पन्न करणें सहज च अवघड झालें. कान्होबाच्या मृत्यूनंतर मात्र गुमास्ता नात्यानें कारभार करणाऱ्या नरसोबास तसली खटपट करणें अवश्य वाटलें; म्हणून रंगोबाच्या नांवानें कारभार चालवीत असतां, पुढें पुढें स्वतःच्या नांवानें तो चालविण्याचा त्यानें घाट घातला. परंतु सासरा, नवरा आणि दत्तक मुलगा या कारभाराच्या तीन पिढ्या प्रत्यक्ष पाहियेलेल

मानी व वृद्ध कृष्णाबाईस नरसोबाची ही लुडबुड खपली नाहीं. तिनें नरसोबास परत बोलावून त्याच्या जागीं दुसरा गुमास्ता नेमून पाठवून दिला. अशा प्रकारें वास्तविक वडील अशी ही शाखा मागें पडून रंगो केशवाचें घराणें कायमचें पुढें सरसावलें. वतनी वडिलकी या प्रकारें प्रभानवल्ली घराण्यांत आली.

नरसोबाचा पुत्र कान्होबा (२-२८-१३) यानें पुढें शाहू व ताराबाई यांच्यांत राज्याच्या मालकीविषयीं तंटा जुंपल्यावेळीं देशमुखीबद्दल एकवार उचल खाल्ली होती, आणि त्यांत कानोबास स. १७०९ मध्यें ताराबाईकडून आज्ञापत्र मिळालें हि होतें. परंतु प्रभानवल्लीकरांनीं तें अल्पावधींत रद्द करविलें; आणि मग मात्र कानोबाचें घराणें कायमचें मागें पडलें. कानोबा स. १७२९ मध्यें हयात होता या पलीकडे त्याची पुढील हकीकत आज उपलब्ध नाहीं. गणोबाचा धाकटा भाऊ विसोबा (२-२८-१६) यानें हि औरंगजेबाच्या कोंकण प्रांतींच्या धामधुमींत बादशाहाकडून आपल्या नांवें वतनाच्या सनदा करून घेण्याची खटपट केल्याचें दिसतें (ले. ४ पहा). विसोबाचा हा उद्योग कान्होबाच्या अनुमतानें झाला असावा असें सनदेंतील शब्दांवरून दिसतें; कारण सनदेंत त्याचें नांव ' गणोबाचा भाऊ ' असें नसून ' कानोबाचा भाऊ ' म्हणून लिहिलेलें आहे. धाकट्या घराण्यांतील दोन सख्या भावांत तंटा लावून दिल्यास त्या घराण्यांत गेलेलें वतन आपल्याकडे परत येण्यास सुलभ होईल, दोघांचें भांडण म्हणजे च तिसऱ्याचा लाभ, अशी हि कदाचित् कानोबाची हिकमत असेल. तें कसें हि असो, पण एवढें खचित कीं, यावेळीं २५ व्या पिढीचा सोमाजी लोवलेकर व त्याचा पुत्र विठोबा यांच्या वेळची उच्च नीतिमत्ता ढासळून सरदेसायांवर निव्वळ स्वार्थाचा पगडा बसूं लागला. थोड्या च अवधींत हा स्वार्थ इतका बळावला कीं, त्याच्या नादीं लागून एकमेकांविषयीं वरिष्ठ अधिकारीवर्गापासून तों थेट बादशाही दरबारापर्यंत चुगल्या व नालस्त्या करून, व प्रसंगीं लांचलुचपतीचा प्रयोग करून परस्परांचा पाडाव करण्यापर्यंत मजल येऊन पोंचली.

विसाव्या पिढीचा महादोबा नायक सरदेशमुखीचा कारभार करीत असतां खिळण्याच्या किल्लेदारानें किल्ला व त्या खालील ९० गांव मिळून मामल्याहून निराळा तनखा करून घेतल्यानें तो कारभार निराळा झाला व किल्ल्यावर महादोबाचा धाकटा भाऊ, देवळेकर देसायांचा पूर्वज, नरसोबा राहिला, वगैरे मजकूर बखरींत आला आहे च. हा किल्ल्याच्या देशमुखीचा कारभार मामल्याच्या सरदेशमुखीच्या कारभाराहून कमी दर्जाचा होता. परंतु विजापुरच्या सलतनतीचे लचके तोडून स्वतंत्र मराठशाहीची स्थापना करण्याचा शिवाजीनें उपक्रम केल्यापासून या किल्ल्याचें महत्व एकसारखें वाढूं लागलें, आणि त्या मानानें तेथील जमेदारांस हि महत्व आलें. किल्ला ज्याच्या हातीं राहील त्याच्या आधीन आसपासच्या प्रांताचें स्वामित्व राहील हें स्पष्टपणें दिसूं लागतां च किल्ल्याचा हवालदार व त्याच्या हाताखालचे इतर अधिकारी यांची मर्जी संभाळण्याची जरूर राज्याधिकाऱ्यांस भासूं लागली, आणि त्यांस सहज च फौजबंद सरदारांचा दर्जा आला. या स्थित्यंतरामुळें किल्ल्याच्या देवळेकर देशमुखांपुढें वरिष्ठ दर्जाचे मामल्याचे सरदेशमुख फिके पडले. या वेळचा मामल्याचा सरदेशमुख रंगोबा केसोबा (२-२७-११) हा महत्वाकांक्षी होता. त्याच्या लक्ष्यांत वरील आपत्ति येतांच त्यानें किल्ल्याकडील तत्कालीन वृद्ध देशमुख महादोबा (९-२४-७) याची देशमुखी हरप्रयत्नानें हिरावून घेण्याचा निश्चय करून महादोबाशीं झगडा सुरूं केला. चहाड्या, चुगल्या, नालस्ती, वशीला, लांचलुचपत या वाममार्गाच्या साधनांची कांस येथें रंगोबानें प्रथम धरिली. महादोबानें हि आपला मुलगा गोविंद नायक व नातु बाळाजी विठ्ठल यांकरवीं त्या च मार्गानें तोडीस तोड करून रंगोबाची डाळ शिजूं दिली नाहीं. या कामीं एकदां अखेर साधल्यावर पुढें केव्हां हि देवळेकरांनीं आपल्या अधिकारकक्षेंत कोणत्या हि इतर घराण्यास बिलकुल फिरकूं दिलें नाहीं.

धाकट्या घराण्यानें वडील घराण्यावर जय मिळविण्याचा हा परंपरागत धडा पुढें हि चांगला गिरविण्यांत आला. देवळेकरांत पुढें वेरवली आणि मोरडें मिळून वडील व खुद्द देवळेकर म्हणून धाकटी, अशा दोन पोट-

शाखा निर्माण झाल्या. औरंगजेबाच्या अंमलदारांकडून विशाळगड किल्ला पंतप्रतिनिधींच्या स्वाधीन करून देण्याच्या कामीं वडील शाखेस मोरडें गांव इनाम मिळाला होता. मध्यंतरीं धामधुमीच्या प्रसंगीं तो सरकारांत अमानत झाला व पुनः स. १७०६ मध्यें सरदेसायांकडे मोकळा झाला; त्या वेळीं वेरवलकरांस कांहीं एक न देण्याच्या बुद्धीनें मोर्डेकरांनीं केलेलें वर्तन गर्ह्य आहे. त्यासंबंधाची हकीकत पुढें दिलेल्या नरसोबा अंतोबा (९-२६-१८) च्या पत्रांत सविस्तर आहे. नरसोबा स्वतः इकडील वतनावर तुळशीपत्र ठेवून देशांतरीं गेलेला होता, आणि वंशावळीवर पाहिल्यास दोनी पक्ष त्यास अगदीं सारखे—दोन सख्या भावाचे वंश—होते; यामुळें त्याच्या पत्रांतील मजकुरांत सत्यापलाप होण्याचें कारण नव्हतें. हा तंटा प्रतिनिधींनीं आपल्या वजनानें सामोपचारानें मिटविला आणि वेरवलीकर व मोर्डेकर समान हिस्सेदार ठरले.

वडिलांनीं घालून दिलेला भांडकुदळपणाचा हा कित्ता गिरविण्याच्या कामीं आपण इतर शाखांस हार जाणार नाहीं असें सर्वांच्या अनुभवास आणून देण्याची पाळी आतां फक्त देवळेकरांची (हल्लीं ज्या घराण्यास देवळेकर म्हणतात त्याची) उरली होती. ही शाखा सर्वांत कनिष्ठ आणि तिच्यांत मंडळी हि थोडी; परंतु या घरगुती यादवींत या शाखेनें दाखविलेल्या चिकाटीची व केलेल्या टोलवाटोलवीची अपूर्व करामत पाहिली म्हणजे खोटी बाजू उचलून धरणारा एखादा बिलंदर वकील सुद्धां जरासा चमकून जाईल, आणि कलह—कलाकौशल्याच्या अग्रेसरत्वाचा मान सगळ्या मावळंगकरांत देवळेकरांस मुकाट्यानें देईल असें वाटतें. कौशिकगोत्री मावळंकरांत अत्रिगोत्रोत्पन्न मुलगा दत्तक झाल्यानें कुलाला आलेला बाट दोन पुऱ्या पिढ्या झाल्यानंतर तिसऱ्या पिढीला उमगला. दत्तक वंशाच्या उत्पन्नाचा यथाविभाग वांटा उचलण्यास व त्या वंशाचें यथाशास्त्र सुवेर सुतक पाळण्यास देवळेकरांच्या एक दोन पिढ्यांस कांक्षा वाटली नाहीं; परंतु तिसरी पिढी खडबडून एकदम जागी झाली. परगोत्री दत्तक हुसकून लावून सर्व उत्पन्न लाटण्याची सुसंधि

वडिलांनीं हातची दवडली, आणि त्याचा आप्तपणा कबूल करून पुढल्या पिढ्यांस व्यर्थ अडचणींत घातलें याचा तिसऱ्या पिढीस पस्तावा झाला. झाल्या चुकीची दुरुस्ती करण्याकरितां भिकाजी नाईक (२७-२८-५) व बापूजी नाईक (२७-२८-६) यांनीं कंबर कसली. वडील शाखेचा जमाव देवळेकरांस हातघाईत दाद देण्यासारखा लेचापेचा नव्हता, म्हणून उत्पन्नाचा ताबा घेण्यास सरकारांत जाणें जरूर होतें. धार्मिक किंवा सामाजिक बाबतींत वडील शाखेच्या मार्गांत नसत्या अडचणी पैदा करणें हें काम त्याहून सुलभ आणि तात्काल परिणाम करणारें होतें. सबब सुवेर सुतक मानणें न मानणें ही जी स्वाधीनची गोष्ट होती तेथून च सुरुवात करून त्यांनीं तें पाळण्याचें टाकलें. या कामीं एवढेंच करून ते थांबले नाहींत. वडिलांनीं केलेल्या सदरच्या महापापाच्या क्षालनार्थ दत्तकवंशांतील एका मृताच्या भर अशौचांत मुद्दाम देवक ठेवून एक विवाह समारंभ उरकून घेण्यास देखील या गत्रूंनीं कमी केलें नाहीं. या कृत्यानें दत्तकशाखेची तर पुरती गाळण उडाली. देवळेकरांपुढें पंचक्रोशींतील भटभिक्षुकांचें कांहीं चालेना; करवीरक्षेत्रस्थ ब्रह्मवृंदांची घमेंड जिरली आणि धर्मसंस्थापनेची शेखी मिरविणाऱ्या जगद्गुरु शंकराचार्यांनीं हात टेंकले. मठाच्या चार भिंतींच्या आंत सुद्धां ज्यांस कोणी विचारीत नाहीं अशा आधुनिक आचार्यांपैकीं त्यावेळचे मठाधिप नव्हते; तरी सुद्धां त्यांचें निर्वाणीचें बहिष्कारास्त्र निर्वीर्य होऊन संस्थानदेवतेस पीठाची लाज राखण्याकरितां प्रतिनिधींचा धांवा करावा लागला. प्रतिनिधींच्या निवाड्यास देवळेकरांनीं गुंडाळून ठेविलें. याप्रमाणें सुमारें एक तप देवळेकरांनीं मारे धुमाकूळ उडवून दिला. अखेर रामशास्त्र्यासारखा बाणेदार न्यायाधीश व थोरल्या माधवरावसाहेबासारखा जरबदार पेशवा यांची जेव्हां सांगड जमली तेव्हां कोठें या वादाची इतिश्री झाली आणि देवळेकर खोटे ठरले.

आपसांतील वादाची अखेर या वादा बरोबर करून आतां दुसऱ्या दोन प्रकारच्या वादांकडे वळूं—

हे वाद घराण्याबाहेरच्या लोकांशीं झाले. त्यांतील पहिल्याची सुरुवात अठराव्या शतकाच्या सुरुवाती बरोबर च झाली, शंभर वर्षें तो जोरांत चालला; अद्यापि त्याच्या ज्वाला मधून मधून उफाळत आहेत. कऱ्हाडे गोळवलकर पाध्ये व चित्तपावन संगमेश्वरकर जोशी यांच्यांत ज्योतिषपणाच्या वृत्तीसंबंधानें चुरस लागून त्यांत सरदेशमुखांस पडावें लागलें. सरदेसायांच्या घरीं एका लग्नाचे वेळीं लग्नघटिका घालण्याचा हक्क कोणाचा याबद्दल दोघां जोशी घराण्यांत आयत्यावेळीं तंटा जुंपून लग्नच तहकूब होण्याची वेळ येऊन ठेपली; तेव्हां उभयतांस हि बाजूस ठेवून सरदेसायांनीं कुलोपाध्याय सप्रे भटजी यांकरवीं घटका घालवून त्या वेळेपुरती अडचण दूर केली. पुढें तडजोड होऊन पाध्ये व जोशी या दोघांच्या हि घटका चालू झाल्या, परंतु तेवढ्यानें मनांतली तेढ कांहीं कमी झाली नाहीं. संगमेश्वरकर जोशांच्या मनांत सरदेशमुखांविषयीं येथें जी एकदां आढी बसली, तिची तीव्रता असल्या च बारीक सारीक गोष्टींनीं उत्तरोत्तर वाढत गेली. या उभयतांचीं घरांचीं आढीं जरी एकमेकांस लागून आहेत तरी उभयतां मधून पिढ्यानुपिढ्या विस्तव गेलेला नाहीं. कोणत्याना कोणत्या स्वरूपांत त्यांचा कलह आज दोनशें वर्षें संगमेश्वरास चालू आहे. (राजवाडे ले. ११ ता. २४-२-१७०६). जोसकी वरून उठलेल्या या वादाचें पर्यवसान घरठाणांत झालें. संगमेश्वरीं उभयतांच्या घरांमध्यें फक्त एक कुंपण आहे. भाऊबंद नसतां भाऊबंदांहून हि तीव्रतेनें परनाशाविषयीं टपणाऱ्या या निरलस मत्सराला बिचारें कुंपण कितीसा प्रतिकार करील ? जेथें हल्लीं सरदेसायांचें घर आहे तेथें पूर्वीं त्यांचा मोठा राहता वाडा होता. संभाजीला मोंगलांनीं या वाड्यांत पकडलें तेव्हां सरदेसायांचा हा मुख्य व प्राचीन वाडा संभाजीचें कांहीं काल आश्रयस्थान झाल्याच्या अपराधास्तव मोंगलांनीं लुटून व जाळून उध्वस्त केला. पुढें कालान्तरानें सरदेसाई पुनः वाडा बांधूं लागले तेव्हां आपले जातभाई पेशवे यांजकडे वाड्याच्या मालकीसंबंधानें परभारें फुणगी लावून गंमत पाहण्यास व साधल्यास आपला कांहीं फायदा करून घेण्यास जोशांस नामी संधि मिळाली. तिची हकी-

कत राजवाडेकृत खं० २०, ले० २८९ यांत आहे. रा. श्री. वि. आठल्ये यांचा या संबंधीं खालील लेख येथें उद्धृत केला आहे—

' संगमेश्वरकर जोशी व सरदेसाई यांच्यांतील तंट्याचा उगम'

" पूर्वीं विजापूरकर आदिलशाही कारकीर्द तळ कोंकणांत असतां प्रभावळीकर सरजोशी यांनीं प्रभावळी मामल्याचें सरज्योतिषपण वतन करून घेतलें. ते मामल्याचे सरज्योतिषि आणि मामल्याचे सरदेसाई मावळंगकर नाईक पुरातन पासून. कसबा संगमेश्वरीं राहत आले. सरदेसाई यांच्या घरीं पुरातन ज्योतिष गोळवलकर पाध्ये यांचें चालत असतां सरजोशी यांहीं कसबे मजकुरीं सरदेसाई यांचे घरीं आपला ज्योतिषाचा मान असावा ऐसा आक्षेप केला. त्यावरून सरदेसाई यांणीं आपल्या घरीं कार्य प्रयोजनीं सरजोशी यांसि दुसरी घटका घालावयासी सांगितली. तेव्हांपासून ते यांचे घरीं दुसरी घटका घालूं लागले. पुढें सरजोशी यांहीं सरदेसाई यांच्या गांवांवरी, कोणताही हक्कलाजिमा नसतां, सरजोशीपणाच्या हक्काचा पादशाही परवाना आणिला. परंतु सरदेसाई यांनीं दुसरा परवाना आणून सरजोशी यांचे हक्क चालों दिले नाहींत. त्यावरून सरदेसाई व सरजोशी यांचें वैमनस्य आलें; तेव्हां सरदेसाई यांहीं आपले घरीं कसबा संगमेश्वरीं सरजोशी यांची घटका मना केली; त्यापासून ते घटका घालीत नाहींत. सरजोशी यांनीं सरदेसाई यांचें आर्जव बहुत केलें, आणि पूर्वीं घटका घालीत होते ती आपण मागून घेतली. त्यापासून सरदेसाई यांच्या घरीं संगमेश्वरीं पाध्ये व जोशी या दोघांचें ज्योतिष चालिलें. पुढें आपलीच घटका चालावी, गोळवलकरांची चालूं नये असा कलह पेशव्यांचे कारकीर्दीस सरजोशी यांनीं आरंभिला."

या संबंधांत सदाशिव नायक (४-२९-१२) पुण्यास लिहितातः—

" संगमेश्वरास आमचा वडिलोपार्जित वाडा आहे. त्याजवरील घर जळालें. त्यास गुदस्ता एक सोपा बांधिला, तेव्हां हा वाडा सरकारचा, आमचा नव्हे असें जोशी यांनीं पेशव्यांस समजाविलें. त्यावरून वाडा

बांधावयाविशीं पेशव्यांचा मनाई हुकूम आला. वास्तविक आमचा वाडा मूळ वतनी. संभाजी महाराज संगमेश्वरीं आले ते उन्हाळां वाड्यानजीक होते. पर्जन्यकाळ आला तेव्हा आमचा वाडा मोठा पाहून वडिलांजवळ वाडा मागोन त्यांत अडीच महिने राहिले. पुढें संभाजी महाराजांस मोंगलांनीं पकडिलें ते समयीं आमचा वाडा जाळिला व गांवांतील देवळें फोडिलीं. तेव्हां रंगोबा नायकांनीं वाडा पुनः बांधोन वस्ती केली. पुढें रंगोबा नायकाचे पांच पुत्र वाड्यांत नांदत असतां नारायणराव घोरपडे यांनीं आंगऱ्याचे मदतीस्तव स्वारी केली. ते माघारे आले ते समयीं कसबा संगमेश्वरास २० दिवस तळ दिल्हा, कसबा लुटिला. त्याजवर श्रीपतराव प्रतिनिधींनीं विसोबा नायकांस साताऱ्यास बोलावून नेऊन महाल भरावयाविशीं कौल दिल्हा त्याजवरून महाल भरिला. प्रचितगडाहून मुलें माणसें आणोन कसब्यांत वाडा बांधोन राहिले. पुढें कांबळ्या चाकर वाड्याचे उस्तवारीस होता, त्याचे हातून आग लागून वाडा जळाला, तो हल्लीं बांधीत आहों. सारांश, हा वाडा पुरातन आमचा; सभोंवार वस्ती आमच्या चाकर कुणबिणींची. आम्ही जोशी यांचें वाईट केलें नाहीं. ऐसें असतां जोशी घर बुडवायासी बसले. धन्यांनीं चौकशी मात्र केली पाहिजे ह्मणजे वाडा आमचा हें तेव्हांच ध्यानांत येईल."

पत्र लिहिणारे सदाशिव नायक स. १८०४ त मृत्यु पावले. वरील लेख सवाई माधवरावाचे वेळचा स. १७९० च्या सुमाराचा आहे.

परंतु जोशी पडले पेशव्यांचे आप्त आणि पेशवे झालेले राज्याचे पूर्ण मालक; तेव्हां जोशांची कड पेशव्यानीं घेतली यांत नवल नाहीं. स्वजातीय अधिकारी असले ह्मणजे त्यांच्या आश्रयावर खासगी दाव्याचा सूड उगवण्याची दुर्बुद्धि आम्हास कशी होते, आणि ना मला ना तुला घाल कुत्र्याला असें करण्यास आपण कसे प्रवृत्त होतों हें महाराष्ट्रांत तरी कोणास नव्यानें सांगावयास नको च. वाडा व त्या सभोंवारची बाग व मोकळी जागा यापैकीं एक तसूभरसुद्धां जोशांस मिळणारी नव्हती; परंतु देशमुखां-कडून ती काढून घेतलेली पाहण्यास मिळाली तरी जन्माचें सार्थक होऊन

परलोकस्थ पूर्वजांचा आत्मा थंड होईल अशा समजुतीनें दीर्घ प्रयत्न करून जोशानीं पेशव्यांकडून रा० महिपतराव कृष्ण सुभेदार यांचें नावें पुढील फर्मान सोडविला—

ले. ३. (पेशव्यांच्या रोजनिशा–सवाई माधवराव–भाग १, ले. ५६).

छ. ६ रविलावल ११९१ = ता. १४ नवंबर १७९० इ.

कसबे संगमेश्वर तर्फ मजकूर तालुके रत्नागिरी येथें श्रीमंत कैलासवासी संभाजी महाराज राज्य करीत होते, त्या राजवाड्याचे चौथऱ्यावर सदाशिव दादाजी मावळंकर यांनीं आपले घराचा चौथरा म्हणोन, घर बांधों लागले तेव्हां समस्त जोशी संगमेश्वरकर यांणीं राजवाड्याचे चौथऱ्यावर सदाशिव दादाजी घर बांधणार यांस ताकीद करून घर बांधूं न द्यावें, म्हणोन तुम्हांस सांगितलें व हुजुरही विनंति केली, तेव्हां हुजूर चौकशी जालीयाशिवाय घर बांधो नये, याप्रमाणें जालें असतां तिगस्ता चौकशी न होतां त्या चौथऱ्यावर घर बांधलें, तेव्हां गणपतराव जिवाजी सरसुभा यास, चौकशी करून घर मोडावें, म्हणून आज्ञा झाली असतां, गुदस्ता पहिलें घर बांधलें आहे, त्यालगतें नवें काम घराचें केलें, म्हणोन समस्त जोशी संगमेश्वरकर यांणीं हुजूर विदित केलें, ऐशास, राजवाड्याचा चौथरा तुम्हास समजला असतां, सदाशिव दादाजी यास चौथऱ्यावर घर बांधों दिलेंत, हें ठीक न केलें. त्याजवरून हल्लीं हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी घर मोडावयास सरकारांतून नारो आत्माराम कारकून व ढालाईत असामी २ पाठविले आहेत. हे घर मोडतील त्यांस मोडूं देणें. राजवाड्याचे चौथऱ्याजवळ महाराजांची बाग आहे, त्यासुद्धां जागा सरकारांत ठेवणें."

या हुकुमावर सरदेसायांनीं छत्रपतींच्या हुजुर तक्रार करून वाडा सरदेसायांचा अशी स्पष्ट आज्ञा आणिली. स. १७९० च्या सुमारास छत्रपतींचा अधिकार तितपत च राहिला होता म्हणून असो किंवा इतर कारणानें असो पण हा वाद त्या वेळेस मिटला नाहीं; आणि आज तो चालू

च आहे. ४।५ एकर घरठाण्याच्या जाग्याबद्दल २२५ वर्षे चालून शेवटास न गेलेला असा हा **अद्वितीय** वाद आहे.

सरदेसायांकडे जे खोती गांव चालत होते त्यांबद्दल हि त्यांस वरचेवर वाद करावे लागले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या विशेष मर्जींतल्या माणसांमध्यें एक प्रकारचा लोभाविष्टपणा चहूंकडे नेहमीं आढळून येतो आणि तो इतरांस जाचक होतो. त्याप्रमाणें च एखाद्या माणसाचा किंवा घराण्याचा बरा च काल चालत आलेला उत्कर्ष हि कांहीं लोकांस असह्य होतो. या लोभ-मत्सरांचा मिलाफ होण्याचा योग आला–व तो तसा बहुधा येतो हि–म्हणजे जीं खेकटीं उत्पन्न होतात त्या मासल्याचे च हे सर्व वाद आहेत. ते अस्सल कागद पत्र पाहिल्यावांचून चांगलेसे समजणार नाहींत म्हणून या प्रकरणाचा अखेर ले० २० ते ३३ पर्यंत ते दिले आहेत. घरांत भाऊबंदकीचा मत्सराग्नि धुमसूं लागला म्हणजे परकीय शत्रूंस जिंकण्यास कशा अडचणी पैदा होतात, वशील्याचें तट्टू न्यायदेवतेपर्यंत दामटतां न आल्यास खऱ्या पक्षास आपला खरेपणा प्रत्ययास आणून देणें किती कठीण जातें, आणि केवळ न्याय मिळविण्याकरितां पैसा आणि वेळ यांचा कसा व किती अपव्यय होतो हें आम्हां लोकांस कांहीं नव्यानें सांगावयास नको; सर्वांच्या नित्य अनुभवाची ही गोष्ट आहे. पुढील लेख म्हणजे वरील सर्व प्रकारांचीं शब्दचित्रें च आहेत. लेखांक २० हा या सर्व चित्रांचें लहान छायाचित्र आहे; त्यांत लहान प्रमाणांत एकंदर प्रकार दिसतील. हा लेख मननीय वाटेल अशी उमेद आहे.

घराण्यांतील या सर्व वादांसंबंधाचे अस्सल कागद येथें दिले आहेत; आणि त्यांस लहान माथाळे देऊन वादाचा विषय किंवा प्रकार दाखविला आहे.

या वादांचें परीक्षण बोधप्रद होईल; तें आपापल्यापरी करण्यास वाचकवर्ग खास असमर्थ नाहीं; सबब ते करून आमच्या अभिप्रायाचा बोजा त्यांजवर विनाकारण लादणें इष्ट दिसत नाहीं.

कोंकणची प्राचीन स्थिति (श्री. वि. आठल्ये.)

" पाध्ये यांचे वृत्तींत कसबा संगमेश्वर हा गांव मौजे होता. राजापूर सुभ्यासी पाटणदेश म्हणत. दाभोळ सुभ्यासी गुंड देश म्हणत. या प्रांतावर पूर्वी विद्यानगरच्या रामराजाचें राज्य होतें. विद्यानगरचें राज्य उच्छिन्न झाल्यावर बेदरची पादशाही झाली, त्याची सत्ता प्रांत मजकुरीं झाली. तेव्हां काळा खोजा, गोरा खोजा हे उत्तम कारकून होते, त्यांस मुलखाचा बंदोबस्त सांगितला. त्यावरून ते कोंकणचे बंदोबस्तास आले. तेव्हां कित्येक पुंड पाळेगार होते ते त्यांनीं मारून काढिले. मुलखाची लावणीसंचणी करून मामले व तर्फ व कसबे केले. पट्टणदेशीं अठरा तर्फा करून प्रभावळीं मामला केला, त्यास मुजफराबाद म्हणत. व गुंड देशीं हमजाबाद व जाफराबाद ऐशा दोन तर्फा केल्या; त्यांत गडनदीचे खाडीपासून चिपळूणचे खाडीपर्यंत हमजाबाद व चिपळूणचे खाडीपासून महाडचे खाडी पावेतों जाफराबाद येणेंप्रमाणें दोन तर्फा व त्यांचा मामला दाभोळ केला. त्यास बंदर मैमून मुस्तफाबाद म्हणत. अलिकडे शिवाजी महाराजांचें राज्य झाल्यावरी प्रभावळी मामल्याचा राजापुर सुभा केला, व दाभोळ मामल्याचा दाभोळ सुभा केला. उपरांत दाभोळ सुभ्यात अकरा तर्पा केल्या. एवं च बेदरच्या पादशाहीपासून कसबे झाले, तेव्हां संगमेश्वर हा गांव कसबा केला. बेदरची पादशाही मोडल्यावरी विजापुरीं पादशाही झाली. विजापुरचे पादशाहीमध्यें शृंगारपुरकर सुर्वे पूर्वी प्रभावळींत होते; तेथून विजापुरकर यांणीं मारून काढिल्यावरी एक बायको मात्र सगर्भ होती ते गोवील तर्फ प्रांत राजापूर येथें जाऊन राहिली. तीस पुत्र तानाजी झाला. तो महापराक्रमी त्यास आईनें पूर्ववृत्तान्त सांगितल्यावर या प्रांतांत संगमेश्वराकडेस येऊन धामधूम केल्यावर देशमुख यांहीं पादशाहास सांगोन कौल घेऊन देऊन, सुर्व्यांशीं सलूख करून, पादशाहास रुजू करून, तळकोंकणांत नव्वद गांव सुर्व्यांस जहागीर देवविली. त्यापैकीं ४५ गांव संगमेश्वरतर्फमध्यें दिले. त्यावरी सुर्वे राजे शृंगारपुरीं राहिले. त्यांचें राज्य जहागिरीमध्यें बहुत वर्षें चालिलें. त्यावरी शके १५८३ प्लव

संवत्सरीं वैशाख शु॥ १ स (१९ एप्रिल १६६१) शृंगारपुरकरांस शिवाजीनें मारून काढून दोन सुभांमध्यें आपली सत्ता केली. पुढें वारणेच्या तहानें सातारकर व कोल्हापुरकर यांचें तळकोंकणामध्यें निमेनीम राज्य उभयतांचें सकट जाहलें. संभाजीराजे यांजकडून भगवंतराव रामचंद्र रत्नागिरी तर्फेनें व कृष्णाजी परशुराम विशाळगड तर्फेनें हे दोन जिल्हेदार जाहले; आणि शाहूराजे यांजकडून श्रीपतराव परशुराम महिमतगड व प्रचितगड तर्फेनें जिल्हेदार होते. त्यास कान्होजी आंगरे सरखेल हे ही राज्यांतील उमराव यांसीं जयगड किल्ला बंदिस्त केला. त्यांहीं संगमेश्वर महाल व कोंडिवरें महाल श्रीपतरावाकडून इजारा करून घेतला त्यापासून सरखेल यांची सत्ता त्या प्रांतीं झाली. कान्होजी आंगरे (स. १७२९ त) शांत जाहल्यावरी, त्यांचे पुत्र सेखोजी, संभाजी व तुळाजी यांनीं अनुक्रमें सत्ता केली. पुढें शके १६७७ (स. १७५५) त तुळाजी आंगऱ्यास धरून पुण्यास आणिल्यावर राजापुर व दाभोळ सुभ्यांमध्यें सत्ता पेशवे यांची जाहली, ते हा कालवरी चालत आहे.

महादोबा नायक व रंगोबा नायक यांचा कलह.

या उभयतांमध्यें कैक वर्षे निकराच्या हातघाईचा कज्जा चालला होता. त्याची हकीकत देवळेकर दप्तरांतील एका कागदांत सांपडली. विशाळगड किल्ल्यावर हजीर मजालस भरून या वादाचा तपास छ ३ जिल्हेज सु॥ सब्बां खमसैन (ता० ३०।८।१६५६) रोजीं झाला असें या कागदावरून दिसतें. कोणा अप्रबुद्ध माणसानें मूळ फारसीचें भाषांतर मोडींत या कागदावर लिहिलें आहे. त्याचा बोध चांगलासा होत नाहीं. मतलब असा आहे—

किल्ले मजकुरीं देसाईगिरीवर रामनायक बिन केशवनायक व रुद्राजी नायक बिन विसनायक मुक्रर होते. हे व यांचे वडे (बापजादे) यांनीं बाळाजी बिंन विठ्ठल नायक व महाद नायक पालक बिंन गोविंद नायक यांचें चालविलें नाहीं. त्यावरून महादनायकानें एक हजार लारी भरून रायाजी

पंडिताचे मदतीनें आपल्या नांवें फर्मान करून घेतलें. महाद नायक हा पालक पुत्र पिढीजादा नव्हे. त्याचें नांव फर्मानामध्यें घालून फर्मान महालास पाठविला. त्यावरून रंगनायक व रामनायक फर्जंद (बिन) केशव नायक दिलगीर झाले; व किल्ले मजकूरचे खोत मुळ्ये, महाजन वगैरे बेदिल जाहले कीं बाळाजी विठ्ठल व महाद नायक पालक हे गैरनफर, यांचे बुदरुखांनीं कधीं देसकत चालविली नाहीं; व त्यांचे हातून विलायतीची महामुरी होणार नाहीं. ऐसा अहवाल अब्दुल कादर सुरूरखान हवालदार साहेबीं मालिम साहेबांस (वरिष्ठांस) लिहिला. त्यावरून रामनायकाचें नांवें फर्मान देसाईगिरीचें आलें. आणि हर्दू बिरादर रामनायक व रंगनायक कारभार चालवूं लागले. विलायतीचे रयत परागंदा झालेले पाहून रंगनायक व बाबाजी केशव कुलकर्णी व भुजबळ-राव नाईकवाडी हुजूर गेले देखोन महादनायक व बाळाजी विठ्ठल हे पुंडाई करूं लागले. पूर्वी गोविंद नायकाची औरत वांजोळें येथें इनामांत राहत होती ती मयत झाल्यावर तें उत्पन्न महादनायक खाऊन होता. तो विशा-ळगडचे हवालदार शेख अब्दुलसाहेब यांस जाऊन भेटला. आणि आपणांस देसकतीमध्यें तक्षीम देवविणें म्हणून त्यानें विनंति केली. त्यावरून महाद-नायक पालक, त्याचा संबंध मिरासीशीं नाहीं असा निवाडा जाहला. त्यावर महादनायक पळोन गेला आणि मौजे सोनवडेमध्यें घर करून राहिला. राजे यांस लांच कबूल करून, लोक मागोन, वांजोळें, करंजारी वगैरे गांवांवरी स्वारी घालून, रयतांस लुटून, लखमोजी राजे यांसी तर्फेस नेलें; आणि गांव राजेकरवीं बजोर (बळजबरीनें) लिहोन घेतले. तसेंच रामनायकाचें ही बजोर लिहोन घेतलें. ऐसे महादनायक हरामखोरी करून मौजे सोनवडेमध्यें घर करून पुंडावे करी. दोन गांव खराब होऊन गेले. त्यावरी बाळाजी विठ्ठल वारीसदार त्याचे बुजरुखासीं रंग-नायक व रामनायक यांचे बुजरुखांनीं इनामत मौजे करंजारीमध्यें आगर व शेत करून दिल्हें. त्याप्रमाणें रंगनायक व रामनायक चालवीत असतां महादनायकानें खराबा केला. बाळाजी विठ्ठल विजापुरास जाऊन, पाणी

वाहोन व धोत्रें धूवून शहरांत होता. त्यानें रायाजी पंडित रातीबदार याचे घरीं चाकरीस राहोन त्याजला गैरवांका मालूम करून, एक हजार लारी कबूल करोन आपले व महादनायकाचें नांवें फर्मान कराविलें. तें फर्मान घेऊन बाळाजी विठ्ठल माहालास आले. त्यावर महादनायक दुतर्फा राजेचे आश्रय करून विलायती खराब करितो सबब रंगनायक सरदेसाई हुजुर आले आहेत. साहेबीं निवाडा फर्माऊन सर्फराज करणें हे अहवाल."

या प्रकरणाचा निकाल पुढें काय झाला तें समजत नाहीं. महादनायक मागत असलेला वतनांतील हिस्सा त्याच्या वंशजांस म्हणजे वेरवलीकर व मोडेंकर यांस मिळाला. वरील तंटा इ. स. १६८० च्या सुमारास झाला असावा. मूळ फारसी कागदांतील नांवें मराठींत तर्जुमा उतरतांना पुष्कळ ठिकाणीं चुकलीं आहेत असा हा लेख पाहिल्यावर बळकट ग्रह होतो. महादोबा नायका विरुद्ध किल्ल्याच्या अधिकाऱ्याकडून विजापुर दरबारीं गिल्याचा 'रपोट' करण्याविषयींचा प्रभावळीकरांचा प्रयत्न येथें दिसून येतो. तर्जुम्याचा सारांश तेथील शब्दांनीं च दिला आहे.

—सं०.

धाकट्या घराण्यांत गेलेली सरदेशमुखी परत मिळविण्याविषयीं वडील घराण्याची खटपट.

लें० ४ शिक्का अलिफ् ता. ४ एप्रिल १७०२ इ.

खादिमे शरा काजी हसन वल्लद काजी अली पर्गने माजगांव
नायबे काजी महमूद संगमेसर.

कौलनामः बइस्मे देसमुखान् व देसपांडेयान् व रिआयाए सकना परगने परभावल वगैरः मुजाफ् दारुज्जफर बिजापूर आं के दरींविला बीसा बिरादर कानो सरदेसमुख पर्गनः मज्कूर वगैरः इल्तिमासे कौलनामः आबादीए आं हा नमूदा लिहाजा मर्कूम मीगर्दद के आं हा बमकाने अस्ली खुद हा आबाद बूदा मालगुजारी नुमायंद दरीं बाब ताकीद दानंद

तरीकः वगैरः व मालगुजारी शुआरे खुद बमानंद मुफिसदान् व मुमर्दान् दरमहाले मौअल्लका जमेदारीए खुद जा न दिहंद व दर सूरत वुक् खिलाफे आं अज बाज पुर्स अंदेशः बद् बाशुद

परभावल मुकर्रः येक कसबा व तेरा थे

सौंदल मिटगावनः राजापूर लांजा पांवस किलाए माजगांव नेवरा महमदाबाद संगमेसर कोंडिवरा देवरूख फुनगुस धामनस कसबा परभावल तम्मत्

पर्गनः खारेपटन पर्गनः सालसी पर्गनः खिलना मुकर्रः १३ से थे

हातखंबा वेलवंड हरचिरी ३ तम्मत्

व तारीख १७ जिल्काद सन ४६ जुल्सेवाला—कलमी स्वही

....

टीपा:—

१ कान्होबा सरदेशमुखाचा भाऊ विसोबा यास सदहू गांवांची खोती वगैरे हक्क दिले आहेत. गांवांची वसाहत सरदेशमुखांनीं च पूर्वी केली असल्यानें वहिवाट करून गांवांची कीर्द महासुरी त्यांनीं करण्याबद्दल परगण्याच्या वतनदारांस वगैरे ताकीद आहे.

२ याच मजकुराची व शिक्कातारखेची दुसरी ताकीद दाभोळ सुभ्यास आहे त्यांतील गांवें—

पर्गनः दाभोल मुकर्रः

सांवर्दी चिपळून वेलंब गुहागर हवेली कहमर

मचंद्री जालगांव नातू केलसी वेसवी तम्मत्

ले. ५ **निळो मोरेश्वर यांचा शिक्का** स. १७०८।९ इ.

(डोंगरकरांकडून लिहून आलेली नक्कल) शके १६३१

श्री.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३६ विरोधी संवत्सरे जेष्ठ शुा सप्तमी भृगुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाशिवछत्रपति यांनीं राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी प्रांत मामले दाभोळ यांसी आज्ञा केली यैसीजे

राजश्री कान्होबा नाईक बिन नरसोबा नाईक सरदेसाई मा० मजकूर यांणी हुजुर येऊन विदित केलें कीं मा० मजकूरचे सरदेशमुखीचें वतन पूर्वीं आदिलशाहानें आपले वडिलांस मऱ्हमत केलें त्या समई कांहीं दिवस भोगवटा चालिला त्याउपरि वि-र-प्रसंगामुळें बहुत दिवस वतनाचा भोगवटा तुटला होता हें वर्तमान पूर्वोत्तर रा० कैलासवासी स्वामीस श्रुत जाहालें त्यांणी कृपाळु होऊन मा० मजकूरचे सरदेशमुखीचें वतन अजरामऱ्हमत करून दिल्हें परंतु मामले प्रभावळीच्या सरदेशमुखीचा कारभार रंगोवा नायकापासून गणोवा नाईक जोरावारीनें करीत आहेत त्या वलवस्यानें मामले मजकूरचे हि सरदेशमुखीचें वतन गणोवा नाईकच अनभवित आहेत आपणास वतनाचा अमल कांहीं दखल होऊं देत नाहींत येशास वडील घराणे आपलें आहे वतनाचा कारभार शिका वडिलांपासून मामले प्रभावळीच्या सरदेशमुखीचा वडील घराणियासच चालत आला आहे त्या हिसेबें दाभोल मामालियाचे सरदेशमुखीचा कारभार सिका आपण चालवावा दायादसमंधेंकडून विभाग देणे तो गणोवा नाईकास द्यावा यैसा दंडक आहे परंतु गणोवा नाईक जोरावारीनें सारें वतन अनभवित आहे याचे पारपत्य कराया आज्ञा केली पाहिजे ह्मणोन विनंति केली त्यावरून याचे पूर्वोक्त वर्तमान मनास आणितां वडील घराणे कान्होवा नाईक बिन नरसोवा नाईक याचे या हिसेबें मामले मजकूरचे सरदेशमुखीचा कारभार सिका कान्होवा नाईक यांणी चालऊन वतन अनभवावें आणि दायादपणाच्या समंधेकडून वतनाचा विभाग जो देणे तो गणोवा नाईक यांस द्यावा यैसी नीत आहे याकरितां हालीं स्वामी कृपाळु होऊन मामले मजकूरचे सरदेशमुखीचें वतन कान्होवा नाईक बिन नरसोवा नाईक यांचे स्वाधीन करून कारभार वडलाप्रमाणें याचे हातें घेत जाणे या वतनास हक लाजिमा इनामत इसाफत मानपान तश्रीफ व बाजे हक पहिल्यापासून चालत आल्याप्रमाणें यांस व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवीत जाणें गणोवा नाईक यास वतनाच्या कारभारासी समंध नाहीं त्यास प्रथक करून देणे या वतनास याचे माथा शेरणी रुपये ५०० पाचसे मुकरर केले आहेत याचा वसूल हुजुर होईल

तुम्ही मामले मजकूरची सरदेशमुखी कान्होवा नाईक बिन नरसोवा नाईक यास चालवणे गणोवा नाईक कथला करील तरी त्यास ताकीद करून वजाऊन ठेवणें या पत्राची प्रत लेहून घेऊन मुख्यपत्र परतोन देणें. लेखनालंकार (मोर्तब).

ले. ६. (प्रभा० दप्तर.) श्री शुक्रवार ता. ४ जुलई १५२९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५६ सौम्य नाम संवत्सरे आषाढ बहुल पंचमी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभु छत्रपति स्वामी याणी समस्तराजकार्यधुरंधरविश्वासनिधि राजमान्य राजश्री कान्होजी आंगरे सरखेल यांसि आज्ञा केली यैसीजे राजश्री शाहूराजे दाजी रागण्याखालें चिकेवाडीस आले ते समई कितेक गड किले त्यांस हस्तगत होऊन संपूर्ण राज्यांत फितवा जाला तन्मुलें राजश्री गणोवा नाईक सरदेसाई म।। प्रभानवली व म।। दाभोल यांसि त्यांस भेटावें लागले विसोवा नाईक हुजुर होते ते हि सिंधुदुर्गास-स्वारी जाली तेव्हां मागाहून न पुसत गेले याकारितां त्यांवरी इतराजी जाली ते प्रसंगी राजश्री रामचंद्र पंडित हुकुमतपन्हा होते त्याणी राजश्री शिवाजी राजे दाजी यांजवल विनति केली कीं त्याचा दायाज कानोवा नाईक आहे त्यास वतनाची पत्रें करून द्यावी म्हणजे गणोवा नाईक यास आपल्या वतनाची पत्रें दुसऱ्यास दिल्हीं यैसें भये निर्माण होऊनु स्वामीचे पायांसी सादर होऊन निष्टेनें वर्तेतील यैसें विदित केलें त्यावरून कानोवा नाईकास पत्र करून दिल्हें होतें परंतु त्यास वतनासी अधिकार नाहीं त्यामुलें त्याचा भोगवटा जाला नाही त्याउपर विशालगडचे मुकामी खर नाम संवत्सरी (राज्याभि० शके ४० स. १७१३) गणोवा नाईक याणी राजश्री शिवाजी राजे दाजी यांचे दर्शन घेतले ते नाईक म।।रनिलेवर कृपाळु होऊन सदरहू पत्र कानोवा नाईकास दिल्हें होतें तें रद करून गणोवा नाईक यांचे वतन यांसी सुरलीत करून देऊन पत्रें दिल्ही गणोवा नाईक याणी बहुत निष्टेनें वर्तोन वतनी धंदा चालऊन सेवा केली त्याप्रमाणें त्यांचे बंधु राजश्री अंतोवा नाईक स्वामीचे पायांसी निष्टेने वर्तत आहेत यैशास कानोवा

नाईक यापासीं पेशजीचें पत्र होतें तें तुम्हांस दाखऊन याचें वतनासीं कथला आरंभला आहे म्हणून विदित जालें तरी पूर्वापार वतनाचे खावंद गणोवा नाईक कानोवा नाईकास वतनासीं दरकार नाहीं त्यासी येकेनिमित्यें पत्र दिल्हें होतें कीं गणोवा नाईक यांसी भये निर्माण व्हावें त्यावर गणोवा नाईक दर्शनास आल्यानंतर कानोवा नाईक यास दिल्हें पत्र रद केलें असतां त्या पत्रावरून त्यास यांच्या वतनासी कथला करावयास गरज नाहीं याकरितां तुह्मी कानोवा नाईकास ताकीद करून यांच्या वतनासी कथला न करी ते गोष्ट करणें गणोवा नाईक यांचे बंधु राजश्री दादोवा नाईक व अंतोवा नाईक व पुत्र राजश्री प्रल्हाद नाईक व केशव नाईक सरदेसाई पूर्वापार वतनदार येकनिष्ठ आहेत यांचे वतन यांस सुरलीत चालवणें जाणिजे बहुत लिहिणे तर तुह्मी सुज्ञ असा. मर्यादेयं विराजते.

ले० ७. (प्रभा० दप्तर). श्री. शुक्रवार ता० ४।७।१७२९.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५६ सौम्य नाम संवत्सरे आषाढ बहुल ५ भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभु छत्रपति स्वामी याणी

शिक्का	शिक्का
पिंपळपानी	वर्तुलाकार
प्रधानाचा	प्रतिनिधिचा

कान्होबा नाईक यांसी आज्ञा केली यैसीजे पूर्वी राजश्री गणोवा नाईक सरदेसाई मा। प्रभानवली व दाभोल यांस राजश्री शाहु राजे दाजी यांची जाऊन भेटी घ्यावी लागली होती त्यांस भये प्रदर्शन व्हावें म्हणून तुम्हांस राजश्री शिवाजी राजे दाजी याणी रागण्याचे मुकामीं पत्र करून दिल्हें याउपरी विषालगडचे मुकामी खर संवत्सरी गणोवा नायक याणी हूजुर येऊन दर्शन घेतलें तेव्हां तुम्हास पत्र दिल्हें होतें त रद करून त्यांचे वतन त्यांस चालवावयाचीं पत्रें दिल्हीं यैसें असतां तुम्ही रागण्याचे मुकामीचें पत्र राजश्री कान्होजी आंगरे सरखेल यांस दाखऊन यांच्या वतनासीं कथला माडला आहे तर यैसें करावयास तुम्हास गरज काय याउपर यांच्या वतनासी कथला

येकंदर न करणें फिरोन हुजुर बोभाट येऊ न देणें यांच्या वतनासीं तुम्हांस समंध नाही जाणिजे निदेश समक्ष मर्यादेयं विराजते

मोर्डे गांव इनाम दिल्याची सनद.

ले० ८. (तालीक). श्री. सन १७०६.

शिक्का परशराम त्र्यंबक प्रतिनिधि यांचा राजमान्य राजश्री बाबाजी कानो नामजाद व कारकून वर्तमान व भावी ताा देवले व लांजे यांसि

परशराम त्र्यंबक प्रतिनिधि सुहुरसन सबा मया व आलफ राजश्री केशव नाईक व सोमाजी नाईक बिन गोपजी नायक सरदेसाई ताा किले खिलणा यांणी मोगलाई जाहाली ते प्रसंगी या राज्याविसीं येकनिस्टा धरून वर्तणूक केली कष्ट मेहनत करून विशालगड तांम्रास हस्तगत जाहाला होता त्याचे कितेक राजकारण प्रसंग करून किला आमफल आम्हाकडे हस्तगत करून दिल्हा त्यावरून यावरी कृपालु होऊन मौजे मोर्डे ताा देवले हा गाव पेशजी आदलशाहाचे कारकीर्दीस यास इनाम चालत होता आलीकडे चालत नव्हता तो हाली याचा यांस इनाम करून दिल्हा असे तरी गाव याचे नावे दुमाला करून यास व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालविणे या पत्राची तालीक लेहून घेऊन असल पत्र भोगवटियास मशारनिल्हेजवली परतोन देणे जाणिजे छ ९ सफर पाा हुजुर

राजते लेखनावधी

ले. ९. (तालीक). श्री ता. ३।५।१७०७

छ मशारलहुल अनाम हवालदार व कारकून ताा देवले ताा देवले यासि परशराम त्रिंबक प्रतिनिधि सुहुर सन सबा मयां व अलफ राो केसो रघुनाथ व सोमाजी बापोजी व केसो गोपाळ सरदेसाई व देशकुलकर्णी ताा खिलणां याणी राजश्री स्वामीच्या पांयापासी यकनिष्ठा धरून किले विशाळगड

गनीमानें घेतला त्याप्रसंगी कितक खटपट करून आम्हास हस्तगत करून दिल्हा याकरितां कृपाळू होऊन नूतन इनाम पड जमीन विसा पांडाचे बिघेयाणे रोप जमीन बिघे दशमुख ८१० दशकुलकर्णी ८५ यकूण पंधरा बिघे रास इनामत पड देविली असे तरप माारपाौ नेमून चतुःसीमा करून याचे दुमाला करणे सदरहू इनाम यांस व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे या पत्राची प्रत लिहोन घेऊन मुख्य पत्र परतून भोगवाटियास देणें छ ९ सफर निदेश समक्ष.

मोर्डे गांव अमानत झाला होता तो सोडून पूर्ववत् दिल्याची सनद.

ले. १० (तालीक) श्री मंगळवार २६ जून १७६४.

राजश्री गणोबा नायक बिन बाजी नायक व लक्ष्मण नायक बिन रुद्राजी नायक सरदेसाई ताा :खिलणा व देसाई ताा देवले गोसावी यांसि अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य———

सेवक कृष्णाजी अमृतराऊ प्रतिनिधि नमस्कार सु॥ खमस सितैन मयां व अलफ तुम्हीं किले विशालगडचे मुकामी हुजुर येऊन विनंति केली कीं मौजे मोर्डे ताा देवलें हा गाव आपले वडील राजश्री केशव नाईक व सोमाजी नाईक बिन गोपजी नाईक यांसी श्रीमंत राजश्री परशरामपंत प्रतिनिधि कैलासवासी स्वामीनी स्वामीकार्यावर मेहरबान होऊन इनाम करून दिल्हा त्याची सनद बजिनस आपणांजवल आहे गाव दिल्हियापासून सतत चालत आसतां श्रीमंत राजश्री राऊ प्रतिनिधि कैलासवासी यांचे कारकीर्दीस सन सीत खमसैनामध्यें किले मजकूरचे मुकामी राजश्री भिकाजी नाईक व बापूजी नाईक सरदेसाई ताा माार यांणीं येऊन आमच्या वडिलांचे दत्तपुत्रविधान न जाहालियाविसीं कलह आरंभिला त्या समई दिवाणांतून सरदेशमुखी ताा मजकूर व देशमुखी ताा मजकूर आमानत करविली त्या समई मौजे मजकूर हा गाव आम्हांकडे इनाम होता त्यास तो

हि आमानत जाहाला यैशास मौजे मजकूर हा गांव स्वामीकार्यावरी आमच्या वडिलांस इनाम करून दिल्हा आहे त्यास वतनदारींत इनाम गांवचा इमला नाहीं व भिकाजी नाईक व बापूजी नाईक यांसीं समंध नाहीं यैसें आसतां गांव इनाम आमानत जाहाला आहे यैशास स्वामीनी कृपाळू होऊन पूर्ववतप्रमाणें इनाम करार करून द्यावा म्हणून त्यावरून मनास आणितां तीर्थस्वरूप राजश्री कैलासवासी थोरले पंत प्रतिनिधि यांणी इनामपत्र करून दिल्हें तें पाहातां मौजे मजकूर हा गांव वतनदारीसच इनाम करून दिल्हा नाहीं तुमच्या वडिलांस स्वामीकार्यावरी कृपावंत होऊन इनाम करून दिल्हा सदरहू इनामपत्रामध्ये भिकाजी नाईक व बापूजी नाईक यांचे वडिलांस इनाम गांवासी समंध नाहीं यैसें करून केसोवा नाईक व सोमाजी नाईक बिन गोपजी नाईक यांसच इनाम करून दिल्हा त्याप्रमाणें भोगवटा चालत आला हें जाणोन मौजे मजकूर हा गांव तुम्हांकडे पूर्ववतप्रमाणे इनाम करार करून देऊन हें पत्र भोगवटियास करून दिल्हें असे तरी तुम्ही आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने आनभावित जाणें जाणिजे छ २९ जिल्हेज निदेश समक्ष. राजते लेखनावधिः

बार सुरू सुद बार.

हें पत्र तारीख ५ माहे नवंबर सन १८३४ रोजीं पाहिले नंबरचे बुकावर पांचशेहे एकतीस ५३१ नंबरास नोंदलें असे

रामजी कदम मामलेदार

ता॥ रत्नागिरि

सही इंग्रजी

नि॥ आहे.

ले. ११

श्री

ता. २३।३।१७६३.

छ मौ अनाम देशमुख व देशकुलकर्णी सुभा प्रांत राजापुर यांस नारो शंकर पंडित प्रतिनिधि सुरू॥ सलास सितैन मया व अलफ

राजश्री गणोवा नाईक बिन बाजी नाईक व आपाजी नाईक बिन बालाजी गोविंद उपनाम मावलंकर सरदेशाई तालुका खिलणा प्रा मजकूर यानी हुजुर येऊन विदित केले आपले वतन ता देवले ता हातखंबे ता हरचिंरी ता देवरूख निमे लग यकून साडेतीन माहालची सरदशमुखी व देवले महालची देशमुखी व मौजे मोरडे ता देवले हा गाव इनाम व गावगना इनामती या प्रा पुरातन चालत असता मधे आपला भाऊबंद बापूजी नारायेण याने विशालगडी जाऊन फिर्याद केली की आपला याचा दत्तक विशई कलह आहे त्यास साहेबी बरहक इनसाफ करून निवाडा करावा त्यावरून उभयेताचा इनसाफ केला जे निमेनिमे वतन उभयेतानीं आनभवावे याप्रमाणे निवाडपत्र जाहाले ते स्वामीनी मनास आणून भोगवटियास जमईची पत्रे करून द्यावी म्हणऊन विनंति केली त्यावरून निवाडपत्र मनास आणून हे पत्र सादर केले असे तरी पुरातन याचे वतन चालत आल्याप्रमाणे याजकडे चालवणे प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणे हे पत्र भोगवटियास परतोन मा।रनिलेपासी देणे छ ७ रमजान निदेश समक्ष लेखन सीमा

शिक्का श्रीराज्ञाराम छत्रपति कृपानिधि
अष्टकोनी नारो शंकर पंडित प्रतिनीधि

मोर्डें गांवाबद्दल वेरवलीकर व मोर्डेकर यांचा वाद.

ले. १२ श्री

चिरंजीव राजश्री बाजी नायक बिन बाळाजी नायक (९-२७-२६) व आपाजी नायक बिन बालाजी नायक (९-२७-२७) यांसी नरसोबा नायक अंतोबा नायक (९-२६-१८) आसीरवाद उपरी तुमचा व रुद्राजी नायक (९-२७-२९) व गोपाळ नायक (९-२७-३१) यांचा मौजे मोर्डे इनामाचा कजिया लागला याजकरितां तुम्ही माहादोबा नायक बिन गोविंद

नायक (९-२४-७) यांपासून हकीकत पुसिली त्यास माहादोवा नायक यांस पुत्र चवघे त्यास वडील पुत्र गोविंद नायक दुसरे पुत्र अंत नायक तिसरे पुत्र विठल नायक चवथे पुत्र गोपजी :नायक ऐसे एकत्र आसता व माहादोवा नायक यांची चवथी तक्षीम व वांजोळें करजारी वतनाची व इनाम गांवची वाटणी घेतली माहादोवा नायक वृद्ध जाहाले तेव्हां जेष्ट पुत्र गोविंद नायक कारभार करीत होते तेव्हां रंगोवा (४-२७-१) नायक हे विजापुरास जाऊन माहादोवा नायक व बाळाजी नायक (९-२६-१९) व विस नायक (९-२६-२०) याची नालिसी सांगोन फर्मान आणिला तेव्हां रंगनायक यांसी कटकट करून सीधी आवदुल कादिर विशालगडी कोकणचा सुभेदार होता त्याकडेस जाऊन न्याये केला तेव्हां तक्षीम बरहुकुम पूर्ववत चालावे याप्रमाणे सुभांची पत्रे घेतली समजी जाहाली त्यावर रंगोवा नायक यांणी गैरवाका समजाऊन फर्मान आणिला याकारितां विजापुरास जाऊन दुसरा फर्मान आणावा त्यास द्रव्य पाहिजे याकारितां माहादोवा नाईक यांणी जेष्ट पुत्र गोविंद नायक यांस श्रींगारपुरास भानजी कृष्ण पंडित हे श्रींगारपुरकर राजे यांचे दिवाण सर्व राज्याचा कारभार करीत होते आणि गोविंद नायक यांसि भानजीपंत यांची वडील बहीण दिल्ही होती भानजीपंतास गोविंद नायक यांचें आगत्य होतें तेव्हां गोविंदनायक याणी फर्मानाची हकीकत सांगितली त्यास दुसरा फर्मान आणावा लागतो त्यास द्रव्य च्यार पांच हजार लारी तेथें दिवाणात व दरबारी खर्च करावा लागतो याकरितां तीर्थरूपी आपणाकडे पाठविले की पाच हजार लारी कर्ज मेळऊन द्यावें तेव्हां गोविंद नायक यांस नेऊन राज्यास भेटविले आणि हकीकत सांगितली कीं हे कर्ज पाच हजार लारी मागतात तरी पांच हजार लारी यांसि द्यावे व त्यास राजे बोलिले कीं तुम्ही आपला कतवा आम्हास द्या व गोविंद नायक यांचा कतवा तुम्ही घ्या तेव्हां कर्ज देऊ याप्रमाणें बोली जाहाली तेव्हां गोविंद नायक यांणी कतवा लिहोन दिल्हा आणि आडीच सेर सोन्याची सांकळी व पांचसे लारी रोख घेतली आणि भानजीपंती आपला कतवा राज्यांस लिहोन दिल्हा आणि

सोनें व लारी घेऊन गोविंद नायक घरास आले आल्यानंतरी माहादोवा नायक याणी बाळाजी नायक बिन विठल नायक यांस विज्यापुरास पाठऊन पैका देऊन फर्मान आणिला पुढें श्रीमंत सिवाजी महाराज यांचे राज्य जाहाले श्रींगारपुरकर राजे पळोन सावणुर बंकापुरास गेले माहादोवानायक कैलासवासी जाहाले कारभार वलनांचा गोविंदनायक करीतच होते तेव्हां गोविंदनायक व गोपजीनायक येकत्रच होते माहादोवा नायक मृत्य पावोन येक महिना जाहल्यानंतरी गोपजीनायक विभक्त होऊन भडकंबियास गेले वरकड त्रिवर्गबंधु येकत्रच होते गोपजीनायक विभक्त होऊन जाऊ लागले तेव्हां गोविंदनायक यांणी सांगितले की वेघळे तुम्ही जाता हे जाऊ नको परंतु ते न यैकत तेव्हा गापजीनायक बोलिले की आपणास मोर्डोंची तक्षीन व वतनाची तक्षीम नको वतन गांवसीव सर्व तुम्ही घेणे व कर्जवाम वडिलाचे आहे हे तुम्ही वारणे आम्हांस दोनी गोष्टी लागत नाहीं यैसे बोलोन मौजे मजकुरास गेले पुढें श्रिंगारपुरकर राजे यांचे देणे आडीच सेर सोनें व पांचसे लारी व याखेरीज रघुनाथभट साठे देवरुखात होते त्यांघ्या तीनसे लारी व आंबेकर साहुकार पेठेमध्ये होते त्याचे कर्ज च्यारसे लारी होत्या त्यास माहादोवा नायक यांच्या कानांत नीळ होते ते आंबेकर यांजपासी गाहाण ठेविले होते ते नीळ गोनजी नायक यांणी शंभर लारी देऊन नीळ मात्र सोडविले वरकड कर्ज गोविंद नायक यांजकडे लागले कोणी भाऊबंद लागो न देत तेव्हां कर्जदारियांचे लचांड गोविंद नायक याजकडे लागले गोविंद नायक याचा उपाय नाहीं तेव्हां आणखी लोकांची कर्जे घेऊन आंबेकर व रघुनाथभट साठे याचे कर्ज वारिलें गांवात नुकसान उपाये नाही कर्जामुळें ग्रस्त जाहाले तों श्रिंगारपुरकर राजे यांणी सावनुर बंकापुराहून येक हरकरा व बरोबर दोन माणसें देऊन व भानजीपंत यांचा कतबा पाठऊन दिला तेव्हां ते भडकंबियास आले गोपजीनायक यांकडेस आले आणि कर्जाचा मजकूर गोपजीनायक यांस सांगितला कर्ज आमचे द्या तेव्हां नाईक बोलिले की आपण वतन सोडिले आणि कर्ज हि सोडिलें जे वतन आणभवितात त्यांपासी कर्ज तुम्ही मागणे आम्हांकडे निसबत

नाही तेव्हां ते मोंडयास गोविंदनायक यांकडेस येऊन बसले आठ दिवस राहून घेतले त्याची तारतीम तवाजु बहुत प्रकारें केली उपरांत भानजीपंत मौजे वणगुलें ता। लांजे येथें कुटुंबसहवर्तमान होते तेथें हरकारा व माणुस घेऊन गोविंदनायक वणगुल्यास गेले आणि आपली हकीकत मा।रनिले याजपासी सांगितली की शिवाजी माहाराजांच्या राज्यामध्ये पाहिल्या माहासुलाच्या पांचपट माहासूल जाहाला गांवचे: नुकसाने देऊन कर्जाचे डोंगर जाहाले कांही उपाये नाही यैसे बोलोन गोविंद नायक (व स्त्री) उभयतां गेली होती त्याणी भानजीपंताच्या पायावर डोई ठेविली तेव्हां भानजीपंत बोलिले तू माजी वडील बहीण आणि तू पाईवर डोई ठेवित्येस हे तुज उचित कीं कायें बरें तुम्हांस आनकुळ पडेल तेव्हां कर्ज येणे ते द्या आम्ही श्रिंगारपुरकर यांचा कजिया वारितो तेव्हां मा।रनिले यांणी राज्याचें कर्ज वारून कतबा काढून घेतला गोविंद नायक (व स्त्री) उभयतां मोंडेयासि आली च्यार पांच वरशें होती पुढें ते कैलासवासी जाहाले खोती गोविंद नाईक यांची स्त्री लक्ष्मीबाई इणे केली बाळाजीपंत (९-२६-१६) लाहान होते तेव्हां संभाजी बल्लाळ यांसि राजापुर सुभांची मजमु होती ते लक्षुमीबाईचे पुतण्या पाठच्या बहीणीचा लेक ते पालखीत बसोन समाधानास आले तेव्हां इजपासी बोलोन चालोन सर्व अभिमान मज आहे तू सुखरूप राहा बाळ येथे गोवला होईल याकारितां घेऊन जातो यैसे बोलोन मुलास घेऊन गेले दोन वरषे दप्तरीं लिहिलें लिहिणार चांगले जाहाले तेव्हां आणाजीपंत (अणाजी दत्तो सचीव) यांस भेटाविलें आणि यांची हकीकत सांगितली कीं हे देवळेकर सरदेसाई ता। खिळणा यांस काही आसामी सांगावी त्याजवरून दप्तरदारीची आसामी सांगितली वीस लारी दरमाहा वेतन केलें आणि संभाजीपंतास सांगितले की हा मूल आम्हाबरोबर असो द्या तेव्हा दोन वरषे समागमे राहिले तेव्हां यांचे कसब पाहिले लिहिणार चांगले च्यतुर रयतरजावंत दिवाण किफायेत यैसे पाहोन सुभ्याची जमाबंदी यांणी करावी पनास लारी दरमाहे केल्या तेव्हां आणाजीपंतापासी यांणी जडाव चांगला केला तेव्हां केसोबा नायक

(९-२६-२१)यांस बोलाऊन आणुन राजापुरी राहिले चवसोपी वाडा बांधला भिकाजी नायक यांणी आणाजीपंतापासी जडाव वराच केला होता तेव्हां बाळाजीपंताचा जडाव जाहालियावरी भिकाजी नायक आपल्या घरास गेले तेव्हा केशव नायक यांचा वनांव करून दिल्हा खोती मातुश्री करीतच होती वरषामध्ये येक दोन वेळा मातुश्रीच्या दर्शनास जात होते तेव्हां भानजीपंत याचे देणे ते बाळाजीपंत मोर्डेयास येऊन मातुश्रीस घेऊन वणगुले यास गेले आणि भानजीपंत यांचे कर्जाचा मुदलान भाग वारिला आणि कतवा काढून घेतला उपरांत मातुश्री वृद्ध जाहाली तेव्हां बाळाजीपंती केशव नायक यांस बोलाऊन आणुन सेतभात व कुणबी नायकाचे स्वाधीन केले येणेप्रमाणे हकीकत आहे याप्रमाणे विशाळगडी रुद्राजी नायक व गोपाळ नायक यांणी आपणास बोलाऊन नेले तेव्हां इत्थंभूत जाहाले वृत्त सांगीतले कळावे. सदरहू दुसरे दिवशी श्रीमंत राजश्री गंगाधरपंत प्रतिनिधि यांणी आपणांस वाडीपर्यंत बोलाऊन नेऊन सत्यपुरःस्कर पुसिले तेव्हां हाचप्रमाणे सांगितले राजश्री गोविंद नायक बिंन हणमाजी नायक (९-२७-३५) याचे साक्षीने सांगितले रुद्राजी नायक व गोपाळ नायक हे हि तेथे बसले होते मग आपण निरोप घेऊन घरास आलो.

या खेरीज विशाळगडी रुद्राजी नायक व गोपाळ नायक यांणी बोलाऊन नेले तेव्हां त्यापासी बाजी नायक मोड्यांचे इनामाच्या व वंताच्या पैवस आम्हास देत नाहीं म्हणोन पाच वर्षा वेव्हार सांगितला त्यास त्याचा आमचा न्याय लागला तेव्हां रुद्राजी नायक याणी सागितले की गंगाधरपंत प्रतिनिधि विशालगडी आहेत धनी ते व विशालगड जागा आमचा ते सांगतील ते आमचे धणी सागतील ते तुम्ही अैका ते आम्ही (रुद्राजी ना० व गोपाळ ना०) कबूल केले ते विशाळगडास गेलो गोपाळ नायक व रुद्राजी नायक मिळोन श्रीमंताकडेस गेलो आह्मी तीर्थरूप बाजीपंत व आह्मी उभयता गडांस गेलो याखेरीज तीर्थरूप राजश्री नरसोबा नायक यांसि त्याणी बलाऊन नेऊन पुसिले त्याणी एकवीस पुरुष नरकात बुडवील तो लटके बोलेल त्यानी साफ सांगितलें निमे वंत तुम्ही घेणे निमे बाजी

नायक घेतील त्यास सांगितले त्या उपरी श्रीमंतांनी सांगितले की तुमची हकीकत आम्हास ठाऊक आहे तुमचे तीर्थरूप व बाजी नायक याचे तीर्थरूप सख्खे चुलत भाऊ आह्मी दाहा वर्षांचे होतो त्यापासून तुमचे तीर्थरूप व बाजी नायक याचे तीर्थरूप आम्हापासी आहेत आम्हास सर्व ठाऊक आहे असे सांगितल्यावर रुद्राजी नायक निरोप मागावयास लागले तेव्हां श्रीमंतानी आज्ञा केली की तुम्ही बाजीनायकापासी कजिया करून येथे आलेत आणि आम्हासि निरोप द्यावा ह्मणोन मागता तेव्हा आह्मी रुद्राजीनायक यास प्रतिनिधींची दुराई दिल्ही की फडशा करून जा आणि नाईक यास वाड्यात बोलाऊन श्रीमंतानी नेले आणि त्यास सत्योत्तरे पुसिले राजश्री गोविंद नायक (९-२७-३५) व बाजी नायक व गोपाळ नायक याचे गुजारतीने श्रीमंतापासी सविस्तर वर्तमान सांगितले या उभयतानी भांडो नये निमे इनाम व खोती व निमे वतनवाडी निमेनिम ध्यावी असे सांगोन निरोप घेऊन नरसोबा नायक खाली उतरले रुद्राजी नायक याणी सांगितले की रुद्रभट आउल्ये बहुत काली आहेत ते सांगतील ते तुम्ही अैका व आम्ही अैकतो ते कबूल करून श्रीमंताचा निरोप घेऊन उतरले रुद्राजी नायक उतरोन महिमतगडास गेले आम्ही सिपोसीस गेलो दोन दिवस भटजीचे घरी होतो रुद्राजी नायक कोठे नाहीत त्यावर तीर्थरूप महिमतगडास गेले रुद्राजी नायक यास भटजीकडेस बोलावीत होते परंतु ते न येत रुद्राजी नायक बोलिले रुद्रभटाहून कृष्णाजीपंत पेंढरकर याजकडेस जाऊ ते सांगतील ते अैका त्यावर कृष्णाजीपंताकडेस कराडास गेलो त्याणी सांगितले की बाजीनायक याचे वडिली वतन अैसे केले तुम्ही यासि जकडो नको गावइनाम व खोती व जमीन व हकहकदारी निमे तुम्ही घेणे व निमे बाजीनायक घेतील त्यावर रुद्राजीनायक याणी सांगितले की बाघेरीचा पाटील मुसलमान आहे तो न्याय करितो त्याजकडे उभयता जाऊ तो सांगेल ते अैको त्यावर बाघेरीस गेले पाटलाने सांगितले त्याचे उत्तर श्रीमंतास आहे ते तुम्हापासी आहे त्या उपरी साताऱ्यास गेले श्रीमंत रावसाहेब (प्रतिनिधि) यास निवेदन उभयतानी केले त्याची पत्रे आहेत त्याच्या तालका तुम्हापासी आहेत.

टीप—कंसातील मजकूर मुळांतील नव्हे या पत्राच्या दोन प्रति आहेत, त्या दोनी हि नकला च असाव्यात असें वाटतें.—सं०.

दत्तकाविषयींचा वाद.

ले० १३. श्रीशंकर सन १७६२ ते ६५.

श्रीमत्छंकराचार्यान्वये श्रीविद्यानरसिंव्हभारती स्वामी करकमळसंजाताभिनव श्रीविद्याशंकरभारती स्वामीकृत नारायेण स्मरणांनि राजमान्यें राजेश्री गोविंद नाईक देवळकर सरदेशमुख यांसि— अज्ञा केली येसीजे तुम्हांत व रा। गोपाळ नाईक मोर्डेकर यांत दत्तक विषयार्थ कथला लागोन परस्परें कलहे करितां म्हणोंन कळले येसें गोष्टीस उभयेतांचा कलहे निवडून देणें अगत्ये जाणोंन हे अज्ञापत्र सादर केले असें तरी तुम्ही आपले बापभाऊसहित अवघे मठास येणें गोपाळ नाईक हि आणविले आहेत आले नंतर दाहां ब्राम्हणांच्या विचारे शास्त्रसमतें मनास अणोन निर्व्हा केला जाईल याउपरी उभयेतां हि मठास न येतां परस्परें कथला कराल तरी निग्रह पत्र पाठवणें लागल मग गोष्टी लांबती तरी येसें होऊ न देता अज्ञेप्रमाणें येणें बहुत काय लिहिणे तैसेच अजीपावतों परस्परें क्षेये व्रिधि धरित असता सांत ते हि गोष्टी न करितां धर्मशास्त्रांस विरोध करितां हे अनुचित यास्तव मठास अलियां सर्व विलेस लाविले जाईल जाणिजे.

इत्यलम्

ले० १४ श्रीविद्याशंकर स. १७६२ ते ६५.

श्रीमत्परमहंसादियेथोक्त विरुदांकित शृंगेरीसिंहासनाधीस्वेंर श्रीमत्छंकराच्यार्यान्वये श्रीविद्यानरसिंव्हभारती स्वामीकरकमळसंजाताभिनव श्रीविद्याशंकर भारती स्वामीकृत नारायेण स्मरणांनि———

स्वस्ति श्रीमत्सकळगुणाळंकरण हरिगुरुभक्तिपरायेण समस्तराजकार्यधुरंधर राजेश्रीया विराजित राजमान्यें राजेश्री अंबूतराव कृस्ण पंतप्रतिनिधि परम

भक्तोत्तम यांप्रती———विशेषस्तु तुमचें कल्याणं इछीत करवीरक्षेत्रीं छयात्वसभासमवेत श्रीनिकट राहिलों असों तदनंतर अपणांकडील बहुत दिवस वर्तमान न कळतां चितांस संतोष वाटत नाही तरी यैसें न करितां वारंवार स्वेकीये सामराज्ये अतिशेयें लिहून चित्त प्रमोदवित असीलें पाहिजे तेणेंकरितां श्रयेस्कर आहे यानंतर रा। गोपाळ:नाईक मारडेंकर सरदेशमुख यात व गोविंद नाईक देवळेकर यां उभयेतात दत्तकविषयार्थ कथला लागला आहे हें वर्तमान पूर्वी अपणांस विदितच आहे त्यांस सांप्रत गोपाळ नाईकानी मठीं येऊन सविस्तर वर्तमान विदित केले यैसें गोष्टींचा विचार मनास अणोंन उभंयेतांचा कलहे तोडून येथायुक्त वर्तेत यैसें करावे हे ध्यानास अणोंन गोविंदनाईकास मठास यावयाविषईं अज्ञापत्र पाठविले आहे अपण हि संस्थानाचे अभिमानी आणि मठीचे निजसिद्ध असां त्यांस सांगणे तें सांगून मठास येत ती गोंष्टी करणें संस्थानास अलेनंतर सर्व समक्तें शास्त्रार्थ मनास अणोंन येथान्याये कलहे तोडून सुदामंत वर्तत यैसें केले जाईल यांउपरि मठास न येतां परस्परे कथला करीतील तरी परिछिन्न तथे (?) निग्रहपत्र पाठवणे लागल तदनंतर अपणच गोंष्टी विलेस लागल कळावे यांकरितां लिहिले असे यांची मनसुभी अपण केलीच आहे यैसें असतां कथला करीताती अणि अजी पावतां परस्परें क्षेये वृधी धरीत अले सांप्रत तो हि प्रसंग राजेश्री गोविंद नाईक धरीत नाहीत तेव्हां शास्त्र विरोध यास्तव मठास अलेनंतर सर्व गोष्टी विलेस लागलते अहे बहुत लिहिणे———

इत्यलम्

ले. १५ **श्रीमहालक्ष्मीः प्रसन्ना स. १७६२ ते ६५.**

श्रीसह्यभूधराधोभागवर्ति देवले हर्चिरी हातखंबे देवरूख बराजपूर संगमेश्वरादि क्षेत्रवर्ति विद्वद्वैदिकसमस्तविप्रेषु

श्रीमज्जंबूद्वीपशिरोविभूषण दक्षिणवाराणसी यवाधिकरुद्रगया विमुक्त करवीरक्षेत्रस्थ समस्त विद्वद्विजविहिता नतिततयो विलसंतु॥ विशेषस्तु राजमान्य राजश्री गोपाळ सोमाजी सर्देशमुख प्रांत विशाळगड यांही श्रीक्षेत्री

येउन सकळ ब्रह्मवृंदास स्ववृत्त निवेदिले किं आह्मी देवळेकर सर्देशमुख कौशिक गोत्री राजश्री गोविंद नायक याचा दत्तक आत्रिगोत्रोत्पन्न महादावा नायक यांचा पणतू शास्त्रार्थाविषयीं आलो आहो तो शास्त्रार्थ ऐसाजे सांप्रत अमचे दायाद म्हणतात कीं तुह्मी अमचे दायाद नव्हा यास्तव तुह्मी कौशिक गोत्रीं व्यवहार नका करू व तुमचे सूयेर सूतक आह्मी न धरू व तुह्मी अमचा न धरावा याविषयीं विशाळगडी बोलोन कतबे देऊन मनसुभीस उभे राहून अह्मास बोलाऊन आणून श्रीमंत राजश्री अमृतराव प्रतिनिधीसन्निध मनसुभी करविली तेथे तळकोंकणातील व वरघाटिचे भले ब्राह्मण व महालोमहाळींचे वतनदार आले आणि त्यानि निश्चय केला जे हे दत्तक होत दत्तविधानावाचून कौशिक गोत्र व सूयेरसूतक वृत्तीचा भोगवटा चालणार नाहीं ऐसा निश्चय केला त्यास रा॥ गोविंद नायक व रा॥ हणमंतराव हे त्या गोष्टीस मान्य नाहीत व वे॥ बाबदेभट्ट अठल्ये ह्मणतात कीं तुम्ही कौशिक गोत्र टाका पूर्वील आपुले नाफड्याचे अत्रि गोत्र धरा येविषयीं अग्रह करून सांप्रत आम्ही त्याचा सुयेर सूतक धरितो त्यास दुरायी देतात व अमचा सुयेरसूतक आपण धरीत नाहींत सांप्रत रा॥ गोविंदनायकाच्या पुत्राविवाहदिवशी अमचे चुलते नरसोबा नायक शांत जाहले त्याचे आशौच त्यांही दाहा दिवस धरावे तें कळले असतो त्यादिवशी देवक ठेवुन विवाह केला ऐसा भ्रष्टाकार आरंभिला आहे यास्तव मी स्वामीपाशी निश्चयास आलो आहो सकळ ज्ञाति मिळोन आह्मास जो निश्चय सांगाल तो अंगीकारु म्हणोन रा॥ गोपाळनायकीं निवेदन केलें त्यावरून हे पत्र तुह्मास लिहिली आहे जे हे गोष्टि येका वाद्याचा वचनमात्रे निश्चित होत नाही यास्तव तुम्ही उभयता वादी समक्ष करून विचारून मनसुभी केली असता ऐशी गोष्टी न हावी हा भ्रष्टाकार ब्राह्मणास योग्य नव्हे तर तुह्मी रा॥ गोविंदनायक प्रभृतीस सांगोन व श्रीमंत प्रतिनिधीस सांगोन यथापूर्व शास्त्रार्थानुरूप उभयतास वर्त्तवावे जर ते नायकत तर त्यांस पंक्तिबाह्य करून आह्माकडे पाठवणे येथे श्रीस्वामी आहेत व क्षेत्रस्थ आहों हे त्यां उभयतास यथाशास्त्र वर्त्तवितील तर गोविंद

नायकास येथवर पाठऊन देणे आणि ते जर न येत आणि तुमची गोष्टि नायकेत तर त्यांस अपांक्त करणे मणजे अपणच ऐकतील या गोष्टीची उपेक्षा न करणे केल्याने ब्राह्मण्य बुडेल नाहीतर ज्यांचे त्यांशी शरिर संबंधी असतील त्यांस हे गोष्टिचे संकट पडोन मोटा परभूचे सारिखा कलह होईल परिणाम बरा नाही बहुत काय लिहिणे इत्यलमभिज्ञेपु इति नतयः । हे स्वहस्ताक्षर शांभट्टसुत बाबुभट्ट धर्माधिकारी यांचे.

×ₓ× **टीप**—लेखांक १३।१४।१५ हे बाळबोध लिपींत लिहिलेले आहेत, व येथें ते जशाचे तसे छापले आहेत.— सं.

ले० १६. श्री. सोमवार, ता० ४।१२।१७६९ ई०

राजश्री बचोबा नायक बिन गोपाळ नायक व गणोबा नायक बिन बाजी नायक व आपाजी नायक बिन बालाजी नायक व अंतोबा नायक बिन माहादेवा नायक व रामचंद्र नायक व लक्ष्मण नायक बिन रुद्राजी नायक सरदेसाई ताा खिळणा व देशमुख ताा देवले गोसावी यांस

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

सेवक आबाजी राऊ कृष्ण प्रतिनिधि नमस्कार सुहुर संन सबैन मया व अलफ तुंम्ही किले विशालगडचे मुकामी हुजुर येऊन विनंती केली कीं राा भिकाजी नायक बिन दादजी नायक व बापूजी नायक बिन नारोबा नायेक सरदेसाई तालुके मजकूर व देशमुख ताा मजकूर यांणी सन सीत खमसैनामध्ये आम्हांबरोबर कजिया केला जे तुमच्या वडिलांचे दत्तपुत्र विधान जाहालें नाहीं सबब तुंम्ही वतनाचे विभागी नव्हां त्याजवरून श्रीमंत कैलासवासी अमृतराव पंडित प्रतिनिधि यांच्या कारकीर्दीत मनसुबी होऊन निवाडपत्र जाहालें त्याप्रमाणें सरकारचें पत्र होऊन वतन दुमाला व्हावें तों बापूजी नायक यांणी कांही आपलें खासगत कार्याचें निमित्येकरून गेलें ते आले नांहा त्या उपरी आंम्ही श्रीमंत कैलासवासी कृष्णराव पंडित प्रतिनिधि यांचे कारकीर्दीत सन खमस सितैनामध्ये विनंति करून वतन सरकारांत जप्त होतें त्या पैकीं आपलीं निमे तक्षीम वतन सोडऊन

घेऊन सरकारची पत्रें करून घेतलीं त्यांतील मुख्य पत्र आमचे नांवाचे होतें ते पुणियांस राजश्री प्रधानपंत यांकडील पत्रे करून घेणें होती म्हणवून दाखवावयास नेले होते ते पत्र लक्ष्मण नायेक यांणी आपली वस्तभाव व कागदपत्र वो॥ सदासिवभट्ट गद्रे यांचे घरीं साखरपे येथें ठेविली होतीं त्यास त्यांचे घर दग्ध जाहालें तेथें तें पत्र जलाले यास्तव स्वामींनी कृपाळू होऊन भोगवटियास पत्र करून द्यावें म्हणऊन त्याजवरून मनास आणितां तुम्ही वरकड पत्रें पेसर्जा करून घेतलीं होती ती पाहिलीं व सरकारांत तुमचे पत्र वार होते तें पाहोन त्याप्रमाणें मजकूर लेहून दिल्हा बीतपसील रा॥ गोपाळनायक बिन सोमाजी नायक व गणोबानायक बिन बाजीनायेक व आपाजीनायक बिन बालाजीनायक व अंतोबानायक बिन माहादोबानायक व रामचंद्रनायक व लक्ष्मणनायक बिन रुद्राजी नायक सरदसाई तालुक खिलणा व देशमुख ता॥ देवले गां॥ सेवकं कृष्णाजी अमृतराऊ प्रतिनिधि नमस्कार सु॥ खमससितैन मयां व अलफ तुम्ही किले विशालगडचे मु॥ हुजुर येऊन विनंति केली कीं सन सीतखमसैन या सालामध्यें रा॥ भिकाजीनायक बिन दाजीनायक बापूजीनायक बिन नारोबा नायक सरदेसाई तालुक खिळणा व देशमुख ता॥ मजकूर यांणी श्रीमंत राजश्री राऊ प्रतिनिधि कैलासवासी यापांसी येऊन विधित केले कीं मोडेकर नाफडे अत्रिगोत्री यांचा पुत्र महादोबानायक यांस आमचे वडील गोविंदनायक बिन अनंतनायक याणी दत्तक घेतला म्हणऊन सांगतात आणि निमे वतन सरदेशमुखी तालुक खिलणा व देशमुखी ता॥ देवले येथील निमे वतनाचा उपभोग करितात यैशास गोविदनायक यांणी महादोबानायक मोडेकर यांस पुत्रविधान करून घेतला नसतां वतन आणभवितांत याजकरितां स्वामींनी येविसीची बरहक मनसुबी त्यांची व आमची करऊन आवघे वतन आमचे आम्हांकडे चाले ते गोष्ट करावी म्हणऊन त्याजवरून श्रीमंताही आम्हांस हुजुर आणून वतन आवघे दिवाणांत अमानत ठेऊन त्यांची व आमची पुत्रविघानाविसी मनसुबी कोंकणप्रांतीचे व वरघांटीचे जमेदार व भले ब्राम्हण सिष्ट शास्त्रज्ञ व खोत पाटील व अन्यत्र न्याये जाणतें यैसे अवघें किले मजकुरीं जमा करून

त्याकडे मनसुभी लाऊन दिल्हीं त्यांणी आम्हां उभयतां वादियांचे कतबे व राजिनामे करीणें लेहून घेऊन लिखित भुक्त साक्षमोझे पाहोन बरहक मनसुभी केली मनसुभीमुळें आपलें पूर्वज माहादोबा नायक हे दत्तकपुत्रविधान करून घेतले यैसें खरें जाहालें त्याजवरून समस्त पंचाईतानी व हकीमानी महजर केला ते समई वतनाचें बाहालपत्र करून द्यावें त्यास राजश्री बापूजी नायक यांणी कांहीं आपले खासगत कार्य प्रयोजन आहे म्हंणऊन निमित्य करून पंधरादिवसां हजीर व्हावें ऐसा जामीन देऊन निरोप घेऊन गेले ते हजीर जाहाले नांही त्यामुळें वतन तैसेंच दिवाणांत अमानत राहिलें यैशास स्वामींनी कृपाळू होऊन पेसजीच्या मनसुभीचा साद्यंत अर्थ मनांस आणून वतन करार करून देऊन पूर्ववतप्रमाणें आम्हांकडे चाले तें करावें म्हणऊन त्याजवरून मनास आणितां तीर्थस्वरूप राजश्री राव स्वामींनी पंचाईतामध्यें तुम्हां उभयेतां वादियांची मनसुभी करविलीं त्याचे महजराचा दाखला वरकड कागदपत्रांचा दाखला पाहतां पंचाईतमत्ते मूळपुरुष सोमाजी नायक त्यांचे पुत्र चौघे त्यामध्ये वडील पुत्र अनंत नायक त्यांचा पुत्र गोविंद नायक त्यास संतान नाहीं याकरितां त्यांणे आपले मेवणीचा पुत्र अत्रिगोत्री नाफडे यांचा दत्तक घेतला त्यांचे नाव महादोबा नायक त्याचे दत्तकविधान न जाहालियांचे साक्षमोझें व दाखले व कागदपत्र आणून दाखवणें म्हणऊन पंचाईतानी भिकाजी नायक व बापूजीनायक यांस सांगितलें त्यास त्यांचे वस्तु दाखलामोझ्या कांहीं पुरऊन देववीला नाही पत्रें मात्र आणून दाखविलीं त्याची विवेक्ष्या करितां पंचाईतमत्ते पत्रें मासूम ती साहित्यपत्रासारिखीं दिसोन आलीं व त्यापत्रांत दत्तकपुत्रविधान न जाहालियाचा मजकूर किमपि नाहीं किले मजकूरच्या हकीमाचा व नाईकवाडी याच्या सुरत महजर बाखैरीसारिखा बालाजीनायक बिन विठलनायक व महादोबा नायक बिन गोविंदनायक यांच्या नालिसीविसीं विज्यापुरास रंगनायक व रामनायक हे भिकाजीनायक व बापूजीनायक यांचे पूर्वज यांणीं घेऊन जाऊन पातशांही फर्मान आंणिला त्यास सुरत महजराचा दाखला फर्मा-

नामध्ये असावा तो नाहीं अथवा दत्तकविधान न जाहालियाचा मजकूर हि फर्मानांत कांही नाहीं फर्मानामधें मादोवानायक बिन गोंविंदनायक व बालाजीनायक बिन विठलनायक हे दिवाणचाकरी योग्य नव्हत यैसा नालिसीचा मात्र मजकूर आहे परंतु माहादोवा नायेक यांस गोविंदनायक यांची च बिन लाविली आहे व सुरत महजर याची विवक्षा होतां त्यांस हि मूळ नाहीं उभयता वादी यांसमक्ष निवाडा करून न्यायेता (न्यायतः) येक खरा व येक खोटा करून महजर व्हावा तो हि अर्थ त्यामध्ये नाहीं व सफरे उपाध्ये यांचा उपाध्यपणांचा भोगवटा उभयतांचे घरी पुरातन चालत आहे यैशास दत्तकविधान न जाहालें हे वृतांत त्यांस ठाऊक असावें तें त्यांस ठाऊक नाहीं व माहादोवानायक बिन गोविंदनायक यांणी अत्रि गोत्राचे पाळण करून कौशिकगोत्रें विवाहवृतबंधादिक कार्यें करून सूयेरसूतक परस्परें धरून वतन अनभविले त्याची संतत पिढी दरपिढी तुम्ही वतन अनभवित आलेत व मूळपुरुष सोमाजीनायक यांचे द्वितीये पुत्र केशवनायक हे अनंतनायक यांचे धाकटे बंधु ते भिकाजीनायक व बापूजीनायक यांचे पूर्वज त्यांणी महादोवानायक यांस विभागपत्र करून दिल्हें त्या आलिकडे त्याचे पुत्र रामनायक यांणी सुरत महजर करून घेतला म्हणऊन भिकाजीनायक व बापूजीनायक सांगतात त्यास त्या रामाजीनायेकीं विभागपत्र मादोबानायक यांस करून दिल्हे तें दोनी पत्रें पाहातां केशवनायक यांच्या पत्रास व रामनायक यांचे पत्रास यकूणतीस वर्षांचे अंतर आहे त्यापलीकडे दत्तक किति वर्षें घेतला हे भिकाजीनायक व बापूजीनायक यांस ठाऊक नाहीं व केशवनायक बिन सोमाजी नायक यांचे कारभारांत भिकाजीनायक व बापूजीनायक यांचे बोलणेवरून व करीण्यावरून कजियाच नाहीं. केशव नायक असता त्यांपासून तुमचा भोगवटियाचा दाखला व त्या आलीकडे वंशपरंपरेने भोगवटा चालला त्याचे दाखले व साक्षीमोझें व माहालोंमांहालच्या वतनदारांच्या व गावगंनाच्या साडिया व नवद वर्षांचे वृध पुरुष यांचे साक्षीने व भोंवारमाहालचे कागदपत्रांचे दाखले पाहातां व ईदलशाही कारकीर्दींची पत्रें व सिवशाही कारकीर्दीपासून राजश्री तुको राम सुभेदार

मामले प्रभावली व महालानिहाये व श्रीमंत मांहाराज राजश्री संभाजी माहांराज थोरले व श्रीमंत माहांराज मातुश्री ताराआई साहेब यांची राग-णेचे कारकीर्दीची व तीर्थस्वरूप राजश्री परशराम पंडित प्रतिनिधि कैलास-वासी यांची पत्रें व निमेनिमप्रमाणें वतनाचा भोगवटा चालत आला व नू-तन ज्याजती हकलवाजिमा व इनामत बिघे ३० तीस तुमचे वडील केशव नायक व सोमाजीनायक बिन गोपजीनायक यांणी करून घेतलें त्याचा हि विभाग निमेनिमेंप्रमाणें भोगवटा तुम्हां उभयतां वादियांकडे चालत आहे याजवरून व धर्मशास्त्रसंमत्त दत्तकपुत्रविधान जाहाले असतां अत्रिगोत्र सुटोन कौशिक गोत्राची प्रवृत होणार नाहीं व दत्तकविधान जाहालें नसतां परस्परें सूयेरसूतक धरितील हे गोष्ट न घडती त्यास सूयेरसूतक परस्परें धरीत आलें हे सर्व साधने खरीं दिसोन आलीं दत्तकविधानाचा लढा कांही राहिला नाहीं हे जाणोन तुम्हांवर कृपाळू होऊन पुरातन चालत आल्याप्रमाणें तुमचे तक्षिमेचे वतन तुम्हांस करार करून देऊन हे पत्र भोगवटियास करून दिल्हें असे तरी तुम्हीं सरदेशमुखी तालुके खिळणा व देशमुखी ता। देवलें यथील वतनाचे हक लवाजिमा व कानू कायेदे पूर्ववत कानू जाबिल्याप्रमाणें व इनाम जमीन खोतचि गाव व माहालीं असतील तें व कसबा देवलें येथील खोती व घर घरवंद व सेतपोत जे असेल तें येका विभागें तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादिवंशपरंपरेने आणभवित जाणें वतन-संमधे दिवाणांत तुम्हांपासून सेरणी रुपये १००० यक हजार घेतले असेत जाणिजे छ २५ जिल्हेज येणे प्रमाणें पेसजीचे पत्रांचा बार दप्तरचा पाहोन हालीं तुम्हांस हे पत्र भोगवटियास सादर केलें असे तरी तुम्हीं आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने वतनाचा पुरातन भोगवटा चालत आल्याप्रमाणें उपभोग करून सुखरूप राहाणें छ ५ माहे शाबान निदेश समक्ष

राजते लेखनावधि

श्री

शिक्का वर्तुलाकार

आईआदिपुरुष श्री राजा सिव छत्रपति
स्वामि कृपानिधी आबाजिराव कृष्ण प्रतिनिधी

संगमेश्वरकर जोशी वि. सरदेसाई.

ले. १७ (तालीक) श्री. सन १७०५.

स्वस्ति श्री शके १६२७ पार्थिवनाम संवत्सरे फाल्गुन वद्य अष्टमी रविवासरे तदीनि वेदशास्त्रसंपन्न राजश्री कासी पाध्ये बिन अंतो पाध्ये व रुद्रो पाध्ये बिंन पन्हो पाध्ये व देवो पाध्ये देशोपाध्ये धर्माधिकरणी व जोतिषी उपनाम गोलवलीकर वास्तव्य कसबे संगमेश्वर यांसि गणोबा नायक सरदेसाई मामले प्रभावली व मामले दाभोल नमस्कार उपारि तुम्ही सारंगडच्या मुकामी विदित केले कीं आपली वृती धर्माधिकरण व ज्योतिष व देशोपाध्यपण मौजे देवघर प्रभावली विलायतीचे पासून गुढे विलायतीचे देवघरपावेतो पुरातन भोगवटा चालत आहे कसबे संगमेश्वरी धर्माधिकरण व दुसरीं वृत स्वामींचे घरी घटिका ग्रहपूजन व नूतन पंच्यांग पुरातन चालिले असतां सांप्रति स्वामींचे घरी कसबे मजकुरी चिरंजीव बचीचे लग्न जाहले राजश्री कृष्णाजी भास्कर याचे पुत्रास दिल्ही तेव्हा जोसी कसबेयांमध्यें आपणामध्ये घटिकेविशई कलह होऊ लागला तेव्हा राजश्री कृष्णाजीपंती उभयतास निराले ठेऊन स्वामींचे पुरोहित सप्रे यांकरवी घटिका घालऊन लग्नंसिधी केली ऐसियासि स्वामींनी पूर्ववृत मनास आणून आम्हास काय आज्ञा तें करून कलह न होय ते करावे आम्हाजवल प्राचीन पत्रे आहेत त्यांत प्राचीन स्तीत सर्व लिहिली आहे परंतु प्रस्तुत ती पत्रे सिरसकर आमचे दायाद यांपासी राहिली आहेत ते देशांतरी आहेत पत्राचा प्रेत्न होतां घडेल तो खरा स्वामान वृध्ध वृध्ध आहेत यांसि पुसोन जोसियाचा आमचा कलह नव्हे ते करावे त्यावरून प्रस्तुत चिरंजीव दादोबा व अंतोबा यांची लग्ने बहिरवगडी जाहाली या प्रसंगी वेदमूर्ति सोमनाथभट कात्रे व रामभट हर्षे व बाळकृष्णभट देव व पुतंभट सप्रे व वासुदेवभट सप्रे हे येथे आले व कसबेचे जोसी बालजोसी सौदागर व सदासिव जोसी ये हि आले व केसो विठल कुलकर्णी मौजे धामापुर व तिमाजी कृष्ण कुलकर्णी मौजे मुचरी हे समस्त एकत्र बसोन उभयतांचा कलहमोचन कैसे करावे त्यावर सर्वांच्या व उभयताच्या विचारे जाहाले जे वेदमूर्ति विष्णुभट सप्रे आमचे पुरोहित अति वृध नवद

वर्षांचे हे सत्यपूर्वक सांगतील तें उभयतानी मान्य करावे ऐसा नियत करून विष्णुभटांस पत्र लिहिले संगमेश्वरी आमचे घरी पुरातन घटिकाविशय कैसा आहे तो सत्यपूर्वक लिहोन पाठवणे त्या वरून विष्णुभटी करीना लिहोन पाठो जें संगमेश्वरी देशमुखाचे घरी गोलवलकर उपाध्ये घटिका घालीत असतां रा। सोमोवा नायक प्रथम स्त्रीचे कन्येचे लग्न संगमेश्वरी केले सौदालकर देशमुखाचे घरी दिल्ही ते वेलेस प्रभावलीचे मामलेदार अनंत जोसी व गण जोसी मामलेचे हवलदाराचें पत्र सोमोवा नायकांस घेऊन आले कीं तुम्ही मामलेचे सरदेसाई आणि अनंत जोसी व गण जोसी मामलेयाचे ज्योतिषी याचे तुम्ही आपले घरी ज्योतिष चालवणें त्यावरून सोमोवा नायकीं मामलेदार जोसी यांस कसवे मजकुरी दुसरी घटिका दिल्ही त्यावरी मामलेदार जोसी दाहा पंधरा वर्षे कार्य प्रयोजी कसवे मजकुरी देशमुखाचे घरी दुसरी घटिका घालीत होते त्या वर सोमोवा नायक विज्यापुरास गेले साडेतीन वर्षे होते तेव्हा वामन जोसी व अनंत जोसी नाइका बरोबर गेले त्यांणी नाइकाचे आर्जव बहुत च केले त्याणी च्यार सहस्त्र लारी नायकांस रीण दिल्ह सोमोवा नायक कृतकार्य होऊन प्रभावलीस आले मग कोणएक प्रसंगी मामलेकर जोसी यापासून नायकां जवळ अंतर पडिले त्यावर नायकाचे व जोसियाचे वैमनस्य जाहले मग नायकी गण जोसी यांस रागे भरून सांगितले जे आमचे घरी तुजला पंच्यांग देखील वाचावयास प्रयोजन नाही मग तो विषादी बहुत च जाहाला त्यावर सोमोवा नायकीं आपले पुत्र विठल नाइक याची मुंजी संगमेश्वरी केली तेव्हा मामलेकर जोसी आला नाहीं ते प्रसंगी वामन जोसी व अनंत जोसी यांणी सोमोवा नायकांची प्रार्थना केली जे आपण तुमचेथे सर्वकाल आहों स्वामीनी आपल्ये घरी ज्योतिषपणाचा मान आपणास द्यावा त्यावरी नायकी वामन जोसी व अनंत जोसी यास सांगितले जे मामलेचे जोसी दुसरी घटिका घालीत होते ते घटिका तुम्ही घालणे व गणपतिपूजन घेणे ऐसे नायकी सांगितले त्यापासून कसबेचे जोसी दुसरी घटिका घालिताती पूर्वी त्या उभयतांचा कलह जाहाला नाही विठल नाइक याचे

वेळेस मामलेकर जोसी याणे संगमेश्वरच्या देशमुखाचे घरचे घटकेविशई उपाध्ये व जोसी यांसि पाच सात वर्षे कलह बहुत च केला कीं देशमुखाचे येथे आपली च घटिका म्हणोन उपाध्ये व जोसी यासी प्रभावलीस नेविले होते मग विठल नायकी उपाध्येयासी मामलेकर जोसियाचा कथला च नाही म्हणोन उपाध्यांस निरोप घरांस जावयास देविला मामलेकर जोसी व कसबेकर जोसी या उभयतांची समाजाविसी आपण करितो म्हणोन दिवाणातून सोडऊन आणविले समाजाविसी करीत होते परंतु दोघे समजत ना मग नायकी घटिका अमांनत केली मागती याचा कलह वारावा तो विठल नाइक शांत जाहाले येका वर्षानं मामलेकर गण जोसी हि शांत जाहले त्यावर तो कलह तैसा च राहिला पुढे मामलेकर जोसी संगमेश्वरास कार्यप्रयोजिनास आले नाहीत त्याउपर केशव नायकी रंगोबा नायकांची मुंज व सोनाबाईचे लग्न संगमेश्वरच्या घरी केले आपाजी बलाल यासि दिल्ही आपण कन्यादान केले तेव्हा उपाध्ये व जोसी या करवी दोन घ . . . . (टिका आणविल्या ?) आलीकडे रंगोवा नायकीं आपले पुत्राचा + + + + संगमेश्वरी केला त्या पासून कसवे संगमेश्वरी घटिकेचे प्रयोजन जाहाले तरी जोसी उपाध्ये दोन घटिका घालीत आहेत रंगोबा नायकांची कन्या मनुबाईचे लग्न संगमेश्वरी जाहले राजश्री कृष्णाजी आपाजी नाफडे यासि दिल्ही तेव्हा उपाध्ये जोसी यांणी दोन घटिका घातल्या जोसी यांणी उपक्रम केला होता कीं कालसाधना आपले घटिकेवरी करावी लग्नपूजा दोघास द्यावी ऐसे बोलत होते मग कृष्णाबाई याणी प्राचीन सिस्त सांगितली जे हा कालवर संगमेश्वरी आपले घरी दोन घटिका चालिल्या पूर्वी उपाध्ये गोलवलकर व मामलेकर अनंत जोसी व गण जोसी घटिका घालित होते विठल नायकांआलीकडे उपाध्ये गोलवलकर व कसवे संगमेश्वरचे जोसी ऐसे दोन घटिका घालितात ऐसे सांगितले त्या वरून मनूच्या लग्नात दोन घटिका घातल्या खेडेगांवी देशमुखानी काय केले तरी उपाध्ये गोलवलकर यांची येक च घटिका चालत आली आलाकडे बचीचे लग्न संगमेश्वरी जाले तेव्हा उपाध्ये व जोसी याचा प्रथम कलह जाला तेव्हा

राजश्री कृष्णाजी भास्कर याणी उभयतास निराले ठेऊन सप्रे पुरोहित या-करवी घटिका घालविली दादोबा व अंतोबा याच्या मुंजी कुल्यात जाहाल्या तेव्हा घटिका उपाध्येयाची च घातली याप्रा पुरातन स्थीत चालत आली आहे म्हणोन विष्णुभटी करीणा लिहून पाठविला व तिमाजी कृष्ण यांणी हि याचप्रा सांगितले व पुलभट व वासुदेवभट सप्रे यांणी तीर्थरूपांचें मुंजीपासून याचप्रा करीणा सांगितला ऐसे आजीवर चालत आले आहे पूर्वी उभयतांमध्ये कलह जाहाला नाहीं बचीचे लग्न जाहाले तेव्हा मात्र कथला जाहाला ऐसियास पुढे कथला न व्हावा व कलह तुटावा यानिमित्य बाल जोसी सौदागर व सदासिव जोसी यासी ठेऊन घेतले त्यास बाल जोसी यांणी कथलानिमित्य सदासिव जोसी यास ठेऊन आपण निरोप घेऊन गेले विष्णुभटाचे पत्र यावयास विलंब लागला म्हणोन सदासीव जोसी यांणी चऊ दिवसाचा नेम करून पत्र लेहून देऊन घरासि गेले त्यास व इतर जोसी यास दोन चार वेल लिहिले परंतु ते हजीर होत नाही सदा-सिव जोसी विशालगडास गेले ऐसियास पूर्व वर्तमान मनास आणितां जोसि यासि सदरहू घटिकेचा कलह तुम्हासी करावयासि संबंध नाही तुम्ही पुरा-तन कसबे मजकुरी आमचे घरी घटिका घालीत आले आहां हां सर्वांचे मते आहे याप्रा तुम्ही कसबे मजकुरी आमचे घरी घटिका व ग्रहपूजन व नूतन पंच्यांग चालवितां त्याप्रा चालवणे ये विसी हे पत्र तुम्हास दिल्हे असे जाणिजे तुम्ही येविसी चित्त उद्विग्न न करणे मोर्तब आहे दस्तुर **सोमाजी नरसी करकरे.**

ले० १८. **श्री सन १७९०।९१ ई०. आज्यासाहेब**

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ११७ साधारण नाम संवत्सरे त्रयोदसी* भोमवासरें क्षत्रियेकुलावतंस श्रीराजा शिव छत्रपति स्वामी याणी समस्त-राज्यकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री माधवराव पंडित प्रधान यांसी आज्ञा केली यैसीजे कसबा संगमेस्वर येथे कैलासवासी तीर्थस्वरूप माहाराज—साहेब याचा वाडा आहे त्या जागेवरी हली राजश्री

सदाशिव दादाजी माहालुंगकर सरदेसाई वाड्याच्या जुन्या जात्यावरी याणी घर बांधिले म्हणोन जोसी याजकडून हुजुर गैर वाका समजाऊन देऊन पेशजी आपणास आज्ञापत्र सादर जाहले आहे यै००००ली सरदेसाई याणी घर बांधिले आहे व बाग त्या०००नांदणूक कसबे मजकुरी कैलासवासी माहाराज०००हे गडाहून येऊन राहिले होते तेव्हा व त्यापूर्वी०००कसी जाहली आहे त्याची चौकसी वाजबी न्याय००० म्हणोन दाखलेनिसीं वैवाट चालत आली आहे०००णे सरदेसाई याजकडे चालू द्यावी जाणिजे बहुत लिहिणे तरी सुज्ञे आसा

मर्यादेयं विराजते

× टीप— "त्रयोदसी" या अक्षरांस बरोबर मध्यें आडवी रेघ मारल्यास जो भाग वर राहील तसा अस्सल कागदांत राहिला आहे व दुसऱ्या कोणत्याही तिथीस याप्रकारें असा भाग राहत नाहीं म्हणोन १३ तिथी दिली आहे. सदर संवत्सरीं मंगळवारीं त्रयोदशी खालील तारखांस पडली आहे. इंग्रजी वर्ष १७९०।९१—वैशाख शु॥ (२७-४-९०); वैशाख व॥(११-५-९०) श्रावण व॥ (७-९-९०) ; पौष शु॥(१८-१-९१) भाद्रपद शु॥ (२१-९-९०); भाद्रपद व॥ [१-२-९१)—सं०

ले० १९ श्री शुक्रवार ता० १७।११।१८२० ई०

राजश्री गणोबानाईक बिन प्रल्हादनाईक व राघोबानाईक बिन दादोबानाईक सरदेसाई मामले प्रभावली व सुभा दाभोल यासी आज्ञा केली ऐसी जे सु॥ इहिदे अशरीन मयातैन व अलफ स्वामीचे शेवेसी तुम्ही हुजूर करवीरचे मुकामी येऊन विनंति केली की कसबा संगमेस्वर येथे पूर्वी आमचा वाडा होता त्या वाड्यात कैलासवासी माहाराज————— कारणामुले राहिले पुढें वाडा धग्ध जाहाला त्या वाड्यावर दादोबानाईक सरदेसाई याणी घर बांधिले त्याजवरून जोसी याणी गैरवाखा समजाऊन माधवराव पंडित प्रधान यासी आज्ञापत्र देऊन वाडा मोडविला त्याजवर त्याच वर्षी दादोबा-नाईक सरदेसाई याणी आपला मजकूर सम-

जाऊन पंडित-प्रधान यांसि वाडा बांधू देणे म्हणोन आज्ञापत्र न्हेले परंतु जोसियाचे भिडेमुळे वाडा जाहाला नाही त्यांसि हाली कृपा करून आमचा वाडा आंम्ही बांधितो त्याजविसी आज्ञा जाहली पाहिजे म्हणोन विदित केले त्याजवरून मनासी आणिता तुमचे वाड्यात कैलासवासी माहाराज राहिले व तुम्हांजवळील कागदपत्र व भोगवटा पाहून पेशजी प्रधान-पंत यांसि आज्ञापत्र दिल्हे आहे हे जाणून व हाली चवकसी करून वाड्याची जागा तुमची खरी हे जाणोन तुम्हांस आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी तुंम्ही कसबे मारी जुन्या वाड्यावरील जागेवर घर बांधून सुखरूप राहाणे जाणिजे रा छ १० माहे मोहरम लेखन स्वासा

विलसति लेखनावधी

(दाभोळ सुभ्याच्या साडेचार महालांच्या सरदेशमुखी विषयींचा वाद) ले० २० (तालीक). श्री. ता. ५।५।१७७० ते १६।३।१७७२ पर्यंतचे

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री कृष्णाजी विश्वनाथ गोसि

शेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार सुाा इहिदे सबैन मयां व अलफ शके १६९२ विकृतिनामसंवत्छरे दादोबानांईक बिन सदासिवनाईक व नारोबानाईक बिन केशवनाईक सरदेसाई मामले प्रभानुवंली व सुभा दाभोल याचा व आनंदराव बिन यशवंतराव चवाण देशमुख साडेच्यार माहाल मामले हमजाबाद व भास्कर बाबाजी बोक खोत मौजे कोतलुम ताा वालवें व बदरे मोकासी तांा चिपळूण वगैरे यांचा दाभोल सुभाचे सरदेशमुखीचा कजिया लागोन मनसुफी साल तिगस्तापासून हुजूर पडली आहे त्यांस सरदेसाई म्हणतात की दाभोल सुभाची सरदेशमुखी वतनी वतंनी परंपरेने वडील वडील अनभवीत आले मध्यें कैलासवांसी सिवाजी माहाराज यांचे कारकीर्दीत अवघ्या वतनदारावरोबर आमचे हि हक मना जाहाले होतें ते राजारामसाहेबाचे कारकीर्दीपासून चालते जाहाले त्याजवर हबसियाचा अमल दाभोल सुभांत जाहाला तेव्हा त्याणी मागती मना केलें त्याउपरी आमचे आजे दादोबानायक बिन रंगोबानायक हबसी याजकडे हाले आहेत त्यांस हबसियापलीकडे

याचा भोग(व)टा कधीच नांही हबसी याजकडे अमल जाहाला तेंव्हा दादोबानायक त्याजला भेटले नवतें ते समंई त्याणी आम्हांस पत्रे पाठविलीं की सरदेशमुखीचें वतन याचे नसता याजला हक तुम्ही देता हे कामाचे नवे म्हणोन पत्रे पाठविली ती बजिनस आमापांसी आहेत म्हणोन विनंती करून पत्रें दाखविली त्याजवरून मनास आणिता सुभे मारचे सरदेसाईपणाच्या वंतनाचे दाखलेयाची पत्रे शंभरा वर्षापैलीकडील व आलीकडील दादोबानायक बिन रंगोबानायक हबसियाकडे रुजू नवते त्या पूर्वीचे हबसियाचे ताकीदपत्र चवाण वगैरे याणी आणूंन दाखविले त्या च पत्रावरून हबसियाचे अमलाअगोधर सरदेसाई याचा भोगोटा होता ऐसे दिसते परंतु आणखी भोगवटियाचा पुर्ता शोध करून अका माहालचे वंतन याचे जाहाले तरी याजकडे चालवावे त्यास हबसियाचे कारकीर्दीस अका माहाल याजकडे चालिले त्याजवर आंगरेयाचे अमलांत तीन माहाल चालिले तो भोगवटा कैलासवासी तीं॥ नानासाहेबीं मनांस आणून तीन महालचे सरदेशमुखीचे वंतन याजकडे चालविले त्यांस याची मनसुफी हुजूर पडली असंता सरसुभाहून सदरहू तीन माहाल अमानत करावयाचे कारण नाही याजकरितां हे पत्र तुम्हास सादर केले असे तरी तां चिपळूण व तां दाभोल व तां सावर्डे एकूण तीन माहाल देखील मीठबंदर येथील सरदेशमुखीचा हक लवाजिमा तुलाजी आंगरेयाचे अमलाचे अखेरीपर्यंत चालिला असेल त्याप्रो सरदेसाई याजकडे चालवणे आलीकडे सरकारच्या.........

टीप—पुढील बंद गहाळ आहे.—सं.

खोती गांवांबद्दलचे वाद.

(पत्रावर दाखल छ ७ शावाल सन तिस्सा सितैन मया व आलफ आहे)

ले० २० श्रीनरहरिवरद. मंगळवार, ता० ७।२।१७६९.

तीर्थस्वरूप सौभाग्यवति मातु (श्री) सगुणाबाई

वहिनीं वडिलांचे शेवेसी——

अपत्यासमान दादोबानायक दोनीं कर जोडून सिरसाष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल ता। माघ शुध्ध प्रतिपदा पावेतों मुकाम पुणें येथें श्रीकृपे-करून सुखरूप असों विशेष आपण पत्र सख्या तोडकर याबरोबर पाठ-विलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ कलों आला पत्रांतील अर्थ कीं तुम्हांकडून अनुभव नाहीं आपण वायकों मूल लाहान लोकाचें देणें बहुत त्याचा परि-हार व्हावा सर्व वतनाचा मूल जागा येथें श्रीमंताचें सानिध्य रखून मुलाचें व आमचें चालवावें याअर्थें चिरंजीव नारोबा नायक येक वर्ष ठेऊन घेतलें होते ते चित न घालीत नाना प्रकारची निमित्यें योजून आंग काढून गेलें मुतालीक उमदा माहितगार पदरी कोणी नाहीं नित्य उठोन देणेकरी श्रमी करितात याचा निकाल व संस्थानाचा बंदोबस्त कोणी करावा वडि-लांचें नांव पदरी कागदपत्र व मूल लाहान श्रीमंताचे पाय सोडून कोठें जावे तेव्हां श्रीचा आश्रय करून सर्व दुःख्यें गिळून राहिलों वडील तीर्थ-स्वरूप उभयता मामाजी याणी साभालावे तरी ते देशाटणास गेलें त्याणी तुम्हांवर वतनाचा भार सोपिला तुम्हीं व चिरंजीव नारोबा नायक यथामति तिकडील संभाळीत आहा इकडील संस्थानाची मात्र ऐसी गत जाहाली आहे आणि उगीच उपरोधें लिहिता द्वैतार्थ दाखऊन आम्हांस दुःखांत घालितां हे तुम्हांस योग्य नव्हे उभयतां तुम्हांस आम्हीं वडील वडीलोपा-र्जित द्वैतभावाची चाल च नाहीं याचें प्रमाण तरी उभयतांतील येक येऊन येथील आमच्या सर्व अनुपपत्ति परिहार करून आमचें व मुलाचें व श्रीचें चालवावें तेव्हां अनुभवास आले उपरांतीक कागदपत्र तुमचे च आहेत दुसरा कोणीं बाहीराक (ला ?) येऊन नेईल कीं काय हें चिती आणून दोघातील येकझण येऊन लिहिल्याअन्वयें चालवावें म्हणजे सर्व तुमचें आहे हे न करितां तिकडील व हिकडील वतनाचा अव्हेवार करून आम्हांस सब्द लाऊन दुःखांत मात्र घालितां लोकांत शब्द ठेऊन दुरापेयश आमचे ठाई आणाल तरी त्याचा साक्ष श्री—आहे वडिलार्जित वृत मेल-विली आहे यश कीर्ति रक्षण करावी हें श्रीनें तुम्हां उभयतांचे माथां ठेविलें आहे समजोन श्री बुध्धि देईल त्याप्रमाणें करावें म्हणोन लिहिलें

यैसियासी तुम्हीं वायको चिरंजीव प्रल्हाद नाईक लाहान देणेकराचा उपद्रव होतो ही गोष्ट प्रमाण परंतु आम्हीं आज च्यार वर्षे वतनाच्या कसालेमध्यें ऐसें असतां आम्हांस तेथील बंदोबस्ताविसीं आपण आज्ञा कधीं केली ते आम्हीं अमान्य केली यैसें नाहीं न कारितांच करावे हे उचित आहे तशामध्यें आम्हीं कसालेयामध्यें इतकें हि असोन आज्ञा होती तरी यांतच पाहून घेतों अंतरज्ञानी कोण आहे सर्व वतनाची मूल जागा हे यैसें म्हटले तर मूल जागा श्रीमावलंगेयांत आहे ते व संगमेश्वर व प्रभावलीं श्रीमंत कैलासवासी——पंत प्रतिनिधि याचें चरणाची जोड आमचें वडिलांनी केली त्याचे परंपरेच्या सानिंध्यास्तव त्रेसष्ट चौसष्ट वर्षे तेथें रहिवास जाहाला इतकाच प्रकार चिरंजीव (नारोबा) नायक तेथील संस्थान सांभालावयासी नेले होते ते निमित्यें योजून आंग काढून गेले हे वृत (त) र तुम्हीं आज लिहिल्यावरून कललें नारोबा नायक तेथें गेले मागती घरास अंजणवेलीस गेले इतकें ऐकण्यांत आहे मुतालीक माहितगार मातबर शाहाणें राजश्री भास्करपंत होते त्याची उपेक्षा प्रथमता च केली याहून दुसरा कोठून मिलणार पदरीचें माणोस आहेत त्यांचे बहुत प्रकारें चालवावें लागतें कृष्णाजीपंत तीर्थरूप कैलासवासी आपाचें पदरीं होते ते मृत्यु पावलें त्याची स्त्री व वहीण आहे त्यांचा अद्यापि थोडा बहुत परामर्ष करीत असतों विशालगडी घरचे चाकर होते त्यास ते चहूंकडे गेले आहेत त्यांची व्यवस्था काय आहे ती आपण पाहात च आहेत तेव्हां पदरी माणोस कोण राहों पाहातो हा शब्द आमचे च माथां प्रमाण आहे तीर्थस्वरूप राजश्री गणोवा नायक जाऊन आज साहा वर्षे जाहाली तत्रापि आज या च प्रसंगें आपण इतक्या उपाधींत आहेत हें लिहिलें या खेरीज समय च नवता खरें च आहे अडचणीचे दिवसीं जें साह्य असेल तें करावें आम्हीं मात्र ऐक्यभाव लिहून अनुभवास दृश्यत्वें येत नाहीं वडिलांकडून आज्ञा कोणती जाहाली आणि वाजवी रीतीस अंतर पडिलें तें धरून ठेविलें आहे उभयता मामाजी पर्यटणास गेले होते ते येक रत्नागिरीस आले येक करविरास समीप च आहेत अविलंबे च भेटी होतील त्यापासी आपण आम्हांस

निमित्य त्याजकडे येईल हे मनात वैपरीत्य बुधि चिंतून लिहिले ते तरी तुमचें बंधु याणी तुम्हांकडील कागदपत्र आमचे द्रिष्टीस न पडावे येतदर्थी तुम्हांस मंत्र दृढतर केला आहे हे ते च येथें बहुतांजवल वदले आहेत लटकें संस्थानाचें व कर्जाचे कारण लाविलें आहे अभ्यंतरांतील अर्थ भिन्न आपा मावलंकर याचें साहित्य रत्नागिरीस तुमचे तीर्थरूपीं केलें तें परस्परें च श्रवणात आलें च असेल जन्मादारभ्य ज्यांचे अन्न भक्षिलें त्याचें अनिष्ट न चिंतितां जन्माचें सार्थक जनापवादें करून कशानें रूढीस येईल आतां कागदांचा घोकणा तुम्हीं घातला आहे तिकडील व हिकडील वतनाचा अव्हेर करून मजला नहाक दुःख देता असा उलेख त्यास कैलासवांसी चौघे वडील बंधु आजे आमचे होते त्याचे मागें कोणी वृत्त अनुभव करीत असतां अव्हेर जाहाला तो तुम्हीं आपलें चितांत पाहावें आम्हीं वृत्तीवर आल्यापासून आजपर्यंत तीर्थस्वरूप राजश्री केशव नायक काका यांही अनु भव घेतला त्यातील तिलतुल्य जाऊ दिल्हें नाहीं कांही वृध्धी त्यापेक्षा असेल वतनांत श्रम श्रीमंताचा अमल जाहाल्यासून आलीकडे प्रभुसानिध्य व प्रापंचरित वडील चार बंधु आमचे आजे कर्ते होतें त्या आलीकडे त्याच्या संहस्त्रांसें थोडेबहुत आम्ही च संपादिली आहे इतराचा विशय सर्व तुमच्या लिहिण्यावरून समजण्यात आला आहे कैलासवासी तीर्थस्वरूप प्रहराद नायक काका यांणी वतनी कागद तल्यांस गाहाण ठेविले त्यातील कांही कागद कृष्णाजीपंतीं आणिले काही आजून राहिलेच आहेत विशाल-गडी होते ते तीर्थस्वरूप राजश्री गणोबा नायक याजपासी राजश्री भास्करपंती दिल्हें ते तुम्हापासी च आहेत अंजणवेली व विशालगडीं गणोबा नायक दादा च होते त्याणी वडिलांचे संपादित होतें तें रक्षिले कीं काय हे चिती न आणितां आम्ही वतनाचा अव्हेर कारितो म्हणोन उपराटा शब्द ठेविता परंतु विस्व कोणी ठेवणार नाहीं प्रत्यक्ष द्रिष्टिगोचर गोष्टी आहेत तुम्हीं महतसंकटांत आहा हे प्रमाण येविसी आमचा उपाय असोन उपेक्षा करीत असों तरी श्रीचा शब्द लागता निरुपाय गोष्ट या दुःखाचा परिहार श्रीविना दुसरा काय करील श्री—करील तर होईल आम्हीं कागदाच्या

अडचणीत सापडिलो येसें समजोन अडचणीत जसें म्हणाल तें मान्य करितील हे चिती धरिले असीले तर आज आम्हास अडचण पडिली तुम्हांस न पडे ऐसे नाहीं वृतिवंत आहेत त्यांस कार्यानरूप अडचणी पडत च आहेत तेव्हां प्रसंगानरूप आमचे कारण तुम्हांस कधी ना कधीं लागेल या अर्थारतव आम्ही अडचणीत सापडिलो ते च तुम्हीं सापडिलां ऐसे समजोन लक्ष राखल्यानें वडीलपणास श्रेयस्कर च आहे आम्हांकडून आद्ययावत भाऊवंदाचे जागां दुजाभाव नाहीं ही च निष्ठा दृढतर आहे तरी श्री——
तुम्हांस सब्दुध्धि देऊन कागदपत्र चिरंजीवांपासी देऊन साह्यभूत होऊन वतनाचे यश घ्याल हा च आमचा सिधांत आहे नेणतेपणी लिहिले आहे वडिलीं राग न मानावा व उतराचे प्रत्योतर न लिहितां अज्ञानत्व येतें यदंनि-(मि)त्य सुचले तें यथामति लिहिले आहे सारांस तुमची आम्ही लेकरें आहों जेणेंकरून वतनाचे व आमचें संरक्षण होय आणि वडिलांचे कीर्तीस जनउपहास्य न होय ते वडिलांनी केल्यानें उतम आहे बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति——————————

चिरंजीव राजश्री प्रहराद नायेक यासी आसीर्वाद——————

ले. २१ (प्रभा० दप्तर) श्रीनरहरिवरद ता० ७।२।१७६९

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री भास्करपंत बाबा स्वामीचे शेवेसी

पोष्य दादोबा नायक सरदेसाई मों पुणें कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत गेलें पाहिजे विशेष आपण पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन लेखनावलोकनें परम समाधान जाहालें अहिरनिसी पत्रीं आपले साकल्यार्थ लेहून संतोषप्राविति करीत असावें उचित आहे यानंतर दाभोल सुभांचें सरदेशमुखीचें वृतिचा कजिया येथें पडिला कागदपत्राचें कारण लागलें नकला दाखविल्या असल दोन च्यार कागद दाखऊन पत्रें करून घ्यावीं इतक्यावर ठराव ठरल्यानंतर चिरंजीव राजश्री नारोबा नायक यांसी विशालगडास पाठविलें ते गेलें त्यांस नाना प्रकारच्या अडचणी दाखऊन कागदपत्र न

द्यावयाचें इतकें च लक्ष ऐसे असतां पुनरुक्त आम्हीं लिहिलें त्याचें प्रत्योत्तर आलें ते बरें च आहे आम्हांखेरीज सौ सगुणाबाईचा दुसरा अर्थ नाहीं म्हणोन लिहिलें तो हा च विचार कीं काय प्रसंगी अडचणीचे संधीत कार्य लागल्यास गुडघा (घा) लून ज्याचें कारण ते न देत येक्यभाव दाखविल्यानें जनामध्यें कैसा होऊन येतो लटकें मृगजलवत बोलणें मायावी बरें असो आपण संस्थानातील वडील माणुस वतनाच्या कडोविकडा कोणे री(ती)च्या यांचा अनुभव सर्व आपणास आहे यास्तव विनंति लि॥ आहे च्यार गोष्टी दूरदेसी चितांत सौ मातुश्री सगुणावहिनीस सांगोन कागद चिरंजीव राजश्री नारोबा नायक गेलें आहेत याजपासीं देवावें दाभोल सुभांचा कजियां कोणासीं आहे येथील प्रकार काय लिहावा श्रीने च लज्या रक्षिली आहे मातबर दरबारी वतनाचा कजिया मातबरानें सांगतां श्रम बहुत आहेत आपण सर्व जाणत आहेत म्हणोन लि॥ आहे प्रसंगी आपण आहेत आमचे कार्यासीं आपण सर्वातरयामीं श्रम करितील हा आमचा निश्चय आहे हें जाणोन चिरंजीव नानास पाठविलें आहेत लिहिल्याअन्वयें कार्य-सिधीतें पावविणार आपण आहेत तेथील कर्तव्यतेचा म(न)सबेयाचा प्रकार करणें आहे तो करावा च लागेल परंतु विचारे करू घडेल आज तागायत भाऊबंदीत दुजाभाव आहे हे कायावाच्यामनें करून आमच्या नाहीं तिक-डून प्रस्तुत दिसण्यात आला आहे तेव्हा त्याचे उपशमन ज्या रीतीनें घडेल तैसे घडवावें लागेल मनसबायाचे रीतीस तुम्ही चौघे आस राजकी(य) पुरुष आहा त्याचें बुधी(स) येईल त्याप्रमाणें कराल यदर्थी श्लोक

अनुबंधानुपेक्षेते सानुबंधेषु कर्मसु ॥
संप्रधार्य० ० ० ० न वेगेन समाचरेत् ॥
अनुबंधं च संप्रोक्तं वैपाकं चैव कर्मणां ॥
उत्थाय मात्मनश्चार्थं धीर कुर्वीत वा न वा ॥

मनसबेची रीत या तऱ्हेने केली पाहिजे सुज्ञाप्रति विशेष काय लिहिणें ॥ माघ शुध १ प्रतिपदा बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

मौजे दाभोळें व मौजे चाफवली या गांवांच्या खोतीहक्काबाबद

टीप—या वादांतील ले० २२ ते ३१ हे सर्व देवळे दप्तरांतील असून शेवटचा तेवढा अस्सल व बाकी सर्व नकला आहेत——स०.

ले० २२ श्री सोमवार ता० ६।१२।१७७३

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री

महिपतराव कृष्ण गोसावी यांस

सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ आर्बा सबैन मयां व आलफ राजश्री माहादाजी बलाळ दप्तरदार तावा देवळें ता॥ मार तालुकें रत्नागिरि येथें आपलें वतनाचें गांवीं श्री विठोबाचें देवालयाची जीर्णोधार करीत आहेत त्यास वेठबेगारी कारितां दोन गांव खोती सरकारतर्फेनें असावे याकरितां मौजे दाभोळे ता॥ मजकूर हा गांव बेवारीस कोणी वतनदार खोत नाहीं यामुळें सुभांहून नरहर गोविंद सरदेसाई कमावीस करीत आहेत तो गांव त्याजकडून दूर करून व मौजे चांफवली ता॥ मा॥र येथील कजियामुळें अमानत आहे तो गाव येकून दोन गावची खोती आपणाकडे करार करून द्यावी म्हणोन मारनिल्हें याणी विनंति केली त्याजवरून पेसजीचे मर्त्तेप्रमाणें सालमजकुरापासून सरकारांतून हरदू गांवची कमावीस मारनिल्हे याजकडे करार करून दिल्ही असें तरी मारनिल्हेचे तर्फेने कारकून येईल त्याचे दुमाला हरदू गांवची कमावीस करून सरकार-दस्ताची उगवणी मुलुकसिरस्त्याप्रमाणें दरसाल करून घेत जाणें वेठबेगारी नेहमी किलेहायेची शाकार व कारसाई व गला व चुडीवोड साला-बाद चालत आला असेल तो खेरीज करून वरकड सुभांकडील वगैरे वेठ-बेगार मारनिल्हे घेतील तुम्ही न घेणें जाणिजे छ २१ रमजांन बहुत काय लिहिणें मोर्तब

ले० २३ श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री महिपतराव सुभेदार स्वामीचे सेवेसी॥

पो॥ माहादाजी बलाळ सां॥ नमस्कार विनंति येथील कुशल जाणोन

स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष मौजे दाभोले व मौजे चाफवली ता। देवले येथील खोती बेवारीस म्हणोन सरकारची संनद आम्ही घेतली त्यास सदरहू गांवची खोती नरहर नायक सरदेसाई याची यास्तव त्याचे गांव त्यांणी करावे घालमेल करू नये येविसीं तीर्थस्वरूप कैलासवासी अंताजी-पंत दादा व चिरंजीव आबा याणी तुम्हांस पत्रें दिल्ही च आहेत संनदेचा शोध करितां सापडत नाहीं गैरविल्हेस लागली सांपडली असती तर सर-देसाई याचे हवाली केली असती पुढे मागें निघाल्यास ग़समू धरावयाची नाही सदरहू गावाविसीं आमचा कझ्या नाहीं सरदेसाई याचे गांव चालत आल्याप्रा। चालवावे बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति

पैवस्ता जेष्ट सुध ५ सन तिसा समानीन मया व आलफ शके १७१० कीलक नाम संवत्सरे (ता। ८ जून १७८८.)

ले० २४ श्रीभार्गव स. १७८८ते१८००.

श्रीमंत राजश्री——————पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी——————

विनंति सेवक महिपतराव कृष्ण मुकाम जंजिरे रत्नागिरि साष्टांग नम-स्कार विज्ञापना तागायत छ १२ जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीचें आज्ञापत्र सुभां सादर जाहालें तेथे आज्ञा जे मौजे दाभोलें ता। देवलें या गावची कमावीस नर-हर नाईक सरदेसाई तालुके खिलणा याजकडून गयाली गाव सबब दूर करून राजश्री माहादाजी बलाल दफ्तरदार हुजुर यांस सांगितली असे म्हणोन त्यास येथें मारनिल्हेचे पुत्र राजश्री विष्णु माहादेव कोकणांत लग्नाकरितां आले होते त्यांणी सरदेसाई यांजकडे बहुत काल गांव चालत आला असें जाणून आपण कमावीस न केली व सुभांहून चौकसी पाहतां सरकार आमलांत सुभांहून सरदेसाई यांस गांव सांगितला असे नाहीं पेसजीपासून बेवारसी गांव माहालचा जमीदारीचे इतालेयानें यांजकडे

लागोन खोती करीत आले आहेत येविसींचें वर्तमान सरदेसाई याणी हुजुर निवेदन केल्यावर आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

ले० २५ श्री रविवार ता० १५।६।१८०० इ.

अज स्वारी राजश्री मोरो अनंत व विठल नारायेण सुभेदार तालुके रत्नागिरि तारयान मौजे दाभोले ता देवले सु॥ ईहिदे मयातैन व अलफ राजश्री चिटकोवा नायक बिन बापूजी नायक सरदेसाई तालुके खिळणा व देशमुख ता मजकूर याणी सुभां विदित केले कीं मौजे मार येथील खोती वतनी आमची वडील परंपरागत अनभवीत आले असतां महादाजी बलाळ गुरुजी याणी संन आर्बा सबैनात गयाली खोतीचा सबब लाऊन जप्तीची सनद हुजुरून घेतली ते समई आमचे बोलणे पडोन गुरुजींचे पत्र माजी मामलेदार याचे नावें गाव सरदेसाई याचा वतनी जप्ती करू नये सनद गैरविल्हेस लागली सापडली असती तरी सरदेसाई याजवल परतोन दिल्ही असती म्हणोन आणिलें त्याजवरून गावची जप्ती जाहाली नाही सालमजकुरी पेसजीचे सनदेवरून जप्ती जाहाली आहे त्यास ज्याणी जप्तीची सनद घेतली त्याणीच मजकूर समजोन घेऊन सुभांस पत्र दिल्हें आहे जप्ती राहिली यैद्यास मनास आणून जप्तीची मोकलीक करून आमची वतनी खोती आम्हांकडे चालत आल्याप्रमाणें चालविली पाहिजे म्हणोन त्यावरून माहादाजी बलाल याणी पेसजी जप्तीची सनद घेतली त्याची तालीक व जप्ती करू नये म्हणोन माजी मामलेदार यास पत्र मारनिल्हेंनी दिल्हें तें पाहोन खोती वतनी सरदेसाई याची जाणोन जप्तीची मोकलीक करून सरदेसाई यास पूर्ववतप्रमाणें खोती चालवण्याची आज्ञा करून हे ताकीद सादर केली असे तरी सरदेसाई खोतीची वैवट करीत आल्याप्रमाणें करितील तुम्ही याचे रजातलबेत वर्तोन वसूल वासूल सरदेसाई याजकडे देत जाणें छ २१ मोहरम मोर्तब सुद——मोर्तब

ले० २६. श्री ता० १४।६।१८०१

राजश्री चिटकोबा नायक बिन बापूजी नायक उपनाम मावलंगकर गोत्र कौसिक सूत्र अस्वलायन सरदेसाई ता। खिळणा व देसाई ता। देवळे तालुके रत्नागिरि प्रांत राजापुर गोसावी यांस

छ सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सु॥ इसने मयातैन व आलफ तुम्ही सरसुभां पुण्याचे मुकामी विनंति केली कीं मौजे दाभोले तां देवले ता। मजकूर येथील खोती वतनी आमची वडिलोपार्जित अनुभव अविछिन्न करीत आहो सन आर्बा सबैनांत माहादाजी बलाल करकरे याणी मौजे मजकूरची खोती बेवार्शी येथील कमाविसी आपणाकडे सांगावी ह्मणोन गैरवाका समजाऊन महिपतराव कृष्ण माजी मामलेदार तालुके रत्नागिरि याचे नावे कैलासवासी दादासाहेब याची सनद घेतली ती आम्हास समजल्यावर आमचे चुलते नरहर नायक सरदेसाई याणी खोतीचे भोगवटियासंमधे दाखले व कागदपत्र माहादाजी बलाल यास दाखवून खोती बेवारसी नव्हे असी खातरजमा केली त्याजवरून करकरे याणी माजी मामलेदार यास मौजे मजकूरची खोती सरदेसाई याची त्याचा गाव त्याणी करावा वालमेल करू नये सनद गैरविल्हेस लागली सापडली असती तर सरदेसाई यांचे हवाली करितों पुढें निघाल्यास मसमू धरावयाची नाही सदरहू गावाविसी आमचा कज्या नाहीं सरदेसाई याचा गाव चालत आल्याप्रमाणें चालवावा ह्मणोन पत्रें दिल्ही आहेत त्याजवरून सुभाहून वालमेल जाहाली नाही आमचा गाव आम्हाकडे चालत आहे त्यास सालमजकुरी चिमणाजी सदाशिव करकरे याणी सरसुभा गैरवाका समजाऊन मौजे मजकूरचे जप्तीविसी संनदा घेतल्या आहेत अशास मागील भोगवटियाचे कागदपत्र होते ते घर दग्ध जाहाले त्यात काही जलाले परंतु पेशजीं माहादाजी बलाळ याणी मनास आणून आपण सनद घेतली ती गैरवाका मसमू धरावयाची नाही म्हणोन पत्र दिल्हे आहे ते पाहोन व खोतीचा भोगवटा आम्हाकडे चालत आहे हे मनास आणून करकरे याणी जप्तीच्या वगैरे संनदा घेतल्या आहेत त्या माघाऱ्या आणून वतनसंमधे काही जीवनमाफक सरकारात

नजर घेऊन भोगवटियास पत्रे करून दिल्ही पाहिजेत म्हणोन त्याजवरून मनास आणितां मौजे मजकूरचे खोतीचे वतनाचा भोगवटा तुम्हांकडे बहुत वर्षें चालत आला आहे तुमचे घर दग्ध जाहाले त्यात कांही कागद पत्र जलाले सन आर्बा सबैनात माहादाजी बलाल करकरे याणी मौजे मजकूरची खोती बेवार्षी असे समजाऊन आपले नावे कमाविसीची सनद घेतली होती तेव्हा तुमचे चुलते नरहर नायक सरदेसाई याणी आपले भोगवटियाचे दाखले समजाऊन खोती आपली म्हणोन खातरजमा करून दिल्ही त्याजवरून त्याणी आपली पत्रें महिपतराव कृष्ण माजी मामलेदार तालुके मजकूर यास दिल्ही ती तुम्ही आणून दाखविली ती पाहातां माहादाजी बलाल याची खातरजमा होऊन सनद घेतली ती मसमू धरावयांची नाहीं सदरहू गावाविसी आमचा कज्या नाही सरदेसाई याचा गाव चालत आल्याप्रमाणें चालवावा याअन्वये पत्रे आहेत त्याप्रमाणे खोती तुम्हाकडे चालत असतां सालमजकुरी चिमणाजी सदाशिव करकरे याणी सरसुभाच्या संनदा खोतीचे जप्तीविसी घेतल्या त्या गैरवाका सबब माघाऱ्यां आणविणे खोतीवतनसमधें तुमच्यापासून जीवनमाफक सरकारात नजर रुो ७५ पंच्याहातर घेऊन मौजे मजकूरचे खोतीचे वतन तुम्हाकडे चालत अल्याप्रमाणे करार करून देऊन हे सनद सादर केली असे तरी मौजे मजकूरची खोती व खोतीसंमधे मानपान कानूकायदे तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने वतन आनभऊन सरकार दस्ताची उगवणी मुलुका(चे) सिरस्तेप्रमाणे करून देऊन सुखरूप राहाणे जाणिजे छ २ सफर पाा हुजुर शिक्का

ले० २७

श्री· रविवार, ता० १४.६.१८०१

राजमान्य राजश्री गणेश कृष्ण कारकून

निा सरसुभा गोसावी यास

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधांन नमस्कार सुरुसन ईसने मयातैन व अलफ चिटकोबा नायक बिन बापूजी नायक सरदेसाई तां खिळणा व

देसाई ता। देवले तालुके रत्नागिरि याणी सरसुभां पुण्याचे मुकामी विनंति केली कीं मौजे चाफवली तालुके मा।र येथील खोतीचे वतन आमचे आम्हाकडे चालत असतां तुपट ऊर्फ चालका रयत मौजे मजकूर खोती आपलीं म्हणोन कजिया करीत होता त्याची मनसुबी हुजुर पेसजी रामशास्त्रीबाबा याजकडे पडिली तेथे चालक्याकडून पुरवणी जाहाली नाही आमचे कागदपत्र व साधनसूत्रे पाहून निवाडा केला त्यात खोतीचे वतन आमचे असे ठरोन सन सीत सबैनात आम्हापासून सरकारात नजर रु॥ अडीचशे घेऊन मनसुबीचा फडशा करून खोतीचे वतन आमचे आम्हाकडे चालते केले त्याप्रमाणे अनभव करीत असतां सालमजकूरी गणेश कृष्ण करकरे याणी चालका सरकारात न आला असतां आपणच आत्माजी तुपट ऊर्फ चालका याचे नावे मनमाने तसा गैरवाका समजाऊन मौजे मजकूरचे खोतीचे जप्तीविसी सनद घेतली आहे त्यास पेशजी निवाडा होऊन पत्रे दिल्ही आहेत ती पाहून जप्तीची सनद घेतली आहे ती माघारा आणवावयाची आज्ञा जाहाली पाहिजे ह्मणोन त्याजवरून येविसीचे मनास आणितां तुपट ऊर्फ चालका रयत मौजे मजकूरचे खोतीविसी खटला करीत होता त्यास पेशजी सरकारात मनसुबी पडोन सीत सबैनात महिपतराव कृष्ण माजी मामलेदार याचे नावे सरकारची पत्रे दिल्ही आहेत ती आणून दाखविली त्याजवरून आत्माजी चालका याणे गैरवाका समजाऊन मौजे मजकूरचे खोतीचे जप्तीविसी सनद घेतली होती ती माघारा आणऊन जप्ती मोकली करून हे पत्र सादर केले असे तरी खोतीची हे वैवाट करत आल्याप्रमाणे करितील तुम्ही दाखलगिरी न करणे जाणिजे छ॰२ सफर पा। हुजुर मोर्तब

... ...

* महादाजी बल्लाळ गुरुजी हे सरकार कामाबा। गुजराथेंत गायकवाड यांजकडे गेले होते; मागें त्यांचे बंधु आबाजी बल्लाळ करकरे यांनीं त्यांचे नांवें श्री॰ दादासो॥ याचे गडबडींत सन आर्बा सबैनांत गांवच्या खोतीची ताकीद घेतली हें वर्तमान चिटकोबा नायक यांसी समजाविलें तेव्हां नरहर नायकांनीं गुरुजीचे पुत्र विष्णु महादेव व वडील बंधु अंताजी

चह्लाळ यांची समजूत करून सनद मना करविली. परंतु सरकारची सनद मागें पुढें निघाल्यास वतनदारीस ठीक नाहीं याजकरितां सरकारचें फेरपत्र घ्यावें म्हणून नरहरी नायक पुण्यांत आले परंतु तेथें "दुखणेयास पडोन घरीं गेल्यावर शांत झाले" यामुळें फेरपत्र घ्यावयाचें राहिले तें घेण्यासाठीं पुण्यास येऊन चिटकोबानें पुढील सर्व खटपट केली.

यांतील चिटको ऊर्फ महादेव बापूजी देवळेकर हे (२७-२९-१०) व त्यांचे चुलते नरहर गोविंद हे (२७-२८-८) होत.

दाभोळें– देवरूखच्या दक्षिणेस ३ मैल.

चाफवली– ,, उत्तरेस २ मैल. —सं.

ले० २८ श्री शनिवार ता० २१।११।१८०१ ई.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री
दिनकर विश्वनाथ गोसावी यांसी—

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सु॥ इसन्ने मयातैन व आलफ राजश्री चिमणाजी सदाशिव करकरे कसबा देवले ता। रत्नागिरि याणी सरसुभा पुण्याचे मुकामी विनंति केली कीं मौजे दाभोले ता। मा।र हा गांव बेवारसी वतनदार खोत पुरातन नाहीं आपले वडिलानी बहुत दिवस खोती केली घरठिकाण आहे पुढें नातवानीमुळे वडील परागंदा जाहाले नंतर चांधे रीतीने कमावीस दुसऱ्यानी केली त्यानंतर आठल्ये ग्रामोपाध्ये याणी खोती केली असतां गोविंद नायक सरदेसाई याणी केली तेव्हां सन आर्बा सबैनात गाव गयाळी पूर्वी करकरे याणी खोती केली घरठिकाण गांवी आहे म्हणोन हुजुरून खोतीची सनद घेतली असतां सरदेसाई याणी मामलेदाराकडून कमावीस चालविली आहे त्यास गांवास वारिसदार कोणी नाहीं यास्तव गांवची वैवाट आम्हांकडे सांगितली पाहिजे म्हणोन त्यावरून मौजे मजकूर येथे वतनदार खोत नाहीं पेशजी करकरे याजकडे खोती चालत होती आलीकडे सरदेसाई करीत आहेत त्यास गांव बेवारसी सबब खोतीची जप्ती करून जप्तीचे काम चिमणाजी सदासिव याजकडे सरसुभांहून सांगोन

हे सनद तुम्हास सादर केली असे तरी मशारनिल्हे मौजे मजकूरची वैवट करितील याजपासून सरकार दस्ताची उगवणी जमाबंदीप्रमाणे तालुके मजकुरी करून घेऊन कसरेचा ऐवज सरसुभां देत जातील जाणिजे छ १४ रजब पा। हुजुर——मोर्तब.

ले० २९ श्री गुरुवार ता० १७।१२।१८०१ ई.

रोखा राजश्री गणेश कृष्ण नि॥ सरसुभा तारयानी मौजे चाफवली ता। देवळे ता। रत्नागिरि सु॥ इसने मयातैन व आलफ मौजे मारचे खोतीचा कजिया चालके व सरदेसाई याचा आहे त्याबद्दल सरसुभाहून खोतीची जप्ती होऊन कमावीस आम्हाकडे सांगितली आहे तरी सालमजकुरचा वसूल सरदेसाई याजकडे न देणें मागाहून कारकून येईल त्याजपासी रुजू होऊन गावची कची वैवट समजाऊन देणे जाणिजे छ १० शाबान मोर्तब सुद

टीप—याच तारीखमजकुरचा रोखा मौजे दाभोळें गांवास आहे—सं०.

ले. ३०. स. १८००।१८०१.

या वादांतील एक अर्धें मुर्धें मिळालेलें पत्र.

न सेरणी रुपये ३५० साडे तीनसें घेऊन वतनपत्र करून दिल्हे त्यापासून खोतीचा भोगवटा अविछिन्न आम्हाकडे चालत आला आलीकडे सरकार आमलात प्रथम खंडोजी माणकर याची चिठी खोतीविसी तुपट ऊर्फ चालका याणे घेतली होती त्यावरी सर्व च आम्ही जाऊन आपले वृत त्याजला समजाऊन खोतीची चिठी आम्ही आणिली आणि पूर्ववतप्रों खोती करीत आलो त्याजवर संन समान सितैनामध्ये गावचे कुणबी सुभां रत्नागिरीस फिर्याद जाहाले की सरदेसाई आम्हावर जलल करितात म्हणोन त्यावरी सुभांहून गावचे देखरेखीस कांही दिवस प्यादा ठेविला होता त्यावर रयत चालका रयत मौजे मारचा हुजुर येऊन खोती अमानत करविली आहे तरी प्रतिनिधीनी वतनपत्रें करून दिल्ही आहेत ती व

सुभांहून प्यादा देखरेखीस ठेविला होता तेव्हा सुभांहून चिठी आली आहे ती मनास आणून आज्ञा करावी म्हणोन विनंति केली याजवरून मनास आणितां अमानतीचें पत्र हुजुरून संन इहिदे सबैनात रयताची मालुमत लाऊन चालक्याने नेली की खोतीविसी कजिया सरदेसाई व चालके याचा लागला आहे यामुले आम्ही सुभां फिर्याद जाहालो तेव्हा खोती सुभांहून अमानत जाहाली उपरांत सरदेसाई रत्नागिरीस जाऊन मोकलिकेचा विचार करू लागले तेव्हा चालका व आम्ही सरसुभां जाऊन मोकलीक होऊ दिल्ही नाहीं हाली नरहर नाईक सुभां घालमेल करितात येविसी आज्ञा जाहाली पाहिजे याप्रो। विनंति करून खोती मोकली न कर्णे म्हणोन पत्र नेले याचा दाखला सुभांची चिठी संमान तिसैनातील सरदेसाई याणी दाखविली त्याजवरून पाहातां चालक्याचे कजियामुले खोती अमानत जाहाली नाही सरदेसाई जलल करितात यामुले रयतानीं फिर्याद केली यास्तव देखरेखीस प्यादा सुभांहून ठेविला होता यामुले मुलीच मालुमत सांगितली ती खोटी दिसल्ये व चालक्याने हुजुर करार केला होता की आपली खोती येविसी दाखल्याचे कागद च्यार महिन्याने कोठे असतील तर शोध करून आणून दाखवितो त्यास तीन वर्षे होत आली परंतु कागदपत्र आणून चालक्याने दाखविले नाहीं त्याची पुरसीस चालक्याला करिता त्याणे सांगितले की कागदपत्र आपणापासी नाही व कोणाजवळ आहेत यैसे ही आपल्यास दखल नाहीत तेव्हा चालक्याचे प्रमाण कायधरावे प्रतिनिधीचे पत्र किले विशालगडचे सन इहिदे खमसैनातील व महिमतगडचे मुकामीचे सन ईसने खमसैनातील येकून दोन पत्रे सरदेसाई याजवल आहेत संसवासें वर्षे आधेकरी खोती करीत आले यैसे लिहिले आहे व सरदेसाई याणी सदरहू वतनपत्रे करून घेतल्यावर सरकार अमलपर्यंत निर्वेद भोगवटा सरदेसाई घेत आहेत चालक्याने कधी कजिया केला नाही तेव्हा चालक्याची खोती असे कशावरून म्हणावे त्याजवरून खोतीचे वतन अमानत आहे ते मोकले करून हे पत्र सादर केले असे तर मौजे मजकूरची खोतीचे वतन पूर्ववत चालत आल्याप्रो। नरहर नाईक सरदेसाई

याकडे चालवणे या पत्राची प्रत लिहून घेऊन असलपत्र सरदेसाई याजवल देणे म्हणोन त्याजवरून साल गु॥ मौजे मजकुरचे खोतीविसीचा हुजुर फडशा होऊन माजी मामलेदार याचे नावे पत्रे सादर जाहाली परतु तोतयाच्या दंग्यामुले पत्रे आणून सुभा दाखविली नाहीत यास्तव मौजे मजकूरचे खोतीचे वतन तुमचे स्वाधीन न जाहाले साल गु॥ पत्रे हुजुरची जाहाली ते हाली सुभां आणून दाखविली त्यास हुजूर निवांड होऊन पत्रे जाहाली त्याप्रो॥ मौजे मजकूरची खोतीचे वतन पूर्ववत चालत आल्याप्रो॥ तुमचे स्वाधीन केले असे————

ता. २२ आगस्ट १८०२ किंवा ता. ११ आगस्ट १८०३ इ०.

ले० ३१ श्रीशंकर प्रां

राजश्रियां विराजित राजमान्य राजश्री गोविंदपंत पोंक्षे स्वामीचे सेवसीं

पो॥ खंडेराव नीलकंठ रास्ते सा॥ नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असीले पो॥ विशेष मौजे दाभोले व मौजे चाफवली ता॥ देवले तालुके रत्नागिरि या दोन गांवचे खोतीची जप्ती गु॥ सरसुभांहून होऊन कमावीस रा॥ गणेश कृष्ण करकरे यास सागितली होती त्यास राजश्री चिटकोबा नाईक सरदेसाई तालुके खिलणा व देसाई ता॥ देवले तालुके सा॥र यांणीं दोनी गांव आपले खोतीचे वतनी याची साधनसूत्रे आणून दाखविली त्याजवरून जप्तीची मोकलीक होऊन सरसुभांचीं पत्रें सरदेसाई याणी करून घेतली आहेत यैशास हरदू गावचे जप्तीच्या सनदा व करकरे याणी घरांविसी सनद गैरवाका समजाऊन घेतली ते माघाऱ्या आणवाव्या यैसे ठरोन पेशजी तुम्हास पत्र गेले असतां आद्यापि आल्या नाहीत याजकरितां हाली हे पत्र तुम्हास लि॥ आहे तरी दाभोले व चाफवली या दोनी गावचे जप्तीच्या व दाभोले येथील घराविसी करकरे यांणीं सनदा नेल्या आहेत त्या माघाऱ्या आणऊन व दाभोले येथे कसरीबाबत हजार रुपयाची वरात जाहाली होती ते गैरवाका सबब गैरआदा जाहाली पो॥ यास्तव ती वरात येकूण सदरहू लिं॥

प्रा सनदा व पत्रे माघारी घेऊन सरसुभां पा द्यावी सरदेसाई याचा जावसाल सरसुभां होऊन सनदा व पत्रे गेली च आहेत त्याप्रमाणें चालवावें तुम्हाकडून हरयेकविसी मारनिल्हेस उपद्रव लागो देऊ नये रा छ २२ राकर बहुत काये लिहिणे हे विनंति.

मौजे मुचरी येथील खोतीचा वाद.

ले. ३२. (प्रभा० दप्तर) श्री ता. २६-१२-१७८४ ई.

राजश्री प्रल्हाद नायक बिन गणोबा नायक व सदाशिव नायक बिन दादोबा नायक सरदेशाई मामले प्रभावली व सुभा दाभोल व देसाई ता संगमेश्वर व कोंडिवरें गो यांस ——

छ अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य——

सेवक आबाजी राऊ कृष्ण प्रतिनिधि नमस्कार सु सन ११८४ तुम्ही किले विशाळगडचे मुकामीं हुजुर येऊन विनंति केली कीं मौजे मुचरी ता संगमेश्वर येथील पुरातन वतनी खोती आपली आपले वडील वंशपरंपरेने अणभवित आले असतां आलीकडे कोंकण प्रांती अंगारकावर मसलतीस पुण्याहून खंडोजी माणकर आले ते संधीत सुभानराव सुर्वे रयेत मौजे मजकूर हे माणकराजवल चाकरीस होते त्या आश्रयाने गावांत कजिया केला आणि मोराजी सिंदे याजकडे रत्नागिरीस फिर्याद होऊन खोतीचे वतन अमानत करविलें परंतु सरकार तर्फेने खोतीचे वतन पुरातन प्रा आंमचे आह्माकडे चालत आलें त्यास कैलासवासी आपाजीराऊ पंडित प्रतिनिधि यांजपासी गंगाजीराव खानविलकर पेश होते त्याणी विनंति करून सुर्वे आपले गोत्रज या अन्वयें त्यांचा अभिमान धरून बिठोजीराव व गोविंदराव व धोंडजीराव सुर्वे रयेत मौजे मजकूर यांस आणून सरकारांत उभे केले आणि गैरवाका समजाऊन रुपये देऊन सन सीत सितैनांत छ २१ जिल्कादचीं (१-मे-१७६६ ई.) मौजे मजकूरचे खोतीचीं पत्रें करून घेतलीं त्याजवर चहू महिनेयानी आपले भाऊ नारोबा नायक बिन केशव नायक यांणी हुजुर येऊन विनंति केली कीं मौजे मार हा गांव वतनी

खोतीचा आपला आपणाकडे पुरातन चालत असतां सुर्वे याणी सरकारांत गैरवाका समजाविला त्यामुळें आमचें वृत्त कांहींच मनास न आणितां त्यांस पत्रें करून दिलीं यैसियास स्वामीनी कृपाळु होऊन आमचे वृत्त मनास आणऊन न्याय करावा म्हणोन त्यावरोन विठोजीराव व गोविंदराव सुर्वे यांस बोलावून आणून आज्ञा केली जे तुम्ही पत्रें करून घेतलीं आहा त्यास हालीं सरदेशाई खोतीच्या वादास उभे राहिले आहेत तुम्हीं उभे राहून न्यायाचा फडशा करून घेणें त्यावर नारोबा नायेक यांणीं कतबा छ १५ रा।खर सन सबां सितैनात लेहून दिल्हा जे खोती पुरातन आपली खरी खरी करून देऊं व सुर्वे यांणी हि छ १९ रा।खर सन मजकुरी सदरहूप्रा कतबा लेहून दिल्हा त्याजवरून सुर्वे यांजकडे खोती होती ते दूर करून अमानत केली आणि कमाविषी रामचंद्र बहिरव हवालदार ता। संगमेश्वर यांस सांगितली पुडें मनसुबी करावी तों आपाजीराऊ पंडित यांस कैलासवास जाहाला त्या गडबडेंत हवालदार यांस सुर्वे मिळोन गांवची वैवट चालऊ लागले आणि सरकारांत गैरहजीर होऊन पुणेयास गेले तेथें त्यांची व आमची मनसुबी राजश्री पंत प्रधान यांणी नेमून देऊन कागद कतबे घेतले चौकशी करितां सुर्वे यांणी लेहून दिल्हे कीं आपणाजवळ कागदपत्र नाहींत गांवचे सडीदार यांच्या साक्ष्या घेऊन न्याय करावा त्याप्रमाणे आपण मान्य म्हणोन लेहून दिल्हें त्याजवरून मजरे मठ धामापुर ता। देवरूख येथे श्री सोमेश्वर याचे देवालई गांवकरी वगैरे सडीदार यांस आणून सक्ष्या घेतल्या त्यावरून न्यायाचा निवाडा केला मनसुबीमुळें सुर्वे खोतीच्या वादास खोटे पडिले आमचा गांव वतनी खोती पुरातन यैसें ठरलें त्याप्रमाणे खोतीचें वतन आमचे आम्हाकडे करार करून देऊन निवाडपत्र वगैरे पत्रें भोगवटियास सन समान सबैनांत करून दिलीं त्याप्रमाणे त्या तर्फेने वतनाचा भोगवटा घेत आहों ये तर्फेनें आमचा गांव आम्हाकडे चालवावा म्हणोन सन समास सबैनांत विनंति केली त्यावरून सुर्वे यांजकडील खोती अमानत जाहाली असतां मामलेदार यांच्या अनुमतें वैवट करीत होते ते दूर करून अमानतेची कमावीस बाळाजी विठल पेंढरकर यांस सांगितली त्यापासून आज

पावेतो कमाविसी त्यांजकडे चालत आहे सुर्वे यासी येक दोन बोलावणी जाहालीं असतां आले नाही याजकरितां स्वामींनी कृपाळु होऊन पुरातन वृत मनास आणून पुणेयांत फडशा होऊन निवाडपत्र वगैरे पत्रें करून दिल्ही आहेत तीं पाहोन आमचे खोतीचा गांव आम्हाकडे करार करून देऊन भोगवटियास पत्रें करून द्यावीं म्हणोन त्यावरून मनास आणितां मौजे मुचरी हा गांव पुरातन वतनी खोती तुमचा तुमचे वडील परंपरागत अणभवित आले असतां आलीकडे सुर्वे यांणी कजिया करून तिकडील तर्फेनें तुम्हांकडे चालत असतां कैलासवासी आपाजीराऊ पंडित यांचे कारकीर्दींत गंगाजीराव खानवलिकर यांणी सुर्वे यांस उभे करून आपल्या भिडेनें पत्रें करून देविलीं त्यावर नारोबा नायक सरदेशाई यांणी विनंति करून मनसुबी करावी म्हणोन सरकारांत कतबे दिल्हे त्यावर सुर्वे यांजकडून खोती दूर करून छ १३ जा।खर सन सबां सितैनांत रामचंद्र बाहिरव याजकडे अमानतेची वैवट सांगितली उपरांत मनसुबी व्हावी तों आपाजीराव यांस कैलासवास जाहाला त्या गडबडेंत दाहा वर्षे रामचंद्र भैरी याचे अनुमतें सुर्वे यांणी गांवात वैवट केली आणि इकडे न येतां गैरहाजिर होऊन पुण्यास गेले तेथे त्यांची व तुमची मनसुबी राजश्री—प्रधान पंत याजकडे होऊन सन समान सबैनांत फडशा जाहाला सुर्वे खोतीच्या वादास खोटे पडिले तुम्ही खरे जाहालां त्याप्रमाणें निवाडपत्र वगैरे पत्रें करून दिलीं ती तुम्ही आणून दाखविलीं ते पाहोन तुम्हावर कृपाळु होऊन मौजे मजकूरची खोती तुमची तुम्हास करार करून देऊन भोगवटियास पत्रें करून देऊन तुम्हास हें आज्ञापत्र सादर केले असे तरी तुम्हीं मौजे मा।रचे खोती व खोतीचे वतन संमधे मानपान कानुकायेदे पुरातन चालत आले असतील त्याप्रमाणे घेऊन खोतीचें वतन तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अणभऊन सुखरूप राहाणे मौजे मा।रचे खोतीचीं पत्रें पेशजी सन सीत सितैनांत बारांसे रुपये सरकारांत देऊन सुर्वे यांणी करून घेतलीं त्याजवर तुम्हीं वादास उभे राहिलां सुर्वे यांस वादास उभे राहाणे म्हणऊन आज्ञा जाहालीं असतां पुण्यास गेले तेथे न्याय होऊन सुर्वे वादास खोटे पाडिले तुम्ही खरे

१२

जाहालां सबब त्यांजपासून पेशजीं सदरहू बारासे रुपये घेतले आहेत ते गुन्हेगारीच्या यैवजांत सुर्वे यांस मजुरां देविले जातील सुर्वे याजपासी पत्रें आहेत तीं रद असत तुम्हीं खोतीचे वादास खरे जाहाला सबब सरकारांत हर्की रुो ७०० सातसे घेतले ते जमा पोतां असेत छ १ सफर निदेश समक्ष

मोर्तब राजते ले

खनावधि

टीप—याच तारखेचीं व मजकुराचीं इतर आज्ञापत्रें बहिवाटीप्रों आहेत.

... ...

मुचरी गांवच्या खोतकीच्या सदरच्या वादाचा निवाडा माधवराव नारायण पंत प्रधान (सवाई माधवराव पेशवे) यांनीं ता। ३ फेब्रुआरी सन १७७८ इसवी (शके १६९९ हेमलंबी संवत्सरीं) रोजीं प्रल्हाद गणोबा व सदाशिव दादोबा यांचे तर्फे दिला त्याची नक्कल दप्तरीं मिळाली तिचे पाठपोट भरलेले बंद ३१ आहेत. त्यांतून कांहीं उतारे येथें देत आहों. ते सामान्य वाचकांस सुद्धां मनोरंजक वाटतील, कांहीं नवीन माहिती हि त्यांतून मिळेल—सं.

(१) सरदेसायांची कैफीयत दादोबा सदाशिव नायकांनीं दिल्याचा तेथील शब्दांनींच च सारांश—

"आपल्या ज्या वडिलानें देशमुखीचें वतन मेलविलें त्यानें च मौजे मुचरी गांव उज्याड होता तेथील पाट पाणी काढून गांवची वसाहात करून मूळ गावांत घर बांधोन राहिले, बाग लाविला, रयता आणून गांव माहसुरा करून दिवाणांतून इनाम घेतला व खोती सुधां सर्व अधिकार गांव मोंगलाई अमलांत होता तोंपर्यंत चालिला. कै० थोरले शिवाजी माहाराज छत्रपति यांचा अंमल त्या प्रांतीं जाहाल्यावरी इनाम दूर जाहाला. तळ्यानजीक ठिकाण व बाग व तळ्याचे व शेटीचे सेत याप्रों आमचें खासगत आहे. वाड्याजवळ तळी खणोन पाणी केलें, रयता आणिल्या त्यापैकीं सुर्वा आहे. खंडोजी माणकराच्या वगीनें सुर्व्यांनी खोतीविसी कजिया केला पुढें मोराजी शिंद्यांकडून गांव अमानत करविला. या मागें खोतीकरितां त्याणें कजिया

कधीं केला नाहीं. आमच्या वडिलांचे चुलते विसोवा नायक यांच्या कुटुंबाच्या वेगमीस धामापुर व मुचरी हे गांव व कुंभारखाणी व वेसराड येथील वाडे निराळे तोडून दिले होते त्याप्रमाणें विसोवा वेंसरडांत घर बांधून राहिले होते तो घरवंद तेथें आहे. मौजे मारच्या गुरवाचें नकल झालें तेव्हां सुर्व्यांस देवसकीचें व देवावर पाणी घालण्याचें काम आमचे वडिलांही सांगितले व कुर्णावयांत त्यास वडीलकी दिल्ही. आमचे तर्फेनें गांवचे कारभारास ठेवलेल्या बहुत जणांपैकीं बाबाजी नारायण हालीं आहेत त्यांणी बहुत दिवस लिहिणेंसुधां काम चालविलें (लें आहे). मौजे मारचें उपाध्यपण पित्रे यांस आमच्या वडिलांही दिल्हें आहे. श्रिंगारपुरकर राजे यांस हा गांव सरंजाम नव्हता तेव्हां त्यांजकडून मालोजी सुर्व्यांस मुकासा कोठून असावा? खोतीसंमधें मानपान त्यास कधीं पावला नाहीं. देवळांत सुर्व्यांचा खांब आहे नाहीं माहीत नाहीं. खोतींत वडील गणोवा नायक व रंगोवा नायक व सुर्वे यांचा वांटा चालत होता हें अप्रमाण. संगमेश्वर माहालचे जाहगीरदार चाळकेमवासगिरी करीत म्हणोन पादशाहानीं त्यास मारून काहाडिलें. ते असतां च आमचे वडिलांचा व त्यांचा पेच पडिला. ते समई आमचे वडील संगमेश्वरीं च देशमुखी करून होते. आम्हांखेरीज दुसरा देशमुख कोणी नाहीं. खोतीसमंधें देवाची पालखी, होळीची पूजा व जागराचें पोवतें हे मान आधीं आम्हांकडे चालतात व देवाची साईकसावज पडतें त्याचें उजवे फलें खोतकीचें आमचे चाकर घेतात. येविसीचे साक्षीदार आमचे व सुर्वे याचे मान्यतेचे यादीस लेहून दिले आहेत त्यांचे मुखें खरें करून देऊं. साक्षी घ्यावयास हुजुरून कारकून पाठवावा तो साक्षी लेहून घेऊन आणील त्यास आम्हीं मान्य असों."

(२) सुभानजी सुर्वे यांची कैफीयत सारांशानें कीं—

"हा गांव पुरातन मिरास आपला. खोतीचें वतन वंशपरंपरागत आपलें. ईदलशाहींत वडील मानजीराव सुर्वे श्रिंगारपुरीं चाकरीस होते त्यावेळीं गांव कुळारगी होता, जमाबंदी ठरत होती व सुर्वे यांस वेतन पावत असें. त्यापूर्वीं खोती वडील जोमाजीराव करीत होते. कै० शिवाजी

माहाराजांचे समईं श्रिंगारपुरकर राजे परागंदा जाहाल्यावर मानाजीराव खोती करून होते त्यांस माहाराजांनी धरून नेऊन कांगोरीस बंदीं घातलें. तीन वर्षें गांव उज्याड होता. सुटून आल्यावर मानाजीराव गांव भरून खोती चालऊन होते. नातवानीमुळें गणोबा नायक रंगोबा नायक यांस खोतीचा वांटा निमे त्यांनी दिला. देसाई यांनी खोती ५।७ वर्षें निमी चालविली; मानपान वेठ बेगार वगैरे मानाजीराव घेत. ते मृत्य पावल्यानंतर त्यांची बायको येसावानें २।३ वर्षे खोती चालविल्याउपरांत तिचा पुत्र येशवंतराव याजला माहाराजानी किले रामसेन येथील सरनोबती दूर करून सारंगगडचा हवाला दिला त्यावेळीं सरदेसाई सारीच खोती करूं लागले; परंतु मानपान वेठबेगार येसावाकडे चालत. पुढें भालेराईंत गांवचे हिसेबाकितेबचा रुमाल सरदेसायांनी मागोन घेतला तो त्याजकडे राहिला. येसावाचे मृत्यूनंतर येशवंतराव सारंगगडाहून मुलांमाणसांसुधां कुडाळ प्रांतास गेले. त्यांस पंडित आमात्यानी भिवगडची सरनोबती सांगितली. आमचा गांवीं कोणी नाहीं ही संध पाहून सरदेसायांनी देवाचे तळीवर घराचा चवथरा बांधोन घर बांधिलें. यावर येशवंतरावाचा पुत्र बाबाजीराव आला त्यास देसायांनी सांगितलें कीं माहालचा इजारा आम्हीं केला तुजला खोती करावयासी प्रयोजन नाहीं तूं कुणबावा करून राहाणें त्याजवरून कै० बहिरोपंत पिंगळे व गंगाधर पंडित प्रतिनिधि यांजजवळ बाबाजीरावानें खोतीविसीं कजिया मांडिला. आपा प्रतिनिधींनीं गणोबास गांव सुव्यांचा तुम्हीं काजिया न करणें म्हणून सांगितलें. अंजणवेलीस दादोबानायक होते त्यांणी हें ऐकोन हपसी याचे बोलावणे बाबाजीस करून तिकडे नेलें. तेथें बाळकृष्णजी व बाळाजी विठल व नारोबा नाईक तांबे व येशवंतराव चव्हाण, कोकणराव देसाई पाटपन्हाळेकर यांणी सांगितलें जे नायकांची भीड भारी आहे तुम्हीं आपल्या घरास जाणें. हें ऐकोन तेथून येऊन बाहेरले गांवीं वस्ती करून राहिले व खोतीचे मानपान, वेठबेगार घेत. गांवांत जाऊन खोती करून राहावें तर देसायांची तीहीं दरबारी वग समर्थ, उपाय नाहीं. आपले घरबंदावरी घर बांधावयासी चिरे काढिले, पाया घालावा तों विशाळगडीं अंतोबा

नायक सरदेसाई होते त्यांणी धरून नेऊन मारहाण करून फार हाल केले तेव्हां बावाजीराव सातारियास प्रतिनिधीकडे जाऊन बाळाजीरावाचा जीव मात्र सोडविला. तुळाजी आंग्र्यांनी वतनदारांपासून खोत खंड घेतले समई आम्हांस बोलावणें जाहालें होतें परंतु देसायांचे गुमस्ते पुरंदर नारायण आंग्र्यांजवळ होते त्यांणी सुर्वे पेशव्यांचे चाकर त्यांस चाकरीस ठेऊं नये खोतखंड व मोकासबाबेची चाकरी आम्हांपासून घ्यावी असें सांगितल्यावर तो मजकूर राहिला. ग्रामदेवीचे देवळांत आमचा पाषाणी खांब आहे त्यास आम्हीं गांवीं नसल्यास आमचा मान देतात. पूर्वीं ताा मारचे देसाई चाळके होते त्यांणी डोंगरावरी किल्ला बांधोन विहीर पाडिली तिजला पाणी न पडे याजकरितां आमच्या वडिलापासीं चाकरीस म्हार होता त्यास त्यांनी दाणीस दिला उपरांत पाणी लागलें. त्या म्हाराच्या मुलास म्हारकीचें निमें वतन दिलें तें चालत आहे. वतनदार गुरवाचा नकल जाहाल्यावर बाधेकरी गुरव पूजा करून गांवची पुंज घेत. आलीकडे नांगलेकर कुणबी वतनदार तो गुरवकी करीत आला; त्याणें पुंज घेतली नाहीं. देसायांच्या घराच्या पश्चिमेस बाग आहे तो सरकारचा परंतु कोणत्या हकीमानें केला तो ठाऊक नाही. पूर्वीं बागेचें उत्पन्न श्रिंगारपुरकर नेत. आमचें उपाध्येपण पूर्वीं कोण चालवीत हें न कळे आलीकडे पित्रे चालवितात. संभाजी महाराजांचे वेळीं देसायांनी आपले आप्त सप्रे गांवांत आणून ठेविले. देशमुखांचें ठिकाण अगर शेत गांवांत नाहीं; गुरवाचे पाट पाणी नाहीं. माहादेवाची स्थापना आमच्या वाडिलांनी केली; जीर्णोधार सप्र्यांनी केला. कुलकर्णी होता तो श्रिंगारपुरकरांचे कारकीर्दीत मोडोन गेला. आलीकडे बाबाजीपंताचे बापानें चालविलें. तो वतनदार कीं कसें न कळे. रामराव बावाजीचे वेळेस देसायांनी आपला तक्षिमदार कोंड वेसराड येथें ठेविल्यापासून कोंड निराळा जाहाला. तळ्याच्या पूर्वेस शेत आहे तें वतनी आमचें. वरगळ कोंडांत देसायांनी सप्र्यांस आणून ठेविलें; किती वर्षें जालीं न कळें. चाळके देशमुखांपासून देशमुखीचा हक्क आमचे वडिलांनी माफ करून घेतला. देशकुलकर्णी व सरदेशकुलकर्णी यांचा

हक पावत होता. आलीकडे देतात किंवा नाहीं न कळे. घोटीलच्या कोंडांत पाट आहे तो तेथील ज्या ब्राह्मणानें आपल्या दारांत नेला त्याचें किंवा त्याच्या वंशजांचें नांव ठाऊक नाहीं. ज्या भागीं पूर्वीं सुखवस्तु ब्राह्मण होते त्यास ब्राह्मण वाडार म्हणतात; तत्पूर्वीं वतनदार कुणबी होते; त्यापैकीं वांवेटकर, नागलेकर, खाड्या, रामाणी, आगऱ्या, व सोळिक्या आहेत. याखेरीज मोऱ्या मराठा आहे त्यास आमचे वडिलांनीं मिरासदार करून ठेविला आहे. आणखी कुणबी आहेत ते किती दिवसांचे, कोणी आणून ठेविले हे न कळे. येशवंतरावाचा पुत्र शंकराजीराव, त्याचा यादवराव, त्याचा भिकाजीराव; त्यास पुत्र तीन; धाकट्या केशवरावाचे नकल; वडील मालजीराव यांच्या वंशाचे हालीं अंतोजीराव आहेत. मधील विठोजीराव; त्यांचे पुत्र संभाजीराव व त्याचे हालीं आपण सुभानराव; अशी वंशावळ ठाऊक आहे. हें लेहून दिलेलें साक्षीमुखें खरें करून देऊं. साक्षी घेण्यास हुजुरून कारकून पाठवावा. साक्षीदारास क्रियेचा नेम नाहीं; त्या साक्षीस आपण राजी असों. याखेरीज अधिक लेहून द्यावयाचें राहिलें नाहीं. कागदपत्र आपणांजवळ नाहीं."

(३) मनसुबीच्या ठरावाप्रों वर्तावें येविसीं हरदूजणानी जामीन दिले ते सरदेसायांबद्दल—माहादाजी नीलकंठ देसाई, ता। लांजे,
सुर्व्यांबद्दल—गोपाळराव खानविलकर, खोत मौजे खानवली.

(४) पुराव्याचे कागदावििा—"कागद गणोबा नायकांजवळ होते ते रोजगारास ह्मणोन गेले त्याचे ठिकाण नाहीं. त्याचे स्त्रीजवळ पुसिलें तिणें कागदपत्र कोठें ठेविले तें आपणास दखल नाहींत यैसें सांगितलें" ह्मणोन तुह्मी उत्तर केलें

(५) "साक्षिदाराचे मान्यतेची याद दिल्ही त्याच्या साक्षी लेहून घ्यावयास उभयतांचे रजावंदीनें कारकून वेंकाजी सावजी अथणीकर हुजुरून नेमिला त्याणे व सुभांचा कारकून रामाजी सिवदेव यांणी श्री सोमेश्वर मठ धामापुर येथें साक्षी लेहून घेतल्या त्या व पेशजी सुभा रत्नागिरीस घेतल्या त्या हुजुर आल्या त्याची नांवनिसी बिता।"

(६) अ. सिव धडे—साक्षीदार २९-परमाहालचे ४ व ता। मारचे २५ (प्रत्येकाचे नांव, उमर वर्षे, राहण्याचें ठिकाण आणि धंदा दिलेला आहे व तसें पुढील सर्व साक्षीदारांच्या बावतींत केलेलें आहे).

ब. रयत साक्षीदार मौजें मजकूर २४—गांवकरी १८ व वाडा वेंसराडचे ६

क. नारो केशव सरदेशकुलकर्णी मा. प्रभावली-श्रीसतेश्वर देवळांत घेतली.

येकूण ——तेरीज विद्यमान वेंकाजी सावजी ५४.

ड. चिसणाजी कृष्ण गानु खोत मौजे कलवस्तें उमर वर्षे — यांची साक्ष हुजुर श्रीनागेस्वर का। पुणें येथें घेतली

येकूण —— तेरीज येकांदर ५५.

इ. सुभा रत्नागिरि येथें संन तिसा खमसैनांत सामलेदारानी गावकरी यांच्या साक्षी लेहून घेतल्या आसामी १२ पौ वजा हालीचे साक्षींत आले आहेत आसामी सात बाकी आ ॥ ५

येकूण ——तेरीज येकांदर आसामी ४८ नूतन, ७ हाली व पेशजीचे, व ५ सुम्यास जाहाल्या पैकी हालीत न आलेले, येकूण—— ६०

पैकीं वजा "कांहीं ठाऊक नाहीं" ह्मणणारे असामी ५

(७) बाकी ५५ साक्षींतील अन्वय ——

वतनी खोती सरदेसाई यांची म्हणोन २२ पैकीं पेशजी सुभा साक्षी जाहाल्या त्यांत पूर्वीचे आपणास काही ठाऊक नाहीं यैसे येसा बेटकर व गंगा हज्याम याच्या लिहिल्यांत आहे व बाळका भोंसला याच्या लिहिल्यांत भालेराईपासून सरदेसाई करितात म्हणोन

खोती देसाई यांची म्हणोन आ॥ ४ पौ माणका तेली याणें पुरातन म्हणोन व जाना माहार याणें पूर्वीं कुणबावे होते म्हणोन ८

कुणबावे होते ते वेळेस खोती व कारभार सरदेसाई करीत म्हणोन २ पैकीं येकाचे साक्षीत सरदेसाई याणी कुलकर्णी यास आपल्या तर्फेनें कमाविसीवर ठेविला होता म्हणोन १

सरदेसाई या खेरीज खोती दुसरियाणें कोणी केली अगर सुर्वे याणें केली यैसें यैकिले नाहीं म्हणोन आ॥ १०

या मागें वतनी कोणाची हें न कळें म्हणोन व आपले जाणोपरी खोती देसाई करितात यैसें कृष्णा परीट याचे साक्षीत १

खोती शब्द जाहल्यापासून सरदेसाई करित आले म्हणोन आ।। ३

सरदेसाई खोती चालवीत परंतु वतनी किंवा बाधेरीतीनें ठाऊक नाहीं म्हणोन २

खोती सरदेसाई करीत आले म्हणोन ११

पौ चिमणाजी कृष्णाचे साक्षीत थोरले सिवाजीमाहाराज यांचे कारकीर्दीपासून करीत आले म्हणोन व मालोजी सुर्वे याच्या लिहिल्यांत १२ वर्षांचा होतों तेव्हां परागंदा जाहालों स्वराज्यांत गांवीं आलों त्यापासून कजिया म्हणोन

कुणबावे होते ते वेळेस कारभार कुलकर्णी करीत होते म्हणोन आ।। ३

कोण करीत हें न कळें म्हणोन आ।। २

कुणबावे होते भालेराई पलीकडे होते म्हणोन असामी ३

सिवाजी माहांराजाचे वेळेस होते म्हणोन नाना माहार मुचरीकरचे सडीत १

पौ कोणाच्या बोलण्यांत सुर्वे यांची खोती हें व कोणाच्या बोलण्यांत दुसरेयाणें केली नाहीं म्हणोन १

श्रिंगारपुरकर राजे यांचे आगोधरची खोती सरदेसाई यांची आहे म्हणोन आबासेट सोनार याणें सांगितलें १

वतनी खोती कोणाची हें ठाऊक नाहीं म्हणोन असामी २०

खोतीचा शब्द सिवाजी माहांराजांआलीकडे जाहाला म्हणोन जाना माहार मुचरीकर याचे सडीत १

खोतीचा शब्द सिवाजी महाराजांपासून जाहाला म्हणोन सदासिव भट पित्ते व धोंडसेट सेट्या यांचे सडीत १

वरकडांचे साक्षीत कुणबावे याचा मार ठाऊक नाहीं म्हणोन १

भालेराई पलीकडे खोती कोण करीत होता ते न कळे त्याआलीकडे सरदेसाई करितात म्हणोन आ ।।२

कुणबावे होते कारकीर्द कोणती ती ठाऊक नाहीं आ।। २

येकूण— —खोतीचे कलम १

मानांविसी

(१) शिमग्याचे—देवाचे होळीचाः——

होळींत नारळ प्रथम सरदेसाई टाकितात मग सुर्वा टाकितो कीं नाहीं न कळे म्हणोन लखमा सोलिमचे सडीत १	होळीत नारळ खोतीचा सरदेसाई टाकितात अ॥ ५ किता मोघम आ॥ १०
सुर्वा मिरासी वतनदार मुळ्या म्हणोन होळीत नारळ टाकितो अ॥ ४ पौ कोणी वतनदार, कोण्ही मुळ्या व मिरासी म्हटलें आहे	
होळीची पूजा सरदेसाई व सुर्वे करितात म्हणोन आ ॥ ३	

येकूण—— होळीच्या मानाचे कलम १

देवाचे पालखीचा— होळीखालून तळ्यावर देव आंघोळीस येतो आंघोळ जाहाली म्हणजे

पूजा सरदेसाई करितात मग सुर्वे याजकडे जाते म्हणोन असामी १६	साणेखालीं येऊन तेथून वेसराडीस सरदेसायांचे घरास जाऊन मग सुर्वे याजकडे जाते म्हणोन असामी ४
कृष्णा रामाणी याचे सडीत तळ्यावर पूजा गुरव करितो मग खाबुडात जाते तेथून वेसरडीस देसाई याजकडे म्हणोन १	पौ दतसेटी तेलीचे सडीत ज्याजती साणेखाली येऊन सरदेसायांची वस्ती घरांत होती तेव्हां त्याचे घरास जाई वस्ती मोडल्यावरी वेसरडीस घर आहे तेथे जाते म्हणोन १
होळीखाली सुर्वे व गावकरी मिळाल्यावरी कुणबी व म्हार ढोल घेऊन जाऊन सरदेसाई यांस आणावे म्हणोन जाना माहार याचे सडीत १	

येकूण —— पालखीच्या मानाचें कलम १

येकूण —— शिमग्याचे कलम १

(२) याप्रमाणेंच " नागराचे देवाचें पवतें", " दिवाळीचे दिवे ", " खोतीचा मान ", " मुलांमुलींच्या लग्नाचे नारळ व विडे " या मानांचा तपशील आहे.

(३) देवाचे साईकेचे सावज पडते त्याचे फळें व खांदा कोणास देतात, खुरसुंडी कोणास मिळते, वगैरे विषयीं साक्षी घेतल्या आहेत. उभयतांच्या कैफीयतांतील प्रत्येक मुद्यावर साक्षी घेतले असून त्यांतून फक्त १।२ मुद्यांपुरते च उतारे आतां देतों; इतर गोष्टी संक्षेपानें दिल्या तरी कंटाळवाण्या होण्याइतक्या लांबतील.

" कोणाकोणाचे साक्षीत सुर्वा मिरासी वतनदार देवधर्माचा आधिकारी याणे कोणाचा कौल देवाचा घ्यावयाचा असीला तरी गुरवाकडून घेऊन देवाचा कौल देवास लावणे तो सुर्व्यास पुसून लावावा गावामध्ये कुणवी व माहार यास अकलबुध सागावी देवसकीची वडीलकी यांची गावासिवाचा कौल घ्यावा म्हणोन याणें सांगावें म्हणोन."

" गावच्या वेठी सुर्व्याकडे च्यार चालत होत्या–देव पुजीत यामुळें त्याचें सोईरधायरे हांसो लागले तेव्हां गुरव आणून ठेविला त्याजला वेठी दोन देऊन बाकी दोन आपल्याकडे ठेविल्या "

" जाना माहार याचे सडीत ज्याजती मजकूर विहिरीस पाणी न पडे यास्तव राजे (श्रिंगारपुरकर) याणी गावचा माहार दाणीस द्यावा यैसें योजिलें त्यावेळेस गावचे माहार पलाले म्हणोन सुर्वे याचे दारी वरातदार बसले त्यावेलेस आपल्या वडिलानी माहारास सांगितले कीं तुम्ही पलों नका दाणीस डोके कोणी दिल्हें तरी त्यास काय द्याल तेव्हां माहारानी आपली माहारकी निमे द्यावयास केली ते समई सुर्वे व.व माहार सरदेसाई गावचे खोत माहालचे देसाई संगमेस्वरास होते त्यांजकडे येऊन त्यांचे विद्यमाने माहारापासून निमे वतन घेऊन आपले वडिलानें दाणीस आपलें डोके दिल्हे म्ह."

वादी प्रतिवादी यांच्या तकरीरा ऊर्फ कैफियती, कागदपत्र आणि साक्षीदारांच्या जबान्या यांवरून केलेला ठराव व विवेचन हीं वाचण्यासारखीं आहेत, व असल्या एखाद्या घराण्याच्या च इतिहासांत तीं साम्र

दिल्यास वावगें दिसणार नाहीं म्हणून त्याचा उतारा येथें बराच मोठा दिला आहे—

" येणेप्रमाणे साक्षीचा व हरदू वाद्याचे तकरीराचा सारांश पंचाईतमतें हाजिर मज्यालसीत मनास आणून सुर्वे यासी सदरहू कागदपत्र वाचून दाखऊन पुसिले कीं तुवां खोती वतनी परंपरागत आपली अलीकडे गणोवा नायक रंगोबा नायक यासी निमे वाटा मालोजी सुर्वे याणी सिवाजी माहाराजांचे कारकीर्दींत दिल्हा याप्रमाणे साक्षीदाराचे मुखें खरें करून देऊ म्हणोन लेहून दिल्हें त्यास हे गोष्ट साक्षीदाराचे साक्षीत नारो केशव सरदेशकुलकर्णी याजखेरीज पुरत नाहीं कागदपत्र तो आपणापासी नाही म्हणतोस तेव्हा पुढें विचार काय त्यास सुर्वे याणी विनंति केली की नारो केशव याणी सडी लेहून दिल्ही आहे ती पाहून मखलासी करावी त्यावरून तुम्हांस (सरदेसाई यांस) पुर्सीस करितां तुम्ही विदित केलें की खासगत आमच्या गावावरी सरदेशकुलकर्णी याचे हक नाही याजकरिता आमचा गाव नव्हे यैसे म्हटलें म्हणजे सरदेशकुलकर्णी यांचे विचारें हक आपणास येईल म्हणून त्याचा आमचा पेच आहे तथापि त्याजला हुजुर आणून कागदपत्र त्याचे प्राचीन असीले तरी त्याणी दाखवावे त्यास आपण मान्य म्हणोन लेहून दिल्हे त्यावरून सुर्व्याचा कतबा घेऊन नारो केशव यास हुजुर आणून पुर्सीस करितां त्याणें लेहून दिल्हें कीं विशाळगडतर्फेचा हवाला सरदेसाई याजकडे व दादोबा नायक हवसी याजकडे होते त्या जबरदस्तीमुळें हक आमचे चालों दिल्हें नाहीं त्यापलीकडे हक आमचे मुचरी देखील सरदेसाई यांच्या साऱ्याच खासगत गावावरी चालत होते त्यावेळेचे कागदपत्र असल आपणापासी नाहींत तेव्हां त्याजला पुसिले की सुर्व्यास मुळ्या म्हणतात म्हणोन तुम्ही व आणखी दोघा चवघां सडीदारानी लेहून दिल्हें त्यास सुर्वे याणें आपले तकरीरेत मुळ्या यैसे लिहिलें नाहीं व कोंकण प्रांतात मराठेयास मुळे म्हणावयाची चाल नसतां तुम्ही कशावरून लिहिलेत याचा दाखला कागदीपत्री दाखवणें त्यावरून त्याणी लेहून दिल्हें की येविसीचा कागदपत्र आपणाजवळ नाही आपण सरकारचे

अमलांत वतनावरी आलो यापूर्वी परागंदा होतो वतनावरी आल्यानंतर आपले भाऊबंद माहादाजी आंबाजी व आणाजी लिंबाजी हे वतनांवरी होते ते हाली मरोन गेले त्याणी आपल्यास सांगितले त्यावरून लेहून दिल्हे म्हणोन त्यास येविसीचा कयास पाहाता काही कारण नसतां माहादाजी व आणाजी यांस येवढीच गोष्ट सांगावयाचें कारण काय यावरून सरदेसाई व सरदेशकुलकर्णी यांचे वतनसमंधे पेच आणि गाव सरदेसाई यांजकडून निघाला तरी सरदेशकुलकर्णी याजला हक येतो यास्तव कागदी पत्री सरदेशकुलकर्णी यांजपासी साधन नसतां वडिलांचे तोंडजबानीवरी घालून सडी लेहून दिल्ही ही प्रमाण धरितां येत नाहीं हकाचा मजकूर वरकडा गावची वाट ती हकाविसी मुचरीची वाट या कलमावरून सुव्यांचे साधन येते यैसे नाही येक सडी फाडून नवी कारकुनानें लिहिली म्हणोन सुवें म्हणतो त्यास सड्या घ्यावयास कारकून हुजुरचा वेकाजी सावजी व सुभाचा रामाजी सिवदेव मायदेव माहांजन मौजे राहाटगर येकूण दोन कारकून सुव्यांने मागितले ते च दिल्हे त्या कारकुनास सरदेसाई राजी जाहाले सड्या ल्याहावयास तिसरा कारकून बाळाजी रघुनाथ खोत मौजे कलझोडी ता। सैतवडें हे होते तेव्हां कृत्रिमता कसी घडेल तथापि पेशजी सरदेसाई जवळ नसतां सुव्यांनें मोराजी सिंदे यांजकडून गावकरियाच्या सड्या घेविल्या त्यात हि सुवें याची खोती यैसे कोण्ही च लिहिले नाही त्या सड्या व हालीच्या सड्यांत येकच अन्वय आहे याजकारितां फाडल्याचा संशय दिसत नाहीं नातवानीमुलें सुव्यांचे खोतीचा अपहार सरदेसाई याणी केला म्हणावा तरी सुव्यांचे वडील मातबर मातबर चाकरीस सरकारात होते म्हणोन त्याणेच लिहिलें आहे त्यास खोती सुव्यांची तरी त्याकाळी त्याजकडे कां न चालती तेव्हां नातवानीमुळें म्हणतो हे गोष्ट लटकी आहे खोती हा शब्द सिवाजी माहाराजांअ'लीकडे जाहाला म्हणोन सरदेशकुलकर्णी याचे व आणखी येकांदोघाचे सडीत आहे त्यास त्या प्रांतीचे प्राचीन कागद से दोनसे वर्षापर्यंत पाहाण्यांत आले त्यांत खोत यैसे म्हटले आहे मग खोती आलीकडेस जाहाली हें कशावरून म्हणावे रूढीवरून व पत्रावरून पाहातां खोती शब्द



श्रीनृसिंहमंदिर–स. १९२५ मौ० मावळंगें.

[चित्रकार–नारायण रामकृष्ण सरदेसाई, मुंबई.

प्राचीन दिसतो चालका देशमुख म्हणोन सुव्यानें लिहिलें व सरदेशकुलकर्णी याणे त्यांचे च तकरीरेप्रमाणें लेहून मुळ्या सुर्वे यैसे अधिक लिहिलें परंतु चाळका देशमुख यैसा दाखला त्याजपासी कागदीपत्री नाहीं व साक्षीत हि पुरलें नाहीं तेव्हां सरदेशकुलकर्णी सुव्यांचे मिलाफी याजकरिता सर-देसाई याच्या द्वेषामुळें लेहून देतात हे प्रमाण तुम्ही (सरदेसाई) म्हणतां कीं वतनी खोती पूर्वीपासून आपली सुव्यांचा वांटा खोतीविसी आमचे वडिली कधी केला नाही म्हणोन त्याप्रमाणें सडी साक्षीत तुमचें साधन पुरलें खोतीचें वतन तुमचे खरें आहे सुव्यांचे खोतीचे वतन नव्हे तो खोतीच्या वतनास खोटा आहे तो गावचा रयत त्याणे मिरासी म्हणोन देवसकीसमंधे कुणब्यामध्ये मानपान सरदेसाई याचे पाठीमाशून पूर्ववत प्रमाणें घेऊन आपली वतनी ठिकाणें असतील ती अनभऊन असावें या प्रमाणे पंचाईतमतें सिधांत करून सुव्यांस आज्ञा केली की खोतीविसी तुझ्यानें साधन पुरऊन देवलें नाहीं खोतीच्या वतनास तू खोटा आहेस सरदेशकुलकर्णी याणी सडी दिल्ही त्यास दोष याप्रमाणें त्यास आज्ञा करून तुम्हांस हे निवाडपत्र भोगवटियास करून दिल्हे असे" इ० छ ४ माहे मोहरम सन समान सबैन मयां व अलफ.

प्रकरण अकरावें

देवस्थान

मावळंकरांचे मूळपुरुष नृसिंहभट्ट गोदातीराहून तळकोंकणांत येऊन ज्या ठिकाणीं कायम झाले व जेथील वस्तीमुळें त्यांच्या वंशजांचें मूळचें **सत्यवादी** हें उपनाम मागें पडलें तो मावळंगें गांव, माखजन या गांवास लागून दक्षिणेस नदीतीरीं आहे. चिपळुणावरून संगमेश्वरास जातांना अठरा मैलांवर आरवली गांव आहे. तेथें थोरल्या रस्त्यास फांटा फुटतो. त्या फांट्यानें गेलें म्हणजे ६ मैलांवर खाडीच्या कांठीं माखजन आहे. माख-

जनापर्यंत मोटारगाडी जाते. माखजन व मावळंगें यांच्या हद्दींस लागून च धामापुर म्हणून मोठा गांव असून तो पूर्वी सरदेसायांस इनाम होता. मावळंगें हा गांव ४ थ्या पिढीचा व सरदेशमुखी वतनाचा मूळ संपादक पुरुष कृष्णाजी यानें १३ वे शतकांत दक्षिणेंत मुसलमानांची सत्ता झाली तेव्हां त्याजपासून इनाम मिळविला. पुढें तो गांव खोती होऊन सरदेसाई हे इनामदाराचे खोत बनले. पुढें खोती हि विकली जाऊन आतां कोणी रानडे आडनांवाचे ब्राह्मण खोत तेथें आहेत. मांवळंगें गांवास वाघ वगैरे हिंस्र पशूंस राहतां येण्याजोगें दाट राखीव जंगल आहे.

या मावळंगें गांवांतील श्रीनृसिंहाची जागृत मूर्ति पाहून नृसिंहभट्टजींनीं तेथें वास केला; त्यावेळीं तेथें लहानसें देवालय किंवा गाभारा असावा. अव्वल सरदेशमुख कृष्णाजी नायक यांनीं श्रीवर देवालय बांधिल्याचा उल्लेख बखरींत (पा. ८) आहे. अर्थात् पहिलें मंदिर १३ वे शतकांतील होय. तेंच हें हल्लींचें मंदिर कीं कसें हें पक्कें समजत नाहीं. सरदेसायांच्या भरभराटीच्या काळीं कदाचित् त्याची दुरुस्ती हि झाली असेल. परंतु हल्लीं जुनें हेमाडपंती लांकडी मंदिर अगदीं जीर्ण होऊन गेलेलें आहे. पांचशें माणसें बसतील एवढा मंदिराचा सभामंडप होता. झोंबडीकर सरदेसायांनीं अलीकडे छपर बांधून ऊनपावसापासून देवस्थानचा बचाव केला आहे. सभामंडप वगैरे दुरुस्त करण्यास हजार पंधराशें रुपये लागतील. जयंतीचा उत्सव ४।५ दिवस सरदेसायांच्या लौकिकास शोभेसारखा व हल्लींच्या ऐपतीस निभावेल असा केल्यास दरसाल १०० ।१२५ रु. पेक्षां अधिक खर्च येणार नाहीं. माखजनाहून मोटारींतून उतरल्यावर मंदिरापर्यंत सुमारें तीन मैल पायीं जावें लागतें.

देवाच्या खर्चासाठीं पूर्वी नक्त नेमणुका असून शिवाय इनाम जमीनी दरसाल तीन खंडी मक्ता येण्यासारख्या होता. प्रभानवल्लीच्या दप्तरांत नक्त नेमणुकीसंबंधाचा एक कागद मिळाला तो पुढें दिला आहे. इंग्रजी अंमलांत देवाच्या जमीनी त्याच्या चालत्या बोलत्या खटपटी पुजाऱ्यांच्या नांवें पैमाषींत लागल्या व पुजाऱ्यांनीं त्या विकून टाकल्या. देवस्थानच्या

उत्पन्नाची अशा प्रकारें विल्हेवाट लागल्यावर पूजेचा प्रश्न मर्जीवर राहिला. हल्लीं देवाची पूजा मंदिराजवळ च राहणारे रा. वासुदेव गोविंद मावळंकर यांनीं चालविली आहे. या च देवाच्या कृपेनें विस्तार पावलेल्या मावळंकरांपैकीं बहुतेकांस कुलदैवताच्या मूळ जागेचा हल्लीं पत्ता हि नाहीं; देवाचा वार्षिक जयंत्युत्सव मोठ्या प्रमाणावर करण्याइतकी मंडळी सदर गांवांत असतील वा नसतील; किंवा गांवच्या लोकांस उत्सव करण्याची इच्छा असली तरी शक्ति नसेल; तें कसें हि असो, देवाचा अशा प्रकारचा वार्षिक उत्सव आज होत नाहीं एवढें खरें.

सार्वजनिक उत्साह होत नसला तरी मावळंकर मंडळीच्या घरीं देवाऱ्यांत श्रीनृसिंहमूर्ति किंवा नृसिंह-शालिग्राम असतो त्याची जयंति वैशाख शु॥ १४ रोजीं होते. पांच ब्राह्मणांकडून महाभिषेक होऊन दुसरे दिवशीं पारणें होतें.

मोडकळीस आलेल्या प्राचीन देवस्थानांचा जीर्णोद्धार करण्याऐवजीं नवीन देवालयें बांधून त्यांत आपल्या आवडत्या किंवा उपास्य देवतांची स्थापना करण्याची प्रवृत्ति आपल्याकडील ऐपतदार, धार्मिकबुद्धीच्या प्रतिष्ठित लोकांत सर्वत्र दिसून येते. संस्थानिक, जाहागिरदार, मोठमोठे सावकार वगैरेंनीं आपापल्या गांवीं नवीन नवीन देवालयें बांधल्याचें चहूंकडे आढळतें. सरदेशमुखांच्या बाबतींत हि हा सार्वजनिक नियम मोडला नाहीं. प्रभानवल्ली, विशाळगड, धामापुर, संगमेश्वर वगैरे निरनिराळ्या जागीं सरदेशमुख सरकारी कामानिमित्य कायमपणें राहूं लागले तसें त्यांचें मूळच्या जागेकडील लक्ष्य या नवीन ठिकाणांकडे वेधलें. संगमेश्वरीं पूर्वीच्या कर्णराजाचें कर्णेश्वराचें व सोमाजी प्रधानाचें सोमेश्वराचें देऊळ पाहून तेथें कायमपणें येऊन राहिलेल्या अंतोबा रंगोबानें (४-२८-६) आपल्या नृसिंह देवाची स्थापना तेथें एक नवें देवालय बांधून केली, व त्याच्या पूजेअर्चेची हि कायम व्यवस्था करून टाकली. अंतोबानें तेथील सोमेश्वर देवाच्या हि खर्चवेंचाची व्यवस्था करून घेतली. २४ व्या पिढीच्या गणोबा नरसोबानें धामापुरास केशवाचें देवालय बांधिल्याचा उल्लेख बखरींत (पृ. ५१) आला आहे च. वेरवली गांवीं जी शाखा राहूं लागली तिच्यां-

तील अपाजी बल्लाळ (९-२७-२७) यांनीं तेथें हरिहरेश्वराचें देऊळ बांधिलें. त्यांचे जेष्ठ पुत्र विठ्ठल यांनीं विठ्ठलमंदिर उभारिलें. मोर्डेकरांनीं सार्वजनिक वर्गणीनें मोर्ड्यांतील एक दोन मंदिरांचा जीर्णोद्धार केला. परंतु या सर्व देवस्थानांची हल्लींची स्थिति बहुधां चांगली नसावी असें मंडळीच्या सांगण्यावरून दिसतें. मोर्डें गांवांतील एका देवस्थानच्या थोड्या मोडकळीस आलेल्या मंदिराचें खांब, तुळ्या वगैरे सामान रातबेरात हलके हलके लांबवून देवाला मोकळी हवा मुबलक मिळूं देण्याची तजवीज तेथील कांहीं भक्तांनी केल्याचें ऐकतों ! असो !

या देवस्थानांसंबंधानें पुढील कागदपत्र दप्तरीं मिळाले—

लें० ३३ श्रीनृसिंहदेव श्री ता० १०।५।१७०८ ई०

राजश्री शिवाजी दामोदर नामजाद व कारकून ताा संगमेश्वर गोा यांस छ अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य——सेवक माहादाजी बापू नमस्कार सु॥ समान सया आलफ श्री——देव बहुत जाग्रत स्थान आहेत त्यास ताबाने राज्य आक्रमण केले ते समई देवाची ऊर्जा चालवावी हा नियत्न केला त्यास श्रीकृपेने औरंगजेब निधानत्व पावला गड किले हस्तगत जाले राजयाची आभिवृधी होत चालिली त्यास देवाची ऊर्जा चालवावी हे आगत्य जाणून ताा मजकूरपैकीं जमीन देविली आसे दाभोली लारी

१०० श्री नरसिह माहालुगे
५० श्री केशव धामापुर
१५०

शिक्का वर्तुल
श्री भवानी चरणीभाव
बापूजीसुत माधवराव

येकून दीडसे लाहारी देविली असे तर सदरहूची जमीन कदीम निम्में कदीम धारियाप्रमाणें मौजे मावलगे लारी ५० व मौजे बुरबाड लारी १०० येकून दीडसे लारींची जमीन नेमून येक तकसीम कीर्दी तीन तकसिमा पड सिरस्ताप्राा चतुःसीमा करून देवाचे शेवक आहेत त्याचे स्वाधीन करणे त्याची कीर्दी करून श्रीची ऊर्जा चालवितील प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे प्रती लेहोन घेऊन मुख्य पत्र परतून पूजकाजवल देणे छ २९ सवाल (बेर०द०) मोर्तब—लेखन सीमा

ले० ३४ (प्रभा. द.) श्री. भाद्रपद ३० शके १६३२.

अष्टकोनी शिक्का श्रीशंकर श्रीशाहुछत्रपती कृपानिधी।
प्रल्हादसुत गदाधर प्रतिनिधी ॥

आज्ञापत्र राजश्री———पंत प्रतिनिधि ताा कमाविसदार मौजे बुरबाड ताा संगमेस्वर सुहुर संन इहिदे अशरीन मयां व अलफ मौजे मजकुरी इनाम लारी—

श्रीदेव नरसिंह माहालुंगे ५० वेदमूर्ती शांभट सफरे १००

येणेंप्राा दीडसें लारीची वृती पेसजीपासूनं आहे त्यास तुम्ही कथला करून चालवीत नाही म्हणोंन कलो आले तरी याउपरी हे आज्ञापत्र सादर केले असे तरी सदरहू वृती पेसजीपासून चालत आलीं आहे त्याप्राा चालवीत जाणे गै (गय) केली म्हणजे ताकीद होईल जाणिजे छ २८ र ज ब पाा हुजुर

ले० ३४ अ. (नक्कल)(प्रभा.द.) श्री ता. १८।७।१७११.

राजश्री सिवाजी दामोधर नांमजाद व कारकून
वर्तमान व भावी ताा संगमेस्वर गोसावी यांस

छ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य——— स्नो। परशराम त्र्यंबक प्रतिनिधि नमस्कार सुहुरसन इसने अशर मयां व अलफ श्री——— देव माहुलंगे ताा मजकूर येथें श्रीस नैवेद्य व दीप चालावयाबद्दल इनामवृति पेशजी राजश्री गदाधर प्रल्हाद प्रतिनिधि यांही मौजे बुरबाड ताा मजकूर येथे दिली आहे तेथे कीर्दी होऊन श्रीचा उछाह नैवेद्य व दीप चालत नाही म्हणोन वर्तमान हुजुर विदित जाले त्यावरून मनास आणितां देवस्थान माहुलंगेचे आणि वृति दुसरे गांवी याकरितां बुंरबाडची दूर करून मौजे माहुलंगे येथे दाभोली लारी ५० पनास येक पटी धारियाने देविली असे राजश्री आनाजी दतो याचे धारियाने जमीन नेमून देऊन चतुःसीमा करून देणे या पत्राची प्रती लिहून घेऊन मुख्यपत्र भोगवटियासी परतोन देणे नवीन पत्राचा आक्षेप न करणे जाणिजे छ १२ जमादिलाकर सदरहू वृतीची जमीन पड नेमून चतुःसीमा करून देणे जाणिजे.

ले. ३५ (प्रभा.द.) श्री मंगळवार ता० १७।७।१७३९

शिक्का वर्तुलाकार
श्रीराजा शिव महीपाळक । सोमेश्वर.
शेवक कृष्णमुत त्र्यंबक ॥

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री कृष्णाजी परशराम प्रतिनिधि तांहां कमाविसदार कसबा संगमेश्वर सुहुर सन आर्बैन मयां व अलफ श्री———देव कसबा मजकूर हें ज्याग्रत स्थान आहे तेथील श्रावण मासीचा मासाभिशेक करून द्यावा म्हणोन राजश्री अंतोबा नाईक सरदेसाई याणी विनंति केली म्हणोन त्यावरून वेदमूर्ती राजश्री नारायेण-भट व बालंभट व भिकंभट सफरे वास्तव्य क॥ मजकूर यांसी श्रावणमासीचा मासाभिशेक सांगितला आहे हे श्री———देव येथील अभिशेक करितील यांस व देवास व सामग्री व दक्षणा मोईन रुपये ७॥ साडे सात देविले असेत तरी सदरहू साडे सात रुपये कसबे मजकूर पैकीं पाववीत जाणें वेदमूर्ती प्रतिवर्षी अभिशेक करितील त्यांस साल दरसाल मोईनप्रमाणें रुपये प्रविष्ट करीत जाणें प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें छ २१ रबिलाखर पा। हुजुर मो०— लेखनावधी मुद्रा वीराजीत

ले० ३६ (प्रभा.द.) श्री रविवार ता० ५।१०।१७४०

प्रतिनिधींचा अष्टकोनी शिक्का नारसिंह

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री कृष्णाजी परशराम प्रतिनिधि तांहां कमाविसदार देहाये ता। संगमेस्वर सुभा प्रांत राजापुर सुहुर सन इहिदे आर्बैन मयां व अलफ राजश्री अंतोबा नायक सरदेसाई मामले प्रभावली व दाभोल यांणी विशालगडचे मुकामीं हुजुर विनंति केली कीं आपण कसबा संगमेस्वर येथें नूतन देवाल्य बांधोन श्री———देव याची स्थापनां केली आहे त्याची नैवेद्याची व नंदादीपाची व वरकड अनुकुलता होऊन ऊर्जा चालिली पाहिजे याकरितां स्वामींनी कृपाळु होऊन देहाये मजकुरीं नूतन इनाम करून दिल्हिया त्याची कीर्द करून श्रीची ऊर्जा चालऊन म्हणोन त्यावरून मनास आणितां मा।रनुले यांणी कसबा संगमे-

स्वर येथें नवें देवाल्य बांधोन तेथें श्रीची स्थापनां केली तेथील नैवेद्य नंदादीप ऊर्जा चालिली पाहिजे याकरितां देहाये मजकूरपैकीं नूतन इनाम खेरीज हकदार व इनामदार करून दिल्हा असे पड जमीन मली बिघे—

८२ कसबा संगमेस्वर	८१ मौजे करबेलें	८२ मौजे वांसी
८२ मौजे मुचरी	८१ मौजे सोनवडें	८१ मौजे उमरें
८१ मौजे माभलें	येकूण———— ८१०	

येकून दाहा बिघे जमीन इनाम करून दिल्हा असे तरी देहाये मजकूरपैकीं जमीन विसां पाडाचे बिघ्यानें मोजून चतुःसीमा करून देऊन पुजारी मजकूर याच्या दुमाला करणें प्रतिवर्षीं नूतन पत्राचा आक्षेप न करणें या पत्राची प्रती लेहून घेऊन असलपत्र भोगवटियासि परतोन देणें जाणिजे छ२४ रजब निदेश समक्ष ——मोर्तब राजते। लेखना। वधी।

टीप—याच तारखेची, शिक्कामोर्तबाची व मजकुराचीं दुसरीं आज्ञापत्रें १ हवालदार व कारकून वर्तमान व भावी व २ देसाई व देशकुलकर्णी ताा संगमेश्वर यांस प्रतिनिधींचीं गेलीं आहेत.

ले.३७. (नक्कल) (प्रभा. द.) श्री ता. २१।१०।१७४०.

राजमान्य राजश्री परशराम हरी गोसावी यांसी—

सेवक गंगाधर कृष्ण नमस्कार सु॥ सन इहिदे आर्बैन मयां व अलफ राजश्री अंतोबा नायक सरदेसाई याणी कसबा संगमेस्वर येथें नूतन देवालय बांधोन श्री—— ची स्थापना केली तेथील ऊर्जा चालावयानिमित्य संगमेस्वर माहालीं गांवगना इनाम जमीन दाहा बिघे घेतली त्याची पत्रें आलाहिदा सादर आहेत त्याप्राॉ जमीन मोजून चतुःसीमा करून द्यांवयाविसी हे पत्र सादर केले असे तरी सदरहूप्राॉ जमीन मोजून चतुःसीमा करून देऊन मशार्निले याच्या कारभारीयाचें दुमांला करणे जाणिजे छ १० शाबान.

टीप—" श्री——स नैवेद्य नंदादीप चालविल्यानें स्वामीस श्रेयस्कर यास्तव " सदर देवस्थानाकडे निरनिराळ्या गांवीं मिळून ही जी दहा बिघे जमीन इनाम दिली तिचें बहादरीपत्र राज्याभिषेक शके ६८ दुर्मति संवत्सरे

कार्तिक वहुल अष्टमी भृगुवासरीं (ता. १९ नवंबर १७४१ ई०) क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभुछत्रपति स्वामींनीं समस्त रा०का०धु०विश्वास० रा. रा. संभाजी आंग्रे सरखेल यांच्या नांवें आज्ञा करून दिलें आहे. —सं.

ले. ३८. (वेर० द०) श्री ता. ३०।१०।१७६४.

हरिहरेश्वर.

अष्टकोनी शिक्का— श्रीआई आदिपुरुष
श्रीराजा शंभुछत्रपती स्वामी कृपानीधी
तस्य अमृतराऊ कृष्ण प्रतिनीधी

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री कृष्णाजी अमृतराऊ प्रतिनिधी ताहां कमावीसदार मौजे बेरवली बु।। ता देवलें सुभा प्रांत राजापुर सुहुरसंन खंमस सितैन मयां व अलफ राजश्री आपाजी नाईक सरदेसाई (९-२७-२७) तालुके खिलणा यांणी किले विशाळगडचे मुकामीं हुजुर येऊन विनंति केली कीं आपण मौजे मजकुरीं नूतन श्री— चें देवालय बांधोन स्थापना केली आहे तेथील ऊर्जा चालिली पाहिजे या करितां स्वामीनी कृपाळू होऊन कांही जमीन इनाम करून दिल्हियाने तेथील उत्पन्न होईल तेंकरून श्रीची ऊर्जा चालऊन म्हणऊन त्यावरून मनास आणितां मारनिले यांणी नूतन देवालये बाधोन श्रीची स्थापना केली आहे तेथील ऊर्जा चालविलियाने स्वामीस व स्वामीच्या राज्यास कल्याणवह देखोन श्रीस मौजे मारपैकी खेरीज हकदार व इनामदर भातजमीन पड बिघे ८२ दोन बिघे इनाम करार करून देऊन मौजे मजकुरास हे आज्ञापत्र सादर केलें असे तर मौजे मारपैकी जमीन विसां पांडांच्या बिघ्यानें मोजून चतुःसीमा करून देऊन श्रीकडे इनाम चालवीत जाणें प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें या. पत्राची प्रती लेहून घेऊन असलपत्र भोगवटियास श्रीच्या गुरवाजवल परतोन देणे छ ४ जमादिलौवल निदेश समक्ष

मो० राजते लेखना वधी

कोंकणांतील उच्च दर्जाच्या लोकांच्या देखील देवस्थानांबद्दलच्या समजुती शंभर दीडशें वर्षांपूर्वी कशा असत हें पुढील पत्रावरून दिसेल. आज देखील या समजुती खालच्या वर्गांत दृढमूल असून वरच्या वर्गांतील पुष्कळ लोकांवर त्यांचा पगडा कायम आहे. पत्राची जरा आर्जवी भाषा पाहिली म्हणजे मालकांच्या जवळच्या कारकून वगैरेंची क्षुल्लक गोष्टींकरितां खुशामत करण्यापर्यंतची पाळी अव्वल दर्जाच्या जमेदारावर आली असल्याचें दिसतें; म्हणून या पत्राचा काळ ठरविण्यास अन्य साधनाभावीं तें सरदेसायांच्या उतरत्या कालांत म्ह० एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतील असावें एवढें च अनुमान होतें. तें पत्र येथें देऊन हें प्रकरण संपवूं.

ले० ३९. (प्र.ना.द.) श्रीनरहरिवरद

रा. वि. रा. रा. रवलोपंत ——— तथा सखोपंत स्वामी गो० यांसी पोष्य केशव नाईक सरदेसाई कृतानेक सां नमस्कार विनंती येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष बहुत दिवस आपणांकडून पत्र येऊन परामृश होत नाही तरी यैसे न करिता सदैव येणारा मनुश्यांसमागमें पत्र पाठऊन संतोशवित आसीले पाहिजे यानंतर आमच्या घरामध्यें दुखीने पाठ घेतली आहे ती पत्री कोठवर ल्यावी लिहितां पुरवत नाही आजि दोन महिने गोविंद न्हाटवल व आणखी दोन चार भगत घेऊन मौजे धामापुरच्या देविली बसलो आहों अद्याप कांही देवसकीचा निकाल पडत नाहीं त्यास गोविंद न्हाटवल व धाकोजी कदम यास गोपाळगडचे जिल्हेस पडथले करावयास पाठविले आहेत त्यास पंधरा दिवस लागतील त्यास सरकारातून रोखा गोविद न्हाटवल याचें नांवाचा होऊन मसाला दाहा रुपये धेऊन त्यास गडास बोलाविला त्याचे घरी वरातदार येऊन दारकोड करून बसले आहेत त्यास तुम्ही येका महिनेयाची मुदत सरकारात मागोन मनाचिटी आगत्य आगत्य वतनदारास पाठवावी ह्मणजे आमचे कार्य संजेलसें पाहूं या गोस्टीविसी आपण अनमान सहसा न कीजे बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंति छ

प्रकरण बारावें

स्वराज्यांतील हालहवाल

पांचव्या प्रकरणांतील बखरीचा उत्तरार्ध स. १६८४ त तयार झाला असें ४ थ्या प्रकरणांत सांगितलें आहे. थोडेंसें काळजीपूर्वक पाहिल्यास उत्तरार्धांतील अखेरचा थोडा भाग (पृ. ५१ वरील १६ व्या ओळीच्या "त्यांचे दत्तपुत्र विद्यमान रंगोबानायक," याच्या पुढला मजकूर) मागाहून बऱ्या च दिवसांनीं जोडला असल्याचें आढळून येईल. बाकीचा उत्तरार्ध रंगोबाचा थोरला भाऊ नरसोबा याच्या हयातींत व गुमास्तेगिरीच्या काळांत सुरू होऊन पुरा झालेला आहे. रंगोबा त्यावेळी लहान होता. चौदा वर्षें इमानानें कारभार चालवून शेवटचीं दोन वर्षें आपल्या च नांवानें तो चालविण्याची नरसोबास बुद्धि होऊन तो कारभारांतून निघाल्यावर व बहुत दिवसांच्या व्रणव्यथेनें नरसोबा शांत झाल्यानंतर हा अखेरचा भाग लिहिण्यांत आला आहे. शिवाय स. १६८४ तील लहान रंगोबा त्यावेळीं तीन पुत्रांचा जनक होण्याइतका मोठा झालेला आहे. तसें च नरसोबाच्या जागीं कारभारास पाठविलेला गुमास्ता हणमाजी केशव खेर "राजापुरास आतां कारभार करितो" असें अखेर अखेर वाक्य आहे. या हणमाजी गुमास्त्याच्या नांवें औरंगजेबाचा अंमलदार रेझा तलबखान यानें सोडलेला अस्सल फारसी फर्मान ता. ८ एप्रिल १७०२ चा दप्तरीं मिळतो. या सर्व गोष्टींवरून वर निर्दिष्ट केलेला मजकूर स. १७०० च्या सुमारास केव्हां तरी बखरीस जोडलेला आहे असें होतें. यामुळेंच त्यांत पूर्वीच्या कांहीं मजकुराची पुनरावृत्ति होऊन, कांहीं चुका हि झाल्यानें तेथील संदर्भ लावतांना बुचकळ्यांत पडल्यासारखें होत आहे.

सतराव्या शतकाच्या अखेरपर्यंत घराण्याचा त्रोटक वृत्तान्त जो या बखरींत आला आहे त्याहून फारसा अधिक तूर्त तरी मिळण्यासारखा नाहीं. तेथून पुढील वृत्तान्त समजण्याचीं साधनें अधिकाधिक मिळतात;

त्यांवरून अव्वल इंग्रजी कारकीर्दीपर्यंतचा शें दीडशें वर्षांचा थोडा विस्तृत वृत्तान्त देतां येण्याजोगा आहे. पहिल्या ६०० वर्षांचा बखरींत आलेला इतिहास थोडक्यांत सुटसुटित लिहिलेला आयता मिळाला. परंतु येथें वतनांचें संपादन व रक्षण (उत्पत्ति, स्थिति) यांची हकीकत जरी संक्षेपानें च द्यावयाची आहे तरी ती देतांना त्यांतल्या त्यांत त्यांच्या अर्जक, संपादक व रक्षक पुरुषांचा उचित सत्कार करण्याचें कार्य हि यथाशक्ति साधून घ्यावयाचें असल्यानें तें जरा सढळ हातानें च करावें लागणार आहे. याचा वचपा पुढें वतनांच्या तिसऱ्या अवस्थेच्या (लयाच्या) वर्णनांत निघेल; कारण तो सर्व कारभार केवळ अर्ध-शतकाच्या अवधींत झटपट आटपलेला आहे.

अठराव्या शतकाच्या वृत्तान्तास सुरुवात करण्यापूर्वी सतराव्या शतका-अखेर वतनाची स्थिति कशी होती हें समजण्यास थोडें सिंहावलोकन केलें पाहिजे. तिसऱ्या पिढीच्या नृसिंहभट्टांस **संगमेश्वर** गांव १२ व्या शतकांत धारादत्त इनाम मिळाला. हें च या घराण्यास मिळालेलें पहिलें इनाम. वतनी संपादन नृसिंहभटजीच्या पुत्रानें सुरू केलें. मुसलमानांचा कोंकणप्रांतीचा मुख्य अंमलदार वली बेग याजपासून कृष्णाजीनें संगमेश्वर तालुक्यांतील ७० गांव प्रथम मोकासा व नंतर इजाऱ्यानें घेऊन तेथें आपली सत्ता स्थापिली; व त्या गांवांची देशमुखी व सरदेशमुखी हि पुढें संपादून सत्ता दृढ केली. **मावळंगें** गांव कृष्णाजीनें च इनाम मिळविला. त्याचा पणतु केशवनायक यानें 'तळकोंकणांत **सातशत गांवींची** राजसत्ता केली'. त्यावेळीं सुभ्याचा कारभार खारेपाटण येथें होत असे. केशव ना० चा नातू गणोबा यानें पंधराव्या शतकाच्या आरंभीं तिसरें गांव **धामापुर** इनाम मिळविलें, आणि गणोबाचा नातू विसोबा यानें **कुंभारखाणीखुर्द** हा चौथा गांव मिळविला. त्याचा पुत्र नरसिंह यानें चाळक्यांच्या मवासपणास त्रासून मूळच्या संगमेश्वराशेजारीं च परंतु नदीच्या उत्तरतीरावर दोन नवीन पेठा वसविल्या व तेथें तो राहूं लागला. पंधरावें शतक पुरें झालें त्यावेळीं अशी स्थिति होती.

सोळाव्या शतकांत कोंकणांतील मुसलमानी सत्ता नष्टप्राय होऊन तेथें विजयानगरचें प्राबल्य झालें. त्यावेळीं नृसिंह ना० चा पणतु सोमाजी यानें तेथील राजांपासून आपल्या सरदेशमुखीची ७०० गांवां-बद्दलची सनद पुनः करून घेतली; पण कोंकणचा अंमलदार रामराव कानडा हा प्रतिकूल झाल्यानें हुकुमाची अंमलबजावणी झाली नाहीं. दरम्यान विद्यानगरचें राज्य लोपून सर्वत्र यवनसत्ता प्रस्थापित झाली; त्यांत तळ कोंकणप्रांत बेदरच्या सुलतानाच्या वांट्यास गेला. बेदराहून प्रांताच्या बंदोबस्तास आलेले कारकून काळा व गोरा खोजा यांनीं कसबे, महाल व मामले असे एकाहून एक श्रेष्ठ प्रांताचे सोईवार भाग करून लावणी संचणीची व्यवस्था लावून दिली. या व्यवस्थेंत प्रभावळी स्वतंत्र मामला होऊन त्याच्याखालीं १८ महाल आले, आणि सरदेसाई मामलेदार बनले. सोमाजीचा नातु नरसोबा यानें बेदरच्या बादशाहाकडून सरदेशमुखीच्या हक्काचा जीर्णोद्धार करून घेतला आणि चाळक्यांचाहि पूर्णपणें मोड करून संगमेश्वरीं पहिल्याप्रमाणें आपला अंमल बसविला. तों १६ वें शतक आणि मागोमाग बेदरचें राज्य संपलें. विजापुर-बादशाहीचा अंमल कोंकणावर सुरू झाला. सत्ताधारी बदलले कीं त्यांजकडे जाऊन पुनः नवीन सनदा करून घेण्याचें नेहमीचें पहिलें काम आटोपून घेण्याची पाळी नरसो-बाचा पुत्र केशव ना० याजवर आली. ती त्यानें शेवटास नेऊन शिवाय बादशाहाकडून बुर्बाड हा पांचवा गांव इनाम मिळविला. यावेळेसच प्रभावळीस ' हवालदार ' ह्मणून मुख्याधिकाऱ्याची नवीन नेमणूक विजा-पुरच्या दरबाराकडून झाली; आणि केशव ना० हवलदाराजवळ प्रभावळीस राहूं लागले. केशव नायकानें कोंड असुर्डे, व गिर्‍यें गांवीं इनाम जमीनी करून घेतल्या. केशव ना०स तीन पुत्र. शेवटचा नारोबा यास पुत्रसंतान नव्हतें. त्यानें सरवटे आडनांवाचा मुलगा दत्तक घेऊन गिर्‍यें (हल्लींचें विजयदुर्ग) गांवच्या वडिलार्जित इनाम जमीनी वहि-वाटून तेथेंच घर केलें आणि तेथील ज्योतिषपण व धर्माधिकारण साधिलें. त्याच्या वंशांत सदर गांवचे अष्टाधिकार आजपर्यंत चालत आले आहेत.

हे वंशज आज **लळित** या आडनांवानें संबोधिले जात आहेत; परंतु आपण मूळचे मावळंकर ही जाणीव आज हि त्यांस आहे. केशव ना०चा मधला मुलगा विसोवा याच्या मनांत सरदेशमुखीचे दोन हिस्से करण्याचें आलें होतें; परंतु अर्ध्या बुर्वाड गांवावर च त्याची अखेर समजावणी झाली, आणि ज्येष्ठ पुत्र गणोवा सरदेशमुखीचा एकटा मालक राहिला. वंशावळ नं. १,पृ. ४५वर १९व्या पिढीच्या नं. २६ व २७ यांस बेपत्ता कंसांत दाखविलें आहे. मुंबईहून रा. जनार्दन भिकाजी लळित यांनीं कळविलेल्या हकीकतीवरून नारोवाच्या पुढील वंशाचा पत्ता लागण्याची वेळ आतां आली आहे. बुर्वाडकर मंडळी नं. २६ चा तपास लावून देतात कीं काय पहावें.

गणोवा केसोवाच्या पश्चात् त्याचा थोरला मुलगा महादोवा प्रभावळीस सरदेशमुख असतां खिळणा (विशाळगड) किल्लेदारानें साडेतीन महाल वेगळे तोडून ९० (वास्तविक ९५—पान ६४ पहा) गांवांचा तनखा मामल्याहून स्वतंत्र करून घेतल्यानें त्या कारभारास महादोवाचा धाकटा भाऊ नरसोवा गेला व किल्यावर राहूं लागला. हल्लींचे देवळेकर, मोर्डेकर व वेरवलीकर या शाखांचा मूळपुरुष हा नरसोवा. या प्रकारें अठरा महालांच्या मूळच्या सरदेशमुखीचे १४½ महालांचा एक व ३½ महालांचा एक असे दोन विभाग येथें झाले; आणि साहजिकच त्या वेगळाल्या शाखा आपापला कारभार स्वतंत्रतेनें करूं लागल्या. अव्वलची बखर प्रभावळीच्या थोरल्या घराण्यांत तयार झाली म्हणून तींत नरसोवा खिळण्या किल्ल्यावर राहूं लागल्यानंतर त्याची किंवा त्याचे पुढील वंशाची खबर त्यांत मिळत नाहीं. प्रभावळीच्या वतनाशीं संबंध सुटला कीं बखरीशीं संबंध सुटला अशीच सर्वत्र स्थिति आहे. यावरून खिळण्याचा मामला त्यावेळीं प्रभावळीपुढें कांहींच नव्हता असें होतें. सतराव्या शतकाचा पूर्वार्ध संपण्याच्या सुमारास मावळंकरांपैकीं खास सरदेसाई वतनदारांची राहण्याचीं मुख्य ठिकाणें प्रभावळी आणि खिळणा किल्ला हीं दोन, आणि इतर मंडळीचीं संगमेश्वर, धामापुर, मावळंगें, बुर्वाड आणि गिर्यें हीं पांच झालीं. या सुमारासच खिळणा किल्यावरील सरदेसायांनीं आपल्या ताब्यांतील जवळचें

देवळें गांव राहण्यास पसंत केल्याचें दिसतें, कारण बखरींत नरसोबास देवळेकर म्हटलेलें आहे. महादोबाचा दुसरा भाऊ निपुत्रिक होता. तिसरा भाऊ विठोबा; त्याचा धाकटा मुलगा पुरुषोत्तम याच्या स्वभावास रिकाम्या माशा मारीत बसणें आवडेना. त्यानें विजापुरास जाऊन पुष्कळ खर्च करून **सैतवडे** महालची सरदेशमुखी संपादन केली; या कामीं झालेलें कर्ज फेडण्याविषयीं त्यानें चुलत्याच्या मागें निकड लाविली. तेव्हां मूळच्या सरदेशमुखी वतनावर पुतण्याचा बेदावा लिहून घेऊन महादोबानें कर्ज आपण फेडिलें. पुरुषोत्तम मग सैतवड्याचे कारभारावर निघोन गेला व तिकडेच राहिला. याप्रमाणें तीन ठिकाणीं तीन स्वतंत्र वतनें झालीं.

महादोबाचा वडील पुत्र गोविंद ना० यानें आपल्या कारकीर्दींत प्रभावळी गांवची खोती, केळशी व वेसवी येथील देशमुखी हीं वतनें नवीन संपादिलीं. पैकीं देशमुखी आपला बंधु विसाजी ऊर्फ शिवाजी यास देऊन त्यानें सरदेशमुखीवरील त्याचा हक्क दूर केला. विसाजी देशमुखीच्या गांवीं निराळा राहूं लागला; त्याप्रमाणेंच मधला भाऊ अंतोबा धामापुरीं जाऊन कायम झाला; आणि रीतीप्रमाणें बखरीच्या हकीकतींतून उभयतांच्या पुढील वंशाचा निर्देश साहजिक तुटला. गोविंद नायकानें **ओझरें बुद्रुक** इनाम मिळवून सबंध इनाम गांवांची संख्या सहा केली. त्याचा पुत्र नरसोबा यानें मावळंगें इनाम गांव व इतर जमीनी वगैरे निरनिराळ्या दायादांस वांटून दिलीं. त्यानें विजापुराहून **लोवल्याचा कोंड** इनाम मिळविला. नरसोबाचा तिसरा मुलगा महादोबा हा लोवल्यास जाऊन राहिल्यानें लोवलेकर ह्मणून त्याच्या वंशजांचें निराळें कुटुंब झालें. वडील पुत्र केशव नरसिंह यानें **दाभोळची** चौथी सरदेशमुखी संपादिली. **मुचरी** गांव इनाम मिळविला. इतर हक्क लवाजिमा हि अनेक संपादन केले. केशव नायकाचा पाठचा बंधु गणोबा याची हरएक कामीं त्यास मोठी मदत होती. कनिष्ठ बंधु नारोबा याजवर मदत करण्याचा अंमळसा कठीण प्रसंग येतांच त्यानें त्या प्रसंगाकडे आणि त्याबरोबर च वतनाकडे कायमची पाठ फिरविली व आपण ओझऱ्यास जाऊन राहिला. गणोबा ना० नें

संगमेश्वर हें आपल्या राहण्याचें ठिकाण केलें. केशव ना०नें प्रभावळीचें घर चालविलें. पुढें केशव ना० लवकरच निपुत्रिक वारला. गणोबानें सुमारें दहा वर्षें देशमुखीचा कारभार केला, आणि म्हातारपणीं पुतण्या सोमाजी लोवलेकर यास तें काम सांगून आपण धामापुरीं हरि हरि म्हणत स्वस्थ राहिला. सोमाजी व त्याचे पश्चात् त्याचा पुत्र विठोबा यांनीं पुष्कळ वर्षें उत्कृष्ट कारभार करून कोलवेची बाग आणि कुवसे वाडी हीं इनामें, माखजन व उंचगांवच्या इसाफती, प्रभावळीची राईवाडी आणि निवें बु॥ हीं गांवें मिळविलीं; दाभोळ सरदेशमुखीचीं फेरफर्मानें घेतलीं; आणि इतर मान मरातब हि पुष्कळ मिळविले. विठ्ठल सोमाजी वारल्यावर गणोबाचा नातु केशव राघोबा यानें २४ वर्षें सरदेशमुखीचा कारभार केला. स० १६६० च्या सुमारास केशव ना० मृत्यु पावला. त्यावेळीं मावळंकरांच्या घराण्यांत प्रभावळी, खिळणा, सैतवडें व दाभोळ या चार मामलती, केशळी व वेसवी येथील देशमुखी हीं वतनें होतीं. याखेरीज १०।११ सबंध इनाम गांव व गांवगंना किरकोळ शेतें, आगरें, बागा चालत असून खोतीचे व इसाफतीचे हि कित्येक गांव त्यांचे होते. निरनिराळ्या गांवीं मिळून त्यांचीं ८।१० राहतीं घरें होऊन घराण्याच्या हळू हळू पांच सहा शाखा वेगळ्या फुटल्या होत्या. धामापुरची शाखा बाह्यतः नसली तरी वास्तविक वेगळी झाल्यांत च जमा होती. एकत्रपणा काय तो प्रभावळी व संगमेश्वर येथील कुटुंबांत अद्याप टिकला होता. केशव ना० नें धामापुरच्या घरापैकीं रंगोबा यास दत्तक घेतल्याबरोबर धामापुरचें घर वेगळें काढल्याचें उघड झालें.

केशवनायकाच्या मृत्युपूर्वीं एक दोन च वर्षें तळकोंकणप्रांत शिवाजीस अर्जांन झाला होता. राज्यस्थापनेच्या उपक्रमास ज्या ज्या जमेदारांनीं शिवाजीस उघड उघड अडथळा केला होता त्यांस बेमान ठरवून व नतीजा पोंचवून शिवाजीनें उधळून लाविलें होतें. परंतु पहिल्या मालकांशीं इमानी राहिलेल्या, शिवाजीस उघडपणें न मिळालेल्या किंवा तटस्थ राहिलेल्या जमेदारांची पालटलेल्या मनूप्रमाणें गुन्हेगारी ठरवून त्यांचें पारिपत्य करणें हें काम झटपट आटपणारें नव्हतें; म्हणून शिवाजीनें यच्चयावत् वतनें

व इनामती तडाक्यास अमानत (जप्त) केल्या. तळकोंकणांत खासा स्वारी होऊन सरकारांतून सर्वांस कौल (अभयपत्र) मिळाल्यावर केशवना० प्रमुख सारे वतनदार शिवाजीस भेटले; तेव्हां नायकांचा सत्कार करून सरदेशमुखी हक्काबद्दल ३००० लारींचा करार करून त्या प्रांतावर नेमलेल्या पिलाजी नीलकंठ सुभेदाराच्या दिमतीस त्यांस पाठविण्यांत आलें. पुढें लवकरच केशव नायक मृत्यु पावल्यानें नरसोबा कान्होबा गुमास्ता यानें नायकांचा मुलगा रंगोबा यास महाराजांच्या पायांवर नेऊन घातलें. केशवना० च्या वेळेस च घराण्याची सर्व हकीकत शिवाजीस समजलेली होती; म्हणून रंगोबाच्या नांवें प्रभावळी व दाभोळ सरदेशमुखीच्या वंशपरंपरेच्या सनदा स. १६६२ त परत (पक्षीं--पुनः) मिळाल्या, प्रभावळीच्या हक्क लाजिम्याबद्दल २००० लारी पट्टीपछोडी ठरली आणि बाग कोलबें अमानतींतून मोकळी झाली. (ले० ४६-४७). याप्रकारें यावनी खिदमत खलास होऊन स्वधर्मीयांची सेवावृत्ति सुरू झाली, आणि मराठशाहींतल्या जमेदारीचा मान मावळंगकरांत प्रथम रंगोबास लाभला.

दाभोळ सरदेशमुखीचा हक्क लवाजिमा मागाहून ठरविण्याचें शिवाजीचें आश्वासन त्याच्या कारकीर्दींत पुरें झालें नाहीं. संभाजीच्या वेळीं अवश्य ती चौकशी होऊन दाभोळ मामल्यापैकीं हमजाबाद व जाफराबाद येथील सरदेशमुखीचा हक्क व दाभोळचे राहिलेले हक्क रंगोबाचे माथां शेरणी (नजराणा) ठेवून त्यास देण्याचें सुक्रर झालें होतें; परंतु मोंगलांच्या धामधुमीमुळें उडालेल्या गडबडींत वतनाची सनद रंगोबाच्या हातीं आली नाहीं. ती पुढें स. १६९६ त राजारामाचे वेळीं मिळाली; (ले० ५१.) या वतनाबद्दल रोख १२५०० दाभोली लारी व इतर पट्याबाबींच्या सरकारी वसुलावर व मोहतर्फा वगैरे बाबींवर ठराविक आकाराची मोईन सरदेसायांस वेतन ह्मणून मिळण्याचें ठरलें. नजराणा १५००० लारी बसला. दाभोळ याखेरीज मौजे तनाली तर्फ हवेली आणि मौजे चिंचघर ताा खेड हीं दोन गांवें या च सनदेनें इनाम मिळालीं. मिळालीं. दूरच्या दाभोळ सुभ्याच्या कारभारास हणमाजी केशव खेर यास पाठविण्यांत आलें.

याच सुमारास नरहर कृष्ण वगैरे तिघां खानवलीकर बंधूंस दाभोळ सुभ्याच्या सरदेशमुखीची मुतालिकी वंशपरंपरेच्या हक्कानें रंगोवानें दिली. हे खानवलीकर तेव्हांपासून आपल्यास "सरमुकादम" म्हणवूं लागले. हें घराणें हल्लीं संगमेश्वर तालुक्यांतील चिखली–रांगांव येथें नांदत आहे.

दोन शतकांची यावनी अमदानी संपवून तिची जागा स्वधर्मी स्वजनांनीं पटकावल्याबरोबर कोंकणप्रांतींच्या जमेदारांवर प्रथम काय परिणाम झाला हें तुलनेनें पाहणें येथें अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें.

या दूरच्या डोंगराळ व रुक्ष प्रदेशाशीं मिजासींत रुळलेल्या बादशाहांच्या व त्यांच्या बड्या सरदारांचा प्रत्यक्ष संबंध येणें असंभवनीय च होतें. इकडील मुख्य मुख्य किल्ल्यांवर दरबारच्या वर्गीचे व विश्वासांतील तिसऱ्या चौथ्या दर्जाचे मुत्सद्दी एकदां हवालदार नेमून पाठविले कीं प्रांताच्या प्रत्यक्ष कारभाराची व दरबाराची फारखत च होत असे. किल्ल्यांचा कडेकोट बंदोबस्त, बादशाही खजिन्यांत वसुलाचा वक्तशीर भरणा, आणि ताब्यांतील मुलखाची न्यायमनसुबी एवढीं तीन कामें या अंमलदारांचीं आदि कर्तव्यें असत. पहाडी किल्ले मूळचे च फार बळकट, व अवघड जागीं बांधलेले असल्यानें शत्रूंपासून त्यांचें संरक्षण करण्याचें काम विशेष दगदगीचें नसे. महसुलाची जबाबदारी अव्वल अखेर संभाळण्यास देशमुख, देशपांडे वगैरे जमेदार कायमचे होतेच; एखादे वेळीं वसुलास वेळ झाला तर सरदेशमुखास पकडून किल्ल्यावर डांबून टाकल्याची वर्दी दरबारास दिली कीं आपली जबाबदारी संपली इतकीच हवालदाराची समजूत असे. न्यायमनसुबीचा बराच भाग गांवची जमात गांवांत आटोपी; तिचें लोण हवालदारसाहेबांपर्यंत चुकूनमाकून येऊन पोंचलें च तर बडी मजालिस भरवून तिचा निकाल होई; देवाच्या उत्सवमूर्तीप्रमाणें फार तर मजालसींत उच्चासनावर विराजमान होऊन तमाशा पाहण्याचा प्रसंग त्यांजवर येई; हल्लींच्या सभांतील अध्यक्षाच्या कामाइतकें देखील या सभापतींचें काम अवघड नसे. मुख्य कर्तव्यांतून इतक्या सुलभ रीतीनें पार पडण्याची सोय असतां मिजासखोरीकडे स्वाभाविक कल असणारे मुसलमान अंमलदार भेटीस

येणाऱ्या जाणाऱ्यांस " सलाम आलेकुं–आलेकुं सलाम " करण्यापलीकडे कशाला अधिक पंचाईत करतील ? त्यांचा काल ख्यालीखुशालींत जात असल्यानें आपल्या अंमलांतील लोकांच्या सुखासमाधानांत त्यांजकडून बहुधां खलल पडत नसे. शिकारीच्या करमणुकीशिवाय ताब्यांतील मुलखाची पाहणी करण्याकरितां वगैरे किल्ल्याच्या बाहेर पडण्याची तसदी ते घेत नसत. वसुलाच्या दृष्टीनें या भिकार प्रांतांतून अधिक रकम येण्याची अपेक्षा दरबारांत नसे. रयतेवरील सारा बेताचा, कायम पद्धतीचा असल्यानें तो भरण्यास त्यांस जाचक होत नसे. लढाया, स्वाऱ्या, शिकारी यांची मुलख उजाड पाडणारी धामधूम या प्रांतीं जवळजवळ नव्हती च. टोळधाडीसारख्या क्वचित् येणाऱ्या आपत्ति अपवादात्मक होत्या; त्यांच्यायोगें रयतेची असहाय्य स्थिति झालीच तर सरदेशमुख पदरच्या पैशानें–प्रसंगीं कर्जवाम काढून—रयतेचा भार स्वतःचे अंगावर घेण्यास तत्पर असत, आणि तसा तो अंगावर घेण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत असे. जमेदारांचे उपकार रयत हि कृतज्ञतापूर्वक स्मरत; आणि यामुळें उभयतांचें परस्परसंबंध सलोख्याचे व प्रेमाचे राहून सर्वत्र आबादानी नांदे.

सर्वच प्रांताधिकारी या नमुन्याचे असत असें नाहीं. एकादा दुसरा खारटतुरट व जुलमी असे; परंतु असला एखादा भेटला च तर बादशाहाच्या दरबारीं वशीला बांधून त्यास 'तहगीर' करण्याची सवड असे. त्याची इभ्रत राखण्याकरितां लोकांच्या बोकांडीं त्याला च बसवून ठेविला तर च आपली इज्जत टिकून राहील ही विचारसरणी तत्कालीन सुलतानांच्या किंवा त्यांच्या वजीरांच्या मेंदूंत उदय पावली नव्हती. यामुळें तिच्या जोरांत तोऱ्यानें वागण्याचें धारिष्ट्र हि अंमलदारांत आलेलें नव्हतें, आणि बड्या अंमलदारांविरुद्ध गिल्ला करून कांहीं उपयोग नाहीं या निराशेच्या भूतानें हि रयतेच्या हितकर्त्या पुढाऱ्यांस पछाडलेलें नव्हतें.

परकीय यवनसत्ते खालीं आपण आहों; स्वातंत्र्यास आपण पारखे झालों आहों या कल्पनेची लोकांस पुरती तोंडओळख हि राहिली नव्हती. मुसलमान राज्यकर्ते परदेशांतून आले खरे, परंतु त्यांनीं हिंदुस्थान आपलें

कायमपणें राहण्याचें ठिकाण केल्यानें आरंभीचा त्यांचा परकेपणा लोपून गेला होता. धर्माची बाब वगळल्यास बाकी गोष्टींत त्यांचे व येथील लोकांचे हितसंबंध एक च झाले होते. धार्मिक बाबतींत सुद्धां बेदर किंवा विजापुर येथील सुलतानांकडून कोंकणप्रांतांत जुलूम झाला होता असें आढळून येत नाहीं. माणुसकी, सुधारणा, भूतदया वगैरे बाबतींत स्वतःस सर्व जगांत श्रेष्ठ समजणाऱ्या युरोपियन लोकांतील प्रथमतः इकडे आलेले जे पोर्तुगीज लोक त्यांनीं मोठ्या कळकळीनें 'एका गालावर थप्पड बसल्यास दुसरें थोबाड पुढें करावें' असला अत्यंत अनत्याचारी सहनशीलतेचा उपदेश करणाऱ्या धर्माचा शेजारच्या गोमांतकांत प्रसार करण्याकरितां जीं अनन्वित कृत्यें केलीं, लोकांचा जो अमानुष छळ केला, त्यापुढें मुसलमानांनीं थोडा बहुत जुलूम कोठें केला असल्यास त्याचें तळकोंकणच्या लोकांस कांहीं च वाटलें नसेल. जिंकलेल्या लोकांस राजकीय सत्ताधारी अस्पृश्यांप्रमाणें आपल्यापासून दूर न ठेवतां त्यांच्यांत मिळून मिसळून वागत. या सर्व कारणांस्तव स्वतंत्रता गेल्याबद्दलची हळहळ किंवा पारतंत्र्य घालविण्याची चळवळ लोकांत साधारणपणें नव्हती म्हटलें तरी चालेल.

पुढें स्वराज्य झालें. अनेक शतकें रुसून दूर गेलेलें स्वातंत्र्य ठिकाणावर आलें, तेव्हां त्याचें स्वागत करण्याकरितां व बडदास्त ठेवण्याकरितां पूर्वींची व्यवस्था झाडून सारी बदलावी लागली. किल्ल्यांबाहेर कधीं काळीं येणाऱ्या विलासी अंमलदारांच्या जागीं रानावनांतून हिंडणारे, डोंगरपठार भराभर चढणारे, प्रांताचा कोनाकोंपरा ठाऊक असणारे आणि नाचण्याची भाकर व हुलग्याचें माडगें याजवर प्रसंगीं गुजराण करणारे कणखर अंमलदार आले; स्वाऱ्या, वेढे, लढाया अंगणांत व परसावांत होऊं लागल्या; अनेक जागची लूट खर्चास अपुरी पडून नवीन जबर सारे ठरविण्यांत येऊं लागले; आणि मूळच्या मालकांशीं इमानें इतबारें राहिलेले 'कोंकणांतील पातशाई अंमलदार यांणी' नवीन मालकाच्या दृष्टीनें 'बेमानी केली आणि ते नतीजा पोंहचून उधळून गेले'. एकूण एक जमेदारांचीं दरोबस्त वतनें इनामें, असल्याच कांहीं कारणास्तव, दिवाणांतून अमानत (सरकारांत

जप्त) झालीं. स्वराजाच्या या पहिल्याच लाटेनें रंगोवा प्रभावळीकरास ज्या गटंगळ्या चारिल्या व त्याची जी दुर्दशा केली तिचें वर्णन त्याच्या शब्दांनीं देतों. ले० ५१ मध्यें रंगोवा म्हणतो— **स्वामीनें कुलवतनदाराचे हक्क व इनामती अमानत केल्या, खंड हि बेमुबलगा बांधला त्यामुळें आपला कांहीं उवार राहिला नाहीं; सर्वस्व खंडाचे भरीस पडलें....मुतालीक व चाकर होते त्यास भक्षावयासी नाहीं ऐसा अर्थ झाला, यार्कारतां कितेक आपणास टाकून गेले."** स. १६९६ तील म्हणजे वतनवाडी अमानत झाल्यानंतर ३०।३५ वर्षांनंतरचें हें रडगाणें आहे. रंगोवाचा कांहीं अपराध होता म्हणावा तर जप्तींतील दोन सुभांची सरदेशमुखी जप्तीनंतर अवघ्या दोन वर्षांत च खुली होऊन वंशपरंपरेनें चालण्याच्या हक्कासह त्यास परत मिळाली होती. दहा बारा गांवचें इनाम भोगणाऱ्या रंगोवास तो कोणत्या हि प्रकारें गुन्हेगार नाहीं हें ठरल्यावरसुद्धां ३० वर्षें असा काल कंठावा लागला तेव्हां त्याची सर्व मिळकत तिसऱ्या कारकीर्दीस त्याच्या पुनः हातीं आली ! स्वराज्य ही चीज कांहीं और आहे ! तिचे लाड पुरविण्याचें काम मोठ्या खर्चाचें, भानगडीचें, दिरंगाईचें व यातायातीचें आहे यांत संशय नाहीं.

प्रभावळी दप्तरांत सन १६९९ ते १७०१ या सालांतील एक सुद्धां कागद मिळाला नाहीं. स. १७०२ च्या जून महिन्याच्या कागदांत रंगोवाचा थोरला मुलगा गणोवा याचें नांव सरदेशमुख म्हणून लागलें आहे. तेव्हां वरील तीन वर्षांत केव्हां तरी रंगोवा मृत्यु पावला असावा. त्याची कारकीर्द ४० वर्षें झाली. मृत्यु समयीं त्याचें वय ६० वर्षांचें असावें.

वतनाचा कारभार करणाऱ्या मावळंकर सरदेशमुखांत रंगोवाइतका नशीबवान् दुसरा कोणी आढळत नाहीं. अत्यंत गडबडीच्या काळांत त्याचें सर्व आयुष्य जाऊन हि विशेष दगदगीच्या सपाट्यांत तो सांपडला नाहीं. सन १६६० पर्यंत त्याचा बाप होता च. पुढें कृष्णाबाई सारख्या शहाण्या, धूर्त व दक्ष आईच्या खबरदारीमुळें करत्या सवरत्या गुमास्त्यांकडून कारभार सुरळीत चालला असल्यानें वयांत आल्यावर हि त्यास

त्यांत फारसें मन घालावें लागलें नाहीं; आणि कारभाराचा बोजा त्याचे स्वतःवर पडण्याची वेळ आली तेव्हां देशमुखांचीं मुख्य कर्तव्यें पहिल्याहून बरींच मर्यादित झालीं असल्यानें तो भारहि पुष्कळ हलका झाला होता. आतां त्याच्या वेळीं कोंकणप्रांत आपापल्या स्वाधीन करून घेण्याबद्दल मोंगल व मराठे यांच्यांत पराकाष्ठेचा झगडा लागला असल्यानें स्वस्थपणा जसा कोणालाच मिळणें संभवनीय नव्हतें तसा तो रंगोबाला हि मिळाला नव्हता; त्याची सांपत्तिक स्थिति एक वेळ फार खालावली होती व कांहीं काळ त्यास बऱ्याच काळजींत काढावा लागला होता; या गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी असल्या अल्पकालीन दुःस्थितीचा विसर पाडण्याइतक्या मोठ्या घडामोडी त्याच्या वेळीं नित्य होत होत्या. स्वराज्याची स्थापना करण्यांत अहर्निश गुंतलेल्या अनेक वीरांचे व मुत्सद्यांचे विविध प्रकारचे देशोद्धाराचे प्रयत्न रोज कानावर पडत होते तर कित्येक खटपटी प्रत्यक्ष हि पाहण्याचा योग त्यास वारंवार येत होता. त्यावेळीं मुसलमानांना काय किंवा मराठ्यांना काय जमेदारांस आपल्या बाजूस वळविणें अवश्य असल्यानें असल्या दंगलींत सुद्धां रंगोबास सत्ताधाऱ्यांकडून उपद्रव बिलकुल पोंचला नाहीं. बादशाहीचे अंमलदार व छत्रपतींचे सरदार या उभयतांकडून त्याचा मान मरातब च राखण्यांत आला. सारांश बाहेरील बडिवारांत उणेपणा असलाच तर परिस्थित्यनुरूप तो विशेष मनाला लावून घेण्याइतका खचित नव्हता. घरीं संसारसुख त्यास उत्तम प्रतीचें मिळालें होतें. रंगोबाच्या बायका दोन झाल्या; पहिलीस चार मुलगे व दुसरीस एक मुलगा व एक मुलगी याप्रमाणें त्यास संततिलाभ झाला. त्याच्या सर्व मुलांनीं पुढें घराण्याचा जो चहूंकडून उत्कर्ष केला त्यावरून त्यांच्या लहानपणीं हि त्यांच्या भावी मोठेपणाचीं चिन्हें रंगोबाच्या दृष्टोत्पत्तीस आल्यावांचून राहिलीं नसतील. एवं च लोकांत मानमान्यता पावून, दीर्घायुष्य भोगून, मुलाबाळांनीं, आप्तेष्टांनीं व नोकरचाकरांनीं गजबजलेल्या घरांत, घराण्याच्या भावी उत्कर्षाच्या सुखस्वप्नांच्या गुंगींतच या भाग्यशाली रंगोबाचें परलोकीं प्रयाण झालें असावें असें मानण्यास हरकत नाहीं.

रंगोबाच्या पश्चात् सरदेशमुखीचा कारभार त्याचा वडील* मुलगा गणोबा याजकडे आला. ही वेळ मराठ्यांच्या नुकत्या च स्थापन झालेल्या राज्यास मोठ्या आणीबाणीची होती. तें राज्य सफै बुडविण्याकरितां कित्येक दिवस दक्षिणेंत उतरलेला औरंगजेब मनःपूर्वक जोराची खटपट करीत होता. त्याच्या प्रयत्नांस मराठे वीर व मुत्सदी चहूंकडून पायबंदी करीत होते. प्रांतांतील गड किल्ले पाडाव करीत औरंगजेबानें पुढें जावें आणि मागाहून मराठ्यांनीं थोड्या वेळांत ते पुनः हस्तगत करून घ्यावे असें एकसारखें चाललें होतें. त्यांत च सातारा किल्ला पाडाव झाला आणि राजाराम हि एकाएकीं मृत्युमुखीं पडला, त्यामुळें मराठ्यांस रसातळास पोंचविण्यास उत्कृष्ट संधि मिळाली असें वाटून बादशाहास दुप्पट आवेश चढला. हरएक प्रकारचा स्वार्थत्याग केल्याखेरीज राज्याचें, धर्माचें किंबहुना स्वतःचें रक्षण होणें अशक्य ही खात्री पक्की झाल्यानें प्रत्येक मराठा औरंगजेबास कसून विरोध करण्यास सज्ज झाला होता. शिवाजीच्या तालमींत तयार झालेला मुत्सदी रामचंद्रपंत हा या कामीं पुढारी लाधल्यानें व त्याला सर्व जातींच्या मराठ्यांचें पूर्ण सहाय्य मिळाल्यानें औरंगजेबाचे सर्व प्रयत्न निष्फळ होऊन त्याची व त्याच्या लोकांची दुर्दशा उडाली व याच स्थितींत तो स. १७०७ त मरण पावला. सन १७०० ते १७०७ पर्यंतचीं ७।८ वर्षें याप्रकारें आत्मसरंक्षणाच्या कामीं सर्वस्वीं खर्चीं घालावीं लागल्यानें, राजारामाच्या नेभळेपणानें मराठे सरदारांत एकमेकांविषयीं उत्पन्न झालेल्या मत्सर, द्वेष वगैरे दुर्गुणांस पुरतेपणीं प्रकट होण्यास अवकाश मिळाला नव्हता. राजारामाच्या मृत्यूनंतर राज्यावरील शाहूचा वारसा दूर सारून आपल्या अल्पवयी मुलास तख्तनशीन करून राज्याचीं सर्व सूत्रें स्वतःच्या हातांत नाचविण्याच्या ताराबाईच्या महत्वाकांक्षेमुळें त्या दुर्गुणांस आपला खेळ दाखविण्यास रंगभूमि

* मागाहून हातीं आलेल्या कागदपत्रांवरून केशव ना० हा रंगोबाचा दुसरा मुलगा हें स्पष्ट झालें. परंतु त्यापूर्वी च पहिल्या माहितीप्रों केशवास वशावळींत वडील म्हणून नमूद केलें होतें तें तसेंच छापूनहि गेलें.

मोकळी सांपडली. जेथें ताराबाईच्याच पक्षांतील रामचंद्रपंत अमात्य व त्यांचे हस्तक परशराम त्र्यंबक यांच्या सारख्या शहाण्यासुर्त्या व कर्त्या-सवरत्या प्रमुख मुत्सद्यांत वैमनस्य आलें, तेथें शाहु व ताराबाई या एक-मेकांविरुद्ध उठलेल्या प्रतिस्पर्ध्यांच्या अनुयायांतील वैर कोणत्या थरावर गेलें असेल याचें अनुमान करणें अवघड नाहीं. या वैरास स्वार्थपरायण-तेचा पूर्ण पाठिंबा होता च. त्यामुळें शिवाजीनें मुसलमानांच्या हातून महा-राष्ट्र थोडाबहुत हिसकावून घेतल्यावेळीं बादशाही जमेदारांवर जी आपत्ति येऊन आदळली तिचीच सुधारून वाढविलेली आवृत्ति या गृहकलहांत निघाली. शाहूस बिलकुल थारा न देण्याविषयीं प्रत्येक जमेदारास तारा-बाईकडून सख्त ताकीद झाली तर आपल्यास ताबडतोब येऊन मिळण्या-विषयीं त्यास शाहूचा तगादा सुरूं झाला. कोणती बाजू न्याय्य याविषयींचा निश्चय न झाल्यामुळें जेथें शंकराजी नारायणासारख्या पराक्रमी सरदारास जलसमाधि घेणें अवश्य झालें, तेथें छोट्या मोठ्या देशमुखांसारख्या जमेदारांची किती तिरपिट उडाली असेल बरें? येथें या गोष्टीचा इतका पाल्हाळ करण्याचें कारण एवढेंच आहे कीं, गणोबा कारभारावर आला त्यावेळीं त्याला या बिकट परिस्थितींतून वाट काढून स्वतःचा व वतनाचा बचाव करावा लागला. तें काम त्यानें मोठ्या चतुराईनें पार पाडिलें. मोंगल व मराठे आणि ताराबाई व शाहु या दोन तीक्ष्ण कात्र्यांच्या तडाक्यांतून तो सुखरूप निभावला, एवढेंच नव्हे, तर उलट या सर्वांचा विश्वास संपादून त्यांजकडून शाबासकी व इनामें त्यास मिळवितां आलीं. यावरून तो मोठा धूर्त व व्यवहारदक्ष होता हें निःसंशय आहे. स. १७०२ ते १७२० पर्यंतचे लेखांक पाहिल्यास ताराबाईचा शिवाजी, राजसबाईचा संभाजी, रामचंद्रपंत अमात्य व सातारा व कोल्हापुर येथील प्रतिनिधि या सर्वांची त्याच्यावर एकसारखी मेहरबानीच असलेली आढ-ळते. मराठ्यांकडील एकहि माणुस जायबंदी न होऊं देतां, विशाळगडचा किल्ला मोंगली अंमलदाराकडून युक्तीनें आपल्या ताब्यांत घेऊन तो परश-रामपंताच्या हवालीं करण्यांत त्यानें दाखविलेल्या हिकमतीनें तर प्रतिनिधि

घराण्याची त्याच्याधर अत्यंत मर्जी बसली. त्यानें मिळविलेलीं बहुतेक इनामें हीं प्रतिनिधींच्या कृपेचीं फळें होत. अशाप्रकारें परस्परविरुद्ध पक्षीयांस संतुष्ट राखण्यास दुटप्पी वर्तन ठेवणें अपरिहार्य होतें. असल्या व्यवहारदक्षतेस कावेबाजी हें निंदाव्यंजक नांव हि मिळतें. शिवाजीचीं कारस्थानें पाहिलेल्या व त्याच्या पश्चात् तीं स्वतःच्या जबाबदारीवर पुढें चालविणाऱ्या आणि नंतर ताराबाईचा पडता पक्ष धरल्यानें चित्तवृत्तीचा वारंवार प्रक्षोभ होत असलेल्या, शांत व दान्त रामचंद्रपंत अमात्यास गणोबाची कारवाई कावेबाजी वाटून बिलकुल रूपली नाहीं. त्यांच्या रागाची थोडी चुणूक गणोबास एक दोन वेळां पहावयास मिळाली. ताराबाई व शाहु यांच्या दरम्यान कटकटी सुरू झाल्यावेळीं गणोबानें खूप हुशारीनें तटस्थपणाचा आव आणिला होता. त्याबरोबर पंतांनीं त्याची सरदेशमुखी काढून ती डोंगरकर कान्होबा बिन नरसोबा यास दिल्याचें आज्ञापत्र काढिलें. शाहूची सरशी लवकरच झाल्यानें पंताचें हें आज्ञापत्र शाहुबद्दलची गणोबाची राजनिष्ठा शाबीद होण्यास उपयोगीं पडलें; व ताराबाईचीच सत्ता अत्यंत मर्यादित झाल्यानें पंतांचें फर्मान नुस्तें कागदांत राहिलें हें खरें, तरी ताराबाईच्या अंमलांत असलेल्या राज्याच्या भागांतील गणोबाचें इनामी उत्पन्न अमानत झालेंच. गणोबानें आपला धाकटा भाऊ दादोबा यास पंतांच्या दिमतीस पाठवून तें उत्पन्न मोकळें करून घेतलें. यावेळीं कोंकणप्रांतीं सत्ताधारी शिवाजी, शाहु व शिद्दी असे तीन होते, व ज्यास जिकडे हात चालविण्यास सांपडे, तिकडे तो खुशाल चालवीत असे. गणोबा वगैरे बंधु पांच होते व ते हि पण सर्व एकोप्यानें होते; म्हणूनच प्रत्येक मालकाच्या वांटणीला निरनिराळा सरदेशमुख देतां येऊन वतनाचा सांभाळ करतां आला. पंतांचा गणोबावरील राग जरी पुढें पुष्कळ कमी झाला, तरी मधून मधून त्यास एकादी उसळी येत असे. ता। ९।८।१७१० च्या आज्ञापत्रांतील “ तुम्ही वतनदार येकनिष्टेस अंतर पडों न देतां येकरूपतेने सेवा करावी आणि स्वामीची कृपा संपादून घ्यावी ते गोष्टी न करितां त्याच अविलंबी पडोन स्वामी-

नी कृपा करावी यैसी वर्तणुक न केली" हा मजकूर, व ता. १०।१०।१७१० च्या पत्रांतील " नेमास अंतर करावे हा तुमचा पुरातन दंडकच आहे येणेंकरून परिणाम बरा होत नाहीं " हे शब्द पाहिले म्हणजे पंतांचा गणोबावरील राग कितपत मावळला होता हें दिसून येतें. तेंच यावेळचीं व यानंतरचीं शाहूचीं आज्ञापत्रें पाहिलीं म्हणजे एकनिष्ठतेबद्दल गणोबाची तारीफ केलेली नाहीं असें आज्ञापत्र क्वचित् आढळतें. एका राजाच्या विश्वासास व कृपेस पात्र झालेली मंडळी त्याच्या मागून गादीवर येणाऱ्या राजाच्या अवकृपेस पात्र झाल्याचा चमत्कार इकडे पुष्कळ वेळां दृष्टीस पडतो. पुढल्याच्या अवकृपेचें विशिष्ट कारण हि मागल्याच्या कृपेव्यतिरिक्त निराळें उमगून येत नाहीं. गादीचा एक मालक दिवंगत झाल्यानंतर वारसानात्यानें त्याच्या जागीं येणाऱ्या दुसऱ्या मालकाच्या बाबतींत जर असा प्रकार होतो– संभाजीच्या कारकीर्दीत शिवाजीच्या वेळच्या कांहीं प्रतिष्ठित इसमांची उडालेली दुर्दशा एवढें एक उदाहरण या संबंधांत खात्री पटविण्यास पुरें आहे— तर राज्याच्या मालकीकरितां एकमेकांचा उच्छेद करण्यास उठलेल्या दोघां प्रतिस्पर्ध्यांतून एकाच्याहि गैरमर्जीस बळी न पडतां अचाकन सुटणें एवढी सुद्धां करामत प्रशंसनीय आहे; मग उभय विरुद्ध पक्षाची कृपादृष्टि आपल्याकडे वळवून घेण्यांत गणोबानें पूर्ण यश मिळविलें ही गोष्ट त्याच्या दूरदर्शित्वाची व व्यवहारचातुर्याची उत्कृष्ट निदर्शक नव्हे असें कोण म्हणेल ? स्वराज्यांतील मावळंकर सरदेशमुखांत भाग्यशालीपणांत जसा रंगोबा तसा कर्तबगारींत आम्हांस गणोबा अग्रगण्य वाटतो. वतन संभाळण्यापलीकडे आपल्यास कांहीं कर्तव्य आहे किंवा करिता येईल अशी कल्पना त्याला शिवली असती तर त्याचें नांव आज महाराष्ट्राच्या इतिहासांत खचित चमकलें असतें. शिवाजी महाराजांच्या वेळीं तो असता तर त्याच्या योग्यतेचें खरें चीज खचित झालें असतें.

नियमास अपवाद पाहिजे म्हणूनच जणुं काय गणोबासहि एक घराणें विरुद्ध झालें. आरमाराचे मुख्याधिकारी आंगरे यांची मात्र गणोबावर शेवटपर्यंत अवकृपा होती. कान्होबा नरसोबाचे पक्षपाती म्हणून असो किंवा

दुसरें कांहीं कारण असो गणोबा व त्याचें घराणें यांजवर आंगऱ्यांचा दांत पुष्कळ दिवस राहिला. प्रतिनिधींचा लोभ व खुद्द शाहू महाराजांची कृपा गणोबावर असल्यामुळें, आंगऱ्यांस गणोबाचें विशेष नुकसान करितां आलें नाहीं ही गोष्ट वेगळी; तरी पण दिवसेंदिवस बळावत गेलेल्या या सरदारांचा राग प्रभानवल्लीकरांस थोडा बहुत भोंवल्याशिवाय राहिला नाहीं. परशराम त्र्यंबकानंतर प्रतिनिधींच्या घराण्याचें दरबारांतील वजन एकसारखें कमी होत गेलें. त्यांच्या जागीं पंत प्रधान पेशवे यांचें वाढत गेलें, आणि पेशव्यांची जरी गणोबावर व त्याच्या घराण्यावर कृपा होती तरी शिरजोर होत चाललेल्या आंगऱ्यांच्या रागापासून गणोबाचें रक्षण करण्या-इतकें त्या कृपेचें तेज प्रखर नव्हतें. त्यामुळें आंगऱ्यांच्या प्रत्यक्ष अंम-लाखालील प्रांताची सरदेशमुखी, नांवानें नसली तरी प्रत्यक्ष वहिवाटीनें, डोंगरकर घराण्यांत जाऊं देणें प्रभावळीकरांस भाग झालें. अशा रीतीनें विजयदुर्ग भागाच्या (म्हणजेच पुढें राजापुर सुभ्याच्या) सरदेशमुखीची लगाम प्रभावळीकरांच्या हातून सैल पडत जाऊन डोंगरकरांच्या हातीं कायम झाली.

वतनाचा कारभार पाहूं लागल्या दिवसापासून पूर्वीं अमानत झालेलीं वतनें व इनामती सोडवून घेण्याची व त्यांत वाढ करण्याची एकहि संधि गणोबानें फुकट दवडिली नाहीं. १८।२० वर्षांच्या त्याच्या कारकीर्दींत त्यानें काय काय संपादन केलें तें त्या वेळच्या कागदपत्रांत तपशीलवार दिलें आहे च; येथें फक्त गोळाबेरजेनें त्याचा उल्लेख केला म्हणजे पुरें.

सदर मुदतींत गणोबा नायकानें—

(१) बाग मौ० कोलवें व कोंड मौ० असुडें हे अमानतींतून मोकळे करून घेतले आणि प्रभावळी व दाभोळ या सुभ्यांतील १४४० गांवांचा हक्कलवाजिमा कांहीं ठिकाणीं पूर्ववत् चालू करून घेऊन कांहीं ठिकाणचा वाढवून घेतला.

(२) शिवाजीच्या नवीन व्यवस्थेंत वरघांटीं मलकापुर व असंडोली तालुके नवे होऊन त्या खालीं तळघांटचे गांव गेले होते. मलकापुर

पैकीं ४१ व असंडोली पैकीं ४४ गांवच्या सरदेशमुखीचा आपला हक्क शाबीद करून तो मिळविला व तेथील पुष्कळ हक्क हि नवीन संपादन केले.

(३) राजापुर, लांजें, सौंदळ, चिपळुण, खेड, मलकापुर व असंडोली या तालुक्यांतील अनेक गांवांत मिळून ३ चाहूर नवीन इनाम जमिनी मिळविल्या. याशिवाय हातखंबें, हरचिरी, देवरुख, मिठगावणें व मालगुंड येथें कित्येक बिघे जमीन इनाम मिळविली. प्रभावळी तालुक्यांत २५ खंडीची भातजमीन मिळविली.

(४) धामापुर व प्रभावळीची देसाईवाडी या गांवांच्या इनामाच्या सनदा करून घेतल्या आणि नेवरें कर्यातीपैकीं बाग निरखोल संपादिली.

(५) सर्व इनामावरील तिजाई पट्टी माफ करून घेतली व डोंगर गांवची कमाविशी मिळविली.

पंधरा वीस वर्षांच्या अवकाशांत कोंकणपट्टींतल्या एकाद्या देशमुखानें इतकें मिळविल्याचें उदाहरण त्या भागांत दुसरें आढळत नाहीं.

गणोबा व त्याचे धाकटे बंधु विसोबा व अंतोबा यांच्या नांवें जंजीऱ्याच्या शिद्दीचें ता २८।२।१७२० चें एक फर्मान आहे व त्यानंतरचें ता. ६।७।१७२० च्या आज्ञापत्रांत " गणोबा ना० अलीकडे मृत्यु पावले " असें म्हटलें आहे. यावरून गणोबा स. १७२० च्या माघ फाल्गुनाच्या सुमारास मृत्यु पावल्याचें होत आहे. या मुदतींतील एक हि कागद उपलब्ध नसल्यानें मृत्युतिथि यापेक्षां अधिक निश्चित करण्यासारखें तूर्त अन्य कांहीं साधन नाहीं.

रंगोबाप्रमाणें गणोबाच्या हि बायका दोन झाल्या. पहिलीस मुलगा प्रल्हाद ना० व मुलगी बची, आणि दुसरीस केशव व श्यामजी अशीं अपत्यें झालीं. संगमेश्वरकर जोशी व गोळवलकर पाध्ये यांच्यांत लग्नाची घटका घालण्याच्या हक्काबद्दल जें भांडण जुंपलें, व जें अखेर सरदेसायांस हि फुकटाफाकटीं बरेंच भोंवलें तें या बचीच्याच लग्नांत. केशव ना० पुढें वेगळा होऊन झोंबडी शाखेचा प्रवर्तक झाला व श्यामजी हा चुलता विसोबास दत्तक झाला. मुंढर येथील शाखा या श्यामजीचा वंश होय.

गणोबाच्या सर्व उद्योगांत त्याचे बंधु केशव, विसोबा, दादोबा, व अंतोबा यांचें त्यास अप्रतिम साह्य मिळालें. मावळकराच्या सरदेशमुखी अंमलाच्या प्रदेशाची मराठी राज्यांत फेर फाळणी होऊन त्याचे निरनिराळे विभाग निरनिराळ्या सुभेदारांच्या ताब्यांत गेले असतां वेगवेगळ्या जागीं सरदेशमुखीचा कारभार संभाळण्यास घरच्या या संचामुळें अडचण आली नाहीं. दंडाराजपुरीच्या शिद्दींचा अंमल हि दाभोळ प्रांतांत जारी होता. मराठी अंमलाच्या विभागांत सुद्धां दोन छत्रपति, दोन प्रतिनिधि, अमात्य, आंग्रे, सरखेल आणि जोत्याजी केसरकर, खंडोजी माणकर इत्यादि अंमलदारांची गर्दी उडाली असतां, व प्रत्येकाचा आपल्यापाशीं स्वतंत्रपणें सरदेशमुख हवा असा आग्रह पडला असतां, पांडवांप्रमाणें हे पांच बंधु मोठ्या जुटीनें वागणारे, नेटानें एकमेकांचा पाठपुरावा करणारे व अंगावर पडलेली जबाबदारी हुशारीनें संभाळणारे होते म्हणूनच घराण्याचा निभाव लागला.

गणोबाच्या पश्चात् केशव ना० चार वर्षांनीं (स. १७२४) वारले. तरी बाकीच्यांनीं व विशेषतः दादोबा व अंतोबा यांनीं प्रल्हाद नायकास हातीं धरून पहिल्याच नेटानें काम पुढें चालविलें. दादोबानें शिद्दी संभाळिला, अंतोबानें प्रतिनिधींकडची बाजू आटोपिली आणि प्रल्हाद ना. स बरोबर घेऊन इतर ठिकाणची कामगारी विसोबानें निस्तारिली. दादोबानें शिद्दीकडून तनाली तर्फ वेलंब हा गांव इनाम मिळविला आणि दाभोळसुभ्यापैकीं हमजाबाद व जाफराबाद येथील वतनाचा जीर्णोद्धार करून घेतला. दाभोळ सुभ्यावर यावेळीं अंमल शिद्दीचा व छत्रपतीचा असा दुहेरी होता, म्हणून खेड तर्फेतील मौजे चिंचघर या आपल्या इनामगांवाबद्दल छत्रपतीची जरी सनद होती तरी दादोबानें मुसलमानी अंमलाचा उपसर्ग न व्हावा या हेतूनें तिकडील फर्मानहि करून घेतलें. या सुमाराचीं पत्रें पाहिल्यास शिद्दी व अमात्य, प्रतिनिधि वगैरे मराठे सरदार या दोनी बाजूंची सारखी कृपा संपादून कार्यभाग साधल्याबद्दल दादोबाची तारीफ केल्यावांचून राहवत नाहीं. वतनाचा जीर्णोद्धार व घराण्याचा सर्व बाजूंनीं उत्कर्ष करण्याची जी कामगारी गणोबानें आपल्या कारकीर्दींत

सुरू केली ती त्याच्याच तालमींत तयार झालेल्या या दोघां भावांनीं गणोवाच्या पश्चात् पंचवीस वर्षें यथामति, यथाशक्ति, सतत खपून पुरी केली. सरदेसाई बांधवांनीं स. १७२१ ते १७४४ पर्यंतच्या लेखांवर केवळ उडती नजर टाकल्यास दादोवा व अंतोवा यांची कर्तबगारी दिसून येऊन तिचें त्यांस सानंद कौतुक वाटेल. गणोवादि भावांच्या या मुदतींतील राज्याच्या एका भागांतील कामगारीची गोळाबेरीज करवीरकर संभाजी छत्रपतींच्या ता. २२।११।१७३२ च्या आज्ञापत्रांत समाविष्ट झाली असल्यानें तिची येथें पुनरुक्ति नको आहे. सारांश अठरावें शतक अर्धेमुर्धे पुरें झालें त्यावेळीं वतनदारीच्या बाबतींत हें घराणें उत्कर्षाच्या परमावधीला पोंचलें होतें. राजकृपा, प्रतिनिधींचा लोभ व अमात्यांची सहानुभूति यांची सांवली या घराण्यावर सतत असल्यानें त्याचा हा काल भरभराटींत व सुखांत गेला.

याच मुदतींत मलकापुर व असंडोली येथील सरदेशमुखीच्या हक्काचें पुनरुज्जीवन झालें, ओझरें बु॥ गांवांतील प्रतिनिधीच्या इनाम तक्षिमीचा हिस्सा मिळाला, आणि चिंचघर गांव दुमाला चालला. गणोवाच्या हातून सुरुवात होऊन जीं जीं कामें त्याच्या हयातींत पुरीं झालीं नव्हतीं तीं सर्व दादोवा व अंतोवा यांच्या हातून तडीस गेलीं.

स० १७३१ च्या पुढील कागदांत विसोवाचें नांव आढळून येत नाहीं. यावरून तो त्या सुमारास मृत्यु पावला असावा असें वाटतें. दादोवा सन १७४३च्या एप्रिल–मे महिन्यांत व अंतोवा स० १७४४ च्या नवंबर–दिसेंबरांत म्हणजे वर्ष दीड वर्षाच्या अंतरानें वारले. गणोवाचे पुत्र प्रल्हाद, केशव व श्यामजी, आणि दादोवाचा सदाशिव व अंतोवाचा नरहरि यांचीं नांवें पुढें वतन, इनाम व जमिनी यास लागलीं; तीं केव्हां केव्हां सर्वांचीं मिळून, तर केव्हां दोघांची आणि केव्हां तिघांची आणि केव्हां एकएकट्याचें अशीं लागलीं आहेत. घराण्याच्या हितापेक्षां व्यक्तीच्या स्वार्थाची आवड या पिढींत उत्पन्न होऊन दिवसेंदिवस बळावत गेली असें येथें दिसूं लागतें. अंतोवाच्या मृत्यूनंतर १०।१५ वर्षांतच या चुलत-

भावांत भांडणें सुरू झालीं. योग्य जागीं यथाक्रम त्यांची हकीकत येईल.

सरदेसायांवरील आंगऱ्यांच्या अवकृपेचा उल्लेख पूर्वीं केला आहे च. कान्होबा नरसोबास आपल्या ताब्यांतील एका सुभ्याची सरदेशमुखी मिळवून देण्यास आंगऱ्यांनीं वारंवार खटपट केली. मध्यवर्ती वरिष्ठ सत्तेंत जोम होता तोंवर आंगऱ्यांचें कांहीं चाललें नाहीं. या प्रकरणीं झालेला एकंदर पत्रव्यवहार पाहिला म्हणजे अंगांत भरपूर रग असली म्हणजे कमकुवत वरिष्ठ सत्तेला झुगारून देऊन शिस्तीचा पगडा न चालूं देण्याची आमची तयारी कशी असते हें चांगलें दिसून येतें. पहा कीं, कान्होबा नायकास सरदेशमुखी देण्याचा केवढा अट्टाहास आंगऱ्यांनीं धरला! कान्होजीपासून तुळाजीपर्यंत एकंदर पांच दर्यासारंग समकालीन वा एकामागून एक झाले; परंतु त्यांपैकीं एकानें तरी प्रभावळीकरांची पाठ सोडावयाची होती! जणुं काय प्रभावळीकरांवर शिस्त धरण्याचा तो एक आंग्रे घराण्याचा परंपरागत कुलाचार च! वतनदार धनी व वतनदार चाकर यांत असला हेवादावा एकदां उत्पन्न झाला म्हणजे तो परंपरेनें वाढत जाऊन कमजोर पक्षास नुकसानींत आणिल्याखेरीज राहत नाहीं. परिस्थितीची अनुकूलता मिळाली म्हणजे झालें. प्रभावळीकरांनीं आंगऱ्यांचें कांहीं वांकडें केलें असतें तर त्याचें उट्टें काढण्याचें तरी त्यांस निमित्त झालें असतें. फक्त **कान्होबाची** बाजू **कान्होजीनें** उचलली म्हणून त्या अभिमानाच्या आहारीं पडून एकूणएक आंगऱ्यांनीं एक च कित्ता गिरवावा हा चमत्कार नव्हे काय? आरंभीं आरंभीं छत्रपतींनीं व प्रतिनिधींनीं आंगऱ्यांस या बाबतींत ताकिदी केल्या; "सरदेसाई राज्याच्या फार उपयोगीं पडले, त्यांची सेवा एकनिष्ठ आहे, त्यांचें आम्हांस फार अगत्य आहे", वगैरे अनेक गोष्टी आंगऱ्यांच्या निदर्शनास वारंवार आणिल्या; परंतु व्यर्थ. जसजसे आंग्रे बळावत चालले आणि आरमाराच्या वाढत्या बुडाबरोबर त्यांचें हि बूड जड होत गेलें, तसतसें वरिष्ठांच्या पहिल्या जहाल ताकीदीचें स्वरूप मवाळी, समजूतवजा होऊन, लवकरच आर्जवाच्या पायरीवर उतरलें. बाजीराव बल्लाळासारख्या रणगाजी पंत प्रधानास असल्या क्षुद्र बाबतींत जेथें सूर कसा

चाहतो तें पाहून नेमस्तपणा पत्करणें जरूर वाटलें, तेथें हतप्रभ होत चाललेल्या प्रतिनिधींना आपल्या आश्रितांच्या बचावाकरितां नेभळट बोलणीं बोलावीं लागल्यास नवल काय? शिस्तीची वाट अशा प्रकारें लागल्यावर पायबंदी आपोआपच ढिली पडत जाते, जबरदस्ताचा डोईजडपणा अमर्याद वाढतो आणि समाजांत कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत न टिकण्याची वेळ येऊन पोंचते. शिवाजीच्या अपूर्व करामतीमुळें शिस्तीची घडी मोठ्या प्रयत्नानें बसली होती; परंतु तिचा मनापासून आवड बहुतेकांस नसल्यानें शिवाजीच्या मरणोत्तर ती तावडतोब बिघडूं लागली. तिला आळेंबळें कवटाळून धरण्यांत संताजी घोरपड्यास लोकांच्या अप्रियतेस बळी पडून अखेर प्राणांस मुकावें लागलें. कांहीं थोडा वेळ वगळल्यास मराठी राज्यांत अव्वल अखेर शिस्त आणि एकोपा यांचा आश्चर्यकारक अभाव च दृष्टीस पडतो. इंग्रजी राज्यांत या दोन गोष्टींचा परिपोष किती काळजीनें केला जातो हें तुलनेनें पाहिले म्हणजे आमचें दैन्य फारच हिडिस स्वरूपांत दिसूं लागतें. तरी सुद्धां आम्हांस त्याचें कांहीं वाटत नाहीं हा चमत्कार आहे! असो.

आंगऱ्यांच्या हेतूला छत्रपतींकडून पुष्टि मिळाली नाहीं; तेव्हां त्यांनीं जंजिऱ्याच्या शिद्दीकडे या बाबतींत एकवार इलाज केला. त्यांच्या या उपद्व्यापाची तिकडे कशी वासलात लागली तें पुढें दिलेल्या पत्रावरून दिसून येईल. पत्र ता० २ नवंबर १७३४ ई० चें आहे. त्याचा बराच विस्तृत उतारा देऊन गणोबादि पांच बंधूंच्या कारकीर्दींची रजा घेऊं. पत्राचा उतारा करण्यांत मधल्या ७।८ ओळींचें तात्पर्य कंसांत लिहिलें आहे; विरामचिन्हें पदरचीं दिलीं असून अवश्य वाटला नाहीं तो भाग कमी केला आहे. तावे अंमलदारांस सदरचा हु॥ जंजिऱ्याहून गेलेला आहे.

भाषा, विचारसरणी, व निस्पृहपणा यांमुळें खालील पत्र मजेदार वाटेल असें दिसल्यावरून तें जवळ जवळ सर्वच येथें उद्धृत केलें आहे. सोनारानें कान टोंचले म्हणजे नेहमींच बरें असतें. भलत्याच कामीं बगलबच्च्यांची केलेली पाठराखणी केव्हां केव्हां तोंडघशी कशी पाडते याचें पुढील पत्र एक भारदस्त व नमुनेदार उदाहरण आहे.

" सुभां जाहिर होत असे कीं कान्होबा मावलंगकर सालमजकूर झुट-सुट जयगडाहून सोबत सिपाई घेऊन मुलकांत येऊन देशमुखीचा हक तुम्हाजवळ मागतात आणि तुम्ही त्यांसी देऊं पाहातां तरी कान्होबासी देशमुखीसी काय संमध आहे? बाकी जैसे मावलंगकर आहेत तैसा कान्होबाहि आहे. अलबत कान्होबाचे चिचे यासी सरदेशमुखांचे घराणेयांत पोसणे धर्मपुत्र घेतला, असें म्हणोन कान्होबा कजिया करीत असेल तरी सारे दुनियामध्ये धर्मपुत्र कोणाचा कोण करीत नाहीं ? हर कोणी आपले गोत्रीचा अगर जातीमध्यें खूब देखोन घेतच आहेत; म्हणून धर्मपुत्राचे बापभाई जो घेतो त्याकडे हरयेक वारसीस पोंहचतो यैसे मुसलमानी अगर हिंदु राज्यांत चालत नाही हे महशूर सबजणास जाहीर असे. यावरून कानेबास हक काय पोहचत असे व तुम्हांस हक द्यावयासी काय दरकार? अवल तर त्यास काही वारसा पोंहचत नाही; तशांत कानोबा झुटमुट कजिया करितो त्याची फैसल कोठे करून घेतली आहे ? जे खरे बतनदार आहेत ते तर दुतर्फा राज्यात रुजु होऊन, सनद असनाद घेऊन चालवित असेत. कजियाची फैसल करून घेणे तर येक पादशाही अमीराना खानसाहेबांचे दरबार व दुसरें माहाराज छत्रपतीचें दरबार, यैसें दोन दरबारें असत तेथे रुजु होऊन करून घ्यावी होती; ते तर कांहीच नाही. येक वक्त अजम थोरले सरखेल (कान्होजी आंग्रे) याही दरबंदगी खानसाहेबांस कानोबाचेबाबे सिपारस लेहून सुंदर विझाजी व राघो बलाल यांसोबत जंजीरा दंडाराजपुरीस रवाना केले होते. त्यांनीं त्या बाबें अर्ज केला होता त्यावर दरबंदगी खानसाहेबीं हुकूम फर्माविला कीं सरखेलांची व आमची दोस्ती आहे तेथें त्यांचे सकुनावरून हरयेकाचे चालविणे. (येकमेकातर्फे वतनाचे कामास नेमून पाठविले ते खुशाल द्यावे घ्यावे). अंमा इनसाफाचे जाग बरहक्क निवाडा करावा लागत असे. खुसूस सरखेल अजमाही लिहिले कीं हकीकत खातिरेस आणून वाजिब होईल ते करावे. याबद्दल याचे वादी दादोबा ना० अंजनवेलीस असेत त्यासी बलाऊन आणवितों व राजापुर प्रांतीच्या वतनदाराच्या सड्या आणवितों,

याणेंहि कागदपत्र साक्षीमोझा असेल तो रुजु करावा म्हणजे खातरेस आणून फैसल होईल म्हणून हुकुम फर्माविला होता. त्यावक्तीं कान्होवानें तेथें राहोन, कागदपत्र रुजु करून फैसल करून घ्यावी होती. ते न करितां आपण कागदपत्र शाबीद मोझा घेऊन येतो यैसा मुचलका लिहून देऊन रजा घेऊन निघोन गेला. तो तसा आलियावरी बरहक्क निवाडा होईल म्हणून खानसाहेबीं सरखेल अजमांस जबाबस्वाल हि लिहिला. त्याप्रों कान्होवानें हाजिर व्हावें आणि फैसल करून घ्यावी ते घेतली नाहीं. त्यावर सन समान इशरीनामध्यें (स. १७२८ त) थोरले अजमांही सुंदर विझाजी व राघो बलाल यांसी जमाबंदीचे मुकादिमेयाकरितां हुजुर जंजीरेयास रवाना केले होते. त्यावेळीं त्यांहीं कान्होवास बोलिले कीं हालीं आम्हांस सरखेल जजीरेयास रवाना करीत आहेत; तुम्हांस कजिया चुकऊन रुजुवात चालवणे असेल तरी तुम्ही आम्हांबरोबर येणें; तुम्ही मुचलका लेहून दिल्हा असे त्यास सच्चे व्हाल व निवाडाहि होऊन येईल म्हणून; अंमा ते वक्तीहि त्यांचे बरोबर येऊन कान्होवा रुजु जाहाला नाहीं; त्यावरी थोरले सरखेल च्यार पांच वर्षे हयात होतेभी. हा कजिया खरा आहे यैसे त्यांचे मतें असते तर फेर कान्होवाचे बाबे दरबंदगी खानसाहेबास लेहून त्यास जंजीरा पाठवून फैसल करून घेते; अंमा त्यांचे मतें गैरवाजिबी आहे यैसे दिलांत आले, तरीच येलामाज (अनमान ?) केला होता. त्यावरहि आलाकडेस संन इसने सलासीनामध्यें (स. १७३२ त) सातारे यासी माहाराज छत्रपतींचे दरबारीं दादोबा ना० गेले होते तेव्हां कान्होवा मावलंकर हि सातारेयास गेले होते; त्यासी दादोबा ना० सरदेसाई यांही सांगोन पाठविलें कीं तुम्ही मागेमागें कजिया बोलत असतां तो काय मजकूर असे ? हाली आम्हीं हि आलों असों व तुम्हींहि हाजिर असां; तुम्ही आम्हीं माहाराज छत्रपतीचे दरबारी हकीकत जाहिर करून पेस्तर जैसा निवाडा होईल त्याप्रों तुम्हीं आम्हीं चालों, यैसे त्याचे बिराडास सांगोन पाठविले होतें. अंमा तेथें हि कान्होवा मावलंकर मनसुबीस खडे न राहातां, सरदेसाई यांसी न भेटतां तोंड चुकाऊन निघोन गेले. याप्रों

त्याची हकीकत असे. त्यास याचे वतनाचे कजियासी संमध नाही; व तुम्हांस सबजणांस दखल हि आहे. यैसे असतां झुटमुट कान्होवास हक द्यावयासी काय पोंहचत असे ? हालीं तुम्हांस ताकीद लिहिली जात असे; तरी ताकीद समजोन येक रुका कानोवास हकाबावत द्यावयास दरकार नसे; यैसे असोन कोण्ही त्यासी हक म्हणोन काही दिल्हे होईल, आणि ते खबर सुभा जाहिर जालियावर जो देईल त्यासी खूब सज्या पोचेल, व जो पैसे देईल ते वसूलहि घेतले जातील. याची येक जरा मुलाहिजा होणार नाही. रा छ १६ जाकर "

अठराव्या शतकाचा पूर्वार्ध पुरता खलास झाला नाहीं तोंच मुख्य वतनदार सरदेशमुख घराण्याच्या २८ व्या पिढीचा शेवटचा पुरुष मृत्यु पावला. धामापुरचे (हल्लीं डोंगरकर) घराणें वडील असतांहि मागें कसें पडलें हें पूर्वी सांगितलें च आहे. आंगऱ्यांच्या मदतीनें व प्रभानवल्ली-करांच्या नाइलाजामुळें राजापुर तालुक्यापुरती सरदेशमुखी धामापुर शाखेस या सुमारास मिळाली असावी. प्रभावळीकरांपैकीं अखेरचे कर्ते पुरुष दादोबा व अंतोबा हे कदाचित् डोंगरकरांशीं नित्य कटकट करण्यास अखेर अखेर कंटाळले असावे, किंवा त्यांच्या मृत्यूनंतर पुढल्या मंडळींत तितक्या चिकाटीचे कोणी राहिले नसावे, यांपैकीं एखाद्या कारणानें १८ वें शतक अर्धेमुर्धें संपल्यावेळीं किंवा थोडें आगेंमागें खुद्द राजापुर तालु-क्याची वतनदारी प्रभावळी घराण्यांतून कायमची हिसकली गेली. हातीं वतनाची वहिवाट बिलकुल नसतां किंवा गुमास्ते नात्यानें ती असतां धामा-पुरकर आपल्या नांवास "सरदेसाई मा० प्रभावळी व मा० दाभोळ, प्रांत राजापुर " हा हुद्दा लावीतच आले होते. हुद्याचें हें शेंपूट इतके दिवस फुकट वागविल्याचें अखेर अंशतः तरी सार्थक झालें. वडीलकीचा पूर्ण ग्रास प्रभावळकरांनीं आजवर केला होता तो थोडासा त्यांच्या जबड्यांतून सुटला. आजपर्यंत ज्या वतनांत हिस्से झाले नव्हते त्यांतून एक तुकडा अलग निघतांच त्यावेळेपर्यंत दृढ झालेली वतनाच्या अविभाज्यपणाची भावना दूर होऊन, पुढल्याच म्हणजे २९ व्या पिढीस अवश्य तितके

स्वतंत्र तुकडे झाले. आजवरची चाल अशी होती कीं, घराण्यांत एका पुरुषास अनेक पुत्र झाले म्हणजे इतरांची समजूत कोणत्या ना कोणत्या रीतीनें करून वडील पुत्र वतन आपल्याकडे ठेवी. ' राजारामसाहेबांस राज्य देण्याचें ईश्वराच्या मनांत असतें, तर त्यानें त्यांस संभाजी महाराजांचे मागून कां जन्मास घातलें असतें ? ' या बाळाजी आवजीच्या उक्तीचा भावार्थ पूर्वीपासूनच सर्वसंमत असल्यानें वडील भावाकडे वतन सर्वमान्य ठेवण्याचा इतर बंधूंस विषाद हि वाटत नव्हता. रंगोबाच्या इतके मुलगे (पांच जण) पूर्वीं कोणास झाले नव्हते; शिवाय त्यांत सावत्रपणा असून हि तो सर्वांत लहान भावाच्या वांट्यास आल्यानें कर्तबगार व एकोप्यानें वागणाऱ्या वडील बंधुचतुष्टयाच्या वाटेंत तो आडवा आला नव्हता. अंतोबाच्या बाबतींत सापत्नपणाची वागणुकहि बाकींच्याकडून झालेली नव्हती. एकोपा टिकण्यास याखेरीज मुख्य कारण म्हणजे सरदेशमुखीचा कारभार निरनिराळ्या चार ठिकाणीं चालल्यानें घरप्रपंच संभाळून त्याचा आटोप करण्यास पांच हि जणांची जरूर होती. प्रत्येकास भरपूर काम होतें, व त्या कामासंबंधें प्रत्येकास निरनिराळ्या जागीं वर्षांतून बहुतेक वेळ राहणें भाग पडत असल्यानें रिकामपणीं सुचणारे भांडणतंट्यांचे खेळ खेळण्यास कोणासच वेळ नव्हता. पण पुढल्या पिढींत सावत्रपणाचा जोर वाढला आणि त्यांत चुलतपणाची भर पडली, तेव्हां खेळास सुरवात होऊन लवकरच रंग आला. मोंगल साम्राज्याचा पाया खचूं लागतांच ठिकठिकाणचे मोंगली सुभेदार जसे स्वतंत्र सुलतान बनले, तसे वेगवेगळ्या जागीं काम करीत असलेले पोट–सरदेशमुख त्या त्या ठिकाणीं पुढें मुख्य झाले. नं ४ ची वंशावळ व तिची पुरवणी पाहिल्यास या देखाव्याचा आरंभ तेथें दिसेल. असें होणें म्हणजे कांहीं विलक्षण व अस्वाभाविक गोष्ट आहे असें म्हणण्याचा इरादा नाहीं. मोठ्या कुटुंबांत असें होणें एका दृष्टीनें अपरिहार्य व अनेक वेळां सुखाचें हि असतें; पण तें गुण्यागोविंदानें होणें वेगळें आणि परस्परांविषयीं अप्रेम बाणून होणें वेगळें.

विभक्तपणा सामोपचारानें घडून न आल्यानें घराण्याचा मोठेपणा मात्र पार नाहींसा झाला. तो कोणाच्याच वाट्यास अंशानें सुद्धां आला नाहीं. वजन नाहींसें झाल्यानें आलेला दुर्बळपणा सर्वांस सारखा भोंवला. पहिल्या इभ्रतीची आठवण लोकांत पुसट होत गेली आणि पुढल्या पंनास वर्षांत म्हणजे स्वराज्याच्या अखेर सरदेसायांचें घराणें एक वेळ सुप्रतिष्ठित व वजनदार होतें हें सांगून पटविण्याची पाळी आली. अठरावें शतक संपतांच म्हणजे महादजी शिंदे व नाना फडनवीस यांच्या मरणोत्तर 'मराठी स्वराज्य' अंतकाळचा ऊर्ध्व लागून आटपण्याच्या पंथास लागलें. नाड्या पुरत्या गुंडाळावयास व घुटमळलेला प्राण कुडीबाहेर पडण्यास आणखीं सतराअठरा वर्षें लागलीं एवढेंच. चालू प्रकरण या धोरणानें आटपण्याचें आहे. फारसें सांगण्याचेंहि उरलेलें नाहीं. अठराव्या शतकांतील बाकीच्या पूर्वजांची थोडक्यांत ओळवण केल्यास भागण्यासारखें आहे. तेव्हां नामोच्चारपूर्वक त्यांचें तर्पण करून मग उठावें हें बरें.

स्वराज्यस्थापनेच्या पहिल्या लाटेनें कुल वतनदार व इनामदार यांच्या हक्कांवर पाणी पडल्याचें ध्यानांत असेलच. सरदेसायांचें मुख्य वतन व एक दोन इनाम गांव कसेबसे मोकळे होण्यास पांच पंनास वर्षांचा अवधि लागला; परंतु राज्यघटनेच्या या नव्या घिरटींतून इतर इनाम गांवें भरडून निघालीं. राज्यकर्त्यांच्या दूरदृष्टीच्या सुपांत हा भरडा पाखडल्यावर त्यांतील सात्विक भाग सुपांत राहून खोतीचा कोंडा इनामदारांचे पदरीं पडला. तेवढा तरी हातीं लागल्याबद्दल सानंद कृतज्ञतेचें प्रदर्शन करण्यास लाळघोट्याचा तांडा सज्ज होता किंवा नव्हता हें आतां समजणें कठीण आहे. तसेंच ही कृपाछत्राची सांवट सरदेसायांवर केव्हां पडली हेंहि समजण्याचें साधन मिळालें नाहीं; परंतु ता. १९।१।१८५४ चें खंडोजी माणकर, सुभेदार प्रांत राजापुर व दाभोळ, यांच्या पत्रावरून वगैरे प्रल्हाद गणेश व नरहर अनंत यांजकडे सदर जप्ती झालेल्या गावाची खोती पेशजीप्रमाणें चालविण्याचे हुकुम सरदेसायांनीं वरून आणविल्याचें दिसून येतें. एवंच गांवांवरील त्याची इनामदारी दूर होऊन तिचे जागीं पाटिलकीचे

हक्क तेवढे त्यांजकडे राहिले. पण या फेरबदलानें सरदेसाई इनामदार असतां निरनिराळ्या गांवच्या खोतीची प्रत्यक्ष वहिवाट त्यांनीं ज्यांकडे सोंपविली होती त्यांजकडून ती परत मिळविण्यास त्यांस अनेक वाद सांगावे लागले. त्यांतच घरांत नव्यानें जन्मास आलेली भाऊबंदकी एकमेकांचे पाय ओढूं लागली; आणि स्वराज्यीय सुभेदारांच्या जातीचे, नात्यागोत्याचें किंवा वशील्याचे असे जे कोणी खोतीची वहिवाट करणारे होते त्यांस व सरदेसायांचा उत्कर्ष असह्य झालेल्या गांवच्या रिकामटेंकड्या लोकांनीं उठवून खंडोबा केलेल्या कित्येक आशाळभूत खुळसटांस हि जोर करण्यास फावलें; यामुळें देऊं केलेला खोतीचा कोंडा पदरीं पाडून घेण्यास सरदेसायांस कांहीं थोडी यातायात पडली नाहीं. छत्रपति महाराजांकडून राज्याची कुलअखत्यारी पंत प्रधानांच्या ताबीन झाली तेव्हां त्या क्रांतीबरोबरच राजधानीचें स्थलांतर सातार्‍याहून दुप्पट लांबीच्या पुण्यास झालें. सरदेसायांस जवळचे धनी जे प्रतिनिधि ते हळुहळू पेशव्यांच्या हुकुमाची डांक खालीं पोंचविणारे दुय्यम दर्जाचे सरदार बनत चालले. लहानसहान तंट्यांचा निकाल ते करीत होते खरे, पण महत्वाच्या दाव्याची अखेर पुण्यक्षेत्राच्या यात्रेखेरीज सांग होईनाशी झाली. खोतीच्या वादांनीं तर एकसारखी पाठ पुरविली. त्याकरितां सरदेसायांपैकीं एकादोघांस पुण्यास कायमपणें ठाणें ठेवणें प्राप्त झालें. दादोबाचे चिरंजीव सदाशिव ना० हे बोलण्यासवरण्यांत पटाईत व त्या कालच्या मानानें चांगले कलमबहादूर असे होते; अर्थात् त्यांच्या वांट्यास हें काम आलें, आणि त्यांची पुण्यास चिरंजीवासमवेत रवानगी झाली. पुत्र दादोबा हे हि वडिलांस शोभण्यासारखेच होते. सरदेसाई घराण्याच्या लौकिकास हि अद्याप ओहटी लागलेली नव्हती यामुळें श्रीमंत नानासाहेब पेशव्यांकडे संधान बांधण्यास उभयतांस अडचण पडली नाहीं. त्यांचें तेथें बस्तान बरें बसलें, आणि वादांचा अनुकुल निकाल लागण्यास, निदान तो लवकर लागण्यास, या गोष्टीचा बर्‍याच अंशानें उपयोग हि झाला. सरदेसायांचे पिढिजाद हाडवैरी जे संगमेश्वरकर जोशी हे पेशव्यांचे आप्त नसते तर या वादांच्या

पायीं सरदेसायांस झालेला त्रास पुष्कळ वांचला असता. हल्लीं सरदेसायांची खोती हि संपुष्टांत आली आणि जोशांची घटका हि जोशीविलाच्या भोंवऱ्यांत गिरक्या खाऊं लागली आहे, तरी पण उभयतांतील वैर अगदीं पहिल्या जोमांत आहे. वडिलोपार्जित उपद्यापाबद्दलची ही चिकाटी प्रशंसनीय नाहीं असें कोण म्हणेल ? असो !

हे खोतीचे दावे वीस पंचवीस वर्षें चालले. त्यांचा सारांश पृ. १२५ वर असून तपशील पृ. १५७ ते १८९ यांत दिला आहे. देवळेकर वि. वेरवलीकर आणि मोडेंकर हा प्रसिद्ध दत्तकवाद हि याच वेळचा; त्याची हकीकत बहुतेक ' महत्वाचे वाद ' या प्रकरणांत आली आहे च. प्रभानवल्ली घराण्यांतील धाकट्या शाखेच्या चिरफळ्या उडण्यास हि तेथील एक दत्तक प्रकरण मुख्यत्वें कारणीभूत झालें. ती हकीकत संक्षिप्तपणें "झोंबडी दप्तर" या भागाच्या अहवालांत पुढें येत आहे. सारांश, अठराव्या शतकाच्या शेवटच्या पंचविशींत या घराण्याच्या सर्व शाखा वास्तविकपणें वेगवेगळ्या नांदू लागल्या; त्यांचे हितसंबंध भिन्नच नव्हे तर थोडेबहुत परस्परविरोधीहि झाले म्हणून घराण्याचा वृत्तान्त यापुढें समाईक असा राहिला नाहीं; तो यापुढें वेगवेगळा लिहिला पाहिजे; तेव्हां तें काम उत्तरार्धावर टाकून सन १८०० ची अखेर पाहिलेल्या मंडळीची बोळवण करून पूर्वार्धाचें काम आटोपूं.

ता० २३।२।१७५६ च्या नानासाहेब पेशव्याच्या पत्रांत इतरांच्या नांवाबरोबर प्रल्हाद ना०चें नांव आलेलें नाहीं. अशाप्रकारें घराण्याच्या प्रमुख व्यक्तीचें नाव कमी होण्यास त्या व्यक्तीचा मृत्यु कारण झाला पाहिजे. त्यापुढील कागदांतून त्याचा मुलगा गणोबा याचें नांव आढळतें; यावरून प्रल्हाद गणेश हा स. १७५६ च्या आरंभीं मत्यु पावला असें म्हणण्यास बाध नाहीं. शिद्दीच्या दरबारांतून मौजे वेलदुर येथील चार बिघ्यांचें खारें खाजण प्रल्हाद ना०नें स.१७४७ त इनाम करून घेतलें होतें, यापलीकडे नवीन संपादन किंवा इतर सांगण्यासारखी गोष्ट त्याच्या हातून झालेली दिसत नाहीं.

बाहेरील लोकांशीं झगडण्याची दगदग पुण्यास राहून दादोबा व त्याचा मुलगा सदाशिव यांनीं अंगावर घेतल्यानें आणि घरप्रपंच अंतोबा व त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा नरहरि यांनीं वव्हंशीं आटोपल्यामुळें प्रल्हाद नायक केवळ वडे बापके बेटे होऊन बसले असावे असें वाटतें. त्यांचा मुलगा गणोबा हा तर बापसे बेटा सवाई निपजला. स. १७६० च्या सुमारास सरदेशमुखीच्या व इतर उत्पन्नाच्या वांटण्या पक्क्या होऊन गणोबाच्या हिश्यास विशाळगडतर्फेची म्ह. मलकापुर व असंडोली तालुक्यांचीं आणि राजापूर तालुक्याखालीं न गेलेल्या प्रभानवल्ली मामल्यांतील गांवांचीं सरदेशमुखी आली. इतर फुटकळ उत्पन्नाचा द्वादशांश त्याच्या पदरीं पडला. घराण्याच्या प्रमुखपणाचा डामडौल कायम ठेवण्याचा लौकिकी बोजा मात्र त्याच्यावर बसल्यानें हिशास आलेल्या उत्पन्नांत खर्च भागेनासा झाला. पूर्वी विशाळगडावर स. १७५३ त तुळाजी आंगरे याचा हल्ला होऊन त्यांत सरदेशमुखांचें फार नुकसान झालें होतें. घरचें काय होतें नव्हतें तें तर गेलें होतें च, परंतु घरच्या व वहिवाटींत असलेल्या देवस्थानांच्या दागदागिन्यांची व सोन्यारुप्यांच्या इतर जिनसांची जी या हल्ल्यांत वाट लागली होती, तिच्या नुकसानीची भरपाई करून देण्याकरितां कर्जाची घूस घरांत घ्यावी लागली; आणि ती जी एकदां घरांत घुसली तिनें सर्व पोंखरून फडशा उडविला. तिचा धुमाकूळ अद्याप चालू च आहे. संकटसमयीं पूर्वी जसे दायाद मदतीस धांवून येत, तसे ते आतां येतनासे झाले. एकमेकांविषयींचा पहिला आपलेपणा नष्ट होऊन जो तो आपल्या पायापुरतें पहात बसला, व स्वतःपुरती बळकटी करण्याच्या नादीं लागला. एक दुसऱ्याच्या नुकसानीकडे ढुंकून हि पाहिना, मग परस्पर साह्याचें नांव कशाला ? हा अदूरदर्शीपणा अखेर सर्वांना च भोंवला; पण या परिस्थितीचा पहिला तडाका गणोबास सहन करावा लागला. आजचा दिवस कसाबसा निभावला, उद्या कसें होणार ही विवंचना त्यास सोडीना; तो अगदीं भांबावून गेला. ता. ६।१।१७६१ रोजीं—शके १६८२ च्या मार्गशीर्षाच्या **अमावास्येस**, मंगळवारीं, मंगळ जन्मलग्नीं—त्यास प्रल्हाद ऊर्फ

गुंडोबा हा मुलगा झाला. अमावास्येस मुलाचा जन्म झाल्यास आज हि लोक चमकतील, मग शें दीडशें वर्षांपूर्वीच्या भोळसर कल्पनांच्या तीव्र वातावरणांत वावरणाऱ्या गणोबाची या प्रकरणानें किती घाबरगुंडी उडाली असेल हें अजमाविणें कठीण नाहीं. यावेळीं या घराण्यास लागलेल्या उतरत्या कळेस या नव्या अवतारानें कितीसा हातभार लावला हें ठरविण्याचें काम कुंडलीविज्ञानकर्त्यांचें आहे; त्यांच्याकरितां गुंडोबाची जन्मलग्न ुंडली पुढील कागदपत्रांत दिली आहे.

गणोबाच्या अंगीं कर्तृत्व विशेष होतें असें नाहीं; त्यांत काल प्रतिकुल आला आणि स्वजनांचें पाठबळ बिलकुल मिळालें नाहीं. तेव्हां हातपाय हालविल्याशिवाय आतां गत्यंतर नाहीं असें पाहून, घर व अज्ञान पोर संभाळण्याची जबाबदारी सर्वथैव बायको सगुणाबाई इच्यावर टाकून पुढलें आयुष्य कसेंतरी व कोठेंतरी काढण्याचा निश्चय करून त्यानें घराचा उंबरठा सोडिला. घर सोडिल्यावर बाहेर यानें काय उद्योग केला याची माहिती मिळाली नाहीं; परंतु ' **प्रायो गच्छाति यत्र भाग्यरहितस्तत्रैव यांत्यापदः** ' या न्यायानें दुसरीकडे हि त्याचें कांहीं जुळलें नसावें, म्हणून सन १७७५ च्या सुमारास स्वारी घरी परतली. ता. २४।२। १७७७ चें आबाजीराव प्रतिनिधी यांचें आज्ञापत्र मलकापुरातर्फेखालील ४१ गांवाचा हक्क लाजिमा गणोबास सुदामतप्रमाणें देण्याविषयीचें आहे, व पुढें ता. १०।४।१७८३ चें त्यांचें च दुसरें आज्ञापत्र प्रल्हाद गणोबा व सदाशिव दादोबा यांच्या नांवें निघालेलें आहे; यावरून गणोबा सन १७८१।८२ च्या अदमासास वारल्याचें दिसतें. अठरावें शतक संपल्यावेळीं प्रभावळीच्या वडील शाखेंतील गुंडोबा ना० म्ह. दुसरा प्रल्हाद गणेश हा हयात असून ४० वर्षांचा होता.

पहिल्या प्रल्हाद गणेशाचे सावत्र बंधु केशव व शामजी यांची हकीकत थोडीशी झोंबडी दसऱ्या अहवालांत येईल.

पहिल्या प्रल्हाद गणेशाचा चुलतभाऊ नरहर अंतोबा याजकडे बापाच्या मागें घरचा कारभार आला; तो त्यानें बऱ्याप्रकारें एकत्रांत राहून

चालविला. ता. १०।४।१७८३ च्या प्रतिनिधींच्या वर निर्दिष्ट केलेल्या पत्रांत व त्यानंतरच्या कागदपत्रांत त्याचें नांव आलेलें नसल्यानें सन १७८२ च्या अखेरीस अगर सन १७८३ च्या अवलीस तो मृत्यु पावला असावा. घराण्याचा एकोपा राखून निःस्वार्थबुद्धीनें आपलें कर्तव्य समजेल तसें बजावणारा असा सरदेसायांतील हा शेवटचा पुरुष. त्यांस पुत्रसंतान नव्हतें, यामुळें त्याच्या मृत्युबरोबर रंगोबा केसोबाच्या शेवटच्या मुलाचा वंश संपला.

आतां दादोबा रंगोबाच्या वंशाची तेवढी हकीकत सांगितली म्हणजे २९ व्या पिढीची आणि मुख्य घराण्याची '**स्वराज्यांतील हालहवाल**' संपली. दादोबाचा मुलगा सदाशिव ना० व नातु दादोबा ना० यांचाच फक्त आतां उल्लेख उरला आहे.

या उभयतांचा बहुतेक काळ पुण्यास खोतीच्या गांवांचे वाद सांगण्यांत व ते जिंकण्यांत गेला. सवाई माधवरावांच्या कारकीर्दीअखेर उभयतां कोंकणांत परत आले. दोघेही धोरणी, हुषार व खटपटी होते. यांचीं चारपांच पत्रें मिळालीं आहेत त्यावरून त्या वेळेच्या मानानें ते बरेच सुशिक्षित, संस्कृतज्ञ व खंबीर लिहिणारे होते असें दिसून येतें. पृ.१५७ वरील सगुणाबाईस दादोबानें लिहिलेलें पत्र आणि मुंढरकर श्यामजी ना०नें भगवंत केशवास दत्तक घेण्याचें ठरविलें त्या संबंधांत सदाशिव ना०नें लिहिलेलीं पत्रें (हीं झोंबडी दप्तरविभागांत दिलीं आहेत) पाहिलीं म्हणजे वरील विधानांची सत्यता प्रत्ययास येईल. हीं पत्रें एकवार नजरेखालीं घालण्यासारखीं आहेत. तीं पाहिल्यास सदाशिव ना०ची हुशारी त्याच्या मनोभावनांविषयीं इतर भाऊबंदांच्या बुद्धीस साशंक करणारी होती असें हि वांटल्यावांचून राहत नाहीं. त्या पत्रांवरून सदाशिव ना०वर इतरांचा असावा तितका विश्वास कां नव्हता हें अजमावतां येण्यासारखें आहे. त्याजवर सोंपविलेलें काम त्यानें चिकाटीनें, उत्साहानें व धीरानें तडीस नेलें हें कबूल करणें भाग आहे. तथापि पेशव्याशीं विशेष घरोबा झाल्यामुळें इतरांस तुच्छ लेखण्याची व तुसडपणाची झांक त्याच्या

स्वभावांत दिवसेंदिवस अधिकाधिक व्यक्त होत जाऊन ती इतरांस दुःसह होऊं लागली असली पाहिजे. पेशव्यांची आपल्यावर कृपा आहे, रंगोबा व गणोबा यांच्या खालोखाल घराण्याच्या ऊर्जितावस्थेस आपले वडील दादोबा कारण झाले, घराण्याचा अपकर्ष आपल्यामुळें च टळला, आणि प्रल्हाद नायकामागें वयानें नसलों तरी कर्तृत्वानें आपण च सर्वश्रेष्ठ आहों हा अहंभाव सदाशिव ना०त फार लवकर प्रकट झाला असला पाहिजे. सन १७५९।६० च्या सुमारचे छ १० साबानच्या नानासाहेब पेशव्यांच्या पत्रावरून वडील चुलतभाऊ केशव व श्यामजी गणेश यांस मागें सारून रत्नागिरीतर्फेची सरदेशमुखी आपल्या हिशास दडपण्याचा त्याचा प्रयत्न निर्विवादपणें शाबीत होतो. हें वतन अखेर त्याच्या घराण्यास मिळालेंहि. नानासाहेब पेशव्याच्या सहवासानें सर्व सत्ता आपल्या हातीं एकवटून ठेवण्याची बळकट महत्वाकांक्षा सदाशिव ना०त प्रादुर्भूत झाली होती; पेशवे मजकुरांचें शहाणपण व धिमेपणा त्यांच्या अंगीं असता तर ती गोष्ट त्यास साध्य हि झाली असती. तें धोरण न सांभाळिल्यानें त्याचें शेवटीं सर्वांशीं वितुष्ट पडलें. सन १७८४ अखेर त्यांचे नांव कागदोपत्रीं आढळतें. स. १७९१ त त्याच्या मुलग्याचें नांव स्वतंत्रपणें कागदांतून येतें; म्हणून सन १७९० च्या सुमारास सदाशिव ना० स्वर्गवासी झाले असें वाटतें; परंतु अखेरचीं त्यांचीं वर्षें शिद्दीच्या संस्थांनीं गेलीं असल्यानें त्यांच्या नांवाचा लोप इकडील कागदपत्रांत झाला असावा ही कल्पना हि संभवते. त्यांचें मृत्युसाल १८०१ किंवा १८०४ हि असू शकेल असा हि कांहीं कागदांवरून तर्क बांधतां येत आहे.

सु॥ ११५३ (स. १७५३) चा ' श्री देवाच्या वस्तांची याद ' म्हणून एक कागद प्रभावळी–दप्तरीं मिळाला, त्यांत ' वस्ता मोडून दिवाणास दिले रुपये ' नंतर बाकी शिलकीचे दागिने म्हणून सदर आहे त्यांत रुप्याच्या दागिन्यांचे पोटीं “ **१ तनाल पेसजी रा० सदाशिव नायेकास तरवार दिली तेव्हां दिले** ” म्हणून एक दागिना वजा दिला आहे, यावरून पेशवे किंवा शिद्दी यांचे दरबारांतून ही तलवार त्यांस मिळाली असावी;

ती शिद्दीच्या दरबारांतून मिळाली असण्याचा संभव अधिक आहे, कारण सदाशिव ना० व त्यांचे वडील दादोबा ना० यांची बहुतेक कामगारी त्या संस्थानीं झालेली होती.

पुण्याकडील काम आटोपल्यावर सन १७९१ च्या सुमारास सदाशिव ना०बरोबर दादोबा हि परत आला तो गुंडोबाच्या मदतीस राहून त्याच्या समवेत विशाळगड व रत्नागिरी तर्फांचा सरदेशमुखीचा कारभार करीत होता. कारणपरत्वें तो संगमेश्वर व रत्नागिरि येथें राही. शके १७३० च्या फाल्गुन महिन्यांत (मार्च १८०८ त) मावळंगे येथें तो " एकाएकीं कांहीं आजाराशिवाय " मरण पावला. त्याची थोरली बायको चिमा-बाई सती गेली. धाकटी बायको दुर्गाबाई इनें स. १८३४ त काशी-यात्रा केल्याचा उल्लेख तेथील उपाध्यायांच्या लेखांत आहे. दादोबास औरस पुत्र नसल्यानें झोंबडीकरांपैकीं रंगो केशवाचा वडील मुलगा राघोबा यास दुर्गाबाईच्या मांडीवर दत्तक देण्यांत आलें. राघोबानें रत्नागिरीस नवीन वाडा बांधिला व तेथें राहून तो स्वतंत्रपणें रत्नागिरितर्फेच्या सर-देशमुखीची वहिवाट करूं लागला. अशाप्रकारें हें घराणें निराळी शाखा बनलें. हल्लींचे संगमेश्वरकर सरदेसाई हे या राघोबाचे वंशज. दाभोळ-सुभ्याची किंवा अंजणवेलतर्फेची सरदेशमुखी गणोबा रंगोबाचा दुसरा मुलगा केशव ना० याच्या वहिवाटीस राहिली. तेथून पुढें झोंबडी व मुंढर या शाखा उगम पावल्या.

प्रकरण तेरावें

अपुरें काम

या पुस्तकास हल्लींचें स्वरूप देण्याचा संकल्प झाल्यावर हिंदुस्थानांत दूरवर पसरलेल्या या घराण्याच्या विद्यमान वंशजांकडून संकल्पसिद्धयर्थ माहितीचा पुरवठा व्हावा म्हणून स. १९२४ च्या नवंबरांत केसरींतून

जाहिर विनंति केली होती. ती पाहून प्रथमतः वे. सदाशिव ल. कात्रे यांजकडून ता. २७।११।१९२४ चें पुढील पत्र आलें:— " वेदोक्त अ. आशीर्वाद वि. वि...... आम्ही आपले व बहुतेक कऱ्हाडे मंडळीचे या क्षेत्रांतील पूर्वापार तीर्थोपाध्याय आहों......आमचेकडे **कौशिकगोत्री मावळंकरांचे** जुने नवे वरेच लेख आहेत......

" केसरीच्या गेल्या अंकांतील जाहिरातीवरून आपण मावळंकर घराण्याचा इतिहास लिहित आहांत असें कळतें. फार संतोषाची गोष्ट आहे. आपण अनेक मार्गांनीं माहिती मिळविली आहे च. आमचेकडे संवत् १८३७ पासून आजमितीपर्यंतचे कौशिकगोत्री मावळंकरांचे लेख आहेत. सैतवडें, देवळें......जालवण—गुलसराई......सांगली वगैरे ठिकाणच्या लेखांतून वंशवृक्षांची बरीच माहिती मिळण्यासारखी आहे··· ती पाठविली असतां आपणांस तिचा कांहीं उपयोग होण्यासारखा असल्यास उत्तरीं जरूर कळवावें म्हणजे सवडीप्रों ती उतरून पाठवून देईन. उत्तर हिंदुस्थानांतील घराण्याची आजतागायतची माहिती हवी असल्यास मी अवश्य ती खटपट करण्यास तयार आहें."

लेखांचे उतारे पाठविण्याविषयीं विनंतिपत्र लिहिल्यावरून त्यांजकडून ता.९।५।१९२५चें पुढील पत्र व त्यासोबत ४८ उतारे आले:—

" आमचेकडील कागदपत्रांतून फक्त वंशावळीची च कांहीं माहिती दिली असते. वंशावळ लेखांतून देण्याचा प्रघातसुद्धां नवीन आहे. यात्रेकरांकडून लेख लिहून घेण्याचा प्रघातसुद्धां फार प्राचीन नाहीं...लेख अलीकडील कांहीं शतकांतले च आढळतात. याचें कारण पूर्वीं येथील पुरोहितांची केवळ मानवृत्ति होती; लेखवृत्ति ही नंतर सुरू झाली. त्यानंतर नाशिकांतील पद्धतीप्रों लेखांतून वंशावळ देण्याची टूम निघाली.··· आमचे जवळ असे कितीतरी जुने लेख आहेत ज्यांत लेख देणाऱ्याच्या नांव आडनावांपेक्षां ज्यास्त माहिती नाहीं. आपल्या घराण्यापैकीं असे बरेच लेख आहेत. एवं च लेखांतील माहितीचा वंशावळ जुळविण्यापुरता उपयोग आहे.

" उत्तर हिंदुस्थानांत......जालवण U. P., गुलसराई जि. झांशी, गोरझामर, प्रांत सागर (C P.), बासोदा जि. इसागड (ग्वाल्हेर राज्य), सोपूर (ग्वाल्हेर राज्य), इतक्या ठिकाणचे (मावळंकरांचे) लेख आमचेजवळ असल्यापैकीं सोबतच्या कागदांत दिले च आहेत. गोरझामर व सोपूर येथील घराण्यांची सध्यांची माहिती आम्हांस आहे. रा. बाळकृण गंगाधर मावळंकर हे सोपूर (Sheopore) येथें बडे जमीनदार असून रा. बापूसाहेब मावळंकर गोरझामरवाले यांचा जमीनजुमला गोरझामर येथें च असून ते सध्यां हुशंगाबाद येथें हायस्कुलांत मास्तर आहेत. बासोदा येथें हि सदर घराणें कायम असावें असा अंदाज आहे पण त्याची सध्यांची निश्चित माहिती नाहीं......पूर्वीं या प्रांतांत कऱ्हाड्यांची संपन्न राज्यें झांशी (नेवाळकर), जालवण, सागर, गुलसराई (खेर), इत्यादि ठिकाणीं असल्यानें साहजिक च कोंकणांतून व देशांतून इकडे अनेक कुळें आलीं: असें एखादें च कऱ्हाडे उपनांव असेल ज्याची एखादी शाखा या प्रांतांत स्थायिक झाली नसेल. राज्यें कायम असतांना त्यांस इनामें, उत्पन्नें, इ. पुष्कळ मिळालीं. पण वरील राज्यें नाहींशीं झाल्यावर वरील कुळांपैकीं पुष्कळांचें योगक्षेमसाधन नाहींसें झालें. गुलसराईचें राज्य अर्धवट स्थितींत अजून कायम आहे, पण तेथील व जालवण येथील बरींच कुळें लष्कर ग्वाल्हेर येथें जाऊन राहिलीं. ग्वाल्हेरची वस्ती फार मोठी असल्यानें तेथें एखाद्या घराण्याच्या अस्तित्वाची माहिती मिळविणें सोपें नाहीं पण गुलसराई येथील घराणें तेथें च विद्यमान असावें. सोपूर येथील घराणें जालवणपैकीं च आहे. या सर्व घराण्यांचें मूळगांव " देवळें " हें च असावें असें वाटतें. गुलसराईकरांनीं व बासोदाकरांनीं तसा स्पष्ट निर्देश लेखांत केला आहे.

" इतर ठिकाणांपैकीं गोठिवें येथील घराणें कौशिकगोत्री असल्याची खात्री नाहीं. मावळुंगें...वगैरेची इतर माहिती नाहीं. मौजे डोंगर ता० विजयदुर्ग येथील आप्पा सरदेसाई बत्तीसशिराळें येथें रामदासी होते. ते पंचवीस वर्षांपूर्वीं निपुत्रिक वारले. सातारा येथें वेरवलीखुर्दचे सखा-

राम बापूजी सरदेसाई हे तेथील त्यावेळचे सरकारी वकील भडकमकर यांजकडे कारकून होते......माधवराव नारायण मावळंकर हे वांई येथें राहत होते. कांहीं वर्षांपूर्वी ते दाभोळ येथें च माझ्या वडिलांस भेटले होते. दाभोळचे रा. लक्ष्मणराव धोंडदेव काते वकील हे त्यांचे सख्खे भाचे...येणेंप्रो माहिती कळविली आहे.

" सोपूरचे रा. धोंडो बाळकृष्ण मावळंकर हे ग्वाल्हेर संस्थानापैकीं पोहरी येथें कमाविसदार होते. कांहीं दिवस खास लष्कर येथें हि त्यांची नोकरी होती. एकंदरींत सोपूरचें घराणें सध्यां हि चांगलें संपन्न आहे. " गोरझामरवाले " यांजकडे सागरचें राज्य असतांना फडणीशीचें काम होतें. पण आतां ' फडणीस ' हें आडनांवासारखें च होऊन राहिलें आहे...हें घराणें हि बऱ्या स्थितींत आहे. ही दोन्हीं घराणीं 'सरदेसाई' हें उपपद लावीत नाहींत. पण तीं कौशिकगोत्रीं च आहेत. बासोदा येथील घराणें नोकरपेशा आहे किंवा होतें. गुलसराईचें घराणें भिक्षुकपेशा च असावें. हीं येथील घराणीं ' सरदेसाई ' किंवा ' देसाई ' म्हणवून घेतात. बासोदाकरांचे आजे पुरुषोत्तम नाईक सरदेसाई हे देवळें गांवाहून च काशीस आले होते.

" आमचें मूळगांव चोरवणें तर्फ देवळें ता.रत्नागिरि हें असावें. २००।२५० वर्षे आमचें घराणें काशींत च आहे. आमच्या पूर्वजांचे वेळीं स्वतःचीं १०।१२ घरें असलेली ' कालेगल्ली ' येथें अजून म्युनिसिपालिटींत व लोकांत चालू आहे पण तीं घरें विकल्यास शंभर वर्षे झालीं."

या पुढें उतारे दिल्यावर अखेर ता. क. आहे तो— " यांशिवाय आमचे वहींत सदर आडनांवाचे कांहीं लेख आहेत. त्यांत लेख देणाराच्या नांवापलीकडे ज्यास्त माहिती नसल्यानें ते लिहून पाठविले नाहींत. शिवाय मोडी लेख नीट वाचतां न आल्यामुळें खतावणींत रुजू न झालेले जुने लेख बरे च आहेत. त्यांपैकीं कांहीं सदर आडनांवाचे हि असूं शकतील. "

वरील दोनी पत्रांतील मजकुरावरून माहिती जमा होण्यास किती अडचणी आहेत हें व घराण्याचा प्रसार किती लांब लांब ठिकाणीं झाला

आहे हें स्पष्ट दिसून येईल. हे उतारे बहुधां १ ते ३ ओळींचे आहेत; एकादा दुसरा ४।५ ओळींचा. त्यांचें साधारण स्वरूप पृ.११० वर दिलेल्या दोन तीन लेखांवरून व अवतरणांवरून समजून येईल. याच पत्रांतील नाशिकसंबंधाच्या उल्लेखावरून तिकडूनहि उतारे आणविले; त्यांची संख्या ९२ भरली. या उताऱ्यांत यात्रेचा काळ बहुधा दिलेला असल्यानें, त्यांवरून एकाच कुटुंबांतल्या निरनिराळ्या लोकांनीं निरनिराळ्या वेळीं केलेल्या यात्रांवरून वंशावळींचे तुकडे एकत्र करण्यास पुष्कळ मदत झाली. अवंतिका (उज्जयिनी) क्षेत्रोपाध्याय वे. सांदीपनी व्यास यांच्या संग्रहांतील बाडावरून फक्त चार उतारे घेतां आले, परंतु त्यांत यात्राकाळाचा निर्देश करून घेण्याचें गडबडींत चुकून राहिलें.

आमच्या विनंतीस मान देऊन काशी व नाशिक येथील उपाध्यायांनीं फार श्रम घेऊन व काळजीपूर्वक लिहून सदरची माहिती तावडतोब पाठविली हे त्यांचे आमच्यावर फार उपकार आहेत, व घराण्याच्या तर्फेनें त्यांचे येथें प्रसिद्धपणें आभार मानण्यास आम्हांस फार आनंद वाटतो.

या १४४ पैकीं पुष्कळ उताऱ्यांचा उपयोग आम्ही जमविलेल्या वंशावळी तपासून पाहण्यांत व कांहीं दुरुस्त करण्यांत झाला. बाकींच्या सुमारें ४०।५० उताऱ्यांवरून या प्रकरणांतील अपुऱ्या वंशावळी मांडिल्या आहेत. एकाच कुटुंबांतील २।४ बंधूंपैकीं कोणातरी एखाद्या दुसऱ्यानें यात्रा करून वेगवेगळे लेख लिहून ठेविले आहेत तेथें त्या बंधूंतील वडीलधाकटेपणा ठरविण्यांत केवळ तर्कांचा उपयोग कित्येक वेळां करावा लागल्यानें त्याबद्दल खात्री सांगतां येत नाहीं; परंतु त्याखेरीज बाकीचा तपशील काळजीपूर्वक तपासला आहे. वंशावळी जुळवून लिहिण्याचें काम ' जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे " पैकीं असल्यानें त्यांत बारीकसारीक चुका निघाल्यास तिकडे करड्या नजरेनें न पाहण्यास विनंति आहे. ज्या त्या कुटुंबांतील विद्यमान सुशिक्षित पुढारी वंशजांनीं सदरच्या वंशावळी आजमितीपर्यंत पुऱ्या करण्याची व मागील पिढ्यांसंबंधांत शक्य तितकी भर घालण्याची कृपा केल्यास हल्लींचें अपुरें काम पुरें होणार नाहीं

असें नाहीं. मात्र काशी व नाशिक येथील क्षेत्रोपाध्यायांसारखी उत्सुकता पाहिजे, मग उद्योग सहजासहजीं होईल.

पुढील वंशावळींत यात्रेकरूंचीं नांवें मोठ्या अक्षरानीं छापिलीं आहेत व यात्रेचा दिवस त्यांच्या जवळच कंसांत इंग्रजी तारखेनें दिला आहे. जेथें जागेचा संकोच झाला तेथें माथाळ्यावर सदरचा दिवस दाखविण्यांत आला आहे. यात्रेकरूंनीं जीं राहण्याचीं गांवें नमूद केलीं आहेत तींच दिलीं आहेत; त्यांवरून हल्लीं त्या त्या ठिकाणीं असलेल्या कुटुंबांतील लोकांस पूर्वापर संबंध पाहण्यास सोपें होईल. यद्यपि आतां ठिकाणें बदललीं असलीं तरी देखील पूर्वींच्या ठिकाणांची ऐकीव माहिती बहुधां असते, त्यामुळें गांवें सोडून दुसरीकडे राहणाऱ्या मंडळींसहि सदरच्या माहितीचा उपयोग होण्यासारखा आहे. आम्हांस मिळालेली माहिती सर्व जुळवून मांडिली आहे, ती याप्रकारें उभयतांस उपयुक्त व्हावी अशी इच्छा आहे.

पूर्वजांनीं केलेल्या यात्रांचें श्रेय त्यांच्या तर पदरीं पडलेंच आहे; पण इतक्या कालावधीनें त्यांचें पुण्य आज निराळ्या रीतीनें आमच्या पदरीं अंशतः व फुकाफुकी पडत आहे, हें पाहून विस्मय वाटतो.

वाचकांच्या सोयीसाठीं येथून पुढें दिलेल्या वंशावळींचे सामान्यतः चार विभाग केले आहेत. पहिल्यांत मावळंगें गांवीं आरंभीं व क्वचित् आजहि राहणारीं, दुसऱ्यांत कोंकणपट्टींत इतरत्र राहणारीं आणि तिसऱ्यांत पुष्कळ वर्षांखालीं हिंदुस्थानांत जाऊन तिकडे कायम झालेलीं कुटुंबें दाखविलीं आहेत; चवथा विभाग नुक्त्या च परिचित झालेल्या मावळंकरीय ‘ लळित ’ मंडळीकरितां राखून ठेवण्यांत आला होता. त्यांची वाट पाहून पाहून अखेर एकट्या पालगडच्या मावळंकरास तेथें बसविलें आहे. घराण्याचे आद्यजनक मूळचे ‘ **भट्ट** ’ होते ही जाणीव यामुळें अखेरपर्यंत टिकतेहि.

वंशा. नं. ३२ यांतील नं. ७ त्र्यंबक, नं. ८ कृष्णाजी व नं. १४ केशव यांच्या नाशिक-यात्रांच्या अनुक्रमें तारखा (१८-१०-१७२६), (१७४२) व (१९-१२-१७७७) जागेच्या अडचणीमुळें येथें दिल्या आहेत.

१ मूळ मावळंगें गांवीं राहणारीं कुटुंबें—

वंशावळ नं० ३२ (१)

१ केसोबा नाईक
|
२ बल्लाळ ऊर्फ बाळाजी नाईक
|
३ केसो ऊर्फ बाबजी | ४ गोविंद | ५ महादेव

३ केसो ऊर्फ बाबजी — ६ हरी, ७ त्र्यंबक, ८ कृष्णाजी, ९ शामजी
४ गोविंद — १० भिकाजी, ११ रामाजी
५ महादेव — १२ नारो, १३ लक्ष्मण (यापुढील वंशाचा पत्ता लागला नाहीं)

८ कृष्णाजी — १४ केशव — १६ कृष्णाजी — १८ जगंनाथ ×रखमा
११ रामाजी — १५ बाळाजी — १७ गोविंद — १९ भिकाजी ×यमुना

१८ जगंनाथ — २० मोरो (१३ १२-१८५१) ×वेणू ऊर्फ सरस्वती उंचगांवकर मुळ्ये (१८९०।९१) (नं.२०।२१ यांच्या पुढील वंशाचा पत्ता लागलेला नाहीं); २१रामचंद्र (१८७०)
१९ भिकाजी — २२काशीनाथ ×गंगा खांडेकर; २३राजाराम मृ.१९१९

२२काशीनाथ — २४सदाशिव मृ.१९०५. ×पार्वती | खेर; २५नारायण उ.६५

२४सदाशिव — २६(दत्तात्रेय); २७ कृष्णा ऊर्फ अप्पा उ.२६

नं. २० ची बायको सरस्वती इच्या काशीयात्रेच्या लेखांत "आमच्या दशांतले काशीनाथपंत (नं. २२) हे मावळंग्यास आहेत" असा मजकूर असल्यानें इतर यात्रा लेखांधारें ही वंशावळ मांडितां आली. या काशीनाथपंताचे पुत्र नं. २५ व नातु नं. २७ एवढीं दोन च टकलीं आजमितीस नामशेष झालेल्या मूळच्या चौसोपी भव्य वाड्याच्या एका सोप्यावर एक लहानसा इमला उभारून नांदत आहेत; त्यामुळें मावळंकरांच्या पहिल्या घरवंदावर अद्याप दिव्याचा उजेड पडत आहे. हा घराचा चौथरा श्रीदेवाच्या देवळानजीक असून देवाची पालखी आरंभीं तेथें बसविण्याचा मान पूर्वीप्रमाणें हल्लींहि चालू आहे.

वं० नं. २ मधील २६ व्या पिढीचा नं. ९ अंताजी विसोबा मावळंकर याचा पुढील वंश तेथें बेपत्ता दाखविला आहे. या वंशावळींतील आरंभीचा केसोबा नाईक हा या अंतोबाचा मुलगा असावा असा आमचा तर्क आहे. या अंतोबाचा आजा नारोबा (१-२४-४२) पुत्रपौत्रादिकांसुद्धां वतनावर वेदावा लिहून ओझरें गांवीं जाऊन राहिला होता. बखरीच्या पूर्वभागीं " त्याचा पुत्र विसोबा वोझरे यांत आहे " असा ज्याचा अखेर उल्लेख आहे त्या विसोबास चुलता गणोबा नायक सरदेशमुख यानें "माऊळंगेयांत आणून येक आगर व येक शेत देऊन ठेविला" (पृ. ५१ पहा) होता, असा मजकूर आहे. हें आगर व शेत अद्याप या वंशांतल्या मंडळीकडे भोगत आहे. मावळंग्यांत आतां मावळंकरांचीं फक्त दोन घरें आहेत. वर निर्दिष्ट केलेलें एक व दुसरें त्याच्या हद्दीस लागूनच जरा उंचावर आहे. मावळंगें गांव एका उंच डोंगरावर असून डोंगराच्या माथ्यावर एक मोठा तलाव व श्रीनृसिंहाचें देवालय आहे. देवालयास लागून १०।१२ हात खालीं हें दुसरें घर आहे. देवस्थान आगराच्या जमिनींत असावें. गुहागर येथें हल्लीं राहत असलेले मावळंकर यांच्याकडून आलेल्या माहितीप्रमाणें देऊळ असलेली जमीन त्यांच्या हिशास आली होती, व हल्लीं दुसऱ्या घरची जी मंडळी आहे ती गुहागरकरांस जवळची. आज सुयेरसुतक कोण

कोणाचें च धरीत नाहींत. फक्त तेथें असलेलीं दोन कुटुंबें ३ दिवसांचें मृताशौच एकमेकांचें पाळतात. बाकी गोतावळा कोणास कांहींएक माहित नाहीं. हल्लीं ज्यांत देऊळ आहे तें एक आगर व एक शेत हें प्रथम ज्या विसोवास मिळालें तें त्याच्या निर्वाहास पुष्कळ होतें; परंतु पुढील वंशावळी पाहिल्यास या वंशविस्तारास उदरनिर्वाहाकरितां सोय झाल्या-ठिकाणीं गेल्यावांचून इलाज नव्हता. त्यामुळें मंडळी जी हलुहळू चोंहों-कडे पसरली ती शंभर वर्षांत एकमेकांची ओळख साफ विसरण्याइतकी दूरावली. गुहागरची व खेडची शाखा तर एक च. या शाखेचा संबंध मावळंग्याच्या मूळ शाखेशीं निकटचा. यात्रांतील लेखांत सदरच्या व मावळं-ग्याच्या शाखेच्या म्हणून ज्या वंशावळी पुढें दिल्या आहेत त्या सर्व सद-रच्या अंताजी विसोवा, किंवा थोड्या अधिक खातरीनें म्हणावयाचें झाल्यास, विसोवा नारोवाच्या घराण्याच्या असल्या पाहिजेत असें आम्हांस वाटतें. या सर्व उपशाखांचे विद्यमान वंशज आज कोठें आहेत तें आम्हांस कळलें नाहीं २।३ इसमांकडून जी थोडी माहिती मिळाली त्यांत यात्रा-लेखांची भर घालून वंशावळी सजविण्याचा तूर्त प्रयत्न केला आहे. तुटपंज्या आधारांवर कल्पनेच्या मदतीनें ही रचना केली आहे; मात्र कल्पनेला भरमसाट स्वैर संचार करूं न देतां प्रत्येक पाऊल दृष्टिपूत टाकिलें आहे. विद्यमान वंशजांच्या दृष्टिपथांत हें पुस्तक येईल व त्यांना कमजास्त सुच-वितां येईल तर आज न मिळालेले वंशावळीचे दुवे सांपडून सबंध सांखळी सांगडतां येईल. हल्लीं जुळवून ठेविलेले तुकडे तयार करण्यास फार परिश्रम करावे लागले असून पुष्कळ वेळ खर्चीं घालावा लागला आहे. ते श्रम व तो वेळ इतरांचा पुनः वांया जाऊं नये म्हणून झालेलें काम येथें मांडिलें आहे. ही रिकामी उठाठेव करावयास सांगितली कुणी व हें खूळ अन्य ठिकाणीं पसरण्यांत फायदा काय असा प्रश्न इतरांकडूनच काय पण मावळंकर-वंशीयांकडून सुद्धां होण्याचा संभव कमी नाहीं; नव्हे, प्रश्न होणार ही खात्रीसुद्धां वाटते; परंतु सर्व अडचणी अंशतः दूर होऊन केवळ चार च माणसांस येथपर्यंत मजल

पोंचवितां आली, एवढेंच नव्हे तर राहिलेला पुढला टप्पाही आक्रमितां येईल इतका भरंवसा त्यांच्यांत उत्पन्न झाला आहे; तेव्हां असल्या अपशकुनी व गैरहिशेबी प्रश्नानें आमची हिंमत खचेल अशी स्थिति श्रीनरहरिकृपेनें राहिलेली नाहीं. असो. या व पुढील वंशावळींचा एकमेकांशीं व सर्वांचा मूळ वृक्षांशीं संबंध पुढें केव्हांतरी दाखवितां येईल अशी आम्हांस आशा वाटते. कारण यापूर्वीं दोन ठिकाणीं असल्या प्रकारचा आमचा प्रयत्न पूर्णपणें सिद्धीस गेला आहे.


वरील वंशावळींतील नं. ७ कृष्णाजी बाबजी यांनीं सन १७४२ त नासिक व अवंतिका या दोनी क्षेत्राची यात्रा केली आहे. यात्रालेखांत आपले चुलतबंधु चार त्यांनीं सांगितले आहेत; पैकीं नं. ९।१० वर आले आहेत; परंतु दुसरे दोघे मोरोपंत व दामोदरपंत यांची मांडणावळ वंशावळींत योग्यप्रकारें करण्यापुरता लेखांत आधार नाहीं; सबब त्यांस त्रिशंकुप्रमाणें वंशवृक्षावर अधांतरीं न ठेवितां तूर्त येथें बसवून ठेविलें आहे.

या घराण्यांतील यात्रेकरू पुरुषांनीं सर्वांच्या नांवांचा उल्लेख 'पंत' या उपपदानें सर्वत्र केला आहे. पुढें "तळें घोंसाळें" येथील घराण्याची वंशावळ नं. ३३ ची दिली आहे ती ज्या यात्रालेखांवरून दिली आहे त्यांत हि हा च प्रकार आढळला. इतर कोणत्या हि लेखांत ही पद्धत दिसली नाहीं. तेव्हां या दोन "**पंतमय**" घराण्यांचा कांहीं जवळचा संबंध दिसून येतो कीं काय हें तपासून पाहून निश्चयपूर्वक ठरविण्यास त्या घराण्यांतील विद्यमान वंशजांस व तसें करण्यास फुरसत असलेल्या इतर बंधुजनांस विनंति आहे.

यात्रालेखांत वंशावळींतील मंडळींनी आपलें राहण्याचें जें ठिकाण लिहून दिलें आहे तेंच त्या वंशावळीच्या माथ्यावर चहूंकडे लिहिलें आहे.

* * *

विशेष सूचना—या प्रकरणीं कोणी शंका विचारल्यास त्यांचें शक्य तितकें समाधान, आणि कोणी अधिक माहिती पुरविल्यास अथवा उपयुक्त सूचना केल्यास त्यांचा साभार स्वीकार, अवश्यमेव करण्यांत येईल.




मूळ ठिकाणावरील मावळंकर स. १९२५ दिसेंबर.

[चित्रकार--नारायण रामकृष्ण सरदेसाई, मुंबई.

वं.नं.३३.(२) तळें घोसाळें (नंतर भादंत विजापूर) येथील घराणें

(नासिक व अवंतिका येथील मिळून ५ यात्रालेखांवरून)



नं. १५ चे इसमापर्यंत लेखांत सर्वांस पंत म्हटलें आहे.

नं. ३ गणेशपंत यांनीं केलेल्या अवंतिका यात्रेचें साल समजलें नाहीं.

नं. ६ भास्करपंत यांची नासिक यात्रा स. १७४५–५० तील आहे.

नं. १५ राघोबा व नं. १८ रामचंद्र उभयतांनीं नासिक यात्रा स. १७६७ मध्यें केली असून उभयतांच्या लेखांत नं. २१।२२।२३ हे चुलत बंधु नमूद आहेत, परंतु ते कोणाचे मुलगे तें लिहिलेलें नाहीं. नं. १६ त्र्यंबक यांचा यात्रालेख १७७७ मधील आहे. शेवटची पिढी हीं अठराव्या शतकाच्या अखेरची किंवा फार झाली तर एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभीची होय. तेथून शें सवाशें वर्षांच्या अलीकडील मंडळींचा, किंवा त्यांच्या हल्लींच्या ठिकाणांचा पत्ता लागलेला नाहीं.

वं. नं. ३४ (३) मावळंगें येथें हल्लीं कायम असलेलें कुटुंब.

१ चिटको
- २ बच्याजी
  - ३ [०००]
  - ४ [०००]
  - ५ नारायण × भागीरथी खांडेकर
    - ७ (हरिभाऊ) × लक्ष्मी मुळ्ये
    - ८ गोविंद × राधा | मुळ्ये
      - ९ वासुदेव ज. २०-१०-१८८१ × रमा | पाध्ये
        - ११ नारायण ज. ७-२-१९१४
        - १२ दत्तात्रय ज. ९-८-१९१६
      - १० विष्णु ज. ३-१२-१८८९ × अंनपूर्णा टेंबे.
  - ६ [०००]

मावळंग्यांत हल्लीं मावळंकरांचीं जीं दोन घरें आहेत त्यांतलि हें दुसरें. दोनी घरांत हें घर वडील आहे. कुलदैवताची पूजाहि या कारणानें या घरांत आहे. यांचें पहिलें घर सुमारें ७५ वर्षांपूर्वीं दग्ध होऊन त्यांत सर्व कागदपत्र जळून गेले, म्हणून वर नमूद केलेल्यापेक्षां अधिक माहिती त्यांस देतां आली नाहीं. नं. ३।४ व ६ हे इसम फार वर्षांखालीं उत्तर हिंदुस्थानांत गेले. त्यांचीं नांवें सुद्धां हल्लींच्या मंडळीस माहीत नाहींत. गुहागरच्या मावळंकरांचा संबंध आपल्याशीं काय हें जरी या कुटुंबास पक्केपणीं माहित नाहीं तरी ते आपल्या दशांतले असावे अशी हल्लींच्या मंडळीची समजूत आहे; म्हणून यानंतर गुहागरकरांची वंशावळ दिली आहे.

वं० नं० ३५

(४) गुहागर (पूर्वी खेड) येथील कुटुंब.

१ गोपाळ (मावळंगें सोडून खेडास प्रथम गेले.)

२ रामचंद्र ऊर्फ बाळाजी

३ नारायण (१८४७) × रखमाबाई

४ (हरी) | ५ (भास्कर) × सरस्वती जठार (१८६१) | ६ बाळकृष्ण मृ. १८९२ × राधाबाई तांबे | ७ (गोपाळ) × सगुणा आंतरकर | ८ (लक्ष्मण) × गंगा | ९ (माधव) (१८८९) × उमा तांबे

(६ बाळकृष्ण यांची मुलें:)

१० (मोरेश्वर) | ११ केशव उ. ६२ × जानकी कोटीभास्कर | १२ (सीताराम) × अंनपूर्णा हळवे | १३ अनंत ऊर्फ अप्पा ज. १७।५।१८७९ यात्रा (१८९७) × सीता पाध्ये | १४ दत्तात्रेय ज. २१।११।१८८८ यात्रा (१९०७) × १ दुर्गा लघाटे २ रमा तांबे

(१३ अनंत यांची मुलें:)

१५ आत्माराम ज.-१५।११।०२ × सुशीला शेंबेकर | १६ नारायण २२।२।०५ | १७ कृष्णा १५।५।१३ | १८ प्रल्हाद १८।९।१७ | १९ रघुनाथ १५।८।२० | २० मधुकर २६।१२।२५

(१४ दत्तात्रेय यांची मुलें:)

२१ रामचंद्र १०।८।१८ | २२ गजानन २४।१२।२३

टीप—नं. ४ ते ९ यांच्या अनुक्रमाविषयीं खात्री देतां येत नाहीं.

वं० नं० ३६ (५)

१ विसोवा ना० मावळंकर

२ केसोवा ना०

३ नरसोवा ना०

४ जिवाजी (१७३१) ५ अंताजी ६ गोविंद गोसावी (१७४२)

७ नरसोवा ८ केसोवा ९ राघोवा १० कृष्णाजी

(१९।२।१७९०)

११ गोविंद १२ महादेव १३ गणेश १४ विष्णु

नाशीकच्या तीन लेखांवरून ही वंशावळ मांडिली आहे. नाईक या पदवीवरून व मावळंकर या नांवावरून या वृत्तान्तांत समाविष्ट होण्याचा त्यांचा हक्क निर्विवाद आहे. नं. ६ आपल्यास 'गोसावी' म्हणवितात त्यावरून ते कीर्तनकार झाले असावेत. नं. ९ यांनीं लेखांत 'हल्लीं राहण्याचें ठिकाण पुणें' म्हटलें आहे. खेडची एक शाखा पुण्यास गेली त्यापैकीं तर ही मंडळी नसतीलना? या कुटुंबाचा पुढील पत्ता लागला नाहीं.

वं० नं० ३७ (६)

१ विसोवा

२ सोमाजी

३ विसोवा ४ कृष्णाजी

५ रामाजी नाईक (१७४२) ६ सोमाजी

वं० नं० ३८ (७)

१ गोविंद

२ गणोवा

३ गोविंद × सखूबाई (५।११।१७५४)

४ अपाजी ५ नरसो ६ रामाजी

वं० नं० ३९ (८)

१ [०००]:

२ कृष्णाजी — ३ [०००]

४ रामाजी (८।१।१७३१) — ५ गोविंद नायक

वं० नं० ४० (९)

१ नारायण

२ महादाजी

३ नरहरी — ४ रंगो

५ महादाजी — ६ कृष्णाजी — ७ जनार्दन

(४।३।१७३१)

वं० नं० ४१ (१०)

१ गणोवा

२ अंतोवा

३ मुरार ना० × रखमाबाई (११।४।१७९०)

४ [०००]

५ प्रल्हाद

वं० नं० ४२ (११)

१ महादेव

३ रामचंद्र × जानकीबाई

३ गणेश (मे १८८३) — ४ महादेव — ५ सदाशिव — ६ नारायण

टीप—नाशिक यात्रांच्या लेखाधारें वरील सहा वंशा० मांडिल्या आहेत.

अवंतिका येथील लेखाधारें:—

वं० नं० ४३ (१२)

मूळ ठिकाण मावळंगें.

१ नरसीपंत

२ जिवाजीपंत

३ नरसीपंत

४ नारो — ५ चिटको — ६ हरी — ७ अंताजी — ८ केशव

वं० नं० ४४ (१३)

मूळ ठिकाण देवळें.

१ अनंत

२ काशीनाथ

३ अनंत

४ सोमनाथ — ५ विसोवा — ६ पुरुषोत्तम — ७ महादोवा

(२). कोंकणपट्टींत इतरत्र पसरलेलीं कुटुंबें.

वं.नं.४५ (१) मौजे किर्डुवें–

१ विठ्ठलभट
२ नारायणभट
३ विठ्ठलभट (८-१-१७३१)
×रखमाबाई (५-११-१७३१)
४ पुरुषोत्तमभट (१७९०)

रखमाबाई व पुरुषोत्तमभट यांनीं "हल्लीं वस्ती तळेगांव" असें ठिकाण लिहून दिलें आहे.

वं.नं.४६ (२) मौ. कोदवली

१ नारायण
२ कृष्ण
३ केसो ४ बाळाजीपंत ५ गोविंदपंत
(१९-१०|१७३७)
६ महेश्वर

वं.नं.४७ (३) मौ. धामापुर (हल्लीं संभापुर)

१ केसोवा
२ नारोवा ना. ×द्वारकाबाई (१७४४)
३ कृष्णाजी ४ रामजी

(४) मौजे माखजन—

वं. नं. ४८.

१ {०००}
२ केशव ३ रंगो
३ रामचंद्र ×जानकीबाई (१७६७)

वं. नं. ४९.

१ बाळाजीपंत
२ गोविंदपंत
३ भिकाजीपंत
४ गोविंदपंत ५ सदाशिव (१८००)
६ भिकाजी ७ नारायण

(५) मौ. रिंगणगांव

वं.नं.५०

१ रामजी
|
२ नरसो
|
३ नारायण
|
४ बाळाजी (१७९०)

(६) मौ.सुवर्णदुर्ग

वं. नं. ५१

१ कृष्णाजीपंत
|
२ विसाजी
|
३ बाळाजी
|
४ सदाशिव (८-१-१७९०)

(७)अंजनवेल (हल्लीं गोपाळगड)

वं.नं.५२

१ रघुनाथ
|
२ विष्णु (१०-५-१८४९)
|
३जनार्दन, ४रघुनाथ

वं. नं. ५३

१ केसोवानाईक
|
२ नारोवा ना.
|
३ अंतोवा ना. ×रुक्मिणी
| ६-३-१८१८
४आबाजी ना०

---

(८) मौजे गोळवली (हल्लीं नेवासें)

वं. नं. ५४

१ नारायण
|
२ धोंडो
|
३मल्हार ×यशोदा, ४बापूजीपंत, ५उद्धवपंत

३मल्हार
|
६विठ्ठल (१२-२-१८५९नासिक)
|
७श्रीधर, ८माधव

(९) खानापुर-सांखळी.

वं. नं. ५५

१ श्रीपाद
|
२ अनंत
|
३केशव, ४जिवप्पा, ५श्रीपाद

३केशव
|
६ जिवाजी, ७ वामन

७ वामन २३-११-१९०८
|
८केशव, ९श्रीपाद

(२) कोंकण पट्टींतील इतर जागचीं घराणीं.

वं० नं० ५६. (१०) मौजे तुळशी पेटा मंडणगड ताा दापोली (पूर्वीं ताा सुवर्णदुर्ग) येथील घराणें. सन १८१४ ते १९११ या १०० वर्षांत या कुटुंबाच्या झालेल्या नाशिकच्या सहा यात्रालेखांवरून ही वंशावळ मांडिली आहे. सदरच्या लेखांत त्यांनीं आपणांस मावळंगकर देशमुख असें ह्मटलें आहे.

१ कृष्णाजी
२ विसाजी ऊर्फ विश्वनाथ
३ बाळाजी ऊर्फ बल्लाळ
४ सदाशिव (२२-२-१८१४) × उमाबाई

५ विनायक ऊर्फ बाळोबा — ६ रामचंद्र — ७ जगन्नाथ — ८ विठ्ठल

५ विनायक ऊर्फ बाळोबा: ९ नारोपंत, १० गोविंदपंत, ११ विष्णु, १२ बजाबा
६ रामचंद्र: १३ बाळकृष्ण, १४ गणेश, १५ काशीनाथ
७ जगन्नाथ: १६ सदाशिव, १७ दामोदर

९ नारोपंत: २२ वासुदेव, २३ अंताजी
११ विष्णु: २४ जनार्दन, २५ कृष्णाजी
१३ बाळकृष्ण: २६ हरी
१४ गणेश: २७ वामन
१६ सदाशिव: २८ केशव, २९ श्रीधर, ३० महादेव, ३१ नारायण

२२ वासुदेव: ३२ पुरुषोत्तम
२४ जनार्दन (१०-५-१८९०): ३३ बाळकृष्ण, ३४ गजानन
२७ वामन: ३५ गंगाधर, ३६ रामचंद्र, ३७ लक्ष्पण
२८ केशव: ३८ मोरेश्वर (१३-५-१९११)

सन १८३८ सालीं नं. ७ जगन्नाथ यांणीं रामकृष्ण सीताराम-परशराम व जगन्नाथ असे आणखी आपले पुतणे म्हणून लिहिलें आहे. परंतु ते कोणाचे मुलगे ती माहिती लेखांत मिळाली नाहीं. हल्लीं या घराण्यांतील कोण मंडळी कोठें आहेत हें समजलें नाहीं. नं. १४ गणेश यांची यात्रा (२०।२।१८८५) रोजीं झाली आहे.

(३) उत्तर हिंदुस्थानांतील घराणीं

वं. नं. ५७. (१) गुलसराई मावळंकर सरदेसाई

- १ अंताजीपंत
  - २ महादेव
    - ४ बाबाजी
      - ६ विश्वनाथभट
        - ८ **काशीनाथभट सरदेसाई** मावळंकर गोत्र कौशिक मूळ रा. देवळें, हल्लीं वस्ती गुलसराई (११-३-१८६३)
      - ७ **नाना सरदेसाई** (२८-२-१८६४)
  - ३ नांव दिलेलें नाहीं
    - ५ गणेशपंत

वं. नं. ५८. (२) गोरझामर मावळंकर फडणीस

- १ गोपाळराव मावळंकर
  - २ जगंनाथ
    - ३ बापूसाहेब ×गंगाबाई उर्फ वेणूबाई (१८८९-९०)
      - ४ गोपाळराव (१८९०-९१)
        - ५ बापूसाहेब

वं. नं. ५९ (३) बासोदा (मूळगांव देवळें) रियासत ग्वाल्हेर मावळंकर सरदेसाई

- १ पुरुषोत्तम नाईक (१७९६-९७)
  - २ मोरेश्वर
    - ३ रामचंद्र
      - ५ गोपाळ नाईक (१८८१-८२)
        - ९ केशव
        - १० रामचंद्र
      - ६ गोविंद
      - ७ कृष्णाजी
        - ११ मोरेश्वर
        - १२ विष्णु
    - ४ पुरुषोत्तम ना. सरदेसाई मावळंकर (१८८१-८२)
      - ८ नारायण

(४) जालवण (हल्लीं लष्कर ग्वाल्हेर) येथील घराणीं (ना. या. ले.)
वं० नं० ६० (अ) ६।१२।१८८४.

- १ सोमनाथपंत
  - २ गणेशपंत
    - ३ बाळशास्त्री
      - ६ अण्णा
        - ११ आत्माराम
          - १४ हरीभाऊ
          - १५ केशव
    - ४ बावजीपंत
      - ७ बाळकृष्ण
    - ५ नरसिंह
      - ८ भिकाजी
        - १२ भय्या
        - १३ गोपाळ
      - ९ नारायण
      - १० गोपाळ

(ब) का. या. ले. (१८९९-१९००)

मूळ जालवण हल्लीं सोपूर (वं० नं० ६१) मूळ जालवण हल्लीं पोहरी

- १ बाळकृष्ण
  - २ गंगाधर
    - ४ बाळकृष्ण
  - ३ धोंडो
    - ५ रामचंद्र

या बंधूंनीं यात्रा एकदम च केली आहे. सोपूर व पोहरी हीं ठिकाणें त्यांच्या त्या वेळच्या नोकरीचीं असावींत. हीं ठिकाणें ग्वाल्हेर रिसायतींतील आहेत.

वं. नं. ६२ (५ अ) सागर हल्लीं वस्ती जबलपुर, मध्यप्रांत

१ गणेश
- २ बाबाजी
  - ३ बाळकृष्ण
    - ४ श्रीधर
      - ६ गणेश
      - ७ विनायक
    - ५ दामोदर (९-३-१९०३)

नं. ५ दामोदर यांच्या स. १९०३ च्या लेखावरून ही वंशावळ मांडिली आहे. सदरच्या लेखांत नं. ७ चें नांव नांव नाहीं. परंतु ता. ४।९।२५ चें एक पत्र " रा. विनायक श्रीधर सरदेसाई-देसाई मेडिकल फार्मसी—जबलपुर," यांजकडून आलें; त्यांत त्यांनीं आपल्या घरची माहिती देणेचें अभिवचन दिलें, वगैरे कारणांमुळें विनायकराव हे नं. ४ श्रीधरपंताचे चिरंजीव असावे व १९०३ चे मार्चानंतर जन्मले असावे असा तर्क करून योग्य ठिकाणीं त्यांस बसविलें आहे. त्यांचे पत्तावरून त्यांचें घर सागरास असून घराण्यांत वैद्यकीचा धंदा चालतो असें दिसतें.

वं. नं. ६४ (५ ब) सागर येथील घराणें—

गंगाधर
- २ नारायण
  - ४ रघुनाथ
    - ९ शंकर
- ३ भिकाजी
  - ५ यशवंत (१६-१९१८)
    - १० दत्तात्रेय
  - ६ महादेव
    - ११ रामकृष्ण
  - ७ विष्णु
  - ८ गोपाळ

वं. नं. ६४

(४) मौजे पालगड ता० दापोली येथील मावळंकर कुटुंब.

१ गोपाळभट (पालगडास प्रथम येऊन राहिले).

२ नारायण ×लक्ष्मीबाई

३ बाळाजी ×गंगाबाई — ४ केशव ×अन्नपूर्णाबाई

(३ चे पुत्र:) ५ [महादेव] ×पार्वती — ६ [नारायण] ×भागीरथी — ७ [गोविंदभट] लग्न केलें नाहीं.

(४ चे पुत्र:) ८ विष्णु ×रखमाबाई ज.श. १७२४ मृ.श. १७९५ — ९ गोपाळ ×आनंदबाई ज.श. १७३४ मृ. १८०१

(८ चा पुत्र:) १० (रामचंद्र) × अन्नपूर्णा

(९ चा पुत्र:) ११ विनायक ज.श. १७६७ ×सरस्वती पेंढारकर

(११ चे पुत्र:) १२ केशव ज.श. १७८६ ×भागीरथी खांडेकर — १३ लक्ष्मण ज श. १७९० ×रखमा नाफडे — १४ (वासुदेव) ज. १७९७ मृ. १८३३ लग्न केलें नव्हतें.

(१२ चे पुत्र:) १५ गणेश ज.श. १८२७ — १६ वामन ज.श. १८३३ — १७ सदाशिव ज.श. १८४६

नं. ६ नारायण बाळाजी यांनीं सन १८७२ मध्यें नाशिक येथील यात्रा केली आहे. या पलीकडे बाळाजी नारायण (नं. २) यांच्या पुढल्या आजपर्यंतच्या वंशाचा पत्ता मिळाला नाहीं.

नं. १५ गणेश केशव यांजकडून उजवे बाजूची माहिती आली.

(५) आप्त मंडळ.

स्वगोत्रजांच्या सत्काराबरोबरच त्यांशीं आजवर सोयरीक करून आप्त झालेल्या परगोत्री कुटुंबांचेंहि स्वागत करणें विहित समजून अकारविल्हेनें त्यांची नांवनिशीं येथें देत आहों. नवीन लग्न ठरविण्यास तिचा उपयोग होणारा आहे. यादींत सर्व कुटुंबें कदाचित् दाखल झालीं नसतील म्हणून तिला 'अपुऱ्या **कामाच्या**' प्रकरणांत गोंविलें आहे.

१ अध्ये(अद्ये)	२० कोटिभास्कर	४० तोफखाने	५७ पंडित
२ आगटे	२१ कोलटकर	(पंडित)	५८ पेंढारकर
३ आजरेकर	२२ खांडेकर	४१ दिवाण	५९ प्रभुदेसाई
(सबनीस)	२३ खेर	(महाजनी)	६० फडणीस
४ आठल्ये	२४ गर्दे	४२ देसाई (आ-	६१ फणसळकर
५ आंगलेकर	२५ गुणे	,, सगेकर)	६२ फळणीकर
६ आंतुरकर	२६ गुर्जर	४३ ,, (देवरुख-	६३ बखले
७ करकरे	२७ गोडे	कर)	६४ बिनीवाले
८ कयाळ	२८ गोळवलकर	४४ ,, (पळसुले)	६५ बेलवलकर
९ कांटदरे	(पाध्ये)	४५ ,, (प्रभु)	६६ बोंद्रे
१० कानेटकर	२९ चांदोरकर	४६ ,, (रुणकर)	६७ बोरवणकर
११ कात्रे	३० चौकर	४७ नवरे	६८ भडकमकर
१२ काळे	३१ जठार	४८ नानिवडेकर	६९ भडभडे
१३ किबे	३२ जमेनीस	(महाजनी)	७० भागवत
१४ किर्लोस्कर	(पंडित)	४९ नाफडे	७१ भाटवडेकर
१५ कीर्तने	३३ जावडेकर	५० नारळकर	७२ मणेरीकर
१६ कुलकर्णी	३४ जोशी	५१ पटवर्धन	७३ महाजनी
(कनकाडीकर)	३५ टिकेकर	५२ पराडकर	७४ माईणकर
१७ ,,(खानापूर)	३६ टेंबे	५३ पळसुले	७५ मुकादम
१८ ,,(देवळेकर)	३७ ढवळे	५४ पाध्ये	७६ मुठ्ये
१९ कोगनोळीकर	३८ ताटके	५५ पुसाळकर	७७ मुळ्ये
(भास्ये)	३९ तांबे	५६ पोतदार	७८ मोघे

७९ लघाटे	८४ श्रीखंडे	८७ सप्रे	९२ हर्षे
८० वांकणकर	८५ सबनीस (आजरेकर)	८८ सरदेशपांडे	९३ हळबे
८१ शहाणे	८६ सबनीस (पन्हाळकर)	८९ सरमुकादम	
८२ शेंबेकर		९० सातवळेकर	
८३ शेवडे		९१ हर्डीकर	

एकाच कुटुंबास अनेक आडनांवें आहेत. वरील यादींत प्रत्येक आडनांव निरनिराळ्या अक्षरविल्हेंत मुद्दाम लिहिलें आहे; उ० महाजनी हे नानिवडेकर व दिवाण या आडनांवांचाहि उपयोग करितात म्हणून हें कुटुंब तीन वेळां वरील यादींत आलें आहे.

पन्हाळकर सबनीस यांचें उपनांव नाफडे आहे. कोल्हापुराकडे राहिलेल्या खांडेकरांस पन्हाळकर म्हणतात. श्रीखंडे यांजपैकीं एक कुटुंब हुजुरबाजार हें आंडनांव लिहितात. देवरुखकर देसाई यांचें मूळ उपनाम मोघे.

साखर्पेकर सरदेशपांडे, कनकाडीकर कुलकर्णी, तोफखाने व जमेनीस यांचें मूळ आडनांव पंडित आहे.

वेरवलीकर व मोंडेकर सरदेसायांचा पूर्वज २४ वे पिढीचा महादोबा नायक हा अत्रिगोत्री नाफडे घराण्यांतून दत्तक घेतल्यामुळें सरदेसायांच्या या शाखांस ८ पिढ्यांपर्यंत अत्रिगोत्राशीं संबंध करितां येत नव्हता. आतांची पिढी ३३।३४ वी असल्यानें ती हरकत दूर झाली असून तसे संबंध अलीकडे दोन घडूनहि आले आहेत व ते शास्त्र व शिष्ट यांस संमत झालेले आहेत. इतर मावळंकरांस ही हरकत केव्हांहि आली नव्हतीच.

पार्थिव, लोहिताक्ष, वैश्वामित्र आणि क्षालाक्ष या ४ गोत्री कुटुंबांशीं मावळंकरांचा संबंध होऊं शकत नाहीं.

मोंडेकर सरदेसायांनीं देशस्थ व चित्तपावन ब्राह्मण कुटुंबांशीं शरीरसंबंध घडवून आणण्याची अनुकरणीय पद्धत गेल्या ३०।४० वर्षांत अंमलांत आणिली आहे. अशा प्रकारें संबंध घडलेलीं कुटुंबें—

देशस्थांपैकीं—१ गुळवणी व २ चरणकर कुलकर्णी, आणि कोंकणस्थांपैकीं–१ मोडक, हीं होत.

यात्रालेखांपैकीं ज्यांचा मुळींच उपयोग करण्यांत आला नाहीं असे आतां सुमारें दहा लेख आमच्याकडे बाकी राहिले आहेत; परंतु त्यांत यात्रेकरूंच्या नांव-आडनांवापेक्षां किंवा फार तर राहण्याच्या ठिकाणापेक्षां अधिक माहिती नाहीं, सबब ते देऊन कांहीं फायदा नाहीं असें वाटलें.

यानंतर मावळंकरापैकीं कोणास कोणतीहि यात्रा घडेल तर त्यांनीं तेथील लेखांची काळजीपूर्वक तपासणी करून यात्रेच्या तिथीसुद्धां टिप्पण करून घ्यावें आणि आम्हांकडे पाठविण्यास सवड नसेल तर तें निदान आपल्याकडील या पुस्तकाच्या प्रतीस (प्रत्येक मावळंकर कुटुंब घराण्याचा हा वृत्तान्त पूर्वजांविषयींच्या आदरास्तव आपल्याजवळ ठेवून घेईल असा आम्हांस भरंवसा आहे) व्यवस्थितपणें जोडून ठेवावें, अशी त्यांस भावी वृत्तान्तकारांच्या वतीनें आम्ही विनंति करितों. तितकीहि फुरसत नसेल तर निदान त्यांनीं आपला लेख सुवाच्य व पूर्ण माहितीचा करून ठेवावा, आणि पुनरपि वृत्तान्ताच्या भानगडींत कोणी पडेल तर त्याच्यावर भावी उपकाराचें अनायासें होणारें हें ओझें तरी करून ठेवावें.

वाडवडिलांनीं पुढील पिढ्यांवर अनेक प्रकारचे अगणित उपकार करून ठेविले होते च. तथापि क्षेत्रोपाध्यायांच्या आग्रहावरून केवळ त्यांच्या वृत्तीस बळकटी व्हावी म्हणून लिहून ठेविलेल्या चार शब्दांचा उपयोग भविष्यकालीं स्ववंशीयांसदेखील अशा अनपेक्षित रीतीनें होईल आणि त्यांवरून आपलें स्मरण इतक्या कालावधीनंतर त्यांस घडेल, या गोष्टीची कल्पनाहि तत्कालीन लेखकांस आली नसेल; पण **यास्तेषां स्वैरकथास्ता एव भवन्ति शास्त्राणि** या न्यायानें त्यांची मदत आम्हांस आज होत आहे. तेव्हां

" कल्याणार्थ जनांहीं त्यांसी साष्टांग करुनियां नमन "

मग त्यांचा निरोप घ्यावा हेंच योग्य.

प्रकरण चवदावें

साफसफाई

फक्त दीड दोन शतकांतल्या दीड दोन हजार उपलब्ध झालेल्या जुन्या नव्या कागदपत्रांच्या मदतीनें घराण्याची सात आठ शतकांची त्रोटक हकीकत लिहून पुरी केल्यानंतर पुस्तकास हल्लींचें स्वरूप देण्याचें ठरवून मूळच्या लेखांत वारंवार भर घातल्यानें व वरचेवर फेरबदल करीत गेल्यानें पुस्तकाचा मजकूर विस्कळित झाला; त्याची संगति लावण्यास अनेकवार कल्पनेचें साह्य घ्यावें लागलें, व कित्येक वेळां ऐकींव माहिती हि वृत्तान्तांत दडपावी लागली. याप्रकारें लिहिलेला मजकूर अर्धाअधिक छापून गेल्यानंतर जी नवीन माहिती मिळाली व जे कागद हातीं लागले त्यावरून छापून गेलेल्या भागांत कांहीं ठिकाणीं दुरुस्ती करणें अवश्य दिसलें. मराठींत छापलेल्या पुस्तकांस ऱ्हस्वदीर्घादि कमजास्तीचें जें नेहमीचें शेंपूट असतें त्यापेक्षां बऱ्याच वेगळ्या प्रकारचें टिपण येथें जोडणें जरूर दिसलें. केवळ छपाईच्या ढोबळ चुका दाखवून भागणार नाहीं, तर कोठें कोठें स्पष्टीकरणाचा मजकूर जोडावा लागेल असें वाटल्यावरून हें स्वतंत्र प्रकरण लिहावें लागलें. गिलावा करून व सफेती फांसून मूळची ओबडधोबड असलेली इमारत जशी थोडी तरी उठावदार दिसेलशी करितात त्याच मासल्याचा हा प्रयत्न आहे. विशेष बारकाईनें पाहिल्यास शुद्धलेखनाच्या किरकोळ चुका पुष्कळ आढळतील; पण त्या दिसल्याबरोबर त्यांची दुरुस्ती हि वाचकांच्या सहज लक्ष्यांत येईल म्हणून त्या दिल्या नाहींत.

या प्रकरणांत पुढील संक्षेप योजिले आहेत— ओ०=ओळ, म्ह०= म्हणजे, ब०=बद्दल, पा०=पाहिजे, (पा०)=पाठांतर, झों०=झोंबडीकर प्रत.

ओळींच्या सुरुवातीचे आंकडे पुस्तकाच्या पानांचे आहेत.

प्र० १.

४ ओ.८ मुख्य म्ह० महत्वाची, वडील नव्हे.

५ ओ. ६ सर्व ब. ' बहुतेक '. ओ. ७ तेहि ब. त्यांपैकीं कांहीं. ओ. २१ एकत्र शब्दापूर्वीं ' जवळ जवळ ' शब्द पा.

६ ओ. १।२ " अवघड नाहीं " असें येथें लिहिलें खरें, परंतु नंतरच्या अनुभवावरून हें कार्य हातीं घेणाऱ्यांबद्दल सक्रिय तर राहोच परंतु निवळ औपचारिक सहानुभूति तरी कोणी दाखवितील कीं नाहीं हा संशय येऊं लागला आहे.

१० ओ. १४ ' पुरवणीनें ' आतां ' उत्तरार्धांत ' म्हणणें भाग आहे.

१२ वरील भगवंत शामजीचा अर्ज प्रभावळीचे कागदांत मिळाला. १८२७ पर्यंत मुख्य घराण्याच्या वेगळया शाखा व वांटण्या पूर्णपणें झाल्या नव्हत्या, तसेंच मावळंगें, धामापुर वगैरे आसपासचे गांव सरदेसायांच्या वहिवाटींतच होते असें या अर्जावरून दिसून येतें.

प्र० २

१४ ओ. १६ अधिकार कायम राहिला–स्वराज्यांत जरी त्या अधिकारास जबरदस्त धक्का बसला तरी त्याचें पुरतें निर्मूलन झालें नव्हतें. ओ. २१. देवळेकरांची सरदेशमुखी विशाळगड किल्ला व त्याकडे दिलेले ३½ महाल यांवर असल्यानें त्यांची वस्ती गडावर असे, तरी प्रभावळीकर सरदेशमुख हेहि प्रतिनिधींचे ताबेदार म्हणून गडावर आपल्या वाड्यांत राहत होते.

१५ ओ. ७ वडील शाखेच्या–गडावर देवळेकर व प्रभावळीकर असत, त्यांतील वडील शाखा प्रभावळीकरांची. ओ. ११ 'वडील'–अर्थात् महत्वानें; नात्यानें डोंगर शाखा वडील. ओ. १२ ' प्रभावळी ' कुळंबटांत ' परभोळी ' म्हणतात.

१६ ओ. ३ 'प्रशंसा'-रा. राजवाडे हे एक निःस्वार्थी, कष्टाळु आणि विद्वान् महाराष्ट्र- संतान आहेत. सडेतोडपणाविषयींहि त्यांची प्रसिद्धि आहे. तेव्हां त्यांच्याकडून मिळालेलें शिफारसपत्र औपचारिक नाहीं. त्यांत ज्या कऱ्हाडे ब्राह्मणांस त्यांजकडून हें शेला–पागोटें मिळालें आहे त्यांच्या जातीविषयीं रा. राजवाड्यांचें मत बरेंच कलुषित आहे; तेव्हां

प्रशंसेचे शब्द त्यांच्या लेखणींतून नाइलाजानें, निदान कष्टानें, उतरले असले पाहिजेत; म्हणून च ते किंमतीचे आहेत. ओ. ११।१२ इतरांस नसलें तरी घराण्यांतील मंडळीस तरी तें दप्तर महत्वाचें वाटेल असें आम्ही गृहीत धरून चालतों. ओ. २७ अमदाबाद दप्तरांत सुमारें १५ फारशी कागद आहेत परंतु ते यापेक्षांहि जुनाट असल्यानें फारच जीर्ण झालेले असून त्यांचा तर्जुमा करणें मुष्कीलीचें दिसत आहे.

१७ ओ. १५ बंधु विसोवा म्हणजे **चुलतभाऊ** समजावा.

१८ येथील विचारसरणी या पुस्तकांतील इतरत्र केलेल्या कांहीं उल्लेखांशीं विरोधी दिसेल. वृत्तान्ताच्या उभयतां लेखकांत स्वराज्याविषयींचें प्रेम मूळचें उत्कट असून उभयतांचें बहुतेक आयुष्य निर्भेळ स्वराज्याच्या सेवेंतच वेंचलें आहे; परंतु कामगारीचें क्षेत्र एकाचें उत्तरेस व दुसऱ्याचें दक्षिणेस असल्यानें च कीं काय कोण जाणे उभयतांच्या स्वराज्यविषयक अनुभवांत उत्तरदाक्षिणध्रुवांइतका फरक पडून तज्जन्य विचारांत त्या फरकाची छटा उमटल्यावांचून रहात नाहीं. एवढा इषारा येथें देऊन ठेवला म्हणजे विचारी वाचक बुचकळ्यांत पडणार नाहींत, व टीकाकारांच्या दोषाचें खापर भलत्याच डोक्यावर फुटणार नाहीं.

२० ओ. २२ **आडिवरें** बद्दल **मावळंगें** पाहिजे.

२१ ओ. १० ग्वाल्हेर नंतर जबलपुर पाहिजे.
ओ. १३ दुसऱ्या भागाच्या म्हणजे उत्तरार्धांत.

प्र० ३.

२३ ओ. २३ 'साखरीकर' या पुढें 'इत्यादि' शब्द वाचावा.

२९ ओ २० पूर्वींचे म्ह. २९ व्या पिढीपर्यंतचे. ओ. २६।२७ यांतील विधानें थोडीं अत्युक्त आहेत.

प्र० ४

३१ ओ. ११ त्यांचा म्ह. प्रमुख शाखांचा.

३५ ओ. २१ 'वंशवृक्षांत' बद्दल 'वृत्तान्तांत' पाहिजे

३८ ओ. १० ' त्यांचीं...बनलीं 'बद्दल ' त्यांच्या वेगळ्या शाखा झाल्या ' पा०

३९ ओ. ९ ' मुख्य उद्देश '—' स्वार्थसाधनाची ही एक नवीन भामटेगिरी आहे ' असा हि आमचा उद्देश कित्येकांनीं कल्पिला आहे. ओ. १८ ते २० येथील आणेवारी वतनी उत्पन्नाची किंवा हिशाची नव्हे. प्रभानवल्लींतून-प्रभानवल्ली व झोंबडी आणि संगमेश्वर व मुंढर अशा चार शाखा व देवळ्यांतून देवळे आणि वेरवली व मोर्डे अशा तीन शाखा निघाल्या एवढें सांगण्याचा हेतु आहे.

४० ओ. ७ ते ९ स्वार्थामुळें भाऊबंदकी बळावून या घसरगुंडीस फार वेग मिळाला. ओ. १० सर्वांत कनिष्ठ=वंशविस्तारामुळें वतनांत पराकाष्ठेची हिस्सेरसी होऊन निकृष्ट दशेला पोंचलेली.

प्र० ५

शें पाऊणशें वर्षांखालची बखरीची आणखी एक नक्कल झोंबडीकरां-कडून अलीकडे मिळाली, तिच्यावरून पाठभेद व पूर्वींच्या प्रतींतील कस-रीनें नाहींसे केलेले शब्द या ठिकाणीं दिले आहेत.

४५ विसाव्या पिढीचा नारोबा गिऱ्येंकर हा '**ललित**' घराण्याचा मूळपुरुष असा पत्ता अलीकडे लागला आहे.

४६ ओ. १६ यादव— माधव (पा०); ओ. २१ साह्य नाहीं—यवना-हीं मारिला (पा०); ओ. २४ माहालास— माहाल व (पा०), ओ. २६ दुसरे कोंकणात— कोंकणात आणखी (पा०).

४७ ओ. १४ चांदजी— चांदजीस (पा०); ओ. १९-००० चास—बेचाळीस (पा०); ओ. २२ येथील दोनी ठिकाणी 'नारोबा' बद्दल झोंब-डी प्रतींत 'नरसोबा' असा पाठ आहे; ओ. २४ आर्जविलें— आर्जिलें (पा०); ओ. ७ नंवद— वास्तविक ९५ (पृ. ६४ पहा).

४८ ओ. १७ वलटा-वळवा (पा०); ओ. २३ वसेवीची-वेसवी तर्फेची (पा०).

४९ ओ. ११ तिसाला केला यानंतर 'तों' हा शब्द झों.त आहे.

५० ओ. १५ कुवसेवाडी—०--वाडा (पा०); ओ. १७ इसाफतीच्या पुढें 'मिरास' शब्द झों०त आहे; ओ. २० राईवाडी-सोनार० (पा०); ओ. २२ परोक्ष-अपरोक्ष (पा०).

५१ ओ. ६ ०स न पडाव=०सी विरोध (पा०); ओ. २० नारोबा-नरोबा (पा०).

५२ सोमाजी (२–२७–१२) यास बेपत्ता खुणेनें दाखविला आहे. पण नंतर मिळालेल्या माहितीवरून त्याच वंशावळींतील नं. १६ चा विसोबा यास सोमाजीची स्त्री दुर्गाबाई इनें दत्तक घेतल्याचें कळून आलें. (मुंढरकर वंशा० पहा). हा विसोबा स० १७२८ च्या सुमारास वारला.

प्र० ७.

६१ ओ. ८ महमदाबाद ऊर्फ सतुरा-म्ह० सैतवडें. कान्होजी आंग्रे यांनीं सैतवडेकरांस दिलेल्या एका फर्मानांत 'महमदाबाद ऊर्फ सैतवडे' असा स्पष्ट उल्लेख सांपडला. अगदीं सूक्ष्म फरकानें 'सैतवडा' व 'सतुरा' हीं नांवें फारसी लिपींत सारखींच दिसतात.

प्र० ८.

६१ माथाळ्यांत वेलांटीनें पलटा मारल्यानें 'हकीकत' बद्दल 'हकिकत' झालें आहे. ओ. २२ 'वस्ती नाहीं'— फक्त २।४ घरें व १०।१५ माणसें किल्ल्यावर अजूनहि राहतात.

६२ ओ. २२ ओर्पे सरपोतदार— याचें नांव रंगो बापूजी. याजकडे पुढें किल्याची कारखानानिसी, सबनिशी आणि देवरूखचें कुलकर्ण इतकीं वतनें चाललीं. याचे वंशज सरपोतदारसुद्धां सदरील हुद्यांचीं चार आडनांवें वापरतात. फक्त त्यांच्यांत वतनांचें व त्याबरोबर आडनांवांचें हि वांटप झालें आहे. ओ. २६ 'वगैरे' ब० "हे तीन" पा०

६३ मथळ्यांत "वंशावळ नं. ३" हे शब्द नकोत- कमी करण्यांत यावे.

६४ लेखांक १ हा कागद 'वेरवली दप्तरां'त मिळालेल्या कागदावरून कांहीं थोडा मजकूर मधून मधून कमी करून दिला होता. हल्लीं त्याची

च एक प्रत 'देवळें दप्तरां'त मिळाली आहे. तिजवर सल्लास सलासीन मया तैन व अलफ असा सन आहे व तोच बरोबर आहे. वेरवलीकरांनीं प्रत करतांना 'तैन' शब्द गाळला हें स्पष्ट आहे.

६५ ओ. २२ रांगणा— यालाच प्रसिद्धगड असें दुसरें नांव आहे.

६६ ओ. १।२ हीं नांवें १ कृष्णाजी भास्कर पंडित नि॥ गणोवा ना० प्रभावळीकर २ केशव ना० बिन गोपजी ना० व ३ सोमाजी ना० बिन गोपजी ना० मोर्डेकर अशीं वास्तविक पाहिजेत. केसो रघुनाथ व सोमाजी बापूजी हीं नांवें मागाहून दडपलेलीं असावीं. किल्ला स्वाधीन केल्यावेळीं २७ वे पिढीचा सोमाजी बापूजी देवळेकर हा अगदीं लहान असल्यानें असल्या भानगडींत भाग घेण्याचें त्याचें वय नव्हतें, आणि केसो रघुनाथ धामापुरकराचा तर पत्ता च लागत नाहीं. शिवाय या कामगिरीबद्दल इनाम मिळालेल्या वेरवली व मोर्डें गांवांच्या सनदात फक्त केशव व सोमाजी बिन गोपजी मोर्डेकर यांचीं च तेवढीं नांवें आहेत.

देवळे दप्तरच्या या कागदांत विशाळगड किल्ल्याच्या हद्दी दाखविणारा असा हातानें रेघोट्या ओढून काढलेला एक नकाशा आहे. अवश्य दिसल्यास तो त्या दप्तरच्या कागदांत देऊं.

६७ ओ. ७ विसाजी मोरेश्वर मावळंकर— पृ० ११० वर काशीयात्रालेखाचा ता० २५।४।१८४३ चा उतारा दिला आहे, त्यांतील विसाजी ते हेच अशी बहुतेक खात्री वाटते; परंतु त्यांच्या वंशजांचा अद्याप कांहीं पत्ता लागला नाहीं. संगमेश्वरकरांनीं तपास केल्यास समजेल. ओ. ७।८ राघोवा हे (४-३१-२१) व सदाशिव हे (१५-३०-४) होत.

६८ शृंगारपुरकर राजांचे दिवाण म्हणून पृ. १३८ वर जे भानजी कृष्ण सांगितले ते भास्कर संभाजी पंडित यांचे आजे. त्यांची बहिण गोविंद ना०स दिली होती, म्ह० जमेनिसांचा सरदेसायांशीं असलेला सोयरिकीचा संबंध येथें सांगितल्याहून दोन पिढ्या प्राचीन आहे. नं० ३ कृष्णाजी भास्कर यांस धाकटा भाऊ केशव नांवाचा होता. उदयसिंगास देशीं परत पाठवितांना केशवास त्याच्या बरोबर दिला होता.

प्र० ९ वंशावळी.

वंशावळींसंबंधांत मागाहून पुष्कळ माहिती मिळाली ती आतां उत्तरार्धांत येणार आहे. येथें फक्त थोड्या चुका तेवढ्या दुरुस्त केल्या आहेत.

वं० नं० ४ नं० ३ गणोबाच्या दुसऱ्या बायकोचें नांव सत्यभामा असून तिनें १७३१ त नासिकची यात्रा केली होती. २८ वे पिढीच्या अंतोबास नं० ६ द्यावा, व २९ वे पिढीचा नं० ११ शामजीस 'दत्तक दिला' हीं अक्षरें जोडावीं.

वं० नं० ५ नं० ६ याचें ऊर्फ नांव 'रावजी' व नं. ७ चें 'नाना'. नं. ६ यास नं. ९ गोपाळ दत्तक दिला होता व त्यास नरहर म्हणून मुलगा होता. नरहर वैद्यकी करी. तो स. १९१४ चे सुमारास वयाचे ६० वे वर्षीं मयत झाला. या दत्तकाबद्दल पुष्कळ दिवस या घराण्यांत वाद चालला होता. नं. १२ जगंनाथ यांची जन्म ता० ९।५।१८६७ आहे; व नं. १४ रामचंद्र यास मोरेश्वर नांवाचा मुलगा आहे. ही मंडळी आतां मुचरी गांवीं राहतात. प्रभावळीस त्यांचें कांहीं राहिलेलें नाहीं.

वं० नं० ७ नं. ६ गोपाळ यांस चिटकोबा म्हणून औरस मुलगा होता तो वारल्यावर त्यांनीं मुंढरकरांपैकीं गणेश बाळाजी (८-३३-११) चा दुसरा मुलगा वामन यास दत्तक घेऊन त्याचें नांव 'रंगनाथ' असें ठेविलें.

नं. १३ नरसो नारायण यांच्या पुत्रांतील रामचंद्र यांचें नांव रामकृष्ण असें मागाहून लिहून आलें आहे. त्यांच्या गोविंद व रंगनाथ या पुत्रांच्या दरम्यान विसोबा नांवाचा मुलगा स. १८९२ च्या एका वंशावळींत काढून दिलेला आहे.

नं. १६ केशव मोरेश्वर यांच्या आबाजी व भगवंत या दोघांच्या दरम्यान बाजी व लक्ष्मण असे दोन मुलगे स. १८९२ त हयात होते.

वं० नं० ८. नं. ८ भगवंत याची बायको अनुबाई ही उत्तरहिंदुस्थानांतील पंथ पिपळोदा येथील खांडेकर जहागिरदार घराण्यांतील सीभाजी परशुराम यांची मुलगी होती.

नं. १२ भगवंत यास ' गुंडोबा ' असें बहुधा म्हणत.

नं. ११ गणेश बाळाजी यांचा वंश मागाहून समजला तो—

१ (दत्तात्रय) ज. १८९७ मृ. १९१८.

२ **वामन** ज. २३।६।१८९९ गोपाळ केशव झोंबडीकरांस दत्तक.

३ **आत्माराम** ज. २२।३।१९०२; ४ **श्रीराम** ज. २१।२।१९०४;

५ (गंगाराम) ज.१९०६ मृ.१९११, ६(जन्मतःच वारलेला मुलगा)

वं० नं० ९ नं. ३ अनंत व नं. ४ केशव यांच्या दरम्यान रुद्राजी च विठ्ठल असे दुसरे दोघे बंधु होते; त्यांची नक्कल आहे. नं. ९ गोविंद महादेव यांची पत्नी लक्ष्मीबाई ही शृंगारपुरकर राजांचे दिवाण, भानजी कृष्ण पंडित यांची वडील बहीण होय.

अनंत (९-२५-१०) याचा नष्टांश असें एका वंशावळींत स्पष्ट लिहिलें असल्यानें तसें दाखल केलें; परंतु नंतर नं. १८ नरसोबाचें एक पत्र मिळालें त्यांत त्यानें आपलें नांव नरसोबा अंतोबा लिहिलें आहे, यावरून नं.११ विठ्ठलाचा थोरला मुलगा अंतोबास दत्तक दिला असावा असें वाटतें.

वं० नं० १५. नं. २ धोंडोची मृत्यु तिथि बरोबर नसावी असा तर्क आहे. जी लिहून आली ती दिली आहे; पण संशयास कारणें आहेत. ३२ वे पिढीचे नं. ११ प्रल्हाद व नं. १५ भालचंद्र हे हयात आहेत.

वं० नं० १८. नं. ३ रामचंद्र यांच्या नांवें दत्तकबापाच्या निवाड्याचें प्रतिनिधींचें पत्र ता. ४।१२।१७६९ चें असल्यानें त्यांची मृत्युतिथि १७६३ असणें संभवनीय नाहीं. नं. ८ मोरो हे ता. २।६।१८३१ रोजीं वारले. वेरवलीची एक वंशावळ मिळाली आहे त्यांत नं. ११ नारायण यास पुत्र महादोबा म्हणून लिहिला आहे. तो सदाशिवाचा वडील भाऊ कीं दोनी नांवें एकाच देवाची असल्यानें वंशावळ लिहिणाऱ्या लांबच्या वेरवलीकरानें लिहिण्यांत चूक केली तें समजत नाहीं. त्या वंशावळींत सदाशिवाचें नांव च नाहीं, यावरून असा तर्क होतो; पण कदाचित् वंशावळ लिहिल्यावेळीं सदाशिव जन्मालाच आला नसला तर त्यास महादोबाचा धाकटा भाऊ समजावें लागेल.

वं० नं० २०. नं. १ केशव कृष्ण यांचा जन्म स. १७८२ आहे.

वं० नं० २१. नं. १ गोविंद कृष्ण यांचा जन्म स. १७८७ व नं. २ राघोचा स. १८०५.

वं० नं० २३. नं. २ पांडुरंग ऊर्फ आबा हे ता. १४।५।१८४८ रोजीं काशीस वारले.

नं. १३ शंकर ऊर्फ नाना याची जन्म ता. ४।१०।१८८० आहे.

वं०नं० २४. नं. १ गोपाळ बाळोबा यांची मत्युतिथि २२।२।१८३६ असें हि एक टिप्पण आलें आहे. नं. ३ सदाशिव नारायण यांचा जन्म स. १८१० त व मत्यु ता. २६।६।१८५९ रोजीं.

वं०नं०२५ नं. १ यांचें खरें नांव प्रल्हाद, लोकांत त्यांस बाळू म्हणत.

नं. ४ नरहर हे वेरवलीस जाऊन तेथें स्थाईक झाले.

नं. १२ रामचंद्र हे हयात (१९२५) आहेत.

वं० नं० २७ यांतील नं. १८ रामचंद्र मोरोबा हे बासोदा (ग्वाल्हेर रियासत) येथील वंशावळींतील नं.३ चे रामचंद्र मोरोबा असावेत काय ?

नं. ३४ वासुदेव हे स. १९१८ त वारले; त्यास नारायण म्हणून मुलगा होता तो हि वारला. नं. ३६ गणेश हे स. १८७० चे सुमारास वारले व आतां त्यांची नक्कल आहे.

पुर. वं. ७ नं. २७-नं. ८ परशुराम मोरेश्वर यांस पहिले दोन मुलगे गंगाधर व वामन म्हणून होते; त्यांची नक्कल आहे.

वं० नं० ३० च्या संबंधाचा तपशील—सैतवडे (अमदाबाद) शाखा दुसऱ्या अहवालांत देण्यांत येईल.

१११ याजवरील वंशावळींस नं. ३२ दिला आहे, तो बरोबर नाहीं; तो नंबर ' पुर० १८ ' पाहिजे.

११२ ओ. ७।८ ' मांडणी कोठें जमत नाहीं '—येथील दत्तो नारायण हे (१२।३०।२) होत. हे मोड्यांत येऊन राहिलेले वेरवलीकर. त्यांस मोर्डेकर समजून त्यांचा तपास त्या शाखेच्या वंशावळींत केल्यानें पूर्वी पत्ता लागला नव्हता. नं. १२ च्या वंशावळींत ही सर्व मंडळी आहेत.

११३ स. १७६३ ते १७७७ पर्यंतचे श्रीनिवास गंगाधर प्रतिनिधि यांस ऊर्फ नांव भवानराव असें होतें.

प्र. १०

११६ ओ. १५।१६ नारोवाची हकीकत नंतर थोडी बहुत समजली आहे (वं. नं. २९ पहा). ओ. १६।१७ रंगोवास केशव ना. नें आपल्या हयातींत च दत्तक घेतलें होतें.

११७ ओ. ९ ते ११. कानोवास व त्याच्या वंशास (डोंगरकर वं.नं.३ पहा) मागाहून राजापुर सुभ्याची सरदेशमुखी मिळाली वगैरे हकीकत नंतर मिळालेल्या माहितीवरून बाराव्या प्रकरणांत दिली आहे. ओ. १५ ते १७. विसोवा हा गणोवाचा सख्खा भाऊ, परंतु तो विठ्ठल सोमाजी लोवलेकरास दत्तक गेल्यानें चुलत चुलत भाऊ झाला; लोवलेकरांस वतनांतील हिस्सा नव्हता. विठ्ठल व सोमाजी या उभयतांकडे ६० वर्षे कुलमुखत्यारीनें सर्व च सरदेशमुखी होती. विठ्ठलास पुत्र नसल्यानें स्वतःचा निराळा हिस्सा करून घेण्याचा मोह उत्पन्न होण्याचें कांहीं कारण नव्हतें; आणि विसोवा दत्तक झाला म्हणून गणोवा आपल्या पाठच्या भावास उघडा टाकील असली शंका हि त्यास आली नसेल. विठ्ठल सोमाजीच्या हयातीपर्यंत घराण्यांत बेकीचें नांवसुद्धां नव्हतें, व आपली हयात संपतांच ती उत्पन्न होईल अशी कल्पना त्यास स्वप्नांतहि येण्याचें कारण नव्हतें. स्वतंत्र आणि बरोबरीचा असा हिस्सा मागण्याची प्रेरणा विसोवाच्या मनांत कान्होवा नरसोवामुळें आली असावी. दत्तक बाप व आजा यांच्या अधिकाराचा व वैभवाचा मोठेपणा विसोवाच्या मनांत भरवून त्याला इरेला घालण्याची कान्होवाची खटपट असावी, याखेरीज सयुक्तिक अशी दुसरी कल्पना आम्हांस तर होत नाहीं.

११९।१२०–देवळेकरांवरील येथील टीका प्रतिपक्षांतील वंशीयांनीं लिहिली असल्यानें तिजवर पक्षपातीपणाचा नसला तरी कडकपणाचा दोष येईल. गाढलेलीं मडीं उकरून काढण्यांत अर्थ नसतो हें खरें; पण घराण्याच्या वृत्तान्तांत अशा टीकेस फांटा देऊन तरी कसें चालेल?

१३० लेखांक ५ ची तारीख ३ जून १७०९ ई० आहे.

१३२ ले० ६ तील गणोवा, अंतोवा व दादोवा हे वं. नं. ४ मधील २८ व्या पिढीचे.

१३४ ले० ८ ची ता० १।५।१७०७ आहे. यांतील केशव व सोमाजी म्हणजे (९-२६-२१ व २२).

१३९ ओ. २ बाळाजी विठ्ठल हे (९-२६-२०). ओ. १०. ' मोडोंची तक्षीन ' व. ' मोड्यांची तक्षीम ' पा०

१४१ ओ. ४ केशव ना० हे (९-२६-२१) किंवा (९-२६-२३), परंतु बहुधां पहिलेच असावे. ओ. १० रुद्राजी (९-२७ २९) व गोपाळ (९-२७-३१) होत. ओ. १८ बाजी म्ह. (९-२७-२६).

१४२ येथील रुद्राजी ना० मोडेंकराचें वर्तन दत्तकवाद प्रकरणांतील देवळेकरांच्या वर्तनाच्या तोडीचेंच आहे; फक्त बोभाट कमी.

१४४ ओ. ५।६ गोपाळ ना० (९-२७-३१) व गोविंद ना० म्हणजे (९-२७-३२). ओ. २७ 'त्ळ' –पूर्वींच्या मोडींत "ळ" असा लिहीत.

१४६ ले० १६ यांतील बचोवा (२६-२८-३), गणोवा (१०-२८-२) आपाजी (११-२७-१), अंतोवा (१६-२८-२), रामचंद्र व लक्ष्मण हे (१८-२८-३ व ४), भिकाजी (२७-२८-५), बापूजी (२७-२८-६), व गोपाळ सोमाजी (२६-२७-१) होत.

१४८ ओ. १२ राव स्वामींनी = अमृतराव कृष्ण प्रतिनिधींनीं.

१५१ ले० १७ ची तारीख २४।२।१७०६ आहे.

१५६ ले० २० झोंबडी दप्तरांत या कागदाची एक सबंध नक्कल मिळाली ती त्या दप्तरचे कागदांत दिली आहे. ता. १२-१०-१७७० आहे.

ले. नं २० हा दुबार पडला आहे. तेव्हां येथील ले. चा नंबर १९ अ असा समजावा.

१५७ ओ. २६ सगुणाबाई ही (५-३०-२) गणोवाची बायको, व पत्र लिहिणार दादो सदाशिव (४-३०-८) ची थोरली चुलत भावजय.

१५८ ओ. ५ 'मूल लहान' –सगुणाबाईचा मुलगा प्रल्हाद ऊर्फ गुंडोबा

हा यावेळीं ८ वर्षांचा होता. ओ. ६ चिरं. नारोबा = नारो केशव (४-३०-१५).

१५९. ओ. ४. 'न करिताच करावे,' इ०—कुटुंबांतील आम्हीं कर्ते पुढारी पुरुष, तेव्हां तुमच्या ज्या गैरसोयी असतील त्या आम्ही होऊन समजून तुम्ही सांगण्यापूर्वीच दूर कराव्या हें योग्य; पण कज्यांच्या भानगडींत आम्हीं ठिकाणावर नसल्यानें नाइलाज झाला असा भावार्थ.

१५९ ओ. १६ ती॥ आपा = लेखकाचे वडील सदाशिव दादोबा.

ओ.२० 'आमचेच माथां,' इ०—जुन्या नोकरांची तुम्हींच आबाळ केली, आणि पदरीं कोणी रहात नाहींत याचें खापर आमच्याच डोक्यावर फोडतां ! वडील आहां, तेव्हां चूक पदरांत घेतली पाहिजे.

१६०. ओ. ११ 'सर्व सिधीच आहे'=(उपरोधानें) चहूंकडेच बाजा वाजावयाचा. ओ. २६ कगादपत्रांचें ब० कागद° पा०

१६१. ओ. ११ 'दरबारचा विचार,' इ०=आज बस्तान बांधलें आहे तें उद्यां टिकेल असा नेम नाहीं. उद्यां कदाचित् प्रतिपक्षाचा हात चढेल.

ओ. १६.' वाबुरावजी ' –पुण्याचे सरदार बिनिवाले व अप्पा मावळ-कराचे पाहुणे म्हणून पक्षपाती.

१६२. ओ. ६।७. खाल्या घरचे वांसे मोजल्याशिवाय जनापवादाचा डांगोरा कसा पिटेल व त्याखेरीज जन्माचें सार्थक कसें होईल? असा भावार्थ.

ओ. १६. 'इतराचा विशय' इ.–इतर मंडळीनीं काय दिग्विजय केला तो तुमच्या पत्रावरून दिसतोच आहे. वतनाचे कागद गहाण ठेवण्यापर्यंत तर पाळी आली आहे—असा भावार्थ.

१६३ ओ. आद्ययावत=यच्चयावत, एकंदर.

ले० २१--भास्करपंत बाबा हे सगुणाबाईंचे बंधु व सल्लागार.

१६४ ओ. ४।५ 'तुम्ही आम्ही एक पण कंठाळीला मेख' याप्रकारें तुमच्या लिहिण्यांत आणि प्रत्यक्ष कृतींत फरक आहे, तेव्हां तुमच्या शब्दां-वर विश्वास कसा बसेल ?

१६५ ओ. १२ नरहर गोविंद (२७-२८-८).

१७८ ओ. १६ दादोवा सदाशिव ब० सदाशिव दादोवा पा०

१८० ओ. ८ रामसेन ब० रामसेज पा०

प्र. ११

१९० ओ. ७ मावळंगे खोत रानडे ८८ व शेवडे ८८ असे दोन आहेत.

१९३ ले० ३४ ची तारीख १२।९।१७१० आहे.

प्र. १२

१९८ ओ. २५ शातकाच्या ब० शतकाच्या पा०

२०१ ओ. १९ खिळण्या ब० खिळणा पा०

२०४ ओ. १९ सुक्रर ब० मुक्रर पा० ओ. २६ 'मिळाली हा शब्द दुबार पडला आहे.

२०६ ओ. ४ ' खलल पडत ' ब० ' बिघाड घडत ' पा०

२०८ ओ. १ स्वराजाच्या ब० स्वराज्याच्या पा०

२१२ ओ. १ त्याच्याघर ब० त्याच्यावर पा०

२१३ ओ. १६ अचाकन ब० अचानक पा० ओ. २० कर्तबगारतिं ब० कर्तबगारींत पा०

२१६ ओ. २३ तिकडील फर्मानहि ब. तिकडीलहि फर्मान पा.

२१७ ओ. २६ बळावत गेली ब. बळाऊं लागली पा.

२१९ ओ. ८ ते १० लष्करची शिस्त मोडण्याऱ्यांस संताजी कडक शासन करी. अशाप्रकारचें देहांतशासन मिळालेल्या एका इसमाच्या आप्तानें सूड घेण्याच्या इराद्यानें संताजी निःशस्त्र व बेसावध असतां त्याचा खून केला या गोष्टीवर येथें कटाक्ष आहे.

२२० ओ. १४ दुतर्फा=आम्हांकडे जंजीऱ्यास व मराठी राज्यांत विशाळगड वगैरे जागीं. ओ. २४ बरहक्क निवाडा=हक्काचा योग्य विचार करून योग्य न्याय द्यावा लागतो. वशीला व शिफारस यांचें येथें काय प्रयोजन ?

२२१ ओ. १ याणेहि—कान्होवानें. ओ. १५ ते १७ कानोवाचा

हक्क वाजवी आहे अशी सरखेल यांची खात्री नव्हती म्हणूनच त्यांनीं घेता-चीच शिफारस केली होती असा भावार्थ.

२२४ ओ. २३ सन १८५४ नसून १७५४ आहे.

२२९ ओ. २१ 'पाहिल्यास' ब. 'पाहिल्यावर' पा.

प्र. १३

२३६ ओ. २४ टिकते ब० टिकली पा०

२३९ ओ. १५ सजविण्याचा ब० सजविण्याचा पा०

२४० ओ. १ टप्पाही ब० टप्पाहि पा०

२५१— (५ब) वंशावळीचा नं. ६३ पाहिजे.

२५३ नं. १९ ' कोगनोळीकर ' पाहिजे.

२५५ ओ. १२ ' आपला लेख ' उपाध्यायांच्या चोपडींत लिहून ठेवण्याचा तो.

प्रकरण पंधरावें.

पहिला मुक्काम व पुढली दिशा.

विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम् ।

हें कसें काय असेल तें असो, पण दर दोन—अडीचशें वर्षांनीं **मावळंकरांचा वृत्तान्त** त्या कालमर्यादेपर्यंत आणून पोंचविण्याची प्रेरणा घराण्यांत कोणाला तरी होत आली आहे खरी. स. १६८४ च्या **बखरी**-नंतरचा हा स. १९२४ चा फेर; पण दोहोंत केवढा फरक ! एकाच नियंत्रणाखालीं एक दोन बैठकींत लिहिलेली बखर किती आटपशीर व सुटसुटित आणि अनेकांच्या मदतीवर विसंबून सुरू केलेलें व गोगलगाईच्या पावलानें रेंगाळत चाललेलें हल्लींचें बाड किती अस्ताव्यस्त व हेंगाडें ! कशास कांहीं मेळ ?

उपलब्ध कागदपत्रांवरून विद्यमान स्ववंशीयांच्या साह्यानें घराण्याचा

नमुनेदार इतिहास तयार होण्यास हरकत काय या खात्रीवर तो संकल्प जाहिर करून उद्योग आरंभिला; परंतु अंदाज चुकून अकल्पित अडचणींनीं अगदीं तोबा उडवून दिला. त्यामुळें पहिली संकल्पित मांडणी पार विसकटून गेली आणि अपेक्षेप्रमाणें साधनसामुग्रीचा पुरवठा न झाल्यानें अखेर तिचें अव्यवस्थित प्रदर्शन मांडणें भाग होऊन वरती असल्या कृतीस 'इतिहास' हें भपकेदार नांव देऊन त्या नांवाची विटंबना आणि बंधुवर्गांची फसवणूक केल्याचा आरोप मुकाट्यानें सहन करण्याचें नशीबीं आलें.

आम्हीं काय उद्योग आरंभिला आहे व तो शेवटास जाण्यास बंधुजनांचें किति साह्य पाहिजे याची बरोबर कल्पना पत्रोपत्रीं त्यांस देतां येणें शक्य नाहीं, याकरितां अर्धेमुर्धें काम च त्यांच्या नजरेस आणावें म्हणजे बरें, असा विचार अनेकवार मनांत आला. त्यांतच नांवारूपास येण्यासारखी होतकरू मंडळी अंगची कर्तबगारी दाखविण्याकरितां कंबर कसूं लागण्यापूर्वीच विश्वभक्षक काळाच्या तोंडांत अकस्मात् जाऊन पडलेली पाहून आम्हां पिकलेल्या पानांची कंबर खचली; आणि झालें तेवढेंच काम हातावेगळें करून, दिलेल्या वचनांतून अर्धवट तरी मुक्त व्हावें असें एकसारखें वाटूं लागलें. पुस्तकाची पृष्ठसंख्या हि पुरी झाली; म्हणून हा पूर्वार्ध प्रसिद्ध करून चार दोन महिन्यांची विश्रांति घेण्याचें ठरवून येथेंच पहिला मुक्काम केला.

या भागाच्या वाचनानें आम्हांस कोणत्या माहितीची अपेक्षा आहे त्याची बरीच चांगली कल्पना सर्वांस येईल. पुस्तकांत ठिकठिकाणीं दिसणाऱ्या उणीवा काढून टाकण्याविषयीं व पुस्तकाचें स्वरूप मनोहर व उपयुक्त करण्याविषयीं अनेकांस अनेक गोष्टी सुचविता येतील, टीकाकारांचे लेख उत्कृष्ट मार्गदर्शक होतील, वगैरे पुढील प्रवासाच्या सोयींचा फायदा करून घेण्याचे स्वार्थसाधु विचार हि मनात आल्याशिवाय राहिले नाहींत.

उत्तरार्धांत पुढील विषय आणण्याचा हेतु आहे.

१. अठराव्या शतकाअखेर ज्या वतनदार शाखांचें संकलित वृत्त पूर्वार्धांत द्यावयाचें राहिलें आहे तें वृत्त, व ज्या दप्तरांतील कागदपत्र या भागांत आले नाहींत ते कागदपत्र.

२. उत्तर हिंदुस्थानांतील घराण्यांचा व इतर मावळंकरांचा वृत्तान्त.
३. अपुऱ्या वंशावळींची स. १९२५ अखेर करवेल तेवढी पूर्तता.
४. पूर्वार्धांतील वंशावळींच्या अनुक्रमानें प्रत्येक कुटुंबाची त्रोटक व त्यांतील कर्तबगार इसमांची गेल्या १२५ वर्षांतील थोडी विस्तृत व साधेल तर सचित्र, हकीकत.
५. वतनांची सद्यःस्थिति, इनाम गांवांचा अहवाल आणि मावळंकरांच्या वस्तीच्या मुख्य मुख्य ठिकाणांचें ठळक वर्णन.
६. इंग्रजी अंमलांतील निवडक व मनोरंजक पत्रव्यवहार.
७. घराण्यांतील विद्यमान मंडळींची डायरेक्टरी–घरदार, ठिकाण उद्योगधंदा, वगैरेंची.
८. सन १९२६ च्या एप्रिलांत मौ० मावळंगें येथें श्रीकुलस्वामीचा सार्वजनिक उत्सव होणार आहे, त्याचा सचित्र साग्र अहवाल.

आणि

९. इतरांकडून पुस्तकांत यावयाकरितां सुचविण्यांत येतील त्या विषयांपैकीं सामान्यतः घराण्याच्या उपयोगीं पडतील अशा कांहीं बाबी.

एखाद्या राष्ट्राचा इतिहास लिहितांना अनेक प्रकारच्या मोठमोठ्या घडामोडींची इतकी गर्दी होते कीं दोनचारशें पानांच्या पुस्तकांत प्रत्येक प्रसंगाच्या वर्णनाला सरासरीनें पांच सात ओळी मिळण्याची पंचाईत पडते. एखाद्या प्रसिद्ध पुरुषाचें चरित्र निरनिराळ्या सजावटींनीं चित्तवेधक करण्यास अडचण येत नाहीं; परंतु एखाद्या घराण्याचें इतिवृत्त अथपासून इतिपर्यंत लोकांच्या डोळ्यांत भरेल असें निर्माण करणें म्हणजे फार कठीण काम आहे. घराण्यांच्या इतिहासाचे आजचे नमुने म्हणजे प्रसिद्ध झालेल्या कित्येक संस्थानिकांच्या घराण्यांच्या लहान मोठ्या हकीकती होत. आरंभीच्या एखाद्या दुसऱ्या पुरुषाची हकीकत यांतून वजा केल्यास बाकीच्या गादीनशीनांचीं कथानकें कायम ठशांनीं छापलेल्या शब्द सोडलेल्या धड्यासारखीं च बहुधा आढळतील. नांवांचा व सनांच्या आंकड्यांचा तेवढा फरक. तथापि सुद्धां हीं कथानकें रियासतीच्या इतर मह-

त्याच्या गोष्टींत मिसळून जात असल्यानें त्यांचा नीरसपणा एकाएकीं प्रत्यास येत नाहीं. हल्लींसारख्या केवळ कौटुंबिक कुलकथांची स्थिति अगदीं वेगळी आहे. त्यांस सार्वजनिक हितसंबंधाची फोडणी नसल्यानें त्यांचा वेचवपणा कमालीस पोंचण्याची भीति असते. या कुलकथांचा उपयोग फार तर त्या घराण्यांतील लोकांस च होतो. हें लक्ष्यांत ठेवून पुस्तकाची उपयुक्तता कशी वाढेल व त्याबरोबरच त्याचा नीरसपणा कसा कमी करतां येईल याविषयीं खबरदारी घेतली पाहिजे व वृत्तान्ताचा पाया जितका विस्तृत घालतां येईल तितका घातला पाहिजे. आतां अशा प्रकारचें नमुनेदार, उपयुक्त व मनोवेधक पुस्तक निर्माण व्हावें अशी इच्छा असणें व तसें तें निर्माण करण्याची अंगीं धमक व योग्यता असणें यांत महदंतर आहे. ' इच्छा असेल तर मार्ग दिसेल ' या उत्तेजक म्हणीचा दृक्प्रत्यय व्यवहारांत क्वचित् येतो, पण ' **उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः** ' या मनोत्साहभंजक वचनाचा कटु अनुभव मात्र नित्याचा. **उत्तरार्धाच्या** विषयवारीकडे पाहिल्यास तावडतोब लक्ष्यांत येईल कीं आम्हीं केलेल्या योजनेप्रमाणें कामाचा उठाव व्हावा अशी तीव्र इच्छा आमच्या बंधुवर्गांत उत्पन्न झाल्यावांचून कांहीं उपयोग होणार नाहीं. पूर्वार्धाच्या मानानें उत्तरार्धाच्या कांहीं भागाबद्दल साधनसामुग्रीचें आमचें दारिद्र्य अठरा विस्वे आहे, व तें स्वजनांनीं माहितीचा **भरभक्कम पुरवठा केल्याशिवाय** दूर होणारें नाहीं. आमच्या या काकुळतीच्या विनंतीस मान दिला तर हातोहात काम होऊन जाईल, नाहींतर तें रेंगाळत मागें पडून सर्वांच्याच भावी नाचक्कीस कारण होईल. या प्रकारचें काम जसें वारंवार होत नसतें तसेंच तें एका दोघांच्या हातून हि पुरें होणारें नसतें; म्हणून बंधुवर्गांपैकीं समर्थांनीं हातभार लावून तें सर्वांगसुंदर केलें पाहिजे; किंबहुना हें त्यांचें अवश्य कर्तव्य आहे. तें ते कसें बजावितात हें लवकरच समजेल.

भाग पहिला समाप्त.

॥ श्रीनृसिंह प्रसन्न ॥

सरदेसाई घराण्याचा इतिहास.

मावळंकर

भाग दुसरा

जुने कागदपत्र

खंड पहिला.

प्रास्ताविक

आतांपर्यंत आमच्या हातीं आलेल्या जुन्या कागदपत्रांपैकीं घराण्याच्या इतिहासाशीं साक्षात् किंवा परंपरेनें संबंध असलेले निवडक कागदपत्र या भागांत देण्याचें योजिलें आहे. या इतिहासाशीं ज्यांचा संबंध मुळीं च नाहीं, किंवा असला तर अगदीं थोडा असे इतर कागद हि हातीं लागले आहेत. ऐतिहासिक कागद या दृष्टीनें ते हि महत्वाचे आहेत; पण या पुस्तकांत त्यांचा समावेश करावा कीं कसें याचा विचार चालू आहे. जागेच्या मानानें अखेर ठरेल तसें करूं.

घराण्याच्या शाखांच्या अनुक्रमानें दप्तरें छापावीं अशी योजना आरंभीं ठरविली होती. परंतु दप्तरें मिळविण्याकरितां केलेल्या प्रयत्नांस म्हणावें असें यश आलें नाहीं. मिळालेल्या सामुग्रीवर गुजारा करणें भाग झालें.

हे कागदपत्र प्रसिद्ध करण्यांत स्वीकारलेल्या पद्धतीची ओळख वाचकांस आरंभीं च करून देणें अवश्य आहे, म्हणून ती थोडक्यांत सांगतों.

घराण्याचा वृत्तान्त संगतवार समजावा म्हणून कागदपत्र निरनिराळ्या शाखाविभागांत कालानुक्रमानें दिले आहेत. संदर्भ-सुलभतेकरितां त्यांस क्रमांक मात्र पहिल्या भागाचा च पुढें चालता ठेविला आहे.

बऱ्याच निवडक कागदांचा येथें जीर्णोद्धार केला आहे. त्यांचें महत्व महाराष्ट्राच्या इतिहासांत कितपत आहे याचा निर्णय वाचकांनीं करावा. घराण्याच्या इतिहासांत त्यांचें महत्व कोणास हि नाकबूल होणार नाहीं असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं असें वाटतें.

हातीं आलेल्या कागदांवर कसर, झुरळें, इत्यादिकांचा हल्ला कमजास्त प्रमाणांत झालेला आहे. नकला अस्सलबरहुकुम काढतांना पूर्णपणें नाहींशीं झालेलीं अक्षरें ०००० या खुणेनें दाखविलीं आहेत. साधारणपणें हीं शून्यें नष्ट जाहलेल्या अक्षरसंख्येइतकीं दिलीं आहेत; तथापि ही गोष्ट केवळ अंदाजी असल्यानें त्या मानानें तिची किंमत समजली पाहिजे. रेघ काढून जागा कोरी सोडिली आहे तेथें मुळांत तसें आहे असें समजावें. कित्येक जागीं मुळांतील अक्षरें बरोबर समजलीं नाहींत तेथें तसें स्पष्ट लिहिलें आहे. एक च अक्षर अनेक रीतींनीं वाचतां येण्यासारखें आढळलें तेथें प्रकारांतर त्या अक्षरापुढें कंसांत तें दुसरें अक्षर लिहून आणि इतर शंकास्थानें प्रश्न चिन्हानें दाखविलीं आहेत.

प्रभावळी दप्तरांत कित्येक कागदांच्या १।१, २।२ सुवाच्य नकला करून ठेवलेल्या मिळाल्या. अस्सल कागदांतील नाहींशीं झालेलीं अक्षरें उमगण्यास या नकलांचा पुष्कळ उपयोग झाला, आणि अवश्य तेथें तो भरपूर करून घेण्यांत हि आला. या सर्व नकला शें पाऊणशें वर्षांपूर्वी काढलेल्या दिसतात. त्या एका दोघांच्या च हातच्या आहेत. वतनासंबंधानें सरदेसायांस सातारा किंवा पुणें येथील दरबारांत कराव्या लागलेल्या अनेक वादांत पुराव्याकरितां अस्सल कागदपत्र गुदरावे लागल्यावेळीं या नकला घरच्या दप्तरीं राहण्याकरितां काढल्या असाव्या असें मानावयास त्या दप्तरीं आधार मिळालेला आहे.

प्रत्येक लेखाच्या आरंभीं डाव्या बाजूस अनुक्रमांक व उजवीकडे इंग्रजी तारीख, आणि मध्यभागीं शिक्कानंबर व श्रीकार, वगैरे, लिहिले असून लेखाच्या शेवटीं मोर्तबाचा क्रमांक दिला आहे. जुन्या कागदावरील शिक्के व मोर्तबें प्रथम सर्व एकत्र देऊन त्यांस स्वतंत्र क्रमांक

दिले आहेत; आणि अशाप्रकारें दिलेले स्वतंत्र अनुक्रमांक प्रत्येक लेखाच्या डोक्यावर व शेवटीं लिहिले आहेत; उ०–शि०४ व मो०२ म्हणजे चौथ्या नंबरचा शिक्का व दुसऱ्या नंबरचें मोर्तब असें समजण्याचें आहे.

शिक्केमोर्तबांसंबंधांत हें धोरण पुस्तकाचा आकार त्या मानानें कमी व्हावा म्हणून स्वीकारिलें आहे. या च कारणाकरितां कागदपत्रांतून वारंवार येणाऱ्या शब्दांस व शब्दसमूहांस सुद्धां संक्षेपाच्या संज्ञा योजिल्या आहेत; त्या पुढें दिल्या आहेत. कागदांतील मुख्य मजकूर वाचण्यास या संक्षेपानें अडचण न येईल एवढी मात्र खबरदारी ठेविली आहे.

कागदांतील अक्षरीं लिहिलेले लांबलचक फारसी सुहूर सन आंकड्यांनीं दाखविले आहेत.

लेख कालानुक्रमानें दिले आहेत. काळ बरोबर समजण्यास जेथें मुळांत साधन नाहीं तेथें कागदांतील मजकुराच्या अनुरोधानें त्या लेखाचा काळ ठरवून त्याचा क्रम मुक्रर केला आहे; अर्थात् तो मागें पुढें सरकण्याचा संभव आहे.

फारसी कागदांच्या बाबत सर्व व्यापार दुसऱ्यांवर पूर्णपणें अवलंबून असलेला, सबब प्रोफेसर यदुनाथ सरकार यांनीं ज्या कागदांचें तात्पर्य लिहून पाठविलें त्यांतील दोन तीन व इतर दोन तीन मिळून सुमारें पांच सहा च फारसी कागद पूर्णपणें—मराठींत शब्दोच्चार लिहून—या पुस्तकांत छापले आहेत.

फारसी कागदांचें सामान्य स्वरूप मियां मूठभर आणि दाढी हातभर असें दिसलें म्हणून बाकीचें अस्सल कागद सर्व न छापतां त्यांचा फक्त सारांश ज्या त्या ठिकाणीं नमूद केला आहे. या कागदांतील सुरुवातीचा मजकूर कायम ठशांचा पाल्हाळिक असल्यानें तो पुनः पुनः लिहिण्यांत विशेष अर्थ नव्हता. आदिलशाहींतल्या व औरंगजेबाच्या वेळच्या कागदांची ही हकीकत आहे. जंजिरा शिद्दी यांचीं कांहीं फर्मानें वरती फारसी भाषेंत व लिपींत असून खालीं पुनः मराठींत–मोडींत–लिहिलेलीं आहेत; तीं सर्व दिलीं आहेत; परंतु जीं निवळ फारसी च होतीं त्यांतून कांहीं सबंद व

कांहीं सारांशानें मराठींत छापिलीं आहेत. सर्वस्वीं दुसऱ्यांच्या ओंजळीनें पाणी पिण्याच्या या प्रसंगीं साधेल तशी तहान भागवून घेतली आहे.

फारसी कागदांवरील शिक्यांच्या बाबतींत हि हें परावलंबन बरें च जाचक झालें; त्यामुळें त्या शिक्यांचें स्वरूप या ठिकाणीं थोडें वेडें वांकडें दिसणार आहे. नकला अस्सलबरहुकुम आहेत असें म्हणतांना सदरचीं व्यंगें आधीं च सांगून ठेवलेलीं बरीं.

(२)

कागदपत्र छापतांना योजलेल्या संक्षेपसंज्ञा :—

एका शब्दाबद्दल —

आ० = आज्ञापत्र. उ० = उपरांत. गो० = गोसावी.
जा० = जाणिजे. न० = नमस्कार. ना० = नायक किंवा नाईक.
मा० = मामले. रा० = राजश्री. वि० = विशेष.
स० = सकलगुणालंकरण.

मूळांतील संक्षिप्त शब्द आहेत तसे च ठेविले आहेत.

शब्दसमूहांबद्दल —

[अ०] = अखंडित-लक्ष्मी-आलंकृत राजमान्य.
[क०] = नूतन (नवीन) पत्राचा आक्षेप न करणें.
[क्ष०] = क्षत्रियकुलावतंस श्रीराजा (नांव) छत्रपति स्वामी यांणी (नांव) यांसी आज्ञा केली ऐसी जे.
[ता०] = ताजे सनदेचा उजूर न करणें.
ना० का० = नामजाद व कारकून.
[ना० का०] = नामजाद व कारकून वर्तमान व भावी.
ना० सं० = नाम संवत्सरे.
[ब०] = या पत्राची प्रती (तालीक) लिहून घेऊन अस्सल (मुख्य) पत्र भोगवटियास मशारनिले (नांव) जवळ परतोन (फिरून) देणें.
रा० रा० = राजमान्य राजश्री.
[रा०] = राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री.

[ये०] = येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन केलें (करीत गेलें) पाहिजे.
[स०] = समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री.
[स्व०] = स्वस्ति श्रीराज्याभिषेकशके.

(३)

शिके.

शिक्क्यांच्या आकारांच्या संक्षित संज्ञा :– अ. = अष्टकोनी; क. = कमलदलसम ; च. = चतुष्कोनी ; पिं. = पिंपळपानी; लंब = लंबवर्तुलाकार; व. = वर्तुलाकार; वस. = वर्तुलसम; उ. = उतरंडीप्रमाणें.

दिलेले नंबर	शिक्याचीं अक्षरें	शिक्का कोणाचा	आकार संज्ञा
१.	निळकंठशरण पिलाजी	(सुभेदार)	व.
२.	श्रीशिव नरपति हर्षनिदान सामराज मतिमंत प्रधान		व.
३.	श्रीशंभुसुमनोत्कंठ मोरेस्वरसुत नीळकंठ	(प्रधान)	क.
४.	श्री लक्ष्मीनृसिंहभक्तश्रीनीररायादि जन्मणः आल्हादवर्धिनी मुद्रा प्रल्हादस्य विजय्यते	(प्रतिनिधि)	वस
५.	श्रीमत्स्वामिकृपारामा मुद्रा संपत्प्रदायिनी । महादेवसुतस्यैप्रा गणेशस्य विराजते ॥	(सुभेदार)	लं.
६.	(अक्षरें समजत नाहींत)——राजाराम म० छत्पति.		व.
७.	श्री आई आदिपुरुष श्री राजाशिवछत्रपतीस्वामिकृपानिधि तस्य परशुराम त्र्यंबक प्रतिनिधि		अ.
८.	श्री दादाजी कान्हो ।	(सुभेदार)	व.
९.	श्रीशिवनरपतिहर्षनिदान मोरेश्वरसुत नीलकंठ प्रधान		पिं.
१०.	श्रीशिवनरपति हर्षनिधान मोरेश्वरसुत भैरव मुख्य प्रधान ॥		लं.
११.	श्रीशंकर श्री शाहु छत्रपती कृपानिधी । प्रलहादसुत गदाधर प्रतिनिधी ॥		अ.
१२.	श्रीरामचंद्र ॥ कृष्णाजी वेंकटेश ॥	(सुभेदार)	अ.
१३.	श्रीशाहु नरपति हर्षनिधान । मोरेश्वरसुत भैरव प्रधान ॥		पिं.
१४.	श्रीभवानीचरणी दृढभाव । बापूजीसुत माधवराव ॥	(सुभेदार)	लं.

१५. श्री वल्लालकुलानंदनीलकंठप्रभोरिया । (सुभेदार) क.
सुद्रा मोदाय सर्वस्य चंद्रलेखेव वर्धते ॥

१६. श्रीमंगेशचरण । चिमणाजी बल्लाळ शरण ॥ (सुभेदार) लं.

१७. श्री आई आदिपुरुष। श्रीराजाशिवछत्रपति स्वामी कृपानिधि। व.
तस्य परशराम त्र्यंबक प्रतिनीधि॥

१८. श्रीराजा शाहुचरणीतत्पर॥ बाबाजी भाडवलकर॥ (हवालदार) व.

१९. श्रीराजा शिव महीपाळक ॥ शेवक कृष्णसुत त्र्यंबक ॥ (सुभेदार) व.

२०. श्रीराजा शाहु छत्रपति हर्षनीधान। बाळाजी विश्वनाथ प्रधान॥ पिं.

२१. श्री ॥ श्रीआई आदिपुरुष ॥ श्रीराजा शाहुछत्रपति स्वामि- अ.
कृपानिधि । तस्य श्रीनिवास परशराम प्रतिनिधि ॥

२२. स्वस्ति श्री सुखदा मुद्रा प्रतापोत्कर्षवार्द्धिनी । च.
सरदेशमुखस्यैषा शाहुराजस्य राजते ॥ (सर सरदेशमुख)

२३. श्री आई आदिपुरुष॥ श्रीराजाशंभुछत्रपतीस्वामी कृपानिधी अ.
तस्य कृष्णाजी परशराम प्रतीनीधी ॥

२४. श्री ॥ वर्धिष्णुर्विक्रमैर्वि०० तिरिव वामनी । अ.
शंभुसुनोरसौ मुद्रा शिवराजस्य राजते॥

२५. श्री ॥ प्रतिपच्चंद्ररेखेव वार्धिष्णुर्विश्ववंदिता । चक्राकार.
शंभुछत्रपतेर्मुद्रा रामसूनोर्विराजते ॥

२६. श्रीराजा शंभुछत्रपति हर्षनिदान । पिं.
रघुनाथसुत तिमाजी पंडीत मुख्य प्रधान ॥

२७. श्री शिरके ०र सदाशिव० राजनृपाळा ०००००० अ.
गतो ०००००० पारक राजा (विठोजी शिरके)

२८. श्रीराम ॥ जगद्वंदितसंदेशरद्रेशातद्‌विधायिनी । (अमात्य) पिं.
नीलकंठज० मुद्रा रामचंद्रस्य राजते ॥

२९. श्रीरामचंद्रचरण । नीलकंठ सोनदेव शरण ॥ (अमात्य) लं.

३०. श्री राजा शाहु नरपति हर्षनिधान । वस.
बाजीराव बळाळ मुख्य प्रधान ॥

३१. श्रीशिवराज जनाधिनाथ । तदीय सेवक आपाजी विश्वनाथ ॥
(सुभेदार) लं.

३२. श्री शाहुनृपतिप्रीत्या तुकोजीतनुजन्मनः । लं.
कान्होजी सरखेलस्य मुद्रा जयति सर्वदा ॥

३३. श्रीमत्कान्होजीसंभूतशंभोश० जिगीषेत । (सरखेल) लं.
वर्धिष्णु ० ज रेखेव ० मुद्रा ० ० विराजते ॥

३४. श्री ००००००० चरणतत्तर । लं.
रामाजीसुत कान्होजी शीरके निरंतर ॥

३५. श्री शीर्काईचरणतत्पर । रामाजीसुत कुवर्जी शीरके निरंतर ॥ अ.

३६. श्री शीव नरवीर ॥ दादजीसुत खंडोजी माणकर ॥ (सुभेदार) लं.

३७. श्री आई आदिपुरुष । श्रीराजाशंभुछत्रपतिस्वामी कृपानीधी । लं.
तस्य अमृतराऊ कृष्ण प्रतीनीधी॥

३८. श्री राजा शाहुनरपति हर्षनीधान । बाळाजी बाजीराव प्रधान ॥ पिं.

३९. श्री राजाराम छत्रपति कृपानिधि । नारो शंकर पंडित प्रतिनिधि ॥ अ.

४०. श्री आई आदिपुरुष । श्री राजा सिवछत्रपति स्वामिकृपानिधि । व.
आबाजीराव कृष्ण प्रतिनिधी ॥

४१. अबुल सानी काजी हसन बिन अली सन ०००० ॥ (सरसुभेदार) व.

४२. या अली मदत अज् मौलाए अली ००० महमदशाह: बादशाह: ॥उ.

४३. जफैज लुत्फ् इनायत जिल्ले सुबहानि बखिताब (सरसुभेदार). व.
मुहातिम रेजा तलबखान ॥

४४. या अली मदत जद् मोहर शाही गदजे मोहर मुर्तुजा उ.
बर मिहरुमा खसर आदिल अली बादज् महमदशाह: ॥ १०५८

४५. आलमगीर गाजीए मजीद बादशाह: (सरसुभेदार) व.
३५ इनायत खान ११०२

४६. महमदशाह: बादशाह: गाजीए याकूतखान फिदवी (सुभेदार) व.

४७. शाह: आलम् बादशाह: गाजीए (सुभेदार) व.
याकूतखान फिदवी

४८. श्री———————बाजीराव——————— (सुभेदार) पिं.

४९. श्री आई आदिपुरुष श्रीराजा श्रीस्वामी कृपानिधि । लं.
तस्य परशराम त्र्यंबक प्रतिनिधि ॥

५०. श्री राजारामचरणी सादर ।
तुकोजीसुत कानोजी नीरंतर ॥ (आंग्रे सरदार) व.

५१. श्री आई आदिपुरुष । श्रीराजा शाहु छत्रपति चरणी तत्पर । व.
जगजीवन परशराम निरंतर ॥

५२. श्री आई आदिपुरुष । श्रीराजा शंभुछत्रपति स्वामी कृपानिधी । पिं.
तस्य कृष्णाजी परशराम प्रतीनीधी ॥

५३ सदरप्रों. व.

५४. श्री आई आदिपुरुष । श्री राजा शिवछत्रपतिस्वामीकृपानिधि । व.
तस्य परशराम त्र्यंबक प्रतिनिधि ॥

५५. श्री श्री आई आदिपुरुष लं.
श्री राजा शाहु छत्रपति स्वामि कृपानिधि
तस्य श्रीनिवास परशुराम प्रतिनिधि ॥

५६. श्री । श्री आबाजीराव कृष्ण प्रतिनिधी चरणीं तत्पर । अ.
विसाजीसुत खंडोजी घाटगे निरंतर ॥

या भागांत छापण्याकरितां आरंभीं निवडलेल्या कागदांवरील बहुतेक सर्व शिक्के वर दिले आहेत. यांखेरीज इतर शिक्यांचे कागद मागाहून छापण्यास घेण्यांत येतील—आणखी कागद हातीं येण्याचा संभव आहे—तर त्यांवरील शिक्के देण्याचीं असलीच कांहीं व्यवस्था करण्यांत येईल.

(४)

मोर्तबें.

शिक्यांच्या बाबतींत उपयोगांत आणिलेल्या आकारांच्या संक्षेपांशिवाय ष. = षट्कोनी, व लंच = लंबचक्राकार, हे दोन नवीन संक्षेप येथें योजिले आहेत. मोर्तबाची प्रत्येक ओळ संपल्याजागीं उभी रेघ दिली आहे.

१. मर्या । देयं विरा । जते । ष. २. मर्या । देयं विरा । जते । लंच.

३. मोर्तब । सुद । व.
४. विलस । ति लेखन । सीमा । वस
५. मर्या । देयं विरा । जते । व.
६. राजते । लेखना । वधी । व.
७. मोर्तब । व.
८. राजते । लेखना । वधी । व.
९. मर्या । देयं रा । जते । व.
१०. लेखन । सीमा समु । ल्लसती । व.
११. लेखन । सीमा । व.
१२. राजते । लेखना । वधि । वस.
१३. राजते । लेखना । वधिः । वस.
१४. लेख । नावधी । मुद्रा । वस.
१५. मोर्तब । शुद । व.
१६. लेख । नावधी । मुद्रा । क.
१७. राजते ले । खना व । धिमुद्रा । वस.
१८. लेख । नावधी । व.
१९. राजते । लेखना व । धिमुद्रा । वस.
२०. मो । र्तब । सुद । पिं.
२१. मोर्त । ब सुद । व.
२२. मर्यादेयं । विराजते । लंच.
२३. लेख । नावधी । मुद्रावी । राजीत । वस.
२४. लेख । नावधि । च.
२५. लेख । नावधी मुद्रा । लं.
२६. लेखना । वधिमु । द्रा विराजते. वस.
२७. लेखना । आवधी । मुद्रावी । राजते । व.
२८. राजते । लेखना । वधि । पिं.
२९. लेख । नावधी । मुद्रावि । राजते । व.
३०. लेखना । आवधी । मुद्रावी । राजीत । वस.
३१. विलस । तिलेख । नावधी । व.
३२. मर्यादेयं । विराजते । लं.
३३. लेख । नावधी । मुद्रा ष.
३४. मोर्तब । सुद । व.
३५. मोर्तब । सूद । (फारसी) लं.
३६. लेखन । सीमा । च.
३७. श्री । लेखन । सीमा । व.
३८. ले । खना । वाधि वि । राजीत । पिं.
३९. रा । जते । लेखना । वधी । पिं.
४०. राजते । लेखना । वधि । व.
४१. विलस । ति लेख । नावधी । व.
४२. राजते ले । खनावधि । वस.
४३. वीलस । तिलेख । नावधी । व.
४४. लेखन । सीमा । ष.
४५. इत्य । लम् । व.

जुन्या कागदांच्या नकला करण्यांत काय काय तजविजी केल्या पाहिजेत, कोणकोणत्या खबरदाऱ्या घ्यावयास पाहिजेत या गोष्टींचें विवेचन रा. राजवाडे यांनीं ' इतिहास व ऐतिहासिक ' या मासिकांत " ले० १३ मोडीवाचन व शुद्धलेखन " या निबंधांत, पृ. २४३ ते २५६ यांवर, विस्तृत व मार्मिक केलें आहे. त्यांच्या सूचनांप्रमाणें शास्त्रशुद्ध नकला होण्यास ज्या अडचणी आहेत त्या हि त्यांनीं तेथें स्वानुभवानें नमूद केल्या आहेत. त्यांच्या कांहीं सूचना आजच सर्वत्र मान्य होतील असें नसून त्यांनीं नमूद केलेल्या अडचणींखेरीज दुसऱ्या अडचणी हि आढळतील. कागदांचा खरेपणा निर्विवाद शाबीत व्हावयास रा. राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें नकला व्हावयास पाहिजेत हें खरें; परंतु तें काम अविरत श्रम, मुबलक पैसा, छपाईच्या साधनांची संपन्नता आणि हौशी, व्यासंगी, व व्यवस्थित लेखक इतक्या गोष्टींची अनुकूलता असल्यावांचून तडीस जाणें कठीण आहे. तथापि रा. राजवाड्यांच्या सूचनांकडे लक्ष्य देऊन नकला करण्यांत शक्य तेवढी काळजी घेतली आहे.

खंड दुसरा

डोंगर दप्तर.

सर्वसाधारण अहवाल.—या घराण्याकडून फक्त चार कागदांच्या नकला मिळाल्या. पहिल्या भागांतील ले. ५ हा त्यांतील सर्वांत जुना कागद. मावळंकरांतील सर्वांत वडील शाखा ही हें सदरच्या व ले. ६।७ या प्रभावळी दप्तरच्या कागदांवरून तेथें (भाग १ – पृ. ११६।११७) दाखविलें आहे. चौथा कागद ता. २५-७-१८९४ चा वतनदारांसंबंधानें इंग्रजी अंमलांतील सेटलमेंटच्या छापील नमुन्याचा असल्यानें जरूरीपुरतें त्याचें तात्पर्य शेवटीं दिलें आहे. बाकीचे दोन कागद सबंध येथें छापले आहेत.

स. १७०७।०८च्या सुमारास ताराबाई व शाहु यांचा राज्याच्या मालकीविषयीं तंटा सुरू झाला होता. मालकाच्या घरांत दोघां प्रमुख व्यक्तींमध्यें कलह लागला ह्मणजे चाकरपेशानें वागणारांची जी त्रेधा उडते तीच येथें सरदेसायांच्या वांट्यास आली. त्यावेळचा सरदेशमुख गणोबा रंगोबा हा फार धूर्त होता. कोणता पक्ष जिंकतो व कोणता पडतो याचा अंदाज घेऊन त्या मानानें आपलें पुढील धोरण ठेवतां यावें या हेतूनें त्यानें तटस्थवृत्ति धरली. परंतु त्याचा हा कावा ताराबाईच्या पक्षाचा व मराठी राज्याचा तत्कालीन प्रमुख मुत्सद्दी रामचंद्रपंत अमात्य याच्या लक्ष्यांत आल्यावांचून राहिला नाहीं. रामचंद्रपंताच्या या वेळेच्या मनःस्थितीचा उपयोग करून घेऊन मागें पडलेलें आपल्या हक्कांचें तट्टू कान्होबा नरसोबानें (२-२८-१३) पुढें दामटून ताराबाईकडून वर सांगितलेलें ले०५ चें आज्ञापत्र मिळविलें. लेखांक ५ ते ७ वरून गणोबास दूर करून कान्होबाची सरदेशमुखीवर स्थापना करण्याचा प्रयत्न कसा झाला, गणोबानें त्यास कसा प्रतिकार केला, आणि आपल्या हातचा अधिकार जाऊं न देतां, संधी सांपडतांच कान्होबास मिळालेलें आज्ञापत्र तें देणारांकडून च गणोबानें कसें रद्द करून घेतलें, हें स्पष्ट दिसून येतें. पुढें शाहू व संभाजी यांचे आरमारांवरील सरदार आंगरे यांचा प्रभानवल्लीकर सरदेसायांवर कान्होबा नायकाच्या पक्षपातानें बरा च डोळा असल्यानें कान्होबास हातीं धरून आपल्या ताब्यांतील प्रांतांत तरी त्यास व त्याच्या घराण्यास सरदेशमुखी वतनावर स्थापावें अशी आंगरे सरदारांनीं पुष्कळ खटपट केली. परंतु खुद्द छत्रपति व पंत प्रतिनिधि यांजपुढें आंगऱ्यांचें त्यावेळीं कांहीं चाललें नाहीं. डोंगरकरांस हल्लीं चालत असलेलें वतन आंगऱ्यांच्या आग्रहामुळें विजयदुर्गाखालीं स्वतंत्रपणें मिळालें असावें किंवा गणोबा व त्याचे बंधु दादोबा, अंतोबा यांस प्रभावळी, अंजनवेल, दाभोळ वगैरे अनेक ठिकाणीं व निरनिराळ्या धन्यांच्या ताब्यांत राहणें भाग पडल्यानें आंगऱ्याच्या अंमलाखालील राजापुर सुभ्याकडे त्यांच्या मर्जीतल्या कानोबाच्या घराण्यास काम करूं देण्याची बुद्धि होऊन त्यास त्यांनीं वतनाचा एक लहान भाग वहिवाटूं दिला असावा,

आणि तो पुढें त्याच वंशांत कायम झाला असावा असें आमचें अनुमान आहे. पुढल्या दोन कागदांवरून हें अनुमान दृढ होतें. कानोवाचा पुत्र नरसोवा नायक याच्या निधनानंतर त्याच्या बायकोस दत्तक घेण्याबद्दल विजयदुर्गच्या सुभेदाराची परवानगी रीतसर घ्यावी लागलेली दिसत आहे. नरसोवाच्या वेळीं च विजयदुर्गसुभ्याखालीं डोंगरकरांचे " सरदेसाई प्रांत राजापुर" असें स्वतंत्र वतन झालें होतें यांत संशय नाहीं. विजयदुर्ग हें आंग्र्यांच्या आरमाराचें मोठें ठाणें होतें, व विजयदुर्ग किल्ल्याखालील मुलखावर आंग्र्यांचा साक्षात् ताबा असल्यानें त्यांच्या कृपादृष्टीनें अशी गोष्ट झाली असावी. प्रभानवल्लीकरांनीं ही गोष्ट नाइलाजानें पत्करली असावी. प्रतिनिधींचीं पत्रें यासुमारास आंग्र्यांस गेलेलीं पाहिलीं ह्मणजे तीं ताब्यांतल्या परंतु शिरजोर अधिकाऱ्यांस लिहिण्याच्या गुळमुळीत पद्धतीचीं दिसतात; आणि प्रतिनिधीसारख्यांस किंचित् नमतें घेण्याची जेथें वेळ आली तेथें त्यांच्या आश्रयानें उड्या मारणाऱ्या प्रभानवल्लीकरांस गप्प बसण्याचा शहाणपणाचा मार्ग रुचला यांत आश्चर्य नाहीं.

डोंगर हा गांव राजापुराजवळ डोंगरावर आहे.

या घराण्यांत " सरदेसाई प्रांत राजापुर " या वतनाची जमीन व नक्त नेमणूक हल्लीं चालते तिचा तपशील :—

मौजे धोपेश्वर ता० राजापुर या गांवीं जमीन ९ बिघे १२ पांड १०।।। पोल, आकार रु० ३८१८४, व नक्त नेमणूक १४१८६८७ मिळून १४५८७८११ रु. चें वतन ब्रिटिशसरकारची वफादार (राजनिष्ठ) रयत राहण्याच्या आणि पुढील तपशिलाप्रमाणें सालिना कर देण्याच्या शर्तीवर वंशपरंपरा बिननोकरी इनाम चालणारें आहे.

	कराची रकम
८२८७	मामूल जुडी
४९८१५८४	चाकरीच्या बदला द्यावयाची जुडी
९८१८३	नजराणा
५९८३८२	एकूण

अर्थात् (८६८४८९) रु० रकम तालुक्यांतून मिळते. हल्ली नांववाले नारायण नरहर नायक सरदेसाई यांस ता.२५।७।१८९४ ची सनद ब्रिटिश सरकारची आहे.

मावळंकर सरदेसायांच्या इतर वतनांत यांस हिस्सा नसावा व इतरास या वतनांत नसावा असें वाटतें. डोंगरकरांनीं हें वतन कधीं संपादन केलें व डोंगरकडे ही शाखा स्वतंत्रपणें कधीं राहूं लागली किंवा यांस अगदीं जवळच्या अशा शाखा हल्लीं कोणत्या वगैरे माहिती मिळाली असती तर बरें होतें.

मौजे डोंगर तपे सौंदळ या गांवच्या खोतीच्या वहिवाटीस आपल्या निसबत गुमास्ता गणोवा नायक प्रभावळीकर (४-२८-३) यानें पाठविल्याचा व ती व्यवस्था सरकारांतून मान्य केल्याचा मजकूर प्रभावळी दप्तरच्या ता० ३ फेब्रु. १७११ ई० च्या एका आज्ञापत्रांत आहे.

या घराण्यासंबंधांत इतर माहिती मिळाली नाहीं. फक्त क्षेत्रांच्या यात्रा केल्यासंबंधांत लेखांचे उतारे मिळाले ते —

काशीयात्रा—स. १८९१।९२ तील —

" **आपाजी** उर्फ **जयाजी** गोविंद सरदेसाई, मावळंकर, गोत्र कौशिक रा. मौजे डोंगर ता. विजयदुर्ग, जि. रत्नागिरि, प्रांत राजापुर; आजे (?) व्यंकटेश गणेश; विशाळगड व संगमेश्वर येथें भाऊबंद आहेत."

यांतील इसमांचा आम्हांस अद्याप कांहीं पत्ता लागलेला नाहीं.

नाशिकयात्रा—ता. २४।१०।१९०४ ची —

" **कृष्णाजी** रामचंद्र; आजे गणेश रामचंद्र; बंधु गणेश, यशवंत, वामन, विष्णु; पुतणे नारायण, नरहर व गोविंद गणेश; व वासुदेव वामन; पुत्र महादेव व शिवराम; गां. डोंगर."

ही मंडळी नं. ३ च्या वंशावळींत आहेत. वंशावळ पाठविणारांनीं मयतांस गाळून टाकल्याचें होत आहे.

असल्या माहितीवरून घराण्यांच्या वंशावळींचे चुकलेले दुवे सांपडल्याचा अनुभव आम्हांस आला तसा च तो इतर लोकांस येऊन परस्पर संबंध जोडण्यास त्यांस मदत व्हावी हा असले उतारे देण्याचा हेतु आहे. मुख्यत्वें त्याच वंशांतल्या मंडळीकडे इतर कांहीं साधनें असल्यास त्यांत यामुळें अल्पस्वल्प भरती पडेल.

लें० ४० श्री ता. १० फेब्रु.१७६५.

शिक्का वर्तुलाकार—श्री कृष्णचरणी तत्पर कृष्णाजी विश्वनाथ निरंतर.

अज स्वारी कृष्णाजी विश्वनाथ सुभेदार प्रांत जंजीरे विजयदुर्ग ता। कमाविसदार व पतकी व डांगे जमात (?) बंदर राजापूर सु॥ ११६५ रा० नरसोबा ना० बिन कान्होबा ना० सरदेसाई मा० प्रभानवली प्रांत मजकूर व सुभा दाभोल व देसाई ता। संगमेश्वर यांस पुत्रसंतान नव्हतें मृत्युकाल समीप आला असे जाणून आपले स्त्रीस आज्ञा केली कीं आपल्या दायादांतून हरकोणाचा दत्तपुत्र घेऊन ऋणपरिहार करून वतनास अधिकारी करणें म्हणून आज्ञा होती त्याजवरून नरसोबा ना० याची स्त्री गोपिकाबाई यांनी सुभां येऊन विदित केलें जे दत्तपुत्र घ्यावयासी भ्रताराची आज्ञा आहे, परंतु सरकारची आज्ञा व्हावी त्यावरून सुभांतून धर्माधिकारी ज्योतिषी उपाध्ये व शिष्ट ब्राह्मणांस व जमीदारास सनदा सादर केल्या जे शास्त्रसंमत असल्यास गोपिकाबाई यांस दत्तपुत्र करूं देणें त्यावरून मौजे डोंगर तर्फ सौंदळ येथें वृत्यंसी व सिष्ट ब्राह्मण व जमीदार मिळोन सभा करून रामाजी ना० यास विधानपूर्वक गोपिकाबाई यांचे पुत्रत्व प्रतिपादन करून संमतपत्र करून दिल्हे आहे तें मनास आणून गोविंद ना० हे सरदेसाई यांचे दायाद त्यांचे पुत्र रामाजी ना० हे नरसोबा ना० बिन कान्होबा ना० सरदेसाई यांचे पुत्रत्व पावले हें जाणून सरदेशमुखीचें वतन रामाजी ना० बिन नरसोबा ना० सरदेसाई प्रांत मजकूर यांचे मुकरर केलें असे तरी सरदेसाई यासी रुजु होऊन जकातसंबंधे हकलवाजिमा पुरातनप्रो चालवीत जाणें [क०] [ब०] जा० छ १९ साबान मोर्तब सुद मो० ३

लें० ४१. शिक्का. श्रीगजानन ता० १६ जुलै १७६६ ई.

अजस्वारी रा० आनंदराव धुळप सुभेदार आरमार जंजिरे विजयदुर्ग ता। खोत व कमाविसदार गांवगंना ता। सौंदळ सु॥ ११६७ रा० रामाजी ना० बिन नरसोबा ना० बिन कान्होबा ना० सरदेसाई मा० प्रभानवली

सुभा प्रां राजापुर व सुभा दाभोल व देसाई ताा संगमेश्वर व कोंडिवरें यांनी हुजुर सरसुभां जाऊन आपलें वर्तमान यथंभूत निवेदन करून सरसुभांतून छ २ रजब सन सीत सितैनची (ता. १५ दिसेंबर १७६५ ई०) सनद सुभे प्रांत मजकुरीं सादर जाहली तेथें आज्ञा कीं सरदेसाई मशारनिल्हे हुजुर जाऊन विदित केलें कीं नरसोबा ना० बिन कान्होबा ना० सरदेसाई व देसाई यांचा काल होतेसमई किले मनोहरीं होते तेथें दायाद कोणी समीप नव्हते तेव्हां स्त्री संनिध होती तिजला आज्ञा केली कीं आपल्या दायादांतून हरकोणाचा पुत्र दत्तक घेऊन वतन चालवणे ह्मणोन त्याजवरून त्यांची स्त्री गोपिकाबाई हुजुर येऊन यथंभूत वर्तमान निवेदन करून सरकारचे पत्र सुभा आरमार व सुभा जंजिरे विजयदुर्ग येथें रा० कृष्णाजी विश्वनाथ यांस नेऊन हरदू सुभांची पत्रे ज्योतिषी व धर्माधिकारी उपाध्ये व शिष्ट ब्राह्मण व जमीदार प्रांत राजापुर यांस नेऊन मौजे डोंगर तर्फ सौंदळ येथें शास्त्रसंमत विधानपूर्वक आपणांस पुत्र गोपिकाबाई कोम नरसोबा नाईक बिन कान्होबा नाईक यांणी घेतले त्याजवरून उभयतां सुभेदार जंजिरे मजकूर यानीं पत्रें करून देऊन आपलें वतन पूर्ववतप्रों चालविले त्याप्रों सरकारची पत्रें भोगवटियास करून द्यावीं म्हणोन त्याजवरून तुम्हांस पत्र सादर केलें असे तर रा० रामाजी नाईक सरदेसाई व देसाई यांकडे वतनी खोती पुरातन मौजे डोंगर ताा सौंदळ येथील आहे ते पूर्ववतप्रों व ताा मजकूरपैकीं सदरहू वतनसमंधे हक लवाजिमा व इनामत इसाफत गाव बागा ठिकाणें व बंदरगा जकातपैकीं हक मानपान व तशरिफा व बाजे बाब व कानूकायदे व वतनी खोत्या व सिका पुरातन सुदामत चालत आल्याप्रों मशारनिल्हेकडे सुरळीत चालवणें म्हणोन त्याजवरून मनास आणून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे तरी सरदेसाई मशारनिल्हे यांसी रुजु होऊन सदरहू वतनसंमधें ताा मार पैकीं हक लवाजिमा व इनामत व इसाफत गाव बागा ठिकाणें बंदरगा जकात पैकीं हक मानपान व तशरिफा व बाजे बाब व कानूकायदे देत जाणें व वतनी खोत्या व सिका सुदामत पुरातन चालल्याप्रमाणें हे चालवितील जाणिजे छ ७ माहे सफर मोर्तब सूद.

खंड तिसरा

प्रभावळी दप्तर

सर्वसाधारण अहवाल—स. १६६० च्या सुमारास २६ व्या पिढीचा सरदेशमुख केशव राघोबा मृत्यु पावला. त्याचा दत्तक पुत्र रंगोबा अल्पवयी ह्मणून नरसोबा कान्होबा, हणमाजी केशव वगैरे गुमास्त्यांकरवीं वतनाच्या सेवेचा बंदोबस्त केला जात होता. रंगोबा वयांत येऊन कामकाज स्वतः पाहूं लागला ती वेळ महाराष्ट्रांत अत्यंत खळबळीची होती. मराठ्यांच्या एकाएकीं चौफेर उठलेल्या वावटळीमुळें विजापुरच्या सुलतानाचा तळकोंकणांतील अंमल पार उडून गेला होता. फक्त दंडाराजपुरीं येथील शिद्दी सुभेदार यांनीं मराठ्यांस शेवटपर्यंत दाद दिली नव्हती. शिद्यांचा अंमल प्रथमतः विजापुरच्या व नंतर मोंगलांच्या आश्रयानें जंजीऱ्याच्या आसपासच्या प्रांतांत जारी होता. मुसलमानांकडे तळकोंकण प्रांताची सत्ता होती त्याचवेळीं विशाळगडचा निराळा तनखा पडून त्याखालील गांव देवळेकर नरसोबा नायक याच्या वंशाकडे स्वतंत्र सरदेसाई वतनांत गेले होते. शिवाजीचा अंमल पुरा सुरू होण्यापूर्वींच प्रभानवल्ली दाभोळ आणि अंजनवेल इतक्या ठिकाणीं सरदेशमुखांचीं वेगवेगळीं ठाणीं निरनिराळ्या प्रांतांच्या कारभारासंबंधानें झालेलीं होतीं च. सरदेसायांस मुसलमानी अंमलांत मिळालेलीं शेतें, कोंड, आगरें वतनाबाहेरील भाऊबंदांत वेळोवेळीं वांटून दिलीं होतीं. सरदेशमुखी मात्र प्रत्यक्ष वांटली नव्हती; तरी ती निरनिराळ्या व्यक्तींनीं चालविण्याची अवश्यकता येऊन पोंचली होती. शिवाजीच्यावेळीं मुलखाची फेरव्यवस्था होऊं लागली व सर्व कारभार वेगळ्या शिस्तीनें होऊं लागला तेव्हां सरदेशमुखीचे तनखे आपोआप वेगळे पडले. राजारामाच्या कारकीर्दीअखेर सरदेशमुखांच्या मुख्य घराण्यांतील पुरुष च हे सर्व कारभार निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या अंमलदाराच्या ताब्यांत राहून पार पाडीत. रंगोबानें या सर्व कारकीर्दी स्वतः पाहिलेल्या होत्या. रंगोबाचा थोरला मुलगा केशव हा अंजन-

वेळीस काम करीत असतां चिपळूण येथें स. १७२४ मध्यें वारला. राजारामाच्या मृत्यूनंतर ताराबाईची कारकीर्द चालू झाली व पुढें शाहू महाराज परत आल्यावर उभयतांतील तंटे चालून अखेर राज्याचीं दोन शकलें झालीं त्यांत कोंकणपट्टीचे दोन विभाग झाले. या खळबळीच्या विकट कालीं रंगोबा व त्याच्या पश्चात् त्याचे मुलगे गणोबा, दादोबा व अंतोबा यांनीं फार सावधगिरीनें छत्रपति, प्रतिनिधि, आमात्य, छत्रपतींचे सुभेदार आणि हबसाणचे शिद्दी अंमलदार यां सर्वांची सेवा करून सर्वांकडून शाबास म्हणवून घेतलें. नवीन खोत्या संपादिल्या, कित्येक चाहूर जमीन प्रांतोंप्रांतीं व गांवोंगांवीं मिळविली; अमानत झालेलीं कित्येक महालांचीं सरदेशमुखीचीं वतनें परत मिळविलीं. खुद्द शिवाजीनें रंगोबाचा चांगला सन्मान केला. दादोबा व गणोबा यांच्या कर्तबगारीस तर एक प्रकारें ऊत च आला होता. या सर्व गोष्टी पुढें दिलेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट दिसतात; परंतु कर्तबगारीची पराकाष्ठा येथें झाली व या पिढीच्या पश्चात् या घराण्यास सारखी ओहटी लागली. गणोबादि सर्व बंधु एक विचारें वागून कोणाचें कशांत उणें पडून देत नव्हते. त्यांच्या नंतर प्रत्येकाचा सवता सुभा होऊन सात शत गांवच्या सरदेशमुखीचे सात तुकडे पडले. तुकडे पडतां च घराण्याचा दरारा, इभ्रत, एकोपा आणि स्वास्थ्य नाहींसें झालें. इतकें झालें तरी बडा घर आणि पोंकळ वासा या न्यायानें बाहेरला डामडौल पेशवाईअखेर कसाबसा टिकला. ब्रिटिश अंमलांत ही हि बेगड उडून गेली आणि नांव तेवढें सोनुबाई राहून हातीं कथलाचा वाळा उरला.

सूचना—या भागांत प्रसिद्ध करण्यांत येत असलेल्या फारसी कागदपत्रांच्या बाबतींत पुढील संक्षेप केले आहेत—

म. = मज्कूर किंवा मज्बूर (सदरचा); मु. = मुआमिलए (मामले); मौ. = मौजए (मौजे); त. = तपए (तपे) किंवा तर्फए (तर्फ).

ले० ४२ अलमुल्कोलिल्लाहे ता० १३ मार्च १६५५.

शिक्का वर्तुलाकार— अल् वासिक बिल् वली / काजी हुसेन बिन अली —कबील् बा सिले उल् आली

फर्माने हुमायून् शर्फे मुदूरयाफत बजानिबे कुद्वतुल्अमाजिद वल् अश्राफ लायकुल् मराहीम वल् आताफ मुमहिदे कवानीने मम्लुकत् नाजिमे उमूरे सल्तनत सर आमदे कार आगाहाने सआदत् केश मुख्लिसतरीने हवाख्वाहाने सलाह्अंदेश सियादत् व नकाबत् दस्तगाह् शराफत् व निजाबत् इंतिबाह् मिजाजदाने कार. आगाह् सैयद नूरुल्लाह् सरखैले ममालिक् सरहवालदार व इज्जत व रिफअत दस्तगाहां फतह् -उल्—मुल्क् हवालदारे मु० मुजफ्फरआबाद व किलअ खिलना व शेख अली हवालदार मु० बंदरे मैमूने मुस्तफाआबाद आं के अज शुहूरे संने खंमसा व खमसैन अलफ दरीं बिला केसो नायक बिन राघो नायक महालुंगकर बदर्गाहे मुआल्ला इल्तिमास नमूदा खिझते सरदेसमुखीए मु० मुजफ्फराबाद व मु० बंदरे मैमूने मुस्तफाआबाद व खिझते देसाईगरीए तपे संगमेसर व तपए कोंडिवरा मु० मुजफ्फराबाद कदीमुल् अय्याम मीरास कुर्सी दर कुर्सीए भोगवटा अज बुजुर्गाने खुद हा चलीदा आमदा व बाजे कागज व फरामीने हुज्जतबूदा बकजाए येजदे बे चूं आतष दर खानः उफ्तादा दर आं तमाम सोख्ता शुदा अम्मा तागायते हाल रवां मीशवद नजरे इनायत फर्मूदा दरींबाब फर्माने अश्रफ अ।तिफद शवद के हुज्जत कवी गश्ता अब्दुल्आबाद व बिला कुसूर जारी कर्दा खुद दर दुआए जानदराजी व फतहे फीरोजीए सल्तनते अबद् पैवंद मश्गूल बूदा मीबाशम् बिनाबरां बखातिरे मुबारिक आवुर्दा मराहिमे बेदिरेग शाहाना खिझते सरदेशमुखीए मु० मुजफ्फराबाद व मु० बंदरे मैमूने मुस्तफाआबाद व खिझते देसाईगरीए तपए संगमेसर व तपए कोंडिवरः मु० मुजफ्फराबाद केसो नायक बिन राघो नायक माहलुंगकर बतरीके मीरास बमूजिबे भोगवटः सालाबाद मुकर्रर व मर्न्हमत फर्मूदा दिहानीदा शुदा अस्त मीबायद के हस्बुल् मस्तूर मुकर्रर दानिस्ता रवां दारंद व दुंबाले

नुमायंद व इन्आमाते तपए संगमेसर मु० मुजफ्फराबाद मौजए माहलुंगा व मौ० धामापुर व मौ० मुचरी व कोंड आसुर्दा व मौ० कुंभारखाणी व ठिकनात व इन्आमात व मौ० बुर्बांड तपए कोंडिवरः मु० मज्कूर व इन्-आमात बागायते कोलबा तर्फे पांवस मु० मज्कूर व मौ० कवेसी कर्याते मिटगवानः मु० मज्कूर व इजाफते कस्बए मुजफ्फराबाद ऊर्फ प्रभावली व कस्बए संगमेसर मु० म० व मौ० मख्जन तपे संगमेसर मु० म० व मौ० उचगाव त० संगमेसर मु० म० व मौ० ओझरा त० तुजारपुर मु० म० व इन्आमाते मु० बंदरे मैमूने मुस्तफाआबाद मौ० चिंचघर मु० मुजफ्फराबाद व मौ० पानघर मु० म० व मौ० मुकेली मु० म० व मौ० तनाली मु० हम्जाबाद मु० म० व बाजे हक्क व लवाजिमात व जकात राहदारी बगैरः मु० मुजफ्फराबाद व मु० बंदरे मैमूने मुस्तफाआबाद हस्बुल् मस्तूर बमूजिबे भोगवटः सालाबाद दुंबाले केसो नायक बिन राघो ना० माहलुंगकर मुकर्रर व मर्‍हमत फर्मूदा दिहानीदा शुदा अस्त नुमायंद मीबायद के सालबसाल दुंबाला दानिस्ता बहेच वजेह् मीनुल्वुजूह् मुत-आरिज् व मुजाहिम न शदंब बादे आं हा ब औलाद व अहफादे आं हा जारी व सारी दारंद तालीक नविश्ता गिरिफ्ता असले फर्मान् बाज दिहंद तेहरीर फी १५ जमादि-उल्-अव्वल् संन १०६५.

परवानगीए हुजूरे पुर्नूरे अश्रफे अक्दसे हुमायून्

ब एलामे सियादत व निकाबत दस्तगाह् मिजाजदाने कार् आगाह सैयद नूरुल्लाह् सरखैले मुमालिक्—

तात्पर्य—प्रभानवल्ली व खेळणा येथील हवालदारास ह्या केशव ना० राघो ना० सरदेसाई यांचा अर्ज कीं—फर्मान मजकुरांतील निरनिराळ्या गांवच्या सरदेशमुखीचा, देशमुखीचा हक्क, इनामें इत्यादि आपल्या घराण्यांत अनेक पिढ्या चालत आलीं असून त्यासंबंधाच्या अस्सल सनदा वगैरे कागदपत्र घरास आग लागली त्यांत सर्व जळून नाहींसे झाले; करितां मेहरनजरेनें सर्व सनदा पुनः मिळाव्या व यच्चयावत् हक्क वगैरे चालत आल्याप्रों पुढें ही वंशपरंपरा चालावें—अर्ज मंजुर केला आहे म्हणून.

ले० ४३.		बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम.		ता. १६ मार्च १६५८.

अल् मुल्कोलिल्लाहे ॥

शिक्का } या अली मदद् { अज् तवल्लाए अली जद् सिक्का बर खुर्शीदो माह्
शाहे दीं पर्वर अली बादज् मुहंमद पादशाह्

फर्माने हुमायूं शर्फ सुदूरयाफ्त बजानिबे कुद्वतुल् अमाजिद वल् अश्राफ लायकुल् मराहिम वल् आताफ मुमुहिदे कवानीने मम्लुकत नाजिमे उमूरे सल्तनत सर आमदे कार आगाहाने सआदत केश मुख्लिसतरीने हवाख्वाहाने सलाह्अंदेश सिआदत व निकाबत दस्तगाह शराफत व निजाबत इंतिबाह मिजाजदाने कारआगाह् सय्यद नूरुल्ला सरखैले ममालिक सरहवालदार व इज्जत् व रिफअत् दस्तगाह अली खान् मख्दुम अफ्गान हवालदार व कारकुनाने मु० मुजफ्फराबाद आं के अज दुहूरे सने १०५८ दरींविला अज् रूये अरीजए हवालदारे मु० मज्कूर बदर्गाहे मुअल्ला रौशन गर्दीद के दर मु० म० नायकवारियान् व बाजे मर्दूमे मु० म० फुतूर व हर्कत बर्दाश्ता महिमाते दीवानी चलीदन न मेदिहंद व दर सादिक व बेदागरी दाखिल शुदा हातबस्त व सादिलवार ताल्लुके दिहात मकासामे खुद हा न मेदिहंद व रिआयाए कस्बए मु० म० रा परागंदा साख्ता खराब नमूदा अंद चिः हद्द व अंदाजा आं हा नस्त अक्नुबायेद के बवसूले फर्माने शाही जरए सादिलवार व हातबस्त बमूजीबे सालाबाद व सादिक व बेदागरी व पुंड्रिक मुताल्लुके एहसान व देहाम बाहिसाबी मीगिरिफ्ता बाशंद ब ईं मानी कसे के फुतूरो हर्कत नुमायंद ताकीद ओ तंबीह् ऊ बवाजिबी नुमायंद के तर्के हर्कत व फुतूर नमूदा बहारे खुद बूदा बाशंद व नायकवारियान् बाजे मर्दुम मु० म० रा दर आमले दीवानी फुतूरो हर्कत करदंद न दिहंद व रिआयाए कस्बए मु० म० रा कौल व इस्तिमालत दादः मामूर व आबादान् गर्दानंद तादानंद व बरहुक्मे फर्माने अश्रफ रवंद तारीख फी ४ माहः जमादिल् सानी १०५८.

परवानगीए हुजूरे पुरनूरे अश्रफे अक्दसे आला मिजाजदाने कार आगाह् नूरुल्लाह् सरखैले ममालिक—

तात्पर्य--मुजफराबाद परगण्यांतील नायकवाडी वगैरे लोकांच्या फिसालतीनें रयत लोक वसूल देत नाहींत, दंगेधोपे करितात असा दरबाराकडे हवालदारानें गिल्ला केला त्यावरून त्या लोकांचें पारिपत्य करून दंगे फितुर मोडून रयतास आश्वासन देण्याबद्दल हवालदारास विजापुरचें फर्मान आहे.

ले० ४४ अल् मुल्कोलिल्लाहे. ता० ९ अक्टोबर १६५९

या अली मदद् ! मोहरे शाही जद जे मेहरे मुर्तजा वर मेहरुमाह् ।
खुस्रवे आदिल अली बादज् मोहंमद बादशाह् ॥ १०५८

फर्माने हुमायूं शर्फे सुदूरयाफ्त बजानिबे इज्जत व शुजाअत दस्तगाह मिजाजदाने कार आगाह् उम्दए उजराए इजाम् जुब्दए उमराए किराम् नहंगे दर्याऐं मर्दुमी व मर्दानगी व गौहरेकाने फीरोजमंदी व फर्जनगी फारिसे मिज्मारे शुजाअत मुबारिजे मैदाने शहामत शाइस्तए फिरावां आतफत व तहेसीन् सजावारे हजारान् मर्हमत व आफ्रीन खाने आलीशाने इक्बालनिशान् फर्जंदे रशीदे सालारेदौरान् कर अर्ज कुनिंदए सिपेहेरे आला फज्ले फुज्ला व फस्ले अफ्जल् खुलासाए नेकख्वाहाने मुल्कगीरे किश्वरसितां अफ्जलखान् महंमदशाही सरहवालदार व इजत व रिफअत दस्तगाह अब्दुल कादिर सरवरखां हवालदार व कारकुनाने हाल व इस्तिकबाले मुआमिलए मुजफ्फरआबाद आं के अज शुहूरे संने सतैन व अलफ् दरींविला मश्हूर-उल्-अनाम केसो नायक व रंग नायक फर्जंदे ऊ सरदेसाईए मुआमले मजकूर व बंदरे मैमूने मुस्तफाआबाद बदर्गाहे मुअल्ला इल्तिमास नमूदंद के खुद बमस्लहते पादशाही बमए फर्जंदान् व बरादरजादगान् मश्गूल-शुदा खिद्मत बतक्दीम मीरसानेम् व बिस्यार अहवाल परेशानेम् खुद रा इन्आमे मजरए कवेसी कर्याते मिटगवान: मु० म० दर वजहे इन्आमे बुजुर्गाने खुद कुर्सी दर कुर्सी मए कुलबाब जारी बूद दरीं अस्ना मजरए मज्बूर दर वजहे मकासाए अब्दुल नबी फर्जंदे फखरुद्दीन पट्टीदार ख्वानस्त नजरे इनायत फर्मूदा जरए मज्बूर बरहुक्मे साबिक: मुकर्रर व मर्हमत फर्मायंद बिनाबरे इल्तिमासे नायके मुशारुन् इलेह् बखातिरे मुबारिके आलां

०००००००० खुसरवाना मजरए कवेसी कर्याते मिटगवानः मुआमिलए मज्कूर बाबत अब्दुल नबी मूमीं इलाह् वकेसो नायक व रंग नायक फर्जंदे ऊ ००००००० मुआलिया व बंदरे मज्कूर मए कुलबाब मेहसूल व नक्दीयात व जमीए लवाजिमात व भेट व बेगार व फर्मायिश व जरे मिल्कती व पायपोशी मिज्मानी व नौसील तेल जंगपट्टी व पेशकशी ००० सिक्कए हुमायूं व कारे इमारत बैते मंबा उस् सुरूर कुल्बाब व कुल्जिहात व सायरे कानूनात् इस्मी व रस्मी कल्मी व कदीमी व नक्दी व जिन्सी आं चे के दर दफ्तरे आला साबित अस्त व पेश्तर जिक्र नौ ख्वाहद शुद मुकर्रर व मर्हमत फर्मूदा दिहानीदा शुदा अस्त मीबायद के मजरए मज्कूर मए बाबहाए दाखिले पानलोट व तंगानात व दरख्ताने नारगील व जंगल ताल्लुके गावे देहात् वगैरः दुंबालए सरदेसाईए मुशारुन्–इलेह् साजंद बाद अवलाद व अहफादे ऊ नस्लन् बादे नस्लन् जारी दारंद व हरसाल फर्माने मुज्ददद: न तलबंद वर्हमीं फर्मान् रवां दारंद तालीक निविश्ता गिरिफ्ता असले फर्मान् बाज बुगुजारंद तादानंद बरहुक्मे फर्माने अक्दसे अश्रफ रवंद तेहरीर फी २५ माहे सफर बिल् मुजफ्फर सन १०७०.

परवानगीए हुजुरे खुर्शीद जुहूरे अक्दसे अश्रफे हुमायूने आला

तात्पर्य–केशव नायक व त्याचा पुत्र रंगोबा नायक यांनीं विनंति केली कीं आपलीं वंशपरंपरेचीं इनाम गांवें फखरुद्दीन पट्टीदार याचा मुलगा अब्दुल नबी यास देण्यांत आलीं त्यावरून तीं गांवें नायक मजकूर यांस परत देण्याबद्दल आणि त्याचे सरदेशमुखीचे सर्व हक्क व लाजीमा वगैरे त्यांजकडे वंशपरंपरेनें चालविण्याबद्दल सरहवालदार अफजलखान यास बादशहाचा हुकूम झाला आहे.

ले. ४५. शिक्का ले० नं० ४४ चा. • ता. १४-१०-१६५९

बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम

फर्माने हुमायूं शर्फे सुदूरयाफ्त बजानिबे कारकुनाने हाल व इस्तिकबाले मु० बंदरे मैमूने मुस्तफाआबाद आं के अज शुहूरे संने सब्ऐन अलफ्

दरींविला इज्जत् व शुजाअत् (येथून " किश्वरासितां अफ्जल्खान् महंमद शाही " येथपर्यंत सर्व मजकूर ले० नं० ४४ च्या मजकुराप्रमाणें) बद-र्गाहे मुअल्ला इल्तिमास नमूद के केसो नायक बिन राघो नायक सरदेसाईए मु० बंदरे म० कदीम कुर्सीजादा नमकहलाल दर दौलतख्वाहीए दर्गाहे जहांपनाइ् साबितए रासिखदम् व रिआयाए ००००० पेश अर्जी इन्-आमे सेहे देह व पट्टीपछोडी व हक्के लवाजिमाहाए जामः रवां बूद अर्जी जुम्ला सेहे देह कशीदगी शुदा दर वजेह् इस्तिकामते सियादत् व निजा-यत् दस्तगाह् शाह् अबुल् हसन रवां शुद व पट्टीपछोडी व हक्के लवाजिमा कसे सर्कशी ०००० नमूदः ची जे न मीरसद अर्जी सबब हाल परेशान् अस्त व बराए मस्लहत ००००० हाजिर अस्त अर्जी वास्ता इन्आमे मौजे चिचघर मु० जाफरआबाद आमाले मु० बंदरे म० व पट्टीपछोडी व हक्के लवाजिमे देहाये जामा मुकर्रर नमूदायेम् नजरे इनायत फर्मूदा फर्मान आतिफ शवद बिनाबरां अज् राहे मराहिमे पादशाहाना दफ्तें आयातिफे खुस्रवाना इन्आमे मौजे चिचघर मु० जाफरआबाद आमाले मु० बंदरे म० दाखिले मेहसूले नक्दियात व बाजे उजूहात व जमीए लवाजिमात व भेट व बेगार व फर्माइश व जरे बैलकी व पायपोशी मिज्-मानी व जंगपट्टी व पेशकशी ०००० पट्टी सिक्कए हुमायूं व कारे इमारत व बाजिए वैते मुबारिकए मुतर्बरिकाए मेदनुल अम्र मंबे उस् सुरूर व बाजे ब्राबहाय कुल् उजूहात व सायिरे कानूनात कुल्बाब इस्मी व रस्मी कलमी व कदीमी कोना व कशीदा आं चे के दर दफ्तरे आला सब्त अस्त व पेश्तर एहदास ख्वाहद् शुद व पट्टीपछोडी व हक्के लवाजिमा व बहाए जामा व तेल खाता रोजीना रुबै सेर दुंबाले नायके मुशारून्इलेह् व रंगो ना० बिन केसो ना० व नरसी ना० बिन कान्हो ना० व नार ना० बिन कृष्ण ना० बरादरजादे नायके मुशारुन्इलेह् नुमायंद बादे ऊ बअ-वलाद व अहफादे ऊ अल् अमाशा सल् व तआकब् नस्लन् बादे नस्लन् वतनन् बादे वतनन् जारी साजंद व देहे म० खारिजे थाना दाश्ता बहेच वजेह् मिन्-उ ल्-वुजू् जरी मुजाहिम न शवंद वा आदमे थाना बगिर्दे

पैरोसूने देहे म० न फरीसंद व पट्टीपछोडी व. हक्के लवाजिमा व बहाए जामा ताल्लुके विलायते मु० हम्ज़आबाद व मु० जाफरआबाद दाखिले कर्यात् हा व पर्गनः व किलआ व कस्बः दुंबाला व गैरदुंबाला सर्कशी व कुर्बदारी नमूदा न मीदिहंद ऊ रा बबाजिंबी ताकीद नमूदा हक्के सरदेसाई बिलाकुसूर अदा नुमायंद व नायके मशारुन् इलेह् दरबाबे मफ़ीए दीवान व मासुलीए विलायत व अर्जए सीम व मुसफीए मीरासदारान् व बाजी आं चे बुगोयंद सरंजाम नमूदा बाशंद हरसाला ऊजरे फर्माने न कुनंद साल ब साल बहंमी फर्मान् रवां दारंद तालीक निविश्ता गिरिफ्ता असले फर्मान् बाज दिहंद तादानंद बरहुक्मे फर्माने अश्रफ रवंद तेहरीर फी ७ माहे सफर-ऊल्-मुजफ्फर संन १०७०.

परवानगीए हुजूरे खुर्शीद जुहूरे अश्रफे अक्दसे हुमायूने आला

तात्पर्य—केसो ना० राघो ना० हे मुस्तफाबादचे वंशपरंपरेचे वतनदार असून त्यांस ३ गांवें इनाम व इतर पुष्कळ हक्क वगैरे असून त्यांच्या गांवांपैकीं एक गांव सय्यद शेख अबुल् हसन यांस सरकारांतून दिल्यानें नायकांचें नुकसान झालें आहे वगैरे हकीकत अफ्जलखां यांनीं कळविल्यावरून हुकुम कीं नायकांस मोबदला चिंचघर गांव इनाम दिला आहे, बाकी सर्व हक्क त्यांचे त्यांजकडे चालविण्यांत बिलकुल कसर होऊं नये, गांव ही त्यांजकडे सुरळीत चालवावा वगैरे.

ले. ४६. शि०१. श्रावण व० ४-१५८३(ता।३।८।१६६१)

श्री.

छ मशरुल रा। हवालदार व कारकुनानी व देशमुखानी व देशपांडियेयानी व मोकदमानी व सेटिये व महाजनानी व बाजे रयानी माहालानिहाय मा०प्रभावली यासी पिलाजी नीलकंठराव सुभेदार नामजाद म॥ म॥ सूरसन १०६१ नरसोबा ना० बिन कान्होबा ना० मावलंगकर गुमस्ते सरदेसाई मा०भा॥ याही राजगडच्या मु॥ हुजुर जाऊन माहाराज रा।साहेबांची सनद घेऊन सुभा मां। आले रा। छ २ माहे जिल्काद पौ छ १७ माहे मा। तेथे हुकुम जे

नरसो ना० बिन कान्हो ना० मावलंगकर गुमस्ते सरदेसाई मा० प्रभावली याणी किले राजगंडच्या मु॥ हुजुर येऊन अर्ज केला जे रगो ना० बिन केसो ना० मावलंगकर सरदेसाई मा। म॥ हे पेसजी किले म॥ साहेबांचे भेटीस आलें होते तेव्हां अर्ज केला जे सदरहू देशमुखीचे वतन आपलें पिढी दर पिढी मातकदम इस्तकबिलपासून ता॥ साल गुांपावेतों चालत आले हालीं तलकोंकण साहेबास अर्जान जाहालेंयावरी साहेबीं सेवकावरी मेहेरवान होऊन कौल सादर केलियावरी आपण वतनाचे बाबे खिजमतीस हाजिर जाहालियावरीं दिवाणातून सारी च वतने अमानत जाहाली आपलें कदीम हक व लवाजिमा व इनामती दिवाणातून अमानत जाहाल्यां आपण तों साहेबांचे खिजमतीस येकसान असो साहेबीं मेहेरवान होऊन कुटुंबास अंन देऊन सेवकाची उस्तवारी केलिया उमेद धरून येकसान चाकरी करू त्यावरीं साहेब मेहरवान होऊन सेवकास पटीपछयोडी लाहारी २००० दोन हजार मा० म॥ जमाबंदीवरी रयत निसबत सिरत करून द्यांवी म्हणोन सुभा म॥ सनद सादर केली ते घेऊन सुभा आले सदरहूप्र॥ सिरत करून घ्यावी तों रा॥ सुभेदार हुजुर आले सेवकास कांहीं पावलें नाहीं यामुले सेवक हइरान आहे पेस्तर सेवकास पोटभर अंन देऊन उस्तवारी करणार साहेब धनी आहेत बराय इलतिमास खातरेस आणून रयत मासुरी-वरी नदर देऊन सरदेसाई म॥ यासी हक व लवाजिमा पटी पछयोडी लारी ३००० तीन हजार व इनामत बागाइत मौजे कोलबे ता॥ पावस मा॥ मा॥ याप्रमाणें करार करून देऊन हे सनद सुभां सादर केली असे सदरहू लारी ३००० तीन हजार मा० मांचे जमाबंदीवरी रयत निसबत सिरत करून सरदेसाई म॥ यासी देत जाणे व बाग म॥ची बागाईत व जिराईत जमा-बंदी होईल ते सरदेसाई म॥ याजकडेस इनामत खर्च दरसाल लिहीत जाणे दरसाल [ता०] [ब० (सरदेसाई)] येसे पत्र घेऊन सुभा आलिया-वरी मा० मजकूरचे व माहालानिहाय म॥ म॥ वतनदार सुभां आणून याच्या हुजुर ऐन जमाबंदीवरी लारी ३००० तीन हजाराची रयत निसबत सिरत करून गावगना पटी बसऊन सुभाहून दर माहालास सनदा आलाहिदा

सादर केल्या आहेत त्याप्रा। हक व लवाजिमा व इनामत दरसाल सरदेसाई मा। यास तुम्ही बिलाकुसूर देत जाणे जा० छ १७ माहे जिल्हेज मो० १.

ले०.४७ शि०२. श्री. ता० २१ एप्रिल १६६२.

मसुरुल हजरत रा० पिलाजी नीलकंठराव सुभेदार नामजाद मा० प्रभावली यांसी सिवाजी राजे दंडवत सुहुरसन १०६१ सालगुदस्तां तलकोकण मुलकाची कबजाईतबदल खासा स्वारी तलकोकणात होउनु मुळुक कबज जाहाला तेवक्ती श्रिंगारपुरकर सुर्वे व कोकणातील पातशाई अमलदार याणी बेमानी केली ते नतीजा पोहचोन उधलोन गेले मुलकातील रयतीस सरंजामाबदल वतनदार व रयत यांस सरकारांतून कौल सादर जाहालेवर केसो ना० बिन राघो ना० मावलंगकर व सारे वतनदार मा० मजकूर सरकारी खिजमतीस हाजीर जाहाले सालमजकुरी रंगो ना० बिन केसो ना० मावलंगकर सरदेसाई मा० मा। याणी किले राजगडच्या मुकामी हुजुर येऊन अर्ज केला जे आपलें सरदेशमुखीचे वतन मामले मा। व मामले दाभोल पिडी दर पिडी मालकदम इस्तकबिलपासून ता। सालगुदस्तापावेतों चालत आले हाली तलकोक(ण) साहेबांस अर्जानी जालेवर साहेबीं सेवकावर मेहरबान होऊन कौल सादर केलेयावर आ++ वतनाचे बाबे खिजमतीस हाजीर जाहालो हाली दिवाणातून सारी वतने दिवाणातून अमानत जाली आपले काबिजा हक व लवाजिमा व इनामती अमानत जाल्या आपण तों साहेबाचे खिजमतीस एकसान असो साहेबीं मेहेरबान होऊन सेवकाची वतनावर स्थापना केलिया व कुटुंबास अन देऊन उस्तवारी केलिया उमेद धरून एकसांन चाकरी करूं व ये बाबे तुम्हीं इलतिमास लिहिली बाइलतिमास खातरेस आणून व रयत मामुरीवर नदर देऊन बेकदीम वतनदार याबदल ना० मा। यांस दोनी मा० मा। सरदेशमुखी वंशपरंपरेंने करार करून ना० मा। यांस मामले प्रभावलीचे जमाबंदीवर पटी पछोडी हक लारी २००० दोन हजार रयत निसबत करार केली असे तरी तुम्हीं मा। मा। जमाबंधीवर रयत निसबत सदरहू लारी २००० दोन हजारची सिस्त बसऊन दरसाल ना० मा।

देवीत जाणे दरसाल [ता०] मा० दाभोलची पटी पछोडी हक याची सिस्त होणे त्यास मा। मा।चे असलदार व वतंनदार हुजुर आणविले आहेत ते आलेयावर होईल [व० (नाईक)] जा० मोर्तब सूद मो० १.

लेखांक ४८ श्री तालीक, ता। २१-७-१६७६.

सिवाजी राजे सिका आनाजी पंडित मुरनीसी

कौलनामा अज दिवाण ठाणे तपे संगमेस्वर मामले प्रभांवली तां वेदमुहूर्ती नीलकंठभट विं। सोमनाथभट कात्रे वस्ती कसबा तपें मजकूर सु॥१०७६ दादे कौलनामा यैसा जे तुम्ही येऊन मालूम केले की आपला कसबा घरठाव पुरातन आहे त्यास रामभट सफरें बिढरी ठेविले होते ते हाली कथला करितांती याचा निवाडा केला पाहिजे घरठावयाची हकीकत तरी आपले पिते सोमनाथभट हे पूरवी गोमांतकांत वैद्यपणाचा वेवसाव करीत आसतां राजश्री सोम नाईक बिन विठल नाईक सरदेसाई मामले प्रभावली हे दिवाण कार्यानिमित्यं फोंडियास गेले तेथे त्याचे शरीरी आसवस्त जाहाले त्यास वैद्य पाहिजे यैसा जाहाला त्यावरून सोमनाथभट यास येत्न करून फोंडियास गोमांतकाहून आणिले उशदउपच्यार करितां वैद्यपणाची साक्षता कलों आली त्यावरून तेहीं सोमनाथभटास आग्रह केला कीं तुम्ही गोमांतकी राहोन आधिक काय केले ठावे आहे संगमेस्वरास तुम्ही येणे जे कार्य येथे उत्पन असेल ते देऊन ऐसे कितेक प्रकारे बोलोनि परिवारानिसी आपणासमागमे आणून संगमेस्वरी ठेविलें काही दिवस हरिभट पित्रे याच्या घरी बिढरे होतें त्यावरी काही दिवस देशमुखाच्यां वाड्यांत होतें त्यावरी सोमनाथभटी देशमुखांपासी विनंती केली आपल्यास श्नानसंध्याकारणे सचंतर जागां दिला पाहिजे त्यावरी बरा जागां पाहांता एक सोनारं आपले घरं जागां विकंत होतां तों त्याच्या माथां बबनाल (?) शाबीद जाहाला देसमुखास कललियावरी जड जाईल याकारितां पलोन गेला ते समई सुस्तं असून जें होईल तें देसमुखांस्वाधीन गुन्हेगारी जे होईल तें हि त्याच आधीन याबद्दल तो जागां गैर-

म्हासूल करून वेदमूर्ती सोमनाथभट यास देखील झाडे व घरभूमी यैसे दिधलें तेव्हां आपण हि प्रऊढ होतों तीन वरुसें घरामध्ये भोगवटा केला पुढें हि करीत आसतां नरसिहभट सफरे हे सोमनाथ भटाचे व्याही आपले स्वसुर त्यास देवाज्ञा जाहाली त्याची मुलें निरास्ते सेणावियाच्या घरी होती ती आपल्या घरास आणून विढरी ठेविली त्यावर आपण येक पुत्र ते वाराणसीत राहिलो ४॥–५ वरुसें आलो नाहीं यैसे देखोन सोमनाथभटी आमचे स्त्रीस घेऊन विजापुरास गेले जातेसमई सोइऱ्याआधीन घर करून येका निमित्यं हरिभट पित्रे यास घरामध्यें निमे जागा देऊऊन ठेविलें त्यावरी सोमनाथभट माहानगरा होऊन फिरोन कांही कार्यानिमित्य सगमेंस्वरास आलें येथे सगमेस्वरी वेंथां प्राप्त जाहाली त्यावरून आपले घरीं सन्यास घेतला इतका व्रतात जाहालां तों आपणं वाराणसीहून आलों त्यावरी पितें दो महिनेयानी शात जाहाले त्यांवरी आपण उदरानिमित्यं श्रिंगारपुरकर राजे यांकडे आश्रये इच्छून श्रिंगारपुरी राहिलों देवताज्र्यन व स्त्री सगमेस्वरी च होती त्याजवरी लखमोजी राजें हे नावडीवरी राहिलें मग मागती आम्ही सगमेंस्वरी घरी राहिलों सोमनाथभट आमचे पुत्र त्याचा व्रतवंध व विव्हाह सगमेस्वरी च केला त्यावरी राजसेवेस आतर पडों लागले म्हणोन नावडीस राहिलें २॥–३ वरुसे तेथें होतों मागती सगमे-स्वरीच्यां घरास येऊन राहिलों श्रिंगांरपुरकर राजें श्रिंगारपुरास गेले आपणं हि त्याबरोबर श्रिंगारपुरास गेलों त्यावरी तें राज्य राजश्री राजे यास प्राप्त जाहालें आसतां आपणं पुणकेश्वरी व्रतवंडी होती निमित्य तेथें जाऊन राहि-लों तेथें २॥–४ (वर्षें) होतों मागती आपलें स्थल म्हणून सगमेस्वरास आपले घरीं राहिलों सफरे विढरी ठेविले होतें तें तइसे च होतें काहीक मास सुख-रूप आसतां कांही कलह जाहालानिमित्य येकत्र राहाणे न घडेसे जाहाले रामेस्वरभट कथले करू लागलें की तुमच्या पित्याही आपल्यास घर दिलें तुमचें स्थल नव्हे त्यावरी आपण आजं(नं) देसा ० ० ० ० ० वेदमूर्ती नर जोतिसी याचे येथे सभा करून साक्ष मनास आणितां पित्याही दान दिल्हे नाहीं म्हणोन साक्ष सभासदी दिली बिं॥

वो॥ हरभट वझे गोविंद जोसी हरिभट पित्रे केसो वाहिरव याही साक्ष दिली त्यावरी तो घरातून रामभट गेला दाहा तेरा दिवसी घर आपलें मोडून न्यावे त्याणे बाधिले होतें म्हणोन त्यास देविलें भूम आमची यैसा निश्चय केला त्यावरी मुदती जाहाली तेव्हां आम्ही म्हटले की आपलें घर मोडून नेणे त्यावरी राजमान्य राजश्री पंतापासी जाऊन पत्र आणिले की बरहक निवाडा करणें याबद्दल आपण ठाणां आलों आहों हकीकत तरी सदरहूप्रमाणें आहे त्यावरी भले ब्राम्हणं मेलऊन हुजुर आणून पुसिले की सदरहू हकीकत कसी तें सांगितलें की हे वर्तमान लक्षुमबाई सोमनायकाची सून तीस विदित आहे त्यावरी तुमचा व रामभटाचा कतबा राजीपणाचा घेतला की लक्षुमबाई सांगेल त्यास उभयता मान्यं त्यावरून तीस लिहून पत्रं आणंविता तिचं सांक्षपत्र दिले की सोमनाइकी सोमनाथभटास स्थल दिलें हे खरे हे साक्ष हरीभट वझें वस्ती कसबा यास हि ठावको आहे म्हणौन पत्र लिहिलें त्यावरून हरीभट वझे आणून सांगितले की तुम्ही सकळ भलें वित्पन्नं वैसोन निवाडां करून देणे यास आनीथा करील तो गोंब्राम्हणद्रोही त्यावरी ब्राम्हण वैसोन केला विं॥ हरिभट वझे नारोपाध्ये धर्माधिकरणी गोविद जोसी हरिभट पित्रे वासुदेवभट देव हे सर्व ब्राम्हणांही निवाडा केलां की सोमनाइकी व सोमनाथभटी घरटा रामेश्वरभट सफरे यास दिल्हां नाहीं भोगवट्यानिमित्यं रामभटे घर बांधिले आहे तें रामभटाचे रामभटास द्यावें भूम सोमनाइकी सोमनाथभट यास दिली हे खरें म्हणौन त्यासी द्यांवी यैसा निवाडा वेदमूर्ती नीलकंठभट व रामेश्वरभट सफरे या उभयताचा जाहालां यावरी तुमास कौल सादरं केलां आहे भूम ठाव देखील झाडे परसू व तुम्ही आपली कमावीस करणे जुने काजाणू आहे तें रामभटांचे रामभटास देणे तुम्ही नवे बाधोन सुखरूप आसणें पुत्रंपौ तुम्हास जागां मुकरंर आहे सुखे आसणे दरीबाब कौल आसे छ १९ माहे शौवल (जा। लौवल?) मोर्तब सुद—मोर्तब आसे

लें० ४९ (तालीक)　　　श्री　　　१६८० इ.

स्वस्ति श्रीनृपशालि० शके १६०१ सिद्धार्थी नाम सं. माघ शु॥ २ शुक्रवार तादिने वे. शा. सं. रा. रा. नीलकंठभट कात्रे पिते सोमनाथभट यांसि नरसोवा ना० व रंगोवा ना० सरदेसाई मा० मजकूर (प्रभावली?) व देसाई ता॥ संगमेस्वर सु॥ सन १०८० लेहोन दिल्हे दानपत्र यैसीजे तुम्ही आम्हांपासी येऊन बोलिलेंत जे तुमचे वडील रा० सोमोवा नाईकी आमचे पिते सोमनाथभट यासी घर बांधोन स्थळ संगमेस्वरी कुकसेट सोनाराबा॥ दिले होते तो निपुत्रिक त्याचे कोणी नाहीं म्हणौन दिल्हे त्याचे चतुःसीमासहित पत्रं हि करून दिल्हे होतें ते आम्हांपासून हारपले म्हणोन बोलिलेंत त्याजवरून आम्ही आमच्या वडिलांच्ये वेलचे वृधंवृध्धास विचारून सागितली हकीकत तहकीक करून तुमास स्थलाचें दतपत्र करून दिले आसें त्या स्थलाची हद महदूद———————————

पच्यंमेस घराचे चौथऱ्याची हद	दक्षणेकडे पूर्वी कच्यनाचे झाड होतें मारें (?) पूर्वेस वस्त (?) पार्यजातक
पूर्वेकडेस मार्गाची हद	२ दोन आसेत———————

येणप्रमाणे हद महदूद करून स्थल दिले आसे तेथे तुमी घर बांधोन सुखरूप आसणें तुमच्यां पुत्रपौत्रादिकी सुकरूप स्थळाचा उपभोगं करणे आमचे पुत्रपौत्रादिक वंशपरंपरेनें पाळणेयास काणी हेचे इस्कील करील तो पंचमापातकी हे दतपत्रं सही सिका आसे माघ सुधं सही मार्तब आसे

लें० ५०　　　श्री

करीणा मौजे निवें बु॥ ता॥ देवरूख येथील पूर्वापर स्थीत गाव कोणाचा पूर्वी विज्यापुरीहून किले खिलणायांसी नवद गांव तनखा देवले हातखंबे हरचिरी देवरूख येथे चौकसी ००० माहाली नेमून दिल्हा तेकाली मामले प्रभावली माहाल मौजे मजकूर हा गाव वेढत असता टोलकृत होऊन आंगरे नाबूद जाहाली सारे रयत गांव टांकून देशांतरास गेले अकरा वर्षे गाव कुलीं वोसाड पडिला त्यावरी शके १५०३ व्रश संवत्सरी

(सन १५८१) रा. सोमोबा ना० सरदेसाई (१-१५-६८) मा० प्रभावली याणीं विज्यापुराहून पातशाहापासून मौजे मजकूर इनाम व खोतीं मिरास करून आणिली आणि गावची लावणी केली गावीचे कदम रयंता परागंधा होऊन गेले होते त्यामध्ये पाल्या व कुवलेकर कुणबीं व गुरव व म्हार हे गांवांत आणिलें व हांतखंबे विलायतीहून विठोबा मोघा ऊर्फ करंबलकर त्यास गांवात आणून सिध्धेस्वर वाडेयांत आगर व सेत भूमी व गांवची महाजनकी देऊन ठेविला व ढवला व अंमृत्या व खंडकर व इतर रयतां आणून वाडीमजकुरापासून गांवची माहामुरी केली वाडे तीन वसविले मधील वटार व खालील वटारीं आगर भांडणी केली खा। घर गांवांत बांधले आगर माहामूर जाहालियावरी तानो बलाल राजवाडकरी चिपुलणा ब्राम्हण गावात आपलिया घरी जागा देऊन आवारीपणास ठेऊन त्याच्या हवाला खा। बाग व सेत केलें व गणोबा सेवड्या याचें हवाली खाइल्या आगरीवरी दाहिजाचे आगर करून ठेवला त्यावरी चवीस वर्षे गाव इनामंत व खोंती नायक मारनिलेकडे चालिली त्यावरीं इनामत दिवाणातून दूर जाहाली खोती मीरास नायक यांस चालत असे त्याउपरीं तानो बलाल राजवाडकर मजकुराचे अनुसंधान करून विसोबा राजवाडकर गांवांत आला त्यास किनरा गोसावियाच्या जागा होता तो घरा बांधावयासी दिल्हा त्यापासून राजवाडकर गावांत आहे तानो बलाल राजवाडकर मृत्य पावला त्याचे वंसीचें देशांतरास गेले त्याचें कोणी नाही याजप्रा॥ कितेक काल गेले याजवरी दोन वर्षे बलव्यामुलें सेतें बुडाली व आगरें बुडाली गांव आगरी हि आगरे टाकून पलालें जुजवी वस्ती कोणी गावांत राहिले त्याजउपरीं विसा वर्षीं सिवाजी माहाराज याचें राज्य जाहाले ढवले यांचे आगरांवरी रामाजी राजवाडकर करंबलकराचे आगरावरी भानजी मधील वटारी हरबा याजप्रा॥ राहिले खोती देशमुखाचे नि॥ चालत आली सिवाजी माहा(रा)ज येऊन मारनिलेंस भेटोन गांवची कमाविसीं मागत होते नाईक कमाविसी न सांगत मग बालाजी रघुनाथ सेणवी यांणी भानजी विठल याचे अगत्य धरून गांवची कमाविसी सांगा-

वी म्हणौन बहुत प्रकारें सांगितलें त्यावरून नाइकीं भानजी विठल यांसी कारभार सांगितला व आपण नायकीं जाऊन रामभट हरडीकर याजकडील कुणबी घेऊन भानजीचें स्वाधीन केले त्यांवरी भानजीने पांच वर्षे गांवची कमाविसीं चालविलीं गांवची कारभार न वोढें दिवाणची बाकी राहिली वसूल न पडे तेव्हां भिकांजी विस्वनाथ नायकीं आपणाकडून कमाविसीस आपणाजवळून कमाविसीस आपणाकडून ठेविलें त्यावरी हंगामसीर बाकीचा व कर्ज येणे त्याचा तगादा लागला तेव्हां कुणबीं फिताऊन रयता घेऊन पळोन राजापुरप्रांते गेला यांचे राज्यांत बटाई जाहाली खोतांस गांवांमध्ये उपजीविका नाहीं तेव्हां **केशवनायक** (२-२६-७) सरदेसाई होते त्याणीं गांवची खोंती नारायणभट हरडीकर व भानंजी राजवाडकर यांसी चालवावयासी सांगितली ते चालवीत होते मग माहाराज संभाजी राजे यांचे राज्यांत नरसाया कानडा सुखवस्तु गांवांत दोन वर्षे राहिला मग त्याणें लचाडी कबजी बाबाचे वगीने तीन वर्षे गांवची खोती केली गाव न सोडी तेव्हां **रंगोबानायक** (२-२७-११) सरदेसाई यांणी सेवड्या व हरडीकर व राजवाडकर या तिघांस गावीहून बोलाऊन आणून त्याज कर्दीम आगरी सेवड्या पुढे दिवाणात उभा करून वेव्हार सांगोन पडतपावसी कानडा याची खोती दूर करून विठोबा सेवड्याचे स्वाधीन कारभार खोतीचे समंधे केला त्यास गांवचे उगवणीस मध्यस्थ नारभट हरडीकर व भानजी राजवाडकर घेतलें त्याउपरी भालेराई जाहाली काहीं दिवस धामधुमीत चौथाचा रिगाव चालत होता त्याउपरीं दोन तिन वर्षे गाव कुलीं वोसाड पडिला मग राजश्री रामचंद्रपंती रामाजी गुडेकर यासी चाकरीबद्दल गांव मुकासा करून दिल्हा तेव्हां राजवाडकर रामाजीचें अर्धल करून होते रामभट व शंभुभट हरडीकर बाहेर होते गांवात येऊन कुणबावा देऊन होते पांच सांत वर्षी रामाजींचा मुकासा दूर जाहाला त्यावरी हरडीकरीं व राजवाडकर खोतीं करूं लागलें मग राजश्रीं नील प्रभु याचे कारकीर्दीस गणोबानायकीं त्याची खोती दूर करून संभाजी अनंत आंबेकर खोतीचे मुतालकीस ठेविलें तेव्हां गांवी लुकसान

आलें मागंती गणोवानाइकी (२-२८-१५) रामभट हरडीकर यांसी खोतीं सांगितली त्याणी चौं दिवाणांत जावयासी गांठ न पडे याकरितां विठोवा राजवाडकर यास वांटा दिल्हा त्याउपरी तीं वर्षांनीं नारो गोरपाडा याची धामधूम होऊन मुलुक व गावचे लोक परागंधा जाहाले तेव्हां विठोवा राजवाडकर व्रावडे प्रांत वेंगसरास गेला रामभट हरडीकर च्यार कुणबी होते ते हाती घेऊन देवरूख माहाली राहिले होते त्याउपरी दहां अकरां वर्षीं अंतोवा नायकी रामभट हरडीकर यांसी गावची लावणी करावयासी सांगितली तेव्हां भानजी राजवाडकर वेंगसराहून (पुढील बंद गहाळ).

ले० ५१ शि.३ व ४. श्री शके १६१७ (ता. ५।२।१६९६)

[स्व०] २२ युवा नाम संवत्छर माघ शुध त्रयोदसी सोम्यवासर [क्ष० (राजाराम)] रा० रंगोवा ना० बिन केशव ना० सरदेसाई मा० प्रभावली यासी वृत्तीपत्र दिल्हे ऐसे जे तुम्ही हुजुर विनति केली कीं देहाय हमजावाद व देहाय जाफरावाद मा० मुस्तफाबाद हाली नाव सुभा प्रांत दाभोल येथील सरदेशमुखी वतन आपले पिढी दर पिढी चालत आले आहे भोगवटा अवलपासून माहाराज रा० कैलासवासी— स्वामीचे कारकीर्दीस राजश्री राघो बलाल आत्रे यासी प्रांत मजकूरचा सुभा होता तोपावेतो आविछिन चालिले याउपर रा०——स्वामीने कुल वतनदाराचे हक व इनामती आमानत केल्या खंड हि बेमुबलगा बांधला त्यामुले आपला काही उबार राहिला नाही सर्व खंडाचे भरीस पडिले सवेच आपले पिते केशव नायक होते त्यास देवाज्ञा जाली तेसमई आपण लहान होतो मुतालीक व चाकर होते त्यास भक्षावयासी नाही ऐसा अर्थ जाहला याकरिता कितेक आपणास टाकून गेले वतने चालऊन आटोप करी ऐसे मासूस आपल्याजवली राहिले नाही याकरिता राघो बलाल याचे कारकीर्दीआलाकडे वतनाचा भोगवटा चालत नाही मधे आपण पोख्ता जालियावरी राजश्री संभाजी राजे याचे कारकीर्दीस हुजूर जाऊन या वतनाविसी विनती केली त्यावरी त्यानी मनास आणून आपल्या माथा सेरणी ठेऊन

आपले वतन आपल्यास द्यावे ऐसें केले होते परंतु ते च समई तांब्राची धामधूम जाली वतनाचा कागद आपल्या हातास आला नाही याउपर माहाराजे दिग्‌विजय करून धर्मस्थापना केली महाराजे दयावंत होऊन आपले पुरातन वतन आपल्या दुमाले केले पाहिजे म्हणऊन त्यावरून मनास आणून देहाय हमजाबाद व देहाय जाफराबाद सुभा प्रांत मजकूरा येथील सरदेशमुखी तुमच्या वडिलापासून पिढी दर पिढी भोगवट चालत आला त्याप्रमाणे सरदेशमुखी तुमच्या दुमाले केली असे सरदेश-मुखीचा कार्यभाग करीत जाणे तुम्हास हक व इनामती व लवाजिमा चालत होता त्यास हाली येणेप्रमाणे करून दिल्हा असे

इनाम गाऊ कुलबाब कुलकानू खेरीज हकदार व इनामदार देहे २

बि॥ मौजे तनाली ता॥ हवेली १ मौजे चिचघर ता॥ खेड १

हक रकमी दस्तास सालीना मोईन खेरीज इनामती दाभोली लारी साडे बारा हजार १२५०० रयत निसबतीने केली असे

लवाजिमियाची मोईन रयत निसबतीने दस्तीबाबवरी

मोहतर्फा कुलास सालिना मोईन

तेल्याच्या घाण्यास तेल वजन दर अडीच सेर ८८२॥

गवालियाची म्हैस दुबती असेली तीस लोणी वजन अदसेर नवटाक ८८॥९

मालियाच्या मलियास रुब येक २

चांबार दुकानास जुते एक १ मासोलीचे होडीस रूब येक २

नाहावी जुलीयास रूब एक २ परीट घरास रूब एक २

लोहार दुकानास रूब येक २ सुतार दुकानास रूब एक ।

कोस्टी मागास रूब एक ।' धनगर व साली मागास रूब एक ।'

भामटे मागास रूब एक ।' चांटे दुकानास रूब एक ।'

पंचकणे दुकानास रूब एक ।' सोनार दुकानास रूब एक ।'

सिपी दुकानास रूब नीम८= सराफ दुकानास रूब नीम ८=

सरेकरीदुकानास लारी नीम ।॥'

एकूण बाब आकरा आला कलम एक १

बाजार आठवडियास भरतो त्यास दर आठवाडियास दुकानास मोईन
वाणियाच्या दुकानास आडका०॥ सरेकरी याच्या दुकानास रुका एक०१
चाल्याच्या दुकानास रुका येक०१ लोण्याच्या दुकानास रुका नीम०॥
तांबोली दुकानास पाने विडियाची पनास ५०
मालवे वोझियास वजन आदसेर नवटाक ००॥९
आगरी जिनस आणितील त्यास दरमणे साडेच्यार टाक नारल दोशास एक १
खाटीक दुकानास मास आदसेर नवटाक ००॥९ एकूण कलम १

एकूण बाब आठ कलम येक १

जकाती उभा मार्ग

पंचकणे दर गोणीस रुका एक०१ गडी जिनस दर गोणीस रुके तीन०३
कापड देसुरी जर मीना दर नगास दर सदे चवल एक ०=
कापड मोठे नगास रुके तीन ०३ घोडियास दर लारी नीम ·॥·

एकूण कलमे पाच आरा कलम १

तंबाकु गार्दास दर सदे एक रूब फाटे ·।–
ज्या बजातीचे जकातीचा आकार दिवाणात होईल त्यास दर सदे उदीमियाचे निसबतीने लारी २ दोन व वानगी जिनस माफीक एकूण कलम १
किसमीठ राजभाग आकार होईल त्यास दर खंडीस पाउ मण ०।·
उसाच्या फडास राजभागास पिकाच्या आजमासे दर खंडीस वजन अडीच सेर ००२॥ एकूण कलम १
कोंबडे कुणबी गावास दर गावास एक १
हलद व आले राजभाग आकार होईल त्यास दर खंडीस वजन दाहा सेर ०।· सिगोटी खरीदी फ्रोख्तास दर रुके तीन ०३
बकरियाचा कलप देशाचा असेली त्यास सेलके बकरे एक १

एकूण बाब अकरा आरा कलम १

खरीज दस्तीबाब लवाजिमा मोईन

कुणबगाव असेली त्यास सालीना लोणच्याचे जिनसाचे वोझे नीम ·॥·

कुंभाराच्या आवियास मडिके एक १
राबणूक दर माहालास सालीना एक महिना
गुरव १ माहार एक १ एकूण दोन आरा कलम १
दुरले दर गावास सालीना एक १ जेवा दर गावास साली-
ना लारी नीम "॥" लाकडाचे भारे दर गावास सालीना पाच ५

पारधीस

१ डुकरास सिसाल एक
१ सामरास सात एक
१ वरकड पारधीस भाकर्सी एक
३ एकूण तीन आरा कलम १

एकूण बाब सात आरा कलम १ एकूण बाब दोन आरा कलम एक १

एकूण इना(म)ती गाऊ दोन व हकाची मोईन सालीना दाभोली लारी साडे बारा हजार व लवाजिमियाचे कलम येक येणेप्रमाणे मोईन करून दिली असे याप्रमाणे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने उपभोग करून सुखरूप राहणे सदरहू वतन तुह्मास मऱ्हामत करून तुमचे माथा सेरणी दाभोली लारी १५००० पंधरा हजार ठेविली आणि वसुलाची विल्हे हुजूर केली असे जाणिजे लेखनालंकार मो० २

ले. ५२. श्री ता ५।३।१६९६.

टीप—वरील ले० ५१ च्या च मजकुराचा हा दुसरा कागद आहे. अव्वल अखेर जो मजकूर वेगळा आहे तेवढा च येथें दिला आहे. कंसांतील मजकूर "राजश्री" पासून "त्यावरून" अखेर ले. ५१ प्रमाणें.

अव्वल:—

रा. गंगाजी खीरसागर हवालदार व [ना. का.] ताा खेड गो. यांस [अ०] स्नेहांकित विठल गोपाल सभासद ना० का० सुबा मामले दाभोल आसीरवाद सु॥ १०९६ राजश्री——छत्रपति स्वामीचे आज्ञा-पत्र सादर शके २२ युवा नाम संवत्सरे माघ शुध त्रयोदसी सौम्यवार

छ ११ रजब सन सीत पैवस्ता छ ७ साबान सालमजकूर तेथे आज्ञा कीं (राजश्री रंगोबा नाईक बिन............परतून देणे म्हणऊन सुभा आज्ञापत्र सादर जाहाले त्यावरून)

अखेर– नाईक ००० चा सरदेशमुखीचा ००० असे तर्फ मजकुरी हकलवाजिमा सदरहू सनदेप्रमाणें व इनाम गाव मौजे चिचघर तर्फ मजकूर देह १ यक कुलबाब कुलकानू खेरीज हकदार व इनामदार देविले असे चालवीत जाणे तालीक लेहून घेऊन असल सनद भोगवटियाकारणें सरदेशमुख मशारनुलेजवली परतून देणें छ ११ साबान मोर्तबसुद मो. ३

टीपा—

(१) विठ्ठल गोपाळ याजकडून याच तारीख मजकुराचीं दुसरीं पत्रें पुढील अंमलदारांस गेलीं आहेत—

१. रा. ब्रम्हाजी कोनेर हवालदार व कारकून ता हवेली

२. रा. राघो सिदनाथ हवालदार व कारकून ता गोहागर

(२) तसेंच माहादाजी बापू सुभेदार यांजकडून चिपळूण ठाण्यास पत्र गेलेलें आहे. या पत्रावर नं० ५ चा शिक्का आहे.

(३) विठ्ठल गोपाळ यांच्या पत्रांवर अष्टकोनी शिक्का असून त्याची अक्षरें “ श्री गंगेव वृद्धिनी प्राप्राजनसागरनंदिनी विठलस्य महाबुद्धे मुद्रा ००० जन ” अशीं दिसतात.

(४) सन १६९७ (ज्येष्ट शु॥ ७ शके १६१९) चा कसबे चिपुळीण मामले हमजाबाद अमाल बंदर मैमून मुस्तफाबाद येथें मजालस भरून बकोजी घाटोरा वगैरे २ व दादजी सावलकर वगैरे २ यांच्या दरम्यान पेठ धणगरच्या वडील गावडेपणाच्या वेव्हाराच्या पडलेल्या वादाचा निकाल लागला तो सुमारें २० बंदांचा महजर दप्तरीं मिळाला आहे. राजवाड्यांच्या ऐतिहा. साधनांच्या २१ व्या खंडांत ले. ८ म्हणून तो सबंध छापला आहे. प्रस्तुत इतिहासाशीं त्याचा अर्थाअर्थी कांहीं एक संबंध नाहीं म्हणून तो येथें दिला नाहीं. हाजिर मजालसींत (पंचाइतांमध्यें) देसक मामले मजकूर म्हणून रंगोबा नायक सरदेसाई

बाळाजी विश्वनाथ देशमुख मामले दंडाराजपुरी प्रांत श्रीवर्धन (नंतरचे पहिले पंत प्रधान पेशवे), आणि खंडो आबाजी जानीव खंडो बलाल देशमुख (छत्रपतींचे चिटणीस) सुभा मामले मजकूर या तिघांच्या सह्या आहेत, एवढी च गोष्ट त्यांत विशेष आहे.

ले. ५३ श्रीशंकरवरदे ता०...।३।१६९६

स्वस्ति श्रीनृपशालिवाहनशके १६१७ युवा नाम संवत्सरे फाल्गुन०० दशमी इंदुवासरे तद्दिनि रा. रा. रंग ना० सरदेशाई मा० प्रभानवली व मामले दाभोल स्वामी गोसावी यांस सेवक नरहरी कृष्ण व केशव कृष्ण व निळकंठ कृष्ण खानवलीकर नमस्कार सुहुरसन १०९६ मा० दाभोल येथील सरदेशमुखी वतन पुरातन स्वामीचे त्या वतना ०००० ला पाहिजे म्हणोन मामले मजकूरचे सरदेशमुखीचे मुतालकी ०००० व पुत्र पौत्री वंशपरंपरेने चालवावी यैसे करून देऊन वतनपत्र लेहून दिले त्यावरून आम्ही हे सेवा मान्य केली असे इमाने इतबारें वतनास खा०००न वंशपरंपरेने सेवा करून येविषई अंतर करील त्यास श्री ——— आराध्याचा शफत वडिलाचा शफत असे तुमच्या वृतीसमधे हक लवाजिमा व कवाईत व इनामत याचे उत्पन होईल त्यास स्वामीने आम्हा ०० वतन करून दिले आहे तेणेप्रमाणे घेऊन वरकड स्वामीस प्रविस्ट करून व आम्हास सौसारिकास पाहिजे तरी गावखोती करून व व्यवसाय करून त्यामुळें उत्पन होईल त्यास स्वामीस संमध नाही हे लिहिले सत्य०००० त्याप्रमाणे नरहरी कृष्ण व केशव कृष्ण व निलकंठ कृष्ण मान्य

यास साक्षी भैरवभट पुरोहित

बाबाजी विश्वनाथ भट माहाजनी उपाध्ये खानवलीकराचे

लेखांक ५४. शि. ६. श्री ता. १०-३-१६९८.

[स्व०] २४ ईश्वरनाम संवत्सरे फाल्गुन बहुल पंचमी मंदवासरे [क्ष० (राजाराम) (रा. रंगोबा ना० सरदेसाई प्रात मा० प्रभानवली)] तुमचेविषी

रा० रामचंद्र पंडित अमात्य याणी लिहिले कीं मा० दाभोलची सरदेसमुखी रगोवा नाईक याची पुरातन आहे पूर्वी अदलशाहाचे वेलेस भोगवटा चालिला होता आलाकडे भोगवटा राहिला आहे ऐसियास रंगावानाईक स्वामीच्या पायासी येकनिस्टेने वर्तत आहेती याकरिता मामले मजकूरची सरदेसमुखी नाईक मा।।रनिलेचे स्वाधीन करून पत्रे दिल्ही आहेत तरी स्वामीने कृपाळु होऊन मामले मा।।रची सरदेसमुखी चालवायाची आज्ञा करून आज्ञापत्र सादर केले पाहिजे म्हणोन लिहिले त्यावरून स्वामीने दाभोलची सरदेसमुखी तुम्हास करार करून दिल्ही असे तरी तुम्ही आपले समाधान असो देऊन मामले मारचे सरदेसमुखीची सेवा करीत जाणे वतनास हकलाजिमा व इनामती चालवायाची मोईन पंडित मारनिलेनी करून दिल्ही आहे तेणेप्रमाणे अनभावित जाणे जाणिजे लेखनालंकार मो०५

टीप—रामचद्रपंत अमात्य हुकुमतपन्हा यांस हि या च तारीख मजकुराचें वेगळें आज्ञापत्र गेलेलें आहे.

ले. ५५ श्री स. १६९८

ले.११३ शि. ४९ श्री ता॥ ३।८।१७११

आ. [स०] परशराम पंडित प्रतिनिधि ताहा मोकदमानी देहाये ता॥ असडोली प्रांत तारलें सु॥ ११११२ देहाये मजकुरी रा० गणोवा ना. सरदेसाई मा. प्रभावली व ता॥ मजकूर याचे हक पेसजी सुभातून हक देविले आहे त्याप्रमाणें हाली पटी गावगना करून दिली असें —— रुपये

३	धुदवडे		५८=	पणतरे	·।=	माहासुर्ली
१	हावेली		१॥÷	वेतवडे	२॥।=	पणोरे
·॥।·	सेलोसी		·।·	गोगवे	१॥÷	निवेली
१॥≡	माडुकली		१॥	कोदवली	१।·	माहुलंग
८=	वेसरडे		१÷	तादुलवाडी	१	सेणवडे
५॥।·	अणनुर		१॥	आबुर्डे	१॥·	साखरी
१॥≡	खरवडे		१८=	हर्पवडे	४॥।·	सावर्डे
१३।·			·॥।÷	गोवे	१॥·	वाघुर्डे
१	उंदवडे	कराड गांव	·॥।.	असडोली	·॥।·	तिसंगी
८=	आवसी		·॥÷	आसलज	१८=	सांगरूल
८=	पासर्डे		१।=	मणनुर	८≡	कंदलगाऊ
८=	कडवे		३॥·	वेतवडे खुर्द	·॥.	खोकुर्ले
८=	कुलोली		१८=	खांटकले	२८॥·	

८= नरवली ८= तलियेबु॥ ८= सुळें १॥।=	·॥≡ बोलोली ८= महारूल ८= सैतवडे २२८≡			तेरीज रुपये १३।· २२८≡ १॥।= २८॥· ६५॥।÷

येकून रुपये पावणेसासष्ट रुपये दुवल देहाये मजकुरी नेमून दिल्हे आहे सदरहूप्रमाणें देसाई मशारनुले यास पावणें जा० छ २८ जमादिलाकर पा। हुजुर मो. १७

ले. ११४ (तालीक) श्री त'. २५।८।१७११

आ. [स.] परशराम पंडित प्रतिनिधि ताहां मोकादमानी देहाये ता। मलकापुर सु॥ ११९२ रा. गणोवा ना. सरदेसाई ता। मजकूर यांचा हक व लवाजिमा ता। मजकुरी मोईन आहे सालगुदस्तां वसूल दिल्हा असेल त्याप्रों सालमजकुरी देणें कोणी खलेल न करितां सुरलीत वसूल देणे साल मजकुरी पावले असेल ते वजा करून बाकी राहिला यैवज प्रविष्ट कर्णें जा० छ २१ रजब

ले. ११५ शि. ४९ श्री ता. २८।८।१७११

रा० साबाजी दादाजी सभासद [ना. का.] प्रांत तारले गो० यांसी

[अ०]——स्ने॥ परशराम त्र्यंबक प्रतिनिधि आशीर्वाद व आनुक्रमें न. सु॥ ११९२ रा. गणावा ना. सरदेसाई मा. प्रभावली व दाभोल व ता। मलकापुर आसडोली यांणी किले विशाळगडींचे मुकामी हुजुर विनंति केली कीं आपण आसडोली माहालीचें वतनदार आहो त्यांस वरकड वतनदारांस ता। मजकुरीं इनाम आहें आपणास इनामत नाहीं ऐसियांस आंपण वतनदार आणि कुटुबवत्छल येकनिष्ट सेवक आहों तरी स्वामींनी कृपाळु होऊन नूतन इनाम ता। मजकुरी करून दिलियानें उत्तन करून आनभऊ

म्हणऊन त्यावरून मनास आणितां मा।रनुले ता। मजकुरींचे पुरातन वतनदार आहेत आणि कुटुंबवत्छल येकनिष्ट सेवक ऐसे जाणोन देसाई मा।रनुले यासि नूतन इनाम ता। मजकुरी दरगांवास पडी पैकी भातजमीन बिघा ८१ येकप्रमाणें खेरीज हकदार करून दिल्हा आसें तरी तुम्ही सदरहूप्रमाणें पड जमीन गावगना आवल दूम सीम या तीन प्रतीच्या धाऱ्याने नेमून देऊन चतुःसीमा करून देणें याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवित जाणें [व्र०] [क०] छ २४ रजब पा। हुजुर मो. १७

ले. ११६. शि.५०　　　श्री　　　ता. २८।११।१७११.

राजश्री गणोबा नायक गोसावी यांसि—

[अ०]—स्नेह ० ० ० ० ० ० ० ० सु॥ ११९२ तुम्ही विनति पत्र पाठविले तेथें लिहिले कीं आपला दायाद तेथे आला असे अशास वंशपरंपरेचे ० ० ० ० समध नाहीं आपण बिनाख्ती बरहक करितील म्हणोन लिहिले तरी वतनाचा विचार आहे दायाद आला आणि तुम्ही न या असें तों नाहीं ० ० ० ० ० ० त्यासी आहेत उभयताचे पूर्वांतर वृत तेच सांगतील त्यावरून निर्वाह होणे तो होईल गैरहिसेब सहसा होणार नाही जाणिजे छ २८ सवाल　मो. ३

ले. ११७. नक्कल　　　श्री　　　ता. २।१।१७१२

[स्व०] ३८ खर नाम संवत्छरें पौष शुध पंचमी सौम्यवासरे [क्ष० (शिव) ([स०] कानोजी आंगरे सरखेल)] रा. गणोबा ना. सरदेसाई मा. प्रभावली व दाभोल यांचे इनामतीचे व खोतीचे गांव संगमेस्वर प्रांतें आहेत त्यावरी तुम्हीं रोखे करून वसुलास माणसे पाठविलीं आहेत म्हणौन हुजुर विदित जाहालें येसियासी कानोबा नाईक यांचा दायाद प्रसिधगडचे मुकामी सालगुदस्तां येऊन आपलें वर्तमान विदित केलें तेसमई गणोबा नायेक विशालगडीं होते याकरितां स्वामींनी यांला भयप्रदर्शनार्थ सरदेशमुखीच्या वतनाची पत्रें कान्होबा नाईक यांजवळ

दिल्हीं त्यावरून त्याणें तुम्हांकडे जाऊन पत्रें दाखऊन वर्तमान सांगितलें आणि तुम्हीं यांच्या गांवावरी रोखे केले असतील यैसियासी स्वामी विशालगडास आल्यावरी गणोवानाईक स्वामीसंनिध येऊन आपलें वर्तमान विदित केलें तरी तुम्हीं यांच्या गांवावरी रोखे केले आहेत ते मना करणें वसुलास लोक पाठविले आहेत ते आपणाकडे परतोन नेणें कानोवा नाईक यांसि हुजुर पाठऊन देणें आज्ञा करणें ते केली जाईल यांच्या वतनास व गांवास येक जरा उपसर्ग न देणें——————

———————

ले.११८ (नकल) श्री ता। ६ एप्रिल १७१२

रा. गणोवा ना० सरदेसाई मा० प्रभावली व दाभोल गो० यांसी [अ०]—सेवक कृष्णाजी परशराम प्रतिनिधि न. सु॥ ११२२ तुम्ही विशालगडचे मुकामीं हुजुर येऊन विनंति केली जे दाभोल सुभांची सरदेशमुखी आपली आहे त्यास पेशजी आपल्या वडिलांस अदलशाही कारकिर्दीस हक होता त्यास हाली कमतर पडला आहे यैसियास स्वामींनी कृपालु होऊन जाजती हक करून दिल्हा पाहिजे म्हणून त्यावरून मनास आणितां वरकड सुभां सरदेशमुखीस हक जाजती आहे यां सुभां हक कमतर पडला आहे या करितां तुम्हांस जाजती हक दर सदे पेसजीची सनद चालली आहे ते देखील हक दाभोली लारी ५ पंचोत्राप्रमाणे करार करून दिल्हा असे उपभोग करणे सदरहु हक तुम्हांस व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने करून दिल्हे आसे उपभोग करून सुखरूप असणे जा० छ १० रबिलौवल——————

———————

ले.११९ (नकल) श्री ता. १६।१२।१७१२

अभयपत्र [स०] परशराम पंडित प्रतिनिधि ताहां खोत व रयानी देहाये

ता। संगमेश्वर

धामापुर १ मालजन १ कुंभारखणी खुर्द १ कोंड असुर्डे १

सु॥ ११११३ दिल्हे अभयपत्र यैसीजे देहाये मजकूर रा. गणोवा ना.

सरदेसाई मा. प्रभावली यांकडे इनाम आहेती त्यांस निजाईची विल्हे जाहाली नव्हती म्हणोन गांवांस तोसीस लागत होती यास्तव तुम्ही तजावजा जाहालेस यैशियास सांप्रत मा॥रनिलेनी लिजाईचा तह करून घेतला आहे आणि तुम्हांस हे अभयेपत्र सादर केले आहे कोणे बाबे शक न धरितां सुखरूप गांवावरी राहोन कीर्दी माहांमुरी कर्णे याउपरी तुम्हांस काही उपद्रव होणार नाही येविसी अभय असे छ २८ जिल्काद

ले. १२० श्रीशकर ता. २२।२।१७१३

श्रीमंत राजश्री——नाईक स्वामीचे सेवेसी

पोश्यतरगत गणेश भिकाजी सेणवी कुलकर्णी व मालसेटी बिन बिसेट सेटिया व हरसेट चौगला व तुलाजी आपटराउ व नागोजी सिंदे व आनंतसेट सेटिया सोनार व समस्त गावकर कसबे प्रभावली सां न. व रामराम विनाति सु॥ ११११३ स्वामीची वाडीची चतुःसीमेचे गावकराचे पत्र आणून देणे म्हणू (न) रा०——पंत प्रतिनिधि याणी आज्ञा केली त्यावरून स्वामीची वाडी कसबे मजकुरी आहे त्याची चतुःसीमा——

पूर्वेकडे मुसेलेकडे डगरीस आंबा आहे पछमेस धजेवेलेकडे वोहल·
उतरेस नदीची सीमा दक्षणेस डोंगराचे पाणलोट

येणेप्रमाणे चतुःसीमा आहे कलले पाहिजे बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे छ ७ सफर हे विनाति

गुार

ही कलम गणसेणवी कुलकर्णी कसबे मजकूर नागोजी राा सिदे (नि॥ नागर).
मालसेटी सेटिया बा॥ (नि॥ तागडी)
कमला म्हार विरसा (नि॥ रेघ) तुलाजी आपटराउ (नि॥ नांगर)
हरसेट बिन सखसेट चौगुला बाा ताजवा (नि॥ ताजवा) आनंतसेट बिन बापू सेट सेट्या सोनार (नि॥हातोडा) लखमोजी सरसिगा गुरव निनको

ले. १२१ सिका (नकल) श्री ता. २७।३।१७१३

आ० [स०] कृष्णाजी परशराम प्रतिनिधि तां कमावीसदार कसबा प्रभावली सु॥ १११३ किले विशालगडचे मुकामी हुजुर येऊन रा. गणोवा ना. सरदेसाई मा० प्रभावली व दाभोल यांही विनंति केली की कसबा मजकुरी आपली वाडी देसाई पुरातन अदलशाई कारकीर्दीपावेतो इनाम चालत आली होती अलीकडे रा.———— माहाराज थोरले कैलासवासी यास देश अर्जानी जाहाला तेसमई वतनदाराच्या इनामती दूर जाहाल्या ऐसियास आपण कुटुंबवछल आणि आजतागांयत स्वामीशेवा येकनिष्टेने केली आहे पुढे हि येकनिष्टेने सेवा करावयास उमेद धरितो तर आपणावर कृपाळु होऊन आपली वाडी देसाई कसबे मजकुरी आहे ते आपणास इनाम करून दिल्ही पाहिजे म्हणोन विनंति केली त्यावरून मनास आणिता सरदेसाई मशानुलें याही या राज्यामध्ये येकनिष्टेने सेवा केली आहे हे कुटुंबवछल कसबा यांचा राहाता जागा याकारिता वाडी देसाई कसबा प्रभावली हे यास इनाम करून दिल्ही आहे तर ते वाडी मशानुलेंचे स्वाधीन करणे तेथे कीर्द करून उपभोग करितील वाडी इनाम करून पत्र दिल्हेयाचे सेरणी रुो २५ पंचवीस रास हुजुर वसूल घेतला असे सदरहु वाडी इनाम यास पौत्रादि वंशपरपरेने चलवीत जाणे [व०] सदरहु वाडीची चतुःसीमा ईदलशाई कारकीर्दीस चालली असेल तेणेप्रा। ठिकाण जमीन स्वाधीन करणे जा० छ ११ रोवल पा। हुजुर मोर्तब असे

ले. १२२ शि. १८ श्री ता। १७ जुलै १७१४

मा। लोकानी किले विशालगड यासि बापाजी भाडवलकर हवालदार व कारकून किले मजकूर सु॥ १११५ मुसलखोरे का॥ प्रभावली येथे तुम्ही सेते केली आहेत त्यास देशमुख राजश्री गणोवानाइक सरदेसाई सुभा प्रांत राजापूर यासि हक दर बिघा गला दसेरी ०८१ येक पाइली करून दिल्हे कदीम घेरा रोखे खेरीज कोकण तर्फेस लोक सेते करितील त्यास हक नेमून दिले आहे त्याप्रमाणे देत जाणे छ १५ रजब मोर्तब सूद (मो. ११)

ले १२३ श्री ता. १५।११।१७१४

[स्व०] ४१ जयनाम संवत्सरे कार्तिक बहुल पंचमी इंदुवासर [क्ष० (शंभु) [स०] (कृष्णाजी पंडित प्रतिनिधि)] रा. गणोबा ना० सरदेसाई मा० प्रभावली व मा० दाभोल हे हुजुर दर्शनास आले पुरातन वतनदार येकनिस्ट यांचे चालवणें हें अगत्य यैशास प्रांत मजकुरी यांच्या सरदेशमुखीच्या वतनास हक लाजिमा व इनामत पहिल्यापासून चालत आले आहे त्याप्रमाणें पुढें हि यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवायाची आज्ञा केली असे तरी तुम्हीं यांचे हातें वतनाची सेवा घेऊन हक लाजिमा इनामात बाजे बाब चालत आहे त्याप्रमाणें यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने बिला कुसूर चालवणें बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा मो० २२.

लेखांक १२४ श्री ता० १५।२।१७१५

[रा०]गणोबा ना०सरदेसाई मा० प्रभावली व दाभोल गोसावी यांसी सेवक कृष्णाजी परशराम प्रतिनिधि नमस्कार सु।। १११५ तुह्मीं विनती केली की कसबा प्रभावली ईदलशाहा पादशहांचे कारकीर्दी तागायेत अपली इसाफत अपणापासी पाछाई फर्मान आहे यैसियास राजश्री कैलासवासी छत्रपती स्वामी यांचे कारकीर्दीपासून कसबे मजकुरी कारभार होता तो राहिला राजापुरीं ठाणें जाहाले अपले मुतालिक राजापुरीं सुबेदाराजवली राहिले कसबे मजकुरी दिवाणाहून हुदेदार ठेऊन कमाविश करित गेले सांप्रत खोतीमुले कारभार चालो लागला यैसियासी स्वामींनी मनास आणून अमचे इसाफतीचा गांवें यैसा फर्मानी आहे तरी अमचे स्वाधीन खोती केली पाहिजे त्यावरुन मनास अणिता तुमचा पुरातन इसाफतीचा गाव हे फर्मानी पाहता खरे जाइले परंतु बहुत दिवस भोगवटा चालिला नाहीं याकरितां सेरणी कबूल करणे ह्मणजे तुमची तुमच्या स्वाधीन करून म्हणऊन अज्ञा केली त्यावरून तुम्ही शेरणी कबूल केली रुपये २००दोनीशे केले कसबा मजकुरीची खोती तुमची तुम्हास करार करून दिल्ही असे तरी तुम्ही वौसीपरंपरेने खोती कमाविश करणे जाणिजे छ२१सफर पा। हुजुर मो८.

ले. १२५ (नक्कल) श्री ता. ९।३।१७१६

[रा०] माहादाजीपंत गो. यांसी

सेवक भगवंतराऊ रामचंद्र अमात्य हुकुमत पन्हा न० सु॥ ११११६ रा० केशव ना० बिन गणोवा ना० सरदेसाई मा० प्रभानवली व दाभोल याणि पनालियाचे मुकामी रा.— स्वामी संनिध विनंति केली की मा० प्रभानवलीखाले ता। मलकापुर व ता। असडोली हे दोनी माहाल वरघाटे आहेत येथील पूर्वी सरदेशमुखीचे वतन आपले चालत होते त्यास आलकिडेस भोगवटा राहिला आहे त्यास साहेबी कृपालु होऊन वतन अजऱ्हामऱ्हामत करून द्यावे म्हणून विनंति केली त्यावरून मशनुलेवरी रा० — स्वामी कृपालु होऊन हरदु माहालींचे सरदेसमुखीचे वतन पूर्वीप्रो। यांसि अजरामऱ्हामत करून सनद रा.— स्वामीची आलाहिदा सादर आहे त्याप्रमाणें सरदेसमुखीचे वतन यांसि व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे [व०] जा० छ २५ रबिलौवल कृपा असो दीजे हे विनंति

ले. १२६ श्री ता. २।२।१७१७.

[स्व०] ४३ दुर्मुख संवत्सरे फाल्गुण शुध द्वितीया मंदवासरे [क्ष० (शाहु) (रा. रा. दत्ताजी अंगरे)] रा॥ विसाजी नाईक सरदेसाई प्रांत राजापुर व मामले दाभोल हे पुरातन वतनदार स्वामीची सेवा येकनिष्टपणे करितात यैशास राजापुर सुभाचे च्यार माहल तुम्हाकडे आहेत

१ राजापुर १ संवदल १ मिटगव्हाणें १ सैतवडें

येणेंप्रमाणे च्यार माहल आहेत तेथील याचा हक यांस पावत नाहीं म्हणून कलों आलें तरी वतनदाराच्या हकास तुम्ही इस्कील करावी हें काही उचित नाहीं हाली यांचे चालवणें स्वामीस अगत्य याकरितां हे पत्र लिहिलें आहे तरी तुम्हीं सदरहू च्यार माहलचे सरदेशमुखीचा हक सुदामत चालत आला आहे त्याप्रमाणें तुम्हाकडील कमाविसदार माहाली असतील त्यास व देसकांस अपली पत्रे देऊन हक बिलाकुसूर देवणें वतनाचे कमाविसीस मशारनिले अपले मुतालिक पाठवितील त्याचे हातें

दंडकप्रमाणें वतनाची सेवा घेत जाणें कान्हावा नाईक तुम्ही ठेविला आहे तो काही या वतनास खात नाही त्यास दखल होऊ न देणें वतनाचे खावद विसाजी नाईक आहेत यांचा अमल यांस देणें बहुत काय लिहिणे मो. ९

ले. १२७ श्री ता. २९।१०।१७१७

रा. कान्होजी आंगरे सरखेल गो० यांसी

छ स० [अ०]——श्री कृष्णाजी परशराम आसीर्वाद उपरी [ये०] वि० रा० गणावा ना० सरदेशाई मा. प्रभावली व मा० दाभोल हे येथे आम्हापासी आहेती याचे गाव संगमेश्वर माहाली आहेती त्या गावावरी आपणाकडून रोखे होऊन उपद्रव होतो तरी हे गोष्टी आपणास काही उचित नाही जे आम्हापासीं आहेती ते आपणापासीं आहेती आम्हामधे व आपणामधे दुसरा विचार आहे ऐसे किमपि नाही तरी याच्या गावावरी रोखे केले असतील ते मना करून उपद्रव न लागे ऐसी गोष्टी केली पाहिजे येतद्विषई विशेष काय लिहिणे छ ५ जिल्हेज मो. १७

ले.१२८ शिक्का १९ श्री ता. १६।३।१७१७

छ म॥ अनाम देसकानी माहालानिहाये सुभा प्रांत राजापुर यांसि गंगाधर कृष्ण सु॥ ११५७ रा० गणोवा ना० सरदेसाई याही विशालगडचे मुकामी विनंति केली कीं आपल्यास हक दर सदे येक पट निर्खास लारीं सवा नेमून दिली आहे यैसियास हाली गावास चहूकडील उपसर्ग लागतो याकरिता दस्त कम पडो लागले आहेत त्यामुलें हकास जागाच नाही यैसे जाहाले आहे तरी स्वामीने जो हाली निर्ख चालतो त्याप्रमाणे जो दस्त आहे त्याच्या येकबेरजीस दर संदे रुपयास सवा रुपया करून देविला पाहिजे त्यावरून मनास आणून हे आज्ञापत्र सादर केले असे तरी जो दस्त हाली चालतो त्यास हाली निर्खप्रो येकबेरजी करून सेंभर रुपयास सवा रुपयाप्रमाणे हक देत जाणे सदरहूप्रमाणे साल दरसाल देत जाणे छ २३ रबिलाखर पा। हुजुर मो. २३

ले.१२९ शि. २१ श्री ता.१४जाने०१७१८

राजश्री कान्होजी आगरे सरखेल गोसावी यांसी

छ स. [अ०] ———— स्ने।। श्रीनिवास परशराम प्रतिनिधि आसीर्वाद [ये०] वि. मा० प्रभानवली व मा० दाभोल येथील सरदेशमुखी रा। विसोवा ना० यांची त्यासी राजापुर सुभांपैकीं राजापुर सौदल मिटगवाणें सैतवडे यां चहू माहलचा हक लाजिमा येत नाही कानोवा नाईकाचा उजूर केला आहे व दाभोल सुभांचेहि हक प्रविष्ट होत नाहीं ऐसियासि हे वतनदार याचे साहित्य करावे कोणी कथला कुसूर करील त्यासी ताकीद करावी आणि वतनदाराची वतने सुरलीत चालवावी हे तुम्हा लोकास उचित आहे तरी राजापुरचे च्यार माहालचा हक प्रविष्ट होत नाही कथला करितात त्यासी ताकीद करून हक यांचा यासी प्रविष्ट करणे तैसेच दाभोल सुभांचे हक लाजिमा सुरलीत प्रविष्ट होत नाही त्यासी ताकीद करून हकलाजिमा सिरीस्तेयाप्रमाणे पाववणे येविसी बहुत काय लिहिणे छ ४ रबिलौवल बहुत लिहिणे तर सुज्ञ आसा मो० ६.

ले० १३० श्री ता० ९।५।१७१८.

[अ०] रा. रामाजी गोविंद नामजाद व कारकून प्रांत दाभोल गो० यांसी से।। भगवंतराव रामचंद्र अमात्य नमस्कार सु।। ११९ मौजे तनाली तर्री चेलब हा गाऊ रा. दादोवा ना. सरदेसाई प्रा। मार यासी इनाम चालत आहे त्याप्रों तुम्ही सुरलीत चालवणे छ १९ जा।लाकर पा। हुजुर मो० १२.

ले० १३१ शि० २०।२१ श्री ता० १३।११।१७१८

[स्व०] ४५ विलंबी नाम सवत्सरे मार्गशीर्ष शुध द्वितीया गुरुवासरे [क्ष० (शाहू) (रा० शामजी बलाल नामजाद प्रांत महिपतगड)] सरदेसमुखिचें वतन स्वामींचे चालत आले आहे तेणप्रा। हाली पातशाहानी स्वामीचे स्वामीस बहाल केले आहे यैशास मा. प्रभावली मा. दाभोल येथील सरदेशमुखीचें वतन रा। गणोवा नाईक व विसोवा नाईक यांचे यांस करार

करून दिल्हे आहे आणि कोकण प्रांतें स्वामींचे वतनाची कमावीस असली पाहिजे याबदल प्रभावली व दाभोल या दोन्ही मामलियांत खासा स्वामींचे वतन सरदेशमुखीचे नूतन स्वामीनी मोकरर करून या वतनास हक आकारास दर सदे पंचोत्रा रयेतीनिसबती मोईन केली आहे व गणोवा नाईक व विसोबा ना. सरदेशमुख मामले मार यांसि कदीम हक लाजिमा इनामत असेल ते चालवायाची आज्ञा केली आहे तरी तुम्हाकडे दाभोल प्रांताचे माहाल कमाविसीस असतील तेथील यांचे वतनाचा हक लाजिमा इनामत असेल त्याप्रमाणे चालवणे लेखनालंकार मो० ९.

टीप— राज्या० शक ४५ मार्ग. शु॥ २ गुरुवारचीं सदरच्या मजकुराचीं इतर आज्ञापत्रें खालील लोकांस गेलीं आहेत—

१. रा. रा. जोत्याजी केशरकर आा सरदेशमुख,
२. [स.] कान्होजी आंगरे सरखैल,
३. देशमुख व देशकुलकर्णी वाहालानिहाय प्रा राजापुर,
४. खोतानी व रयानी माहालानिहाय मामले दाभोल,

आणि या आज्ञापत्राधारें केशरकर यांजकडून छ १ मोहरम ११९९ चीं पत्रें पुढील अंमलदारांस गेलीं आहेत--

१. मा अनाम खोतानी व रयानी मा. प्रभावली, २ रा. दत्ताजी आंगरे, ३. रा. शामजी बल्लाळ नामजाद प्रांत महिपतगड, ४ रा. विठोजी शिंके ५. आंपाजी विश्वनाथ नामजाद व कारकून सुभाप्रांत राजापुर,
६. अजम सिद्दी सादत खान, ७ देशमुख व देशपांडे मा. दाभोल,
८. देशमुख व देशकुलकर्णी मा. प्रभावळी,
९. रा. गणोवा ना० व विसोबा ना. सरदेसाई मा० प्रभावळी व दाभोळ.

केशरकर यांच्या सर्व पत्रांवर नं. २२ चा शिक्का व नं २४चें मोर्तब आहे.

रा. विठोजी सिरके गो० यांसी श्रीनिवास परशराम प्रतिनिधींकडून ता। २ माहे अगस्ट १७२८ चें याच मजकुराचें पुनः वेगळें पत्र गेलेलें आहे त्यांत अखेर मजकूर आहे तो— " तुम्हांकडे कमाविसीस दाभोल सुभा माहाल आहेत तेथील वतनी अंमल सुरलीत चाले ते करणे छ ७ मोहरम बहुत काय लिहिणे "

(सूचना— यापुढील ३ कागद स. १७१८ च्या सुमाराचे आहेत यापेक्षां त्यांची नक्की तारीख ठरावितां आली नाहीं.)

ले. १३२ श्री

श्रीमत्सकलगुणाआलंकरण [रा०] गणोवा ना० स्वामी गो० यांसी पोष्य कृष्णाजी हरी दिनकरराऊ दडवत प्रा विनति उपरि येथील जाणून स्वकीये कुशल लिहिने विशेष बहुतां दिवसी पत्र पाठविले ते पावोन लेखनार्थ अवगत जाला कुशलार्थ कलोन समाधान वाटले यैसेंच निरंतर पत्री परामर्श करीत गेले पाहिजे पत्रीं अहनतीसेंकडून लिहिले तरी आम्ही काही स्वामीच्या कुटुंबाविरहित नाहीं तुमचेच होते ये स्थली आहों तेथे उपचारिक लिहिणे काय आहे हालीं राजश्री ——छत्रपति-स्वामीस विंति पत्र पाठविले ते येकांती मातुश्री ——साहेबांस विदित करून समयोचित जे विंति करावयाची ते केली निशा होऊन मेहरबानीची उत्तरे बोलिलीं त्याचा अर्थ राजपत्रावरून कलेल समई राजश्री आपानी स्वामीची तारफि व कितेक कार्यप्रयोजनाचा प्रसंग लिहिला होता त्याव-रून बहुत समाधान पावली तदनसार स्वामीने कर्तव्यतेचा प्रसंग संपादून धणी यास संतोसी केले पाहिजे आम्हीं संज्ञा लिहिता हेच लिहिली होती कीं जे दया करणे ते मनापासून केली पाहिजे दुसरा प्रसंग काहीं नाही स्वामीने विपरियास चितांत आणिला न पाहिजे तीर्थस्वरूप राजश्री शंक-राजीराऊ स्वामीच्या सहवासे आहेत जो सांभाल करणे तो करीत गेले पाहिजे बहुत काय लिहिणे कृपा असो देणे हे विनति.

ले.१३३ शि. २४ श्री

रा. खेम सावंत भोसले सरदेशाई प्राा कुडाल गाो यांसी

छ [अ०] ——प्रति रा. राजा शाहु छत्रपति उपरी

मौजे डोंगर ताा सौदल हा गाव रा. गणोवा ना० सरदेसाई मा. प्रभावली व दाभोल यांचा वतनी इसाफतीचा व खोतीचा आहे यैशास मौजे मजकूर हाली तुम्हास इनाम करून दिल्हा आहे तरी तुम्ही याची

इसाफती व खोती चालऊन आपला इनामतीचा यैवज घेत जाणे जाणिजे बहुत काय लिहिणे मो. ९..

ले. १३४ श्री (तालीक)

रा. गणोबा ना. सरदेसाई स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक संभसेट व पालसेट सेटिये कसबा लांजे दंडवत विनंति उपरी वाडी देवराई कसबे मजकूर हे वाडी तुम्हास मिरास करून दिल्ही असे तरी स्वामीने उपभोग करून कमावीस केली पाहिजे छ २२ रमजान

ले.१३५ श्री सन१७१८।१९

राजश्री कानोजी आगरे दाजी गोसावी यांसि

छ स. [अ.] श्रेहंकित बालाजी विस्वनाथ आसीर्वाद विनंति येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहिलें पाहिजे वि. रा. गणोबा ना. देशाई यांचे वतन संगमेस्वर माहाली देशमुखी व दाभोल राजापुर सरदेशमुखी पूर्वी पासून वतन आहे येसियास वतनाचे प्रयोजनास येक भाऊ आपणाकडे पाठवावा यैसा त्यांचा हेत आहे ग्रहस्त लोक आहेत यांचे आम्हांस हि अगत्य आहे याकरितां आपले भाऊ आपणाकडे भेटीस पाठवितील त्याचे हातून वतनाची सेवा घेऊन सर्वप्रकारे चालविले पाहिजे येविसी विशेष काये लिहिणे छ २४ शौवल

ले. १३६ (तालीक) श्री ता. ७।१०।१७१९

आ. [स.]कृष्णाजी परशुराम प्रतिनिधि ताहां मुकदमांनी देहाय ता मलकापुर सु॥ ११२० रा. अंतोबा ना सरदेसाई मा. प्रभावली व दाभोल व देह ४ ता मजकूर याणी किले विशालगडचे मुकामी हुजुर विनंती केली की देहाय मजकुरी देह ४१ येथें आपले सरदेशमुखीचे हक व लवाजिमा पुरातन साल दरसाल चालत आहे त्यामध्यें धामधुमीच्या प्रसंगाकरितां हक व लवाजिमा पावला नाही यैशास स्वामींनी कृपाळु होऊन गावगनां ताकीद करून हक व लवाजिमा देविला पाहिजे त्यावरून मनास

आणून देहाय मजकूर देह ४१ येथे येणेप्रमाणे हक लवाजिमा करार करून दिल्हा असे बिता ———— रुो

१	कसबा	.।।। ≈ मौजे मके	।'	करगुले	।।।'	वारूल	।।.	चांदोली	
२	आंबे	२	कासर्डे	३।।	माण	१।'	परेल	१।।	उचज
१।। ≈	कोपर्डे	।।'	येलण	.।.	सेवगाऊ	२	उकोली	३	मारुल
३।।	आंबर्डे	३।।	पणुद्रे	।।'	कोलिक	१।।	अलतुर	।।।'	पुसार्ले
।।'	जावली	१	म्हाळसवडे	१।।	येलवण	।।।.	माजरें	१।	सेंबवणे
१	गजापुर	१।'	कुंभवडे	१	अणसकुरे	१	बरकी	१	बुरबाल
१	गोठणे	१।'	पिसात्री	१	पोंबरे	१	कालजवडें	.।।।'	किसरूल
।।।'	गिरगाऊ	।।'	कोलगाऊ	१	येलुर	१।'	गांवडी	१	कलाणे
।।'	चेनवाड								

५०।। येणेप्रो देह येकेचालीस येकून साडेपंनासप्रों हक लवाजिमा करार करून दिल्हा असे तरी सदहूप्रों साल दरसाल पावीत जाणें जा० छ ४ जिल्हेज ————

ले. १३७ (तालीक) श्री ता. ७।१०।१७१९

आ० [स.] कृष्णाजी परशराम प्रतिनिधि ताहां पतकी व डांगीये जकात वरघाट आंबा ताा मलकापुर सु।। ११२० रा. अंतोवा ना० सरदेसाई मा० प्रभावली व दाभोल व ताा मलकापुर याणी किले विशालगडचे मुकामी हुजुर विनांति केली की आपणास घाट मजकुरच्या जकातीस हक करून दिल्हे होतें त्याजप्रों आपणास पावत होतें आलीकडे धामधुमीच्या प्रसंगाकरिता पांच साला हक पावत नाहि त्यास स्वामीनी हक करार करून दिल्हे पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणून मा।रनिलेचे हक करार करून दिल्हे आहे तरी याचे हकाची पेशजीची मोईन आहे त्याजप्रों हक देत जाणें छ ४ जिल्हेज पाा हुजुर ————

ले. १३८ श्री ता. ७।१०।१७१९

रा० चिमणाजी बलाल सुभेदार व कारकून प्रांत मलकापुर गो० यांसी.

छ [अ०]—————— स्नो। कृष्णाजी परशराम प्रतिनिधि आसीर्वाद व अनुक्रमें न० सु॥ ११२० रा. अंतोवा ना० सरदेसाई मा० प्रभावली व दाभोल व ता॥ मलकापुर यांणी किले विशालगडचे मुकामी हुजुर विनंति केली कीं आपणास पेसजीं संन अशरामध्यें रा. नीलकंठ बलाल र ी ता॥ मलकापुर येथें पड जमीन विघे ॥१३ पावणा चावरं तेरा विघे इनाम करून दिली होती त्यापैकीं पंचवीस विघे सवा पांड मोजून चतुःसीमा करून देऊन आपले स्वाधीन केली बाकी राहिली जमीन ते करार करून देऊन चतुःसीमा करून देविली पाहिजे म्हणोन त्यावरून मनास आणून सदरहू बाकी जमीन विघे ॥१७॥३॥ अर्ध चावर पावणे अठरा विघे पावणेच्यारपांड रास करार करून देविली असे याप्रमाणे मोजून चतुःसीमा करून देऊन मा॥रनुलें याचें स्वाधीन करणें सदरहू जमीन यास व याचे पुत्रपौत्रादि वंषपरंपरेने चालवीत जाणे [व०] [क०] सदरहू जमीनीपैकी चौथाई भातरोप व तीन तक्सीमा वरकस याप्रमाणे चतुःसीमा करून देणे जाणिजे छ ४ जिल्हेज पा॥ हुजुर मो. ३३

टीप— जंजिरा सिद्दी दरबारच्या इतर सनदा वर फारसी व खालीं मराठी (मोडी) अशा आहेत. खालीं दिलेलीं एवढीच सनद फक्त मराठींत आहे. शिक्का व मोर्तब मात्र फारसी आहेत. समासाच्या उलट्या बाजूस बऱ्याच ठिकाणीं ही सनद फाटून तुटून गेली असल्यानें व आरंभीचा मजकूर इतर सनदाप्रमाणें च असल्यानें सनदेच्याच शब्दांत परंतु कारणापुरता तिचा संक्षिप्त उतारा येथें दिला आहे.

ले. १३९

हू

ता. २८।३।१७२०

सु॥ ११२० मशरुल अनाम दादोवा नायेक वलद रंगोवा नायेक सरदेसाई यानी साहेबाचे कदमानजीक येऊन रुजु होऊन हमजाबाद व जाफराबाद या तर्फांचें आपलें सरदेशमुखीचें वतन पूर्वीच्या सनदेप्रां आपल्या कडे चालवावें म्हणून अर्ज केल्यावरून———

" यावरी मेहरवानी करून सुबे मजकूरची सरदेसमुखी यांची कदीम

सबब वतनाची खजमत चालवावयास फरमाविली असे तरी खुद नायेक मशारइले व याचे बडे भाई गणोबा नायेक वलद रंगोबा नायेक व त्याचा बेटा प्रलाद नायेक व तिसरे भाई विसोबा नायेक व नन्हे भाई अंतोबा नायेक यांचे हातीन वतनाची खजमत पिढी दरपिढी सुदामत मोजीब घेत जाणे याचे वतनाचा हक लवाजिमा व इनामत इसाफत सुदामत चालिली असेल त्या मोजीब चालवणे दरसाल [ता.] नकल घेऊन असल फिराऊन देणे परवानगी हुजुर रसा० खुश महमद जबानी कृष्णाजी कदम अफराध रवाना तारिख छ २९ माहे जमादि लाखैर सन ११३२ हिजरी मोर्तब सुद "

लें० १४० शिका फारसी अक्षेरं समजत नाहींत. ता०९।५।१७२०

बजानेब आमीलानि हाल व० इस्तिकबाल व देसकानी तर्फ हमजाबाद सुबा मामले दाभोल मालुमदानद सु॥ ११२० मशारुल अनम दादोबा ना० वलद रगोबा ना० सरदेसाई सुबे मा॥र येहि हजुर येऊन इलतिमास केला की सुबे मा॥रची सरदेसमुखी आपली कदीम असे सबब हजुर येऊन रुजू जालो वतनाचे खुर्दखताबाबे आर्ज केला यावरुन साहेब मेहरबान होउन वतनाचे खुर्द खत करून छ २९ जमादिलाखैर सन मजकुरी सादर केले ते लिहिले असे की सरदेसाई मा॥र याचे हातून वतनाचा हक लवाजिमा व इनामत व इसाफत कदीम चालिला असेल त्यामौजिब चालविणे येसियास आपला हक लाजिमा व इनामत इसाफत कदीम आहे यापैकी मौजे तनाली ता। वेलब तर्फ मा॥र हा गाव आपला इनामत कदीम आहे सुबाहून तहकीक करून आपले तालुका केला असे यैसियास साहेबी मेहरबानी करून मौजे मजकुरची इनामत सनद माहालास सादर केली पाहिजे म्हणोन अर्ज केला व येबाबे यैजतआसार सीदी साद हवालदार कोट अजनवेली येही मालुमात केली की मौजे मजकुर सरदेसाई याचा कदीम इनाम असे सुभाहून तहकीक केले असे यैसे जाहिर केले त्यावरून सरदेसाई मा॥र यावर मेहरबानी करून मौजे मजकूर मौजा १ येक साल-मजकुरापासोन इनाम दिल्हा असे तर मौजे मजकूरची जमाबंदी जे साली जे

होत जाईल ते बेरीज नक्त बाव व गला कैली व वजनी व सुमारी सरकार तक्षीम सरदेसाई मजकूर याचे नावे खर्च लिहित जाणे [ता०] नकल घेऊन असल परतोन देणे व मौजे मजकूरची वेठवेगार व ज्याहात फरमासीबाबे मुजाहिक ना होणे पा। हु॥ रा। दिलावर जवानी रामाजी सीदा अफराध छ १२ माहे रजेब मोर्तबा सूद मो० ३५

ले.१४१ (तालीक) श्री ता. १५।६।१७२०

[अ०] रा. रामाजी गोविंद नामजाद प्रांत दाभोल गो० यांसी सेवक भगवंतराव रामचंद्र अमात्य न० सु॥ ११२१ मौजे तनाली ता॥ वेलंब हा गाव रा. दादोबा ना० सरदेसाई यास इनाम आहे त्यास गुदस्ताचे तिजाईच्या यैवजाचा तगादा गावकरी यास करिता म्हणोन सरदेसाई याणी हूजुर लि॥ त्यावरून गुदस्ताचे तिजाईचा यैवज तहकुब केला असे तुम्हीं गांवकरास तगादा न लावणे छ १९ शाबान पा। हूजुर

ले० १४२. श्री ता. ६।७।१७२०

[स्व०] ४७ शार्वरी नाम संवत्सरे आशाढ शुध त्रयोदसी सौम्यवासरे [क्ष० (शंभु) (रा रा. रामराव बाबाजी मुतालिक दिमत अमात्य)] रा. अंतोबा ना० बिन रंगोबा ना० सरदेशमुख मा. प्रभानवली व मा. दाभोल यांणी हुजुर येऊन विनंति केली की हरदू मामले मजकूरचे सरदेशमुखीचे वतन पुरातन आपले आपण अनभवित आहों पुढें सुरक्षित चालवावयाची आज्ञा स्वामीनी केली पाहिजे म्हणून विदित केले त्यावरून मनास आणितां अंतोबा ना० यांचे वडील भाऊ गणोबा ना. होते ते वतनदार येकनिष्ट होते सदरहू सरदेशमुखीचे वतन पुरातन गणोबा ना. यांचे तें वतन अनभवित असतां मृत्य पावले त्यांमागें सरदेशमुखीचे वतन त्यांचे पुत्रास व बंधूस सुरक्षित चालवणें हें स्वामीस अगत्य आहे याकरितां मामले मजकूरचे सरदेशमुखीचें वतन गणोबा ना. त्याचे पुत्र प्रल्हाद ना. व भाऊ दादोबा ना. व अंतोबा ना. यास चालवायाची

आज्ञा करून तुम्हांस हें पत्र सादर केले आहे तरी तुम्हीं मामले मजकूरचे सरदेशमुखीचे वतन त्रिवर्ग ना. मारनिलेस वंशपरंपरेने चालवणे व या वतनास हक्क लाजिमा इनाम इसाफत व बाजे बाब मामले मजकूरचे गाव जजीरें रतनागिरीच्या तनख्यास आहेत तेथे चालवीत जाणे बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा मो. २२

टीप—याच तारखेचें व मजकुराचें दुसरें आज्ञापत्र कृष्णाजी परशराम प्रतिनिधि यांच्या नांवचें प्रभावली व दाभोल मामल्यांबाबत आहे.

ले. १४३ श्री ता. ६।७।१७२०

[स्व०] ४७ शार्वरीनाम संवत्सरे आषाढ शुध त्रयोदसी सौम्य वासरे [क्ष०(शंभु) ([स०] कान्होजी आंगरे सरखेल)] रा. अंतोवा ना० बिन रगोवा ना० सरदेशमुख मामले प्रभानवली व मामले दाभोल यांणी हुजुर येऊनु विनंति केली कीं हरदू मामले मजकूरचे सरदेशमुखीचे वतन पुरातन आपलें आपण अनभवित आहों त्यास कान्होजी आंगरे यांकडून दाभोल सुभाचे सरदेशमुखीस इस्कील होते याकरितां स्वामीनीं त्यांस आज्ञापत्र द्यावया आज्ञा केली पाहिजे म्हणून विदित केलें त्यावरून मनास आणितां अंतोवा नायक यांचे वडील भाव गणोवा नाईक होते वतनदार येकनिष्ट होते सदरहू सरदेशमुखीचें वतन पुरातन यांचेच हे अनभवित आहेत आलीकडे गणोवा नाईक मृत्य पावले त्याचे पुत्रास व बंधूस वतन चालवणें हें स्वामीस अगत्य आहे तरी गणोवा नाईक यांचे पुत्र प्रल्हाद नाईक व भाऊ दादोवा नाईक व अंतोवा नाईक यांस माहाल मारचें सरदेशमुखीचे वतन सुरक्षित चालऊनु हक लवाजिमा इनामत इसाफत बाजे बाब पूर्वापार प्रमाणें चालवीत जाणें व दाभोल सुभांचे सरदेशमुखीस तुम्हांकडील कारकून व लोक खलेल कारितात त्यास ताकीद करून नाईक मारनिलेचे वतनाचे अमलास खलेल होऊ न देणें व प्रभानवली सुभाचें माहाल तुमचे ताबीन आहेत तेथे हि यांच्या वतनाचा अमल पेसजींप्रमाणें चालवणें कोण्हें इस्कील सर्वथा होऊ ने देणें बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा मो २२

ले.१४४ शिक्का फारसी वर्तुलाकार अक्षरें समजत नाहींत हू ता. १८।१०।१७२०

अज सुबा मुकाम किले अंजनवेल मामले बंदर मैमून मुस्तफाबाद ऊर्फ दाभोल व मामले मुजफराबाद ऊर्फ प्रभावली व इस्म देशमुखानी व मुकामानी व देशपांडियानी व बाजे वतनदारानी व खोतानी व रयानी माहालानिहाये सुबा दाभोल सुहुर सन इहिदे इशरीन मिया व अलफ दादोबा नाईक बिन रंगोबा नाईक सरदेशाई सुबैन मजकुर यांही सुभा मुकांम मजकुरीं इलतिमास केला कीं आपले सरदेशमुखीचें वतन कदीम पुस्त दर पुस्त सुबैन मजकूरचें चालत आलें असे दरम्याने धामधुमीचे सबबेकरितां सरकार तर्फेस रुजुवातीस मवाफिक आलें नव्हतें सबब केशो कृष्ण गुमस्ते मामले दाभोल यांस सन खमस अशरमध्यें वतनी पादशाही फरामीन व बाजे कागद देऊन हुजुर जंजिरे दंडाराजपुरीस रवाना केले होते ते वख्तीं त्यांणीं हुजुर जंजीरा जाऊन वतनी कागद दखल केले त्यावरून हुजरून खातिरेस आणून मेहरवान होऊन केसो कृष्ण मुतालिक यांस वतन चालवावयासी खुर्दखत मरहमत केलें असे त्यावर ते सुबैन मजकुरी वतनाचे चाकरीवर होते त्यावर आपणहि साल गुदस्तां हुजुर जंजीरे दंडाराजपुरीस जाऊन रुजु होऊन अर्ज केला कीं वतनाची खिजमत चालवावयासी हालीं आपण उमेदवार असों तर आपले व आपले भाई यांचे नावें खुर्दखत करून देणार साहेब धनी आहेत म्हणऊन अर्ज केला त्यावरून हुजरून मेहरवान होऊन सन इशरीनमध्यें आपले व आपले भाई यांचे नावें खुर्दखत मरहमत केलें असे त्यामध्यें कदीम हक लवाजिमा व इनामत व इसाफत सुदामद चाललें असेल ते मोजीब चालवणे यैसा हुकुम असे त्या मोजीब सुभाहून ताकीद फर्माऊन देविलें पाहिजे म्हणऊन इलतिमास केला ऐसियासि सरदेसाई मशारुनइले यावर मेहरवांन होऊन हुजुरून खुर्दखत छ २९ जमादिलाखर सन इशरीन मरहमत केलें असे तेव्हां हुकुम जे सरदेसाई मजकूर हुजुर येऊन खुर्दखताबाबे अर्ज केला त्यावरून खातिरेस आणितां सन सीत आसरमध्यें सरदेसाई मजकूर यांचे नायब केशो कृष्ण हुजुर येऊन रुजु होऊन

वतनाचे खुर्दखतबाबे अर्ज केला त्यावरून छ ११ जिल्हेंजी मेहरबान होऊन खुर्दखत करून दिल्हे असें की सुबे मजकूरचे सरदेशमुखीचे वतनाची मुतालकी यांची कदीम असे सबब यांचे दुमालां केली असे यांचे हातून वतनाची खजमत सुदामदमोजीब पिढी दर पिढी घेत जाणे यैसें सादर असे हालीं खुद दादोबा नाईक सरदेसाई सन मजकुरीं हुजुर येऊन रुजु जाहाले आणि वतनाचे खुर्दखतबाबे अर्ज केला त्यावरून हुजुरून यांवर मेहरबान होऊन खुर्दखत मरहमत केलें असें सुबे मजकूरची सरदेशमुखी यांची कदीम असे सबब वतन चालवावयासी फर्माविलें असे तर खुद नाईक मशारइले व यांचे वडे भाई गणोबा नायेक वलद रंगोबा नायेक व त्यांचा बेटा प्रल्हाद नायेक व दुसरे भाई विसोबा नायेक व नने भाई अंतोबा नायेक यांचे हातोंन वतनाची खिजमत पिढी दर पिढी सुदामदमोजीब घेत जाणे व यांचे वतनाचा हक व लवाजिमा व इनामत व इसापत सुदामद चालील असेल तेमोजीब चालवणे दर दर साल ताजे सनदेचा उजूर न धरणे नकल घेऊन असल फिराऊन देणे म्हणऊन हुजुरचे खुर्दखतांत हुकुम सादर असे यैसियासि खातिरेस आणितां सुदामद सरदेसाई मशारइले यांचा कदीम हक लवाजिमा चालला आहे त्यामोजीब हालीं हि देववावा (मु) दुरुसच असे अंमा अवल मुलकाची अबादी होती तेव्हां मवाफिक पडत होतें फिलहाल चहूंकडील कसालेयामुलें मुलुक वैरान असे जुजवी वसाहत असे ते रयेत कसालेयामुलें नादार पडली असे यामुलें सुदामदमोजीब हक लवाजिमा द्यावयासी मवाफिक पडणार नाही याबदल सरदेशाई मशारुनइले यांस फर्माविलें कीं पेस्तर मुलकाची ऊस्तावारी जालेयावर तुमचा हक व लवाजिमा सुदामद चालला असे त्यामोजिब घेणे व रयेत हि देईल फिलहाल रयेतीचे नादारीकरितां करार करून फर्माविलें जात असे तर येणेप्रमाणे हक लवाजिमा देत जाणे बीतपसील—

हालीं जमाबंदी कैली यैनजिनसी असे त्यास हर जिनसास दर खंडीस च्यार आणे रुपये ।

नक्त बाब ऐन नक्त देखील घरपटी व वण म्हैसी व वजनी व सुमारी जिनसास किमतीस दर रुपयास ८॥.

गौळीयांचे म्हैसींस सालिना दर म्हैसीस दुद वजन कचे
विनीस दर दीडशेर पाडसीस दर
॥१॥. अदशेर ॥॥.
जकायेतीस—
मेण्याचे आणि मिळाचे व भुसाचे
दर बैलास साहा रुके ॥६
पानांचे दर बैलास तीन रुके ॥३
डोईवोझें व खांदाडीस दर दीड रुका
कैली व वजनी बंदरी तेराडियांची जिन्नस व कापड वगैरा जकात आ-विकील त्याचे कारेल त्यास दर-किंमतीस दर रुपयास नीम आणा
रुपयास नीम ॥.
आणा ॥.
आठवडेयाचा बाजार भरेल त्यास
दर बाजारास
वाणी याचे व कापडकरी आणि मासलकरी यांचे सरेकरी याचे दु-दुकानास पाऊण कानास दीड रुका
रुका ॥॥. ॥१॥.
बाजे खुम मोहतर्फी कुलांस, सराफांस दर दुकानास दीड रुका ॥१॥.
पानाचे दर मोटेस वजनी जिनसास
पानें १०० दरमणे पावशेर
गलेयास फसकी नारळ दर सदे
गला कैली येक १
गोणीस मोटेस खाटकी याचे दुका-

तेलियाचे खुटास सालिना तेल वजन कचे अडीच शेर ॥२॥.
चानबांराचे दुकानास सालिना
पायपोसकारियांचे वाहाणांची जुतीं
दुकानास पाये- करितात त्यांस
पोस जोडे दोन २ दर दुकानास
जुती जोडे दोन २
रयेतनिसबतीने वरांडें होतील त्यास
दर वराडास
नारल १ पानें ५० सुपारी ॥॥१
बारीक मीठ पिकेल त्यास पिकास कैली दर खंडीस मीठ कैली अदमण
दरगावांस सालिना———
जेवा १ शाकभाजी वोझें १ इरले १
कोंबडे येक १ राबता महार १ रोज ४
फाटी भारे दोन २
कोली व दालदी व खारवे व भोई यांचे दर होडीस मासा येक १
कुंभाराचे दर आवेयासी मडके येक १
बुरडाचे दुकानास सालिना दागिने
च्यार ४ खुर्द २ बुजरुख २
साली कोटे यांचे मागास सालिना सूत चिवट येक १
नारल व सुपारीचे आगरास सालिना
सुपारीचे आगरास नारलांचे आगरास
सिपुट येक १ नारल येक १
बंदी व गुलाम फरोक्त होईल त्यास
दर सनगास नीम रुपया ॥.

सवाशेर निटवे नास मांस वजन
८८।– ८८॥ सवाशेर ८८१।.
धणगर सणगर यांचे मेहतरास सालिना
दर मागास कांबले येक १
नारळाचे दरबैलास तीन रुके ८३
सणगर व धणगर कांबली फरोक्त
करितील त्यास दर बोधेस सा रुके ८६
घोडे व उंटे फरोक्त होतील त्यास
किंमतीस दर सदे एक रुपया

दत्तपुत्र घेईल त्यास सेला एक १
सेली व मेंढी याचे कळपास दर सदे
बकरे येक १
सिगोटी गाई ढोरें व म्हैस ढोरें दर
सरास च्यार आणे ।. रुपये
खंड गुन्हेगारी होईल त्यास दर सदे
पांचरुपये ५
पारध सिकारी सावजास सिसाला १

येणेप्रमाणे हक लवाजिमा फील हाल करार करून दिल्हे आहे तर सदरहूमोजीब सरदेसाई मशारुनइले यांस देत जाणे पेस्तर मुलकाची अबादी जाहलेयावर सुदामद कदीम हक लवाजिमा चालिला असे त्याप्रमाणे घेत जातील व तुम्हीहि सुदामदमोज़िब देत जाणे दर दर साल ताजे सनदेचा उजूर न करणे नकल घेऊन असल सरदेसाई मशारइले यांनजीक देणे ताकीद समजणे र॥ छ २५ माहे जिल्हेज सन २ जुलुस मुताबिक सन ११३३ हिजरी मोर्तब सुद मो. ३५

ले० १४५ (तालीक) श्री ता. २६।१२।१७२०.

आ० [स०] भगवंतराव रामचंद्र अमात्य ताां कमावीसदार मौजे धामापूर ताां संगमेश्वर सु॥ ११२१ मौजे मजकूर हा गांव सरदेसाई याजकडे इनाम चालत आहे यैशास रा. अंतोवा ना. सरदेसाई मा. प्रभानवली व मा. दाभोल हे हुजूर रत्नागिरीच्या मुकामी दर्शनास येऊन विदित केले जे मौजे मजकुरास इकडून वसुलाचा उपसर्ग लागतो यामुळे गावीचे रयत शकदिल आणि आपण कुटुंबवछल कुटुंबाचा योगक्षेम चालावयाकरिता मौजे मजकूर इनाम दिल्हा तेथे उपद्रव जाहाल्यावर गांव पडतो यैशास स्वामी कृपाळु होऊन गांवीचा उपद्रव चुकऊन आपणास निरापद्राव गांव चाले ते केले पाहिजे ह्मणोन त्यावरून मनांस आणून मौजे

मजकूर इनाम गांव मशार्निलेच्या दुमाला केला असे तरी तुह्मांकडे रुजुवात राहोन गांवीची लावणीसंचणी उमेदीने करणें मौजे मजकुराकडे येतफेचा चौथाईचा यैवज येणे तो मशार्निलेकडे साल दर साल देत जाणें व हुजुरून चिटी मसाला होईल तो देत जाणे जा० छ ७ रोावल———

ले. १४६ श्री स. १७२१ चे सुमाराचें

श्रियासह चिरंजीव रा. रा. श्रीनिवासराऊ यासप्रति कृस्णाजी परशराम आसीर्वाद उपर [ये०] यानतर रा० आंतोवा ना० सरदेसाई आपल्या दर्शनास आले आहेत पूर्वीपासून हे आपले पदरचे याची स्थापना सर्वप्रकारे आपले वतन यैसे मानून तीर्थस्वरूप रा.— बाबाही केली आहे त्याप्रमाणे सर्वविसीं याचा अभिमान धरून आपण स्थापना केली पाहिजे हे आम्हापासी आहेत ते आपणाजवली च आहे यैसे चितांत धरून दया केली पाहिजे च्यार राजें जाहाली आहेत यास आधार आपल्याविरहित दुसरियाचा नाही थोर वतनदार ब्राम्हण म्हणऊन तीर्थस्वरूपी आपले पुत्र ह्मणऊन चालविले आहे त्याचे ठाई तुह्मीं आहा याचा अभिमान धरून चालविणार आपण सर्वज्ञ आहेत याचेविसि चिरजीव आपणास विनती करितील तदनुरून याचेठाई कृपा केली पाहिजे बहुत काय लिहिणे हा आसीर्वाद.

टीप —हें पत्र अव्वल अखेर खुद्द कृष्णाजी परशुराम यांचे हातचें आहे.

ले० १४७ हुवल् गनी सन १७२२

आमिलाने हाल व इस्तिकबाल व देसमुखान् व देसपांडियान् व मुकद्दमान् व जमीअ जमीदारान् व मुजारियान् व रिआया व बरायाए त. बेलंब तर्फए हम्जाबाद मु० बंदर मैमूने मुस्तफाआबाद ऊर्फ सुबए दाभोल ताल्लुके किलए मेहरूसे जजीरे दंडाराजपुरी सरकारे तलकोंकन आदिलखानी मुजाफे सुबए दारुजफरे बीजापूर बिदानंद के दरींविला इज्जतआसार दादो ना. वलद रंगो ना. सरदेसाईए सुबए म. व सुबए राजापूर बहुजूर आमदा अर्ज नमूद के पेश अर्जे ईं खानसाहिब व किल्ले जिन्नतनिशान याकूतखाने सानी

मर्हूम अज राहे मेहरबानी व कदीमपरवरी मौ० तनाली त० म०के बाबत हक्के लवाजिमात व इन्आमाते सरदेसमुखी खत बतारीख द्वाजदहु शेहरे रजब संने २ मंहमदशाही मुताबिक सने ११३४ हिजरी मुताबिक संने अशरैन माता व अलफ मृगसाली दरोबस्त इन्आम बाऔलाद व अहफाद मुकर्रर फर्मूद सनदे हिंदवी मुजय्यन् बमोहरे खुद अता नमूद अंद बिनाबरां उमीदवारं के अल् हाल मुताबिक आं सनदे नातीक बखते फारसी मर्हमत गर्दद चूं बखातिर आवुर्दा शुद बजुहूर पैवस्ता मौ० म० अज कदीम बाबते हक्के लवाजिमात व इन्आमाते सरदेसमुखीए ऊस्त लिहाजा नजर बर आं व बर अकीदत व नेकोबंदगीए मुआरुन्इलेह मौ० म० रा दरदस्त नमूदा हासिलाते दीवानी व कुल् जमअबदीए गल्ला व नक्दियाते दरूनि व शुमारी आं चे तक्सीम अज सरकार ख्वाहद बूद बाअवलाद व अहफाद इन्आम व मर्हमत फर्मूदेदम् बायद के अम्लः व फअलः त० म० त० म० मौ० मस्तूर रा दरोबस्त इन्आम मुकर्री बाअवलाद व अहफादश दानिस्ता दर कब्ज व तसर्रुफे ऊ वा गुजारंद व बहेच वजह मिन्नुल् वुजुह बइल्लत बिल्वुजूहात सहेव सायरे जहात् व बिसात् बेठ व बेगार व कनाफा व जमीए तकालीके दीवानी मुजाहिमत न रसानंद व हरसाल सनदे मुजद्दद् न तलबंद नकल गिरिफ्ता असल् वापस दिहंद दरींबाब ताकीद दानिस्ता हस्ब-ई-मस्तूर बाअंमल आरंद तेहरीर फित्तारीख (पुढें कांहीं नाहीं)

(सुभे दाभोळ सरदेशमुखीच्या कामाबद्दल वेतन म्हणून सुभे मजकूर पैकीं मौजे तनाली तपे वेलंब–हमजाबाद हा गांव आम्हांस वंशपरंपरेनें इनाम दिल्याबद्दलची फारसी सनद सरसुभेदार मरहूम याकुतखान यांची आहे व त्याप्रमाणें गांव आम्हांकडे इनाम चालत आहे तो तसा पुढें चालावा वगैरे म्हणून दादोनायक रंगोनायक सरदेसाई यांनीं हुजुर विनंति केली ती मनास आणून व सनदपत्राचा वगैरे दाखला पाहून सदर तनाली गांव त्यांजकडे वंशपरंपरेनें कायम इनाम दिला आहे म्हणून जंजिरे शिद्दी अधिकाऱ्यांचें फर्मान आहे).

ले. १४८ (तालीक) श्री ता. २६।३।१७२२

अभयपत्र [स०] भगवंतराव रामचंद्र अमात्य ता। येसो माहादेव मुलिया रयानी कोंड इनामत सरदेसाई मौजे असुर्डे ता। संगमेस्वर सु॥ ११२२ दिल्हे अभयपत्र यैसीजे रा. अंतोबा ना० सरदेसाई हुजुर रत्नागिरीचे मुकामीं येऊन विदित केले जे कोंड मजकूर हा इनामतीचा कांहीं दिवस खराब पडिला होता त्यास साल गुा। स्वामीच्या दर्शनास आलो तेव्हां स्वामींनी कोंडाचे वसाहतीची आज्ञा करून इकडील तिजाईचा तह करून अभयपत्र सादर केले त्यावरून येसो माहादेव मुलिया व आणखी येक दोन कुळे आणून थोडीबहुत कीर्द केली स्वामीनी तिजाईचा तह केला त्याप्रा। उगवणी केली याउपर पेस्तर सालचा तिजाईचा तह करून अभयपत्र सादर केले पाहिजे म्हणोन तपासिले विदित केले त्यावरून मनास आणून नायक मशार्निलेचे चालवणे अवश्यक जाणोन कोंड मजकूरचा इकडील येकतर्फा तिजाईचा येकसाला सन सलासाकारणे तह नक्त रुा। ५ पांच रुपये मोकरार केले असे याप्रमाणें येकतर्फेने हंगामसीर उगवणी कर्णे आणि कोंड मजकूरची माहामुरी करून खुशाल राहाणे जाजती होणार नाही चिंता न कर्णे जाणिजे अभय असे सदरहू तह देखील बायती केला असे जा० छ १९ जमादिलाकर

(या संबंधांतील याच सुमाराचे एक खासगी पत्र)

ले. १४९ (तालीक) श्री

रा. रा. अंतोबा ना. स्वामी गो० यांसी

सेवक श्रीनिवास सिवदेव न. विनंति [ये०] विशेष तुम्हीं पत्र पाठविलेप्रा। जाले सारांश घेरियाचे हक व बाग कोलबे व कोंड असुर्डेविसी लि॥ तरी प्रस्तुत येथील तवाईचा प्रसंग ल्याहावा तेव्हा तुमच्या चित्तात यावा यैसे नाही तथाप तुमचा प्रसंग तो आवशक जाणोन बाग कोलबे व कोंड असुर्डे येथे दोन पत्रे सिक्यानिसि पाठविली आहेत पुढे उर्वरित कार्य तेहि प्रसंगोचित घडोन येईल तुमच्या कार्यास अंतराय सर्वथा न करूं बहुत काय लिहिणे सुज्ञ आहा कृपा असो दीजे ही विनंति

ले० १५० श्री ता० २०।१।१७२३

[स्व०]४९ शुभकृत संवत्सरे पौष्य बहुल दशमी रविवासरे [क्ष०(शाहु) ([स.] कान्होजी आगरे सरखेल)] प्रल्हाद ना. व अंतोबा ना. सरदेसाई प्रा राजापुर हे प्रात मजकुराचे लावणीसंचणीबदल संगमेस्वर माहाली कबिल्या-समेत राहातील तुम्हीं सर्व प्रकारें याचे साहित करणें प्राा मजकूरपैकी याचे माहाल तुम्हाकडे आहेत त्या माहालीं याचे इनाम व हक लाजिमा पूर्वीपासून चालत आला आहे त्या प्राो यास विलाकुसुर चालवणें बहुत लिहिणें तरी सुज्ञ असां (मो. ९).

ले०१५१ (तालीक) श्री ताा २९।५।१७२३

मााअनाम हवालदार व कारकून व. भा. ताा संगमेश्वर यांसी कृष्णाजी परशराम प्रतिनिधि सुा। ११२४ रा० अंतोबा ना० सरदेसाई मा. प्रभा-वली व दाभोल याणी हुजुर विशाळगडचे मुकामी येऊन विनंति केली की मौजे धामापुर ताा मजकूर हा गांव आपणास वतनसंमधे इनाम आहे तेथील तिजाईचा वसूल आपणास पडतो यैसियास आपण वतनसमधे स्वामी-पासी सेवा येकनिष्ठेने करीत आहो स्वामीनी कृपाळु होऊन मौजे मजकूरची तिजाई आपणास माफ केली पाहिजे --(इ०) ... ... तिजाई साल दर साल माफ केली असे. वसुलास तगादा न लावणें--छ ५ रमजान.

ले० १५२ शि०२८ श्री ता० १५।११।१७२३

अभयपत्र [स०] भगवंतराव रामचंद्र आमात्य हुकमत पन्हा ताा कमाविसदार कोंड असुरडे ताा सगमेस्वर सुा। ११२४ दिल्हे अभयपत्र ऐसे जे तुां हुजुर रतनागिरीच्या मुकामीं येऊन विनंति केली जे मौजे मा।र सात पाच साले खराब पडिला होता त्यास साल गुा। वसाहत करावयाविसी आज्ञा करून अभयपत्र सादर केले त्यावरून सेवक उमेदवार होऊन गांवावरी येऊन वसाहत करून जुजवी कीर्दी केली त्या कीर्दीच्या अजमासाबदल रा। हरी बाबजीराव पाठ-विले त्याणी कीर्दी अवलोकन करून अजमास शेवेसी विदित केला च आहे

परंतु पाऊस सेवटवर लागला नाही यामुळे वलवा पडोन सेते जायां जाहाली आहेत स्वामी कृपाळु होऊन कीर्दीवर नजर देऊन गावीचा तह करून आज्ञापत्र सादर केले पाहिजे म्हणून त्यावरून मनास आणून सालगुाच्या कीर्दीवर नजर देऊन मौजे मारचा तह सालमजकुराकारणे येकसाला देखील बावती येकतरफा येतर्फेने खेरीजगी यास मक्ता उसुली वेरीज तिजाईचे येवजी नकद रुपये ५ गला दसेरी खंडी ॥ येकून पाच रुपये व गला दाहा मण रास केला असे विलाकसीर उगवणी करणे आणि पेस्तरची कीर्दी उमेदीने करून खुशाल राहाणे ज्याजती होणार नाही अभय असे सदरहू कोड सरदेशमुखाकडे इनाम आहे त्याचा येतर्फेन उसूलाचा तह केला असे याप्रा उसूल देणे जाजती होणार नाही छ २७ सफर पा हुजुर मो० २८

ले० १५३ श्री ता० ५।४।१७२४

[स्व०] ५० क्रोधीनाम संवत्सरे चैत्र बहुल अस्टमी भानुवासरे [क्ष० (शंभु) ([स०] कृष्णाजी पंडित प्रतिनिधि)] केशव ना० बिन गणावा ना० सरदेसाई मा० प्रभावली व मा० दाभोल यांनी किले पनाळाचे मोकामी स्वामीसंनिध विनंति केली जे मा० मजकूरचे सरदेशमुखीचे वतन महत कदीम अपलें अपले आजे रंगावा ना० त्याचे पुत्र गणोवा ना विसोवा ना० व दादोवा ना० व अतोवा ना० यैसे चौघे त्यामध्यें गणोवा ना० वडील पुत्र ते अपले पिते याणी पूर्वी माहाराजासंनिध येऊनु वतनाविषइ विनंति केली होती कीं मा० प्रभानवलीखालें ता मलकापूर व ता असडोली हे दोनी माहाल वरघांटे आहेत येथील कदीम सरदेशमुखी ईदलशाहाचे कारकीर्दीस अपलें वतन चालत होते त्या आलाकडे कांही दिवस मुकासियामुळें दो माहालचा भोगवटा अपला राहात आला आहे यैसियासी दोही माहालचें वतन करार करून दिल्हें पाहिजे म्हणोन विनंति केली होती परंतु ते प्रसंगी पत्रें होऊन अलीं नाही याकरितां अमचे बंधु वडील प्रल्हाद नाईक व आपण व कनिष्ट

बंधु शामजी नाईक यैसे त्रिवर्ग व आपले चुलते विसोवा नाईक व दादोवा नाईक व अंतोवा नाईक इतकियांचा वतनाविसीं स्वामीच्या पायांसी आर्ज आहे तरी साहेबीं मेहरवान होऊन वतनाचा भोगवटा राहिला आहे तो जीर्णोधार करावयासी महाराज समर्थ आहेत म्हणोन विनंति केली त्या वरून मनास आणितां मा० मजकुराखालें सदरहू दोनी महाल कदीम चालत होते अदलशाई मुकाशामुलें व या राज्यांत वरघांटे तीर्थस्वरूप रा० थोरले कैलासवासी स्वामीनीं नूतन सुभे केले तेव्हां ता मलकापुराखालें आणखी च्यार माहाल देऊन स्वतंत्र सुभा केला व तारलें सुभा केला त्याखालें आणखी माहाल व ता आसडोंली माहाल दिला त्यामुलें भोगवटा वतनाचा राहिलासें दिसोन आलें परंतु कदीम इदलशाई कारकीर्दीस प्रभानवलीखालें हे माहाल चालत होते दरम्यांने भोगवटा राहिला म्हणून वतनदाराचे वतन तुटावें यैसे नाहीं हे वतनदार प्रमाणिक स्वामीच्या पायासीं राजश्री थोरले कैलासवासी स्वामीपासून हा कालपर्यंत निष्टेनें वर्तत आहेत याचे चालवणें हें स्वामीस परमावश्यक याकरितां स्वामी याजवर कृपाळु होऊन हरदू माहालचे सरदेशमुखीचें वतन कदीमप्रमाणें यांस अजरामऱ्हामत करून दिल्हें आसें तरी तुह्मीं यां दोनी माहालचे सरदेशमुखीचे वतन याचे दुमाला करून वतनाची सेवा यांचे हातून घेत जाणें या वतनास हक व लवाजिमा व जकायतीस विस्वा हक निसबत मा० मजकुराचे बाजे माहालप्रमाणें चालवीत जाणें या दोही माहालचे वतनाचे सनदा अलाहिदा माहालचे नांवे सादर आहेत सदरहु वतन यासि व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणें वर्ष प्रतिवर्षी [क.] [व.] जाणिजे वहुत लिहिणे सुज्ञ असां मो. २२.

टीपा—याचदिवशीं याच मजकुराची आज्ञापत्रें दुसरीं गेलीं आहेत तीं व त्यांतील कमजास्त बावी खालीं दिल्या आहेत:—

(१) "भगवंतराऊ अमात्य हुकमत पनाह यांसी"—नांवाखेरीज फरक नाहीं

(२) "देशमुख देशपांडे ता। असडोली यांसि"
(३) "देशमुख व देशपांडे ता। मलकापुर यांसि" } "बहुत लिहिणें सुज्ञ असां" याबद्दल 'लेखनालंकार' आहे.

(४) "पारपत्यगार व कारकून वर्तमान व भावी ता। मलकापुर यांसि"
(५) व "पारपत्यगार व कारकून वर्तमान व भावी ता। असंडोली यांसि"
शेवटच्या दोन आज्ञापत्रांत पुढील मजकूर जास्ती आहे:—

"वतनसबंधें यांचे माथां शेरणी रुपये ३०० तीनसे रुपये करार केले असत याचा वसूल हुजुर होईल" "सदरहु ता। मजकुरचे वतन यांसि व यांचे पुत्रपौत्रादि वंश०" इत्यादि मजकुरापूर्वी वरील शेरणसिंबंधाचा मजकूर आहे. अखेर "लेखनालंकार" व रुजु असे शब्द आहेत व दोहोंच्या दरम्यान मोर्तब आहे. शेवटच्या ४ पत्रांवर मोर्तबाखेरीज आरंभीं नं. २६ व १७ चे शिक्के आहेत. याच आज्ञापत्राधारें कृष्णाजी प० प्रतिनिधि यांनीं ता. १०।१।१७२६ चे जे हु॥ मलकापुर सुभ्यास व देहे ४१ चे देशकांस दिले आहेत त्यांतील दुसऱ्या हुकुमाचे अखेर पुढील मजकूर अधिक आहे —" सरदेशमुखीच्या धंद्यास मशारनिले आपला मुतालिक ठेवतील तो व तुह्मीं येकमतें वतनी धंदा चालवणें."

ले० १५४ शि०२५।२६।१७. श्री. ता. ५।४।१७२४

[स्व.]५० क्रोधीनाम संवच्छरे चैत्र बहुल अष्टमी भानुवासरे क्ष. श्रीराजा शंभु छ० स्वामी यांणी रा. गणोबा व विसोबा ना०व दादोबा ना० व अंतोबा ना. गोत्र कौशिक सरदेसाई मा. प्रभानवली व मा. दाभोल यांस दिल्हे वतनपत्र ऐसे जे तुह्मीं पूर्वी स्वामीसंनिध आपल्या वतनाविषई विनंति केली होती व हाली तुमचे पुत्र प्रल्हाद नाईक व केशव नाईक व शामजी ना। बिन गणोबा नाईक यांणी किले पनालाचे मुकामी विनंती केली की (येथून पुढील मजकूर "वतनदारांचे वतन तुटावें ऐसे नाहीं" येथपर्यंतचा सर्व अगदीं वरील आज्ञापत्राप्रमाणें) तुह्मी वतनदार प्रामाणिक स्वामीच्या पायासी तीर्थस्वरूप राजश्री थोरले कैलासवासी स्वामीपासून हा कालपर्यंत येकरूप निष्टेनें वर्तत आहा तुमचे चालवणें स्वामीसि परम अवश्यक यास्तव स्वामी तुह्मावरी कृपाळु होऊन ता॥ मलकापुर व ता॥ असडोली या दोन्ही माहालचे सरदेशमुखीचे वतन कदीमप्रमाणें तुह्मांस

अजरामऱ्हामत करून दिल्हें असे तरी तुह्मीं सदरहु दोही माहालचे वतन आपले दुमाला करुन घेणें या वतनास हक व लवाजिमा व जकायती सविस्वावार निसबत मामले प्रभानवलींचे बाजे माहालाप्रमाणें घेत जाणें या वतनसमंधे तुमचे माथा शेरणी रुपये ६००

ता। मलकापुर ३०० ता। असडोली ३००

येकूण सहासें रुपये रास करार केले असेत याचा वसूल हुजुर होईल सदरहू वतनाच्या सनदा आलाहिदा माहालचे नावे सादर आहेत तुम्हीं सदरहू दो माहालचे सरदेशमुखीचे वतन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनभवणें आणि वतनाची सेवा करून सुखरूप राहाणें जाणिजे सदरहु शेरणीचा यैवज हुजुर पाठऊन पावालियाचा जाब घेणे तेणेप्रमाणें मजुरा होईल जाणिजे लेखनालंकार मो०२२ रूजु.

ले.१५५ शि०२७ श्री ता। १३।८।१७२४

रा. दादोवा ना० व अंतोवा ना० सरदेसाई मा० प्रभावली

व मा० दाभोल गो० यांसी

॥ छ[अ०]—स्ने॥ विठोजी सिरके रामराम सु॥ ११२५ मौजे तनाली ता। वेलंब हा गाऊ तुम्हाकडे इनाम आहे त्यास तेथील तिजाईचा वसूल जिल्हेकडे होत होता त्यास सारंगडचे मुकामी रा. अंतोवा ना० मा।रनिले येऊन विनंति केली की माहाराज राजश्री——स्वामीच्या राज्यांत वतनदारीसमंधे कस्त मेहनत येकनिस्टेनें करित आलों पुढेंही करीत आहों याकरितां तिजाई न घ्यावी माफ करावी ह्मणून तरी मनास आणितां राज्यांत कस्त मेहनत वतनदारीसमंधे करितां दिवाण कार्यास हरयेकविषयीं अंतर * करीत नाहीं या करितां मौजे मा।रची तिजाई माफ केली असे वसूल तुह्मीं घेत जाणें साल दरसाल माफ केली असे जाणिजे छ ४ जिल्हेज मो. ३

टीप—विठोजी शिरके यांस यासंबंधानें गेलेल्या आज्ञापत्रांत " अंतर " या शब्दाबद्दल " अंतराय " हा शब्द आहे.

ले० १५६

श्री

[अ.] रा. अंतोवा ना. सरदेसाई मा. प्रभावली व दाभोल गो. यांसी ता. १६।८।१७२४

सेवक कृष्णाजी परशराम प्रतिनिधि न. सु.॥ ११२५ तुह्मीं हुजुर विशालगडचे मुकामीं येऊन विनंति केली कीं आपण वतनसमधें येकनिष्टेनें सेवा केली आहे यैसियास स्वामीनी कृपालु होऊन सगमेस्वर माहाली आपली इनामत आहे तिची तिजाई माफ करावी म्हणऊन त्यावरून तुम्ही वतनसमंधे सेवा येकनिष्टेने केली आहे याकरितां तुमची इनामत जमीन सगमेस्वर माहाली आहे त्याची तिजाई साल दरसाल माफ केली असे वसुलाचा तगादा लागणार नाहीं जा० छ ७ जिल्हेज पा। हुजुर मो. २६।३०

ले० १५७

श्री

रा. आपाजी चिमणाजी [ना. का.] प्रांत मलकापुर गो. यांसी ता. ११।१०।१७२४

छ [अ.]——स्नें॥ कृष्णाजी परशराम प्रतिनिधि आशीर्वाद व आ॥ न० सु॥ ११२५ रा. अंतोवा ना. सरदेशाई प्रांत राजापुर व दाभोल यांचें सरदेशमुखीचें वतन ता। मलकापुरचें पुरातन आहे त्याप्रभाणें रा.—— छत्रपति स्वामीनी कृपालु होऊन करार करून आज्ञापत्रें सादर केलीं आहेत आह्मांस ही आ० सादर आहे त्यावरून हें पत्र तुम्हांस सादर केलें आहे तरी रा. स्वामीनी हुजुरून ता। मा।रचें वतन अंतोवा ना. यांस करार करून दिल्याप्रमाणें सुरलीत चालवीत जाणें जा. छ ४ सफर पा। हुजुर मो० २७.

ले० १५८

श्री

[अ.] आपाजी विश्वनाथ नामजाद प्रा। महिमतगड यांसी ता. ८।११।१७२४

सेवक श्रीनिवास परशराम प्रतिनिधि न. सु.॥ ११२५ दादोवा ना. सरदेसाई प्रां। राजापुर व दाभोल याणी हुजुर विदित केले की मौजे चिंच. घर ता। खेड आपणास इनाम पेसजीपासून आहे त्याप्रा। चालवावे म्हणोन त्यावरून तुह्मांस आज्ञापत्र सादर केले असे तरी मौजे मजकूर सालाबाद चालत आले असेल त्याप्रा। चालवणे जा. छ २ रविलौवल मो० ६

ले.१५९ शि.५१ श्री ता. ३०।१२।१७२४

रा. माहादाजी हरी ना. का. ताा संगमेस्वर गों

[अ.] सेवक जगजीवन परशराम न. सु.॥ ११२५ रा. अतोवा ना. सरदेसाई मा. प्रभावली याची पडजमीन ताा मजकुरीं व कोंडिवरें माहाली आहे त्याची इनामतिजाई माफ करावी म्हणोन ना. माारनुले याणी हुजुर येऊन विनंति केली त्यावरून याचे चालविणे हे परम अवश्यक जाणोन पड जमिनीची इनामतिजाई माफ केली असे सालमजकुरापासून साल दरसाल चालवणे प्रतिवर्षी [क.] [ब. (सरदेसाई)] जा. छ २४ रबिलाखर पाा हुजुर मो. अष्टकोनी—लेख । नसी । मा.

ले०१६० (तालीक) श्री ता.२३।६।१७२५

आ.[स.] श्रीनिवास परशराम प्रतिनिधि ताहां कमावीसदार मौजे धामापुर ताा संगमेस्वर सु॥ ११२६ सरदेसाई मा. प्रभावली व दाभोल व देसाई ताा मजकूर यांस मौजे मजकुर इनाम आहे तेथील इनामतिजाई वसूल हुजुर पडतो याबद्दल रा. अतोवा ना. सरदेशमुख मा. मजकूर यांणी हुजुर येऊन विनति केली जे स्वामीने कृपाळु होऊन तिजाई माफ केली पाहिजे त्याजवरून मनास आणितां यास वतनसमंधे सेवा पडत्ये याकरितां याजवर मेहरवान होऊन मौजे मजकूरची तिजाई याजकडे देविली असे तरी देखील-तिजाई सरदेशमुख माारनिले याजकडे वसूल देत जाणें प्रतिवर्षी [क.] [ब.] छ २२ सवाल

टीपः— संगमेश्वर तााच्या अधिकाऱ्यांस वेगळा हु॥ गेला आहे.

ले. १६१ (तालीक) श्री ता. २४।८।१७२५

[स्व.] ५२ विश्वावसु नाम संवत्सरे श्रावण बहुल त्रयोदसी भौमवासरे [क्ष. (शंभु) ([स.] भगवंतराव अमात्य हुकुमतपन्हा)] रा. केसोवा ना. बिन गणोवा ना. यांस ताा असंडोली येथील सरदेशमुखीचे वतन करार करून देऊन सनदा आलाहिदा सादर केल्या आहेत तरी तुह्मीं ताा

मजकूरचे सरदेशमुखीचे वतन आलाहिदा सनदपत्राप्रमाणें चालवीत जाणें बहुत काय लिहिणें तरी सुज्ञ असां

टीप—रा. रा. माहादाजी अनंत (सुभेदार) व मामल्याचे देसक यांस निराळीं आज्ञापत्रें गेलीं आहेत.

ले. १६२　　　　　श्री　　　　　ता। ३१।८।१७२५

[स्व.] ५२ विश्वावसु नाम संवछरे भाद्रपद शुध्द पंचमी भौमवासरे [क्ष. (शंभु) (रा. रा. सुंदर विझाजी)] रा. अंतोवा ना. सरदेसाई मा. प्रभावली व मा. दाभोल हे वतनदार येकनिष्ट ता। संगमेस्वर येथील लावणीसंचणीबदल रा. कान्होजी आंगरे सरखेल याणी तुह्मांस पाठविलें आहे ता। मा।र येथील देशमुखी व सरदेशमुखी वतन यांचे त्यास यांचे देशमुखीचा व सरदेशमुखीचा हक व इनाम गांव व लाजिमा बाजे बाब पूर्वापरप्रमाणें चालवीत जाणें हे वतनदार निष्टेने वर्ततात यांचे स्वामीस अगत्य यास्तव हें आज्ञापत्र सादर केलें असे तरी सदरहूप्रो। वतनाचा अमल सुरलीत चाले ते गोस्ट करणें जाणिजे बहुत काय लिहिणे मो. २२

ले० १६३ (तालीक)　　　　　श्री　　　　　ता० १७।१२।१७२५.

अज दिवाण किले पनाला तां मोकादमानी देहाये—

१ असंडोली १ आकुर्डे १ हर्पवणे १ कोदवणे १ वेतवडे खु।। १ पासरडे १ आंबर्डे १ उपवडें १ सांवर्डे १ वेतवडे बु।। १ सैतवडे १ तांदुलवाडी १ आसलजे १ लखमापुर १ नरवेली १ खोकुरले १ तलिये १ किरवे १ गोगवे १ कोदें खु।। १ कोदें बु।। १ गावसी १ मणनुर १ राही ‿—तर्फ असंडोली प्रां तारले

१ आरूल १ कोपर्डे १ येलाणे १ ससेगाव १ चनवड १ कोलगाव १ आवली १ सावर्डी १ मरले १ पडसाली ‿—तर्फ मलकापुर प्रांत मजकूर सु।। ११२६ बा।। आज्ञापत्र माहाराज रा०—छत्रपतिस्वामी व रा०—पंत अमात्य तेथे आज्ञा जे रा० गणोवा ना० व दादोवा ना० व

अंतोवा ना. व विसोवा ना० सरदेसाई मा. प्रभावली व मा. दाभोल यानी स्वामीसन्निध विनंति केली जे आपलें वतन सरदेसमुखीचे पुरातन दोनी मामलेचे यापैकी ता। असंडोली व ता। मलकापुर हे दोनी माहाल वरघाटे येथील भोगवटा साप्रंत चालत नाही त्यास स्वामीनी कृपालु होऊन दोनी माहालचे वतन पूर्वापारप्रों चालवावया आज्ञा करून वतनावर स्थापना करावी म्हणोन त्यावरून स्वामीनी मनास आणून पूर्वापार वतन याचे खरे-खुरे जाणोन आलाहिदा पत्रे करून दिली आहेत त्याप्रों तुम्हीं किलाकडील तनखेयास गांव आहेत तेथील याचे वतनी अमल सुरलीत चालवणे म्हणोन आज्ञेप्रमाणे हे मिसल सादर केली असे तरी तुम्हीं रा० केशव ना० विन गणोवा ना० यास सरदेशमुखीचे वतन यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरं-परेने पूर्वापार चालिलेप्रो राजपत्राप्रों चालवीत जाणे हे मिसलीचे तालीक लेहून घेऊन असल मिसल परतोन देणे साल दर साल ताजे सनदेचा उजूर न करणे जा० छ २२ रबिलाखर

टीप—मूळचे दोन तर्फांचे दोन वेगळे हु॥ येथें एकत्र केले आहेत.—सं.

ले०१६४ (तालीक) श्री ता। ९।१।१७२६.

आ० [स०] कृष्णाजी परशराम प्रतिनिधि तां मोकादमानी

(१) मौजे गजापुर (२) मौजे सेंबवणें ता। मलकापुर

सु॥ ११२६ रा० अंतोवा ना० सरदेसाई मा० प्रभावली यासी देहे ४१ ता। मलकापुर येथील सरदेशमुखीच्या वतनास इनाम जमीन मौजे (प्रत्येकीं) मजकुरी विघे ८१०।• दाहा बिघे पाव पांड पेशजी देविली आहे त्याचे चतुःसीमेचे पत्र रा० नीलकंठ बलाल याचे आहे त्याप्रों करार केली असे यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवीत जाणे नवीन पत्राची आक्षेप न करणे [ब०] जा० छ १६ जमादिलाखर

टीप—येथें हि मूळच्या दोन वेगळ्या आज्ञांचें एकीकरण केलें आहे.—सं.

ले०१६५ शि०१९. श्री ता० ९।१।१७२६.

आ० [स०] कृष्णाजी परशराम प्रतिनिधि तां डांगी व पतकी जकायेत वरघांट आंबा ता। मलकापुर सु।। ११२६ रा० अंतोबा ना० सरदेसाई मा० प्रभावली याणी हुजुर विनंति केली कीं मलकापुर ता।चे येकेचालीस गांवचें सरदेशमुखीचें वतन आपलें त्यास जकातीस हक दर बैलीं रुके ८२ दोन पेसजीं स्वामीनी करार करून दिलें आहे त्याप्रा। चालत नाहीं याकरितां हाली स्वामीनी दयाळु होऊन आपलें हक जकात ॰ ॰री सुरलीत चाले तें करावें म्हणोन त्यावरून मनास आणून हें आज्ञापत्र सादर केलें आहे तरी दोन रुके बैलीं हक मोईन करून दिली आहे त्याप्रा। चालवीत जाणें प्रतिवर्षी [क.][व.] जा. छ१६ जमादिलौवल पा। हुजुर मो०२९

ले०१६६ श्री ता० २४।१।१७२६.

श्रीमंत मातुश्री राजसबाईसाहेब यांणी कमाविसदार व लोकानीं जकायत माहाल ता। असडोली यांसी सु।। ११२६ रा० केशव ना० सरदेसाई मा० प्रभानवली यांचें पुरातनं ता। मजकूरचे सरदेशमुखीचे वतन ता। मजकुरी चालत होते त्याप्रमाणें करार करून देऊन हुजुरून राजपत्रें सादर जाहली आहेत त्याप्रमाणें जकायतीचा विस्वा हक जो काय राजपत्री लिहिल्याप्रमाणें म।।रनिलेंकडे सुरलीत चालवीत जाणें उजूर न करणें बोभाट येऊ न देणें जाणिजें छ १ माहे जमादिलाकर लेखनसीमा मो० ३१

ले.१६७ शिक्का २१ श्री ता. १२।६।१७२६

आ.[स.] श्रीनिवास परशराम प्रतिनिधि ताहां कमाविसदार मौजे धामापुर ता। संगमेस्वर सु।। ११२६ सरदेसाई मा. प्रभावली व मा. दाभोल व देसाई ता। मजकूर यांसी मौजे मजकूर इनाम आहे तेथील इनामतिजाई वसूल हुजुर पडतो याबदल रा। अंतोवा ना. सरदेशमुख मा० मजकूर यांणी हुजुर येऊन विनंति केली जे स्वामीने कृपाळु होऊनु तिजाई माफ केली पाहिजे त्यावरून मनास आणितां यांस वतनसमधे सेवा पडते

याकरितां यांजवर मेहरवान होऊन मौजे मजकूरची तिजाई याजकडे देविली आसे तर देखील तिजाई सरदेशमुख मजकूर याजकडे वसूल देत जाणे प्रतिवर्षी [क.] [व.] छ २२ सवाल मो. ८.

टीप:—करवीर प्रतिनिधींचा या बाबतीचा हु॥ ता. २९।५।१७२५ चा पूर्वी दिला आहे..

ले० १६८ श्री ता. ७।८।१७२६

[अ.]अंतोवा ना. सरदेसाई मा. प्रभावली व दाभोल गो. यांसी

सेवक श्रीनिवास परशराम प्रतिनिधि न० सु॥ ११२७ तुम्ही पत्र पाठविलें ते प्रविष्ट जालें किलेक स्वकीये अर्थ लिहिला तो अवगत जाहाला ऐसियास तुह्मीं पदरीचेच आहां तुमची स्थापना होऊन चाले ती गोष्टी केली जाईल येविसी समाधान असो देणें निंबे व फणसपोली पाठविली ते प्रविष्ट जाली छ १९ जिल्हेज निदेश समक्ष मो० ६.

ले १६९ श्री ता. ११।९।१७२६

रा. रा. रामराऊ बाबाजी मुतालीक अमात्य यांसी श्रीमंत मातुश्री राजसबाईसाहेब उपरी सु॥ ११२७ रा. आंतावा ना. सरदेसाई मा० प्रभावली हुजुर येऊन यांणी आपणांकडील इनामगांव व गांवगंना इनामती च बाग आहे त्याचे तिजाई आपल्यास माफ करावी ह्मणून विनंती केली अशास हे राज्यांतील वतनदार प्रमाणिकपणे येकरूप निष्टेने वर्तत आहेत यांचे चालवणे साहेबांस व चिरंजीव राजश्रीस हि आवस्यक आहे याकरितां साहेब यांजवरी कृपाळु होऊन यांच्या इनामाची तिजाई यांस माफ केली आहे —

ता। संगमेस्वर माहालीं इनाम

१ मौजे धामापुर गांव

१ गांवगंना ता। मा।रीं इनामत आहे

२

ता। पांवस या माहालीं मौजे कोंल्बे या गांवीं याचे बाग इनाम आहे १

येकून संगमेस्वर माहालीं गांव येक व गांवगना इनामत आहे व ता। पांवस मौजे कोलंबे या गांवीं बाग याप्रमाणें यांचा इनाम चालत आहे त्याची तिजाईच्या वसुलच्या तगादा मा।रनिलेस करीत नव जाणे छ २५ माहे मोहरम बहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा मो० ३१

टीप—कोंड असुडें व कुंभारखाणी या दोन इनाम गांवांबद्दल सदरप्रमाणें च आज्ञापत्र छ २७ मोहरम (ता. १३।९।१७२६)चें वेगळें गेलें आहे.

ले० १७० (तालीक) श्री ता० १३।९।१७२६

रा. गंगाधर कृष्ण यांसी—

श्रीमंत मातुश्री राजसबाईसाहेब उपरी तुम्हीं आपणाकडील कुशल वर्तमान लिहित जाणे यानंतर रा. केशव ना. सरदेसाई मा. प्रभानवली यांचे सरदेशमुखीचे वतनी माहाल ता। मलकापुर व ता। असडोली या दोही माहाली भोगवटा बहुत दिवस चालत नव्हता याकरितां हुजुर विनंति केली तेव्हां चिरंजीव राजश्रींनी दोनी माहालाचे सरदेशमुखीचे वतन देऊन पत्रें पेशजी दिल्ही आहेत यैशास हे वतनदार प्रमाणिक यांचे चालवणे अवश्यक याजकरितां हे पत्र तुह्मांस सादर केले आहे तरी तुम्हीं मलकापुर माहालचे सरदेशमुखी वतनास हक व इनाम लाजिमा राजपत्राप्रों चालवावयाविसी माहाली रा. कृष्णाजी भास्कर व देशसरमुकादमास पत्र देऊन ताकीद करून यांचा वतनाचा अंमल सुरलीत चाले ते करणे छ २७ माहे मोहरम बहुत काय लिहिणे तरी तुह्मीं सुज्ञ असां

ले० १७१ श्री ता. १३।९।१७२६

श्रीमन्मातुश्री राजसबाईसाहेब यांणी गौली व धणगरमाहाल ता। मलकापुर व असडोली यांसी सु॥ ११२७ रा. अंतोबा ना. सरदेसाई मा. प्रभावली यांचे सरदेशमुखीचे वतन ता। मजकुरी आहे यांच्या वतनास हक लवाजिमा तुम्हाकडील सुरलीत त्यास देत जाणे उजूर न करणे छ २७ मोहरम लेखन सीमा (मो. ३१)

ले. १७२ श्री सन १७२६

रा. केदारजी देसाई व रा. नरसीपंत देशकुलकर्णी
ता। असडोली गो० यांसि———

छ [अ०] स्नो। अतोबा नायक व केशव नायक सरदेसाई मा० प्रभानवली व दाभोल आसीर्वाद व नमस्कार विनंति उ० [ये०] वि० ता। मारचे सरदेशमुखिचें वतन पुरातन आमचें आहे तुम्हास हि ठावकेच आहे साप्रत धामधुमेच्या प्रसंगामुळें वलवटा राहिला त्यास राजश्री——स्वामींचे सेवेसी वतनाचे वर्तमान व आम्हापासीं पत्रें होती तें दाखऊन विनंति केली त्यावरून रा०——स्वामि कृपाळु होऊन जीर्णोधार करून नूतन पत्रें करून दिल्हीं आहेत अशास तुम्ही आम्हीं वतनभाऊ पुरातन आहों तदनरूप पुढें चालवणे हे सर्वप्रकारें तुम्हास अगत्य उचित च आहे रा.——स्वामीची व रा०——पंत अमात्य स्वामीची किलाची वरकड पत्रें देऊन रा० येसाजी रंगनाथ तुम्हाकडे पाठविले आहेत तरी तुम्ही सर्व प्रकारें साहित्य करून हक व लवाजिमा पुरातनप्रमाणे सुरलीत चाले तो अर्थ करणे [बंदाच्या अखेरची सबंध ओळ न समजे इतकी फाटून गेली आहे व पुढें बंद उलटून मजकूर लिहिला असल्यानें तेथील पहिल्या ओळीची तीच दशा झाल्यानें या दोन ओळींचा मजकूर सुटला आहे—सं०] श गोष्ट साप्रत वलवटा मा००० बसऊन देऊन वतनीं अमल सुरलीत चालोन तुमचे पदरी यश पडे ते करणे येविसी बहुत काय लिहिणे

मो० पिंपळपानी— लेखना। वधी वि। राजीत।

ले.१७३ शि०२१ श्री रविवार ता० १७।११।१७२८

रा. देशाधिकारी व लेखक व. भा. प्रांत राजापुर यांसी

[अ०]——सेवक श्रीनिवास परशराम प्रतिनिधि न० सु॥ ११२९ रा. प्रऱ्हाद ना. सरदेसाई मा. राजापुर व दाभोल याचे चालवणे अवशक याकरितां मौजे ओझरें बु॥ ता। देवरुख हा गाव इनाम कुलबाब कुल-कानु देखील तिजाई इनाम दिल्हा असे याचे दुमाला करून पुत्रपौत्रादि

वंशपरंपरेने इनाम चाल(वि)णे प्रतिवर्षे [क०] [व०] छ २५ राखर निदेश समक्ष मो. ८

ले.१७४ (तालीक) श्री शुक्रवार ता०६।१२।१७२८

[स्व०] ५५ कीलक नाम संवत्सरे मार्गसीर्ष बहुल प्रतिपदा भृगुवासरे [क्ष०(शंभु) ([स०] कान्होजी आंगरे सरखेल)] रा. दादोबा ना० व अंतोबा ना० व प्रल्हाद ना० सरदेसाई मा० प्रभानवली व दाभोल हे पुरातन वतनदार स्वामीच्या राज्यात येकनिष्ठपणे सेवा करून आहेत याचें चालवणे हें स्वामीस अवश्यक आहे यैसियास मा० मजकूरपैकी तुम्हांकडेस माहाल कमाविसीस आहेत तेथील हक व लाजिमा व इनामत व इसाफत व कानुबाबा पूर्वापार चालिले आहे यैसे असतां हाली सुरलीत पावत नाही म्हणोन हुजुर विदित जाहाले त्यावरून हे आज्ञापत्र तुम्हांस सादर केले असे तरी मा० मजकुरीचे माहाल तुम्हांकडे कमाविसीस असतील तेथे ता०००न सरदेसाई मारनिले याचा हक व लाजिमा व इ०००सुरलीत पावे ते गोष्ट करणे मारनिलेचे सर्वविसी (सर्वस्वी) स्वामीस अगत्य आहे यांच्या अमलास कांहीं येक खलेल होऊ न देणे बहुत लिहिणे तर सुज्ञ असा——————

ले. १७५ श्री शुक्रवार ता. २८।८।१७२९

[अ०] रा० निलो माहादेव गो० यांसी

सेवक भगवंतराव रामचंद्र अमात्य न० सु॥ ११३० मौजे धामापुर हा गाव रा॥ दादोबा ना० सरदेसाई यास इनाम असे त्यास इकडील यैवज येणे तो त्यास देविला आसे तुम्ही वसुलाचा तगादा न लावणे वरातदार पाठविले असतील ते मना करणे छ १४ सफर मो.१२

ले. १७६ (तालीक) श्री ता. २६।१०।१७२९

[स्व०] ५६ सौम्य नाम संवत्सरे कार्तिक बहुल बहुल प्रतिपदा रवि-

वासरे [क्ष० (शंभु) (रा. रा. गोपाळ रामराव मुतालिकअमात्य)] रा. दादोबा ना० व अंतोबा ना० व ...... ना० यास पहिले पासून गांव व कोंड व जमीन इनाम आहे बि ता।।

मौजे धामापुर१ मौजे असुर्डे१ मौजे कुंभारखाणी खुर्द१ मौजे वेसराड१ बाग मौजे कोलवे ता। पांवस १ इनामत पडजमीन गावगंना ता। संगमेश्वर१

याप्रमाणे गांव च्यार व बाग ...... व जमीन कुलबाव कुलकानु चालत आहे यैसियासी तेथे तिजाईचा व हरयेकविसीचा उपसर्ग न देणे याचे सर्वप्रकारे स्वामीस अगत्य जाणून काही उपद्र. न देणे बहुत लिहिणे सुज्ञ असां मोर्तब अष्टपैलु असे

ले. १७७ (शि. २१) श्री ता. २५।३।१७३०

रा० सेखोजी आंगरे सरखेल गो० यांस

छ [स०] [अ०]——स्नों श्रीनिवास परशराम प्रतिनिधि आसीर्वाद विनंति [ये०] वि० रा० दादोबा ना० सरदेसाई प्रा। दाभोल राजापुर याचा पुरातन इनाम गाव मौजे चिचघर ता। खेड हा गाव इकडून व शामलाकडून चालत च आहे आपले दर्शनास रा। दादोबा ना० गेले होते चवथाईचा यैवज आपण त्या गावचा वसूल घेत होते त्यांही आपल्यास भेटल्याउपरी दूर जाला च असेल त्या गावी आपल्याकडील लोक सेते करुन सनदा घेतात त्यामुळें तेथील यैवजास खलेल पडते अशास वतनदार पुरातन त्याचा इनाम गाव तेथ सेतसनदा घ्यावी ऐसे नाहीं सेतसनदा इकडून दूर केल्या आहेत आपण हि दूर करून इनामगाव सुरक्षित चाले ते गोष्ट केली पाहिजे छ १६ शाबान बहुत लिहिणें तरी सुज्ञ असां मो. ६

ले. १७८ (नक्कल) हू ता। ३।६।१७३०

बजानबे आमिलाने हाल व इस्तकबाल व देशमुखान व देशपांडियान व मुकादमान व जमीअ जमीदारान व रयान मामले बंदर मैमूने मुस्तफाबाद ऊर्फ दाभोल व मा० मुजाफराबाद ऊर्फ प्रभावली सरकार तलको-

कण आदिलखानी मिनमजाफ सुबे दारुलजफर बीजापुर तालुके किले महरूसे कोट जंजीरे दंडाराजपुरी बिह्यानंब के सु।। सन ११३१ आं के मशहूरुल अंनाम दादोबा ना. बिन रंगोबा ना. सरदेशाई सुबैन. म. याही हुजूर इलतिमास केला कीं सुबैन मजकूरचे सरदेशमुखीचे वतन कदीम पूर्वापार आपले आहे त्याचा आवलपासून पिढी दर पिढी भोगवटा चालत आला असे येसियासी आपले सरदेशमुखीचें वतनास हकलवाजिमे कदीम मोजीब चालवावयास भोगवटियाबद्दल खुर्दखत मऱ्हामत केले पाहिजे ह्मणून इलतिमांस केला त्यावरून खातरेस आणितां सरदेसाई मशारानिले सुबैन मजकूरचें सरदेशमुखी वतनवर कदीमुल्यैयाम पादशाही फरमानी आहेत याचे सरदेशमुखीचे वतनाची मातकदीम पुस्त दर पुस्त भोगवटा हि चालत आला असे आणि सरदेसाई मशारंनिले वतनदारीचे तरिकेयानें येकसानपणें सरकारी रुजू राहोन कितेक सरकार कामाचे तरतुदीमध्यें असोन सरकारची खैरख्वाही व दौलततरकीच्या दोन वतनदारीचे पेशयाने चाकरी करून मेहनत बहुत केली असे आजी सबब सरदेसाई मशारनिलेचे कदीमीवर व येकसानीवर नजर देऊन सरदेसाई मशारनिलेचे सुबैन मजकूर सरदेशमुखीचे वतनास हक व लाजिमे कदीम चालत होते ते. मोजिब चालवावे दुरुस्त असे अमा फिलहाल चहूकडून गर्गशामुले मुलकाची वैरानियेत होऊन जुजवी वसाहत राहोन रयत नादार पडिली असे याबद्दल रयेतीचे नादारीवर नजर देऊन मशारनिलेचे वतनास पातशाही फरमाने देखोन हाली हक व लवाजिमे करार करून भोगवटा जारी चालवावयाबाबे मुकरर करून हुकूम फर्मांविला असे कलमे बी तपसील

(पुढील सर्व तपशील मार्गे ले० ता. १८।१०।१७२० यांत जो आहे तोच असल्यानें तो पुनः येथें दिला नाहीं – सं०)

येणंप्रो हक व लाजिमे करार करून दिल्हे असे तर खुद ना. मशारनिले व यांचे वडेभाऊ गणोबा ना. व तिसरे भाई विसोबा ना. व नने भाई अंतोबा ना. यांचे हातीन वतनाची खिजमत सी० मोजिब पिढी दर पिढी सुदामदप्रमाणें घेत जाणे आण सदहूंमोजिब सरदेसाई मशारानिलेचे

सरदेशमुखीचे वतनास हक व लाजिमे देऊन इनाम इसाफत सुदामद चालिले असे त्याप्रो। चालऊन सदरहू वतनीसमंध पान मान व कानु-कवाइत दस्तुरमोजिब देत जाणें सदरहूमोजिब सरदेसाई मशारनिले आपले सरदेशमुखीचे वतनाचा उपभोग करितील त्याचा सदरहूमोजिब भोगवटा जारी चालऊन बऔलाद व अफलाद चालवीत जाणें हर साल [क] दरीबाब ताकीद समजोन इस्बुलमस्तुर अमलांत आणणें [ब] प्रा। हुजूर रा। खुश मा। जबानी खुद छ २७ माहे जिल्काद सन १३ जुलूस महमदशाही

लेखांक१७९ शि.२१ श्री. ता.१६ जून १७३०

रा. सेखोजी आंगरे सरखेल गो. यांसी

[स०] [अ०]– स्नों श्रीनिवास परशराम प्रतिनिधि आसीर्वाद विनंति उ० [ये०] वि. रा. प्रहराद नाईक सरदेसाई मा. प्रभावली व दाभोल हे हुजूर राजश्री—स्वामीसंनिध सेवा करितात व रा. दादोबा नायेक सरदेसाई मा. मजकूर हेहि हुजुर येऊन हाजीर जाले ऐसियासी यांच्या हकलवाजिमा व इनामतीस गोसावी यांकडून खलेल जाहाली आहे म्हणऊन विदित जालें तरी हे हुजुर या राज्यांत दखल नसते तरी यांच्या वतनास खलेल करावी हे उचितच होते परंतु हे दाखल होऊन स्वामीसं-निध सेवा करितात ऐसे असतां याच्या वतनास खलेल करावी ऐसे नाही हे पुरातन वतनदार हे आपल्यास हि अवगत च आहे यांचे हरयेकाविसी अगत्य धरून चालवावे हे विहित आहे याउपरी गोसावी यानी आपल्या-कडील कमाविसदारास ताकीद करून मामले मजकुरचे हक व लवाजिमा इनामती सुरलीत पेसजीपासून भोगवटा आहे त्याप्रमाणें यांस प्रविष्ट होये ते गोष्टी करणे जाणिजे छ१०जिल्हेज बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा मो. ६

लेखांक १८० शि. ३० श्री. ता. ३० जून १७३०

रा. सेखोजी आंगरे सरखेल गो० यांसी

[स०][अ]–स्नो बाजीराऊ बलाल प्रधान असीर्वाद विनंति उ०[ये०] वि.

रा० दादोबा नाईक सरदेसाई मा०प्रभावली व सुभा दाभोल हे प्रस्तुत राजदर्शनास आले होते आमची हि भेट जाहालियावरी याचे वर्तमान श्रुत जाहले की याणी येकजणांनी आपणांजवल येऊन सेवा करावी आणि याचे देशमुखीचे गाव आपल्या तालुकियांत आहेत तेथील हक घेत जावा यैसे गोसावी यांच्या चितांत येऊन देशमुखीच्या हकास खलेल होतो यैसियास मा॥निले तों हवसी याजवल असतात व यांचे बंधु अंतोवा नाईक विशालगडी आहेत तेथून; त्याचे निघणे होणे दूरतोपास्त याचे पुतणे रा॥ प्रल्हाद नाईक हे हुजुर राजश्री—स्वामीचे सेवेमध्यें आहेत यामुलें कोणास यावयास अनकूल पडत नाही त्यास प्रल्हाद नाईक येथें हुजुर राजश्री—समीप आहेत ते गोसावी याजवलच आहेत याचा कोण्ही येक येऊन चाकरी करावी यैसेंच चितांत आणून हकास इस्कील करावी यैसा विचार नाही काय निमित्य कीं कैलासवासी कान्होजी आंगरे काका यानी याचा अगत्यवाद चितांत आणून यांचेठाई निष्ठुरता किमपि केली नाही तदान्वयें आपणहि यांचेठाई ममता धरून चालत्या प्रसंगास कांही अडथळा न करावा हें विहित आंहे दुसरी गोष्ट याचे आह्मास अगत्य आहे यास्तव आपणांस पत्रलेख केला आहे तरी याचेविसी कांही निष्ठुरता मनांत न आणितां देशमुखीच्या हकास अडथळा न होये ते करावे सारांश हे आपणा-खेरीज आहेत यैसा अर्थ नाहीं पूर्वापार याचा हक चालत आला आहे तदनुरूप सुरळीत चालऊन हरयेकविसी यांचे चालविले पाहिजे जाणिजे रा॥ छ २४जिल्हेज बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंति मो० ११

ले. १८१ (तालीक) श्री ता ५।७।१७३०

[रा.] आपाजी विस्वनाथ नामजाद प्रा॥ महिमतगड गो० यांसी सेवक अंताजी सिवदेव सरसुभेदार प्रा॥ जाऊली व व्याघ्रगड न० सु॥ ११३१ रा० प्रल्हाद ना० बिन गणोबा ना० सरदेसाई सुभा मा० दाभोल प्रांत राजापुर याणीं सरसुभा येऊन विनंति केली यैसी जे आपण या राज्यातील येकनिष्ट सेवक निष्टेने सेवा करीत आहो यांकारिता रा.—

पंत प्रतिनिधि स्वामीनी आपणांस मौ० चिंचघर ता खेड हा गांव सरकारतर्फेने कुलबाब कुलकानु वंशपरंपरेने इनाम करून दिल्हा आहे त्याप्रो। सरसुभाहून इनामपत्र दिल्हे पाहिजे म्हणोन विनंति केली त्यावरून रा.——पंत प्रतिनिधि स्वामीची इनामपत्रें मनास आणून तुम्हांस हे पत्र सादर केले आहे तरी मौ० म० सरकारतर्फेने कुलबाब कुलकानु वंशपरंपरेने इनाम चालवणे प्रतिवर्शी [क०] [ब०] वेठी बेगार फड फर्मास मौ० मजकुरास येकंदर उपसर्ग न देणे जा० छ २ मोहरम

ले. १८२ श्री शनवार ता. ११ जुलै १७३०

[स्व०] ५७ साधारण नाम संवत्सरे श्रावण शुध सप्तमी मंदवासर [क्ष०(शंभु)(रा. रा. संभाजी आंगरे सरसुभेदार आरमार)] रा. दादोवा ना. व अंतोवा ना० बिन रंगोवा ना० सरदेसाई मा० प्रभानवली व दाभोल यांही व यांचे वडील बंधु रा. गणोवा नायक होते त्याही पूर्वीपासून स्वामीच्या राज्यांत येकनिष्टेने वर्तणुक करून वतनसमधें सेवा केली आहे हाली रा. अंतोवा ना० सरदेसाई किले विशालगडी रा० कृष्णाजी पंडित प्रतिनिधि यांजपासी वतनाची सेवा करीत आहेत याचें चालवणें हे स्वामीस अगत्य आहे याजकरितां याचा वतनी अमल हक व लाजिमा कानु कवाईत व इनामत इसाफत पुरातन दंडकप्रमाणें सुरलीत राजापुर सुभा चालवीत जाणें कान्होवा नाईक तुम्हापासी आहेत त्यास वतनासी समध नसतां च्यार माहालचें हक त्याजकडे द्यावें असें नाहीं हे पुरातन वतनदार प्रमाणिक यांणी राज्यांत श्रम साहास केले आहेत याचे वतन यासी सुरक्षित चालवावे ये गोष्टीचें स्वामीस परम अवश्यक जाणोन च्यार माहालचें व वरकड माहालचें व वरकड माहाल राजापुर सुभाचे आहेत तेथील हक लवाजिमा व कानु कवाईत इनामत इसाफत पुरातन दंडकप्रमाणें रा. अंतोवा ना० याजकडे सुरलीत चालवीत जाणे येविसी अंतर न करणे वहुत काय लिहिणें मो. ३२

लेखांक १८३

श्री शनवार ता० ११ जुलै १७३०

[स्व०] ५७ साधारण नाम सं० श्रावण शुध सप्तमी मंदवासर [क्ष० (शंभु) [स०] (सेखोजी आगरे)] रा० दादोवा ना० व अंतोवा ना० बिन रंगोवा ना० सरदेसाई मा० प्रभानवली व दाभोल याही व याचे वडील बंधु गणोवा नायक सरदेसाई होते त्यांही पूर्वीपासून स्वामीसंनिध निष्टेने वतनसमधें सेवा केली आहे अतोवा नायक सरदेसाई विशालगडी राजश्री कृष्णाजी पंडित प्रतिनिधि याजपासी वतनसंमधें सेवा करून आहेत याचें चालवणें स्वामीस अवश्यक यास्तव याचा वतनी अमल पुरातन दंडकप्रमाणें चालो द्यावें म्हणोन पहिलीं पत्रें सादर केली आहेत त्यास तुम्ही म्हणतां जे आपणाकडे येऊन रुजु जाल्यानें वतनी हक चालेल यैसे म्हणलां म्हणऊन हुजुर विदित जालें अशास दो सुभ्यापैकीं दाभोल सुभा हबसी याचे आहारीं आहे यास्तव दादोवा नायक सरदेसाई वतनसमधें हबसी याजवल सेवा करून आहेत म्हणऊन तुम्ही वतनास आक्षेप करावा असे नाहीं यांची सेवा तरी येक बंधु अतोवा नाईक आपला हक रयतेपासून घेतात म्हणोन त्याप्रमाणें तुम्ही घेता त्यामुळें हबसी हि घेतो यैसें रयतेस दुबार पडते यामुले रयेत श्रमी होत्ये हे गोष्ट उचित नव्हे सरदेसाई आपला हक घेतांत त्याप्रमाणें तुम्ही रयेतेपासून घेता तो घ्यावा असें नाहीं तुम्ही न घेतला म्हणजे हबसी हि घेणार नाहीं हे पुरातन वतनदार प्रमाणिक राज्यांत श्रम साहास करून येकरूप निष्टेने सेवा केली याचें स्वामीस अगत्य जाणोन तुम्ही आपणापासी यासी यावयाविसी अक्षेप कोण्हेविसी न करणें याचे हक लाजिमा कानुबाब इनामत इसाफत पूर्वापार दंडकप्रमाणें यांस व यांचें पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवीत जाणें येविसी अंतर होऊ न देणें जाणिजे बहुत लिहिणे तर तुम्हीं सुज्ञ असां मो० २२

ले. १८४ शि० ३०

श्री सोमवार ता. ३।८।१७३०

राजश्री सेखोजी आंगरे सरखेल गो० यांसि

छ [स०] [अ०]——स्नाौं कृष्णाजी परशराम प्रतिनिधि आशीर्वाद [ये०] वि० रा० दादोबा नाईक व अंतोबा नाईक सरदेसाई मा० प्रभावली व दाभोल यांहीं व यांचे जेष्ठ बंधु रा० गणोबा नाईक सरदेसाई होते त्यांहीं या राज्यामध्यें बहुत येकनिष्ठेनें सेवा वतनसमधें करून धण्याची कृपा संपादून घेतली दाभोल सुभा संपूर्ण हबसी याचे आहारीं पडिला तन्मुळें रा० दादोबा नाईक यांस त्याकडे जाऊन वतनसमंधे सेवाकर्तव्य जरूर जाहालें राजश्री अंतोबा नाईक विशाळगडीं आम्हांपासीं वतनी सेवा करून आहेत येैशास रा दादोबा नाईक नाईक यांचे निसबतीनें आपल्यापासीं कोणी नाहीं यास्तव त्यांच्या हकाचा वसूल दाभोल सुभां आपण घेतात तन्मुळें हबसी याचे हि तर्फेनें रयेतीस वसूल पडतो याखेरीज सरदेसाई यांकडून हि हकाचा तगादा होतो येणेंकरून रयेतीस उपसर्ग विशेषच होतो येैशास या त्रिवर्ग बंधूनी याच राज्यांत वतनी सेवा करीत आले प्रस्तुत अंतोबा नाईक तों इकडेच आहेत दादोबा नाईक यांस दाभोल सुभांमुळें तिकडे जाणें जाहालें तोच व्याक्षेप चितांत आणून यांचें न चालवावें यैसें नाहीं येविसीं राजश्री——स्वामीचें हि आज्ञापत्र आपल्यास सादर आहे तो अर्थ चितांत आणून आपल्याकडून दाभोल प्रांतें यांच्या हकाचा वसूल पडतो तो मना करून यांचें हक व लवाजिमा कानुबाब इनामत व इसाफत पूर्वापर चालिल्याप्रमाणें यांकडे सुधामत चाले ते गोष्टी केली पाहिजे आपल्याकडून सुरलीत चालिल्याउपरी हबसी यांकडून हि परभारा हकाचा वसूल रयेतीस पडणार नाहीं राजापुर प्रांतींचें हक रा. अंतोवा नाईक यांकडे सुरलीत पावत नाहीं तरी मारनिले आम्हांपासीं आहेत ते आपल्याचपासीं आहेत यैसें जाणोन तिकडील माहालांस ताकीद करून यांकडे हक लवाजिमा सुधामत पावे ते गोष्टी केली पाहिजे छ १ सफर बहुत लिहिणें तरी तुम्हीं सुज्ञ असा (मो० ३३)

ले. १८५ (तालीक) हू ता। २०।३।१७३१

बजानेब आमिलान हाल व इस्तिकबाल व देशकान ता। जाफराबाद सुभा

मा० दाभोल विदानंद सु॥ ११३१ आं के मशहूरुलअनाम दादोबा ना० वलद रंगोबा ना० सरदेसाई सुबे मजकूर व प्रांत राजापुर येहि हुजूर येऊन मौ० चिंचघर ताां खेड हा गांव आपला कदीमी इनामत वतनी आहे दरम्याने चंद मुदत आपली इनामत राहिली आहे हाली साहेब मेहरवान होऊन आपले कदीमीवर नजर देऊन मौ० मजकूर इनाम देऊन सर्फराज केले पाहिजे ह्मणोन इलतिमास व येबावे सुज्या अतशार सिदी साद सुभेदार सुभा मा. दाभोल व प्रांत राजापुर येहि हुजुर मासुमात केली कीं वतनदार मशारनले यांवर मेहरबान होऊन मौजे चिंचघर मौजा येक पेस्तर साल सन इसने सलासीना(११३२)पासून सरदेसाई मशारनिले यांस औलाद व अहफाद इनाम दिल्हा असे तर मौ. म.ची जमाबंदी जे सालीं जे होईल ते बेरीज नक्तबाब व गंला व वजन व सुमार सरकार तबसीम सरदेशाई याचे नांवें खर्च लिहित जाणें दर दर साल [क.] [ब.] व मौजे मजकूरची वेठ बेगार व ज्यहात फर्माइसीबाबे मुजाहिम ना होणे परमानगी हुजुर रसानगी दिलावर जवानी सूर्याजी सेलार अफराद रवाना छ २२ माहे रमजान सन १६ जुलूस मुताबिक सन ११४३ हिजरी.

ले० १८६ (तालिक) हू ता.४।४।१७३१.

बजानेब आमीलानी हाल इस्तिकबाल व देशकानी व देशपांडेयानी व ज्यमीअ ज्यमीदारानी व रिआयान परगणे वेसवी व परगणे केलसी ता॥ जाफराबाद सुभा मा. मैमून मुस्तफाबाद ऊर्फ दाभोल मिनमजाफ सुबे दारुजफर बीज्यापुर आदिलखानी ता॥ सरकार तलकोकण कोट जंजीरे दंडाराजपुरी बिदानंद सु॥ ११३१ आं के मशहूरुल अनाम दादोबा ना. वलद रंगोबा ना. सरदेसाई सुबे म० प्रांत राजापुर येहि हुजुर येऊन सुबे मजकुरचे सरदेशमुखीचे वतन आपले कदीम पिढी दर पिढी चालत आहे दरम्यानें चंद मुदत वतनाचा भोगवटा राहिला होता सबब आपले वतन चालवावयासी उमेदवार होऊन पेसजी सन अशरीनामध्ये हुजुर येऊन रुजू होऊन वतनाची हकीकत बिलकुल रोशन करून खुर्द खताबाबे अर्ज केला

यावर साहेब मेहरबान होऊन खातेरेस आणून आपले कदीमीवर नजर देऊन सुबे मजकूरचे सरदेशमुखीचे खुर्दखत छ २९ जमादिलाकरी सन आशरीनामध्यें मरामत केले आहे तेमोजिब वतनाचा भोगवटा सुबे मजकूरचें बाजे माहाली आपला चालत आहे आणि हरदू माहालीं आपला वतनाचा भोगवटा चालत नाही तरी हाली मेहरबान होऊन हरदू माहालची सरदेशमुखीची सनद हुजूरून देऊन सर्फराज केले पाहिजे म्हणोन आर्ज केला व सुज्या अलशार सिदी साद सुबेदार सुभा मा० दाभोल व सुभा प्रांत राजापुर येही मासुमात केली कीं नाईक मशारन्हुले कदीम वतनदार साहेबाचे कदमानजीक येकसान आहेत सुबे मजकूरपैकी हरदू माहाली वतन चालावयाचा भोगवटा राहिला आहे सनंद वतनाची देऊन सर्फराज केले पाहिजे म्हणोन मासुमात केली त्यावरून खातेरेस आणून सुबे मजकूरचे बाजे माहाली ना. मशारनिल्हेचे वतनाचा भोगवटा चालत आहे आणि हरदू माहाली याचे वतनाचा भोगवटा चालावयासी राहिला आहे तो चालता करावयाचा हुकुम फर्माविला जात असे तरी ना० मशारनिल्हे याचे सरदेशमुखीचे वतनास हक लाजिमा व इनामत व इसाफत कदीम चालत आले आहे तेमोजिब अवलाद व अफलाद चालवित जाणे दरसाल [क०] [ब०] परवानगी हुजुर रसानगी खुशमहमद जबानी अकुरसुल अफराद रवाना छ ७ माहे सवाल सन १३ जुलुस मुताबिक सन ११४३ हिजरी

ले. १८७ श्रीरामचंद्र शुक्रवार ता० २४ नवंबर १७३१

[रा०] रघुराव स्वामी गो० यांसि

सेवक भगवंतराऊ रामचंद्र आमात्य हुकुमत पन्हा नमस्कार सुहुर संन इसने सलासीन मया अलफ रा. अतोबा नाईक सरदेसाई मा० प्रभावली व दाभोल यांणी किंले गगनगडचे मुकामी हुजुर येऊन विनंति केली कीं रतनागिरीचे तर्फेचे घेण्याचें हक व गावगना बागा सेतें आहेत ते सुरलीत चालत नाही यैसियासी स्वामीनी कृपाळु होऊन वतनी प्रसंग सुरलीत

चाले ते गोष्टी केली पाहिजे म्हणून त्यावरून मनास आणिता देसाई पुरातन पदरींचे यांचे चालवणें अवश्यक याकरितां यांचे हक व इनाम वाग सेतें आहेत ते सुरलीत चालवीत जाणें बी तपसील——————

वाग सरदेसाई मौजे कोलंबे ताा पांवस हे तीर्थरूप राजश्री—पंती इनाम करून दिली आहे त्याप्रमाणें हालीं करार केली आसे तरी वाग सरदेसाई यांकडे सुरलीत चालवणें कलम १ घेऱ्याचे हक चालत नाहीं म्हणोन यांनीं विनंति केली [या पुढील १ ओळ फाटून गेली आहे–सं०] गावगनाचे घेऱ्या ००००० ला सुरलीत ताकीद करून साल दरसाल चालवणें——————कलम १

ताा सगमेश्वर
१ कोड असुर्डे इनाम चालत आहे त्याप्रमाणें करार केला असे तरी सुरलीत चालवणें——
१ गावगना इमानत पेसजीप्राा जमीन चालत आहे त्याप्रमाणें करार केली असे चालवणें
——
२
० लग

येणेंप्रमाणें मौजे कोलंबे व रत्नागिरीचे घेऱ्याचे हक व कोड असुर्डे व गावगना इनाम जमीन आहे त्याप्रमाणें साल दर साल सुरलीत चालवणें वसूल न घेणे जाणिजे छ १६ जमादिलाखर कृपा असो दीजे हे विनंति पाा हुजूर

ले० १८८ (तालीक) श्री ता० २६-९-१७३१

रा. तानाजीराऊ हरकरे हवालदार व कारकून किले महिमतगड गो० यांसी

छ (अ.)——स्नो आपाजी विस्वनाथ आसीर्वाद विनंति सुाा ११३२ किले मजकुरचे घेरेयाचे हक रा. दादोबा ना. सरदेसाई मा. दाभोल व प्रांत राजापुर यांचे हक हुजुरून द्यावयासी आज्ञा जाहाली आहे तरी मशारर्नुलेचे हक दर खंडीस रु.-।- पावला नक्तबाब दर रुपयास ८–आणा प्राा पावीत जाणे बहुत काय लिहिणे छ ५ रााकर हे विनंति

ले० १८९ श्री ता. —नवंबर १७३१

[रा.] अंतोबा नायेक स्वामी गो० यांसी

सेवक श्रीनिवास सिवदेव नमस्कार विनंति [ये.] वि. तुम्ही पत्र पाठविले प्राा जाले सारांश घेरियाचे हक व बाग कोलबे व कोड असुरडे विशी लिा तरी प्रस्तुत येथ० ० ० तवाईचा प्रसंग त्याहात्रा तेव्हा तुमच्या चितात यावा यैसे नाही तथाप तुमचा प्रसंग तो अवशक जाणोन बाग कोलबे व कोड असुरडे या दोनी पत्रे सिक्यानसी पाठविली आहेत पुढे उर्वरित कार्य तेंहि प्रसंगोचित घडोन येईल तुमच्या कार्यास अंतराय सर्वथा न होय बहुत लिहिणे तरी सुज्ञ आहां कृपा असो दीजे हे विनति—

ले० १९० (तालीक) श्री ता. २३।१।१७३२

आज्ञापत्र रा.———पंत प्रतिनिधि ताहां कमावीसदार व रयानी मौ. चिंचघर ताा खेड सुा ११३३ मौजे मजकुर रा. दादोबा ना. सरदेसाई यांचा इनामगांव पुरातन त्या गांवीं शामजी वलाल सेतें करून वसुलास खलेल करितां म्हणोन विदित जाहाले तरी सरदेशमुखांचा इनामगांव तेथे सेतसनद चालणार नाही पेशजी यांणी तेथे इनामाचे सेताचे सनदा दरम्याने घेतल्या आहेत त्या दूर केल्या असेत त्याचा वसूल सुरलीत सरदेशमुखांकडे देणे फिरोन बोभाट येऊ न देणे जा० छ ११ शाबान.

ले. १९१ श्री शनिवार, ता. ८।४।१७३२

किले पूर्णगड

सुहुरसन इसने सलासीन मया व अलफ अंतोवा नाईक सरदेसाई सरकार तर्फेस बेरुजुवात असोन विशालगडी होते ते येऊन हुजुर रुजुवात जाहले मुलकांत जावे यावे याविसीं अर्ज केला त्याजवरून यांसीं फिरा- वयाची आज्ञा केली असे यांसी सुखरूपपणें मुलकात जाऊ येऊ देणे कोणे येक गोष्टीविसी मुजाहिक न होणे जाणिजे राा छ २३ शौवल मो. ३४.

ले.१९२ शि.३२ श्री शनवार ता.१७।६।१७३२

आ. [स०] सेंखोजी आंगरे सरखेल ता। खोतानी व मुकदमानी व रयानी सुभा प्रांत दाभोल सु॥ ११३३ रा॥ दादोबा ना० सरदेसाई सुभे मा॥र यांणी हुजुर कुलाबांचे मुकामी येऊन अर्ज केला जे सुभे मा॥रचें सरदेशमुखीचें वतन आपलें पुरातन आहे आपण गैरहाजीर सबब आपली वतनदारी सरकार तर्फेन चालत नाही हक लाजिमा सरकारांत घेत आहेत हालीं आपण हाजीर जाहालों आपले हातून सरदेशमुखीची सेवा घेऊन पुरातन हक लाजिमा आहे त्याप्रा। कृपाळु होऊन द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे ह्मणोन त्यावरून मनास आणितां देशाई मा॥रनिले सरकार तर्फेस रुजु नाहींत म्हणोन हक लाजिमा पावत नाही हालीं सरकार तर्फेस रुजु जाहाले याउपरी वतनदारांची स्थापना वतनावरी करावी हें वाजीब जाणून मा॥रनिले यांसी सुदामदमोजीब सुभे मा॥रचें सरदेशाईपणाचें वतन चालवायासी आज्ञा केली असे तरी तुम्ही अवघे मा॥रनिलेकडेस रुजु होऊन याचा हक लाजिमा सुदामद चालत आला असेल त्याजप्रा। देत जाणें सुभे मजकूरपैकी क॥ केलसी व क॥ वेसवी खेरीज करून हक देविला असे देत जाणें [ब०] जाणिजे रा। छ ५ माहे मोहरम मो० ३४.

ले० १९३ (तालीक) श्री शनिवार, ता.१७।६।१७३२

रा० बावाजी ह्मसके हवालदार किले जयगड गो० यांसी

श्रो॥ सेखोजी आंगरे सरखेल रामराम सु॥ ११३३ मौजे तनाली ता। वेलब सुभा प्रांत दाभोल हा गाव रा० दादोबा नाईक सरदेसाई यांसी इनाम आहे सरकार तर्फेची पटी पडत्ये ते इनाम करावी ह्मणून मा॥रनिले यांही हुजुर येऊन अर्ज केला त्याजवरून मौजे मा॥र इनाम दिला असे सरकार तर्फेची पटी गलेयाची व नक्तची होईल ते साल दर साल आकारप्रमाणे मा॥रनिलेचे नावे खर्च लिहित जाणे प्रतिवर्शी [क०] [ब०] जाणिजे रा॥ छ ५ माहे मोहरम

ले०१९४ शिक्का ४६ हू ता. ४।७।१७३२

सुज्याअतशार सिदी साद सुभेदार सुभा मामले दाभोल व प्रांत राजापुर मालुम बाशद सु॥ ११३३ आं के दादोबा ना० बिन रंगोबा ना. सरदेशाई सुबैन मजकूर येही मौजे धामापुर तर्फ संगमेस्वर सुभा राजापुर हा आपला कदीम गाव मराठे तर्फेन आपणास इनाम आहे सरकार तर्फ ००णी मौजे मारावर आहे ते मेहरवान होऊन मौजे मजकुरची खंडणी सरदेशाई मारइलेस माफ केली असे तर जे साली जे खंडणी मौजे मारावर मुकरर होत जाईल त्याचा सालमजकुरापासोन सालाचे सालांत माफी खर्च लिहित जाणे [क.][ब.] पा। हुजूर रो खुश मां जबानी रघुजी भिकाजी नाईक बोरकर अफराद रा। छ २२ माहे मोहरम सन १४ जुलूस मोर्तब सूद मो.३५

ले० १९५ श्री ता. १४।७।१७३२

रा. गोपजी विचारे व राघो हरी कारकून मो गोहागर यास सेखोजी आगरे सरखेल सु॥ ११३३ रा॥ दादोबा ना० सरदेशाई सुभा प्रांत दाभोल यांची वाडी ठिकाणा केसो कृष्ण खानविलकर याजवा॥ मौजे पालसेत तो मा॥री जागा आहे तेथील आकार होईल तो इनामात करुन देवावा म्हणोन देशाई मा॥रनिले यागी कुलाबाचे मु॥ अर्ज केला त्याजवरून देशाई यावर कृपाळु होऊन मौजे मा॥री आगराची वाडी मा॥र खासगतची आहे ते इनामत द्यावयाची सनद छ ५ मोहरम सन मा॥रची ००० पौ जाहाली त्यांजवरून तुम्हांस आज्ञा केली असे तर वाडी मा॥री बागाईत व जिरायेत आकार होईल तो देशाई मा॥रनिले यांचे नावे इनामत खर्च लिहित जाणे साल दरसाल नूतन पत्राचा आक्षप न करणें जाणिजे रा॥ छ २सफर पा। हुजूर मो ३६.

ले.१९६ (तालीक) श्री ता० १९।९।१७३२.

[आ०] रा० भगवंतराव रामचंद्र अमात्य हुकुमतपन्हा तां कमावीस-

दार कोंड असुडें ता॥ संगमेश्वर सुभा प्रांत राजापुर सु॥ ११३३ रा. अंतोवा ना० सरदेशाई याणी हुजुर विनंति केली जे कोंड मजकूर पुरातन इनाम त्यास आलीकडे काही दिवस कोड मजकूरचा यैवज जजीरे रत्नागिरीकडे वसूल पडतो यैशास आपण स्वामीचे पुरातन सेवक याकरिता कोंड मजकूरचा यैवज आपणाकडे इनाम चालवावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणोन विदित केले त्यावरून मनास आणून कोंड मजकूर याजकडे इनाम करार करून दिल्हे असे तरी यांची रुजुवात राहोन कोंड मजकूरचा यैवज साल दर साल याकडे देत जाणे प्रतिवर्षी [क०] छ १० रबिलाकर

ले. १९७ श्री मंगळवार ता० १९।९।१७३२.

[अ०] रा० निलो महादेव गो० यांसी

सेवक भगवंतराऊ रामचंद्र आमात्य न० सु॥ ११३३ कोंड असुडें ता॥ संगमेस्वर रा॥ आतोवा ना. सरदेसाई यास पुरातन इनाम आहे त्याप्रां करार केला आसे तर कोंड मजकूरचा यैवज मारनिलेकडे इनाम चालवित जाणें प्रतिवर्षी [क०] या खेरीज ता॥ मजकुरी याची पड जमीन इनाम चालत आहे त्याप्रमाणे इनाम चालवणे छ० १० रबिलाकर पा॥ हुजुर मो० २८

ले. १९८ श्री शुक्रवार ता० २९।९।१७३२.

रोखा स्वारी रा. निलो माहादेव नामजाद ता॥ संगमेस्वर ताहा कमावीसदार देहाये ता॥ मा॥र सु॥ ११३३ देहाये मजकुरी रा. अंतोवा ना० सरदेसाई मा० प्रभावली याची पड जमीन गावगना पुरातन चाल (त) होती यास आलीकडे दोन च्यार साले इकडील तर्फेन वसूल पडत होता त्यास सालमजकुरी श्रीमंत रा.——पंत आमात्य स्वामींची सनद छ० १० रबिलाखरी सादर जाहाली तेथें आज्ञा की पड जमीन सालाबाद चालत्ये त्याप्रमाणें चालवणें त्यावरून हें पत्र तुम्हास सादर केले असें तरी येणेप्रमाणे—

निमेचे गांवापैकी भात दसेरी खंडी	चवथाईचे गावापैकी भात दसेरी खंडी
॰।।॰ मौजे लोवले जमीन बिघे ८१ येक	॰।॰ मौजे सिवने जमीन ८।।॰ येक भात
॰।।॰ तेरिये बिघ ८१८२।।	॰।।॰ मौजे बोरसुत जमीन ८१ येक भात
॰।॰ आत्रवली जमीन ८।।१।। भात	१ मौजे कलबस्ते जमीन ८१।।।४।॰ भात
॰।।।॰ मौजे आबेङ्क बुा जमीन ८१।। येक	१ मौजे आबवे जमीन बिघे ८२ येक भात
॰।।॰ वांडा वजरी जमीन ४८१।॰ येक भात	॰।।॰ मौजे गोलवली जमीन ८१८=।। भात
१ मौजे कुरधोंडें जमीन ४८१।२।।	३।
॰।॰ मौजे वोझरखोल ८।।१। येक भात	तेरीज
१ मौजे हुरर ८२८।। भात	३।॰
॰।।॰ मौजे कोल्हे जमीन ४८१ यक भात	६।=
॰।।॰ मौजे नुरदुर जमीन ८१ यक भात	९।।=
॰।।= कसबा कोंडिबरें जमीन ८१।१ भात	
६।=	

येणेंप्रमाणें साडेनव खंडी दोन मण भात पैकी इकडील तर्फेचा यैवज होईल तो सरदेसाई याकडे सुरलीत पावीत जाणे प्रतिवर्षी [क॰] जा॰ छ २० रबिलाखर मो.३

ले. १९९ शि.३२ श्री सोमवार ता.२३।१०।१७३२

छ. म।। अनाम दादोवा ना. सरदेशाई सुभा प्रां दाभोल यांसि सेखोजी आंगरे सरखेल सु।। ११३३ तुम्ही बखर पाठविली ते पोंहोचोन लिहिली

इकीकत विदित जाहाली व कितेक मजकूर राघो कृष्ण याणी जबानी अर्ज केला त्यावरून हकाची मोईन करार करून जंजीरे सुवर्णदुर्गी सनद सादर केली असे त्याप्रा हक सुरलीत पावेल हरखीबाबत रुपये पाठविले ते प्रविष्ट जाहाले त्याची सनद अलाहिदा सादर आहे त्यावरून कलेल जाणिजे रा छ १४ माहे जमादिलौवल मो. ३

ले० २०० श्री स. १७३२.

शि०चक्राकार—श्रीराजा शिवचरणी सादर
तुकोजीसूत कान्होजी आंगरे निरंतर

आ० रा०———सरखेल तां कारभारी मौजे पालसेत तर्हा गोहागर सु॥ ११३३ रा० दादोबा ना० सरदेशाई सुभा मा० दाभोल याची वाडी ०००० केसो कृष्ण खानविलकर याजब॥ मौजे मा॥री आहे तेथील बागाइती व जिरायेत आकार होईल तो इनामत देवावा म्हणोन देशाई मारनिलें याही कु ०००००० विनति केली ०००००००००००० मारचा आकार बागाइती व जिरायेती होईल तो देशाई मारनिलें याचे नांवे इनामत खर्च लिहित (पुढील कागदाचा तुकडा नाहींसा झाला आहे---सं.)

ले०२०१ शि.२५ श्री बुधवार ता. २२।११।१७३२

[स्व.] ५९ परिधावी नाम संवत्सरे मार्गसीर्श बहुल द्वितीया सौम्यवासरे [क्ष० (शंभु) रा. दादोबा ना० व अंतोबा ना० बिन रंगोबा ना० सरदेसाई मा. प्रभानवली व दाभोल)]—तुम्ही वतनदार प्रमाणिक तुमचे वडील बंधु गणोबा नाईक यांचे पुत्र यांचें व तुमचे चालवणें आगत्य यास्तव तुम्हास हकाची मोईन करून दिल्ही असे बीता॥ ता॥ संगमेश्वर ता॥ मारपैकीं हक लारी

४५०	ता॥ संगमेश्वर कदीम ज जती		
		३००	१५०
११२॥	ता॥ कोडिवरे कदीम नाजती		
५६२॥		७५	३७॥

जाहाजी जिनसास येईल त्यास उद्‌मी निसबतीने लारी दर सदे २ सरदेशमुखीस चालत आहे त्याप्रा॥ दिवाणचा आकार होईल त्याप्रा॥ हक लारी

जकात मीठबंदरी दर खंडीस येक
देशमुखीस ·॥· सरदेशमुखीस ·॥·
मीठ जाहाजास पांटी १
इनाम जमीन ता। मारी चालत आहे
त्याप्रा। करार बिघे भात

२ देशमुखी
२ सरदेशमुखी
४
जकात देशमुखीस दर बैली रुके८३
·।२० देशमुखीस दलाली बंदरी जिनस येईल त्यास चवथी तकसीम
कलम १

येणेप्रमाणे हक व इनामत मोईन करुन सदरहू प्रमाणें दिल्हें असे तरी तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभऊन सुखरूप राहाणें जाणिजे निदेश समक्ष मो. २२.

टीपा—१. याच तारखेचें व याच मजकुराचें दुसरें आज्ञापत्र " पारपत्यगार व लेखक वर्तमान व भावी तां संगमेश्वर व कोंडिवरे सुभा राजापुर यांसि " आहे त्याचे अखेर मजकूर असा आहे—

" येकून हक लारी पाचसें साडेबासष्ट व जहाजाती जिनसास जकात लारी दोन व मीठ दर खंडीस सरदेशमुखीस व देशमुखीस यकायेक व जकात दरबैली रुके तीन व जहाजास मीठ पाटी येक व दलालीची चवथी तकसीम व इनाम जमीन बिघे पनास येणें प्रमाणें मोईन करून दिली असे तरी तुम्ही सदरहू हक व इनामत गणोबा नाईक याचे पुत्र प्रल्हाद ना० व केशव ना० व उभयता बंधु यासि व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवित जाणें व वतनसमंधें कानु काईदे पुरातन चालत असेल त्याप्रमाणें चालवित जाणें प्रतिवर्षी [क.][ब.(सरदेसाई)]जा० निदेश समक्ष" या आज्ञापत्रावर अखेर मोर्तब सदरचेंच आहे परंतु वरील शिक्का छत्रपतींचा नसून कृष्णाजी परशराम प्रतिनिधि यांचा अष्टकोनी आहे.

२. त्याचप्रों याच तारखेच्या व आरंभींच्या याच मजरकुाच्या रा० रा० रघुराव श्रीनिवास यांसि झालेल्या आज्ञापत्राची तालीक आहे तींतील विशेष मजकूर आहे तो—

" तो संगमेश्वर——————

१ मौजे धामापूर

१ मौजे कुंभार खाणी खुर्द

१ वेसराड कोंड

१ कोंड असुर्डे

—

४

तो पांवस——————

१ बाग मौजे कोलबे

१ बाग मौजे निवखोल मौजे झाडगाव बाग नेवरे

इनामत जमीन बिघे पनास

याप्रमाणें गांव दोन कोंड दोन व बागा दोन जमिन बिघे पनास सुरळीत चालवणें व यास तिजाई माफ केली असे तुम्ही तिजाईचा तगादा न करणें व याच्या वतनास हक दर सदे दिवाण दस्ताचे बेरजेस रयतानिसबत लारी सवा आहे व ज्याजती पावणा लारी येकूण लारी २ दोन हक करून दिल्हा आहे याप्रमाणें चालवीत जाणें प्रतिवर्षी [क०] [ब० (देसाई)] जाणिजे निदेश समक्ष"———————सं०.

———

ले० २०२ तालीक सिका श्री ता २२।११।१७३२

[स्व०] ५९ परिधावीनाम संवत्सरे मार्गसीर्ष बहुल द्वितीया सोम्यवासरे [क्ष० (शंभु) (रा० प्रल्हाद ना० व केशव ना० बिन गणोबा ना० व दादोबा ना० व अंतोबा ना० बिन रंगोबा ना० सरदेसाई मा० प्रभानवली व दाभोल) यांसी दिल्हें वतनपत्र यैसें जे तुम्हामधे अंतोबा ना० याणी करवीरचे मुकामी हुजुर स्वामीसंनिध विनंति केली कीं आपले पिते रंगोबा ना० याणी महाराजांच्या राज्यांत बहुत दिवस निष्ठेने सेवा केली त्यांचे पुत्र आपण महाराजांची सेवा निष्ठेने करीत आहों महाराज कृपाळु होऊन सुभा राजापुर येथे हक दर सदे दिवाण दस्ताचे बेरजेस रयतनि॥ लारी १।° सवा लारी चालत आहे ज्याजती पावणा लारी करून दिल्हें पाहिजे व इनाम व लाजिमा व बाजेबाबा पूर्वापार मोईन आहे त्याप्रमाणें चालवावयासी पत्र करून दिल्हे पाहिजे म्हणून विदित केलें त्यावरून तुम्ही वतनदार स्वामीच्या पायांसी निष्ठेने वर्तता तुमचें चालवणे हे स्वामीस आव-

श्यक याकरितां तुम्हावरी स्वामी कृपाळु होऊन जाजती हक करून दिल्हे व लवाजिमा व जकात चालत आहे त्याप्रों करार केलें असे व इनामगांव व जमीन चालत आहे त्याप्रमाणें करार केलें असे

इनामगांव व कोंड व बागा व जमीन

इनामगांव पेशजीपासून आहेत त्याप्रमाणें
४ ता। संगमेश्वर—१ मौजे धामापुर १ कोंड असुर्डे १ मौ. कुंभारखांणी १ कोंड वेसराड ४
१ बाग मौजे कोलवे ता। पांवस
१ वाडी कसबा प्रभावली
६

किती इनाम
बाग मालगुंड ता। सैतवडे १
१ बाग निवेखोल मौजे झाडगांव क. नेवरे
२

जमीन चावर ·।१० तर्फ राजापुर ·।१० ता। सौंदल ·।१० तर्फलांजे १

हक दर सदे दिवाण दस्ताचे वेरजेस रयेत नि॥ लारी २—कदमि लारी चालत आहे १।· जाजती लारी ·॥·

लाजिमायाची मोईन करून दिल्ही असे पेशजी चाल आहे त्याप्रों करार मोहतर्फा दुकानास सालिना मोईन—तेल्याचे घाण्यास तेल वजन ८८२॥ गौली याचे दुभती म्हैसीस लोणी वजन ८८॥९ मालियाचे मलियास रुके ·।· चामार दुकानास जुते १ नाहावी कलियासी रुके ·।· मासोलीचे होडीस रुके ·।· लोहार दुकानास रुब ·।· परीट घरास रुब ·।· कोष्टी दुकानास रुब ·।· सुतार दुकानास रुब ·।· भामटे मागास रुब ·।· धणगर व सणगर मागास रुब ·।· पंचकेणी दुकानास रुब ·।· सिंपी दुकानास अर्ध रुब ८= सराफ दुकानास अर्ध रुब ८= सरेकरी दुकानास अर्ध लारी ·॥· चाटे दुकानास रुब ·।· सोनार दुकानास रुब ·।· येकून बाब कलमे अठरा

बाजार आठवडियास भरतो त्यास दर आठवडियास दुकानास मोईन—रुके वाणी ८॥· सरेकरी ८१ चाटी ८१ मणेर ८॥· तांबोली पंनास पाने मालवेवाले ओझ्यास वजन ८॥९ खाटिक मास वजन ८८॥९ आगरी जिनस आणतील त्यास वजनी असेल त्यास दरमणे साडेच्यारटांक व नारल दोनशांस येक येकून कलम १ येकून बाब कलमे आठ

जकात उभा मार्ग—पंचकेणे गोणीस रुका १ गडीजिंनस दर गोणीस रुके ०३ कापड मोठे नगास रुके ०३: कापड देसुरी व जर्मीना दर नगास दर सदे चवल ०≡ घोडियास दर अर्ध लारी ·॥· येकून कलमे पांच.
जाहाजातील जकातीचा आकार दिवाणांत होईल त्यास दर सदे उदमी—निसबतीने लारी २ वानगी जिनस वाफीक येकून कलम १
किसमीठ राजभाग आकार होईल त्यास दर खंडीस कैली च्यार पायली ०।·
उसाच्या फडास राजभागास पिकाचे अजमासें दर खंडीस मूळवजन खरे सिंगोटी खरीदी फोक्तास दर रुके ०३ तीन ००२॥·
तंबाकू गादीस दर सदे येक रूव फांटे ·।—
हलद व आले राजभाग आकार होईल त्यास दर खंडीस वजन ०।·
बकरियाचा कलप दांताचा असेल त्यास बकरें सेलके १
—— येकून बाब अकरा आरा कलम —————— १
व जिराइताचे दस्त व गला व बाजे गला व बागाइताचे दस्ताचे नक्त याप्रमाणे नक्त बेरीज होईल त्यास दर सदे दोन लारी याप्रों मोईन करून दिल्ही असे हकाचे बेरजेमध्यें दस्ती बाबा आल्या आहेत त्याचे दस्त वजा करणे बाबा वि ता॥ —१ मोहतर्फा १ बाजार आठवडियास भरतो त्यास दस्त होईल तो १ जकायेत जाहाजाती १ मिठागर किसमीठ १ जकाती उभामार्ग १ आलेहलद १ गादी तंबाकू १ सिंगोटी १ उसाचे दस्त १ कोंबडी पटी १ बकरियाचा महसूल —— येकून अकरा बाबेचे दस्त होईल ते वजा करून बाकी बेरजेस दर सदे लारी दोन प्रमाणें घेत जाणें व लवाजिम्याचें कलम येकप्रों हक व इनाम तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभऊन आपल्या वतनाची सेवा करून सुखरूप राहणे सदरहु प्रमाणें पत्रे आलाहिदा देशाधिकारी याचे नावे व देशकाचे नावे पत्रे सादर केली आहेत ते स्वामीचे आज्ञेप्रमाणें सदरहू वतनाचा अमल सुदामत चालवितील जा० निशेद समक्ष मोर्तब
रुजु मंत्री तेरीख १५ जमादिलाकर सु॥ ११३३बार सुरू सुद बार बार

लें० २०३

याच तारखेचे सेखोजी आंगरे सरखेल यांच्या नांवच्या आज्ञापत्रांत पहिला प्रास्ताविक मजकुर झाल्यानंतर आज्ञा आहे ती–" हे वतनदार प्रमाणिक यांसी पूर्ववतप्रा॥ इनाम गांव व कोंड व बागा जमीन इनाम चालवित जाणे व तिजाई माफ केली आहे त्याप्रमाणे चालवणे व हक पेशजी सवा लारी आहे ज्याजती पावणा लारी येकून लारी दोन हक करून दिल्हा आहे दिवाण दस्ताचे बेरजेस दर सदे रयेतानि॥ वंशपरंपरेने चालवित जाणे संगमेश्वर माहाली देशमुखीची मोईन करार करून देऊन सनदा आलाहिदा सादर आहेत त्याप्रा॥ चालवित जाणे व बागा व मौजे मालगुंड तर्फ सैतवडे व जयगड तर्फेस संगमेश्वरचे गांव तुम्हांकडे आहेत व राजापुर सौंदल व लाजे माहालाचे गांवी याची जमीन इनामत आहे तेंहि चालवणे प्रतिवर्षी [क०] [ब०] जा० बहुत लिहिणे तरी सुज्ञ असां "

टीप—लें० २०२ च्या आज्ञापत्राच्या मुख्य मजकुराचीं आज्ञापत्रें याच तारखेचीं कृष्णाजी पंडित प्रतिनिधि व भगवंतराऊ अमात्य हुकुमतपन्हा यांस गेलेलीं प्रभावळी दप्तरांत अस्सल आहेत सं०

लें० २०४ श्री. ता० २२।११।१७३२.

[स्व०] ५९.परिधावी नाम सं. मार्ग० बहुल २ सौम्यवासरे [क्ष० (शंभु) (रा० देशाधिकारी व कारकून व० भा० सुभा प्रांत राजापुर)] रा० अंतोबा नाईक सरदेसाई मा० प्रभानवली व दाभोल यांणी विनंति केली कीं रा० परशुराम पंडित याणी उंडेल तेल दर मणें अडीच सेर करून दिल्हे आहे त्याप्रमाणे माहाराजाहि करार करून दिल्हे पाहिजे म्हणऊन विदित केले त्यावरून मारानिल्हेस दरमणें दिवाण दस्त आकार होईल त्यास दर मणें तेल उंडेल तेलास तेल वजन ०८२॥' अडीच सेर देविले असें याप्रमाणें मा॥रनिल्हेस परंपरेने चालवीत जाणें जाणिजे निदेश समक्ष मो. २२ रुजु समत मंत्री. बार सुरु सुद बार बार.

ले० २०५ शि० श्री. ता० २३।१।१७३३.

आज्ञापत्र रा० पंत प्रतिनिधि ताहा कमाविसदार व रयानि मौजे चिचघर ता खेड सु॥ ११३३ मौजे मजकूर रा० दादोवा नाईक सरदेसाई याचा इनाम गाव पुरातन त्या गावी शामजी बलास सेते करून उसुलात खलेल करितात म्हणुन विदित जालें तरी सरदेशमुखाचा इनाम गाव तेथें सेत सनद चालणार नाही पेशजी याणी तेथें इनामाचे सेताचे सनदा दरम्यान घेतल्या आहेत त्या दूर केल्या असेल त्याचा उसूल सुरलीत सरदेसमुखाकडे देणे फिरोन बोभाट येऊ न देणे जाणिजे छ १७ साबान निदेश समश मो० ८.

ले० २०६ शि. ५१ श्री शनवार ता० १४।४।१७३३.

तहनामा सुभा प्रांत राजापुर पाहाणीमुळे आकार करून उगवणी करून घ्यावी सु॥ ११३३ कलमे १६ येकून कलमे सोला रास

घरस्या पाहाणी करून घरे होतील त्यास वतनदार व गांवगंना खोत व कुलकर्णी व माहाजन व वैदिक ब्राम्हण व ग्रहस्त व म्हार गुरव येणप्रो पालक वजा करून व गुलाम व बटीक वजा करून बाकी घरें राहातील त्याचा तह रुपये

१॥। घर खरें ।॥ मफालिस ।। राडिक १ पालक घरें मिरासी व गुरव व म्हार दर घरास कलम १

बैल वाणी यांचे वहीत आसतील त्यास दर बैली रुपये ।।.

भंडार माडाचा सिरस्ता रुपये १ खरे माडास दर ।॥ बैठा माडास दर कलम १

वण म्हैसी पाहाणी करून टीबपैकी वजा देसक व खोत कुलकर्णी माहाजन व वैदिक ब्राम्हण व म्हार ०००० सिरस्तेप्रमाणें वजा करून बाकी म्हैसी रावती त्यास वण रुपये

१ येकंदर ।॥ जरड दुबलीस ० वाज असेल०० १॥ कलम १

मोहतर्फा जीवन ००० क घ्यावा कलम १

फणस हंगामी पाहाणी करावी त्यास दाहा फणस ज्यावर लागले आसतील ते झाड अजी वजा करावे दाहापासून ज्या झाडावर ज्याजती फणस लागतील ती झाडे मोजून दर

बागायेत नारल सुपारी उंडणी मिरवेल याची पाहाणी हगामसीर करून राजभाग आकारेल त्यास तह ——
नारल दरसदे किमत रु॥
१॥ यैन दरसदे ·।· नफा दर सदे
१॥।· येकून पावणेदोन रुपये
सुपारीचा आकार होईल त्यास यैनजिनस वसूल घेऊन नफा दरमणे रु॥'।≈ तीन चवलप्रा घ्यावा ये॥ कलम १
उंडणीचे पाहाणी करून तेल यैनजिनस वसूल घ्यावा कलम १
मिरवेल पाहाणी करून यैनजिनस घ्यावें कलम १

—— बागायेत कलम १
जिरायेताचे पाहाणी हंगामी करून धारे येणेंप्रमाणें घ्यावे
भात जमीनीस मयेत वजा करून बाकी जमीनीस दर बिघा तिपांडी वजा करावी बाकी राहेल त्यास धारा भात दसेरी

·।३।१ मला दर बिघा
·।≈॥ मळी व खाजण दर बिघां
·।≈॥ बावील दर बिघा
·।१। खरी दर
·।· कुडिमांट
'।' तुरबंटे
'।' भाटी पुलण

झाडास रु॥ ८≡००००चे कलम १
पानवेल आली मोजून दर सदे रु॥ '।।' नीम घ्यावा येकून कलम १

तसैर गला दसेरी बारुलें मापें ——
—— खंडी ००००
६ हरीक दर खंडीस रु॥
१० सावे वरी दर खंडीस रु॥
१५ भात नागली जमाबंदीपैकीं तीन तक्षिमा यैनजिनस घ्यावा चौथाई तसैर दर खंडीस रुपये
कलम १

वजनी धूल हलद ०० आलें दर बिघा वजन दर '।' पांचमण सदरहूचे यैनजिनस वसूल घ्यावा रयेतेचे समजाविसीमुले निकाल जैसा होईल तैसा करून घ्यावा कलम १

गौळी माहालचा सिरस्ता म्हेतर चौगुला यांस पालक सिरस्तेप्रमाणे वजा करून बाकी ०० येकून तूप वजन दर ८॥' यैन त ० ० र ८।' फुवटर ८८५ भरडी ० ० ० ८८८ पाडस

——

येणेप्रमाणें आकार करून यैन जिनस वसूल घ्यावा कलम १

ॅ१॥।१॥ सरवट दर

।१। उमर

ॅ३ नागली जमीन मोजून झाड-
झाडोरा वजा करून खरी जमीन
राहेल त्यास दर बिघा
ॅ३ हरीक खरे दर जमीनीस दर बिघा
ॅ१।' सांवे दर बिघा
ॅ२॥' डोंगर वरी वाद देऊन राहेल
त्यास दर
ॅ२॥' आवट वरी
ॅ१।' तील उडीद कुलीद वर्ण
चवली तुरी मूग दर बिघा
येणेप्रमाणें पाहाणी करून आकार
करावा कलम १

बिघावणी व टिवेचा ० व फाजील
वसूल पडणार नाही कलम १
पाहाणी करून माहाली समजाविशीं
करावी कलम १

चाकरमानेचे घरें असतील त्यांचे घरें
बदलतील त्याचा निकाल परभारें
करून घ्यावा रयतेस तगादा होणार
नाहीं कलम १

माहालोमाहाली गावगंना देवाचे
धर्मादाये सालाबाजप्राो चालवावे
कलम १

येकून सोला कलमे बरहुकुम तह केला आहे तरी सदरहू तहप्रमाणें पाहाणी केलियाने चालविले जाईल जा. छ१० जिलकाद पाा हुजुर मो. २४.

ले० २०७ शि. ३३ श्री गुरुवार ता. ४।१२।१७३५

रा० अंतोबा नायक सरदेसाई गो० यासी

छ [अ०] ——— श्राो संभाजी आंगरे सरखेल रामराम सु॥ ११३६ तुम्हीं पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ विदित जाहाला लाजे तर्फेच्या खोताविसी बोली करून निरोप देविला म्हणून लिहिले कलो आलें खोतास आडीचसे रु॥ करार केले आहेत म्हणोन लि॥ तरी उभयपक्षी श्नेह चालत असतां खोतांस खड करावा हे गोष्ट योग्य आहे यैसे नाहीं येविसी राजश्री गंगाधर पंडित यांसी लेहून पाठविले आसे त्याजवरून कलेल वरकड तुम्हाकडील मजकूर रा॥ पुरंधर नारायण याणी विदित केला तरी सर्वप्रकारें

तुमचे चालवायास अंतर होणार नाही जाणिजे रा छ २९ माहे रजब मो ३४.

लें० २०८ श्री स. १७३६।३७

दा बा रामभट गर्दे खोत मौजे किरडुवे ता संगमेस्वर व गणेशभट सफरे मौजे कोंडण ता देवरूख सु ११३७ कारणें------ स्वामीचे सेवेसी लिहोन दिल्हा कतबा यैसाजे मजरे मजकूरातून मौजे किरडुवेयास पाट पुरातन जातो त्यावर मजरे मजकुरी गणेशभटी नवे घर बांधले त्यामुळे आम्हा उभयतांचा कजिया जाहाला हे वर्तमान स्वामीस विदित जाहाले त्यावरून उभयतास किले विशालगडचे मुकामी बलाऊन आणून आज्ञा केली जे रा. अंतोबा ना. सरदेसाई तुम्हा उभयेताचा करीना मनास आणून समजाविशी करितील त्याप्रमाणे वर्तणुक करणे त्यावरून मारनिले यांणी आम्हा उभयतांची समजाविसी येणेप्रमाणे केली

(पुढील मजकूर मुळांत दोन रकान्यांत आहे—सं०)

मौजे किरडुवे या गांवास मजरे मजकुरातून पाट जातो त्याखालें मजरे मारची गिमवस आहे त्यात बागायेत करू नये घरावरील कोंडणचा पाट दुसरा आहे त्या पाणियाने गिमवस गणेशभटी करावी घराभवते वरले पाटाने बागायेत करवेल ते करावी किरडुवेचा पाट जातो त्या पाटास गणेशभटांस समध नाही शेलणे बुडऊ नये व बाधणे पाडू नये कलम १

कुव्याबाबत सीमेचे पाणी सारणीचे आहे ते गणेशभटी बाधोनये भक्षावयासी पाहिजे ते न्यावे कमल १

गणेशभटाचे घराखालून पाट किरडुवेस जातो त्या पाणियाचा कजिया सन सलास सलासीन (स. १७३३-३४) मध्ये जाहाला होता तेव्हा जाखदेवीचा पाट हरदू जणानी येकसाल दुसरे साली कोडणचे रयतांनी बांधावा त्यास जाखदेवीचा पाट पुरातन मजरे माराचा असीला तरी मजरे मजकुरास सुखरूप न्यावा किरडुवेकरानी पाटास यकसाल खर्च लावावा यैसे केले होते ते घराचा कजिया साल मारी जाहाला यास्तव किरडुवेकरास माफ केले कलम १

किरडुवेयास दैणाचे परियाचे पाणी पुरातन जाते ते किरडुवेकरानी सुखरूप न्यावे सालमजकुरी त्याखाले दुसरे धरण बाधले ते बांधो नये गणेशभटी धरण बाधोन आपल्या घराजवल पाणी आणावे———कलम १

सदरहूप्रमाणें आम्ही उभयेतां मान्य असों कलमे लिहिली आहेत या प्रमाणे उभयता वर्तो ज्यापासून अंतर पडेल अगर दुसरे दिवाणांत मनसुबीस जाऊ तरी गुनेगार

(या खालीं सह्या असाव्या पण पुढें कागद गहाळ—सं.).

ले० २०९ शि. ४६ ता. १५।१०।१७३७

आमीलाने हाल व इस्तिकबाल व देशमुखांन व देशपांडेयांन व मुकदमान व जमीअ जमीदारांन व मुजारिआंन व रिआया व बिरायाये तर्फ संगमेस्वर सुबे राजापुर तालुके कलेअ (किल्ले) महरूसे जंजीरे दंडाराजपुरी सरकार तलकोंकण आदलखानी मनमुजाफ सुबे दारुजफुर बिज्यापुर बिदानंद के दरींविला इजतआसार दादोवा नायेक वलद रंगोवा नायेक सरदेशाई सुबे दाभोल व सुबे मजकूर हुजुर येऊन अर्ज केला कीं मौजे धामापुर तर्फ मजकूर मराठेयांकडून कदीम आपणास इनआम आहे व सरकार तर्फेकडून पेशकश मौजे मस्तुरावर मुकरर आहे त्याचे मआफी बाबे पेशजीं खान साहेब व किबले जन्नतनिशांन याकूतखान सानी मरहूम याहीं परवाना हिंदवी आपले मोहरेनसीं बनाम मगफिरत निशान सिदी सअद शहीद मरहूम बतारीख २२ माहे मोदरमुमहराम सन १४ महमदशाही सादर केला असे हालीं उमेदवार आहे कीं अज राहे फज्ल व करम सनदे नातीक फारसी खता अता होये त्यावरूनं खातरेस आणितां जाहिर होऊन आले कीं मौजे मजबूर कदीम त्यांचा असे बिनाबरां नजर बरअकीदत व नेकोबंदगी मशारुनइलेह पेशकश मौजे मजबूर अज तर्फ सरकार बऔलाद व अहफाद त्यांस मआफ केली असे बाये दमे अमले व फेअले तर्फ मस्तूर पेशकश मौजे मजकूरची इनआम मुकरनी मोमाईलेह बाअवलाद व अहफाद जाणोन दर कब्ज व तसरूफ त्यांचे देणे बहेतवज्युह मिनल-

वज्युह मुजाहीम न होणे व दर साल सनद मुजदद तलब न करणे नकल घेऊन असल फिराऊन देणे :दरींबाब ताकीद जाणोन हसबुलमस्तुर अमलांत आणणें परवानगी हुजुर रसानगी खुश महमद जबानी रघूजी नाईक बोरकर अफराध तहरीरुन फी ता। १ माहे रजब सन २० महमदशाही मुताबिक सन ११५० येक हजार येक सेंपनास हिजरी मवाफिक सन ११३८ मृगसाली मोर्तबसुद मो. ३५ रुजु सुरनसी

ले०२१० शि०४६ ता० १५।१०।१७३७

आमीलाने हाल व इस्तकबाल व देसमुखान व देसपांडेयान व मुकदमांन व जमीअ जमीनदारांन व मुजारिआन व रिआया व बिरायाये तपे वेलंब तर्फ हमजाबाद ममूले बंदर मैमून मुस्तफाबाद ऊर्फ सुबे दाभोल ताळुके कलअ महरूसे जंजीरे दंडाराजपुरी सरकार तलकोंकण अदलखानी मनमजाफ सुबे दारुलजफर बिज्यापुर बिनानंद के दरींविला इजतआसार दादो नायेक वल्द रंगो नायेक सरदेसाई सुबे मजकूर व सुबे राजापुर हुजुर येऊन अर्ज केला कीं पेसजीं खानसाहेब व किबले जिनतनिशांन याकुतखान सानी मरहूम अज राह मेहरबांनी व कदीमपरवरी मौजे तनाली तपे मजकूरके बाबत हकलवाजिमात व इनआमात सरदेसमुखी असे बतारीख १२ माहे रजब सन २ महमदशाही मुताबिक सन ११३२ हिजरी मवाफिक सन अशरीन मिया व अलफ मृगसाली दरोबस्त इनआम मुकररी बाऔलाद फर्माऊन सनद हिंदवी आपले मोहरेनसीं अहफाद अता केली असे बिनाबरां उमेदवार आहों कीं अलहाल मुताबिक आं सनद नातीक बखत फारसी मरहमत होये त्यावरून खातिरेस आणितां जाहिर होऊन आलें कीं मौजे मजकूर अज कदीम बाबत हक लवाजिमात व इनआमात सरदेसमुखी त्यांचे असे त्याहाजा नजरबर आं व बरअकीदत व नेकोबंदगी मोइलेह मौजे मजबूर रा दरोबस्त बमे हासीलात दिवानी व कुलजमाबंदी गला व नकदियात वजनी व शुमारी जे तकसीम सरकार तर्फेची होईल ते बाअवलाद व अहफाद इनआम व मऱ्हमत केली असे

बाये हके अमले व फेअले तपे मजबूर तर्फ मजकूर मौजे मस्तूरास दरोबस्त इनआम मुकररी बाअवलाद व अहफाद यांचे जाणोन त्यांचे कबज तसरूफेंत देणें व हे तवज्युह मिनलवज्युह बइलतमाल व ज्यहात व सायेरज्यहात व पटीयात व वेठबेगार व कनलगा व जमीअ तकालिफ दिवानी मुजाहिम न होणे व दर साल सनद मुजदद तलब न करणें नकल घेऊन असल फिराऊन देणे दरींबाब ताकीद जाणोन हसबुलमस्तूर अमलांत आणणे परवानगी हुजुर रसानगी खुश महमद जबानी रघूजी नाईक बोरकर अफराद तहरीरुन फी तारीख १ माहे रजब सन २० जुलूस महमदशाही मुताबिक सन ११५० येक हजार येकसें पनास हिजरी मवाफिक सन ११३८ मृगसाली मोर्तब सुद मो० ३५.

टीप—या प्रकारच्याच मजकुराची (अवश्य तेवढ्या फरकानें) ता. १ माहे अक्टोबर १७४० ई० ची सनद दादोवा नायकाच्या नांवची मौजे चिंचघर ता। खेड सुभा दाभोळ या गांवाबद्दल आहे; आणि दुसरी सनद त्याच तारखेची वेसवी व केळशी या दोन गावाबद्दल एकच अशी आहे. सं.

ले २११ शि० ४६

सन १७३७

आमीलानें हाल व इस्तिकबाल व देसमुखान व देसपांडेयान व मुकदमान व जमीअ जमीदारान व मुजारिआन व रिआया व बिरायाये तर्फ हमजाबाद व जाफराबाद मामले बंदर मैमून मुस्तफाबाद ऊर्फ सुबे दाभोल सरकार तलकोकण आदलखानी मनमजाफ सुबे दारुलजफर बिज्यापुर तालुके कले महरूसे जंजिरे दंडाराजपुरी बिदानंद के दरींविला इजतआसार दादो नायेक बिन रंगोनायेक सरदेसाई सुबे मजकूर व सुबे राजापुर हुजुर येऊन अर्ज केला कीं पेशर्जी हजरत वली न्यामतखान साहेब व किबले जिनतानिशांन याकूतखान सानी मरहूम अज राह मेहरबानी व कदीमपरवरी सनद हेंदवी जानी नमूदन खिदमत वतन सरदेसमुखी तर्फैन मजबूर बमे हक व लवाजिमात व इनआमात बदस्तुर शुदामद बनामबंदे व गणोवा नायेक बिरादरकलां व विसो नायेक व अंतो नायेक बिरा-

दरान खुद बाअवलाद व अहफाद बतारीख २९ जमादी सानी सन २ महमदशाही मुताबिक सन ११३२ हिजरी मवाफिक सन इसरीन मिया व अलफ मृगसाली मऱ्हमत केली असे बिनाबरां उमेदवार आहें ज अलहाळ त्याचें मवाफिक सनद नातीक फारसी खताची अता होये कीं बदुवाये जियाद उमर व दौलत मशगूल होऊन वतन सरदेसमुखी मस्तूर चालवीत जाऊन त्यावरून खातिरेस आणितां जाहिर होऊंन आले कीं वतन सरदेसमुखी मजकूर कदीम बाबस्ते मोमाईलेची असे त्याहाजा नजरबरां व बरअकोदत व नेकोबंदगी मशारुनइले खुर्दखत वतन सरदेसमुखी मजबूर मअ हक व लवाजिमात व इनआमात बदस्तुर शुदामद बखत फारसी बनाम इजतआसार मोमाइले व बिरादरान हकीकी मशारुन इलेहीम बाअवलाद व अहफाद इनआम व मऱ्हमत फर्मांविलें असे बाये हके अमले व फेअले तर्फेन मजबूर वतन सरदेसमुखी मस्तूर इनआम मुकररी मोमाइलेहीम बाऔलाद व अहफाद ००००० त वतन मजकूर यांचे हातोन घेत जाणे व दरसाल सनद मुजदद तलब न करणे नकल घेऊन असल फिराऊन देणे दरी बाब ताकीद जाणोन हसबुलमस्तुर अमलात आणणे परवानगी हुजुर रसानगी खुस महमद जबानी रघूजी नाईक बोरकर अपराध तहरीरुन फी ता। ११ माहे ००० सन ११३८ मृगसाली मोर्तब सुद मो० ३५.

ले० २१२ शि०५२. श्री. बुधवार, ता० १४।२।१७३९.

आ० [स०] कृष्णाजी परशराम प्रतिनिधि ताहां मोकदमानी मौजे कोपर्डे ता। मलकापूर सुहुर सन ११३९ रा. अंतोवा ना० सरदेसाई मा० प्रभावली व मा० दाभोल यांणी विनंति केली कीं ता। मजकुरीं आपले सरदेशमुखीचे वतन पुरातन आहे त्यासी स्वामींने कृपाळु होऊन नूतन इनाम दिलियाने त्याचा उपभोग करून स्वामींची शेवा वतनी करून म्हणऊन विनांति केली त्याजवरून मना आणून नूतन इनाम मौजे मजकूर पैकीं भात जमीन जांबूल शेत ८१॥ बिघा नेमून देविले आसे त्या जमीनींची चतु:सीमा ——

पूर्वेस मावल्याचे दाक्षिणेस पाटिलांचे पश्चिमेस माल उत्तरेस पंटी आरंदा
शेत १ पालक शेत १ १ १
येणेंप्रमाणें चतुःसीमा करून शेत मा।रनुले यांस इनाम करून दिल्हे असे या शेताचा उपभोग वंशपरंपरेने करतील तुम्हीं याकडे इनाम चालवित जाणें छ १५ जिलकाद पा। हुजुर मो. ३९

टीप—याच तारखेचें व याच कारणाचें दुसरें आज्ञापत्र मौजे येळूर ता मलकापुर येथील दोन बिघे जमीन 'शेत कामत' नांवाची चतुःसीमापूर्वक नूतन इनाम वंशपरंपरा करून दिल्याबा।चें आहे. बिघे व चतुःसीमा आणि गांवचे नांव याखेरीज इतर मजकुर शिक्का मोर्तबासुां सदरचाच आहे- सं॰

ले.२१३ शि.४६ हुअल् मुआबिन् ता. ११।१०।१७४०

आमीलाने हाल व इस्तिकबाल व देशमुखांन व देशपांडेयांन व मुकदमान व ज्यमीये जमीदारांन व मुजारिआंन व रिआया व बिरायाये परगणे वेसवी व केलसी तर्फ जाफराबाद मामले बंदर मैमून मुस्तफाबाद ऊर्फ सुबे दाभोल सरकार तलकोकण आदिलखांनी मनमजाफ सुबे दारुलजफर बिज्यापुर तालुके कलथ महरूसे जंजीरे दंडाराजपुरी बिदानंद के दरींविला इजतआसार दादोबा नायक वलद रंगोबा नायक सरदेशाई सुबे मजकूर व सुबे राजापुर हुजुर येऊन अर्ज केला कीं पेशअंजी बखिदमत खानसाहेब व किबले जिनतनिशांन याकूतखांन सांनी मरहूम हकीकत अहवाल वतने प्रगणे मजकूरैन जाहिर केली कीं वतंन सरदेशमुखी सुबे मजकुरैन अज अबा व अंज्यद खुद ज्यारी आहे व चंद मुदत बसबब फितूर गनीम लईम भोगवटा वतंन मअतल होता अलहाल उमेदवार आहें कीं दरबाब इज्यराये वोहदे वतंन सरदेशमुखी बदस्तुर मुस्तमीर सादर होये खांन साहेब जिनतनिशांन मरहूमे यांहीं खातिरेस आणून तहकीक करून खुर्द खत हिंदवी वतन सरदेशमुखी सुबे मस्तुरैन बतारीख २९ जमादि सांनी सन २ मुताबिक सन ११३२ हिजरी दर सन अशरीन मियां व अलफ मऱ्हंमत केलें त्यास मवाफिक आं भोगवटे वतन बबाजे माहालात

सुबे मजकूरैन ज्यारी व सारी असे व हरदू प्रगणे मजकूर दर तहत व तस-
रुफ सुबे दाभोल आहेत अमा दर हरदू परगणे मजकूर भोगवटे वतंन
खुद ज्यारी नसे उमेदवार आहे कीं अज राह फजल व करम सनद सर-
देशमुखी हरदू प्रगणे मस्तुर बनाम बंदे इनायत होये च्युनाच बरतबक
मारूजे कमतरीन व इजहार हकीकत वतन बज्यारी दास्तंन भोगवटा सर-
देशमुखी हरदू प्रगणे मजकूर हुकुमं फर्माऊन सनद हिंदवी ब तारीख २७
माहे शवाल सन १३ महमदशाही मुताबिक सन ११४३ हिजरी मवाफिक
सन इहिदे सलासीन मियां व अलफ मृगसाली बाअवलाद व अहफाद अता
फर्माविली त्याहाजा उमेदवार आहो कीं हालीं मुताबिक आं सनद नातीक
बखत फारसी मऱ्हंमत होये ता बदुवाये जियादती उम्र व दौलत अब्द
मुदत मशगुल राहोन वतन सरदेशमुखी हरदू प्रगणे मजकूर चालवीत
जाऊन त्यावरून खातिरेस आणितां जाहिर जालें कीं वतंन सरदेशमुखी
हरदू प्रगणे मजकूर ही बादस्त बमोमाइलेह असे बिनाबरां नजरबरां व
बरआकीदत व नेकोबंदगी नायक मशारुनइलेह खुदखत बतन सरदे-
शमुखी प्रगणे मजकूरैन मअ हक लवाजिमात व इनआमात बदस्तुर
शुदामद बखत फारसी बनाम इजलआसार मोमीइलेह बा अवलाद व
अहफाद इनआम व मऱ्हंमत फर्माविलें असे बाये हके अमलें व फेअले
हरदू प्रगणे मजकूर वतन सरदेशमुखी प्रगणे मजकूरैन इनआम मुकरी
मशारुनइलेह बाअवलाद व अहफाद वो जाणून मामूल व ज्यारी राख-
णे व हरसाल सनद मुजदद तलब न करणे नकल घेऊन असल फिराऊन
देणे दरींबाब ताकीद जाणून हसबुलमस्तूर अमलात आणणे परवानगी
हुजुर रसानगी खुश महंमद जबांनी रघूजी नाईक बोरकर अफराद तहरी-
रुन फी तारीख १ माहे रजब सन २० महमंदशाही मुताबिक सन
११५० येक हजार येकशेपंनास हिज्यरी मवाफिक सन ११३८ मृगसाली
मोर्तब सुद मो. ३५ रुजुसुरनसी

ले. २१४ शि. ३४. श्री स. १७४१ ?

रा० कृष्णाजीपंत गुा सरदेसाई गो० यांसी

छ [अ०] श्रो कुवरजी राजे व जयसिंग राजे सिर्के रामराम विनंति उपरी [ये०] वि० तुम्हाकडून रा० पुतलाजी बावा आलें त्याणी मुखोद्गत वर्तमान सांगितले त्याजवरून कलो आलें हरयेकविसीं आम्हाकडील कार्यास साहित्य करिता येणेकरून उचितच आहे तदनुरूप दिवसेंदिवस ममतेची अभिवृधी करावी यैशास आपण देवडीच्या आसामीविसीं आम्हास सांगितलें होतें त्यास चिरंजिव सौभाग्यादिसंपन्न ब (बा) या यांही मान्य केले आहे प्रस्तुत अखेरीचे दिवस आले आहेत म्रुगसाली आसामी करार होऊन येईल वरकड सविस्तर वर्तमान रा० पुतलाजीबावा व रा० आपाजी माहादेव सांगता कलो येईल बहुत काय लिहिणे रा। छ ७ रौवल हे विनंति

मो. ३४.

ले. २१५ श्री आई आदिपुरुष ता. २९ मे १७४३.

[अ०] रा. अंतोबा ना० सरदेसाई मा० प्रभावली व दाभोल गो० यांसी—

सेवक श्रीनिवास परशराम प्रतिनिधि नमस्कार सुहूर सन ११४४ तुम्ही (पत्र) पाठविले ते प्रविष्ट जाले लिहिले वर्तमान कलो आले रा. दादोबा ना०याचे वर्तमान लिहिले तरी तुमचा पत्रापूर्वीं च वर्तमान विदित जाहाले यैशास तुम्ही पूर्वीपासून पदरीचे तुमचे सर्वप्रकारे आवस्यक आहे तुमच्या वडिलाचे चालविले त्याचप्रमाणे तुमचे हि चालविले जाईल रतांबे व फणस व तोंडिली व आबसाले पाठविली ती पावली तुम्ही वर्षास कोकणचा जिनस पाठवावा तो तुम्हाकडोन आलीकडे येत नव्हता यंदा पाठविला यावरून आपूर्व दिसोन आले जाणिजे छ १५ रबिलाखर माहुलंगे थोर जून आणून जी मिळतील ती आगत्य पाठऊन देणे माहुलंगाचे औशधाकरिता प्रयोजन आहे तरी सत्वर पाठवणे हे विनंति

ले. २१६ शि.२१ श्री गुरुवार, ता. २९।९।१७४३
रा. देशाधिकारी व लेखक व. भा. सुभा प्रांत महिमतगड गो० यांसी.
छ [अ०]——सेवक श्रीनिवास परशराम प्रतिनिधि न. सु॥ ११४४ मौजे चिचघर ता खेड सुभा दाभोल हा गांव रा. दादोबा नाईक सरदेसाई मा. प्रभावली व दाभोल यास पुरातन वतनी इनाम आहे त्यास सांप्रत दादोबा नाईक मृत्य पावलें त्यांचे पुत्र रा॥ सदाशिव नाईक व पुतण्ये प्रहराद नाईक यांचे चालवणे अवश्यक जाणोन मौजे मजकूर त्याचा पुरातन वतनी इनाम गाव त्याजकडे करार करून तुम्हांस हें पत्र सादर कले असे तरी मौजे मजकूर सरदेसाई मा॥रनिले याजकडे कुलबाब कुलकानु इनाम चालवीत जाणें प्रतिवर्षी [क०] [च०] जाणिजे छ २१ साबान निदेश समक्ष मो. ६

ले. २१७ श्री ता. २५।११।१७४३
[अ०] रा० अंतोबा ना० सरदेसाई मा० दाभोल व प्रांत राजापुर गो. सेवक श्रीनिवास परशराम प्रतिनिधि न० सु॥ ११४४ आणाजी रघुनाथ देशपांडे ता॥ संगमेश्वर याचे पुरातन कसबे मजकूरचे गावकुलकर्ण आहे त्यास सांप्रत तुम्ही क॥ मजकूरच्या गावकुलकर्णासी कजिया करितां म्हणोन विदित जाले तरी पूर्वी रांगणेयाचे मुकामी तीर्थरूप रा.—— पंत कैलासवासी यानी मनसुभी करून तुम्हास कायाच्या कुलकर्णासी समध नाही यैसे आसता पुन्हा मागती कजिया करिता तरी हे गोष्टी उत्तम नाही रा०—— स्वामीस याचे आगत्य आहे तुम्ही कजिया याच्या वतनासी सर्वथा न करणे आजपावेतो चालत आले त्याप्रा चालवणे या कामास जासूद जजा शाबाजी नाईक पा॥ यासी रुपये ४ च्यार देणे छ १९ सवाल निदेश समक्ष मो. ६

ले० २१८ शि० २१ श्री ता. १३।१२।१७४३
आ० [स.] श्रीनिवास पंडित प्रतिनिधि तां खोतानी देहाये ता॥

संगमेश्वर सु॥ ११४४ रा० अंतोवा ना० सरदेसाई मा० प्रभावली व दाभोल व देशमुख ता॥ मजकुर यांणी हुजुर येऊन विनंति केली कीं देसमुखीच्या वतनास ता॥ मजकुरी ईदलशाही कारकीर्दीस इनामती चालत होते त्याप्रमाणें आलाकडे चालत नाहीं येविसीं रा.——— स्वामीसि विनंति केली त्यावरून रा.—— स्वामींनी गावगना हक इनामत व लाजिमा करार करून दिल्हा आहेत

हक गावगना पैकी रयेत निसबत लारी ७५० ता॥ संगमेस्वर ११२॥ ता॥ कोंडिवरें ८६२॥	ज्याहाजातीपैकी जिनस येईल त्यास उदमी निसबतीनें दर सदे लाहारी सरदेसमुखीप्रमाणें देसमुखीस लारी २ दोन
जकातपैकी दरबैली रुके ८३ तीन मीठ बंदर पैकी दरखंडीस येक ॥ देसमुखी ॥ सरदेसमुखी १	मीठ दर जाहाजास पाटी येक १ बंदरी जिनसाची दलाली आहे त्यापैकी चवथाई देसमुखीस १ सरदेसमुखी दिवाण दस्तास दर सदे लाहारी हक दोन व लाजिमा नीम येकून लाहारी २॥
इनाम जमीन गावगना पेशजी चालत आहे त्या प्रों ।२० बिघे पनास	

येणें प्रमाणें आठ कलमे हक व इनाम करार करून दिल्हा आहे याप्रमाणें देत जाणें यांचे इनाम गाव पुरातन इदलशाहाचे कारकीर्दीचे आहेत त्या गावाखेरीज हक सदरहू आठसे साडेबासष्ट लाहारी देविले असेत देणें [ब्र०] [क०] जा० छ ७ जिल्काद निदेश समक्ष मो० ६

ले० २१९ श्री ता. १५।१२।१७४३

छ मा॥अनाम देशमुख देशपांडे महालानिहाये सुभा प्रांत राजापुर व मलकापुर व असडोली यांसी श्रीनिवास परशराम प्रतिनिधि सु॥ ११४४ रा० अतोवा ना० बिन रंगोबा ना० सरदेशमुख मा० प्रभावली व दाभोल याणी हुजुर येऊन विनंति केली की आपल्यास वतनसमधे हक व इनाम

पूर्वी इदलशाही कारकीर्दीस होता तो आलाकडे त्याप्रमाणें चालत नाही त्यास रा० —— स्वामीनी मोईन दर सदे रयत नि॥ पैकी दिवाण दस्तावर यैन दाभोली लाहारी यैन दोन व लाजिमा लारी '॥' नीम येकून अडीच लाहारी करून दिल्ही आहे त्याप्रमाणें सुरलीत देत नाही म्हणून विनंति केली त्यावरून मनास आणून रा० —— स्वामीनी दर सदे अडीच लाहारी रयत नि॥ पैकी हक व लाजिमा मोईन करून दिल्ही आहे त्याप्रमाणें याचा हक लाजिमा देविला असे दिवाण दस्ताचे बेरीजेवर देत जाणें [ब०] जाणिजे छ ९ जिलकाद निदेश समक्ष मो. ६.

लें० २२० श्री ता० १५।१२।१७४३

राजश्री तुलाजी आगरे गोसावी यांस

छ [अ०] श्री श्रीनिवास परशराम प्रतिनिधि आसीर्वाद सु॥ ११४४ रा० अंतोबा ना० सरदेशमुख सुभा प्रांत राजापुर व दाभोल व देशमुख ता। संगमेस्वर याचे वतनाचे धंदा सवदल राजापुर मिठगाव्हणें व सैतवडें येथें व लाजे माहालचे गाव बारा येथील सुरलीत चालत नाही कानोवा नाईक मावलगकर यांणी गैरवाका समजाऊन रा० गणोवा नाईक या राज्यांत होते यानिमित्यें श्रीमत मातुश्री ताराबाई साहेबास व राजश्री रामचंद्र पंत यांस विषाद येऊन रा० रामराव बावाजी विजयदुर्गी होते त्यास पत्रें घेऊन च्यार माहालचे वतनास कज्या करून हक इनाम त्याचे आश्र्याने खात होता त्याचे स्त्री आहे तिजला भोगवटीने तुम्ही देता यैसियास कानोवाचा बाप यास रगोवा ना० याचे मुतालकी होती वतनास त्यास समध नाही रा० —— थोरले कैलासवासी याचे कारकीर्दीस मुतालिकीस नरसोवा ना० त्याणी ठेविला होता मातुश्री ताराबाई साहेब पनालियास आल्याउपरी रा० गणोवा ना० जाऊन भेटले तेव्हा वर्तमान विदित केलें त्यावरोन मनास आणून कानोवा ना० यास पत्रें दिल्हीं ते रद म्हणून राजपत्रें यास करून दिल्हीं आहेत तुम्ही तीं पत्रें पाहून याचे सरदेशमुखीचे वतनाचा हक इनाम काम कारभार याचे हाते घेऊन चालवीत जाणें जा० छ ९ जिलकाद बहुत काय लिहिणें मो. ६

ले. २२१ तालिक श्री ता. १५।१२।१७४३

रा० तुलाजी आंगरे गो० यांसी

छ [अ०] स्नो श्रीनिवास परशराम प्रतिनिधि आसीर्वाद उपरी [ये०] वि० रा० अंतोवा ना० सरदेसाई मा० प्रभावली व दाभोल हुजुर दर्शनास आले याचे सरदेशमुखीचे वतन संगमेस्वर माहाल इनाम गांव व घामापुर व कोंड असुडें व कुंभारखाणी व वेसराडचा कोंड आहेत त्यास त्याचे गावचा इनामतीचा व गावगना इनामतीचा वसूल घेतां म्हणोन कलो आलें तरी पुरातन त्याचे गांव व ठिकाणें त्यास तुम्हाकडे इजारादाखल दिल्हा तेव्हां येतर्फेने वसूल दिवाणांत नव्हता विशालगडतर्फेने व रत्नागिरितर्फेने व येतर्फेने इनाम चालत होते यैसे असतां तुम्ही त्याचे गावचा वसूल घेता हे उचित नाही वतनदार त्याचे चालवणें आम्हास अवश्यक आहे तरी त्याचे गावचा वसूल न घेणें त्याचे गाव त्याकडे देखिल ठिकाणे गांवगंना जमीन इनामत आहे ते चालवणे हक दर सदेस अर्डीच लाहारी सरदेशमुखीस देखीललाजिमा आहे त्याप्रमाणें व देशमुखीचे हक गावगना आठसे साडेबासष्ट लाहारी मोईन आहे व कानुकाइदे आहे त्याप्रमाणे चालवणें याविसीं अंतर न करणे जाणिजे छ ९ जिल्काद बहुत काय लिहिणें.

ले० २२२ शि०५१. श्री. ता. १५-९-१७४४.

छ मौ अनाम देशमुख व देशपांडे माहालाये सुभा प्रांत राजापुर यांसि जगजीवन परशराम सु॥ ११४५ प्रांत मजकूरचे हक लाजिमा व इनामती पुरातन रा० आतोवा नाईक सरदेसाई यांजकडे याचे कारकीर्दीस चालत आले आहे त्याप्रमाणे त्याचे पुत्र रा० नरहरी नाईक सरदेसाई याजकडे करार आहे तरी यांसी रुजु होऊन सालाबाद ज्याप्रमाणे चालत आले आहे त्याप्रमाणे याचे याजकडे हक लाजिमा सुरळीतपणें पाववीत जाणे ताकीद असे जाणिजे छ २० साबान मो० १२.

टीप—जगजीवन परशराम यांची या आशयाची तारीख मजकूरची

दुसरी ताकीद मौ अनाम देशमुख व देशपाडे ता पांवस प्रांत राजापुर यांस मौजे कोलवे ता मार येथील " आगासेची बाग " बद्दल गेली आहे—सं.

ले० २२३ शि० ४६. हु. ता. २७-१२-१७४५.

बजानेब आमीलांन हाल व इस्तिकबाल व देशमुखान व देशपांडेयान व मुकदमान व ज्यमीअ ज्यमीदारान व रयान ता गोहागर मा. हमजा-बाद मीन अमाल बंदर मैमून मुस्तफाबाद ऊर्फ दाभोल ताळुके किले मह-रूसे जजीरे दंडाराजपुरी सरकार तलकोंकण आदिलखानी मिनमजाफ सुबे दारुलजफर बिजापुर बिदानंद के सु॥ ११४४ चूं दरींविला मशहूरुल् अनाम प्रहराद ना. बिन गणेबा ना० सरदेशाई सुभा मा. मजकूर प्रांत राजापुर यांही हुजुर अर्ज केला की मौजे वेलदुर ता मजकूर ये जागां खारवट जमीन दर्यागर्क होती ते आपले चिच्या दादोबा ना० सरदेशाई याही नौ बंदिस्त करून हुजुर अर्ज करून पोहचाविला बादज ते खार मजकूर मेहरबान होऊन ज्यामीखां साहेबीं इनाम मऱ्हंमत करून सनद असनाद करून दिल्ही तेमोजीब इनाम जारी चालत आले ऽ से अंमा साल मजकुरीं पेठ अंजनवेलीस फुल लागोन आपले घर जळाले त्यामध्ये संनदपत्र होतीं ते सोख्त होऊन गेली असे याबदल हाली मेहरबान होऊन ताजी संनद मऱ्हंमत फर्माऊन बऔलाद व अहफाद भोगवटा जारी चाले तो हुकुम फर्माविला पाहिजे म्हणौन अर्ज केला त्यावरून खातिरेस आणितां सदरहू खार मजकूर दादोबा ना० सरदेशाई मशारनिलेनीं नौ बंदिस्त केली यावर हुजुरून हजरत वली ज्यामीखान वालाशान बुलंदमकान म०० रतनिशान सानी याकूतखान साहेबांचे वख्तीं इनाम यैनायेत होऊन जारी चालत असे त्याची संनद असनाद सोख्त होऊन गेली याकरितां हाली बुजरु-गांचे यैनायतीवर व इनामतीचे भोगवटियावर नजर देऊन सरदेशाई मशारनिले सरजमीदार नेकख्वाहा सरकारी येकसान आहेत ल्याहाजा नजरबरां अज रूये मेहरबानी सदरहू खार मजकूर इनाम जारी फर्माऊन यैनावत केली असे आण भोगवटा पुस्त दर पुस्त चालावयाचे मुकरर करून

दिल्हे असे जमीन बिघे

गोडी जमीन कुडई बिघे	८। ८	८४
खाजणी खार जमीन बिघे	८३॥४	

यासी हद महदूद

पूर्वेकडील डोंगर वेलदूर पाणलोट १	पश्चिमेकडे खाडी असे १	उत्तरेकडे १	दक्षिणेकडे गोठणची चेची असे १

सदरहूमोजिब खार मजकूर गोडे जमीनीदेखील हद महदूद मवाफिक इनाम दुशकस करून मऱ्हमत केली असे तर खार मजकूर सरदेशाई मोमाइलेस बऔलाद व अहफाद इनाम मुकर्रर जाणौन सदरहू जमीनीचा धारा पट्टी वगैरा कुल बाब कुल कानुनात देखील दिवाण दस्ताचा राजभाग जे साली जो आकार होत जाईल तो कुल बाब सरदेशाई मशारनिलेचे तसरुफा तवागु जास्त करून बऔलाद व अहफाद इनामत खर्च लिहीत जाणे व वेठबिगार जे हदफर्मास जे जमीयेत कालिफ दिवानी कोण्हे बाबे मुजाहिम न होणे दरीबाब ताकीद समजोन हसबुलमस्तुर अमलांत आणून सदरहू खार मजकूर साल दर साल इनाम जारी राखोन पुस्त दर पुस्त भोगवटा चालवित जाणे साल दर साल ताजे सनदेचा उजूर न करणे नकल घेऊन असल फिराऊन देणे परवानगी हुजुर रा। जीवरख जबानी रघूजी बोरकर अफराद रवाना छ १४ माहे जिल्हेज सन २७ जुलुस मोर्तब सुद मो. ३५.

ले० २२४ शि० ३४ श्री ता. ८।७।१७४७

आ० रा० कानोजी राजे सिर्के ताहा खोत मौजे तनाली ता। वेलंब सु॥ ११४८ मौजे मजकूर हा गाव रा० सदासिव ना० सरदेसाई सुभा मामले दाभोल व प्रांत राजापुर याजकडे पुरातन त्यांचे वडिलांपासून वतनी इनामत चालत आला आहे त्याप्रमाणे इकडील तकसीम त्यांस इनामत देवविली आहे तरी साल दर साल आकार सरकार तकसीम जे होईल ते खोत बाबती मारनुलेकडे वंशपरंपरा वसूल देत जाणे [क०] जा० रवाना छ १० रजब मोर्तब सुद मो. ३४

ले. २२५ नक्कल. श्री ता० २३।२।१७५०

[अ०] रा० नरहर नाईक सरदेसाई गो० यांसी
सेवक अमृतराव कृष्ण प्रतिनिधि नमस्कार सु॥ ११५० वाो बालंभट व आपाभट सप्रे वास्तव्य कसबा सगमेश्वर याणी विशालगडचे मुकामी विनंति केली की आम्ही सरदेसाई याचे उपाध्ये त्यांच्येथील सर्व अनुस्टान प्रसंग चालऊन उदद्रे परंपरेने घेत आलो हली रघुनाथभट रेमणा येहीं नवीन कथला ग्रामोपाध्यपणाविसी मुजीत सरदेसाई याचे येथे आम्हाशी कशाविसी आरंभिला त्यास आणून चौकसी होऊन निरवेध वृती आमची चालत आल्याप्रमाणें चाले ऐसी सरदेशमुखास आज्ञा असावी म्हणोन त्यांजवरून रेमणे मजकूर यास बलाऊन चौकशी पाहातां रेमणे यांसी कधीं विशय देशमुखाकडील मिलाला नाहीं व येविसी उधो शामजी यास माहितगारी विचारितां त्याणी सांगितले सरदेसाई व आम्ही सरपोतदार ग्रामोपाध्ये धर्माधिकारी यास अक्षत सुधा देत नाही असी पुरातन चाल आहे व आणखी राजापुर प्रांती प्राचीन जमेदार याचे घरीहि असीच चाल आहे त्यावरून हे आज्ञापत्र सादर केले असे तरी सप्रे याची वृती पुरातन तुमचेथील तुम्ही सप्रे यास विशय देत आल्याप्रमाणे देणे ग्रामोपाध्ये धर्माधिकारी याचा समंध नसे त्यास न देणे छ २६ रबिलावल

ले. २२६ (नकल) श्री स. १७५१।५२

पटी हक देशमुखी ता। संगमेस्वर लारी ७५० सु॥ ११५२ किता गाव

३७॥ क० संगमेस्वर	१२॥ लोवले	१० बोरसूत	१८॥ वासी
१२॥ माभले	१५ सिवने	७॥ कुले	५ किजले
७॥ करबेले	१२॥ तेरिये	७॥ देवोले	७॥ फणसवेट
१२॥ मजरे सोनवडे	१० साइले	१० नादलज	१० मुरडुवे
३७॥ कडवई	२२॥ चिखली	१८॥ आंबवे	१० वाइगणी
१५ रांगाव	७॥ सेनवडे	३॥ चापित्रणे	१५ वाडा वोंजरी
१२॥ कुचाबे	२॥ कोंड भैरव	२२॥ आंबेड्ड बु॥	२० कोलंबे

१२॥	सेत्रवणे	१५	फणसवणे	१०	उचगाव	२५	कुरधोडे
१५	श्रींगारपुर	१०	तिवरे	१२॥	वोझरखोल	२॥	वाडा निउली
२५	गोलवली	२०	तुरल	२०	धामणी	२॥	कोंड आंबेड्ड
२॥	मजरे आंबेट	२२॥	सरंद	५	आंबेड्ड खुर्द	१८॥।	असुर्डे
३३॥।	डिंगणी	२२॥	करजुवे	११।	भिरकोडे	१५	पिंरंदवणें
१०	अंत्रवली	५	हेदली	३०	कलंबस्ते	५	अणदरी
७॥	गौली माहाल	०		७॥	नाइरी	०	

४१८॥।   ३३१।

७००

याचे असंल पटी सातारियासी हारपली पाहिले लाहारी ६०० व ज्याजती करवीराहून करून घेतल्या १५० येकूण साडेसातसे मिलोन सातारेयाहूनं पत्रे करूनं घ्यावयावद्दल श्रीमंत रा.—— पंत प्रतिनिधि याजकडे करवीरची पत्रें व पटी नेली ते राजपत्रे व पटी तेथेच हारपली तेव्हां श्रीमंत रा० सिरपतराव प्रतिनिधि याची पत्रें याप्रा करूनं घेतली ती आहेत.

ले.२२७ (तालीक) श्री स. १७५१।५२

(वरील प्रमाणेंच खालील दोनी पट्यांची हकीकत आहे——सं)

पटीहक्क तर्फ कोंडिवरे

देशमुखी लाहारी ११२॥		सरदेशकुलकर्णी लारी	येकून रुो
१५॥।	कसबा कोंडिवरे	१०॥	३
१७॥	आरवली	११।६	३।
१४॥।	मुरड्ड	१३८६	३॥।≡
१२।	उमरे	५।	१॥
१२।	तांबेड्ड	४।६	१।
५।	आबेर सिंदे	३॥	१
१५॥।	कुंभारखाणी व मुर्वे	१४	४
८॥।	मासरंग	४।६	१।

५	निवली	३॥९	१८=
५।	कारबेट	०	०
०	कारभाटले	४।६	१।
०	बुरवाड नि॥ सरदेसाई सबब	०	०
११२॥		७४॥३	२१॥

ले०२२८ श्री ता. ५।२।१७५३ ते ११।३।१७५३ पर्यंत

हिसेब कर्ज देणे श्रीदेवाचे व खासगत रा. सरदेशाई मुकाम विशालगड कारकीर्द रा० भास्कर विश्वनाथ तुलाजी आगरे याचा वेढा विशालगडास आला ते समई दिवाणातून मागितले रुपये त्याब॥ श्रीदेवाच्या वस्ता सोन्यारुप्याच्या व सिलिक पुतल्या व पडदले रुप्याचे यैशा वस्ता होत्या त्या मोडून दिले ते कर्ज देणे सु॥ ११५३ जमा पोतां येकांदर —— रु.

(पोटतपशील कांहीं कांहीं सोडला आहे—सं.)

येकून रुपये

५९० श्रीचे नग—५३२॥ सोनें, ५७॥ रुपे,

१२३।≡ सिलिक पुतल्या व कचकडे—९८।≡ पुतल्याफाशा समेत १९ वजन ८८८५॥।१॥ दर १६॥ प्रो

२५ रुपे पडदले कचकड्याचे, येकून

७१३।≡

(यास पुढें दागिन्यांचा तपशील दिला आहे, त्यांत देवाच्या छत्रीपताका निशाणें, कंबरेची सांखळी, श्रीदुर्गेची गळसरी-पुतळ्या, वगैरे सोन्याचे दागिने; व हलकार्त्या, गिंड्या, अभिषेकपात्रें, कुंच्याची मूठ, वगैरे रुप्याचे जिंनस—त्यांचें वजन व किंमत नमूद आहे— सं०)

तेरीज येकांदर सोनें ८८१।४॥।॥ किं. ५३२॥ रु.

तेरीज येकांदर रुपे वजन खरें ८८२।४॥

पैकीं वजा रुपे डाकामुले सुनाखास वाईट आले सबब गाळून खरें केले सबब तूट वजन खरें ८८८३। बाकी रुपें वजन खरें ८८२।१। किं ५७॥ रु.

५९० रु.

सिलीकपैकीं सोने व रुपें वजन खरें

सोने पुतल्या	८८८५॥।१॥	किं.	९८।≡
रुपें	८८१	किं.	२५
	८८१८५॥।१॥		१२३।≡

सोने मातुश्री दुर्गा आजीबाई बा॥ पुतल्या फाशासमेत २४ पैकीं बाकी १९ तो यैवज रा० शामजी नायेक याचा सिलिक होता तो

रुपें पडदलें कचकड्याचे तीर्थरूप अंतोबा ना० याचे

(या पुढें पुनः तपशीलवार तेरीज आहे—सं०)

ले० २२९ शि०:६ श्री. ता० १९।११।१७५४

अज स्वारी रा० खंडोजी माणकर सुभेदार प्रांत राजापुर व दाभोल व ता। रयानी मौजे माभलें व मौजे उबरें व अणदरी ता। संगमेश्वर सु॥ ११५५ देहाये मजकूर साल्गुदस्तां रा० नरहरी ना० सरदेसाई याजकडे तीनी गाऊ खोत्या होत्या त्याप्रा। करार असेल गांवचा वतनदार खोत असेल तो सुभां रुजु होऊन आपली खोती म्हणोन वाद सांगेल तेव्हां उभयतांचे करीने मनास आणून खरा वततदार खोत होईल त्याचे स्वाधीन खोत्या केल्या जातील तोपावेतों म॥रनिल्हेकडे रुजुवात राहोन वसूलवासूल पूर्ववतप्रा। यांचे विद्यमाने देत जाणे छ ४ माहे सफर मोर्तब सुद मो०२१.

ले० २३० (तालीक) श्री. ता० १९।११।१७५४.

अजस्वारी रा० खंडोजी माणकर सुभेदार प्रांत राजापुर व दाभोल ता। रयान देहाय ता। संगमेश्वर ——— १ क० संगमेश्वर १ मौ० धामापुर १ मौ० मावलगे १ मौ० कुंभारखाणी खुर्द १ मौ० मुचरी ५ कोंड असुर्डे १ ढिकणात १ वाडा वेसराड १ मौ० बुरबाड सु॥ ११५५ देहाय मजकूरच्या पुरातन वतनी खोत्या रा० नरहरी ना० सरदेसाई याजकडे चालत आल्या आहेत त्याप्रों करार असत तरी तुम्ही यांचे रजातलबेत वर्तत जाणे जा० छ ४ माहे सफर.

ले. २३१ (तालीक) श्री ता० २३।२।१७५६

[रा०] रामाजी माहादेव स्वामी गो० यांसी

पौ बालाजी बाजीराव प्रधान न० विनंति उपरी [ये०] विशेष रा० केशव ना० व शामजी ना० व सदाशिव ना० व नरहारि ना० सरदेसाई सुभा प्रांत राजापुर व दाभोल यांणी हुजुर विदित केले कीं प्रांत मजकूरचे सरदेसाईपणाचे वतन आपले पहिल्यापासून चालत आल्याप्रमाणे चालवावयाची आज्ञा करावी म्हणोन त्याजवरून हे पत्र सादर केले असे तरी यांचे वतन चालते त्याप्रों चालवणे कानुकाईदे व गांव व हकलाजीमा सुधामत चालत आल्याप्रों चालवणे छ २२ जमादिलौवल सुा। ११५६ बहुत काय लिहिणे

ले.२३२ शि.३६ श्री ता. ५ मे १७५६

रा० सुभानजीराव सुर्वे गो० यांसी

छ [अ०] श्रो खंडोजी माणकर सुभेदार प्रांत राजापुर रामराम सुा।११५६ मौजे मुचरी ताा संगमेस्वर या गावचे खोती रा० सरदेसाई मा० प्रभानवली व दाभोल याजकडे पेशजीपासून चालत आली होती त्यास गुदस्तां दंग्यामुले त्याचे कमावीसदारानें सोडिली सरकारात पत्र लेहून दिल्हे होते त्यावरी तुमचे स्वाधीन केली होती त्यास हाली मारनिल्हे हुजुरून ताकीदपत्रे वतनाची घेऊन आले त्यावरून सदरहू खोती मारनिल्हेची त्याचे स्वाधीन केली असे तुम्ही त्याचे स्वाधीन करणे जाणिजे छ ५ साबान बहुत काय लिहिणे मो० २१

ले०२३३ शि.३६ श्री ता. ५।५।१७५६

छ मो। अनाम देशमुख व देशकुलकर्णी व खोतानी जकायतीदारानी व मीठबंदरानी व मिठागरानी माहालनिहाये सुभाप्रांत राजापुर यांसी— खंडोजी माणकर सुभेदार प्रांत मजकूर सुहुर सन ११५६ रा० केशव ना० व शामजी ना० व सदाशिव ना० व नरहरि ना० सरदेसाई मा० प्रभान-

चली व दाभोल यांणी हुजुर श्रीमंत राजश्री —— पंत प्रधान स्वामी-
पासी जाऊन विदित केले की सुभे मजकुरी पूर्वापार आपले वतन परंपरा-
गत सरदेशमुखी व संगमेस्वर कोंडिवरे तर्फेची देशमुखी गावगना हक
लवाजिमा इनाम जमीन व गाव खोतीगाव चालत आले आहेत त्याप्रमाणें
ताकीद सुभांस देऊन चालवावे त्यावरून हुजुरची सनद छ २२ जमादि
लौवलची सादर जाली तेथे आज्ञा कीं सरदेसाई मारनिले याचे वतन
सरदेशमुखी व देशमुखी हक लवाजिमा इनामगाव जमीन व खोतीगाव
व कानुकाईदे चालत आल्याप्रमाणे चालवणे त्यावरून हाली हे ताकीद-
पत्र सादर केले असें तर सदरहू वतन चालत आल्याप्रमाणें चालवणे प्रति-
वर्षी [क०] [व०] जाणिजे छ ५ माहे साबान मोर्तब सुद मो. २१

ले. २३४ श्री ता० १७।८।१७५८

रा. चिमाजी माणकर नामजाद ता० अंजनवेल गो यासी—
छ [अ०] ——श्रो बालाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद
सु॥११५९ तर्फ सांवर्डे येथील साहा गांवी विशालगड तर्फेचा अमल आहे
त्याचा मक्ता अंगारकाचे कारकीर्दीपासून साहासें रुपये किले मजकुराकडे
पावत आले त्याप्रमाणें तुम्ही चालवावें ते चालवीत नाही अडथला करितां
म्हणून राजश्री अमृतराव कृष्ण प्रतिनिधि याणी हुजुर लिहिले त्यावरून हें
पत्र तुम्हास सादर केले असे तरी सदरहू साहा गांवचा मक्ता पेसजी अंगा
रकाचे कारकीर्दीस चालत आल्याप्रमाणें तुम्ही चालवणें सुदामत अमलास
नवीच दिकत न घेणें जाणिजे छ१२ जिल्हेज बहुत काय लिहिणे मो.११

ले.२३५ श्री ता० १७।८।१७५८

[अ०] रा० नारो गोविंद व त्रिंबक राम व रामाजी बलाल
कमाविसदार जकात ता। अजणवेली गो० यांस
सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ ११५९ घाट तिवरा व
कुंभारला व मीठबंदर कसबें चिपळूण येथे विशालगडतर्फेचा अमल सुदा

मत चालत आल्याप्रमाणें तुम्ही चालो देत नाही अडथला करिता म्हणोन रा० अमृतराव कृष्ण प्रतिनिधि याणी हुजुर लिहिलें त्यावरून हें पत्र तुम्हास सादर केले असें तरी मशारनिलेकडील विशालगडतर्फेने सदरहू ठिकाणी जकातीचा अमल अगारकाचें कारकीर्दीत चालत आल्याप्रमाणें तुम्ही चालवणें सुदामत चालत आले असेल त्यास नवा अडथला न करणें अगारकाचे कारकीर्दीत चालत आल्याप्रमाणे चालवणें जाणिजे छ १२ जिल्हेज आज्ञा प्रमाण मो. ११

ले. २३६ श्री ता. १।१२।१७५८

रा. नरहरी ना० सरदेशाई ताा कमाविसदार मौजे नाखरे ताा पावस सुा। ११५९ मौजे मजकुराकडे हक लवाजिमाचा यैवज व तेल मण सवा व साल गुदस्त समान दुसाला बाकी रुपये आठराहा व तेल नालिवे वजन खरे ८॥· आदमण येणे ते वो लक्ष्मणभट पालकर यासी हिसेबावरून देऊ यैसे कबूल करून आद्याप भाग वारिला नाही यावरून काये म्हणावे हालीं सदर आठराहा रुपये व तेल आणविले आसे पाठवून देणे या कामास पाा आहेत यासी खर्चास रु॥ ८= चवल देणे छ २९ रबिलौवल मो. ३८.

ले. २३७ } शिक्का वर्तुलाकार-श्री राजा शाहु नरपति हर्षनीधान बाळाजी बाजीराव प्रधान { स. १७५९ चे सुमारास

० ० ० ० ० ० ० रत्नागिरि गो० यांसी

छ [अ०]——० ० ० बालाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद सुा। इहिदे ० ० ० ० मया व अलफ गणोबा ना० सरदेसाई प्राा राजापुर सुभा प्रां दाभोल याणी हुजुर विदित केलें की सदाशिव ना० सरदेसाई प्राा मांर हे इतके रोज वतनावरून परागंदा होते त्यास गुदस्ता येऊन रा. मोराजी सिंदें याजकडे सुभा रत्नागिरीस जाऊन त्यास वर्तमान खरे लटकें सांगून केशव ना० सरदेसाई यांजकडे वतन होते तें आपण घेऊन त्यास


घालवितात वतनावरी पेशजी नानाप्रकारें कर्जियें पडोन कर्जवाम आपणा-वरी व केशव नाईक याजवरी जाले त्याची तकसीम न देतां वतन बलका-वितात तरी येविशी ताकीद करावी म्हणोन येशास सदाशिव नाईक पंरा-गंदा असतां मागें याजवरी वतनसमधें कर्जवाम जाले असेल त्याचे तक-सीमेची वाट सदाशिव नाईक याजपासून न करविता वतन तुम्ही त्याचे हवाली काय निमित्य केलें हाली हे पत्र सादर केलें असे तरी चौघाचे विचारें वाजवी सदाशिव नाईक याणी सदरहू कर्जाची तकसीम द्यावी असे असोन सदाशिव नाईक नोदिग्र करूं लागलियास येविसीचें सविस्तर हुजुर लेहून पाठवणें जाणिजे छ १० साबान बहुत काय लिहिणे मो. ३७

लें० २३८ श्री. स. १७६१.

प्रल्हाद ना० बिन गणोबा ना० यांची पत्रिका दप्तरीं मिळाली त्यांतून कुंडलीसहित जरूर तेवढी माहिती येथें दिली आहे.

स्वस्तिश्रीनृपशालि० शके १६८२ विक्रमसंवत्सरे मार्गशीर्षमासे अमा-वास्यां भौमवासरे (मंगळवार ता० ६ जान्यु० १७६१ ई०) घटिका १८ पळें १८ नक्षत्र पूर्वाषाढा। घटिका २१ योग व्याघात। दिनमान २७।३६ रात्रिमान ३२।२४ सूर्योदयानंतर घटिका ४ पळे ५४ मकर लग्नोदये श्रीमत् गणोबा नायकानां पत्नी सावित्रीबाई पुत्ररत्नं प्रथमं अजिजनत जन्म नक्षत्र पूर्वाषाढा तृ० चरणः राश धन। अवकहडाख्यचक्रानुसारि अभिधानं फाट-केति। व्यावहरिकं नाम प्रल्हाद नाईकेति गुप्त नाम गुंडोबा। घातति० ३।८।१३। घातवारः भृगुः। घातनक्षत्रं भरणिः। घातचंद्रः ४। घातलग्नं ९। मनुष्यगणः।

जन्मलग्नकुडली.



लें० २३९ (नकल) श्री. ता० १ मे १७६६.

आ. [स०] कृष्णाजी अमृतराऊ प्रतिनिधि तां गोविंदराव बिन बाबाजीराव व विठोजीराव बिन संभाजीराव व धोंडजीराव बिन गंगाजीराव सुर्वे खोत मौजे मुचरी ताा संगमेस्वर सुभा प्रांत राजापुर सु॥ ११६६ तुम्ही किले विशालगडचे मुकामी हुजुर येऊन विदित केले की मौजे मजकुरची खोती वतनी पुरातन आपली त्यास धामधुमीच्या प्रसंगामुळे बहुत दिवस परागंदा होऊन बाहिर गेलो होतो याकरिता मौजे मजकूरची खोती रा० सरदेशमुख चालवीत होते येशास खोतीचा उपभोग करावयाबद्दल गांवास आलो आहो तरी स्वामीनी कृपाळु होऊन खोतीचे वतन आमचे आम्हाकडे करार करून द्यावे म्हणौन त्यावरून मनास आणिता तुम्ही धामधुमीमुळे परागंदा जाहला होता त्यास्तव खोतीचा भोगवटा राहिला हे जाणून मौजे मजकूरची खोती वतनी तुम्हास करार करून देऊन हे आज्ञापत्र सादर केलें असे तरी खोती आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपराने अणभऊन सुखरूप राहणे तुम्हापासून सरकारात नजर रुपये १२०१ येक हजार दोनसे यक रुपये घेतले असेत छ २१ माहे जिलकाद.

वरकड पत्रें येणेप्रमाणें

१ देशाधिकारी व देशलेखक व० भा० ताा संगमेस्वर

१ ताा रयानी मौजे मुचरी

१ मोाअनाम देशमुख व देशकुलकर्णी ताा संगमेस्वर सुभा प्रांत राजापुर.

लें० २४० श्री. ता० २० ते २३।२।१७६९.

दाभोल सुभाचे कागद कार्याचे चिरंजीव नारोबा नाईक याजसमागमें पुण्यास पाठवावयास दिल्हे विद्यमान गु॥ रा० भास्कर विस्वनाथ सु॥ ११६९ माहे सवाल छ १५ रोज गुरु

१ राजाराम याचे पत्र विठल गोपाल सभासद यांस शके २२ युवनाम संवछरे यकंदर चालत आल्याप्रो कानु जांबता

२ शाहुराज्याची पत्रें शके ४५ विलंबी संवछरे

१ कानोजी आंगरे यांसी पत्र कीं दाभोल सुभाचे वतन चालत आल्याप्रो चालवीत जाणे

१ खोतानी व रयानी माहालानिहाय मा. दाभोल यांसी पत्र कीं चालत आल्याप्रो हक लवाजिमा इनामत देत जाणे ह्मणोन पत्र

२ सेखोजी आगरे याची पत्रें

१ दादोवा ना. याचे नांवाची हुजत रु॥ ३२० तीनसे वीस हरकीपैकीं छ २६ माहे रा॥कर सु॥ ११३३.

१ हरकीची याद मा. प्रभावली व दाभोल दुम कुलाब सु॥ सलास नकद याची असे सदरहु रुजु तालीक

५

लें० २४१ श्री नरहरिवरद स. १७७५ ते १७८०पर्यंत

चिरंजीव सौ सगुणाबाई व गुंडोवा नाईक या प्रति शामजी नायेक आसीर्वाद तुमचे कृपेकरून कासीक्षेत्रीं सुखरूप असों विशेष आमचे वडिलांची पत्रे तीर्थरूप रा। विसाजी नायक याची राजश्री यज्ञेस्वर पाध्ये यांजवल वतनी ठेविली होती ती दाभोल सुभाची दोन खुर्द खते २ आणि येक हिंदवी इज्यार असी ठविली होते रा। भास्कर विस्वनाथ याणी ते बलकाऊन आमी कासी आलियावर घेऊन तुमचे खावदाजवल दिली असे ती त्याची याद राऊ याजवल आहे ते याद पाहोन यज्ञेस्व पाध्ये व कासी पाध्ये गोलकर व चिरजीव नारोवा नाई तीर्थं रा। केशव ना० याचे पुत्राचे गुजारतीने त्याचे स्वाधीन पत्र उपाध्याचे स्वाधीन वतनी पत्र आमची पुरातन त्याचे स्वाधीन करणे न करा तर येथें श्रीमंत मातुश्री सुंदराबाईचे देणे रुा आमी आहेत त्याचे स्वाधीन आमी आपल तक्षीम करून हे पष्ट समजोन पत्रे देणे उपाध्याचे घर बुडेल त आणि आम तक्षीम गावसीव सरकारत पडतील हे बरे समजोन दूरदाराज पाऊन पत्रे देणें मग आमी आपला ज्यास विभाग देऊ त्यास पत्रें देऊ येक वेल ईस्वरास भियोन लिहिले आहे याचे उतर अतिसीघ्र पाठऊन देणे जबाबाचा मार्ग लक्षीत असो लोभ कीजे हे आसीर्वाद

टीप— पत्रांतील अक्षरें गळलीं आहेत अशीं ठिकाणें वर दिसतील. अक्षर व एकंदर लिहिणें गचाळ आहे.

ले. २४२ श्रीनरहरिवरद सन १७७७ च्या सुमारें

चिरंजीवी सौभाग्यवती सगुणाबाई यांप्रति सदाशिव नायेक सरदेसाई आसीर्वाद उपर येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणे विशेष धामापुराकडे सरकारांतून रोखा जाहाला याकरितां बालाजी लक्ष्मण यांजकडून मोरोबा पा। त्यांस वसलाचा व पांचसाली हिसेबाचा तगादा लाविता म्हणोन त्यांची पत्रें आली आहेत ती पाहून संतोष जाहाला पांचसाली हिसेब तुमचा देणे तो मोरोबास हैरान केल्याने येतो यैसा मनसबा चिती आणिला आहे हिसेब तुम्हाकडील करावा वाजबी परंतु सीतापासून आम्हास कसाला पडिला तो तुम्हास ठाऊकच आहे आलीकडे तिसाला जमाबंदीचा इकडून ठराव नाहीं यंदा जमाबंदी ठरली आहे दोन वर्षे तुम्हांकडे जातांच नये यामुलें हिसेब न जाहाले तुमचा यैवज राहिला नाहीं तत्रापि हिसेब आम्हाकडून करून वासीलबाकी पुरवावी हें खरें या गोष्टीचा शब्द तुम्हाकडे नाहीं घरचा विच्यार यामुलें अधिकउणे दिवस लागले आतां श्रीने हे दिवस दाखविले तिसाली हिसेब हि जाहाले धामापुर माभले या दो गावची घालमेल आहे ते हिसेब होतील चिरंजीव बाबु व बालभट सरसुभांस गेले होते ते आले वर्षप्रतिपदा जाहालियानंतर पांचसाली हिसेब कागदपत्रसुधा कारकून पाठवून देतों सरकारचा धामापुराबर रोखा जाहाला आहे तुम्हाकडे यैवज पावला हिसेबामुलें बाकी निघत नाही अजमास आम्ही येथे पाहिला आहे निघाली तर देऊ मारोबास खालें पाठऊन देणे वरकड सविस्तर मागाहून रा॥ बालाजीपंत कामे येथील सांगता कलेल द्वैतभाव न धरितां आधी मोरोबास निरोप देविवणें कोणेविसी आम्हाकडून द्वैतभाव नाहीं तुम्हाकडून नसावा जनविरुध्ध असेल ते करू नये कोणाचाहि कागद गेला तरी उतर लिहावें हा ग्रहस्ताश्रमाचा धर्म आहे बहुत काय लिहिणे लोभ करावा हे आसीर्वाद

चिरंजीव राजश्री प्रल्हाद नाईक यांस आसीर्वाद लि॥ परिसीजे सविस्तर तुमचे मातुश्रीस लि॥ आहे त्यावरून कलेल.

टीप—पत्र प्रल्हाद ना० न लिहितां त्याच्या आईस लिहिलें आहे; तिला सौ० म्हटलें आहे—अर्थात तिच्या नवऱ्याच्या हयातींतील म्ह. स. १७८२चे पूर्वीचे आहे. प्रल्हाद अद्याप अज्ञान असला पाहिजे सबब नुसत्या आशीर्वादावर त्याची संभावना न करितां मजकूर परिसण्यास लिहिलें आहे—यावरून यावेळीं तो जाणता १५।१६ वर्षांचा असावा. १७६१ त त्याचा जन्म म्हणून पत्र स. १७७७ च्या पूर्वीचें नसावें.

ले० २४३ शि० ४० श्री. ता० २४।२।१७७७

आ० [स०] आबाजीराव पंडित प्रतिनिधि ताहां मुकादमानी देह ४१ ता मलकापुर सु॥ ११७७ रा० गणोबा ना० सरदेसाई मा० प्रभावली व दाभोल यांचे हक देहाये मजकुरीं पुरातन आहे ते सुधामत्त चालत नाहीं व पुढेंहि सुरलीत चालवावें येविसीं आज्ञा करावी म्हणोन सरदेसाई मा० मजकूर यांही किले विशालगडचे मुकामी येऊन विनंति केली म्हणोन त्यावरून मनास आणून सरदेशमुख यांचे हक पुरातनप्रमाणें चालवावें हे जाणोन येणेप्रमाणें गांवगना वि तो रुपये किता गांव

० कसबा २ येळूर १ यलाणें २ कोपर्डे २ आरूल
२॥ उकोली ३ आबर्डे ३॥ गजापुर २ यलवण ·॥· माजरे
·॥।· बुरंबाल ·॥· गिरगाव १ सेंबवणें १ गावडी ३ पणुदरे
० म्हालसवडें ० माण १ परले १ उचद ·॥· चनवाड
·॥· ससेगाव १॥ कोलगाव ·॥· मिलें ·॥।· केकणें (कलाणे?)
१॥ पुसार्ले १॥ कालजवडें ० पोंबरें ·॥।· कुंभवडें १ आणसकुरें
१ बरकी १ किसरूल १ कासर्डे ·॥· नावली
·॥।· वारूल १ चांदोली ·॥।· आंबे १ करगुलें १।· आलतुर
१ पिसात्री ·॥।· कोलिक ·॥· गोठणें ——— ५१॥।.

येकून पावणें बावन्न रुपये सदरहू नेमणुक बमोजिब बसाल दरसाल

द्यावयाची आज्ञा करून हे आज्ञापत्र सादर केले असे तरी सुरलीत पेशजी-पासून चालत आलें असेल त्याप्रमाणें साल दर साल देत जाणें उजूर न करणे छ १५ मोहरम पा। हुजुर मो. ४२.

ले० २४४ शि० ४० श्री गुरुवार ता० १०।४।१५८३

रा० प्रल्हाद ना० बिन गणोबा ना० व सदाशिव ना० बिन दादोबा ना० सरदेसाई मा० प्रभावली व सुभा दाभोल व देसाई ता। संगमेश्वर व कोंडिवरें गो यांसी

छ [अ०] सेवक आबाजीराऊ कृष्ण प्रतिनिधि न० सु॥ ११८३ तुम्हीं किले विशालगडचे मुकामी हुजुर विनंति केली कीं मौजे बोझरें बु॥ ता। देवरुख हा गांव पुरातन वतनी खोती आपला आपले वडील अनंतोबा नायक सरदेसाई मृत्य पावल्यानंतर गांव सरकारा-तून थलीवर ठेऊन वैवाट होत आली येशास स्वामीनी कृपाळु होऊन आमचा खोतिचा गांव वतनी आमचे स्वाधीन करून मुलुकशर्त उगवणी करून घ्यावी म्हणऊन त्याजवरून मनास आणितां मौजे मजकुरची खोती वतनी पुरातन तुमची मागील गांवच्या वैवटीचे कागदपत्र व महिमतगडतर्फेने कौल तुम्हांजवळ आहे तो तुम्हीं आणून दाखविला व गावांत घर घरबंदाची जागा तुमची आहे हे जाणोन तुम्हांवर कृपाळु होऊन मौजे मजकूरची खोती वतनी तुमची तुम्हांकडे करार करून देऊन भोगवटियास तुम्हांस हे पत्र करून दिल्हे असे तरी मौजे मारची खोती व खोतीसंमधें मान-पान कानुकायदे पुरातन चालत आल्याप्रा। तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंश-परंपरेने अनभऊन सुखरूप राहाणे खोतीसंमधें तुम्हांपासून सरकारांत नजर-आणा रुपये ११०० आकराशें घेतलें ते पोतां जमा असेत तुम्हीं गांवची मुलुकशर्त धान्याप्रमाणें उगवणी करून देत जाणें जाणिजे छ ७ जमादि-लौवल निदेश समक्ष मो. ४२.

ले० २४५ श्री ता०१९।२।१७९१.

पत्रांच्या नकला रवाना रत्नागिरीस तीा। रा० दादोबा नायक सरदेसाई यांजकडेस तां बालाजी चिमणाजी गोलवलकर———— किता

१ शके ५९ परिधावी नाम संवत्सरे श्रीराजाशंभु यांचें पत्र संगमेश्वर व कोंडिवरे देशमुखीचे हकाचे नेमणुकेविसीं

१ शके ५९ परिधावी सं० राजा शभु छ० यांचे पत्र रा० रघुराव श्रीनिवास यांस. देशमुखीचे वतनाविसी ————

१ रामराव बाबाजी यांस श्रीमंत मा० राजसबाई यांचे पत्र कोंड असुडें व कुंभारखाणी देशमुखीविसीं इनामाचें पत्र

१ शके ५२ विस्वावसु सं० राजा शंभु यांचें पत्र रा० सुंदर विझाजी यांस देशमुखीविसीं————

१ खोतानी देहाये ताा संगमेश्वर येथील खोतांस श्रीमंत रा. श्रीनिवास पंडित प्रतिनिधि यांचे पत्र देशमुखीचे हकाचे नेमणुकेविसीं————

१ शके ५९ परिधावी सं० राजा शंभु यांचे पत्र दादोबा ना० व अंतोबा ना० यांचे नावे देशमुखीचे हकाचे नेमणुकेविसी

येकूण साहा पत्रांच्या नकला सु॥ इहिदे तिसैन छ ८ जमादिलाकर रा॥ बालाजी चिमणाजी याखेरीज फर्मान देशमुखी व सरदेशमुखी व इनाम गांव सु॥ खंमस खमसैन व आलफ संन येक हजार पंचावंन्न

ले० २४६ शि. ९।७ श्री ता. १७।९।१७९७

[स्व०] ३४ सर्वजित्संवत्सरे आश्विन शु॥ त्रितीया सौम्यवासरे [क्ष० (शिव) (सोम० ना० देसाई व देशकुलकर्णी ताा सैतवडें)] रा. शाहूराजे ताम्राचे निबंधांतून निघाले आहेत म्हणून हुजुर वर्तमान आलें. यैशास हें राज्य थोरल्या कै० स्वामीनीं बहुतां श्रमें मेलऊन, सर्वांथें संपूर्ण केलें होतें. तें राजश्री संभाजी राजे काका यांणीं विध्वंसून कैलासवासी स्वामी राज्याधिकारी झाले. त्यांणीं स्वपराक्रमें नूतनच राज्य संपादिलें. स्वामींनीं

त्याचें संरक्षण करून ताम्राचा पराभव केला. राज्याची अभिवृद्धि होत चालली. दुसरी गोष्टी हें राज्य थोरल्या कै. स्वामींनीं तीर्थस्व. कै. स्वामीस द्यावेंसें केलें होतें. ऐसें असतां त्यांस या राज्याशीं समंध नाहीं. त्या डोहणियांत जे मिळाले आहेत व मिळतील त्यांस नतीजा पाववायाची आज्ञा करून, रा. जयसिंग जाधवराऊ सेनापति व हंबीरराव मोहिते सरलष्कर व वरकड सरदारांस फौजेनशीं पाठविले आहेत रा॰ परशराम पंडित प्रतिनिधि यांसहि रवाना केलें आहे. ज्यांचे अनुसंधान त्यांकडे लागलें असेल त्यांचा हे मुलाहिजा होणार नाहीं, शासन करितील. तुम्हीं वतनदार एकनिष्ठ आहां. तुम्हांपासून अनसारखी वर्तणूक होणार नाहीं. परंतु शाहूराजे यांजकडील कागदपत्र तुम्हास आले असतां कांहीं वर्तमान हुजुर लिहिलें नाहीं म्हणजे काय? त्यांकडून माणूस आले तेच कैद करून पाठवावयाचे होते ते गोष्टी न केली. यामध्यें बरें काय विचारिलें आहे? याउपरी ऐसें करीत न जाणें. कदाचित् कोण्ही त्यांकडे अनुसंधान लावील, राबता राखेल, तरी त्याचा उबार राहणार नाहीं. तुम्ही अनसारिखा प्रसंग मनांत आणाल, कागदपत्र येईल तो पन्हाम कराल, तरी तुमचें बरें होणार नाहीं. वतनापासून दूर व्हाल हें जाणोन, स्वामीच्या पायांशीं निष्ठा धरून राहोन, लिहिलेप्रमाणें वर्तणूक करणें. जाणिजे. मर्यादेयं विराजते. लेखनसीमा. मो.१. सुरू सूद बार.

[शाहु आणि ताराबाई यांच्या सन १७०७|०८ च्या ओढाताणींत वतनदारांवर ओढवलेल्या महत्संकटाचें वर्णन पृ. १२१ वर केलें आहे. वतनदारांस उभयतांकडून मिळालेल्या अस्सल ताकिदी आमच्या हातीं आल्या नाहींत; फक्त सैतवडें दप्तरांतील ताराबाईच्या आज्ञापत्राची नक्कल मिळाली. ती या दप्तरची नसली तरी तत्कालीन संकटाची रूपरेषा दाखविणारी असल्यानें येथें दिली आहे.—सं॰]

ले० २४७ श्रीनरहरिवरद स.१७१०ते १७१५च्या सुमारचा

हिसेब खा॥ दिमत गणोबा ना० सरदेसाई कर्ज द॥ रा० नरहरी कृष्ण व केसो कृष्ण व निलो कृष्ण खानवलीकर सु॥ खमस दाभोल सुभाचे मुतालिकीसंमध्ये कर्ज घेतले लारी दि॥ गणोबा ना० दि० विसोबा ना०
८०० ५००

सदरहूखेरीज कमाविसीकरिता लोक ठेविले व बास्कल २०० दोनशे (बाष्कळ=इतर सटरफटर–सं०) खर्च केला त्याउपरी बावाजी विश्वनाथ मु॥ त्याचे व सिवाजी केषव व एकराजी माहादेउ सरदेसपांडे व कृष्णाजी भास्कर मध्यस्त घालून सारं (ग) गडीचे मुकामी कर्ज वारिले खंड करार रुपये १५०० ———— यांस पावले गु॥ रुपये ————

५०० छ ३ जिल्हेज पौ क्षा ० ० राम आपा रुपये गु॥ नरहरपंत रोख
९० छ १६ जिल्हेज गु॥ कृष्णभट ता॥ नरोबा कारभारी त्याचे ० ०
१२८ छ २९ जिल्हेज गु॥ झिरमा व हाऱ्या ता॥ नरोबा कारभारी ८१ मोहरा ६ दर ।३॥ प्रो ४७ यैन रुपये
१५० छ १ मोहरम गु॥ कानोजी दि॥ कृष्णाजी भास्कर आबा ता॥ नरोबा द॥ कागद
१०० छ मार गु॥ पुतभट ता॥ नरोबा रुपये
३२ छ १५ मोहरम गु॥ गणसेट सोनार सारंगड
६५ छ ९ सफर गु॥ झिरमा व भिमा चाकर ता॥ जगनाथपंत ० ० ०
१५० छ १५ सफर सन सीत हवाला सिवाजी केषव तो॥ सभाजी नरसी बा॥ चिठी
१०० हक मामले दाभोळ पौ ता॥ श्रावणसेट व भट रा० नरहरपंताचे गु॥ दिल्हे
८५ गु॥ संभाजी आनंत ता॥ बावाजी विश्वनाथ ० ० ०
१०० सन सीत छ ० ० ० ० ० ० ० ० ता॥ केसो कृष्ण हक फुणगुस गु॥ नारो आनंत रुपये

१५००

सदर्हू तास नसता वारले पुढे खानवलीकराचे कर्ज नाही वतनावर कर्ज करणे तर सिकेनिसी पत्र घ्यावे तेव्हां कर्ज करावे म्हणोन बहुता देखत तह केला असे

टीप—दाभोळ सुभ्याच्या कारभारास ले. ५३ च्या करारानें नेमलेल्या मंडळीचा कारभार किती प्रामाणिकपणें व मालकाच्या हिताकडे लक्ष्य देऊन चालला होता हें या पत्रावरून दिसतें. यावेळचे सरदेशमुख स्वतः लक्ष्य पुरविणारे दक्ष व खबरदार होते, तरी कारभाऱ्यांनीं थोडी चुणुक दाखविलीच. पुढल्या मंडळींत दक्षता दिवसेंदिवस कमी होत चालली आणि पुढल्या कारभाऱ्यांचा हात अधिकाधिक फैलावूं लागला. अखेर त्यांनीं मालकांच्या डोक्यावरून पुरता हात फिरविला. पण इतकें करून हि कारभाऱ्यांची दैना संपली नाहीं ती नाहीं च! तेव्हां ईश्वरी नेमानेम म्हणावें झालें!—सं०.

[यानंतर प्रभावळी दप्तरांतले दोन कागद प्रसिद्ध करून त्या दप्तरचें काम तूर्त सन १८०० पर्यंत आणून ठेवित आहों. देशाचा संक्षिप्त इतिहास किंवा राजे व अधिकारी यांची नामावळी पूर्वी जमेदार व वतनदार लोकांच्या दप्तरीं कशी तयार करून ठेवीत, आणि त्यांवरून पुढल्या पिढ्यांस त्याची माहिती कशी करून देत, त्याचा बोध त्यांवरून होईल. पहिल्या कागदाचे १० बंद आहेत येथें त्यांचा बराच संक्षेप करून केवळ नांवनिशी दिली आहे. ऐतिहासिक दृष्ट्या तिचा कितपत उपयोग आहे हें तज्ञ ठरवितील. ही यादी देण्यांत पूर्वीच्या लोकांची ऐतिहासिक आवड व ती पुरी करण्याविषयीं त्यांची खटपट निदर्शनास आणण्याचा हेतु आहे. शिवाय असंभाव्य गोष्टीसुद्धां ऐतिहासिक समजून खऱ्या मानण्याची प्रवृत्ति सुमारें दीडदोनशें वर्षांपूर्वी कोंकणप्रांतीं सुशिक्षित वरिष्ठ वर्गांत देखील किती बळकट होती याचा हि पुरावा या लेखांत आहे; म्हणून घराण्याच्या वृत्तान्ताशीं संबंध नसतांहि हा लेख येथें समाविष्ट केला आहे.

दुसरा कागद रा. राजवाडे यांनीं 'इतिहास व ऐतिहासिक' पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत ले० ४१ म्हणून पृ. ६४ ते ७२ यांवर छापला

आहे. त्यांत दिल्लीचे बादशाहा, विजापुरचे सुलतान, मराठशाहीचे छत्रपति व पेशवे यांच्या कारकीर्दींच्या मुदती वगैरे देऊन अखेर कोकणप्रांतावरील शिद्दी अंमलदार व मराठी राज्यांतील सुभेदार यांचीं नांवें दिलीं आहेत. मुसलमान दिल्लीपतींपासून भट पेशव्यापर्यंतचीं नांवें आतां सर्वश्रुत असल्यानें तीं न देतां येथें फक्त या वृत्तान्ताशीं संबंध येणारीं आणि सामान्य वाचकांस अपरिचित अशीं सुभेदारांदिकांचीं तेवढीं नांवें दिलीं आहेत— स०]

लें० २४८ श्रीगणेशायनमः । १७२० च्या सुमारचा.

यादी जावता राजे व पातशाहा दिलीत ००० आरंभ कलयुगापासोन राजा युधिष्ठिर व पातशाहा व वरकड राजे जाहले त्यांचा तपसील पुरुष सुमार १७३

	मुदत वर्षे	महिने	दिवस
महाराष्ट्र राजे वर्षे	३९२३	१०	१
मुसलमान पातशाहा तां औरंग	८८४	६	९

राजा युधिष्ठिर याचे घराण्यांतील पुरुष सुमार ३० मुदत व. १८५३ म. ११ दि. १२

१ युधिष्ठिर २ परीक्षिति ३ जनमेजय ४ जयाश्वमेध ५ धर्मनिष्ठ ६ जायंजित ७ ०००थ ८ दिक्पाल ९ उग्रसेन १० सूरसेन ११ भूपति १२ रणजित १३ हरंजित १४ भीमसेन १५ सुककलंदेव १६ नरहरी १७सुनीतरथ १८ सूर १९ पर्वत २० मधुकर २१ तोडराज २२ भीमदेऊ २३ नरहर २४ ०००मल २५ सिरंगदेव २६ रामराव २७ अभिमन्यु २८ धनपाळ २९ भीम ३० लखमीदेव.

याउपरी लखमीदेवाचा वजीर वीरसेन होता त्याणे लखमीदेवास मारून राज्य घेतले. पुरुष १० वर्षे ४१८ महिने २ दिवस १३.

१ वीरसेन २ सुरसेन ३ वीरशा ४ अनंगशा ५ हररूप ६ सुरसेन ७ पर्वत ८ सुरपाल ९ द्रौपद १० पृथ्वीपाल.

याउपरी नरहरनाथ होता त्याणे परथवीपालास मारून राज्य घेतले- पुरुष १४ वर्षे सुमार ४१९ महिने २ दिवस ०

१ नरहरनाथ २ जैतासिंग ३ वैरागनाथ ४ दिकपाल ५ माहाबल
६ अमृतपाल ७ तेजपाल ८ माणिकदेव ९ कामचंद्र १० बिरगाण
११ जीवनगोड १२ रिजवंग १३ भार्गव १४ उदितकंठ.

याउपरी उदितकंठाचा मंत्री होता त्याणें उदितकंठास मारून राज्य
घेतले. पुरुष १६ वर्षे ३१० महिने २ दिवस १९ १ खासा मंत्री
२ चंद्रपाल ३ सुंदरपाल ४ देशपाल ५ रामपाल ६ माधवपाल ७ राजपाल
८ गोविंदपाल ९ भीमपाल १० अमृतपाल ११ बालपाल १२ मदनपाल
१३ भूपाल १४ परपाल १५ रामपाल १६ विक्रमपाल.

याउपरी नृपासिंग राजा याणें विक्रमपालास मारून राज्य घेतलें
पुरुष ५ मुदत वर्षे ४० महिने ० दिवस ०

१ नृपासिंग २ उदयपाल ३ श्रीपाल ४ केशवपाल ५ सादंत

याउपरी राजा विक्रमजित याणें राजा सादंत मारून राज्य घेतले
पुरुष १३ वर्षे १४८ महिने १० दिवस ०

१ विक्रमजित २ रामचंद ३ श्रीचंद ४ मुलुकचंद ५ कल्याणचंद
६ सुरचंद ७ भीमचंद ८ गोविंदचंद ९ भावती गोविंदचंदाची राणी
तिनें राज्य केले १० राजा प्रतिमल भावतीचे उदरी जाला ११ गोविंद
१२ पूर्णप्रेम १३ माहानंद

याउपरी जैसिंग बंगालयाहून आला त्याणे माहानंदास मारून आपण
राज्य घेतले पुरुष १२ मुदत वर्षे १४७८१८५— १ जयासिंग
२ सुरसेन २ क्षिरिसेन ४ माधवसेन ५ देवसेन ६ नरसेन ७ कल्याणसेन
८ हरिसेन ९ ब्रह्मसेन १० नारायणसेन ११ लखमीसेन १२ दामोदरसेन

याउपरी दामोदरसेन यास राजा माधवसेन उत्तरेकडून आला त्याणे
मारून राज्य घेतले पुरुष ६ मुदत वर्षे १०८८४८९— १ माध-
वसेन २ दिल (दम) सेन ३ राजासिंग ४ सारसिंग ५ वीरासिंग ६ नृपासिंग

याउपरी धीरधरसेन याणे नृपासिंग यास मारून राज्य घेतले पुरुष ९
मुदत वर्षे ३३२८३८२३— १ धीरधरसेन २ सेन ३ कंठ
४ माहादेव ५ वीरनाथ ६ जीवन ७ उदयासिंग ८ कुलानंद ९ लल्हाट.

याउपरी पृथ्वीपाल पूर्वेहून आला त्याणे लल्हाटास मारून राज्य घेतले पुरुष ५ मुदत वर्षे ८५८८८१०— १ पृथ्वीपाल २ दुरजनपाल ३ उदयपाल ४ चेनपाल ५ राजा पिठोरा.

याउपरी राजा पिठोरा यास मारून मुसलमान पातशाहा जाहाले पुरुष ५३ मुदत वर्षे ८८४८६८९— १ सुलतान रुकदीन २ बाहाबदीन ३ समसदीन ४ कुकुबदीन ५ शहादीन ६ बीबीनें पातशाही केली ७ सर्दी गोरी ८ गमासदीन गोरी ९ मोहिदीन गोरी १० हुसेन गोरी ११ जलादीन गोरी १२ फतबादीन गोरी १३ याकुबशाहा गोरी १४ समेसदीन गोरी १५ अलावलदीन गोरी.

पातशाहा शेतु (सेतुबंध रामेश्वर म्हणण्याचा हेतु) पावेतो कारभार फऊज घेऊन केला समुद्रापावेतो फऊजसुधा गेला तेथे फऊज सर्व आध (अंध) होऊन बुडाली खासा हाबीज काबीज दोघे सिपाई देखील खासा तिघे जण राहिले तेथील करामत पाहून जीवंत आसता जीतसमाधि घेतली त्याच दुरबती (तुर्वत म्हणजे थडगें असा शब्द असावा) वर पुतले पातशाहाचे आहेत चिरडीमार (चिडीमार?) पारसी अक्षर लिहिले आसत हाली करामत चालते हे सत्य १६ कुतुबुदीन गोरी १७ गमासंदीन गोरी १८ सेरमस्त गोरी १९ सुलतानशाहा गोरी २० आमीन शाहा बिन मा। शाहा २१ महमदशाहा बिलशा २२ शाहा कुली बिन फेरादे २३ सुलतान तागलू याने जुनी दिली मुस्तेद केली हाली खराबा असे व सालेरी मुल्हेरी किले बांधिले २४ दुरुमशाहा गोरी २५ महमद फतबुदीन २६ नसरदीन २७ मलुशाहा २८ तोडरशाहा २९ मोबारगशाहा ३० अलाविदीन पठाण बिन महमद ३१ हुसेनशाहा पठाण ३२ बलोलखान लोदी ३३ शिकंदर लोदी ३४ इभ्रमशाहा ३५ सिधु खत्री हरामखोर ३६ गाजीशाहा बिन मुदरशाहा ३७महमद उनी ३८बेवर बकस ३९तैमूर ४०बाबर ४१हुमायून ४२ सेरशाहा पठाण हुमायून पातशाहा धुडाऊन पातशाहाई केली ४३ शिलिकशाहा ४४ फरोकशाहा ४५ महमद बनगाजी ४६ इभ्रामखां ४७हेमू बकाल शिकंदरशाहाचा वजीर होता त्यानें पातशाही केली ४८हुमा-

यून पातशाहा याणे दुसरियाने फेरा करून हेमू वकाल यासी व पठाणास मारून पातशाही मागती घेतली ४९ अकबर लाल ५० ज्याहांगीर ५१ शाहाजहान ५२ ओरंगजेब–१ दाराशाहा १ शाहासुजा १ मुरादबक्ष १ आवरंगशाहा–सदरहू चवघे भाऊ त्याना आवरंजेबानी आपले तिघे भाऊ मारून बापास कयेद (कैद) करून पातशाही केली देखील दक्षण.

ले० २४९ सन १८०० चे सुमारचा

मामले बंदर मैमूने मुस्तफाबाद ऊर्फ दाभोल येथें सुभे होते ते—

१ मुस्तफाखान १ चागीजखान सरनोबत १ खुराशानखान गैबती पटाईत १ अफजलखान दीवान खासमजालस १ दौलतखान दीवान खासमजालस १ बडेखान दीवान खासमजालन १ मुतनखान दीवान मुजरी १ मीर अहमदखान दीवान खासमजालस १ साबुद्दीनखान १ (०००००००) १०

जंजीरे दंडाराजपुरीची पैवस्ती कोळी वगैरे होते सन सलास अशेरीन तिसा मिया—हबसी उलीखान मलीखान सन समान समानीन तिसा मिया मुदत ८१०८१०.

× × ×

मराठी राज्यांत दाभोल सुभांस सुभेदार आले—

कारकीर्द सिवाजी राजे	कारकीर्द संभाजी राजे ते आईसाहेब (ताराबाई)	
१ राघो बलाल अंत्रे		
१ राघो वासुदेव	१ विठल गोपाल	१ गंगाजी दादाजी सरसुभा
१ आबाजी माहादेव	१ रुद्रजी अनंत	१ माहादाजी बलाल
१ अंताजी रंगनाथ	१ कासी रंगनाथ	१ सिवाजी त्रिंबक
१ रामाजी अनंत सरसुभेदार	१ बापूजी आपाजी	१ कृष्णाजी परशराम
१ माहादाजी अनंत	१ माहादाजी राम	
१ बहिरो त्रिंबक सरसुभेदार		

(पुढील भाग मुळांतला अनुक्रम सोयीवार बदलून आणि आर्वी सन व हिंदी शक यांबद्दल इंग्रजी सन घालून आटपशीर केला आहे—सं०)

किले अंजणवेल

१ मराठेराज्यापासून हबशाने घेतली (सन १६९८–९९)

१ दंडाराजपुरीस हबसी याकूतखान दिलीहून आले सन १०५२ सिका–याकूतखानी अद्यापि तोच चालतो

१ तुलाजी आंगरे सरखेल यांणी शामलापासून घेतली (स. १६४४)

१ अमलदार—१ बाबूजी नाईक कदम (स. १७५०) १ आत्माजी-राव विचारे (स. १६५४ ते १६५६ जानेवारी)

१ श्रीमंत रा० पंत प्रधान याणी घेतली (१७५५) स्वारी रा० रामाजी माहादेव सुभेदार—कानोजी गजे हवालदार नि॥ रामाजी माहादेव (स. १७५७ मार्च पावेतों) चिमाजी माणकर (स. १७६१ जानेवारी) गणेश कृष्ण कोलटकर (१७६१ सपटंबर) चिमाजी माणकर (१७६१ अकटंबर ते १७६३ अकटंबर) कृष्णाजी विश्वनाथ बरवे (स. १७६३ अकटंबर–नवंबरांत कारभारी केला) आबाजी बलाल फडके पौषमासी (दिसेंबर १७७१–जानेवारीत १७७२) देवाज्ञा जाहाले सन इहिदे (१७७१–१७७२) अखेरीस खासा आले ते (ता० १४।१।१७८०) देवाज्ञा जाहाले. त्रिंबक कृष्ण (स. १७८० जानेवारी)

× × ×

(स. १७२४–२५ मध्ये) कानोजी आंगरे यांणी जैगड बांधिला त्याचवर्षी पूर्णगड बांधिला तेव्हा नहिमतगडतर्फेचे कैलासवासी श्रीमंत रा० श्रीपतराव प्रतिनिधीकडून तेराहि माहालाचा इजारा करून घेतला तेंसमई जयगडास सरंजाम सेतवडे माहाल व संगमेश्वर माहालचें सात गाव व क॥ फुणगुस याप्रो॥ घेतले दोन वर्षें चालिलें पुढे संगमेश्वर माहाल आपणाकडे ठेऊन वरकड माहाल सोडून दिल्हे गावगना

बुरबाड सरंज आरवली माखजन करजुवे पिरदावणे डिंगणी ७

१. रत्नागिरि किलां पंत अमात्य याजकडेस होता तो सेखोजी आंगरे याणी (ता० ४।४। ७३२ मध्यें) घेतला—

१. स. १६६३ किले सुवर्णदुर्ग इमारत करून पुढे कुलाबेयासि गेले.

१. (स. १६९८।९९) कानोजी आंगरे सरखेल कुलाबेयासी गेले याचा दाखला कुलाबेकर बाल जोसी याजवल पत्र आहे—

आगरे याणी कुलाबा घेऊन राज्य केले त्याच्या कारकीर्दी

सन १६९८।९९ त १ कानोजी सुवर्णदुर्गाहून कुलाबेयासि गेले सन १७१२।१३ त विजयदुर्ग घेतला पुढे त्याच साली सरदली जाहाली सन १७२८।२९ कुलाबेयास समाप्त जाहाले राज्य केले वर्षे २९

१ सेखोजी याणी राज्य केले वर्षे ३ १ संभाजी याणी राज्य केले वर्षे १० सन १७४१ त विजयदुर्गी समाप्त जाहाले १ तुलाजीस सन १७४५ त सरखेली जाली

* * *

ता. १४।२।१७५६ स विजयदुर्ग इंग्रज याणे घेतला—

स. १७५७ त प्रांत श्रीमंत रा० पंतप्रधान यांसी अर्जानी जाहाला श्रीमंतांचे निशाण विजयदुर्गावर चढलें मामलत रा० गोविंद शिवराम तात्यां

* * *

स. १७९१।९२ त पूर्वाचे नक्षत्राचा परजन्य गेला यामुले नापीक प्रांत जाहालां याजमुले कोकणांत चवथाई सूट सरकारातून मुलकास दिल्ही परजन्य गेल्यामुले स. १७९२।९३ त दरोबस्त तलकोकण वांईदेश हिकडे नर्मदा व दक्षणेस तुंगभद्रापर्यंत मुलुकात धारण सवा पायलीची पडली लोक बहुत मेल याप्रा। दुकाल पडिला स.१७९३।९४ पासून स्वस्ताई जाहाली

स. १७९६ टोलक्रांत कोकणात व देशात जाहाली स.१७९६ त हि टोल पडिले त्यांस समुद्रकिनारा साहा कोस टोल गेले नाहीत

स. १७९७ संगमेश्वर माहालीं आश्विनमाशी (सपटंबर-अक्टोबर) टोल पडिले तेणेकरून सेते बहुतेक टोलानी खालीं व सुपारी नारळ फणस आंबे वगैरे झाडे टोलानी खाली याजमुले सुपारी नारळ व फणस आंबे

12

साली कांहीं मेली नागायत कुडाळें तालुके रत्नागिरीस टोलखाज जाहाली म्हणौन तालुकेयास सूट सरकारातून साडेआठ हजार रुपये सूट दिल्ही

* * *

स. १७९८ सातारा किला माहाराज याणी बांधोन राहिले होते त्यास रास्ते व परशरामभाऊ याणी सातारा लुटिला आणि किल्याचा बंदोबस्त केला (ता० ९।८।१७९८)

* * *

स. १७७५ त तोतया जाहला

* * *

(सन १७५६ फेब्रुआरींत) श्रीमंत रा० नानासाहेब प्रधान याणी तुलाजी आंगरे सरखेल याजकडून रत्नागिरि किला घेऊन तालुका केला प्रधान पंत याजकडेस रत्नागीर जाली तेव्हापासून अमलदार १ मोराजी सिंदे साले १०—१ कृष्णाजी हरी व त्याचे पुत्रं महिमतराव व त्याचे पुत्र कृष्णराव महिमत स. १७६७ ते १७९२ पावेतो

* * *

स. १७७७।७८ सदाशिव केशव याणी सुभा केला.

* * *

ले० २५०

प्रभानवल्ली वतनाची सद्यःस्थिति

प्रभानवल्ली हा गांव विशाळगडच्या नैऋत्येस सुमारें ५ मैलांवर डोंगराच्या पायथ्याशीं आहे.

या घराण्यांत " सरदेसाई मामले प्रभानवल्ली, विशाळगडतर्फ " या वतनाचें उत्पन्न व नक्त नेमणूक हल्लीं चालते तिचा तपशील:—

मौजे सायलें व वाडा वेसराड येथील फुटकळ इनाम आणि मौजे कुंभारखाणी, मौजे धामापुर व कोंड असुडें या प्रत्येक गांवची चवथाई मिळून इनामाचा आकार ७५५८१०८१०; आणि नक्त नेमणूक २६९८१५८२ मिळून १०२५८१०—

यांत मामुलजुडी ८८८१२८३, सेटलमेंट जुडी ३२२८०८७ आणि सरकारांत नक्त नेमणुकीवरील फुटकळ भाग खरेदी केल्याचा आकार १८८८७ मिळून ४१२८५८५ वजा जातां बाकी रोख ६१३८४८७ दर साल मिळते.

हल्लींचे नांववाले जगंनाथ मोरोबा नायक सरदेसाई यांच्या नांवची ता० २ नवंबर १९०७ ची ब्रिटिश सरकारची सनद आहे.

खंड चवथा

झोंबडी–मुंढर दप्तर

सर्व साधारण अहवाल:–झोंबडी व मुंढर येथील शाखांचे प्रवर्तक, आणि गणोबा रंगोबाच्या धाकट्या स्त्रीचे मुलगे केशव व शामजी यांची पुढील हकीकत आतां सांगतों.

गणोबाचा वडील मुलगा प्रल्हाद हा विशाळगड व प्रभानवल्ली येथें राहून मुख्य सरदेशमुखी संभाळूं लागला, तसे त्याचे हे उभयतां सावत्र बंधु अगदीं दुसऱ्या टोंकाच्या म्हणजे अंजनवेलच्या घराकडे व सरदेशमुखीकडे वळले. शामजी हा चुलता विसोबा लोवलेकर यास दत्तक झाला होता. विसोबाप्रमाणें शामजीहि जनकघरींच राहून वाढला होता; आणि वास्तविकपणें पाहतां जरी या घराण्याचीं आतां चार घरें झालीं होतीं तरी एकोप्याचा बाह्य देखावा कायमच होता. तितक्या ठिकाणीं वतनांचा व घरांचा सांभाळ करावयास अद्यापि चौघां मालकांची अवश्यकता होतीच. सदाशिव दादोबा यांच्या मागचें पुण्याच्या वादांचें काम सुटलें नसल्यानें ते सपुत्र तिकडे अडकले होते; त्यामुळें इकडील चारी ठिकाणच्या कामाला मालकांची थोडीशी कमतरताच भासत होती. नरहर अंतोबा हे जरूरी-

प्रमाणें चहूंकडे जाऊन बंदोबस्त व त्याबरोबरच घराण्याचा एकोपा राखीत होते. शामजी ना. हे कामास ढिले असल्यानें जिकडे काम कमी असेल तिकडे राहून कालक्षेप करीत. शामजी आणि सदाशिव ना. हे वयानें बरेच सारखे असल्यानें त्यांचें आरंभीं मेथकूट बरेंच जमलेंहि होतें. वतनवाडविर असल्यानें आणि त्यांत धाकटेपणाचें नातें असल्यामुळें वडील बंधूच्या सांगीप्रमाणें थोडा बहुत कामाचा भार अंगावर पडूं लागताच त्यांनीं पुण्याची वाट धरली व तेथून उत्तर हिंदुस्थानांत अनेक ठिकाणीं आप्त-स्वकीयांचीं कायम ठाणीं पडलेलीं असल्यानें खुशालचेंद्रप्रमाणें आज येथें तर उद्या तेथें असा पाहुणचार खात स्वारी तिकडे माशा मारीत बसली. नरहर ना.स व शामजी ना.स पोर बाळ नव्हतेंच. तरी मूळ स्वभावा-प्रमाणें नरहर ना. घराण्याच्या लौकिकाकारितां जरूर लागेल त्या ठिकाणीं राहून पडेल ते काम करीत. हिंदुस्थानांत कंटाळा आला म्हणजे शामजी पुण्यास येत आणि तेथें कंटाळले कीं कोंकणांत वाटेल तेथें येऊन रहात. सरदेशमुखीच्या कारभारांतील या दोघांच्या वहिवाटीचें कोणास कांहींहि वाटत नसे. दोघेहि निपुत्रिक तेव्हां त्यांच्या संबंधांत भावीभय नव्हतेंच.

पुढें स. १७५६ सालीं प्रल्हाद ना. वारले. त्यांच्या चिरंजीवाच्या मदतीस नरहर ना. व शामजी ना. जरूरीप्रमाणें जात. शामजी **लोवलेकर** आहेत व त्यांचा वतनाशीं कांहीं एक संबंध नाहीं ही गोष्ट कोणाच्या कधीं मनांत आलीच असली तरी तिची वाच्यता कोणी केली नाहीं. विशाळगड, प्रभानवल्ली, संगमेश्वर-रत्नागिरी आणि दाभोल–अंजनवेल या अखेरच्या तीन वाटण्या शामजी व नरहर यांच्या पश्चात् व्हावयाच्या या समजुतीनें प्रत्येकजण आपापल्या ठिकाणीं स्वस्थ होता; आणि शामजीहि आपण बरोबरीचेच हिस्सेदार या भ्रमांत होता. सदाशिव ना. च्या तत्रानें शामजी वागे आणि आपल्या वहिवाटीच्या उत्पन्नाची व्यवस्था हि तो सदाशिवाच्या सांगीप्रमाणें करी. आपला कसलाहि तोटा न होता आपल्या सख्या भावास वहिवाट मिळत असल्याचें पाहून केशव ना.हि खुशालींत होता. केशव ना.स तीन मुलगे होते, तेव्हां आपल्या वहिवा-

टीचें उत्पन्न या वाढत्या प्रपंचास फार अपुरें पडणार असें त्यास दिसूं लागलें. शामजीनें आपल्या एका मुलास दत्तक घेतल्यास त्या दत्तकाचें आणि आपल्या बाकीच्या दोन पुत्रांचें साधारणपणें ठीक बस्तान बसेल हा विचार मनांत आणून सदाशिवाच्या मतलबी कानाडोळ्यानें शामजी-कडे चालू राहिलेली उतन्नाची वहिवाट कायम ठेवण्यांत (दत्तक देण्याचें साधल्यास) अखेर आपलेंच हित आहे या घमेंडींत केशव ना. राहिला. प्रल्हाद ना.चा पुत्र गणोबा तो अगदींच कर्तृत्वहीन, शिवाय घराण्याचा आपण मुख्य मालक या बडेजावींत रंगून गेलेला. तेव्हां आतां आपण कज्जे वगैरे जिंकून पुण्याहून ठिकाणावर परत गेल्यावर आपल्या सांगण्याबाहेर पानहि हालणार नाहीं या मनोराज्यांत गढून गेलेले सदाशिव ना. प्रल्हाद ना.च्या मरणोत्तर थोड्या अवकाशांत तिकडील कामाची निरवानिरव अंशतः करून कोंकणपट्टींत उतरले. परत आल्यावर त्यांनीं सर्व कारभार आपल्या हातीं घेण्याची धडपड केली, परंतु त्यांत यश न येतां फक्त रत्ना-गिरीच्या व हब्साणांतील कांहीं भागाच्या सरदेशमुखीवर आणि संगमेश्व-रच्या वाड्यावर त्यास संतुष्ट होणें भाग पडलें. थोड्याच अवकाशांत पुण्याकडील अर्धवट टाकलेल्या वादांकरितां आणि नुकत्याच हाताखालीं घातलेल्या दाभोळ सुभ्याच्या वतनांत नवीन उत्पन्न झालेल्या कांहीं कज्जां-करितां त्यास पुण्यास परत जावें लागून तिकडे बरींच वर्षें काढावीं लागलीं, त्यामुळ गृहकलहास तोंड लागण्याचें कांहीं अवधीवर लोटलें; तरी पण सदाशिवाच्या या मधल्या खटपटीनें तो सर्वांच्या विश्वासांतून पार उतरला व भाईबंद जरा सावध होऊन आत्मसंरक्षणाचा विचार करूं लागले. आपल्या कच्छपीं असलेलें शामजी ना.चें खुळें प्यादें हातचें जाऊं न देण्याच्या मसलतीस सदाशिव ना. लागला; त्याच्या मसलती बागुल-बोवाचें आविष्करण करून त्याचा कावा शामजीला साफ दिसेल असलें अंजन शामजीच्या डोळ्यांत घालण्याच्या तयारीस केशव ना. लागला. एवंच जो तो आपापल्या हेतूच्या सिद्ध्यर्थ आपल्या धोरणाचें सुकाणूं शामजीस कबजांत घेण्याच्या मतलबानें फिरवूं लागला. किती झालें तरी

शामशी केशवाचा सहोदर, तेव्हां त्याचा स्वाभाविक ओढा केशवाकडे असावयाचाच; त्यांतून सदाशिवाच्या अरेरावीलाहि तो कदाचित् मनांतून कंटाळला असेल; शिवाय तो मूळचा अनिश्चित् स्वभावाचा असल्यानें थोड्या अवकाशांतच केशव ना. च्या तंत्रानें वागूं लागला असल्यास त्यांत नवल नव्हतें.

शामजीस मूलबाळ नव्हतें. त्यांतून आतां वयहि पुष्कळ झालें होतें. तेव्हां अखेरीचें आयुष्य काशीसारख्या क्षेत्रांत हरिहरि म्हणत काढून मोक्षसाधन तरी करावें असें त्याच्या मनांत आलें, व त्या बेतास त्याच्या कुटुंबाचीहि संमति मिळाली; तेव्हां त्यानें आपला मोर्चा तिकडे फिरविला. त्याचा मूळचा भोळा स्वभाव काशीवासानें अधिकच देवभोळा बनला होता. या सुमारास काशींत सप्रे उपाध्यायांपैकीं बाळंभटजी व स्नेही, आप्त आणि आश्रित असे बापूभटजी आठल्ये हे होते; त्यांस अनुकुल करून घेऊन काम करण्याचा घांट केशव ना.नें घातला, आणि त्याची जोरानें तयारी चालविली. पुन्नामनरकापासून तरणोपाय होण्यास औरस नाहीं तर नाहीं, निदान दत्तपुत्र तरी पाहिजे, या कल्पनेचा पगडा केशव ना०नें या उभयतां भटजीकरवीं शामजीच्या मनावर बेतानें पण पक्का बसविला; आणि शामजीच्या परलोकसाधनाकरितां पोटचें पोर दत्तक देण्याची अहेतुक स्वार्थत्यागाची आपली तयारी त्या भोळसर मनास पटवून दिली. भटजींस भूमिदानाचें आमिष दाखवितांच त्यांनींहि नायकांचा हेतु तडीस नेण्याचा नेटानें प्रयत्न केला. सदाशिव ना० व इतर दायाद यांपैकीं कोणासहि या गुप्त बेताची परिस्फुटता होऊं दिली नाहीं. समारंभ काशींतच आटोपून घेण्याचें ठरविलें. कर्मधर्मसंयोगानें पंत प्रातिनिधि घराण्यांतील श्री. सुंदराबाई याहि यात्रेच्या निमित्तानें काशीस या सुमारास आल्या होत्या. केशवाचा कनिष्ठ पुत्र भगवंत नायक यास मोठ्या गुप्तपणानें काशीस आणविलें. यजमानीणबाईच्या अनुज्ञेनें दत्तकसमारंभ उरकण्याचें ठरविलें; आणि आतां परिस्फुटता झाली तरी सदाशिव ना०स कोणत्याहि प्रकारें कांहीं प्रतिबंध करितां येणार नाहीं इतका थोडा अवकाश ठेवून व तितकी

खात्री झाल्यावर या बेताची वर्दी पत्रद्वारें सदाशिव ना०स पुण्यास पोंचविली.
आपल्यासारख्या राजधानींत वागलेल्या व राजकारणांत मुरलेल्या मुत्स-
द्यानें बळकट पाया घालून बांधलेला व अनेक वर्षें अभंग टिकलेला
आशेचा बालेकिल्ला कोंकणी अकलेच्या केशवाच्या मदतीनें बेअकली शाम-
जीनें असा चुटकीसरसा उडविल्याचें पाहून सदाशिव ना०च्या मनाची
फार बेफाम स्थिति झाली; त्या दोन नायकांस व त्यांस सहाय्य करणाऱ्या
त्या दोन भट्टुक्यांस खाऊं कां गिळूं असें त्यास झालें. पत्रोत्तरीं त्यानें
पुष्कळ अकांडतांडव केलें, धाकदपटशा दाखविला, मनधरणी करण्याची
हि हूल दाखविली, परंतु विश्वेश्वराच्या आश्रयानें असलेल्या तत्रस्थ मंड-
ळींनीं त्या सर्व गोष्टींस धाब्यावर बसवून ता० २०।८।'७८० रोजीं दत्त-
विधान उरकून घेतलें, आणि सर्वांस चकित करून सदाशिव ना०स चुर-
मुरे फांकावयास लाविलें. या दप्तरांतील या संबंधाचीं पत्रें सर्वच वाचण्या-
सारखीं आहेत. त्याच पत्रांच्या आधारें वरील विवेचन केलें आहे.
भगवंत ना०चें हें दत्तविधान त्याचा थोरला भाऊ नारोबा यानें केलें.
बाप केशव ना० बातमी बाहेर न फुटावी म्हणून ठिकाणावरून हाललाच
नव्हता. दत्तविधान उरकल्यावर शामजी नायकानें आपलें उत्पन्न अनेक
वर्षें वहिवाटल्याबद्दल सदाशिव नायकाकडे हिशेबाचें मागणें केलें व त्या-
मुळें या घराण्यांत वादास तोंड लागलें.
या कच्च्या पायावर उभारलेल्या व आरंभापासूनच भाऊबंदांच्या हल्ल्यास
उघडें पडलेल्या दत्तविधानाची अखेर सांगण्यापूर्वीं थोडें सिंहावलोकन
करणें अवश्य दिसतें.
तेविसाव्या पिढीचा सरदेशमुख नरसोबा केसोबा यानें आपल्या सर्व
दायादांस गांव-कोंड-आगरें–वगैरे वांटून देऊन सर्वांची सोय लावून दिली
होती, वगैरे बखरींतील हकीकत ध्यानात असेलच. नरसोबानें विजापुरा-
हून लोवल्याचा कोंड इनाम मिळविला होता तो त्याचा तिसरा पुत्र महा-
दोबा यानें घेऊन तिकडें घर केलें होतें. हाच पहिला लोवलेकर. याचा पुत्र
सोमाजी. त्यानें एकंदर ५७ वर्षें सरदेशमुखी स्वतः केली होती. शिवाय

विजापुरास जाऊन त्यानें कोलब्रेची बाग, कुवसेवाडी, प्रभावळीची वाडी व निवें बु॥ हे गांव इनाम मिळविले होते. त्याप्रमाणेंच माखजन व उंचगांव इसाफती मिळविल्या होत्या. त्याचा मुलगा विठ्ठल ना० यानेंहि ठिकणाती व इनामती मिळवून शिवाय तो पालखीपदस्थ झाला होता. पितापुत्रानीं इतकें स्वतंत्र संपादन केलें होतें तरी तें सर्व घराण्याकरितांच आहे अशा प्रकारची त्यांची समजूत व वागणूक असे. विठ्ठल ना०स एक पुत्र बाळाजी म्हणून होता. तो मयत झाल्यावर त्यानें सोमाजी यास दत्तक घेतलें (वं. नं. ८ पहा). या सोमाजीबद्दल तो निपुत्रिक होता यापेक्षां कोणत्याच प्रकारची जास्त माहिति मिळाली नाहीं. तथापि त्याच्या वहिवाटीस बरेंच उत्पन्न असावें आणि म्हणूनच त्याला केशव व शामजी यांचा चुलता विसोबा यास दत्तक देण्यांत आलें असावें. लोवलेकर घराण्यांत दत्तक झालेल्या या विसोबास त्याचे सख्खे भाऊ गणोबा केसोबा, दादोबा व अंतोबा यांनीं केव्हांहि आपल्या बाहेर गणलें नव्हतें. तो एकत्रांतच कारभार करी. विसोबाहि निपुत्रिक, तेव्हां त्यास थोरला भाऊ गणोबा याचा सर्वांत धाकटा मुलगा शामजी दत्तक दिला होता; म्हणजे लागोपाठ तीन पुरुष दत्तकच होत आले.

"विसोबा नायकांच्या कुटुंबाच्या बेगमीस धामापुर व मुचरी हे गांव व कुंभारखाणी व वेसराड येथील वाडे निराळे तोडून दिले होते त्याप्रमाणें विसोबा ना. वेसराडांत घर बांधून राहिले होते (भाग १ पृ.१७९ पहा)." ही तडजोड बहुधा कान्होबा नरसोबाच्या संगतीनें विसोबा भावांपाशीं वांटणी मागूं लागला त्यावेळीं झालेली असावी. तथापि जरी थोडा वेळ विसोबा कान्होबाच्या संगतीनें नाचला असला तरी लवकरच तो पुनः पहिल्या घरच्या तंत्रानेंच अखेरपर्यंत चालला. त्याच्या पश्चात् अंतोबा ना. प्रभावळीच्या व विशाळगडच्या कारभाराच्या मदतीस असल्यानें व केशव गणोबा हे अंजनवेलीकडे असल्यानें शामजी हा थोरल्या दादोबा ना.च्या देखरेखीखालीं सदाशिव दादोबा बरोबर संगमेश्वरीं राहिला. यामुळें संगमेश्वर घराण्याच्या वहिवाटीस रत्नागिरितर्फेची

जी सरदेशमुखी व इतर उत्पन्न होतें त्यांतच शामजीचा हिस्सा गुरफटून गेला. शामजीला मूलबाळ नव्हतेंच व स्वारी एका ठिकाणीं फार दिवस राहणारी नव्हती; काम तर बिलकुल नको होतें, त्यामुळें दुवक्तां यथेच्छ भोजन झोडून वामकुक्षी व गप्पासप्पा यांत वेळ गमावून उत्पन्नाच्या व्यवस्थेचें आपल्या मागें लचांड नाहीं यांत सुख मानून तो आराम भोगीत स्वस्थ होता. थोरल्या दादोबाचा त्यास धाक होता खरा पण त्यावेळीं शामजीचें वय लहान व तो थोरल्या भावाचा मुलगा म्हणून दादोबानें त्याजकडे थोडा कानाडोळा केला असावा. पुढें व्यवस्था आली सदाशिव नायकाकडे. शामजी त्याच्याहून वडील आणि सदाशिव महत्वाकांक्षी व मतलबी. शामजीस उत्तरहिंदुस्थानांत जाण्यास सवड झाली आणि चाललेली व्यवस्था तशीच चालू राहिली. रत्नागिरितर्फेच्या संगमेश्वरकर सरदेशमुखाकडे शामजीचें उत्पन्न याप्रमाणें वहिवाटींत राहिलें. निखालस वांटण्या या असल्या अनेक कारणांमुळें झाल्या नव्हत्या.

केशव ना.नें आपला तिसरा मुलगा शामजीस दत्तक कां दिला, आणि या दत्तविधानानें सदाशिव ना.च्या अंगाचा तिळपापड कां झाला याचें कारण वरील हकीकतीवरून आतां लक्ष्यांत आलें असेल.

या दत्तकाबाबतींत जीं ३।४ पत्रें पुढें दिलीं आहेत त्यांवरून व पूर्वीच्या अल्प माहितीवरून केवळ अनुमानानें हा अहवाल आम्हीं चितारला आहे. वाचकांनीं सदरचीं पत्रें वाचलीं असतां त्यांस तीं आतां सर्व समजतील आणि मनोरंजक हि वाटतील अशी आम्हांस खात्री वाटते.

शामजी ना. व सदाशिव ना. यांमधील वाद चालले कीं नाहीं, चालले असल्यास त्याचा परिणाम काय झाला, शामजी ना.नीं जीवनयात्रा कधीं संपविली, वगैरे बाबतींत आम्हांस माहिती देणारे कागद खुद्द झोंबडीकरांनीं पुरविल्याशिवाय कांहींच सांगता येत नाहीं. मुंढर शाखेपैकीं वामन गणेश हे झोंबडी शाखेंत दत्तक होऊन रंगनाथ गोपाळ झाले त्यांनीं थोडे बहुत कागद पाठवून दिल्यानें इतकी तरी हकीकत सांगता आली. रंगनाथ हे चिपळूण तालुक्यांत एक छोटे शाळामास्तर आहेत. केसरींतील

जाहिरात पाहून घराण्याच्या इतिहासांत शक्त्यनुसार मदत करण्याची ज्या ४।५ लोकांस प्रेरणा झाली त्यांपैकीं हे एक गृहस्थ आहेत. त्यांच्या या सप्रेम मदतीबद्दल आम्हीं फार आभारी आहों. दुर्मिळ वस्तूची किंमत कोठें हि कोणी हि करीलच.

आतां भगवंत नायकाची थोडी हकीकत देऊन हा अहवाल पुरा करूं. भगवंत ना. पेशवाई संपल्यानंतर कांहीं काळ हयात होता. चालू वृत्तान्त १८ व्या शतका अखेर पुरा करावयाचा आहे, तेव्हां भगवंत ना.स अर्ध्या रस्त्यावर आणून ठेवावें आणि उत्तरार्धांत त्याची व इतर झोंबडी-मुंढरकरांची पुढील हकीकत द्यावी असा बेत आहे. तोंपर्यंत कदाचित् या शाखेची तदुत्तर माहिती हि मिळेल.

लोवलेकर सोमाजी महादोबा व विठ्ठल सोमाजी यांसारख्या दोन पराक्रमी, कर्तबगार आणि अत्यंत निःस्वार्थी नीतिमान् पुरुषांचा वंशोच्छेद व्हावा, घराणें चालूं राहण्याकरितां एकामागून एक असे चार दत्तक झाले तरी त्याला स्थैर्य किंवा ऊर्जित काल येऊं नये असें या लोवलेकरांचें पूर्वकर्म काय होतें समजत नाहीं. आज लोवलेकर हे नांव देखील लोपून गेलें आहे. दत्तकांत कर्तृत्व कमी असेल किंवा मुळींच नसेल हें कबूल; परंतु त्यांचा इतिहास पाहिला तर ही मंडळी दुर्वृत्त मात्र खास नव्हती. मग एका ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें 'शासनाची तीव्रता दुर्वृत्तांपेक्षां दुर्बलांसच विशेष दुर्धर' (The penulty of weakness is greater than that of wickedness) हा जगांत सर्वत्र दिसणारा नियम या कुटुंबाच्या मार्गांत बळेंच येऊन आडवा पडला असल्यास न कळे! स्वयंभू जगचालक **भगवंताच्या** या नियमानें दत्तक कुटुंबचालक भगवंताची आरंभापासून पाठ घेतलेली दिसते, एवढें खरें!

अनेक पुत्रांचें लटांबर म्हणजे बड्या संस्थानिकापासून तों छोट्या वतनदारापर्यंत प्रत्येकाला एक काळजीचीच बाब. जेष्ठेतर चिरंजीवांची मनाजोगी व्यवस्था लावून देणें हें त्याचें पहिलें काम असावयाचें. जगाच्या या रहाटीस अनुसरून केशव ना०नें आपल्या तिसऱ्या मुलग्याची तरतूद कर-

ण्याचें योजिलें; आणि शामजी ना०नें हा वडील भावाचा हेतु तडीस जाण्यास्तव त्याला आपल्या तंत्रानें वागावयास लाविलें. दत्तकविधानाकरितां काशीवास सोडून तो कोंकणांत आला असता तर कार्य सुकर होऊन पुढें उपस्थित झालेल्या कित्येक भानगडींस अवकाशच मिळाला नसता. परंतु शामजी पडला लहरी व एककल्ली आणि केशव पडला गरजु. शामजीस दुखविण्याची सोय नव्हती. शामजीवर सदाशिव ना० केव्हां पगडा बसवून बसविलेली घडी विसकटून टाकील याचा नेम नव्हता. झालेला बेत सदाशिवास कळला तर तो नाहीं नाहीं तीं विघ्नें आणील, या एका सबबीवर शामजीनें गलबत वल्हविण्याचें सुकाणूं आपल्या हातीं घेतलें, आणि इतरांवर तो एकटा हुकमत चालवूं लागला.

सागरच्या मुक्कामापर्यंत भगवंत व त्याचा वडीलभाऊ नारोबा हे जाऊन पोंचताच शामजीचें पहिलें फर्मान त्यांस आलें कीं तुम्हीं उभयतां " हळुहळू पादचारी " काशीस यावें, गाडी करून याल तर " आम्हांस दुप्पट रुपये लागतील, " तेव्हां " गाडी न करणें ". दत्तक होण्याच्या आशेनें बिचाऱ्या भगवंतास काशीपावेतों पायीं रखडत जावें लागलें. वाटेंत ओळखीचें कोणी भेटल्यास त्यास आपला खरा हेतु कळून न देतां कोणास काय थापा माराव्या याबद्दल हुकुम भावी पित्याकडून सुटले. पुढें सरकारच्या परवानगीवांचून, दायादांच्या कबुलीखेरीज आणि दत्तक देण्याबाबतींत शास्त्रसंमत अधिकारी पुरुषाशिवाय काशीक्षेत्रीं "देव ब्राह्मण यांचे सान्निध्यें" हें पुत्रविधान उरकून घेण्यांत येऊन सदाशिव नायकासारख्या वादनिपुण दायादाशीं दोन हात करण्यास या दुबळ्या भगवंतास तावडतोब परत पाठविण्यांत आलें. याप्रमाणें शामजी नाईक कृतकृत्य होऊन बिचाऱ्या भगवंत ना०स वादाच्या आखाड्यांत उतरावें लागून सर्व आयुष्य तेथेंच कंठावें लागलें. शामजी काशींत बसून धर्मन्यायाचा वेदांत, भुताटकीचा धाक व लंगोटीयारीचा स्नेह असल्या अप्रयोजक गोष्टींचीं पत्रें सदाशिवास पाठवून दत्तपुत्राचें साहित्य करावयास पाहूं लागले. तात्पर्य, विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करीत बसण्याच्या सर्व भानगडी भगवंतावर येऊन पडल्या.

ता. २७।७।१८२३ रोजीं भगवंत नायकाचा एक जबाब झालेला मिळाला त्यांत " मी अंजणवेल ताची वैवाट आपले बंधू नारोबा यासह करीत आहे, आमचे वतनाचे वांटे नाहींत सबब जो जेथें राहिला तेथील हक्क खात आहे, वगैरे " मजकूर आहे. सन १८१४ ते १८२४ या दहा वर्षें मुदतीचा हक्काच्या हिशेबाचा एक कागद आहे त्यावरून चिपळूण तर्फेतील ६ व वेलंब तर्फेतील २९ मिळून पस्तीस गांवांवर सुमारें २०० रु. च्या हक्काचें उत्पन्न भगवंत ना० च्या जनकघराकडून त्यास देण्यांत आलें असावें असें दिसतें. तसेंच स. १८३२।३३ मध्यें त्यानें " मी मावळंगे येथें श्रीदेव नरहरि याचे देवालयासंनिध घर बांधण्याकरितां सामानसुमानाची जमवाजमव करून तें बांधू लागलों असतां राघोबा ना. (संगमेश्वर) व गणोबा ना० (प्रभानवल्ली), खोत मौजे मजकूर, यांनीं अडथळा केला, पावसाळ्यांत सर्व सामान कुजून गेलें, तरी त्यांजकडून नुकसानी भरून देऊन घराची हरकत दूर करावी " या मजकुराचा अर्ज सबकलेक्टर रत्नागिरि यांजकडे केला आहे. हा संगमेश्वरचा राघोबा म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून दादो सदाशिव यांस दत्तक दिलेला भगवंत ना० च्या जनक घरचा सख्खा पुतण्या होय.

वृत्तान्ताच्या पहिल्या भागांत पृ. १२ वर ता. १९।५।१८२९ चें जें पत्र दिलें आहे तेंहि याच भगवंत ना०चें. तें छापून गेल्यावेळीं या बाकीच्या गोष्टींची आम्हांस कांहीं माहिती नव्हती; केवळ त्या एका पत्रावरून भगवंत नायकाबद्दल तेथील टीका, हेतु नसतांहि, अनुदार व कडक झाल्याबद्दल आम्हांस पश्चात्ताप होत आहे; आणि प्रायश्चित्त म्हणूनच या अहवालांत भगवंत ना०च्या हकीकतीस आम्हीं इतकीं पानें दिलीं आहेत.

वर दिलेल्या थोड्याशा अवतरणांवरून स. १७८१ ते १८३२ अखेर ५०।५५ वर्षें म्हणजे भगवंत नायकाचें सारें आयुष्य केवळ भाऊबंदांशीं झगडण्यांत व कसेंबसें कुटुंबाचें रक्षण पोषण करण्यात त्यास खर्च करावें लागलें असें दिसून येईल. मावळंकरांत दुसऱ्या कोणाच्या पाठीस दुर्दैव इतकें हात धुवून लागल्याचें आम्हांस आढळलें नाहीं. आजमितीसहि भगवंत

ना० चें घराणें फार खालावलेल्या स्थितींत आहे. लोबलेकरांच्या घरा-ण्यावर ईश्वराची इतकी इतराजी कां असावी याचें कारण कळत नाहीं.

हा वाद आरंभापासून अखेरपर्यंत कसा चालला, त्याचें पर्यवसान काय झालें, वगैरे गोष्टींविषयीं आम्हांस कांहींच माहिती मिळाली नाहीं. शिवाय तो भाग १८ व्या शतकांतला नसून १९ व्या शतकांतला आहे म्हणून त्याचा समारोप उत्तरार्धावर ठेवणें अवश्य आहे.

माळव्यांत रतलामचे उत्तरेस पंथ पिपळोदा नांवाची एक लहानशी जहागीर माधवराव पेशव्यांचे वेळेपासून खांडेकर उपनामक घराण्यास चालू होती. इंग्रजी अंमल झाल्यावर स. १८७० त जहागीर खालसा होऊन हल्लीं त्या घराण्याचे वंशजांस सालिना रोख नेमणूक रु. ११६१ ची मिळते. हे खांडेकर मूळचे कोंकणांतले संगमेश्वरानजीक बुरंबाड गांवचे राहणारे असून त्यांचा सरदेसाई घराण्याशीं पूर्वापार मोठा घरोबा होता. भानजी रघुनाथ खांडेकर यांचा पुत्र नरसिंह भास्कर यानें संगमेश्वर तालुक्यांत पांच गांवचें कुलकर्णवतन सरदेसाई यांजपासून मिळविलें— तें पांच गांव मौजे धामापुर, मौजे मावळंगें, मौजे कुंभारखाणी, मौजे माखजन व मौजे बुरंबाड हे होत. गणेश संभाजी व गोपाळ संभाजी या दोघां खांडेकर बंधूंनीं पानिपतोत्तरकाळीं उत्तरहिंदुस्थानांत मराठ्यांचा अंमल मोठ्या शौर्यानें राखला, त्यामुळें त्यांची तिकडे मोठी प्रतिष्ठा झाली. बहुधा गोविंदपंत खेर बुंदेले यांनीं सागरची स्थापना केल्यानंतर जीं अनेक कुटुंबें त्यांनीं कोंकणांतून सागरकडे नेलीं, त्यांतच हें खांडेकर घराणें तिकडे गेलें असावें. मात्र गोविंदपंताचे पश्चात् त्याचा मुलगा बाळाजी गोविंद याचें व गणेश संभाजीचें वांकडें येऊन बाळाजीनें गणेश संभाजीवर छापा घालून त्यास १७७९-८० त ठार मारिलें.

खांडेकरांचें घराणें मोठें विस्तृत असून त्यांत पुष्कळ विद्वान् मंडळी होऊन गेली व अद्यापिहि आहेत. वंशावळींतील विद्यमान श्री. गणपतराव गोपाळ यांनीं ग्वाल्हेर रियासतींत डि० माजिस्ट्रेट, सुभा, वगैरे मोठमोठीं हुद्यांचीं कामें करून वरिष्ठांची वाहवा व संस्थानांत लौकिक मिळविला आहे.

त्यांच्याकडून आम्हांस कांहीं पत्रें व बरीच माहिती प्राप्त झाली. आपल्या घराण्याचा इतिहास लिहिण्याचा त्यांचा हेतु असून त्याकरितां ते साधन-सामुग्री हल्लीं जुळवीत आहेत. आमच्या या उद्योगांत त्यांनीं आपण होऊन शक्य ती मदत मोठ्या आस्थेनें दिली हे त्यांचे आम्हांवर उपकार आहेत.

या घराण्यापैकीं गोपाळ संभाजी हे देवळेकरांतील प्रसिद्ध दत्तकवाद-प्रकरणीं पेशव्यांनीं निवडलेल्या ज्ञातीच्या सहा पंचांपैकीं एक होते.

गणेश व गोपाळ संभाजी यांची हयात म्ह. १७५० ते ७५ ची आहे. त्यांचा चौथा पूर्वज नरसी भानजी यांस सरदेसायांनीं पांच गांवचें कुल-कर्ण दिलें; म्हणजे तो सरदेसाई सुमारें स. १६५० तला केसोवा राघोवा असावा. खांडेकरांचा संबंध सरदेसायांच्या अनेक कागदांत येण्याचा संभव आहे म्हणून त्यांची वंशावळ येथें देण्यांत आली आहे.

रघुनाथ
भानजी (भास्कर)
नरसी (नरसिंह)
गणेश
तुकदेव
संभाजी (बयाबाई) | शिवाजी | निळोजी

संभाजी (बयाबाई) यांचे पुत्र: बाजी | गणेश | गोपाळ | अंताजी | परशुराम | वासुदेव

गणेश, गोपाळ यांचे वंशज:
धोंडदेव — नारायणराव — गोपाळराव — **गणपतराव**
जनार्दनपंत — वासुदेवराव — जनार्दनपंत — **नारायणराव**

परशुराम: कृष्णाजी | संभाजी

प्रस्तुत अहवालाशीं यांचा संबंध खालील उताऱ्यावरून दिसेल.

" गोपाळ संभाजीचे पुतणे संभाजी परशुराम ऊर्फ संभाजी आत्या-

त्यांची जेष्ठ कन्या अनुबाई (सासरचें नांव यशोदा) भगवंत नायक सरदेसाई यांच्या पत्नी होत. भगवंत ना. कांहीं काल गुहागर येथें राहत असतां लुटले गेले. त्यांचें वास्तव्य कोसर किंवा कोढर (कंवढर काळसुर) येथें होतें. पुढें ते झोंबडी तर्फ वेळंब तालुके अंजणवेल येथें रहावयास गेले. त्या सुमारास अनुबाईची एक कनिष्ठ बहिण, बहिणाबाई (माहेरचें नांव) ताटके वास्तव्य पाटण, इचा संसार विसकटल्यामुळें, तिचें सर्व खटलें भगवंत नायकांनीं झोंबडीस नेऊन तिला एक तक्षिम करून देऊन मोठें सहाय्य केलें. भगवंत ना॰स एक पुत्र, शामजी नायक व दोन कन्या एकूण तीन अपत्यें. वडील मुलगी असगोलींचे केसो बळवंत तांबे यांचे पुत्रास दिली होती."— (गणपतराव गोपाळ खांडेकर यांचें ता. २४।१२।१९२५ चें उज्जनी मुक्कामचें पत्र.)

स्वत: विपन्नावस्थेंत असतां अनाथांस साह्य करण्याच्या या तत्परतेबद्दल भगवंत नायक स्तुतीस पात्र नाहींत काय ?

झोंबडीकरांकडून थोडी तरी माहिती येईल या आशेवर केशव गणोबा नायक यांची हकीकत देण्याचें अभिवचन आरंभीं दिलें होतें. वाट पाहून पाहून आतां वर आलेल्या हकीकतीपेक्षां अधिक कांहीं लिहितां येत नाहीं असें कष्टानें सांगावें लागत आहे. केशव नायक स. १७९२ पर्यंत हयात होते एवढें कांहीं कागदांवरून समजून येत आहे.

सरदेसाई हक्काबद्दल झोंबडीकरांस हल्लीं जुडी वजा जातां नक्त रु.१८९० सरकारांतून दर साल पावतात. अंजनवेल तालुक्यांतून त्यांस जलमार्गाचा हक्क पावत होता, तो बंद आहे; वाद चालू आहे. शिवाय पन्हाळगडाकडून दरसाल रु. ३३ व विशाळगडांतून कांहीं रक्कम पूर्वीं पावत होती. झोंबडी गांव हल्लीं निव्वळ खोती असून, त्यांचा दुसरा एक खोतीगांव कंवढर काळसुर म्हणून चालू आहे. यांचीच एक शाखा मुंढर येथें असून, मुंढर गांव त्या शाखेकडे खोती चालतो.

लें० २५१ (नकल) श्री **सोमवार, ता० ११।४।१७४८**

अभयपत्र [स०] गंगाधर पंडित प्रतिनिधि ताा कासीसेट सेठ्या खुमवाणी कसबे संगमेश्वर सु॥ ११४८ दिल्हे अभयपत्र ऐसे जे तू येतर्फेन रुजुवात वर्तत नव्हतास याजकरितां हुजुरून स्वारी पाठऊन तुजा लेक धोंडसेट सेठ्या यास धरून आणून गुन्हेगारीच्या खंडाची तहसील लाविली त्यांजवरून तुजेबाबे रा. शामजी ना. सरदेसाई (४-२९-११) मा. प्रभावळी व दाभोळ याणी विनंति केली की सेठ्या मजकूर याजपासून गुन्हा जाहाला आहे त्यास स्वामींनी कृपाळु होऊन जीवन मवाफिक खंड माथा ठेवलियाने उगवणी करुन देऊन रुजुवातीने वर्तोन सुखरूप राहील म्हणोन त्याजवरून मनास आणून तुजे माथा गुन्हेगारीचा खंड देखील मसाला रुपये ३००० तीन हजार ठेविले आहेत याची उगवणी करून देऊन रुजुवातीने वर्तोन सुखरूप राहाणे सदरहू रुपये तीन हजार रा. शामजी ना. सरदेसाई याचे गुजारतीने हुजुर पावले मजुरा असत कोणेविसी शक न धरणे अभय असे छ २३ रांकर पाा हुजुर मोर्तब असे

लें०२५२ (नकल) श्री **(वरील तारखेच्या सुमारचें)**

तीर्थस्वरूप रा **कृष्णाजीपंत** काका स्वामी वडिलाचे शेवेसी आपत्ये शामजी ना. साा न विनंति आपण येथून गेलियावरी काशी शेटीस राजश्रीच्या दर्शनास पाठविल तें येथे आलियावरी आपल्या स्वसामर्थ्यें गौरशी करून संतोषानरूप करऊन निरोप देऊन रवानगी केली आपला कतबा आम्हाजवल होता तो याजबरोबर पाठविला आहे तो त्याचा द्यावा वरकड वतंदारीचे अर्थ कासीसेट सांगतील त्याजवरून तुम्हास कलेल श्रुत होय हे वि॥

लें०२५३ (नकल) श्री ता० १२।१०।१७७०

[अ०] कृष्णाजी विस्वनाथ गो. यांस

शेवक माधवराव बलाल प्रधान न. सु॥ ११७१ शके १६९२ विकृति नाम सवत्सरे दादोबा ना. बिन सदाशिव ना. व नारोबा ना. बिन केसोबा ना. सरदेसाई मा. प्रभानवली व सुभा दाभोल याचा व आनंदराव बिन

येशवंतराव चवाण देशमुख साडेच्यार माहाल मा. हमजाबाद व भास्कर बाबाजी बोक खोत मौजे कोतळुक तर्फ वेलंब व बंदरे मोकासी तर्फ चिपळुण वगैरे याचा दाभोल सुभ्याचे सरदेशमुखीचा कजिया लागोन मनसुफी साल तिगस्तापासून हुजुर पडली आहे त्यास सरदेसाई म्हणतात की दाभोल सुभ्याची सरदेशमुखी आमची वतनी परंपरेने वाडवडील अनुभवित आले मध्यें कैलासवासी सिवाजी माहाराज याचे कारकीर्दीत अवघ्या वतनदाराबरोबर आमचे हि हक मना जाहाले होते ते राजाराम साहेबाचे कारकीर्दीपासून चालते जाहाले त्याजवर हबसी याचा अमल दाभोल सुभ्यांत जाहाला तेव्हां त्याणी मागती मना केले त्याउपरी आमचे आजे दादोवा ना. बिन रंगोवा ना. हबसी याजकडे जाऊन आपली प्राचीन पत्रें दाखविली त्यावरून त्याणी पत्रें भोगवटा मनास आणून दाभोळ सुभा अकरा माहालपैकी आठ माहालात सरखेलचा काही अमल होता त्याजकडे आमचे आजे रुजु नव्हते म्हणोन त्यांणी दुबारा एक रयतियापासून आठ माहालचा घेतला त्याजवर सेखोजी आगरे सरखेल याजकडे दादोवा ना० जाऊन दुबारा हक घेत होते तो मना करविला त्याजउपरी दोन वर्षांनी सरखेलचा व हबसी याचा बिघाड जाहाला आमचे आजे राजपुरीस हबसी याजपासी राहिले म्हणून सरखेल याणी मागती आठ माहालचा हक दुबारा रयतीपासून घेतला आपले आजे राजपुरीस शांत होऊन पुढें अंजनवेल व गोवलकोटे हे दोनी किले रा० तुलाजी आगरे याणी हबसी याजपासून घतले तेव्हां दरोबस्त हबसी दूर होऊन आंगरे याचा अमल जाहाला त्यासमयी आगरे याणी आठ माहालास दुबारा हक पडत होता त्याजपैकी आम्ही घेत होतो तो येकतर्फा अमल जाहाला असतां रयतीस दुबारा हक पडतो तो मना करून आपण घेत होतो त्याजप्रमाणें घेऊ लागले आम्हांस सांगितले कीं हबसी याजकडे तर्फ चिपळीण व तर्फ वेलंब व तर्फ सावर्डे असे तीन माहाल होते तेथे आमचा अमल नव्हता तेथील सरदेशमुखीचा हक व लवाजिमा तुम्हाकडे चालत आहे त्याप्रमाणे तुम्हांकडे चालेल पेस्तर तुम्ही नजर कबूल केलीत म्हणजे आठ माहालचाहि

हक तुम्हाकडे चालतां करू म्हणून आज्ञा जाहाली त्यास आमचे तीर्थरूप प्रवासी होते नजर द्यावयास सामर्थ्य नाही पुढें वतन थोडक्या बहुताने सोडवावे तों तो प्रात सरकारांत आला तेव्हां कैलासवासी श्रीमंत नानासाहेब याजपाशी आमचे तीर्थरूपी विनंति केली त्याजवरून त्याणी तीन माहालचा हक पेशजीप्रमाणे चालवावयाची पत्रें दिल्हीं त्याप्रमाणे उपभोग करीत होतो तीन माहालपैकी काही गावचे हकास आनंदराव चवाण वगैरे याणी आज दोन वर्षे अडथळा घालून साल तिगस्ता हुजुर मनसुफीस उभे राहिले त्याजवरून आम्ही हुजुर आलो आहो मागे वाद्याही सरसुभाचे अमलात पत्रे घेऊन तीन माहालचे हकास अगदीच अडथला केला आहे तरी स्वामींनी आमचे कागदपत्र मनास आणून अकरा माहालचे वतन आमचे आमच्या हवाली केले पाहिजे म्हणोन विनंति केली व प्राचीन कागदपत्र दाखविले त्याजवरून आनंदराव चवाण वगैरे याजला पुरसीस करितां त्याणी विनंति केली कीं हबसी याजपासी दादोवा ना० बिन रंगोबा ना० पेश होते म्हणून तीन माहालचे हक त्याणी याजकडे चालविले बाकी आठ माहालचे हबसी वसूल घेत परंतु दादोबा ना० यास देत किंवा दिवाणात घेत हे ठाऊक नाही त्या कारकीर्दीस सरखेलहि आठ माहालचे दुबारा हक रयतीपासून घेत होते त्याजवर हबसी याचा अमल दूर होऊन तुलाजी आगरे याजकडे दरोबस्त प्रात जाहाला त्याजवर आठ माहालचे हक यास दिल्हेच नाही तीन माहालचा मात्र याजकडे देत आलो त्यांत कांही गाव चालिले नव्हते आलीकडे सरकार अमल त्या प्रांती जाहालियावर पूर्ववतप्रमाणे तीन माहालचा हक देत आलो गुदस्ता सरसुभाहून तीन माहाल तेहि अनामत जाहाले आहेत त्यास हबासियापलीकडे त्याचा भोगवटा कधीच नाही हबसी याजकडे अमल जाहाला तेव्हां दादोबा ना० त्याजला भेटले नव्हते ते समई त्याणी आम्हास पत्रें पाठविली कीं सरदेशमुखीचे वतन याचे नसतां याजला हक तुम्ही देता हे कामाचे नव्हे म्हणून पत्रे पाठविली ती बजिनस आम्हापासी आहेत म्हणोन विनंति करून पत्रे दाखविली त्याजवरून मनास आणितां सुभे मजकूरचे सरदेसाईपणाच्या

वतनाचे दाखलेयाची पत्रें शंभर वर्षांपलीकडील व अलीकडील दादोबा ना० बिन सदोबा ना० याजपासी आहेत याचे आजे दादोबा ना० बिन रंगोबा ना० हबसी याजकडे रुजु नव्हते त्यापूर्वीच हबसी याची ताकीदपत्र चवाण वगैरे याणी आणून दाखविलें त्या पत्रावरून हबसी याचे अमलाअगोदर सरदेसाई याचा भोगवटा होता असे दिसते परंतु भोगवटियाचा पुरता शोध करून अकरा माहालचे वतन याचे जाहाले तरी याजकडे चालवावे त्यास हबसी याचे कारकीर्दीस अकरा माहाल त्याजकडेस चालले त्याजवर आंगरे याचे अमलांत तीन माहाल चालले तो भोगवटा कैलासवासी तीर्थरूप नानासाहेबी मनास आणून तीन माहालचे सरदेसमुखीचे वतन त्याजकडे चालविलें त्यास हाली मनसुबी हुजुर पडली असतां सरसुभाहून सदरहू तीन माहाल अनामत करावयाचे कारण नाही याजकरित हे पत्र तुम्हास सादर केले असे तरी ताा चिपळीण व ताा वेलंब व ताा सावर्डें येकूण तीन माहाल देखील मीठबंदर येथील सरदेशमुखीचा हक लवाजिमा तुलाजी आंगरे याचे अमलाचे अखेरीपरयंत चालला असेल त्याप्रमाणे सरदेसाई याजकडे चालवणे आलीकडे सरकारच्या अमलांत तीन माहालापैकी भास्कर बाबाजी वगैरे याणी काही गावचे हक द्यावयास अडथला दोन तीन वर्षे केला असेल तो गैरवाजवी त्याजवर न जाणे सदरहू चालत आल्याप्रमाणे चालवणे [ब०] जा० छ २२ जमादिलाखर बहुत काय लिहिणे मोर्तब असे

टीपः—भाग १ पृ. १५६ वर हें पत्र लें० २० म्हणून अर्धवट छापलें आहे. हल्लीं ही साग्र नक्कल मिळाल्यावरून येथें सर्व छापली आहे. नक्कल बरोबर नसली तरी मजकूर निःसंशय बरोबर आहे.

श्री

लें० २५४ स० १७७०.

शिक्का पिंपळपानी–श्रीमाधवचरणि तत्पर । कृष्णाजी हरी नीरंतर ॥

दस्तक अजरवारी रा० कृष्णाजी हरि सुभेदार तालुके रत्नागिरि ताा कमाविसदारानी व चौकीदारानी व रहदारानी व बाजे लोकानी व जकाती

माहालानिहाये आबद जजीरे मजकूर तहद कसबे पुणे सु॥ ००० सबैन मया व अलफ आ वं चि ते भात तालुके मजकूरपौ पुण्यास हुजुर आणविले त्यास हाली बैलावरून भात बैलसार ४ च्यार बरोबर वाणी व सिपाई देऊन हुजुर रवाना केलें असे मार्गी कोणेविसी मुजाहिम न देता जाऊ देणें रात्रीचे वस्तीस ज्यां गावीं राहातील तेथे बैलाची रखवाली करून बैलास वैरण गवत चारा देत जाणें जा० छ १५ साबान मोर्तब सुद मो. २०

लें० २५५. श्री. मार्च १७८०.

श्रियासह चिरंजीव रा० नारोबा ना० व चिरंजीव रा॥ भगवंत ना० याप्रति शामजी ना० आसीर्वाद तुम्ही पत्र सागरचे मुकामी येऊन फल्गुन शुध पचमीचे पाठविले तें चईत्र वद्य अष्टमी येथे श्रीस आम्हास पावलें तुम्हास आणावयास गगापुत्र आणावयासी उभयेता पाठविला आहे पाद-च्यार उभयेता व येक रागडा मनु (ष्य) सागरचा बोजे डोईवरचे येक तपेले भातास मात्र बगी केली तर दुपट रुपये आम्हास लागतील हळुहळु पाद-च्यारी याचे सागाते पत्रदर्शनी निघोन येणे गगापुत्राचा तळ भारी लागेल याबदल बगीहि न करणे हा गगापुत्र सागेल त्याप्रमाणें वर्तणे दुसरे काना कौल (दुसरेयाना कलो) न देणे कोणी पुसेल तर रा॥ गंगाधर बाबाचे लस्करास जातो यैसें सागोन हा गगापुत्र पाठविला आहे हा सांगेल त्याप्रा॥ मार्गाचे माहित हा आहे असे असोन दुसर (ा) गगापुत्र लागलाच तर पथ्यामध्यें रा॥ बालाजीपंत नवराजवल राहाणे तेथून आम्ही घेऊन येऊ चिता नव करणे बेफिकीर येणे तुम्हास श्रीचे दर्शन करून पुत्रविधान जाह-लि(या)वर मग आमी सागरास श्रीमतास भेटून देश्यास पाठऊ (न) देऊ रा॥ सोनोपंत गोपालरायासचे लस्करात आहेत दवराचे मनुष्य बोलाव-यास आले आहे ते देवरास जातो म्हणऊन आम्हास लिहिले होते कलले पाहिजे बहुत काय लिहिणे लोभ कीजे सीघ्र पत्रदर्शनी येणे मार्ग पहात असो लोभ करावा हे आसीर्वाद

टीप:—पत्रांतील गंगाधर बाबा हे कोणी फौजबक्ष मावळंकर असावेत. पुढील एका पत्रावरील टीपेंत अधिक माहिती दिली आहे. देवळेकरांपैकीं जे पुरुष वर हिंदुस्थानांत गेले त्यांत जालवण व सागर येथील गंगाधर-पंताच्या नांवाच्या २।३ वेळां कोल्हापुर दप्तरच्या पत्रांत या सुमारास उल्लेख झाला आहे. मोर्डेकर व वेरवलीकर यांपैकीं कांहीं मंडळी जाल-वणाकडे गेलेबद्दलहि उल्लेख अन्यत्र एकदोन ठिकाणीं मिळाले आहेत.

ले० २५६ श्री ता० २५।३।१७८०.

तीर्थस्वरूप रा० शामजी नाईक सरदेसाई

मु॥ श्रीक्षेत्र कासी वडिलांचे सेवेसी

आपत्यसमान सदाशिव ना० कृतानेक साष्टांग न० विनंति येथील क्षेम ता॥ फाल्गुन वद्य पंचमी पावेतो श्रीकृपेकरून येथास्थित असें वि० तुम्हीं बहुत दिवसीं पत्र पाठविले ते पावलें तेथें लिहिलें कीं आमचा विभाग तीर्थस्वरूप रा० केशव ना० याचे स्वाधीन करणें बावन वर्षे आमची तक्षीम तुम्हीं खादलीत कर्जाचा वाटा (ठाव?) पाहिजे तरी तुमचा हिसेब आम्हीं समजावा जेणेकरून कजिया न वाढे ते करावे म्हणौन कितेक अर्थ लिहिले ते कललें यैसियास आम्ही हिंदुस्थानांत गेलो होतों ते समई आमची तुमची भेट जाहाली काही दिवस तुमचा आमचा व रा॥ गंगाधर गणेश याचा समागम होतां तेसमई तुम्हीं जी भाषणे केलीं ती विसरोन तीर्थ-स्वरूप केशव ना० याणी पत्रें लिहिली त्यावरून तुम्हास आयुर्भाव येऊन उमेदीनें लिहिले परंतु याचा परिणाम काये आहे हें ध्यानांत आले नाहीं बावन वर्षे तक्षिम तुमची कोणी खादली तुम्हीं कोणाचे स्वाधीन केलीत बावन वर्षे तुम्ही निद्रा केलीं वतनाचा विस्मये कसा पडला विशाळगडीं होतां तें काये निमित्य निघोन गेलां तुम्हास कोणी घालविले वतनांत येक ठाणे पेखडदड (टोणपे खडदड ?) नानाप्रकारचे कजिये पडिले ते आम्ही सांगितलें आणि वतनाचे संवरक्षण केले आहे तुम्ही जन्मप्रभृति वतनात श्रम सायास केले आहेत ते सर्व स्वकीये जनास व तुमचे चितास ठाऊक

आहे आमचे तीर्थरूपानी तुमचे प्रतिपालण केलें स्वतंत्रपणे विशालगडी राहोन वतनाचा अनुभव करीत असतेसमई तेथील सुख पाहून पलालेत ते अद्यापि श्रीक्षेत्री राहिला आहां येविसीचे माहित रा। भास्कर विश्वनाथ-प्रभृति विशालगडचे ग्रहस्तास ठाऊक आहे यैसें असतां श्रीक्षेत्री वतनाच्या भयेकरून परलोकसाधनार्थ राहिला असतां लौकिकरीतीखेरीज आपले रुचीस येईल त्याप्रमाणें पत्रात मजकूर लेहून परहितोपदेश करून श्रीसत्क्षेत्रवास बहुत दिवस केलात यास्तव सद्‌बुधि आसावी ते पूर्व पधतप्रिमाणें वर्तोन क्षेत्रमहिमासमागम काहीच उपतिष्ठला नाही वतनात राहोन इहलोकीचे साधन करावे ते घडले नाही परलोकार्थ सत्क्षेत्री वास तर तोहि अर्थ दृढ धरीत नाही बुधीस चांचल्य धरिता येणेकरून कोणतेहि साधन होत नाही कः शुचिरिह यस्य मानसं शुद्धं केशव ना० याचे म्हटल्यावरून त्याचा दत्तपुत्र तुह्मी घेऊन वृतीत कलह पाडून वृतीचा नाश करवावा हेच श्री —— स्थली राहिल्याचे सार्थक नव्हे हे केल्यानें केले पुण्य निर्फल व्हावयाचा उपाय श्रीने तुह्मास बुधि. देऊन योजिला असिल्यास उपाय काये नाहीतरी केशव नायकाचा पुत्र तुम्ही दत घेऊन प्रापंचाची सुखोत्पति पावाल हा भावगर्भ तुमच्या ध्यानांत आला नसील्यास सौंसंपन्न मातुश्री वहिनी सिष्टाची कन्या आहे तीनीं तुमच्या ध्यानात आणून देतील काही फलोत्पति नसतां निःकारण आपले पुण्य खर्चून कलहास कारण करून आम्ही दुख पावल्याने तुमचे जन्माचे सार्थक होते यैसे नाही वरकड साधन प्रापंचाचे कांही दिसत नाही असों आपाजी गोविंद मावळकर तुमचा म्हणोन कजिया सागत आहे श्रीमंतांची पत्रे करून घेतली आहेत त्याच वसीले रा० विसाजीपंत त्रिनिंवाले त्याचे ते जावई होते त्यास आम्ही त्याचा वतनात दाखला आजीपर्यंत होऊ दिल्हा नाही याउपरी तुम्ही केशव नायकाचा दत्तपुत्र घेणे असल्यास देसी यावे आपाजी गोविंद याचा जाबसाल तोडून टाकावा दाहा वतनदार आहेत त्याच्या विचारे व चौघा मातवर ग्रहस्ताचे विद्यमाने वतनसमधे तुम्ही गेल्यापासून आम्हास पैका पडला आहे तो आमचा तुम्ही वारून द्यावा तुमचे वतन कोणी

खादलें याचा कार्ये जाबस्वाल बोलण्याचा असेल तो तुम्ही येऊन बोलावा तुम्ही मातबर वतनदार आहां दतपुत्र घ्यावयाविसी श्रीमंताची आज्ञा जाहाली पाहिजे आम्हा भाऊबंदाचे संमत असीले पाहिजे हा प्रकार न होतां तुम्ही पुत्र घेतलात आणि केशवनायकी दिल्हा तत्रापि त्याचा परिणाम येथास्थित होणार नाही कलह मात्र होईल तेणेकरून तुम्ही क्षेत्री वास करून जे फल मेलविले आसेल ते व्यर्थ जाईल भाऊबंद राहिल्याने पुण्य विशेष आहे **सोदरे दत्तमक्षयं** वरकड तुम्ही विशालगडी स्वतंत्र वतन अनुभविले तेथे सुख घेतलेत त्याचा अनुभव तुम्हास आलाच आहे जन्मप्रभृति कितीक कार्ये लौकिक वतनात केलात तो तुम्हास व सर्वास कलत च आहे वतन फुकाचे नव्हे आतां तुम्ही पुत्र घेऊन वतनात लौकिक मेलविणार हाहि अर्थ समजलाच आहे आम्हास मात्र दुख द्यावे हा तुमचा व केशव ना० यांचा मानस जन्मादारभ्य दुसरियास श्रमी करावे हा सद्धर्म सत्क्षेत्री राहिल्याने सद्बुध आसावी ते तुम्ही अद्यापि धरिली नाही येणेकरून क्षेत्री राहिल्याची उपहास्य जनामध्ये होईल हा अर्थ चिती आणून आचरण केल्याने तुमचे आभीष्ट आहे अतःपर कलहास कारण न होये ते करावें केल्यास श्री——परिमार्जन करील तुमचे पालग्रहण आमचे तीर्थरूपी केले आहे त्याचा विस्मये नसावा तुम्ही श्रीक्षेत्रीं राहिलेत त्यास तुम्हास सर्व लोक धंन्य धंन्य म्हणत तेच करावे चिरंजीव नारोबा ना० केवल अप्रयोजक दुर्बुधि आपेशी आहे त्याचा कुचाला आहे तुम्ही या गोष्टीत सर्वथीव न पडावे पुत्र घेणेचा आसिल्यास तुम्ही देशास यावे तुमचे आमचे विचारे जो विचार करणे तो करूं तुम्ही कासीत पुत्र घ्यावयाचा विचार योजिला आहे ही गोष्टी तुम्ही ० ० योग्य नव्हे केल्याने उतम परिणाम लागणार नाहीं गेल्याचे भावाचे वतन राहिले भाऊ खातील धाकट्यास द्यावयास व घ्यावयास अधिकार नाही याप्रमाणे आमचे देशी सर्व वतनदार याची चाल आहे विचारे ०००००००००००००००० नंति——

टीप—यांत आपाजी गोविंद मावळंकर याचें नांव आलें आहे. या भागाच्या १३ व्या पानावर ज्या आपाजी गोविंदाचें नांव आलें आहे तो

हा असावा. पान २४४ वर नं. ३८ ची वंशावळ आहे त्यांतील नं. ४ हाच असें वाटतें, व त्याचा भाऊ नं० ६ रामाजी हा डोंगरकर नरसोबा कानोबा (३-२९-२) याची स्त्री गोपिकाबाई इनें घेतलेला दत्तक असावा अशी आमची कल्पना धांवते. पान १३ वरील अपाजीच्या काशीयात्रेचे साल १८९१।९२ लिहून आलें आहे; तोंहि लेखकप्रमाद असून तें साल १७९१।९२ असावेसें वाटतें. —सं०

ले०२५७. (असल बरहुकुम नकल) श्रीनरहरि कासी २५।३।१७८०

वेदशास्त्रसंपन्न रा० बापू भटजी आठले

वास्तव्य श्रीक्षेत्र———— स्वामींचे सेवेसी

विद्यार्थी सदाशिव ना० सरदेसाई मा० प्रभावली व सुभा दाभोल मुकाम पुणे कृतानेक साष्टांग न० विनंति [ये०] तुम्हाकडून बहुत दिवस पत्र येऊन कुशलार्थ कलत नाही तेणेकरून चित सापेक्षित असे तरी यैसे नसावे सदैव पत्री स्वकुशललेखनोतरें संतोषवित जावे यानंतर आपला व आमचा निःकृत्रिम स्नेह आमचे अभीष्ट असेल ते तुम्ही स्वहस्ते परहस्ते करावें तो अर्थ सोडून या संध्धीत वतनात कलह पडोन अपाय व्हावयाचे अवलंब करिता हे गोष्ट सिष्ट रीतीस अयोग्य रा। गंगाधर गणेश यास पत्र लिहून पाठविल्याने तां॥ रा॥ शामजी नायकास भाऊबंदाचे संमत न होता व सरकारचे आज्ञेखेरीज ती॥ केशव नायकाचा पुत्र कसा प्राप्त होईल हा विचार ध्यानात आला नाही असो शामजी नायकास पुत्र घेणे तर देशास यावे वतनसंमध्धे खंड दंड आम्हास पडिले आहेत त्याची वाट चौघे वतनदार याचे विचारे होईल तैसी करून द्यावी व तीन पुरुष दंतक जाहाले असता चौथा पुत्र घ्यावयाचा शास्त्रर्थ व आमचे संमत व सरकारची आज्ञा जाहाल्यास पुत्रविधान करून दंतपुत्र घ्यावा म्हणजे कलह पडणार नाही पुढे वतनात कजिये आहेत त्याचा भार त्याचे माथा लागला आम्ही स्वस्थ च्यार दिवस स्नानसंध्या करून राहो रा॥ गणेशपंत व गंगाधर गणेश यास तुम्ही पत्र लिहिल्याने पुत्र कसा प्राप्त होईल ते आमचे स्वकीय आण

स्नेही तुमच्या कार्याच्या उपयोगास पडणार नाहीत येविसी तुम्हासहि ते लिहितील त्यावरून साद्यंत ध्यानात येईल वरकड श्रीक्षेत्री पुत्र घेऊ म्हणतील तर ठीक नाही आमचे संमत व श्रीमंताची आज्ञा न घेता त्याचाहि परिणाम लागणार नाही सरकारातून तेथील सिष्ट ब्राम्हणास व तेथील हकीमास पत्रे जातील येतदर्थी संवशय न धरावा शामजीनायकी आम्हावर कृतोपकार योजिला आहे त्यास आपण सामील जाहाले आहेत यैशास तीर्थरूप कैलासवासी नायेक स्वामी यापासून आजपर्यंत आमची उपेक्षा श्रीने केली नाही शामजीनायकाचे पाळग्रहण आमचे तीर्थरूपी केले त्याचे सार्थक श्रीक्षेत्री राहून करिता हे उतम नव्हे या गोष्टीची कल्पना आमची भेट जाहाली तेव्हा शामजीनाईकास नवती गेल्या भाऊबंदाने येकासच वतन दिल्याने दुसरा भाऊबंद देतो ऐसे नाही त्याच्या दिल्याने प्राप्त होत नाही मातबर वतनाची रीति ऐशा आहेत व्यर्थ श्रमात घालावयाचा मात्र प्रकार पुत्र घेऊन शामजीनाईकी प्रापंच्य करावा हे कलतच आहे तुम्ही सुज्ञ आहा दुरंदेसी जाणता यास्तव शामजीनायकांस बोध करून व्यर्थ कलह श्रीक्षेत्री राहून पाडावा यात जीव नाही आम्हीच त्याचे पुत्र दुसरा घेतल्याने अधिकोतर फल येते ऐसे नाही तुम्ही जाणतेच आहा आमचे आप्त जाणोन पत्र लिहिले आहे शामजी नायकास उतम रीतीने उपदेश करावा कृपा लोभ कीजे हे विनंति

टीप—यांतील गणेशपंत व गंगाधर गणेश हीं नांवें सागर येथील कोणा वजनदार व श्रीमंत मावळंकराचीं असावीं असा तर्क वाहतो. पान २५१ वर सागर येथील दोन वंशावळी दिल्या आहेत त्यांतील ही मंडळी असावीत काय ? असतील तर पाहिलींतील बाबाजी व दुसरींतील गंगाधर हे भाऊ भाऊ असूं शकतील. पण तूर्त एवढा तर्क सर्वांपुढें मांडण्या पलीकडे आम्हीं तरी काय करणार ? सं.—

ले० २५८. श्रीशंकर. शनिवार ता० २५।३।१७८०.

[रा०] शामजी ना० सरदेसाई स्वामींचे सेवेसीं—

पोष्य गंगाधर गणेश सां न० विनंती येथील कुशल ता। फाल्गुन वा। ५

पाो आपले कृपेकरून मु॥ पुणे येथें सुखरूप आसों वि० आपण पत्रें पाठविली ती पावली येविसींचे वृत राा० सदासिव ना० सरदेसाई याणी लिहिले आहे त्यावरून कलेल नायकसाहेब हा विशये श्रींत राहून होणार नाहीं हा प्रकार आपणास कर्तव्य आहे तरी येकवेल देसी येऊन सर्वांची भेट घेऊन जो प्रकार करणें तो करावा वरकड अर्थ आपण पत्रीं कितेक लिहिले त्यास तेथून हा विचार घडावयाचा नाहीं हा विशये आपण जाणतच आहेत वतनाचा विचार भाऊबंदीचे प्रकार आहेत दिवाणदारी अलीकडील आपणास ठाऊक नाहीं या गोष्टी करावयाच्या तरी भाऊबंदांस हातीं घेऊन सरकारच्या संमतें केल्याने परिणाम रा० केशव ना० याच्याच विचारें केल्याने परिणामास जावयाचे नाहीं वतनाचा भार रा० सदासिव ना० यांजवर आहे त्यांच्या विचारे कोणेक अर्थ जाहल्यानेच सिध आहे ही दुरंदेसी जाणोन जे कर्तव्य ते करावें लटका (बहका?) कलहास भाऊबंदीस उद्योग योजावा हें उत्तम नाहीं सेवेसी बहुत काय लिहिणे हे वि॥

टीप—हा विशये = भगवंत केशव यास दत्तक घेणेची गोष्ट. श्रींत= काशी येथें. लटका (बहका?) मूळ एक शब्द लिहून त्यांत दुसरा गिरगटला असल्यानें या दोन प्रकारें तो दिसतो.

ले० २५९ श्री नरहरिवरद स. १७८० अखेर.

चिरंजीव रा० सदाशिव ना० याप्रति शामजी ना० आसीर्वाद तुमचे कृपेकरून ध (ह) ट येथे सुखरूप असों चिरंजीव भगवंत यासी श्रीस नेऊन संवत् १८३६ श्रावण शुध चतुर्थी उपरांतिक पंचमीस (रविवार, ता० २० आगस्ट १७८०) कासीस्त ब्राम्हण जात परजात उपाध्यें सफरें व प्रतिनिधि मातुश्री सुंदराबाई व रा० मोरो बलाल जोसी व साने रा॥ विसाजीपंत व जोसी सगमेस्वर देव ब्राम्हण याचे सानिधेकरून यथोक्त पुत्रविधान करून देशास पाठविला आहे तर तुम्ही तीर्थस्वरूप रा० केशव ना० चिरंजीव रा० गुडोवा ना० त्रिवर्ग मिलों धर्मेंकरून आमची तर्क्षीम चिरंजीवाचे स्वाधीन करावी येणेकरून कलहें होणार नाही ही गोष्ट तुमी

न करा तर हा काल तुमी जाणतच आहां तुमची आमची लगोटीयारी यैसे असोंन हे पत्र तुम्हास लिहिले आहे धर्मावर नजर देऊन तुम्हांस आमचे चालवावे हा धर्म जाणोन कराल तर उतम आहे रा॥ रामाजी मुल्याकडील भूत विटलादेवीचे तुमच्या कुलास लागलें आहें बाल सुतारास पडथले सर्व ठाऊक आसे त्यास आणून चिरंजीव गुडोबा ०००० घर कासी सेस्याचे भूत ०००००००० जर वाराल तर उत्तम गोष्ट होईल नाहीतर कुल नादणार नाही यैसे जाणोन पत्रदर्शनी लिहिल्याप्रमाणे करावे वेदमूर्ती रा. बालभट सिवाजी सफरें यासी पुत्रविधानीसमई पाच बिघे जमीन दिली आमचे विभागाचे गावात कलले पाहिजे* १८३१सापासून मूल खाली वतनात गेला आहे त्याचे स्वाधीन आमचे गावविभाग तुम्ही वडील चिरंजीव भगवंतास आहां त्रिवर्ग मिळोन संतोषेंकरून द्यावे जे काम सागाल ते करील यै(से) आसों न द्याल तर दुसरा जबरदस्त कारभारी परंजातीचा करायासी कबूल आहेंत येकदा दिले मणजे असें तसें जाईल बरे आपण समजों उतर लिहावे तुम्हास धामापुरासारखा गाव मुचरीसारिखा गाव यैसे असों निपुत्रिकाचे वतन तिसरा बं(धु) ज्याच्या घरातला देत आले त्याच्या घरातला मेला आहें यैसे पापद्रव्य आहे तुम्ही अभिलाश करावा हे योग्य नाही परंतु लोभांस त्रिवर्ग पडाल तर उतम नाही यैसे आपले जागा विचार करून या पत्राचे उतर पाठऊन द्यावे बोढकीचा लेकाने च्यार माहाल घेतले त्याचे पारपत्य न होये आणि आम्ही गरीब म्हणऊन दबविता तर हे ईस्वरास न माने यैसे समजोन खर्चवेच मागाल तीर्थस्वरूप रा॥ केशव नायक दाजी याचे कर्ज वारिले ते असीले तरी आम्ही देऊ नाहीतर उगाची दबावणी करून दबणार नाही लोभ करावा हे आसीर्वाद

* १८३१ हा संवत् आहे. त्याचें इसवी साल १७७४.

ले० २६० श्रीनरहारिवरद स. १७८० अखेर

चिरजीव रा० सदासिव ना० सरदेसाई याप्रति शामजी ना० आसीर्वाद तुमचे कृपेकरून श्रीकासीक्षेत्री सुखरूप असों वि० चिरजीव रा० नारोबा

ना० तीर्थस्वरूप रा० केशव ना० दादा याचे आज्ञेने चिरंजीव रा०भगवंत ना० यासी येथे आम्हापासी आणून कासीस्त ब्राम्हण व कुलपुरोहि(त) सर्प्रे याचे सानिध येथाविध दतपुत्रविधान मातुश्री सुंदराबाई प्रतिनिधि याचे सामक्ष्य करून केले सवत १८३६ श्रावण शुध चतुर्थी रविवार पुत्र करून आपल्याकडे पाठविला आहे तर आपण आम्हास तीर्थस्वरूप रा०नाईकाचे जागा आहां तुम्ही आम्ही लगोटियार आहों तुमचे वडिलाही आमचे सर्व गोष्टीने साभाल केला आहे तर आमचे परकी लोक चालवितात तुम्हीहि चालवावे हे तुम्हास योग्य आहे आमचा पुत्र चिरंजीव भ(ग)वत तोच तुमचा पुत्र आहे सर्व क्रोध टाकून आम्हावर कृपा करून आमचा विभाग देशमुखी सरदेशमुखी कुलकर्ण-खोतीचे गांव इनामत बाग घरवंद धर्मन्याये जो होईल तो सर्व विभाग चिरंजीव रा। भगवता द्यावा येणेकरून श्रीविस्वेस्वर संतुस्ट आपणावर होईल वृधापकाली तुम्हावाचून आमचे चालवणार दुसरा कोण आहे विभाग दिल्याने श्रीत नेवेद्य वैश्वदेव करून तुमचे कल्याण इछून राहो बहुत काय लिहिणे लोभ करावा हे आसीर्वाद

लें० २६१. श्री नरहरिवरद. स.१७८० अखेर.

तीर्थस्वरूप रा० केशव ना० दाजी स्वामी वडिलांचे सेवेसी—

अपत्येसमान शामजी ना० सास्टाग न० विनंति आपण चिरंजीव रा॥ नाना व भगवत पाठविला तो सुखरूप कासीक्षेत्री सुखरूप आम्हाजवल पावले तुमचे आज्ञेवरून समस्त ब्राह्मण व जात परजात चितपावन पुरोहित मातुश्री सुदराबाई प्रतिनिधी रा॥ विसाजीपंत साने रा॥ मोरो बलाल याचे हुजारतीने व सानिधेकरून संवत १८३६ श्रावण शुध चतुर्थी रविवारी यथोक्त पुत्रविधान करून कार्तिकी पूर्णिमासी श्रीहून निघोन परगणे हटे येथें सुखरूप आलों येथें तुम्हाकडे चिरजीव भगवत रवाना केला आहेंत तर आमचा विभाग धर्मन्यायेकरून जो तुम्हास ठाऊक असेल तो यथास्थित चिर(जी)व रा॥ सदासि(व) ना० व गुढो(गुंडो) ना० यास सागोन आपलेकडे असेल तो धर्मेकरून देवावा मागाहून चिर(जी)व नाना येतील कलले पाहिजे बहुत काये लिहिणे लोभ असावा हें विनंति.

ले० २६२ श्री

चिरंजीव रा० नारोबा ना० व भगवंत ना० यासीप्रति शामजी ना० आसीर्वाद तुमी पत्र पाठविले ते पावले लिहिले वर्तमान कललें मागचा पायेबंद तुम्हास भारी आहे असे समजोन घरास जाण्याचे करणे वरीस दोन वर्षं खस्ता खाल तेव्हा तेव्हा काय होणे ते होईल यैसे प्रथम कर्ज करून राहणे दुरापस्त याउपरी तुम्ही जाणतेच आहा समजोन सीघ्र घरास जाण्याचे करावें रा० विसाजीपंत गड्ड्यास आले म्हणजे रा० बच्याजी-पंताबराबर जाऊन त्याची भेट घेऊन त्याउपर श्रीस (काशी येथें) जाण्याचे त्याचे पत्र आले जे तूर्त न येणे त्यामुले राहिलों आहो काही दिवसी जाऊन रा। बच्याजीपंताची कावड गेली त्याबरोबर तुमचे तीर्थरूपास पत्र आमी पाठविले आहे रा। सिवाजी सामराज यासहि लिहिले आहे पत्र आजणवेलीस प्रविष्ट करणे ते पावते करतील आसामीबाबत रुो आद्याप उसूल जाहाले नाहीत सोला रुपये तूर्त मिलाले त्यामध्ये वाटेची भाडी व चाकर ब्राम्हण ठेविला आहे कार्तिकपर्यंत या प्राती राहाणे जाहाले आमचे आहे यदाचे वेतन पुढचे वेतन घेऊन जावे पुढे ईस्वर इछा रा० लक्ष्मण परशराम यासी पत्र लिहिले आहे हे वाचून त्याकडे रा० बाजीपंत याकडचे रु २० याचे हुंडीखाली सिके म्हणऊन करणे नाहींतर हुंडीत हिसका पडल समजोन हुडी करणे रा० भटजी येथे आले म्हणजे रा० बाबुराव केशव रा० केसो शकर याचे वकील आहेत यास मा।निलेजवल पत्रें देतो रा० विसाजीपंताची भेट जाहालियावर उभयेतास पत्र त्यांची पाठऊन देतो रा० फडनीस बाबाचे पत्र रा० जनार्दन अपाजी यास देणे आलस न करणे आयली पत्रे आहेत ती वाचून पाहाणे आणखी साधनपत्रें पाहि-जेत म्हणतील तर लिहिणे त्याप्रा। लिहोन देऊ पत्रे खबरदार जतन राखणे खर्च वेच विचारे करणे मागे दुसरा कोणी मेलवणार नाहीं हे समजोन वर्त-णुक करणे रा। उपाध्ये याकडील रुपयाचे लिहिले त्यास वाकड्याकडील हुंड-(णा)वल भा(फा)र पडेल सागराकडील कोणी ग्रहस्त त्याणी तितला पाठवितात त्याचा यैवज मोबदला करून सागरी रा। केसोपंत याकडे उत-

रणे म्हणजे हुडणावल थोडी पडेल यैसे आहे त्यामध्यें तुमची आमची भेट होईलच तेव्हा आणखी कितेक सांगणे ते सागों लोभ कीजे हे आसीर्वाद

गुरुवर्य रा० माहादाजीपंत स्वामीस सास्टाग नमस्कार रु॥विसी आपले भग्वशावर आहो आपण (पुढील २ ओळी न समजण्याच्या स्थितींत आहेत).

ले०२६३ (नकल) श्री मंगळवार, ता० २०।९।१७८५.

[स्व०] ११२ विस्वावसु नाम सवत्छरे भाद्रपद बहुल द्वितीया भामवासरे [क्ष०(सिव) (रा० केदारजी निकम मुद्राधारी व जगनाथ पांडुरंग सबनिवीस कारकून किले पावनगड)] रा० नारोबा ना० बिन केशव ना० गोत्र कौसिक सूत्र आश्वलायन उपनाम मावलंगेकर सरदेसाई मा० प्रभानवली सुभा प्रांत राजापुर व दाभोल यांणी स्वामींसंनिध्ध किले पनालियाचे मु॥ येऊन विनंति केली कीं आपले पुरातन सुभा मारचे सरदेसाईपणाचे वतन चालत आहे प्रस्तुत ता॥ असडोली गावगना येथील वतन सरकारात अनामत आहे माहाराज कृपाळु होऊन पुरातन भोगवटाप्रमाणे सरदेसाईपणाचे वतन व हक कानुकाइदे करार करून देऊन भोगवटियास सनदा सादर व्हाव्या म्हणोन विदित केलें त्यावरून स्वामी कृपाळु होऊन ता॥ मार येथील सरदेशकपणाचे वतन व हक इनाम गावगना भोगवटेप्रमाणे करार करून दिल्हे असे तरी तुम्ही किले मारचे तनखेस जे गांव असतील तेथे सदरहूप्रमाणे सरदेसाईपणाचे वतन व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवीत जाणे दरसाल [क०][ब०(सरदेसाइ)] जा० निदेश समक्ष मो०

ले० २६४ श्रीनरहरिवरद

चिरंजीव रा० भगवंतराव यासप्रति रगोबा ना० सरदेसाई आसीर्वाद उपरी येथील क्षेम ता॥ आश्विन वा॥ १० पावेतो वर्तमान यथास्थित असे वि० केसोपत टिलक याजकडील काम अद्याप जाहाले नाही जाहाले म्हणजे येऊ साल मारीं मामलेदार नगर याजकडे ठरली पुढे र॥ बच्याजीपंत मोडक दाभोलेचे गेले आहेत मागाहून पांडोबा केलकर घरी गेले दिवाली

करून अंजणवेलीस येतील येथे बच्याजीपंत यास तांकीद पांडो जिवराव गोधलेकर याणी केली आहे की सरदेसाई याचे हकास येकंदर उपद्रव करू नये यैसी केली त्याणीहि मान्य केले आहे यैसे असोन ताकीद रयेतीस केली असतां तावडतोब बातमी कलवावी व कोढरचे कारसाईचेहि संधान जमवावे वरकड विशेष लिहावे यैसे नाहीं दुकानचे रुा मोराबा वेरगावकर याजवल पंचवीस पोचले तो येथे आला आहे ० ० ० ० ० मत नाही चितला आम्हास सोडित नाही मोठे अडच ० ० ० ० ० त्यास त्याचे घरी निकड करून रुा आले तरी देऊन घरी द्यावे म्हणजे खर्चास येतील कलावे कारभार केला तेवढा उरफाटा पडला कलावे लोभ कीजे हे आसीर्वाद चिरजीव बापूस घेऊन मामलेदार याची भेट घ्यावी हे आसीर्वाद

हे।। बाबाजी संभाजी याचे सां न० विनंति खण दोन चिखलीकर कदम याजबा। पाो आहेत पावतील ती॥ आत्या लस्करात गेले आहेत कलावे लोभ कीजे हे विनंति

ले० २६५ श्री

[रा०] विष्णुपंत अणा स्वामीचे सेवेसी—

पाो लक्ष्मण सदासिव कुलकर्णी सां न० विनंति येथील कुशल ताां छ ११ जिलकाद पावेतो वर्तमान यथास्थित असो विशेष रा० मगवंतराव सरदेसाई याचे हकाची मनाई केली आहे त्यास देसाई येथे आहेतच ठरण्यांत येईल त्याप्राा करावयास येईल तुम्हांकडून त्याचे हकाची मनाई होऊ नये यजमानाजवळ देसाई व आम्ही बोलोन यशमानाचे पत्र मागाहून घेऊन पाठऊ बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति कावर्डे (सेतवडे ?) वगैरे माहालानिहाय तेथे आपसाकडून उपसर्ग होऊन बोभाट न येई असे करावे हे विनंति

हे।। पत्री बच्याजी मोरेश्वर निंबकर साा नम० विनंति ऐसीजे सविस्तर मार वर लिहिला आहे त्याप्राों व्हावे बहुत काय लिहावे लोभ करावा हे वि॥

लें० २६६ शि० ९।७ श्री ता०२२।४।१७१२.

(काव्येतिहाससंग्रहावरून उतारा)

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३८ नंदननामसंवत्सरे चैत्र बहुल त्रयोदशी भोमवासरे क्षत्रियकुलावंतस श्री राजा शिव छत्रपति स्वामी यांणीं राजश्री कृष्णाजी भास्कर उपनाम पंडित गोत्र काश्यप यांस दिलें इनामपत्र ऐसीजे. तुम्ही स्वामींचे पुरातन सेवक, स्वामींच्या पायांशीं निष्ठा धरून अंतःकरण पूर्वक सेवा केली. किल्ले विशाळगड अवरंगजेबानें हस्तगत करून उदितसिंग रजपूत किल्ले मजकुरीं ठेवून मनसुबी केली, तें स्थळ स्वामींच्या शासनावश व्हावें या गोष्टिचा प्रयत्न तुम्हीं विशेष केला. उदितसिंगाशीं राजकारण करून त्याला खालीं उतरिलें ते समयीं आपला भाऊ केशव भास्कर यास उदितशिंगाच्या समागमें त्याच्या देशास जावयास दिलें आणि स्थळ स्वामींच्या शासनावस केलें. ते समयीं तुमच्या विषयीं रा० परशराम पंडित प्रतिनिधी यांणीं एक गाव इनाम करून द्यावा म्हणून विनंति पूर्वी केली होती, ती सांप्रत तुम्हीं स्वामींची सेवा प्रेमभावें करून स्वामीस संतोषी करून एक गांव आपणास लेंकराच्या लेंकरीं च।ले ऐसा इनाम करून दिला पाहिजे म्हणून पन्हाळ्याच्या मुक्कामीं तुम्हीं स्वामीसंनिध विनंति केली, त्याजवरून स्वामी तुमच्या सेवेवरी संतोषी होऊन तुम्हास नूतन इनाम कुलबाब कुलकानू देखील हल्लीं पट्टी व पेस्तरपट्टी झाडझाडोरा व जल तरु पाषाण सहित, खेरीज हक्कदार व इनामदार करून मौजे कलबस्तें तर्फ संगमेश्वर देहे १ एक रास इनाम आजरामरामत करून दिला असे, तरि तुम्ही मौजे मजकूर पूर्व मर्यादेप्रमाणें चतुःसीमा याचे स्वाधीन करून हरदू इनाम तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवून स्वामींची सेवा करून सुखरूप राहणें. स्वामी तुम्हास मौजे इनाम सुरक्षीत चालवितील. जाणिजे. निशाण निदेश समक्ष "मो०"

भाग दुसरा समाप्त.